
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाकडून
अनुदान मिळालेला ग्रंथ

भारतीय स्त्री

(हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्थेचे माणिकमहोत्सव प्रकाशन)





१९६७

हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था

पुणे

प्रकाशक
के. रा. पालकर
चिटणीस, हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था
कर्वेनगर, पुणे ४

किंमत दहा रुपये

आवृत्ति पहिली, डिसेंबर १९६७

मुद्रक
त्रि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४ (बी आर)

विक्रेते
मॅजेस्टिक बुक्स इंटरनॅशनल (?)
३५ सी, ताडदेव रस्ता, मुंबई ३४ (डब्ल्यू बी)

विभाग तिसरा—स्त्रीजीवनाच्या समस्या

विभाग चौथा—पुढची वाटचाल

निवेदन

हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेचा माणिक महोत्सव साजरा करण्यासाठी जी कार्यकारी समिती नेमण्यात आली तिने निरनिराळ्या कामांकरिता अनेक पोटसमित्या नेमल्या. त्यांमध्ये महोत्सवाच्या निमित्ताने संस्थेचा गेल्या दहा वर्षांचा अहवाल व स्मरणिका तयार करण्यासाठी एक लहानशी प्रकाशन समितीही नेमण्यात आली. या समितीच्या पहिल्याच सभेत डॉ. सरोजिनी बाबर यांनी माणिक महोत्सवाच्या निमित्ताने स्त्रीजीवनविषयक लेखांचा एक संग्रह संस्थेने प्रसिद्ध करावा अशी कल्पना पुढे मांडली. ती सर्वांना पसंत पडून प्रकाशन समितीवर आणखी काही मंडळी स्वीकृत करून घेण्यात आली.

या समितीने ग्रंथाची रूपरेषा मुक्रर करून भारतीय स्त्रीच्या वेदकालापासून आतापर्यंतच्या वाटचालीचा परामर्श घेणारा ग्रंथ प्रसिद्ध करावा असे ठरविले. त्यासाठी निरनिराळे कालखंड पाडण्यात येऊन त्या त्या विशिष्ट कालखंडाचा अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांकडून लेख लिहून घ्यावेत असाही निर्णय घेण्यात आला. निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह असे ह्या ग्रंथाचे स्वरूप निश्चित झाल्यावर लेखांची व लेखकांची योजना समितीने निर्धारित केली. परंतु लेखक देशभर पसरलेले व आपापल्या उद्योगात निमग्न; तेव्हा ते लेख लिहिण्याचे मान्य करतील की नाही व केल्यास लेख वेळेवर मिळतील की नाही याबद्दल किंचित शंका होती. पण सर्वांनी समितीच्या विनंतीला तात्काळ होकार दिला व लेख तत्परतेने पाठविले हे नमूद करणे आवश्यक आहे. समिती या सर्व विद्वानांची फार ऋणी आहे.

आलेल्या लेखांची यथायोग्य जुळणी करून त्यांना ग्रंथाचे स्वरूप देण्याचे काम प्रा. श्री. ना. बनहट्टी व प्रा. मो. ज्ञा. शहाणे या संपादकद्वयाकडे समितीने सोपविले. हे काम फार जबाबदारीचे व जरासे नाजूक होते. पण सर्व लेखकांच्या सौजन्यपूर्ण सहकार्याने संपादक त्या कामात यशस्वी होऊ शकले.

भारतीय स्त्रीच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय वा सांस्कृतिक जीवनाच्या प्रगतीचा विस्तीर्ण कालखंडातील परामर्श निरनिराळ्या लेखकांनी विविध दृष्टिकोणातून घेतलेला या ग्रंथात आढळेल. अर्थात काही बाबतीत लेखकांची मते परस्परांशी तितकीशी जु ,माल। चिप्रमाणे अपरिहार्य आहे. तसेच एका विशिष्ट दृष्टिकोणानेच लेख लिहावेत असा संप न' या आग्रह नव्हता.

ाडे यांनी

ग्रंथातील लेखांत व्यक्त केलेले सर्वच विचार हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थ दून दास- समिती वा संपादकद्वय यांना मान्य आहेत असे नाही. त्यांबद्दल मतभेद अस लेखसंग्रहात आहे. पण त्यामुळे ग्रंथाच्या गुणवत्तेस उणेपणा येतो असे मुळीच नाही. किं येतो — आहेत हे आपले वैचारिक जीवन कुंठित नसून प्रवाही आहे याचेच लक्षण व

स्त्रियांचे प्रश्न मुख्यतः विवाहसंस्थेशी निगडित, तेव्हा आर्यांच्या अनाद्यनंत इतिहास-पुराणात विवाहसंस्थेचे जे विविध स्वरूप दृष्टीस पडते, समूह विवाहापासून कडक पातिव्रत्यापर्यंत त्यात जे वेळोवेळी फरक पडत गेले, सुधारणा होत गेल्या त्याची साद्यंत चर्चा व विवरण या ग्रंथात वाचावयास मिळेल. त्याचप्रमाणे स्त्रियांचे आपल्या समाजातील स्थान व कर्तबगारी, त्यांच्या समस्या व भविष्यातील जीवनविकासाची संभाव्य दिशा यांवरील विचार उद्बोधक ठरतील. मराठी भाषेत या विषयावर सर्वांगीण विचार करणारा हा पहिलाच ग्रंथ असावा.

अशा प्रकारच्या ग्रंथात संपादकाचे काम बव्हंशी संकलनकाराचेच राहते. श्री. म. रा. मित्रगोत्री यांनी अतोनात परिश्रम घेऊन अल्प कालावधीत सर्व लेखांच्या टंकलिखित प्रती तयार करून दिल्या, त्यामुळे या संकलनास फार मदत झाली. प्रकाशन समितीचे निमंत्रक श्री. भा. धों. कर्वे यांचे निरलस साहाय्य झाले नसते तर ग्रंथसंपादनाचे व प्रकाशनाचे काम कितपत निभावले गेले असते याची शंकाच आहे. ग्रंथाबद्दल व लेखाबद्दलच्या पत्रव्यवहाराचे सर्व काम त्यांनी सांभाळले, प्रुफे तपासण्याचा बोजाही अंगावर घेतला व संपादकांचा भार हलका केला. त्यामुळे या ग्रंथाच्या यशाचे निम्म्याहून अधिक श्रेय त्यांना व त्यांचे सहकारी श्री. के. रा. पालकर यांना आहे हे येथे नमूद करणे अवश्य वाटते.

या ग्रंथाची आकर्षक रचना व सुंदर छपाई यांमध्ये श्री. बापूराव नाईक यांचा सल्ला व मौज प्रिंटिंग ब्यूरोचे कौशल्य यांचा मोठा भाग आहे. या उभयतांच्या सहकार्यानेच ग्रंथ इतका सुबक व बकाशीर तयार होत आहे.

या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याची विनंती महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे अध्यक्ष व मराठी विश्वकोशाचे संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना करताच त्यांनी आपल्या विविध कार्यातून वेळ काढून ती लिहिली याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच.

साडेतीनशे पानांचा हा ग्रंथ वाचकांच्या हाती देणे प्रस्थमूल्याखेरीज कसे शक्य होणार याचीही चिंता होतीच. परंतु तिचे अंशतः निरसन साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या पाच हजार रुपयांच्या अनुदानाने झाले याबद्दल प्रकाशन समिती कृतज्ञ आहे.

शेवटी जोडलेल्या ग्रंथसूचीची जुळणी करण्याचे कामी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या नेणकुरकर व पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. हिंगवे यांची झाली. त्याचप्रमाणे मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांनी आकर्षक वेष्टन तयार करून दिले. या सर्वांची प्रकाशन समिती अत्यंत

दास्य वा पारतंत्र्य पवित्र म्हणून मानले गेले होते. परंतु त्या इतिहासात वैदिक व्हा सप्तपदी नामक विवाह संस्कार करणाऱ्या एका विशिष्ट भारतीय सामाजिक गटात पत्नी ही अखेरच्या सातव्या पावलाने मित्र बनावी अशी पती अपेक्षा करतो. (सखा सप्तपदा भव ।). परंतु हा सख्याचा आदर्श आतापर्यंत मानवी व भारतीय कुटुंबसंस्थेत केवळ दूरचा काल्पनिक आदर्श म्हणूनच राहिला आहे. पटरफोटाची चाल असो वा नसो, दोन्ही ठिकाणी स्त्री ही पायाची दासी तरी असते किंवा निदान पतीच्या हुकमतीखाली राबणारी अबला तरी असते. परंतु त्यातल्या त्यात पुत्र व कन्या यांच्यासंबंधी असलेला दृष्टिकोण पुष्कळच सुधारलेला आहे.

परंतु आता या औद्योगिक क्रांतीच्या वातावरणात व नव्या सार्वजनिक शिक्षण-संस्थांच्या कक्षेत जन्मलेली व वावरणारी मुले मातापितरांच्या नैतिक प्रभावातून निसटून जाऊ लागली आहेत. मातापितरांचे व संततीचे जिव्हाळ्याचे व एकात्मतेचे संबंध शिथिल होत आहेत. त्यामुळे उनाड व बकाल जीवनाची कक्षा रुंदावत आहे. त्यामुळे पहिल्या शिक्षणाच्या वयात ज्या प्रकारचे सकस नैतिक व्यक्तिमत्त्व निर्माण व्हावयास पाहिजे ते तसे निर्माण होणे कठीण होत चालले आहे. अनेक प्राचीन व आधुनिक सामाजिक ध्येयवाद्यांनी, प्लेटोपासून आजपर्यंतच्या मोठमोठ्या समाजवाद्यांनी कल्पनेने निर्माण केलेल्या अद्भुतरम्य आदर्श समाजात व्यक्तिनिष्ठ कुटुंबसंस्था राहू शकत नाही वा तिची गरज नाही असे जे भविष्य वर्तविले आहे, त्याची भुरळ फार भयानक आहे. या समाजवाद्यांना विश्वशांति मानव्याचे अधिष्ठान हे स्वतंत्र नैतिक व्यक्तिमत्त्वच होय, याचा विसर पडला आहे. ही विस्मृती समाजवादी क्रांतीच्या परिसरात माणसांना यंत्राचे जडभाग बनवील आणि माणसाच्या सुंदर षोडश जीवनकलांना (प्रश्नोपनिषद्), निस्तेज व निर्जीव करील. हा धोका टाळणारी शिक्षणपद्धती कशी निर्माण करता येईल, हा नव्या विज्ञानयुगाचा यक्षप्रश्न आहे.

२. या प्रस्तुत लेखसंग्रहात भारतीयांच्या प्राचीन विवाहसंस्थेचा, कुटुंबसंस्थेचा व स्त्रीपुरुषसंबंधाचा विस्तृत परामर्श प्रथम अनेक लेखकांनी घेतला आहे. भारतीयांच्या विवाहसंस्थेत व कुटुंबसंस्थेत इतिहासपूर्व कालापासून अनेक परिवर्तने झालेली प्राचीन भारतीय साहित्यावरून दिसून येतात. विविध प्रकारच्या विवाहसंस्थांचीही नोंद धर्मसूत्रे, महाभारत, मन्वादी स्मृतिग्रंथ आणि अन्य साहित्य यात केलेली आढळते. या विविध विवाहसंस्थांचा विविध सामाजिक संस्थांशी कार्यकारण संबंध असावा असेही अनुमान करता येते. कै. इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांनी चित्रमयजगत या मासिकात लेखमाला लिहून या विविध प्रकारच्या विवाहसंस्थेचा इतिहास सांगितला आहे. त्याचप्रमाणे विशेषतः कै. डॉ. अ. स. अळतेकर यांनी 'हिंदु संस्कृतीत स्त्रियांचे स्थान' या सुप्रसिद्ध प्रबंधात या विषयाचा अथयावत ऊहापोह केला आहे. कै. राजवाडे यांनी विवाहविषयक वैदिक मंत्रांचा अर्थ एका विचित्र सामाजिक उपपत्तीने व्युत्पादून दाखविला आहे. तो फार थोड्यांना पटला तरी विचार्य आहेच. या प्रस्तुत लेखसंग्रहात प्राचीन विवाहसंस्थेचे विवरण केलेले आहे, त्यासंबंधी येथे थोडासा परामर्श घेतो —

महाभारतात विवाहसंस्थेचा इतिहास इतर कोणत्याही प्राचीन भारतीय साहित्यापेक्षा अधिक प्रमाणात सापडतो. मानवी विवाहसंस्थेचा इतिहास संकलित करण्याचा फार मोठा प्रयत्न पश्चिमी विद्वानांनी केला आहे; अतिप्राचीन काळी समूहविवाह होता की नाही याबद्दल त्यांच्यात मतभेद आहे. त्यांच्या विचारांच्या संदर्भात महाभारतातील इतिहासाचा विचार करता एक मुद्दा मुख्यतः वादग्रस्त ठरतो, तो म्हणजे समूहविवाहाचा. महाभारतात कुन्तीला पंडूने सांगितलेल्या श्वेतकेतूच्या कथेवरून (महाभारत पर्व १ अध्याय १२२, मुंबई प्रत) विवाहसंस्थेच्या तीन अवस्था दर्शित केलेल्या दिसतात. पंडू म्हणतो — महात्म्या धर्मवेत्त्यांनी सांगितलेल्या प्राचीन इतिहासात असे म्हटले आहे की, पूर्वी स्त्रिया मोकळ्या होत्या; त्या स्वतंत्र यथेच्छ विहार करीत. पतीची पर्वा न करता अन्यत्र संभोग घेतला तरी अधर्म होत नसे. हा धर्म अजून उत्तर कुरू देशात प्रचलित आहे. त्या सनातन धर्माला उद्दालक ऋषीचा पुत्र जो श्वेतकेतू त्याने बंदी घातली. असे एकदा झाले की, श्वेतकेतूचे वडील उद्दालक ऋषी यांनी आपल्याकडे अतिथी आलेल्या मित्राबरोबर लैंगिक संभोगार्थ जाणाऱ्या आपल्या पत्नीला अडथळा केला नाही, त्याबरोबर श्वेतकेतू क्षुब्ध झाला. तेव्हा उद्दालक ऋषी म्हणाले की, सर्व वर्णांतील स्त्रियांना आपआपल्या वर्णात हे भोगस्वातंत्र्य आहे, हा सनातन धर्म आहे. त्या ऋषिपुत्र श्वेतकेतूस हे सहन झाले नाही. त्याने जबरदस्तीने नवीन नियम असा घालून दिला की, आजपासून कोणत्याही लग्न झालेल्या स्त्रीने पतीचे असे अतिक्रमण केल्यास तिला पातक होईल. असा पातिव्रत्याचा नियम श्वेतकेतूने घातला. म्हणून पतीने नियुक्त केले तरच किंवा त्याची अनुमती असेल तरच स्त्री अन्य पुरुषापासून पुत्रसंतती निर्माण करू शकते किंवा लैंगिक संबंध त्याच्याशी ठेवू शकते. सौदास राजाने नियुक्त केलेल्या मदयंती नामक पत्नीच्या ठिकाणी वसिष्ठापासून अश्मक राजा जन्मला. ऋतुकाली स्त्रीने पतिव्रता म्हणून राहावे. ऋतुकाल नसताना तिला संपूर्ण स्वातंत्र्य आहे.

महाभारतातील या संदर्भावरून प्राचीन विवाहसंस्थेच्या तीन अवस्था सूचित होतात. (१) विवाहित स्त्रीस स्ववर्णामध्ये म्हणजे स्वतःच्या सामाजिक वर्गामध्ये संभोगस्वातंत्र्य, (एक प्रकारे समूहविवाहाचा हा अवशेष.) (कुले कन्या प्रदीयते।), (२) विवाहित स्त्रीस पतीने वा पती नसल्यास कुलप्रमुखाने नियुक्त केल्यास अन्य पुरुषापासून पुत्रोत्पत्तीचा वा अन्यत्र संभोगाचा अधिकार व (३) पती अक्षम असेल किंवा मृत झाला असेल तर केवळ दिरापासून संतती निर्माण करण्याचा अधिकार. दुसऱ्या अवस्थेत उच्चवर्णीय किंवा समानवर्णीय अन्य पुरुषापासून संतती निर्माण करण्याचा अधिकार स्त्रीला होता. तिसऱ्या अवस्थेत पती नसताना केवळ पतीच्या बंधूपासूनच आपत्काली संतती निर्माण करण्याचा अधिकार राहिला. ही तिसरी अवस्था महाभारतात अन्यत्र व स्मृतीमध्ये स्पष्ट सांगितली आहे. हाही अधिकार पुढे विवादग्रस्त झाला आणि कालांतराने अमान्य ठरला. तिसरी अवस्था अनेक पुत्रप्रकार सांगताना मान्य करून पुनः दुसरीकडे मनूने अमान्य केली आहे.

धर्म सूत्रादी धर्मशास्त्र ग्रंथांमध्ये विवाहाचे काहींनी (वसिष्ठ व आपस्तंब) सहा प्रकार

व पुष्कलांनी आठ प्रकार सांगितले आहेत. ब्राह्मण, प्राजापत्य, दैव, आर्ष, गांधर्व, राक्षस, आसुर व पैशाच असे आठ प्रकार एकंदरीत धर्मशास्त्रात वर्णिले आहेत. या विवाह-प्रकारांच्या परिगणनेमध्ये स्वयंवर हा प्रकार एक निराळा प्रकार म्हणून सांगितलेला नाही. तो न सांगण्याचे कारण, या आठ प्रकारांपैकी कोणते प्रकार कोणत्या वर्णास प्रशस्त या अप्रशस्त होत, हे वर्णभेदाने स्मृतिकारांना सांगावयाचे असल्यामुळे सर्व वर्णांकरिता वैध मानलेला स्वयंवर विवाहप्रकारांमध्ये सांगितला नाही. हा स्त्रीने स्वेच्छेने निवडलेल्या वराशी होणारा विवाह होय. ऋतुमती म्हणजे वयात आलेली कन्या ब्राह्म विवाहपद्धतीने विवाहित होण्याची गरज नाही असा गौतम, बौधायन, वसिष्ठ इत्यादी धर्मशास्त्रकारांचा अभिप्राय दिसतो. तीनदा ऋतुमती झाल्यानंतर स्त्री स्वयंवर करण्यास मोकळी असते असे त्यांचे मत दिसते. मनूने ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेपर्यंत वडिलांची वाट पाहून कन्येने स्वयंवर करावा असे म्हटले आहे. याज्ञवल्क्याच्या मते दाता नसेल तर कन्येने स्वयंवर करावा. महाभारतात व अन्यत्र स्वयंवराची अनेक उदाहरणे सांगितली असून स्वयंवर प्रकार हा क्षत्रियास अधिक प्रशस्त होय असे म्हटले आहे.

आठ विवाहप्रकारांमध्ये विवाहाचा प्रत्यक्ष धार्मिक संस्कार किंवा मंत्रपूर्वक विधीने होणारा संस्कार ज्यात आहे असे पहिले चार प्रकार होत. ब्राह्म म्हणजे विधिपूर्वक कन्यादान (अर्थात् बालविवाह). दैव म्हणजे यज्ञामध्ये यजमानाने इतर द्रव्यदक्षिणेबरोबर ऋत्विजास करावयाचे कन्यादान. प्राजापत्य म्हणजे वधूवरांमध्ये दोघांनी एकनिष्ठ राहून धर्माचरण करावयाचे अशा प्रतिज्ञेने मंत्रपूर्वक विवाहबद्ध होणे; यात एकपत्नीव्रत विवक्षित आहे. आर्ष म्हणजे कन्येच्या पित्यास गोमिथुनाचे दान करून विवाहबद्ध होणे. हे चारी विवाहप्रकार मंत्रप्रधान भारतीय संस्कृतीचे दर्शक आहेत. हे पहिले चार ब्राह्मणवर्णास विहित आहेत, परंतु त्यातल्या त्यात पहिला उत्तम, दुसरा दुय्यम, अशा क्रमाने ब्राह्मण-वर्णास ते प्रशस्त मानले आहेत. (मंत्रप्रधान संस्कृतीचे असतील तर) क्षत्रियवैश्यांनाही काही स्मृतिकारांनी पहिले चार विहित मानले आहेत. ऐतिहासिक पद्धतीने विचार केल्यास क्षत्रिय व वैश्य यांच्यामध्ये वैदिक संस्कृतीचे असलेले व वैदिक संस्कृतीचे नसलेले असे दोन प्रकार इतिहासपूर्व कालापासून चालत आलेले आहेत. वैदिक संस्कृती न स्वीकारलेल्या अथवा वैदिक संस्कृतीची विशेष छाप नसलेल्या क्षत्रियांना हे पहिले चार प्रकार विहित नाहीत; असे स्मृतींच्याच मतभेदाच्या विश्लेषणावरून दिसते. मंत्रप्रधान संस्कृतीच्या सामाजिक वर्गातही प्राथमिक अवस्थेत एक प्रकारचे शैथिल्य असते त्यामुळे नियमधर्म कटाक्षाने पाळले जात नसतात.

गांधर्व, राक्षस, आसुर व पैशाच असे, वैदिक किंवा मंत्रप्रधान संस्कृतीची छाप नसलेल्या आर्य व आर्येतर सामाजिक वर्गामधील रूढ असलेले चार विवाहप्रकार होत. परंतु हेही वर्ग मंत्रप्रधान संस्कृतीकडे झुकलेले असल्यास पहिल्या चार प्रकारांचाही स्वीकार करतात; जेव्हा दोन्ही संस्कृतींचे साहचर्य घट्ट लागले तेव्हा गांधर्व म्हणजे प्रेमविवाह मान्य झाला. प्रेमवश होऊन स्त्रीपुरुष युग्माने एकांतात विवाहबद्ध होण्याचा संकल्प केला व

संभोग केला की हा विवाह सिद्ध होतो. मुळामध्ये या विवाहाला धार्मिक विधीची आवश्यकता नव्हती. दुष्यंत व शकुंतला अथवा पराशर व मत्स्यगंधा यांचे विवाह गांधर्वविवाहाची उदाहरणे होत. धर्मशास्त्रात व महाभारतात अनेक ठिकाणी क्षत्रियांना गांधर्वविवाह, किंवा स्वयंवर, सर्व विवाहपद्धतीत अधिक प्रशस्त होय असे सांगितलेले आहे. काही स्मृतिकारांनी, आसुर व गांधर्व हे दोन्ही विवाह ब्राह्मणास आपत्काली योग्य होत असे म्हटले आहे. राक्षसविवाह म्हणजे पितृकुलातून कन्येस जबरदस्तीने, वेळ पडल्यास लढा देऊन, पळवून आणणे व विवाहबद्ध होणे हे होय. महाभारत व पुराणे यांमध्ये अशा प्रकारची उदाहरणे दिली आहेत. त्यांत कृष्ण-रुक्मिणी विवाह हे उदाहरण सुप्रसिद्ध आहे. आसुरविवाह म्हणजे कन्येच्या पालकांना मागतील ती किंमत देऊन कन्या विकत घेणे होय. ब्राह्मणाशिवाय बाकी तिन्ही वर्णांना या विवाहाची परवानगी काही स्मृतिकारांनी दिली आहे. परंतु एका मूळ नैतिक सिद्धान्ताच्या आधारे काही स्मृतिकारांनी हा विवाह गर्ह्य मानला आहे. धर्मनिबंधकारांनी केवळ अपरिहार्य असल्यासच हा गौण प्रकार विवाह म्हणून मान्य केला पाहिजे, असा निर्णय दिला आहे. तो मूळ नैतिक सिद्धान्त म्हणजे मनुष्याचा क्रयविक्रय गर्ह्य होय असा सिद्धान्त महाभारत व अन्यत्र स्मृतींमध्ये प्रतिपादिला आहे. पैशाच विवाह म्हणजे झोपलेली, बेसावध वा मद्य पाजून झिंग आणलेली कन्या जबरदस्तीने पळवून तिच्याशी विवाहबद्ध होणे. हा विवाहप्रकार काही स्मृतिकारांनी संपूर्ण निंद्य म्हणून त्याज्य ठरविला आहे. परंतु आपत्काली अपरिहार्य म्हणून तोही विवाहप्रकार वैध मानला पाहिजे असा काही स्मृतिकारांचा व धर्मनिबंधकारांचा आशय आहे. देवलादी स्मृतिकारांनी (मनुस्मृती टीका गोविंद राजीया अ. ३, श्लोक ३२) म्हटले आहे की गांधर्वादी म्हणजे गांधर्व, राक्षस, आसुर हे विवाह लौकिक पद्धतीने झाल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनी समंत्रक धार्मिक विधी करून विवाहबद्ध व्हावे आणि अप्राशस्त्याचा दोष नष्ट होण्याकरिता प्रायश्चित्त आचरून शुद्ध व्हावे म्हणजे हे तिन्ही विवाह वैध ठरतात. वैखानसगृह्यसूत्रात (३, १२) आठही विवाहप्रकार अनुक्रमे पहिला शक्य नसल्यास दुसरा अशा प्रकारे ब्राह्मणाने सुद्धा करण्यास हरकत नाही असे काही धर्मशास्त्रकारांचे मत सांगितले आहे. या आठ प्रकारांमध्ये ब्राह्मणदृष्ट्या क्रमाने, पुढचे पुढचे कमी प्रतीचे परंतु वैध ठरतात, एवढाच या स्मृतिकारांचा अभिप्राय दिसतो. स्मृतिकारांमध्ये असलेले मतभेद तारतम्याने मिटविण्याचा धर्मनिबंधकारांनी प्रयत्न केला आहे. कामदेव हा जेथे देवादिकांवरही अधिकार अप्रतिहत गाजवतो तेथे ब्राह्मणादी मानवाचा काय पाड? म्हणून सर्व विवाहप्रकार तारतम्याने शहाण्या धर्मशास्त्रकारांनी वैध ठरविले आहेत.

तात्पर्य असे की, धर्मसूत्रे व स्मृती यांच्या काळात भारतीय संस्कृती एका साच्यात आणण्याचा प्रयत्न झाला नाही. विवाहसंस्थेच्या विविध प्रकारांमध्ये संमिश्रता त्यामुळेच प्रतिबिंबित झालेली दिसते. ब्रिटिशांच्या आगमनापर्यंतच्या गेल्या दोन हजार वर्षांच्या काळातही ही संमिश्रता, प्रदेश, जमाती, संप्रदाय, जाती यांच्या भेदाने तशीच कायम टिकून राहिली आहे. बौद्ध, जैन, शैव व भागवत असे विश्वधर्म उदयास आले. त्यांपैकी

श्री. वा. मो. कानिटकर यांच्या 'पुराण कालातील स्त्री-जीवन' या लेखातील–त्या काळात सतीची चाल रूढ होती. इ. स. पूर्व १५० ते इ. स. २५० पर्यंत उत्तर हिंदुस्थानात ही चाल सर्वत्र मान्य होती···पुढेही इ. स. १२०० पर्यंत बहुतेक सर्व हिंदुस्थानात ही चाल प्रचलित होती' (पृ. ४७) हे वाक्य. २५० पर्यंत व १२०० पर्यंत या पर्यंतांची संगती लागत नाहीं. प्रा. संत यांच्या लेखात भूतदयावादी दृष्टिकोण पहिल्या सुधारकांना लावला आहे; सुधारकांच्या दुसऱ्या पिढीचा पहिल्या पिढीपेक्षा निराळा दृष्टिकोण व्यक्तिस्वातंत्र्यवाद हा दाखविला आहे; असे दाखविणे बरोबर नाही. उदारमतवादाचे भारतीय अध्वर्यू कै. न्या. मू. रानडे हे पहिल्या पिढीतील मोठे सुधारक होत. उदारमतवादाचे मूलतत्त्वच व्यक्तिस्वातंत्र्य हे होय. व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व पश्चिमी संस्कृतीमध्ये आधारभूत तत्त्व म्हणून दृढमूल झाल्यानंतरच पहिले पश्चिमी विद्याविभूषित भारतीय सुधारक जन्मले, हे लक्षात घेतले म्हणजे पहिल्या सुधारकांचा दृष्टिकोण भूतदयावादी व दुसऱ्या पिढीतील सुधारकांचा व्यक्तिस्वातंत्र्यवादी असा भेद दाखविता येत नाही.

या माणिकमहोत्सवाच्या निमिताने प्रसिद्ध होणाऱ्या या लेखसंग्रहाच्या रूपाने मराठी साहित्यात एका मूलभूत सामाजिक विषयावरील सर्वांगीण चर्चेची भर टाकली आहे, याबद्दल हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्थेच्या संचालकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

वाई
दिनांक १७–११–६७
त्रिपुरी पौर्णिमा

लक्ष्मणशास्त्री जोशी

विभाग पहिला

स्त्रीजीवन : वेदकाळापासून आजपर्यंत

१. महाभारतपूर्व वेदकालातील स्त्रीजीवन
हरि रामचंद्र दिवेकर

२. सूत्र व स्मृति कालांतील स्त्रीजीवन
विठ्ठल महादेव बेडेकर

३. पौराणिक कालातील स्त्रीजीवन
बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर

४. अभिजात संस्कृत वाङ्मयातील स्त्री
वसंत गजानन राहूरकर

५. ऐतिहासिक कालातील स्त्री
राजाराम विनायक ओतुरकर

६. लोकसाहित्यातील स्त्री
सरोजिनी बाबर

७. आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री
दुर्गादास काशीनाथ संत

१

महाभारतपूर्व वेदकालातील स्त्रीजीवन

हरि रामचंद्र दिवेकर

साहित्याचार्य प्रा. हरि रामचंद्र दिवेकर, एम. ए., डी. लिट्. (पॅरिस) (जन्म ५-११-१८८५). सध्या वैदिक संशोधन मंडळ, पुणे येथे संशोधन व संपादनकार्य पूर्वी श्री. ना. दा. ठा. महिला पाठशाला, पुणे, व्हिक्टोरिया कॉलेज, ग्वाल्हेर यांमध्ये संस्कृतचे प्राध्यापक; उज्जैन कॉलेजचे प्राचार्य. भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे व ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स यांच्या स्थापनेच्या खटपटीत अंशभाग. सेवानिवृत्तीनंतरही मध्यभारत एज्युकेशन सोसायटीच्या कार्यात प्रमुख भाग. पुणे, नागपूर व शिवाजी विद्यापीठात वेदांसंबंधी व्याख्याने. वेदांविषयीचा पन्नास वर्षांचा सखोल अभ्यास. (८०, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे ९)

या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण वर्तते ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥

वेदकाळाची विस्तीर्णता : शंभर पिढ्या

वर दिलेल्या विषयावर काही लिहिण्यापूर्वी त्यातील शब्दांचे थोडे स्पष्टीकरण केले पाहिजे. पहिल्याच शब्दातील महाभारत म्हणजे त्या नावाने प्रसिद्ध असलेला ग्रंथ नव्हे, तर ज्या कौरव-पांडव युद्धाचे वर्णन लिहिण्यासाठी महाभारत ग्रंथाची रचना झाली ते युद्धच होय. हे युद्ध केव्हा झाले याबद्दल जरी विद्वानांत मतभेद असले तरी ही घटनाच घडली नाही, असे कोणीही म्हटलेले नाही. त्यामुळे प्राचीन इतिहासात ही घटना एक महत्त्वाचा टप्पा होऊन बसली आहे. आपल्या पुराण ग्रंथांत ह्या युद्धापूर्वी होऊन गेलेल्या जवळजवळ शंभर पिढ्यांचे वर्णन आहे. त्यातील काव्यात्मक भाग काढून टाकला तर त्याच्या मुळाशी परंपरागत इतिहासच सापडतो. हा निव्वळ काल्पनिक नाही. सुमारे शंभर पिढ्यांतील आणि वीसबावीस घराण्यांतील जवळजवळ आठशे राजांची व त्यांच्या कृत्यांची क्रमवार माहिती नुसत्या कल्पनेने देणे असंभाव्य आहे. त्यामुळे असे मानावेच लागते की जुन्या लोकांनी गोळा करून ठेविलेली आणि एकसारख्या परंपरेने ज्ञात झालेली माहितीच या पुराणेतिहासाच्या मुळाशी असली पाहिजे. म्हणून महाभारतपूर्व जीवनाचा विचार जर करावयाचा असेल तर या सुमारे शंभर पिढ्यांच्या कालखंडाचा विचार करावा लागेल.

महाभारतपूर्व शब्दाचे सष्टीकरण केल्यानंतर 'वेदकाल' म्हणजे काय ह्याचा विचार केला पाहिजे. आपल्या जुन्या काय किंवा नव्या काय, कुठल्याच संस्कृत वाङ्मयात हा शब्द सापडत नाही. पाश्चात्य संस्कृत पंडित ज्यास इंग्रजीत 'वेदिक पीरिअड' म्हणतात त्याचे हे मराठी रूप आहे. ह्या कालाची अगदी अलीकडील मर्यादा म्हणजे स्थूल मानाने इ. स. पूर्वी ५०० ह्या पंडितांनी ठरविली आहे.[1] इ. स. पूर्वी ५०० च्या पलीकडे असलेला सारा कालखंड ह्यांच्या मताने वेदकाल समजला पाहिजे. ह्या कालापैकी आपणास केवळ महाभारतपूर्व कालाचाच विचार करावयाचा असल्याने कौरवपांडव युद्धाच्या वेळी वर्तमान असलेल्या वेदव्यासानंतरच्या काळाचा आपणास विचार करता येणार नाही. वेदांच्या संहिता सोडल्या तर बाकीचे सारे वैदिक वाङ्मय वेदव्यासानंतरचे आहे. आज आपल्यापुढे जे पुराणवाङ्मय आहे ते तर अगदीच अर्वाचीन काळात रचले गेले आहे. पण पुराणांतल्या घटना व व्यक्ती मात्र प्राचीन काळातल्या आहेत. एखादा ग्रंथ कुणी लिहिला, केव्हा लिहिला गेला अथवा कुठल्या भाषेत लिहिला गेला, इत्यादी गोष्टींवरून त्या ग्रंथात जे सांगितले आहे त्याचा काल निश्चित करणे न्यायसंगत होत नाही. म्हणून महाभारतपूर्व वेदकालातील जीवन पाहावयाचे असेल तर ते निवळ यज्ञासाठी म्हणून रचल्या गेलेल्या वैदिक वाङ्मयात फारसे सापडणार नाही. असा प्रयत्न करणे म्हणजे बायबल आदी ग्रंथावरून युरोपचा इतिहास लिहिण्यासारखे आहे.[2] पण आपल्या प्राचीन जीवनाविषयी लिहिताना असेच केले गेले आहे. यासाठी आपले खरे प्राचीन जीवन समजून घ्यावयाचे असेल तर नुसत्या वैदिक संहितांव न विसंबता त्यातील माहितीस, जुन्या पुराणग्रंथात 'इति ह आस,' असे घडले म्हणू जे सांगितले आहे त्याची जोड दिली पाहिजे.

महाभारत युद्धापूर्वीच्या एवढ्या अफाट कालखंडातील जीवनाचा विचार करतान आणखी एक अडचण भासते ती अशी की, एवढ्या मोठ्या कालखंडातल्या आरंभाच्य आणि शेवटच्या घटना जर सरमिसळ झाल्या तर त्यातून प्रकट होणारे जीवनविषयक चित्र डोळ्यापुढे उभे राहात नाही. ह्यासाठी त्या कालखंडाची पुढीलप्रमाणे विभागणी केली आहे. वैवस्वत मनूपासून पांडव धर्मराजापर्यंतचा काल विषयाच्या सोयीसाठी अशा विभागला आहे :—

१ मनु ते ययाति	पिढ्या ८
२ ययाति ते जह्नु	पिढ्या १६

आपले लग्न स्वतःच ठरविले, एवढेच नव्हे, तर ते हिच्या कुलात जी पद्धती प्रचलित होती तदनुरूप ठरविले. या विवाहास गांधर्वविवाह म्हणतात. गंधर्व, दानव, देव ही मानवकुलासारखीच आरंभी निरनिराळी कुले होती. कालांतराने ही सारीच मानवकुलात समाविष्ट झाली. गांधर्वविवाहात पुरुषाबरोबर राहण्यासाठी स्त्री विशिष्ट अटी घालते व पुरुषाने त्या मोडल्या तर ती त्यास सोडून जाते. ही गोष्ट शतपथ ब्राह्मणाच्या कालापर्यंत माहीत होती.[1] पुरूरव्याने अट मोडताच उर्वशी त्यास सोडून गेली. लग्नाच्या बाबतीत स्वतःवर बंधन घालण्याची आवश्यकता पुरुषास कधीच वाटली नाही. पुरुषावर बंधन घालण्याची आवश्यकता स्वाभाविकपणे स्त्रीसच वाटावयाची. कारण लग्नाचे परिणाम स्त्रीयच अधिक भोगावे लागतात, आणि म्हणून त्या परिणामास जबाबदार असून जो मोकळा राहू शकतो त्यावर बंधन घालण्याची कल्पना स्त्रीसच प्रथम सुचणे स्वाभाविक आहे.

उर्वशीचा मुलगा आयु. उर्वशीने सुरू केलेली गांधर्वविवाहाची प्रथा हळूहळू रूढ होत होती. पण आईने वडिलांस सोडल्यावर आपल्या पित्याची वेड्यासारखी स्थिती कशी झाली व त्यास आपल्या राज्यास व प्राणास कसे मुकावे लागले[2] हे पाहिल्यामुळे त्याचा परिणाम आयूचे मनावर होणे अगदी साहजिक होते, म्हणून या एकतर्फी—पुरुषास तेवढ्या शर्ती व स्त्री विनशर्त—पद्धतीविषयी त्याचे मन विटले व शेजारच्या दानवकुलातली दानवी प्रभा नावाची मुलगी त्याने जबरदस्तीने हरण करून आणली व तिच्याशी लग्न[3] केले. जबरदस्तीने धरून आणलेल्या स्त्रीशी केलेला पुराणेतिहासातील हा पहिलाच विवाह.

आयूच्या मुलाचे नाव नहुष होते. गांधर्वविवाहाबरोबर मानवकुलात अशी जबरीची लग्नेही लागू लागली. पण नहुषाच्या हे लक्षात आले असावे की अशी बलात्काराने झालेली लग्ने गृहसौख्यास उपयोगी पडत नाहीत. सबब त्याने एक अशी कुमारी शोधली की जिचे लग्न होत नसल्यामुळे बापाच्या घरीच राहून जी मोठी झाली होती. हिचे नाव विरजा होते. अशा रीतीने लाचार झालेल्या विवाहकांक्षिणीस स्वतःच्या अटी घालणे शक्यच नव्हते. नहुषाने विचारताच तिने स्वीकार केला व ह्या दोघांचे लग्न झाले.[4]

दानवकुलात वृषपर्वा नावाचा राजा होता व त्याचा पुरोहित मानवकुलातला शुक्राचार्य नावाचा होता. देवकुलातल्या एका स्त्रीने आपल्या सौंदर्याने शुक्राचार्यास जिंकून त्याच्याशी लग्न केले होते. हिचे नाव जयन्ती होते.[5] व हिच्यापासून शुक्राचार्यांस

ही मुलगी झाली तिचे नाव देवयानी होते. देवयानीच्या बालपणीच जयंती आई तिला सोडून गेली. ही मातृविहीन कन्या शुक्राचार्यांची अत्यंत लाडकी होती. आपल्या पित्याजवळ विद्या शिकावयास आलेल्या एका देवकुलातील गुरुपुत्रावर—कचावर—हिचे प्रेम बसले. पण त्याने हिला झिडकारून टाकले. हिची कथा सर्वविश्रुत आहे. प्रसंगामुळे लाचार झालेल्या देवयानीची नहुषपुत्र ययातीशी गाठ पडताच तिने त्यास वरिले. ययातीने केवळ हिच्याशीच नव्हे तर हिच्याबरोबर आलेल्या वृषपर्वा राजाच्या शर्मिष्ठा नामक कन्येशीही लग्न लावले. पुराणेतिहासात एकाच वेळी दोन स्त्रियांशी लग्न लावणारा हाच पहिला पुरुष.

देवयानी पतिगृही गेल्यानंतर शुक्राचार्यांस साहजिकपणेच एकएकटे वाटू लागले. हे एकाकीपण घालविण्यास त्यांनी विरजेसारख्याच लग्न न होता पितृगृही वाढलेल्या एका स्त्रीस आपली सहचारिणी करण्याचा विचार केला व तिच्याशी विवाह लावला.[१] जयंतीचा जसा शुक्राचार्यांवर दाब होता तसा हिचा राहणे शक्यच नव्हते. उलट शुक्राचार्यांचाच दाब हिच्यावर होता. त्यामुळे एकशृंगा नाव असलेल्या हिचे जे नाव प्रसिद्ध झाले ते होते 'गौः' म्हणजे 'गरीब गाय'.

दुसरा कालखंड : विवाह स्वातंत्र्यावर बंधने

प्रथम कालखंडातील हे स्त्रीजीवन पाहिल्यानंतर आपण द्वितीय कालखंडाकडे वळू. हा कालखंड पहिल्या कालखंडाच्या दुप्पट मोठा आहे. या काळात फारशा घडामोडी झाल्या नाहीत. ययातीचे प्रतिष्ठानचे राज्य, शर्मिष्ठेच्या पूरु नावाच्या मुलास मिळाले व ययातीच्या दुसऱ्या चार मुलांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली. अत्रिवर्गाने पंचनद प्रांती व भृगुवर्गाने माळवप्रांती लोकराज्ये स्थापन केली. एवंच नर्मदेच्या उत्तर भागात त्या काळी सर्वत्र शांतता नांदत होती. ह्यामुळेच त्या काळचे वर्णन, घडामोडी नमूद करणाऱ्या पुराणेतिहासात फारसे सापडत नाही. शांततेच्या या काळातच घोडे माणसाळले गेले, रथ तयार केले गेले व या दोन्ही गोष्टींचा सेनेत पायदळाप्रमाणेच समावेश झाला. पण फौजेची जसजशी वाढ होऊ लागली तसतशी राजेलोकांची विजिगीषा वाढत गेली व एक राज्यकर्ता दुसऱ्यावर स्वारी करू लागला. त्यामुळेच त्या कालखंडातल्या शेवटच्या पाचचार पिढ्यांचे वर्णनच पुराणेतिहासात अधिक दिलेले आहे. तेव्हा तिकडेच आता दृष्टी वळवू.

पूरूपासून अकराव्या पिढीत रौद्राश्व नावाचा पौरव राजा होऊन गेला. हा आपल्या घोडदळाबद्दल फार प्रसिद्ध होता. याच्या वेळी स्त्रियाही घोड्यावर बसत. अश्वारोही स्त्रियांची तुकडी ह्याच्या सैन्यात होती. ह्याने पंचनदातील लोकराज्यावर चढाई केली. पण हे प्रभाकर आत्रेयाच्या देखरेखीखाली इतक्या चांगल्या रीतीने चालले होते की

---

१. वायुपुराण ९३–१४

कालात शारीरिक शक्तीने पुरुषांशी तुल्यबळ नसणाऱ्या स्त्रियांचे रक्षण करण्याची जबाबदारी पुरुषांवर पडली. स्वाभाविकपणेच अविवाहित मुलीचे रक्षण पित्यास करावे लागले आणि रक्षक म्हणून रक्षितावर त्याचा अधिकार मान्य झाला.

३. तिसरा कालखंड : रेणुकेची शोकांतिका

आपण केलेल्या तिसऱ्या कालखंडाचे आरंभीही हीच अशांतता पसरली होती. मालव आणि पंचनद दोन्ही देशांतील लोकशासित राज्ये नष्ट होऊन तेथेही राजसत्ता सुरू झाली व अत्रिवर्गास व भृगुवर्गास ल्हानल्हान आश्रम स्थापूनच राहावे लागले. यातल्याच एका अत्रिवर्गातील पुरुषाचे भृगुवर्गातील एका स्त्रीशी लग्न झाले होते. कुठलीही सत्ता न जुमानणे व समभावाने राहणे या गोष्टी लोकराज्ये स्थापन करणाऱ्या उभय वर्गांच्या अंगवळणीच पडलेल्या होत्या. त्यामुळे ह्या दोघांनी असे ठरविले, की कुणीच कुणावर अटी घालावयाच्या नाहीत. व स्त्री आणि पुरुष दोघांनीही 'सह धर्मं चरावः' अशी शपथ घेऊन सहधर्मी नात्याने वागावे. यामुळे कुणाच्याच मनात असूया नसे व यामुळेच या स्त्रीचे नाव अनसूया पडले. हिच्या या सरळ असूयारहित व पतीशी समानधर्मी वागणुकीचा असा प्रभाव होता की विषयलालसा धरून आलेले मोठमोठे पुरुषही हिच्यापुढे येताच त्यांची ती दुर्वासना जिरून ते हिच्याशी बालभावाने वागू लागत. दत्तात्रेयजन्माचे काव्य अनसूयेच्या याच गोष्टीवर उभारले आहे.[1]

अत्रिवर्गाचे लोक जरी ह्याप्रमाणे शांत राहिले, तरी भृगुवर्ग असा राहिला नाही. त्यामुळे शासनकर्त्यांपासून त्यांस त्रास भोगावा लागला. त्यांस रानावनातही राहावे लागले. त्यापैकीच एका भृगु पुरोहित पत्नीस विंध्यवनात एक मुलगा झाला. प्रसूतिसमयी धड वस्त्रही जवळ नसल्याने तिला उर्वी म्हणजे जमिनीवरच प्रसूत व्हावे लागले आणि त्यामुळे मुलाचे नावच और्व पडले. एकदा रानात लाकूड वाकवीत असता त्याच्या हातून ते निसटून दूर उडाले. त्यावरून और्वाने धनुष्यबाणाची कल्पना काढली व त्यात तो प्रवीण झाला. ही धनुर्विद्या त्याने आपल्या ऋचीक नावाच्या मुलास शिकविली व ऋचीकाने ती कोसलराजास व नंतर कान्यकुब्ज राजांस शिकविली. कान्यकुब्ज देशात त्या काळी गाधि नावाचा राजा राज्य करीत होता. गाधीच्या सत्यवती नावाच्या मुलीवर ऋचीकाचे मन बसले आणि त्याने गाधीजवळ तिची मागणी केली. मुलगी हवी असेल तर ऋचीकाने काही घोडे मिळवून द्यावे अशी अट गाधीने घातली. ऋचीकाने कोसल राजाजवळून घोडे मिळवून गाधीस दिले व सत्यवतीशी लग्न लाविले.[2] काहीतरी मोबदला घेऊन मुलगी देण्याचा प्रघात येथून सुरू झाला. ह्या और्वपुत्र ऋचीकास सत्यवतीपासून जो मुलगा झाला त्याचे नाव जमदग्नी होते. हा अत्यंत क्रोधी

१. मार्कंडेय पुराण १७–६ ते १६

२. ब्रह्मपुराण, १०–२८ ते ४९

कळशी भर घालून सजविल्या आहेत. त्या साजाकडे आपणास पहावयाचे कारण नाह[येच]
ींनी जरी परांचे मोर करून नाचविले असले तरी या लेखात केवळ मूलभूत परांच[झाल]
चार, अनुकूल प्रतिकूल काही न सांगताच केला आहे. स्त्रीजीवनाचे हे सारे पैलू पा[हिल]
ृणजे असे वाटते की सर्व काळी व सर्व स्थळी मनुष्याचे विचार विकार आज [स्वत]
ाहेत तसेच होते आणि म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की

स्त्रीसंबंधेषु सर्वेषु सर्वकालस्थलेषु च।
यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न तत् क्वचित् ॥

२

सूत्र व स्मृति कालांतील स्त्रीजीवन

विठ्ठल महादेव वेडेकर

प्रा. विठ्ठल महादेव वेडेकर, एम्. ए. (जन्म २६-४-१९०२) रिसर्च फेलो, भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे. माजी आजीव सदस्य, खानदेश शिक्षण मंडळ; अमळनेरच्या प्रताप कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक; संपादक, 'नवभारत' मासिक, वाई. महाराष्ट्रीय संस्कृत तज्ञांत व प्राचीन वाङ्मयोपासकांत उच्च स्थान. ('उन्नति' ७८३, शिवाजीनगर, पुणे ४)

प्रस्तुत लेखात सूत्रे व धर्मशास्त्रे ही प्रामुख्याने ज्या कालात रचिली गेली त्या कालातील या सूत्र-धर्मशास्त्र ग्रंथांतून जे स्त्रीजीवनाचे चित्र पहावयास मिळते त्याचा संक्षेपाने विचार करावयाचा आहे. हा काल स्थूलमानाने पहाता, विद्वानांच्या मते वैदिक वाङ्मयाच्या कालानंतर सुरू होतो. याच कालात गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति व इतर धर्मशास्त्रे रचिली गेली. याच कालात आरंभी कौटिल्याचे अर्थशास्त्र, त्यानंतर वात्स्यायनाचे कामसूत्र इत्यादि ग्रंथही लिहिले गेले. त्याचप्रमाणे याच काळात, सुमारे इ. स. पूर्वी ४०० ते इ. स. ४०० या अवधीत, आज महाभारत व रामायण ही प्राचीन महाकाव्ये ज्या स्वरूपात उपलब्ध आहेत ते स्वरूप त्यांना आले असावे. या प्राचीन महाकाव्यांतून मिळणाऱ्या माहितीमुळेही या कालातील स्त्रीजीवनाचे आकलन होण्यास आपणास मदत होते. म्हणून या कालातील स्त्रीजीवनाच्या विविध बाजूंचे विवेचन करताना वरील विविध ग्रंथांचे मधून मधून आवश्यक वाटले ते उल्लेख दिले आहेत.

या कालातील स्त्रीजीवनाच्या विविध बाजू व अंगे यांचा विचार करताना पुढील सहा पोटमथळ्यांखाली त्यांचे विवेचन करावयाचे योजिले आहे: (१) कौमार्य व शिक्षण (२) विवाह व वैवाहिक जीवन (३) विधवांची स्थिती व स्थान (४) आर्थिक हक्क व सवलती (५) स्त्रियांचे सामाजिक व धार्मिक जीवनात स्थान (६) पोषाख व दागदागिने.

१. कौमार्य व शिक्षण

यापूर्वीचा काल म्हणजे वैदिक काल. त्याशी तुलना करता सर्वसाधारणपणे तज्ज्ञांनी

...नींनी देवयज्ञ, पितृयज्ञ करावयाचा, असा दंडक असून पत्नीला पतीबरोबर धार्मिक ...च्या समान दर्जा होता.

यापूर्वीच्या काळी विवाहाची वयोमर्यादा जेव्हा अधिक होती, तेव्हा मुलीची ...च्या निवडीच्या बाबतीत इच्छा विचारात घेतली जात असे. जर योग्य मनासारखा वर ...ला नाही तर एखादी स्त्री सुलभेसारखी निवत असे. महाभारतात (शांतिपर्वांत ... ३२०) सुलभाजनकसंवादरूपी आख्यानात या सुलभेचे वर्णन आले आहे. तिला ...नासारखा पति मिळाला नाही म्हणून ती अविवाहित राहिली व संन्यासिनी ...ऊन ब्रह्मज्ञानाविषयी जनकाशी वादविवाद करुन तिने त्याला कुंठित केले. सूत्र-स्मृतिकालात पुढे पुढे विवाहाची वयोमर्यादा कमी कमी होत गेली. स्त्रियांचा वैदिक ...पनयनाचा अधिकारही गेला. त्यांना विवाह एवढाच वैदिक मंत्रांचा संस्कार शिल्लक ...ाहिला. त्यामुळे स्त्रीने अविवाहित राहणे म्हणजे कोणत्याहि संस्काराशिवाय राहाणे ...ाला स्मृतिधर्मशास्त्रकारांचा तीव्र विरोध होऊ लागला. 'अ-पति नारी पातकी होय' असे महाभारतात एका ऋषीचे वचन आहे. कुणि नावाच्या ऋषीची मुलगी सुभ्रू ...रायच्या आदल्या दिवशी शृंगवत् नावाच्या मुनीशी विवाहबद्ध झाली व म्हणूनच ...ी स्वर्गाला गेली अशी महाभारतात कथा आहे. बौधायन या धर्मसूत्रकाराने तर असे ...टले आहे की अविवाहित मुलीचे प्रेत लग्न लावूनच नंतर दहन करण्यात यावे.

पुरुषाला अविवाहित राहून विद्याध्ययन, अध्यापन करता येत असे. अशा अविवाहित आचार्याला आपली शिष्यपरंपरा आध्यात्मिक संतति म्हणून मानण्याचा अधिकार असे. परंतु स्त्रियांना विवाह हा अत्यावश्यक विधी मानला गेल्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक, सामाजिक आशा-आकांक्षांवर निर्बंध पडले. रजोदर्शनापूर्वीच कन्यांचे विवाह करावयाची प्रथा रूढ होऊ लागली. यमस्मृतीने म्हटले आहे की, "गुणवान् पति मिळाला नाही तर मुलगी गुणहीनालाही देऊन टाकावी पण तिला अविवाहित रजस्वला ठेवू नये." अर्थात् याही बाबतीत स्मृतिकारांमध्ये मतभेद होते. मनूने एका ठिकाणी म्हटले आहे की, "कन्या ऋतुमती झाली व तिचा विवाह झाला नसला तर तिने तीन वर्षे वाट पाहावी. नाहीतर स्वतःच पति शोधून काढावा." दुसऱ्या ठिकाणी त्यानेच म्हटले आहे की, "गुणवान् वर पाहूनच मुलगी द्यावी, गुणवान् वर मिळाला नाही तर तिने खुशाल आमरण अविवाहित रहावे." अर्थात् ही वचने निरनिराळ्या काळाला व सामाजिक गटांना लागू असणे शक्य आहे.

काही गृह्यसूत्रांमधून 'वधू नग्निका असावी' असे म्हटले आहे. आता नग्निका म्हणजे काय? महाभारतात एके ठिकाणी सोळा वर्षांच्या मुलीला नग्निका म्हटले आहे. त्याचा अर्थ भाष्यकारांनी असा केला आहे की, 'नग्निका म्हणजे मैथुनार्ह, वस्त्र फेडण्यास योग्य'. परंतु पुढे विवाहाचे वय जसजसे कमी कमी होऊ लागले तसे नग्निका याचा अर्थ लहान, परकरातली मुलगी असा होऊन बालविवाह रूढ होऊ लागले.

हुंडा किंवा विवाहपूर्वी मुलीच्या वडिलांनी मुलाच्या वडिलांशी करार करून

होत्या. बाणाच्या वडिलांची एक शूद्र भार्याही असून तिच्यापासून झालेली मुले त्याच्या एकाच कुटुंबात राहात असत. 'कथासरित्सागरा'त असा उल्लेख आहे की, बाप आपल्या मुलीला विचारतो, 'चार वर्णांतील कोणता वर तुला पसंत आहे?'

पुढे इ. स. च्या दहाव्या शतकापासून भिन्नवर्णीय वधूवरांचे विवाह कमीकमी होऊन निषेधार्ह ठरू लागले असावेत असे दिसते. अल्बेरुणीने (इ. स. १०२०) असे म्हटले आहे की, त्यावेळचे ब्राह्मण खालील तीन वर्णांतील स्त्रियांशी विवाह करताना आढळून येत नाहीत. कल्हण या १२ व्या शतकातील काश्मीरमधील ब्राह्मण इतिहासकाराने 'संग्रामराज नावाच्या क्षत्रिय राजाने (इ. स. १०२८) आपली बहीण ब्राह्मण युवकाला दिली अशी नोंद करुन, त्या राजाने आपल्या यशाला गालबोट लावले', असे म्हणून या मिश्रविवाहाबद्दल आपली तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. असे विवाह निषेधार्ह ठरू लागले, याचे कारण भिन्नवर्णांतील वाढती सांस्कृतिक विषमता हे असावे. पूर्वी सर्व त्रैवर्णिक द्विज असून ते वेदाध्ययन करीत. परंतु क्षत्रिय-वैश्यवर्णीयांचे वेदाध्ययन सुटले. 'वैश्य कोणीही वेदाध्ययन करीत नाहीत' असे अल्बेरुणीने नमूद करून ठेविले आहे. पूर्वी सर्व त्रैवर्णिक ब्राह्मण देखील मांसाशन करीत असत. पुढे ब्राह्मणांत मांसाशन कमी झाले. क्षत्रिय-वैश्यांचे चालूच राहिले. अशा भिन्न आचार विचारांमुळे भिन्नवर्णीय विवाह कमीकमी होत गेले असावेत.

हल्ली विवाहसंस्कार करण्याची जी वैदिक पद्धत रूढ आहे तिचे वर्णन आश्वलायन व बौधायन यांच्या गृह्यसूत्रांतून आढळते. विवाहसमारंभानंतर, पतिपत्नींनी तीन दिवस ब्रह्मचर्य पाळून व्रतस्थ राहावयाचे असा नियम काही धर्मशास्त्रांतून आढळतो. अर्थात् या नियमाचा हेतू दांपत्यावर आत्मसंयमनाचे संस्कार बिंबवणे हा असावा. परंतु इतर काही धर्मशास्त्रकारांना हा नियम जाचक वाटतो. कामसूत्रामध्ये बाभ्रव्य नावाच्या स्मृतिकाराच्या मताचा उल्लेख केला आहे. बाभ्रव्याने म्हटले आहे: "स्तंभाप्रमाणे निश्चल असलेल्या नायकाकडे काहीही न बोलता नुसती पहात तीन रात्री काढण्याने स्त्री ही मनातून विटून जाईल व नवऱ्याचा तिरस्कार करील."

पुढे बालविवाह प्रचलित झाल्यावर विवाहानंतरच्या त्रिरात्रीच्या शेवटी होणारे चतुर्थीकर्म अशक्य झाले व वधू वयात आल्यावरचा गर्भाधानसंस्कार नवीन अस्तित्वात आला. या गर्भाधानसंस्काराचे वर्णन स्मृतिचन्द्रिकेमध्ये दिलेले आहे. हा संस्कार ११ व्या शतकात रूढ झाला होता असे अल्बेरुणीने केलेल्या उल्लेखावरून दिसून येते.

इ. स. ३००-४०० नंतरच्या धर्मशास्त्र-वाङ्मयातून स्त्रीला घटस्फोट किंवा विवाहविच्छेद (डायव्होर्स) करायची परवानगी दिलेली आढळत नाही. पण त्यापूर्वी मात्र काही विशिष्ट परिस्थितीत विवाहविच्छेद मान्य केलेला आढळून येतो. पुरुषांना पहिली पत्नी जिवंत असताना दुसरी करायची परवानगी होती. पण स्त्रियांना मात्र ती नव्हती. मनूने (९-४६) म्हटले आहे की, भार्येची भर्त्याच्या विवाहबंधनातून कधीच सुटका होत नाही. परंतु एका विशिष्ट कालखंडात स्त्रीला विवाहबंधनातून काही विशिष्ट

करण्यास सांगणे तिचे कर्तव्य आहे. अर्थात् पहिल्या पत्नीला मूल होत नाही हे पाहायला पुरेसा दहा वर्षांचा काळ लोटला पाहिजे, असे बौधायन धर्मसूत्रात सांगितले आहे. 'पत्नीला जर मूल झाले नाही तर दहाव्या वर्षी, मुलगीच झाली तर बाराव्या वर्षी, मूल जगतच नसेल तर पंधराव्या वर्षी, जर ती अप्रिय कटु बोलणारी असेल तर लगेच, तिचा त्याग करावा' असा त्या वचनाचा मथितार्थ आहे. आपद्धर्म म्हणून बहुपत्नीत्वाला दिलेल्या ह्या सवलतीचा गैरफायदा एरवीही पुरुष घेऊ लागले. त्यांचा धिक्कार धर्मशास्त्रकारांनी केला आहे. आपस्तंब-धर्मसूत्रांत 'पत्नी जर धर्मप्रजासंपन्न असेल तर द्वितीय संबंध करू नये' असे म्हटले असून महाभारताने 'भार्या टाकणाऱ्या मनुष्याचे पाप प्रायश्चित्तापलीकडे आहे' (१३. परिशिष्ट ७ अ २०८) असा स्पष्ट निषेध केला आहे.

बहुपतिकत्वाचे उदाहरण महाभारतातील द्रौपदीचे असून ते प्रसिद्ध असे एकमेव आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना खुद्द महाभारतकार, धर्मशास्त्रकार व सूत्रकार यांच्या टेकीस नव आले आहेत. 'तन्त्रवार्तिक' या मीमांसाविषयक ग्रंथाने त्याचे स्पष्टीकरण असे केले आहे : 'द्रौपदीचा पाच पतींशी विवाह हा लाक्षणिक समजावा. द्रौपदी म्हणजे राज्यलक्ष्मी. पाचहि भाऊ राज्याचा सर्व मिळून उपभोग घेत होते.'

३. विधवांची स्थिती व स्थान

पतिमरणानंतर विधवांचे काय होत होते ? त्या पतीबरोबर सती जात की पुनर्विवाह करीत ? त्यांना कुटुंबाकडून वागवणूक कशी मिळे ? तिला स्थावर वा जंगम मालमत्तेचा काही भाग मिळत असे का, की ज्यामुळे तिला स्वतंत्र मानाचे जिणे जगता येईल ? असे अनेक प्रश्न विधवांच्या स्थितीसंबंधी उत्पन्न होतात. त्यांचा येथे सूत्र-धर्मशास्त्र-महाभारतकालापुरता विचार करावयाचा आहे.

आर्यलोक हिंदुस्थानात येण्यापूर्वी इंडोयुरोपीय कालात त्यांच्यामध्ये सतीची चाल होती असे म्हणतात. परंतु आर्यलोक हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी रचलेल्या पहिल्या पहिल्या वाङ्मयातून सतीचा उल्लेख सापडत नाही. त्यावरून हिंदुस्थानात प्रवेश करतेसमयी आर्यांमधील सतीची चाल बंद झाली असावी असा विद्वानांचा निष्कर्ष आहे. अथर्ववेदात (१८ – २ – १) एका ठिकाणी असा उल्लेख आहे की, मृताच्या प्रेताशेजारी पत्नी काही काळ पडते व मग तिला खाली बोलावण्यात येते. हा उल्लेख प्राचीन सतीचा स्मरणरूप अवशेष असावा. ब्राह्मणग्रंथात, गृह्यसूत्रातही सतीचे उल्लेख सापडत नाहीत. सतीच्या चालीबद्दल साधारणतः जुन्या वाङ्मयातील पहिला असा उल्लेख महाभारतात आहे. त्यात पांडूबरोबर माद्री सती गेली. परंतु सती जाण्याचे कारण जे तिने दिले आहे, ते धार्मिक दिसत नाही : "माझ्या इच्छा तृप्त झाल्या नाहीत म्हणून मला पतीमागून गेले पाहिजे. मी जरी मागे राहिले तरी तुझ्या पुत्रांशी मी समतेने वागेन असे मला वाटत नाही." असे तिने कुंतीला कारण दिले आहे. तसेच मौसलपर्वात, वसुदेवाच्या

चालीचा प्रसार दक्षिणेकडेही आला. ब्राह्मणवर्णातील स्त्रियाही या त्यागधर्मात आपण मागे पडू नये म्हणून सती जाऊ लागल्या.

नियोगाची चाल—पतीच्या अभावी स्त्रीने अपत्योत्पादनार्थ नियोगाचा अवलंब करणे ही पद्धत इ. स. पूर्वी सुमारे ३०० पर्यंत प्रचलित होती. महाभारतातील अशी नियोगाची उदाहरणे प्रसिद्धच आहेत. पुढे काही धर्मशास्त्रकारांनी नियोगपद्धतीला जोराचा विरोध केलेला दिसून येतो. आपस्तंबाने म्हटले आहे की, नियोगज पुत्र हा शेवटी त्याच्या जनकाचाच. मनूने नियोगपद्धति पशुधर्मतुल्य मानली असून, विधवेला अपत्यार्थ नियोग करावयास लावणे निंद्य होय असे प्रतिपादिले आहे. या उलट वसिष्ठ व गौतम यांच्यासारखे धर्मसूत्रकार नियोगाला काही मर्यादेपर्यंत पाठिंबा देतात. विधवेची इच्छा नसेल तर नियोग करायला लावू नये असा स्पष्ट आदेश काही धर्मसूत्रांतून आढळतो. एखाद्या केवळ दीर आपल्या विधवा भावजयीला तिच्या आपल्यापासून होणाऱ्या पुत्राला इस्टेटीमध्ये हिस्सा मिळेल या लोभाने, नियोगाला भाग पाडणे शक्य होते. त्याविरुद्ध हा आदेश असावा. 'नियोग लोभप्रेरित नसावा' असे वसिष्ठधर्मसूत्रात वचन आहे. पुढे इ. स. ६०० नंतर नियोगपद्धति बंद होत गेली.

पुनर्विवाहाची पद्धत—ही प्राचीन कालापासून काही प्रमाणात अमलात असावी. एखादीचा नवरा बाहेर प्रवासाला गेला असता तो पाच वर्षे जर परत आला नाही किंवा आल्यावर त्या स्त्रीची त्याच्याबरोबर राहायची इच्छा नसेल तर तिने आपल्या कुटुंबातील जवळच्या नातेवाईकाशी लग्न करावे असे वसिष्ठ (इ. स. १००) या धर्मशास्त्रकाराने म्हटले आहे. वसिष्ठाने ही पुनर्विवाहाची परवानगी स्त्रीला, तिला मुले असली तरी दिलेली आहे. कौटिल्याने पुनर्विवाहास अशाच परिस्थितीत परवानगी दिलेली आहे.

पण पुढे हळूहळू विधवांच्या पुनर्विवाहाला विरोध होऊन तो निंद्य समजला जाऊ लागला. महाभारतात दुर्योधनाच्या एका उक्तीमधील उपमेच्या द्वारा हा विरोध व्यक्त झाला आहे. दुर्योधन महायुद्धाच्या शेवटच्या दिवशी म्हणतो, 'विधवा स्त्रीचा उपभोग घ्यावा असे ज्याप्रमाणे वाटत नाही त्याप्रमाणे क्षत्रियश्रेष्ठ मारले गेले आहेत अशा पृथ्वीचे राज्य मला उपभोगावेसे वाटत नाही.' विष्णुस्मृतीने (इ. स. २००) विधवेला कडक ब्रह्मचर्यव्रत पाळावयास सांगितले आहे. विधवेने पुनर्विवाहाचा विचारही मनात आणू नये असे मनूने एके ठिकाणी म्हटले आहे. नारदस्मृतीत (इ. स. ५००) मात्र परस्परविरुद्ध मते दिसून येतात. एके ठिकाणी असे म्हटले आहे की, मुलीचा विवाह फक्त एकदाच होतो तर दुसऱ्या ठिकाणी असे प्रतिपादिले आहे की, पति मृत झाला असेल, दीर्घ प्रवासाला गेला असेल किंवा संन्यासी झाला असेल तर त्याच्या पत्नीने पुनर्विवाह करावा. या परस्परविरोधी वचनांवरून असा निष्कर्ष निघू शकेल की, विधवेचा पुनर्विवाह ब्राह्मणजातीतून जरी निषेधार्ह मानला जाऊ लागला असला तरी इतर वर्णांतून तो चालू असला पाहिजे. प्रसिद्ध सम्राट् चन्द्रगुप्त विक्रमादित्य

चीजवस्तूंचे संयुक्त स्वामी किंवा मालक समजले जात असत. परंतु प्रत्यक्षात मात्र स्त्रीला या मालमत्तेत समसमान वाटा व दर्जा मिळाला नाही. तिला काही गौण प्रकारचे हक्क मिळत. याज्ञवल्क्याच्या मताप्रमाणे, स्त्रीचा या मालमत्तेच्या एक तृतीयांश वाट्यावर अधिकार होता. आपस्तंबधर्मसूत्रानुसार पति प्रवासाला गेल्यावर त्याच्या गैरहजेरीत पत्नीला नेहमीचा खर्च करण्याचा हक्क होता. पतिपत्नीच्या संयुक्त मालकीत पत्नीला समसमान अधिकार देण्यास पूर्वीचा काल अनुकूल नव्हता. जमीनजुमला ही स्थावर मालमत्ता मोठ्या अविभक्त कुटुंबाची किंवा ग्रामपंचायतीची समजली जात असे. वैयक्तिक मालकी अजून अस्तित्वात आली नव्हती. जेव्हा पुढे वैयक्तिक मालकी अस्तित्वात आली त्या वेळेला स्त्रीचा दर्जा कमी होऊन पति हेच सर्वस्व किंवा देव मानला जाऊ लागला. म्हणून पत्नीला पतीबरोबर समसमान आर्थिक हक्क मिळणे दुर्घट झाले. स्थावर मालमत्तेवर स्त्रियांना अधिकाराचा वाटा पुढे बऱ्याच उशिरा मिळाला. परंतु जंगम मालमत्ता म्हणजे दागदागिने, वस्त्रप्रावरणे, जडजवाहिर यांवरील त्यांचा हक्क बऱ्याच आधीपासून मान्य झाला. स्त्रियांच्या अधिकारातील जंगल मालमत्तेला 'स्त्रीधन' असे नाव आहे. 'स्त्रीधना'चा उगम, कन्येबद्दल प्राचीन काळी आईबापांना जे शुल्क मिळत असे त्यातून झाला असावा. आईबाप वात्सल्यभावनेमुळे वरपक्षाकडून मिळालेल्या शुल्काचा काही भाग किंवा ते सर्वस्व आपल्या मुलीला देऊन टाकीत असत. मुलीच्या मरणानंतर ते तिचे स्त्रीधन तिच्या संततीकडे येत असे. जर ती अनपत्य मृत झाली असेल तर ते तिचे सर्व स्त्रीधन पुन्हा तिच्या माहेरी वडिलांना मिळत असे.

कन्येला शुल्क ज्या विवाहप्रकारात दिले जात नसे त्या ब्राह्मादि विवाहामध्ये वधूला विवाहसमयी काही देणग्या मिळत. या देण्याना 'पारिणाह्य' अशी संज्ञा आहे. 'पारिणाह्य' वस्तू म्हणजे मुख्यतः अलंकार व वस्त्रप्रावरणे असत. यावर स्त्रीची संपूर्ण मालकी असे.

स्त्रियांच्या बाबतीत काही जुन्या जुलमी चालींचे अवशेष दाखविणारी मनुस्मृतीमध्ये वचने आहेत. उदाहरणार्थ, त्यात एका ठिकाणी (२८–४१६) असे म्हटले आहे की, "भार्या, पुत्र व दास ह्यांना धनावर कोणताही हक्क नाही. त्यांना जे काही धन (देणगी) मिळाले असेल ते त्यांचे नसून त्यांच्या मालकाचे होय." पण हे वचन फार जुन्यापुराण्या जमान्याला लागू होते, आता ते लागू नाही, असे धर्मशास्त्रकारांनीच निक्षून सांगितले आहे. बौधायन व मनु यांसारखे धर्मशास्त्रकार स्त्रियांना वारसाहक्क देण्याच्या विरुद्ध असले तरी स्त्रीधनावरील त्यांच्या अधिकाराला त्यांचा संपूर्ण पाठिंबा आहे.

स्त्रीधनामध्ये कोणकोणत्या वस्तूंचा अंतर्भाव होत होता? मनुस्मृतीप्रमाणे (९–१९४) स्त्रीधन सहा प्रकारचे आहे: (१–३) पिता, माता व भ्राता यांनी दिलेल्या देणग्या. (४) पतीने विवाहोत्तर प्रेमाने दिलेल्या देणग्या. (५–६) विवाहाच्या वेळी किंवा नवीन घरी आल्यावर कोणी दिलेल्या देणग्या. विष्णुस्मृतीने स्त्रीधनात आणखी तीन गोष्टींचा समावेश केला आहे: १ पुत्राने, २ कोणा जवळच्या नातेवाईकाने दिलेल्या देणग्या,

स्त्रीच्या मरणानंतर तिचे स्त्रीधन तिच्या मुलींना मिळाले पाहिजे या बाबतीत बहुसंख्य धर्मशास्त्रकारांची एकवाक्यता आहे. स्त्रीधनात बहुधा अलंकार-दागिने व उंची वस्त्रप्रावरणे यांनाच अंतर्भाव असल्यामुळे त्यांचा उपयोग मुलीच करू शकणार हे उघडच आहे. अर्थात सुनांना त्यांचा उपयोग करता आला असता हे खरे. परंतु आईचा ओढा मुलीकडे अधिक असल्यामुळे स्त्रीधन मुलीकडे जाणे साहजिकच होते. त्यातही पुन्हा मुलींमध्ये निवड करावयाची झाल्यास विवाहित मुलींपेक्षा अविवाहित मुलीचा, विवाहित मुलींमध्येहि ज्यांची सांपत्तिक स्थिति बरी नाही अशांचा स्त्रीधनावर अधिक हक्क मानला जाई.

मनूचे एक वचन असे आहे की, आई मेल्यावर तिच्यामागे राहिलेल्या स्त्रीधनात तिच्या सर्वच मुलांना व मुलींना हिस्सा मिळावा (९-१९२). या वचनाचा अभिप्राय असा असावा की पतीने प्रेमाच्या भरात इतर मुलांचा विचार न करता जर पत्नीला द्रव्याच्या मोठमोठ्या देणग्या, पुढे तिला तिच्या आपत्काळात उपयोगी पडाव्या म्हणून, दिल्या असतील तर मुलांना अन्याय होऊ नये म्हणून त्यानाही स्त्रीधनात हिस्सा दिला असावा.

इतर देशातील समाजाच्या त्या काळच्या इतिहासाशी तुलना करता स्त्रीधनाचा हा इतिहास हिंदु स्त्रीजीवनाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व समजले जाते. स्त्रीधनाची व्याप्ति वाढवीत राहून स्त्रियांच्या आर्थिक हक्काविषयी अत्यंत स्पृहणीय जागरूकता हिंदू समाजाने दाखविली यात शंका नाही.

आईबापांना एकुलती एक मुलगीच असली, तिला भाऊ नसला तर पूर्वीच्या काळी म्हणजे इ. स. पूर्वी २०० वर्षेपर्यंत अशी प्रथा होती की, मुलीलाच वडिलांची सर्व इस्टेट मिळे. पण त्यानंतरच्या काळात मुलीच्या अधिकाराविषयी मतभेद होऊन तिचे हक्क कमी कमी होत गेले. आपस्तंबाने म्हटले आहे की, 'जवळचा सपिण्ड नातेवाईक किंवा गुरु, आचार्य किंवा शिष्य जर कोणी नसेल तरच मुलीला ती इस्टेट देण्याचा हक्क आहे.' त्याने अशीही पुस्ती जोडली आहे की, मुलीला देण्यापेक्षा, धर्मकृत्यासाठी ती इस्टेट देऊन टाकावी. परंतु आपस्तंबाच्या ह्या मताला इतर धर्मशास्त्रज्ञांचा पाठिंबा फारसा मिळालेला दिसत नाही. महाभारतात (१३-४५-१२) असे वचन आहे की, "जसा पुत्र तशी दुहिता. ती असताना, दुसऱ्या कोणाला पित्याचे धन का मिळावे? तिला सगळा नाही तरी अर्धा भाग मिळाला पाहिजे." कौटिल्याने मुलीचा हक्क मान्य केला असून तिला अंशतः का होईना वाटा मिळाला पाहिजे असे म्हटले आहे. धर्मशास्त्रकारांनी असेही काही निवाडे दिले की, एकुलत्या एक मुलीला वडिलांच्या इस्टेटीचा वारस समजावे, पण ते फक्त तिचा विवाह होईपर्यंतच. कात्यायन याच मताचा होता. परंतु या मताला फारसा पाठिंबा मिळालेला दिसत नाही.

मुलीला जर भाऊ असले तर पित्याच्या इस्टेटीमध्ये तिला कोणताही वाटा हक्क नसावा असेच बहुतेक धर्मशास्त्रकारांचे मत दिसून येते. एकच शुक्रनीतीचा कर्ता

केला आहे, हे विशेष होय. हिंदू संस्कृतीमध्ये मातेबद्दल जी आदरभावना असल्याने दिसून येते त्याचे हे निदर्शक होय.

पती जिवंत असताना त्याने जर आपल्या संपत्तीची वा मालमत्तेची वाटणी केली व पत्नीला पतीबरोबर जीवन कंठणे अशक्य झाले तर तिला संपत्तीचा एक तृतीयांश मिळावा असे याज्ञवल्क्य-स्मृतीत सांगितले आहे. जर पतिपत्नींचे चांगले असेल, तर अर्थातच पत्नीला दिलेल्या वाट्याची भर पतीच्या वाट्यात पडत असे.

५. स्त्रियांचे सामाजिक व धार्मिक जीवनात स्थान व समाजाचा त्यांच्याविषयी दृष्टिकोण

सार्वजनिक व सामाजिक जीवनात या काळात स्त्रियांचा काय दर्जा होता, त्या सार्वजनिक व्यवहारात कितपत भाग घेऊ शकत, त्यांच्याविषयी समाजाचा साधारण दृष्टिकोण काय होता यांचा संक्षेपाने विचार करावयाचा आहे.

प्रथम पडदापद्धतीचा विचार करू. असे दिसते की, सुमारे इ. स. पहिल्या शतकापर्यंत स्त्रियांना सार्वजनिक ठिकाणी पडदा, अवगुंठन किंवा ओढणी घेण्याची प्रथा नव्हती. प्राचीन वैदिक कालात मुलींचे मुलांबरोबर सहशिक्षण होत असे. स्त्रिया समासंमेलनातून भाग घेत असत.

अवगुंठनासारख्या पद्धतीचा कालदृष्ट्या पहिला उल्लेख महाभारत-रामायणातून सापडतो. धृतराष्ट्र अरण्यात जावयास निघताना स्त्रिया राजमार्गावर आल्या त्यावेळी त्यांचे वर्णन करताना ज्यांना पूर्वी सूर्यचंद्रांनीही पाहिले नव्हते असे वर्णन केले आहे (म. भा. १५·२१·१३). तसेच रामायणात सीता वनात जावयास निघाली असता, 'जी पूर्वी आकाशस्थ भूतांना' देखील दिसू शकत नव्हती ती आज भर रस्त्यावरून जात आहे', असे म्हटले आहे (२–३३–८). परंतु वरील उतारे या प्राचीन महाकाव्यांत प्रक्षित असावेत, असा विद्वानांचा अंदाज आहे. कारण बाकीच्या इतर उल्लेखांशी हे उल्लेख जुळत नाहीत. कौसल्या, कैकेयी, सुमित्रा चित्रकूट पर्वताकडे जायला निघाल्या तेव्हा त्यांनी अवगुंठन वापरले असे वर्णन नाही. द्रौपदी द्यूतगृहाकडे निघाली असता तिने अवगुंठन घेतल्याचे वर्णन नाही. महाभारतातील पोष्याच्या कथेमध्ये (१·३·११५) उत्तंक सरळ राणीच्या अंतर्गृहात जातो असे वर्णन आहे. राणी पडदा किंवा अवगुंठन वापरीत असती तर हे शक्य नव्हते.

परंतु इ. स. च्या पहिल्या शतकापासून, विशेषतः राजघराण्यातील स्त्रियांवर, सार्वजनिक ठिकाणी अवगुंठनाशिवाय संचार करण्याच्या बाबतीत बंदी घालण्यात येऊ लागली असे दिसते. भासाच्या नाटकातून सीता, कौसल्या आदी राण्या अवगुंठनासह वावरताना दिसतात. 'मृच्छकटिक' नाटकावरून राजघराण्यांतील स्त्रियांचे अनुकरण काही श्रीमंत घराण्यांतील स्त्रियाही करताना दिसतात. परंतु ही अवगुंठनपद्धती फक्त काही राजघराणी व श्रीमंत घराणी यापुरतीच मर्यादित होती. तिला समाजाचा विरोधच

हाकलला असे वर्णन आहे. पहिला चन्द्रगुप्त आपली लिच्छवि गणातील राणी कुमारदेवी हिच्यासह संयुक्तपणे राज्यकारभार करीत होता. ४थ्या शतकात प्रभावतीगुप्ताने पतिनिधनानंतर मध्यप्रदेशावर १० वर्षे आपला मुलगा वयात येईपर्यंत राज्य केले. ७व्या शतकात चालुक्य घराण्यातील राणी विजयभट्टारिका महाराष्ट्रातील दक्षिण विभागावर राज्य करीत होती. इ. स. ७८६मध्ये राष्ट्रकूट घराण्यातील राजा ध्रुव याची राणी शीलमहादेवी हिने स्वतःच्या अधिकारात भूमिदान दिल्याचा उल्लेख आहे.

स्त्रियांना हिंदू समाजात कोणते स्थान होते, त्यांच्याविषयीच्या समाजाच्या आदरभावनेत निरनिराळ्या कालखंडांत, जीवनाच्या भिन्न भिन्न अंगांना अनुलक्षून कमी अधिक बदल कसा होत गेला याची कल्पना वरील विवेचनावरुन येऊ शकेल. या ठिकाणी आणखी एका मुद्याचा विचार करणे उचित होईल. ज्या स्त्रियांच्या नशिबी गुंडांच्या किंवा दुष्मनांच्या हाती सापडून भ्रष्ट किंवा पतित होण्याचे आले, त्यांच्या बाबतीत हिंदू समाजाने कोणती वृत्ती दाखविली हे पाहाण्यासारखे आहे. रामायणात सीतेला ज्या कठोर दिव्यातून जावे लागले त्यावरुन पूर्वी समाज स्त्रियांच्या बाबतीत किती असमंजस व कठोर होता हे दिसून येते. या वृत्तीतील असमंजसपणा व अन्यायीपणा धर्मशास्त्रकारांच्या लक्षात येऊन त्यांनी सीतेसारख्या अवस्थेत पडलेल्या सामान्य स्त्रियांविषयी अधिक समंजस व सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोण बाळगलेला दिसून येतो. वसिष्ठ-धर्मसूत्रात असे म्हटले आहे की जर एखादी स्त्री चोर-दरवडेखोरांनी हरण करुन नेली असेल, किंवा तिच्यावर जर बलात्कार झाला असेल, तर ती परत आल्यावर तिचा कुटुंबाने त्याग करू नये. बृहस्पति या धर्मशास्त्रकाराने तर 'स्त्री जरी अत्यंत दूषित किंवा भ्रष्ट झाली असली तरी तिचा त्याग करणे योग्य नव्हे, योग्य त्या प्रायश्चित्त-संस्काराने तिला त्यातून मुक्त होता येईल' असा हवाला दिला आहे. जर बलात्कार झालेल्या नारीला गर्भ राहिला तर काय ? त्याबाबत अत्रि व देवल आदी धर्मशास्त्रकारांनी असा मार्ग काढला आहे की, ती प्रसूत झाल्यावर मग तिला पूर्वीच्या कुटुंबात परत घ्यावे.

इ. स. च्या ९व्या शतकापर्यंत हिंदू समाजाने अत्रि-देवलांच्या मताप्रमाणे पतित स्त्रियांच्या बाबतीत सहानुभूतिपूर्ण वृत्ती दाखविली. आठव्या शतकात मुसल्मानांच्या आक्रमणात हजारो स्त्रिया मुसल्मानांनी गिरफदार करुन ठेवल्या. त्यांतून ज्या निसटून आल्या, त्यांना परत कुटुंबात व समाजात पूर्ववत स्थान देण्यात आले. पुढे ११ व्या शतकानंतर मात्र समाजाची वृत्ती अनुदार बनली. शत्रूने पकडून दास्यात ठेवलेल्या स्त्रियांना परत घ्यायचे धोरण हिंदू समाजाने सोडले. मुसल्मानांच्या अनुकरणाने वा अवास्तव पावित्र्याच्या भावनेने हिंदू समाजाच्या वृत्तीत हा बदल घडून आला असेल. याचा परिणाम हिंदू समाजाला भयंकर अनर्थकारक ठरला. मुसल्मानांनी बलात्काराने पकडलेल्या स्त्रियांना परत आपल्या कुटुंबात यायची इच्छा असूनही त्यांना समाजाने आपला दरवाजा बंद केला व त्यांच्या पुढील संततीला हिंदू समाज कायमचा मुकला. मुसल्मान समाजाच्या संख्येत भर पडली.

नाकातली नथ, त्याचप्रमाणे पायाच्या बोटातली वेढी किंवा जोडवी या अलंकारांचे प्राचीन वाङ्मयात उल्लेख अजिबात आढळून येत नाही. भरताने आपल्या नाट्यशास्त्राच्या '२३ व्या' अध्यायात स्त्रियांच्या अलंकारांची भरगच यादी दिली आहे. तीत नथीचा उल्लेख नाही. नथीला हिंदीमध्ये 'वेसर' तर गुजराथीमध्ये 'वाली' म्हणतात. इतर देशी भाषांतून 'नथनी', 'नथना' असेही म्हणतात. हे शब्द मूळ कोणत्या संस्कृत शब्दांवरून उद्भूत झाले असावेत याचा पत्ता लागत नाही. नथ, नथनी हे शब्द प्राकृत '[illegible]' या शब्दापासून झाले असणे शक्य आहे. 'नत्था' याचा अर्थ एखाद्या प्राण्याच्या नाकातील घातलेली वेसणासारखी दोरी असा आहे. नथ हा अलंकार मुसलमानांच्या आगमनानंतर प्रसृत झाला असावा असा विद्वानांचा अंदाज आहे. शंकराचार्यांच्या 'सौन्दर्यलहरी' या स्तोत्रात 'नासामौक्तिका' चा किंवा नथीचा उल्लेख आढळतो परंतु ही स्तोत्रे मूळ आद्य शंकराचार्यांची नसावीत, मागाहून आलेल्या शंकराचार्य नावे धारण करणाऱ्या आचार्यांची असणे शक्य आहे. अरबांनी नथीसारखा अलंकार हिंदी लोकांपासून घेतला असावा. अरबांची मलबार किनाऱ्यावर सातव्या शतकापासून येजा चालू झाली. तेव्हापासून नथीची माहिती हळूहळू झाली असावी व मुसलमानांच्या आगमनानंतर तिचा प्रसार झाला असावा.

()

कचित् [illegible]ा वंदनीय सीता-सावित्रीची किंवा दमयंती-द्रौपदीची गोष्ट घेतली तरी त्यांचे स्थान तरी [illegible] भारतातील कोठलेही ठिकाण असा अर्थ होईल का? अर्थातच या ठिकाणी [illegible]ातीचा दोष येईल. जम्बुद्वीप हा जो विश्वाचा भूभाग पुराणात सांगितलेला आहे, त्यात [illegible] भारतवर्षाचा समावेश आहे. हा भारतवर्ष आजच्या भारता (इंडिया) पेक्षा अधिक विस्तृत [illegible] होता. पूर्व पश्चिम, आणि उत्तर दक्षिण सुमारे १४०० ते १८०० मैल लांबीचा भूविस्तार [illegible] हा लहान नाही. अर्थातच त्यातील रहिवाशांचे जीवन अगदी एक स्वरूपाचे आढळ[illegible] कठीण आहे. तथापि मूळ कल्पना सम असू शकतील. त्यातही परकीयांच्या आक्र[illegible]ाचा धोका असणारे सीमाप्रांत आणि दूरचे अंतरप्रान्त यांतील एकंदर जीवनात थोडा [illegible]रक सहजच असणार, अर्थातच स्त्रीजीवनात कमीजास्त बदल होणारच. आमचे म्हण[illegible] विशे[illegible] पडद्याच्या चालीवरून लक्षात येण्यासारखे आहे.' पंजाब, राजस्थान, वगैरेत पडदापद्धती जेवढी प्रबळ आहे तेवढी दक्षिणेत नाही (मुळीच नाही).

जीवनाच्या प्रादेशिक भिन्नतेप्रमाणेच मानवाच्या निष्ठांचा परिणामही जीवनावर घडतो. भारतात विविध निष्ठा होत्या. आजही आहेत. धार्मिक निष्ठा, आचारनिष्ठा, हेतुनिष्ठा अशा कितीतरी भिन्न निष्ठा आपणाला आजही आढळतात. धार्मिक कल्पनांच्या निष्ठेमुळे आपल्या स्वतःच्या मुलाचे डोके करवतीने चिरणाऱ्या राजाची आणि राजपत्नीची कथा आपल्याला आढळते.[२] त्यांतील व्यक्ती ऐतिहासिक असोत नसोत, पण त्यांतील वर्ण्यविषय समाजमान्य होता एवढे निश्चित. चितोडच्या राणी पद्मिनीने अग्नीत जाळून घेतले, पण त्याच्या लगतच्या काळात राजपूतराण्या आणि राजकन्या परक्यांच्या जनानखान्यात सुखाने (!) गेल्या. भारताची फाळणी झाल्यावर अशा किती घटना घडल्या असतील ते देवच जाणे.

हिंदू स्त्रीजीवनाची एकरूपता

तथापि भारतवर्षातील हिंदू स्त्रीजीवन सामान्यपणे एका स्वरूपाचे होते, असे म्हणता येण्यासारखे आहे. यासाठी येथे इ. स. पूर्व २०० ते इ. स. १३०० या काळातील सामान्य हिंदू स्त्रीचे जीवन कसे असे त्याचा विचार केलेला आहे.

त्या काळातील, स्त्रियांच्या जीवनाचा पुढील अनुक्रमाने विचार केलेला आहे. (१) बाल्यपण आणि शिक्षण, (२) विवाह आणि विवाहित जीवन, (३) सार्वजनिक जीवनातील स्थान, (४) वारसा व संपत्ती, (५) विधवांचे जीवन.

ज्याच्या पदरीं असे पाप। त्याला मुली होती आपोआप॥ हा विचार चालू जमान्यातल्या लोकांचा आहे. पुराणकाळी असा दृष्टिकोन नव्हता. पुत्रजन्माएवढा

---

१. CF. Purda System : "The Position of Women in Hindu Civilization" by Dr. A. S. Altekar. 1938, pp 196-200

२. राजा रुक्मांगद व पत्नी विंध्यावली कथा. नारदपुराण अ. २ : ३६.

कवित[illegible]ही लिहिलेल्या आहेत. पुढे संस्कृताचे अध्ययन विशेष सुरू झाल्यावर संस्कृतातही [illegible]त्रयांनी कविता केलेली आहे.[1]

[illegible] इ. स. च्या नवव्या शतकापर्यंत संपन्न आणि सुसंस्कृत घराण्यातील स्त्रियांना उच्च [illegible] देत असत, असे काव्यमीमांसेवरून ध्यानी येते. या शिक्षणात संगीत व नृत्य यांचा [illegible]विशेष समावेश होता. परंतु यावरून बहुसंख्य स्त्रिया सुशिक्षित होत्या असे अनुमान काढता [illegible] येत नाही. उलट नवव्या किंवा दहाव्या वर्षी मुलींची लग्ने होऊ लागल्यापासून बऱ्या[illegible] अशा मुली अशिक्षित राहू लागल्या. फार काय, जाणत्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्या काळा[illegible] शे. १० इतक्या तरी मुली साक्षर होत्या किंवा नाही असे वाटू लागते.[2]

विव[illegible] [illegible]आणि विवाहविषयक रूढी

[illegible] प्राचीन काळी स्त्रियांचे विवाह प्रौढपणी होत असावेत. परंतु इ. स. च्या चवथ्या [illegible]पासून समाजातील विचारवंत ही विवाहवयोमर्यादा कमी करण्याच्या मताचे झाले. मुलगी वयात येण्यापूर्वीच तिचा विवाह उरकून टाकण्याकडे कल झाला.[3] इ. स. २०० च्या सुमारास स्त्री ऋतुमती होण्यापूर्वीच तिचा विवाह करण्याचा प्रघात पडला. तथापि हा प्रघात मुख्यत्वे ब्राह्मण वर्गात जास्त दृढ झाला. क्षत्रियांना तसे बंधन नसे.

इतर वर्णांमध्ये साधारणपणे ८ ते ९ वर्षांपर्यंत मुलींचे विवाह होत. ब्रह्मपुराणासारख्या पुराणातून तर आणखी आधी विवाह व्हावे असे वचन आहे. उपनयनविधीही स्त्रियांचे विवाह अधिक लवकर घडवून आणण्यास कारण झाला. आपल्या मुलाला जास्त शिक्षण, शक्य तितक्या लवकर मिळावे म्हणून पुत्रांचा उपनयन संस्कार ५ व्या वर्षीच होऊ लागला आणि विवाह संस्कार हाच स्त्रियांचा उपनयन संस्कार मानला गेल्यामुळे अर्थातच स्त्रियांचे विवाह फारच लहानपणी घडून येऊ लागले. समाजातल्या खालच्या वर्गाने या रिवाजाचा स्वार्थी उपयोग केला. त्यांच्यात मुलीला लग्नाने वराकडून पैसा मिळे. तो पैसा लवकरात लवकर मिळवण्याचा खालच्या वर्गातले आईबाप प्रयत्न अर्थातच करीत. शिवाय सतीची चाल असल्यामुळे मुलीचे वडील निवर्तले आणि आई सती गेली तरी मुलीची काळजी घेणारे सासू सासरे असतात, हा विचारही डोळ्याआड झाला नाही.

क्षत्रिय वगैरे वर्णांत स्वयंवर पद्धतीही होती. अग्निपुराणाने ही पद्धत मानली आहे.[4] परंतु ब्रह्मपुराण मात्र या पद्धतीच्या विरुद्ध आहे. गांधर्व विवाह रूढ असणाऱ्या समाजात वधूवरांच्या गाठी बहुधा उद्यानात, मेजवानीच्या प्रसंगी किंवा

१. प्रा. भा. शिक्षण पद्धती—डॉ. अल्तेकर—पा. १३१

२. प्रा. भा. शिक्षण पद्धती—डॉ. अल्तेकर—पा. १३३

३. Position of Women etc. Dr. Altekar pp. 67, 69, 70

४. अदण्ड्या स्त्री भवेद्राज्ञ वरयन्ती स्वयम् पतिम् ॥ अग्निपुराण २२६.४१

४

अभिजात संस्कृत वाङ्मयातील स्त्री

वसन्त गजानन राहूरकर

डॉ. वसन्त गजानन राहूरकर, एम्. ए., पीएच्. डी. (जन्म २५-२-१९१९) संस्कृत प्राकृत भाषांचे आचार्य, पुणे विद्यापीठ. पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम. भाऊ दाजी व आचार्य पारितोषिकांचे मानकरी. 'वंगीय संस्कृत मंडळा'च्या परीक्षात व्याकरण व साहित्यात प्रथम श्रेणीने उत्तीर्ण. डेक्कन कॉलेज, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे विद्यापीठ यांच्या विद्यमाने व अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेच्या निमित्ताने ग्रंथ निर्मिति व संशोधनपर विपुल लेखन. (युनिव्हर्सिटी टीचर्स हॉस्टेल, पुणे विद्यापीठ, पुणे ७)

स्त्रीविषयक दृष्टिकोण : सांस्कृतिक उच्चनीचतेचे गमक

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक उच्चनीचता ठरवावयाची असेल तर त्या समाजात स्त्रीला कोणते स्थान दिले गेले आहे ते पाहावे असे सर्वसामान्यपणे म्हटले जाते. या दृष्टीने ज्या समाजात स्त्रीचा मानसन्मान होत नाही किंवा तिला स्वातंत्र्य नाही तो समाज मागासलेला आणि असंस्कृत ठरतो. तथापि काही प्रगत व सुसंस्कृत समाजांनी (उदा० -ग्रीक, हिंदू इ.) स्त्रीला समाजात बरेच खालचे स्थान दिले असल्याचे आढळून येते. म्हणून स्त्रीच्या सामाजिक स्थानावरून त्या समाजाची सांस्कृतिक उच्चनीचता ठरते असे म्हणण्याऐवजी हे समाजातील स्थान तिला पुरुषाने कोणत्या दृष्टिकोनातून दिले आहे यावरून ती ठरते असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल.

समाजाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये स्त्रीला पुरुषावर फारच मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागे. ज्या समाजाने हळू हळू तिचे हे पारतंत्र्य स्वेच्छेने दूर केले तो समाज सांस्कृतिक दृष्ट्या अधिक न्यायी व उदार होऊ लागला आहे असे म्हणता येईल. या दृष्टीने विवाहविषयक कायदे व रूढी यांवरून पुरुषांचा स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोण चट्दिशी ध्यानात येतो. ती एखादी खरेदीविक्रीची वस्तु आहे किंवा युद्धात जिंकून आणलेली लूट आहे एवढाच पुरुषाचा दृष्टिकोण आहे, की पत्नी ही पतीची सुखदुःखात सहभागी होणारी मैत्रीण आहे असे तो समजतो, यावरून समाजाच्या सांस्कृतिक श्रेष्ठकनिष्ठतेची कल्पना येऊ शकते. म्हणूनच स्त्रीला समाजात कोणते प्रतिष्ठेचे

शिक्षण घेत असल्याचे भवभूती सांगतो.[1]

अतिथिसत्काराचे महत्त्वाचे काम सुशिक्षित मुलींच्याकडे सोपविले जात होते असे दिसते. कालिदासाने आपल्या अभिज्ञानशाकुंतलात कण्व हे शकुंतलेकडे अतिथिसत्काराचे काम सोपवून सोमतीर्थाला गेले असल्याचे सांगितले आहे.[2]

शीलभट्टारिका, विजयांका इत्यादी अत्यंत निपुण कवयित्रींचा उल्लेख राजशेखराने सूक्तिमुक्तावलीत केला आहे. कालिदासानंतर वैदर्भी रीतीने लिहिणारी विजयांका ही साक्षात सरस्वतीच होती असे त्याने म्हटले आहे.

मुलींच्या बालपणीच्या करमणुकीच्या साधनांविषयी अभिजात संस्कृत वाङ्मयात काय माहिती मिळते हे आता पाहावयाचे आहे. घराबाहेरचा खेळ म्हणून 'कंदुकक्रीडा' बरीच रूढ होती असे दिसते. कुमारसंभवात (५·१९) उमेच्या बाल्यावस्थेत कालिदासाने या खेळाचा उल्लेख केला आहे. लपंडाव, शिवाशिवी इत्यादी खेळांचा उल्लेख कामसूत्रात आहे (३.३). इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या सुमारास मुलींच्या विवाहाचे वय ९ किंवा १० असावे असे शास्त्रकारांनी ठरविले. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला खो बसू लागला. मात्र शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या विवादात मध्यस्थ म्हणून मंडनमिश्रांची पत्नी सरस्वती हिने काम केल्याचे उदाहरणही याच कालातील आहे. सासरी गेल्यानंतरही कौटुंबिक परिस्थिती व घराण्याची परंपरा असेल त्याप्रमाणे मुलींचे शिक्षण होत असावे.

अभिजात संस्कृत नाटकांतील जवळजवळ सर्व नायिका चांगल्या शिक्षित व नृत्य, गीत, वाद्य, चित्रकला या कलांमध्ये निपुण असल्याचा उल्लेख आहे. मालविका, शकुंतला, उर्वशी, प्रियंवदा, अनसूया, मालती, रत्नावली, प्रियदर्शिका, मलयवती या नायिका आणि सखी ललितकलांमध्ये निपुण असल्याचे उल्लेख संस्कृत नाटकांत आहेत. नवव्या शतकातील काव्यमीमांसा या ग्रंथात उच्च कुलातील स्त्रियांना विविध विषयांचे उच्च शिक्षण दिले जात असे असा उल्लेख आहे.[3]

कालिदासाच्या मालविकाग्निमित्र या नाटकामध्ये मालविकेला नृत्यगीतादी कलांचे शिक्षण देण्यासाठी नाट्याचार्यांची नेमणूक झाली होती असे दिसते. परंतु हे श्रीमंत, सुसंस्कृत कुटुंबात व राजघराण्यापुरतेच मर्यादित होते असे दिसते. राजकुटुंबात लष्करी व राज्यकारभारविषयक शिक्षण मुलींना दिले जात असे. शाकुंतलात यवनींचा उल्लेख आहे. त्या धनुर्विद्येत व खड्गादी शस्त्रांच्या वापरात निपुण असत.

---

१. अयि किं न वेत्सि यदेकत्र नो विद्यापरिग्रहाय नानादिगन्तवासिनां साहचर्यमासीत् । अंक पहिला.

२. इदानीमेव स्वदुहितरं अतिथिसत्काराय नियुज्य सोमतीर्थं गतः । अंक पहिला.
महाभारतातही कुंतीकडे असे काम आले होते व दुर्वासासारख्या अतिथीला तिने संतुष्ट केले होते असा उल्लेख आहे.

३. पुरुषवद्योषितोऽपि कवीभवेयुः । श्रूयन्ते दृश्यन्ते च राजपुत्र्यो महामात्रदुहितरो गणिकाः कौतुकिभार्याश्च शास्त्रप्रहितबुद्धयः कवयश्च ।

घेत. अशा वेळी त्यांच्या पत्नींपैकी कोणाही पत्नीला लोकनिंदेमुळे वेगळे राहाता येत नसे. शाकुंतलाच्या पाचव्या अंकात याचा उल्लेख आहे.[1] एवढेच नव्हे तर पत्नीवर सर्वस्वी पतीचाच ताबा असणे योग्य असेही तेथे म्हटले आहे.[2]

सतीची चाल, तिचा प्रसार व निषेध

विधवा स्त्रीला समाज कसा वागवितो हे पाहिले म्हणजे त्याच्या स्त्रीवर्गविषयक दृष्टिकोणाची योग्य कल्पना येऊ शकते. प्राचीन वैदिक काली विधवेने सती जावे असा दंडक असावा. परंतु तो पुढे टिकला नाही व पुढे खि. पू. ४०० पर्यंत आपणास सती पद्धतीचा मागमूसही दिसत नाही. साधारणपणे खि. पू. ३०० पासून सती जाण्याच्या रूढीचा उल्लेख दिसतो. याच काळात रचल्या गेलेल्या महाभारतात माद्री सती गेल्याचा उल्लेख आहे. पण याही बाबतीत, जमलेल्या ऋषींनी तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला असे म्हटले आहे.

भट्टनारायणाच्या वेणीसंहार नाटकात चौथ्या अंकात कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर एक स्त्री सती गेल्याचा उल्लेख आहे. पण हा नाटककाराचा कालविसंवादात्मक प्रमाद आहे. सती जाण्याची रूढी विशेषतः क्षत्रियांमध्ये इ. स. ४०० च्या सुमारास लोकप्रिय होऊ लागली होती. वात्स्यायनाच्या कामसूत्रांत या रूढीचा उल्लेख आहे. दूतघटोत्कच व ऊरुभङ्गः या नाटकात भासाने उत्तरा, दुःशला व पौरवी या अनुक्रमे अभिमन्यू, जयद्रथ व दुर्योधन यांच्या मृत्यूनंतर सती गेल्याचे सांगितले आहे. या बाबतीत त्याने महाभारतातील मूळ वृत्तांतात फरक केलेला दिसतो. कुमारसंभवाच्या चौथ्या सर्गात रती पतिमरणानंतर सती जाण्याच्या तयारीत असता त्या वेळी झालेल्या आकाशवाणीमुळे ती आपला निश्चय बदलते असे कालिदास सांगतो. रघुवंशाच्या सतराव्या सर्गात कुश युद्धात मारला गेला तेव्हा त्याची पत्नी कुमुद्वती सती गेली असे वर्णन रहाव्या श्लोकात आहे. मृच्छकटिक नाटकात दहाव्या अंकात चारुदत्ताची पत्नी धूता पतीला वधस्तंभावर चढविल्याची वार्ता ऐकताच मरणाची तयारी करीत असल्याचे शूद्रकाने दाखविले आहे.

या रूढीला बुद्धिनिष्ठ विरोध करण्याचे श्रेय बाणभट्टाकडे (इ. स. ६२५) जाते. तो म्हणतो, 'प्रिय व्यक्तीच्या पाठोपाठ मरण स्वीकारणे निष्फळ होय. मूर्ख लोक अशी रूढी पाळतात. मोहाने घडत असलेला हा प्रमाद होय. घाईगर्दीत बेछूटपणे स्वीकारलेला

१. सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयां जनोऽन्यथा भर्तृमती विशङ्कते ।
अथ तु वेत्सि शुचिव्रतमात्मनः पतिकुले तव दास्यमपि क्षमम् । (५.१९,२७)

२. उपपन्ना हि दारेषु प्रभुता सर्वतोमुखी । (५.२६)
(मनुस्मृतीच्या 'प्रदानं स्वाम्यकारणम् (५.१५२)' या नियमाचाच हा परिपाक आहे हे उघड आहे.)

ते पाहावयाचे आहे. पुरुषस्वभावापेक्षा स्त्रीस्वभाव कालिदासाने अधिक बारकाईने व वात्सल्यतेने रंगविला आहे. कालिदासाने रघुवंशात रेखाटलेले सीतेचे शब्दचित्र वाल्मीकींचा अपवाद सोडता इतर कोणाकडूनही इतक्या परिणामकारक रीतीने रेखाटता आलेले नाही. कालिदासाने कुमारसंभवात रेखाटलेले कन्या उमेचे चित्र म्हणजे एका आदर्श कन्येचे चित्र आहे. तिच्या लहानपणाच्या क्रीडांचे वर्णन कालिदासाने केले आहे. तिचे वाढते सौंदर्य कालिदासाने फार हृद्य रीतीने वर्णिले आहे. ती आपल्या पित्याला आपल्या मुलाहूनही अधिक प्रिय वाटे व तिच्या जन्माने पित्याला धन्य धन्य वाटत असे. हे वर्णन वाचून कन्या जन्माला येणे आताइतके दुःखदायक वाटत नव्हते असे दिसते.

आध्यात्मिक उन्नतीसाठी मुलगा हवा हवासा वाटत असेल तर सुंदर, कलावती अशी कन्या व्हावी अशीही आंतरिक इच्छा हिंदूंच्या मनात असे. शाकुंतलाच्या चौथ्या अंकात शकुंतला सासरी जात असता कण्वाच्या हृदयाची झालेली कालवाकालव 'यास्यत्यद्य शकुंतलेति हृदयं' या श्लोकात व्यक्त झाली आहे. त्याच अंकात 'अर्थो हि कन्या परकीय एव' या श्लोकात एखादी मोलाची ठेव ज्याची त्याला परत केल्यावर मनाला जे हलके वाटते त्याचे वर्णन वाचून पिता व कन्या यांच्यातील एक आगळाच जिव्हाळा प्रत्ययास येतो.

कुमारसंभवात उमेच्या शिक्षणाचे वर्णन करताना पूर्वजन्मीच्या कला आणि शास्त्रे या जन्मातही तिच्यामध्ये विशेष तेजाने तळपू लागली,[1] असे कालिदासाने म्हटले आहे. वनकन्या शकुंतला ही देखील सुशिक्षित, गृहकृत्यात दक्ष व आतिथ्यशीलतेत निपुण अशी दाखविली आहे. इतकेच नव्हे तर प्रसंग पडल्यास भर सभेत तोंड टाकून बोलणाऱ्याला बाणेदार उत्तर देणारी स्त्री म्हणूनही तिचे चित्र रेखाटले आहे. मेघदूतातील यक्षपत्नी ही शारीरिक व मानसिक सौंदर्याने विनटलेली अशी रंगविली आहे. चित्रकला, काव्यकला व संगीत यांमध्ये ती निपुण होती असे कालिदास म्हणतो.

मालविकाग्निमित्र नाटकात मालविकेच्या कलाध्ययनातील प्रगतीचे वर्णन करताना कालिदास म्हणतो, 'गीत व नृत्य यांत ती असे काही विशेष नैपुण्य दाखवी की, ती आपल्या नृत्यशिक्षकाला जणू परत शिकवीत आहे, असे वाटे.'[2] त्यामुळे, ज्ञान आत्मसात करण्यात स्त्रिया स्वभावतः निपुण असतात, असेही तो म्हणतो.[3]

कन्या योग्य घरी पडली म्हणजे मग चिंतेचे कारण उरत नाही असे कुमारसंभवात कालिदास म्हणतो.[4] वैवाहिक बाबतीत पती आपल्या पत्नीच्या सल्ल्याने

१. कुमारसंभव १.३०

२. तत्तद् विशेषकरणात् प्रत्युपदिशतीव मे बाला। मालवि०

३. निसर्गनिपुणाः स्त्रियः। मालवि० २

४. अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता। कुमार० ६.७९

घेईल व एखाद्या प्रसंगातून सुटण्यास कशी पळवाट काढील याचाही नियम नसे. पुष्कळ वेळा हे सर्व न्यायालयाच्या व अखेर राज्यकर्त्यांच्या मर्जीवर अवलंबून राही हे उघड आहे.

शास्त्रकार आणि नृपति यांचा उदार दृष्टिकोण

स्त्री गुन्हेगारांच्या नियमनाप्रमाणेच स्त्रियांच्या वारसा-हक्कांचा स्मृतिकारांनी फारच बारकाईने विचार केला आहे तो साकल्याने लक्षात घेतल्यास स्त्रीच्या काही विशिष्ट धनावरील मालकीस काळजीपूर्वक मान्यता देण्याकडे समाजाची प्रवृत्ती होती यात शंका वाटत नाही. याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये पतीने मुले व स्त्री यात आपली मालमत्ता विभागून द्यावी, पण तिचे स्त्रीधन असेल तर तिला तिच्या वाट्याचा निम्मा हिस्सा द्यावा असे सांगितले आहे. परजातीच्या स्त्रीच्या मुलांना वारसा हक्क पुढीलप्रमाणे : ब्राह्मणास क्षत्रिय स्त्रीपासून झालेल्या संततीस ब्राह्मण-पुत्राच्या निम्मा, वैश्य स्त्रीसंततीस १/३ व शूद्र स्त्रीसंततीस १/४ असे वारसा हक्क असावे. आईच्या मालकीची संपत्ती तिच्या पश्चात तिच्या मुलांनी आईचे जे कर्ज असेल ते प्रथम वारून नंतर ती आपसात सारखी वाटून घ्यावी. संततीहीन विधवेला मृतपुरुषाच्या मालमत्तेबाबत अग्रवारसा हक्क प्रदान केला आहे. पण तिने विधवाधर्माचे आचरण सोडल्यास तिला फक्त पोटगी मिळण्याचा हक्क असावा असे प्रतिपादन आहे. तसेच पतीने स्वस्त्रीचा त्याग करून दुसरे लग्न केले तर परित्यक्ता स्त्रीस आपल्या मालमत्तेचा एकतृतीयांश अंश द्यावा.[१] स्त्रीच्या सती जाण्याबद्दल सक्तीपेक्षा अनुमतीदर्शक व पसंतीदर्शक नियम घालून देण्याचा स्मृतींचा कल आहे. सुलतान मुहंमद तुघ्लुख याने सतीचे कायदेशीर नियमन करण्याचा प्रथम प्रयत्न केला व सती जाणाऱ्या स्त्रीने सरकारी परवाना घेतला पाहिजे असा निर्बंध घातला. वेश्याव्यवसायाबाबत अलाउद्दीन खलजीने निर्बंध घातला की वेश्यांनी लवकरच लग्ने करावी. पण हा त्याचा नियम कागदोपत्री राहिला. कबीर व नानक हे सतीच्या चालीविरुद्ध होते. नानक म्हणतो 'विधवेवर सतीची सक्ती काय म्हणून ? प्रिय पतीच्या विरहाचा दुःखाग्नि अगोदरच तिला होरपळून काढतो त्यात हा सहानुभूतीशून्य निर्दयपणा आणखी कशाला ? बरं ती तशी विरहाग्नीने होरपळत नसेल तर नुसत्या शरीरदहनात तरी अर्थ काय ?'

त्या काळी पडद्याच्या चालीचेही मोठे प्रस्थ होते. परंतु कबीरासारख्या संतांनी पडदानशीनतेविरुद्ध तक्रार केली व स्वतःच्या सुनेस पडदा पाळण्यापासून परावृत्त केले.[२] या काळात वधूपित्याने वराच द्यावयाच्या हुंड्याची चाल रूढ झाली व उत्तर हिंदुस्थानापेक्षा दक्षिणेत ती अधिक जाचक होती, असे दिसते. या चालीचा स्त्रीच्या

---

१. कित्ता पृ. ६०४.

२. रामकृष्ण मिशन प्रकाशित कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया–खंड २, पान ६३०

समाजातील स्थानावर परिणाम होणे अपरिहार्य होते.' हुंड्याच्या चालीला आळा घालावा म्हणून विजयनगरच्या दुसऱ्या देवरायाने सर्व ब्राह्मणवर्गांशी विच[illegible] करून ब्राह्मण कन्येचा विवाह साध्या कन्यादान विधीने व्हावा व जो कोणी विवाहसमयी हुंडा देईल किंवा घेईल तो गुन्हेगार समजावा असा नियम केला. असेच नियम कोंडापल्ली ते राजमहेंद्री या प्रदेशांत व इतरत्र दुसऱ्या जातींबद्दल पुढे करण्यात आले. त्यांची अंमलबजावणी कशी झाली ते कळण्यास मात्र मार्ग नाही. नीलकंठ संन्याल म्हणतात, वल्लभाचार्यांस आपली मुलगी चैतन्यास कशी देऊ करावी याबद्दल शंका वाटत होती, कारण त्यांच्याजवळ तिच्या विवाहसमयी देण्यास पुरेसे द्रव्य नव्हते. या सर्व प्रतिपादनाचा व उदाहरणांचा साकल्याने विचार केला तर असा निष्कर्ष निघतो की स्त्रीचे पुरुषदास्य, तिचे गृहक्षेत्रात निमग्न रहाणे, परंतु तिच्या स्त्रीधनाच्या पावित्र्याची कदर राखणे या प्रवृत्ती स्मृतीग्रंथांच्या प्रतिपादनातून दिसून येतात.'

येथपर्यंत इ. स. १२०६ ते १५२६ या सुलतानशाही काळातील स्त्रीविषयक निर्बंध व चालीरीती यांचे समालोचन करून तिचे समाजातील स्थान याबद्दल अंदाज घेतला. परंतु या काळातील कित्येक तेजस्वी स्त्रियांच्या पराक्रमाचा त्रोटक उल्लेख केल्याखेरीज हा विषय पुरा होणार नाही.

सुलतानशाही काळातील तेजस्वी स्त्रिया

अशा स्त्रियांत जयचंदकन्या व पृथ्वीराजस्त्री संयोगिता हिचा कालक्रमाने प्रथम उल्लेख केला पाहिजे. तिने स्वयंवरात आपल्या पित्याच्या मनाविरुद्ध पृथ्वीराजास वरले, निदान पृथ्वीराजाने तिचे अचानक हरण केले, ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट सर्वांस ठाऊक आहे. पुढे तिने पृथ्वीराजास महमद घूरीच्या विरुद्ध लढण्यास उत्तेजन दिले. उभयतांचे युद्ध स्थानेश्वरनजिक तरायन येथे झाले असता पृथ्वीराज धारातीर्थी पतन पावला, संयोगिता त्याजबरोबर स्वर्गाची वाट धरण्यासाठी श्रद्धेने सती गेली. या सर्व गोष्टींत संयोगितेचे विवाहसमयीचे प्रौढ वय, पतीच्या कार्याशी समरस होण्याची पात्रता व पतीधर्मावरील अढळ श्रद्धा ही स्पष्ट दिसून येतात. दुसरे उदाहरण अल्लाउद्दीन खल्जीची चितोडवर स्वारी झाली असता पद्मिनी व अनेक राजपूत स्त्रिया यांनी केलेला जोहार. पद्मिनीच्या परिचित कथानकात काहीसा अतिरंजित भाग असला तरी पद्मिनी व राजपूत स्त्रिया यांचा स्वतःचे पावित्र्य रक्षण करण्यासंबंधीचा कटाक्ष हा सर्वमान्य असा आहे. राजपूतांप्रमाणेच या काळात गुलाम घराण्यातील शमसुद्दीन इल्तुमिशची मुलगी सुल्ताना रेझिया या इस्लामी स्त्रीचे राज्यकर्तेपण सर्वांस परिचित आहे. गादीवर

बसल्यावर तिने थोड्या दिवसांनी पडदा झुगारून दिला अशी माहिती मिळते. तत्पूर्वी मात्र 'ती सिंहासनावर असताना तिचा मुखचंद्रमा पडद्याआड झाकलेला असे आणि तिची तलवार मात्र विजेप्रमाणे तळपत असे' असे काव्यमय वर्णन जुन्या इस्लामी ग्रंथात आढळते.) तिने अनेक लढायांत भाग घेतला. तुर्की सरदारांचे श्रेष्ठत्व कमी करण्यासाठी तिने एका हबशी सरदारास जवळ केले पण दरबारी लोकांनी त्यास ठार मारले. पुढे दरबारी लोकांचा स्त्रीराज्यकर्तीविरुद्ध रोष टाळण्यासाठी तिने एका तुर्की सरदाराशी लग्न केले. शेवटी इल्तुमिशचा जावई बाल्बन तिच्या विरुद्ध उठला, व त्या झगड्यात ती अखेर ठार झाली. रेझियाचे हे चरित्र ज्याप्रमाणे तिच्या व्यक्तिगत कर्तृत्वावर प्रकाश टाकते त्याचप्रमाणे येथील तत्कालीन तुर्की समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन समजण्यास साह्य करते. कित्येक लेखक कुराणातील व अन्य आधारग्रंथांतील वचने दाखवून इस्लामी समाजातील स्त्रीच्या उच्च स्थानाची तरफदारी करतात, परंतु त्या समाजात अनेक पत्नी करण्याची परवानगी, पडद्याची चाल व स्त्रियांवर घालून दिलेले निर्बंध हे लक्षात घेता मध्ययुगीन कालातील भारतातील इस्लामी स्त्रीचे स्थान अजमावताना नुसत्या शास्त्रांना आधार घेऊन चालणार नाही हे मान्य केले पाहिजे. मात्र इस्लामी कन्येला आपल्या बापाच्या मिळकतीत हिंदू कन्येपेक्षा अधिक हक्क शास्त्राने व समाजाने प्रथम पासून मान्य केले आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

या काळाच्या थोडे आधी म्हणजे बाराव्या शतकात गुजरातेत होऊन गेलेल्या कर्तृत्ववान स्त्रिया उल्लेखनीय आहेत. अनहिलवाडापट्टण उर्फ पाटण येथे राज्य करणारा सिद्धराज जयसिंह (१०९४–११४३) याची आई मयणल्ला हिने सिद्धराजाच्या बाल्यात मोठ्या हुषारीने राज्यकारभार केला. तिने विरमगाव व धोलका नजीक तलाव बांधले, सोमनाथच्या यात्रेकरूंवरील कर रद्द केला, अशी माहिती मिळते. परंतु या काळात श्वेतांबर व दिगंबर या दोन जैनपंथांत ज्या विषयावर वाद पडला होता तो या वेळच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनावर प्रकाश टाकणारा आहे. वादाचा विषय स्त्रीला मुक्ती मिळू शकते की नाही असा होता. हा वाद सिद्धराजाच्या समक्ष झाला. वादात मयणल्लाचा उल्लेख होऊन तिच्यासारख्या स्त्रिया या मोक्षास अधिकारी आहेत असे श्वेतांबर पक्षाने सांगितले, त्यास कोणी विरोध केला नाही. गुजरातच्या आणखी एका कर्तृत्ववान राणीचे नाव नाइकीदेवी. ही पाटणचा राजा (११७६–७८) मूळराज याची आई. मूळराज अगदी लहान असता राज्यावर मुसलमानांची, बहुधा महंमद घूरीची स्वारी झाली. त्या प्रसंगी तिने आपल्या मुलास मांडीवर घेऊन लढाईत भाग घेतला व मोठ्या शौर्याने शत्रूस तोंड दिले आणि त्याचा पराभव केला असे वर्णन आहे. या नाइकीदेवीखेरीज तेजपाल व वास्तुपाल या जोडीपैकी तेजपालची स्त्री अनुपमा हिच्या अनुज्ञेने अबूच्या पहाडातील अप्रतिम व अमर असे शिल्पकाम निर्माण झाले. ही मोठी वत्सल होती, व षड्दर्शनमाता म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. याखेरीज, कंचनराज्ञ या स्त्रीचे कर्तृत्व विशेष असे मानले जाते.

गुजरातेतील या वीर स्त्रियांखेरीज काश्मीरची लल्लादेवी, दक्षिणेतील कुमा… याची स्त्री गंगादेवी, तेलुगु कवयित्री मोल्ला, महाराष्ट्रातील महानुभाव कवयित्री म… भक्तिमार्गपरायण मुक्ताबाई व जनाबाई, पूर्वेकडील तिरहुतच्या राजघराण्यातील … देवी, साधु चैतन्याची आई शचीदेवी या सर्व स्त्रिया संत, तत्त्वज्ञ आणि … म्हणून नाव घेण्यासारख्या आहेत. या सर्वांची अधिक तपशीलवार माहिती भा… थोर स्त्रिया (इंग्रजी) या श्रीशारदादेवीच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेल्या… सापडेल. त्याचे मराठी भाषांतरही डॉ. सौ. शरयू बाळ यांनी प्रसिद्ध केले आहे.

मध्ययुगाच्या या प्रथम खण्डात प्रसंगाने प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक … अशी नामावली दिली तरी तेवढ्यावरून तत्कालीन स्त्रीजीवनाविषयी सामान्य … बांधता येत नाहीत. उलट तत्कालीन स्त्रीजीवन हे पुरुषावलंबीच असून वरील उ… केवळ अपवादभूतच मानावी लागतात व हा काल वाचीत असता अभ्यास… असा प्रश्न उभा राहतो की जर फार प्राचीन काळी धाडशी आर्यांना आर्येत… झगडण्यासाठी बाहेर जावे लागल्याने घरी आपल्या स्त्रियांना स्वातंत्र्य द्यावे लाग… काळाच्या गरजेमुळे त्यांच्यात पुनर्विवाह व प्रौढाविवाह हे रूढ झाले, तर या काळ… भारतीयांना बाहेरून आलेल्या मुसलमानांविरुद्ध तोंड देण्यास सिद्ध होण्यास अ… समाजात जरूर ते बदल करून स्त्रीस स्वातंत्र्य देण्याचे का सुचू नये? प्रस्तुत लेख… मते या प्रश्नाचे उत्तर असे आहे की आर्य भारतात आले ते विजिगीषू व अ… असे आले. याच्या उलट मुसलमानकालीन भारतीयांना बाहेरून आलेल्या आक्रमकां प्रथम तोंड द्यायचे होते व त्यांचे धोरण संरक्षक, संकुचित व बचावाचे असे होते. आक्रमणशील समाज हा स्वतःबाबत स्वातंत्र्यप्रिय व सुधारणाप्रिय असतो. उलट बचावाचे धोरण स्वीकारणारा समाज हा काहीसा भीतिग्रस्त व कर्तव्यपरायणतेने धारातीर्थी पतनास सिद्ध झालेला असतो. अर्थात हे विधान केवळ तर्काधिष्ठित असून यावर अधिक विचारमीमांसा होणे अगत्याचे आहे.

सम्राट अकबराचे स्त्रीजीवनविषयक विचार

मध्ययुगातील द्वितीय कालविभाग इ. स. पू. १५२६ ते १७०७ हा होय. हा मुघलबादशाहीचा काळ. विवेचनाच्या सोयीसाठी मराठी रियासतीतील स्त्रीजीवन अंमळ बाजूस ठेवून प्रथम मुघल राजवटीतील स्त्रीजीवनाचा प्रश्न विचारात घेता त्या संबंधात अकबराचे व्यक्तिमत्व प्रामुख्याने नजरेसमोर उभे राहाते. कारण त्याच्याएवढा सामाजिक प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार करणारा पुरुष भारताच्या मध्ययुगीन इतिहासात झालेला आहे, असे वाटत नाही. त्या विचाराची कल्पना येण्यासाठी अबुल्फजलने लिहिलेल्या 'ऐने अकबरी' ग्रंथात अकबराच्या तोंडची काही वचने ग्रथित केलेली आहेत.'

क्रमताम वळण लावीत लावीत सामाजिक सुधारणा करीत जाण्याचे त्याचे सर्वांचा नीट विचार केला तर युरोपातील पंधराव्या सोळाव्या शतकातील मार्टिन ल्यूथर यांसारख्या बुद्धिवादी समाजक्रांतिकारकांशी त्याचे काहीसे साम्य फरक एवढाच की, अकबरास त्याच्या भोवतालच्या वातावरणामुळे समाजात सुधारणा घडवून आणणे अशक्य झाले व त्याचा बुद्धिवादी प्रागतिक दृष्टिकोण त्याच्याबरोबरच अस्तंगत झाला.

अकबराच्या समग्र सुधारणांचे विवेचन करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु समाजातील आचारास बाजूस सारून व परंपरेचे पटल दूर करून बुद्धिवादाने समाजास पटणाऱ्या सुधारणा, समाजास रुचेल व पचेल अशा बेताने समाजाच्या गळी उतरविण्याचा त्याचा मोठा प्रयत्न होता व त्यात स्त्रीजीवनात सुधारणा घडवून आणणे या स्थान होते याबद्दल जी माहिती मिळते त्यायोगे जसे अकबराचे मोठेपण येते त्याचप्रमाणे तत्कालीन स्त्रीजीवनाच्या मर्यादाही अभ्यासकाच्या लक्षात येतात.

स्त्रीजीवनात पुरुषांचे वर्चस्व

डॉ. आर. सी. मुजुमदार आदीकरून प्रसिद्ध इतिहासकारांच्या मते या काळच्या सामाजिक चालीरीती म्हटल्या म्हणजे सती, बालविवाह, विवाहसंबंधात कुळ-विचार, व वरदक्षिणा ह्या होत. अकबराने यास निर्बंध घालण्याचा यत्न केला. विवाहास वधूवरांची व त्यांच्या आईबापांची मान्यता असावी. रजोदर्शनापूर्वी स्त्रीचा विवाह होऊ नये व अनेकपत्नीविवाहास आळा घालावा वगैरेसारखे नियम घालून दिले. पण प्रत्यक्ष व्यवहारात त्याची परिणामकारक अंमलबजावणी झालीसे दिसत नाही. विशेषतः बंगालमध्ये तर त्याची अंमलबजावणी न झाल्याचे अनेक पुरावे सोळाव्या सतराव्या शतकातील बोल्टस, क्रॉफर्ड, स्क्रॅफ्टनसारख्या युरोपियनांच्या लेखनातून व समकालीन एतद्देशीय साहित्यातून हवे तेवढे मिळू शकतात.[१] महाराष्ट्रात मात्र ब्राह्मणेतरात विधवा-विवाहाची चाल होती तशीच ती पंजाबात व यमुनाकाठच्या प्रदेशात जाठातही होती. परंतु जाठात अनेकपत्नी विवाह मात्र होत असत. अठराव्या शतकात बंगाल्यात डाक्क्याचा प्रमुख राजवल्लभ याने विधवाविवाह सुरू करण्याचा यत्न केला, परंतु तो निष्फळ झाला. काही अपवादभूत थोड्या स्त्रिया त्या काळच्या राजकारणात चमकलेल्या इतिहासात नमूद असल्या तरी तत्कालीन स्त्रिया एकंदरीत पुरुषांच्या वर्चस्वाखालीच असत.[२]

---

१. चंडी मंगल या प्रसिद्ध काव्याचा कर्ता मुकुंदराम या सोळाव्या शतकात होऊन गेलेल्या लेखकाने म्हटले आहे की जर मुलीच्या बापास आपल्या कन्येचा विवाह नवव्या वर्षी उरकून घेता आला तर तो मोठा सुदैवी व ईश्वरकृपेस पात्र असा इसम समजावा. 'कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया' खंड २ रा पान ६२७

२. 'ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया' पान ५६८

वसल्याव[?] होता. त्याचे प्रायश्चित्त अकबराने तिला दिले. याखेरीज अकबराच्या मात्र 'ल[?] चितोडच्या वेढ्याचे प्रसंगी जयमल्ल हा लढाईत पडल्यावर अल्पवयी पट्टा तिची तल[?]चा पुढारी झाला व त्यास त्याच्या आईने खुषीने रुकार देऊन युद्धास आढळते. [?]बद्दलचे वर्णन रिमथच्या पुस्तकात दिले आहे ते वाचण्यासारखे आहे. तिने एक[?]च्या रक्षणासाठी मुरादविरुद्ध लढणाऱ्या चांदबिबीचे शौर्य सर्वांस परिचित दरबारी है[?]ांना अधिक विस्तार करीत नाही. चांदबिबीप्रमाणेच जहांगीरनी कर्तृत्ववान केले. शे[?] हिचे चरित्र विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. शाहजहानची अखेर ज[?]आरा बेगम ही देखील मोठी कर्तृत्ववान स्त्री होती. तिने बापाच्या टाकते र[?]त अनेक जबाबदारीची कामे केली. दक्षिणेत विजयनगर साम्राज्याचा शेवट साह्य व[?]हैसूरच्या वायव्येस असलेल्या केळदी संस्थानाचे नायक जवळजवळ स्वतंत्र इस्लाम[?]मार करीत. त्या घराण्यात चेन्नम्मा ही स्त्री इ. स. १६७७ पासून पुढील पती [?]राज्य करीत असता संभाजीच्या वधानंतर रायगडहून निसटून निघालेला घेता [?]क्षिणेस तिच्या राज्यात आला असता तिने त्यास आश्रय देऊन औरंग-शास्त्राक[?]जेस मोठ्या शौर्याने तोंड दिले व राजारामास बिदनूरपासून जिंजीपर्यंत आपल्[?]होचविले. तिच्या शौर्याने औरंगजेब चकीत होऊन त्याने तिचा गौरव केला. पासून[?]पर्यंत आपल्या राज्याचे स्वातंत्र्य कायम राखले. दुसरी स्त्री त्रावणकोरची [?] मुघल सरदाराने त्रावणकोरवर आपला अंमल बसविला असता तिने त्यास [?]ठार मारले व त्रावणकोरचे रक्षण केले. तिने इ. स. १६७८–८४ या काळात त्रावणकोरवर राज्य केले. तिसरी स्त्री मदुरेची मंगम्मा हिने इ. स. १६८९ ते १७०७ या काळात मदुरेचे रक्षण केले. मुघल सैन्याचा प्रभाव पाहून तिने औरंगजेबाचे वर्चस्व मान्य करून आपल्या राज्याचे रक्षण केले. परंतु इतर आजूबाजूच्या राज्यापासून आपल्या राज्याचा बचाव केला. ती धर्मशील व न्यायी होती. काठेवाडचे ब्राह्मण तिच्या राज्यात होते ते धार्मिक बाबतीत काही निर्णयासाठी तिजकडे गेले असता तिने त्यांचे समाधान केले.

या काळात बंगालमध्ये उत्तरेकडील प्रदेशात नाटोर येथील जहागिरीची व्यवस्था पहाणारी राणी भवानी ही फार प्रसिद्ध आहे. इ. स. १७४६ साली आपला पती रमाकांत याच्या मृत्यूनंतर तिने कारभार आपल्या हाती घेतला. तिचे एकंदर चरित्र वाचले व तिची न्यायी व धार्मिक वृत्ती पाहिली म्हणजे मराठी वाचकास अहिल्याबाई होळकरची आठवण होते.

राजकारणात भाग घेणाऱ्या स्त्रियांखेरीज इतर क्षेत्रांत चमकलेल्या स्त्रियांचाही संक्षेपाने उल्लेख करणे जरूर आहे. त्यांत हुमायूनची बहिण व हुमायूननामा या ग्रंथाची लेखिका गुल्बदन बेगम, राजपुतान्यातील प्रसिद्ध साध्वी–राणा संगाची सून–मिराबाई या उल्लेखनीय आहेत. याखेरीज दक्षिणेकडे विजयनगरच्या राज्यात अच्युतदेवरायाच्या पदरी ओडुव तिरुमलांबा नांवाची कवयित्री होऊन गेली. म्हैसूरच्या राज्यात होनम्मा

झाशीच्या रक्षणार्थ धारातीर्थी पतन पावणाऱ्या राणी लक्ष्मीबाईबद्दल काय लिहावे? शेवटच्या लढाईपूर्वी तिने काही पांथस्थ ब्राह्मणांजवळ काढलेले उद्‌गार पुढे देण्यासारखे आहेत. ती म्हणते 'मी अर्धा शेर तांदळाची धनीन, मजला XXX विधवाधर्म सोडून हा उद्योग करण्याची काही जरूर नव्हती. परंतु हिंदुधर्माचा अभिमान धरून ह्या कर्मास (लढण्यास) प्रवृत्त झाले व याजकरिता वित्ताची, जीविताची, सर्वांची आशा सोडिली'' हे उद्‌गार काढून राणीने निष्काम कर्मयोगाचा आदर्श जगापुढे ठेवला व महाराष्ट्राची स्त्री कशी असू शकते याचे जिवंत उदाहरण इतिहासात ठेवून ती चिरंजीव झाली. कोल्हापूरचा दुसरा संभाजी याची स्त्री जिजाबाई हिनेही पेशव्यापासून आपले राज्य सुरक्षित ठेवण्याची मोठी दक्षता ठेवली.

मराठेकालीन इतिहासप्रसिद्ध स्त्रियांचे वर्णन यापेक्षा अधिक विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यांच्या उदाहरणावरून मराठेकालीन सामान्य स्त्रीच्या जीवनाबद्दल निष्कर्ष काढणे धोक्याचे असले तरी ती पूर्वकालीन स्त्रीइतकी शास्त्र व रूढी यांच्या बंधनांनी जखडलेली नव्हती हे पूर्वीच्या विवेचनावरून स्पष्ट झाले असेल. त्या काळी केवल स्मृतीसारख्या आणखी कोणकोणत्या स्मृति प्रमाण मानल्या जात, याचा वास्तविक अधिक बारकाईने विचार व्हावयास पाहिजे. तसेच मध्ययुगीन काळात पूर्वीपासून पैठण हे धर्मपीठ मानले जाई. तेथील पंडितांनी वेळोवेळी कोणकोणते शास्त्रार्थ काढले व निर्णय केले आणि त्यांचा स्त्रीजीवनावर कसा परिणाम झाला याचाही तपशिलाने अभ्यास केला पाहिजे. परंतु माहितीच्या अभावी या मुद्द्याचा केवळ उल्लेख करून येथेच हा विषय पुरा करतो.

परकीय भांडवलशाहीमुळे सामाजिक क्रांति

मध्ययुगीन ऐतिहासिक कालातील स्त्रीसंबंधीचे हे समालोचन पुरे करण्यापूर्वी एक सामान्य विधान करणे जरूर आहे. कार्ल मार्क्स हा ऐतिहासिक दृष्ट्या सामाजिक घटनांचा मीमांसक होता हे सर्वांस माहीत आहे. त्याने भारतासंबंधी जे लेखन केले आहे त्यात असे म्हटले आहे की, 'भारतात जी एकच समाजक्रांती घडून आली ती परकीय भांडवलशाहीमुळे घडून आली.' ('Alien capitalism brought about the only social revolution in India') त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा की, भारतात फार प्राचीन काळापासून अनेक राजकीय किंवा धार्मिक क्रांत्या झाल्या. राजपुतांचा पाडाव व सुलतानशाही किंवा मुघलशाहीचा उदय या राजकीय क्रांत्या होत. हिंदु-बौद्ध, शैव-वैष्णव, हिंदु-मुसलमान यांच्यातील वाद किंवा झगडे व पडझड याना धार्मिक क्रांत्या म्हणता येईल. परंतु भारतात पूर्वीच्या काळी एकदार जी कृषिप्रधान सरंजामशाही, चातुर्वर्ण्यप्रधान समाजव्यवस्था निर्माण झाली त्या समाजव्यवस्थेत कधी

धक्का लागला नाही. राजपूत आले व गेले, मुसलमान आले व गेले. तसेच राष्ट्रकूट चालुक्य वगैरेही. पण कुणासही भारतातील सरंजामशाहीस धक्का लावावासा वाटला नाही. पूर्वीचे हिंदू सरदार गेले पण त्या जागी नबाब आले. पण दोघेही सरंजामी वृत्तीचेच! तसेच कुणासही जातिबंधने, चातुर्वर्ण्य, स्त्रियांवर शास्त्राने घातलेले निर्बंध हे जाचक आहेत व त्यात बदल केला पाहिजे असे तीव्रतेने वाटले नाही. किंवा अस्पृश्यता हा हिंदू समाजावरील कलंक आहे असेही वाटले नाही. सारांश, व्यक्तिस्वातंत्र्यप्रधान सामाजिक चळवळ व क्रांती भारतात गेली आठरो हजार वर्षे झाल्याचे आढळून येत नाही. परंतु पाश्चिमात्य व्यापाऱ्यांच्या आगमनाने भारतात आलेल्या भांडवलशाहीने सरंजामशाहीस धक्का दिला व आपले जुने शास्त्रार्थ व समाजनिर्बंध हे पुनः एकवार बुद्धीच्या कसोटीवर घासूनपुसून परीक्षून घेणे समाजास आवश्यक वाटले. या समाज क्रांतीचे महाराष्ट्रातील अध्वर्यु लोकहितवादी, जोतीराव फुले, रानडे, आगरकर व महर्षि अण्णासाहेब कर्वे हे होत.

या मुद्द्याचा कितीतरी विस्ताराने विचार करता येईल. परंतु प्रस्तुत लेखकास दिलेल्या नियोजित विषयाची कक्षा येथे संपली असल्याने मध्ययुगीन इतिहासकालीन स्त्रीचे हे त्रोटक समालोचन या सर्व समाजधुरीणांच्या स्मृतीस वंदन करून येथेच पुरे करतो.[1]

---

१. या निबंधाचे लेखन करीत असता माझे मित्र प्रा. सरदेशपांडे व के. सी. कॉलेजचे ग्रंथपाल श्री. ओक यांचे साह्य झाले त्यांचा साभार उल्लेख करणे उचित होईल.

लोकसाहित्यातील स्त्री

सरोजिनी बाबर

डॉ. कु. सरोजिनी कृष्णराव बाबर, एम्. ए., पीएच्. डी. (जन्म ७-१-१९२२) प्रबंध, निबंध, कथा, कादंबरी, कविता, बालवाङ्मय, इत्यादी बरेच लेखन. प्रौढ नवसाक्षरांसाठी वाचनसाहित्य निर्मिति व अनेक प्रकारचे समाजिक कार्य. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती. संपादिका, समाजशिक्षणमाला. (१४८६, सदाशिव, पुणे २)

उगवत्या सूर्यदेवानं लाल शेंदराच्या खापांच्यामधून वर मान करीत आणि पूर्व दिशेनं उधळलेल्या गुलालाच्या राशीला मागं सारीत पहिल्यांदा आपल्या घरी यावं असं आमच्या मराठी मुलखातील बायका माणसांना नेहमीच वाटतं. म्हणून भल्या पहाटे उठून दारी सडासंमार्जन करावं, कणा रांगोळी घालावी, फुलांच्या पायघड्या सजवाव्यात, धुपारती फिरवावी, पंचारती फुलवावी, रत्नजडित सिंहासनाचं, चंदनाच्या पाटाचं आसन घालावं असल्या गोष्टी त्या मोठ्या हौसेनं करतात. घरी येतेल्या सूर्यदेवाला दिसेल अशा बेतानं तुळशीची पूजाअर्चा करावी, तुळशीवृंदावनाला प्रदक्षिणा घालीत गीतं म्हणावीत, पाप धुवून काढीत पुण्य पदरात घ्यायची माया करावी, आणि प्रसंगी आपल्या मुलांच्या पंगतीला बसवून त्याला दुधातुपाची न्याहारी पण द्यावी याचा देखील त्यांना भारी सोस. तुळशी सखीच्या शेजारी बसून कृष्णदेवाची चाललेली रासक्रीडा डोळ्यांनी बघावी आणि त्याच्या कवतिकानं भारावून जात आपल्या तान्हाला पण कृष्णदेवाच्या नावानं हाकारा घालीत धारोष्ण दूध प्यायला बोलवावं या हौसमौजेचा त्यांना विलक्षण छंद. म्हणून भल्या पहाटेच्या रामप्रहान्यात या सख्याराजणींनं दर्शन घ्यायचं झालं तर पाय न वाजवता, आवाज न करताना हळूच माजघरात जाता आलं पाहिजे आणि त्यांची गीतं ऐकून तृप्त होता आलं पाहिजे.

जात्याच्या पाळ्याची शीग पिठानं माखत उंचावल्यानं होणारं समाधान अनुभवता येणार आहे. म्हणून या बायकामाणसांच्या या आनंदाचे वाटेकरी होणारानं त्यांच्या मनोभावनांशी एकजीव व्हायला शिकलं पाहिजे. त्याशिवाय त्यातली गोडी मुळी चाखताच येणार नाही.

मालकीत चंद्रमौळी घर, दारात कोंबड्यांचा खुराडा, गोठ्यात चारदोन गाई-म्हशी न् त्यांची वासरं, शेतात बिघाभर जमीन, उतरंडीत थोड्याफार पैशांची पुरचुंडी, देव्हाऱ्यात देवादिकांचं वास्तव्य, घरात चार खाती तोंडं आणि एकला मिळवणारा अशा परिस्थितीतील सखुबाई सुगरण आपली ओळखपाळख सांगताना मोठी तालेवारी सांगते हं! म्हणते कशी —

"चांदीचं घंगाळ आंघोळीला. चंदनाचा पाट बसायला. केशरी गंध लावायला. जरीकाठी धोतर नेसायला. चांदीचे गडवे पेले. आत गंगाभागिरथीचं पाणी. राजगिरा अत्तर. ताट बिल्वराचं. उशा किनकाफाच्या. गाद्या गझनीच्या. हंड्या-झुंबरांचा लखलखाट. समया लावल्या तीनशेसाठ..." म्हणजे आहे की नाही डामडौल? आणि ही कुणाची कोण म्हणून विचाराल तर "ताग तागाची. मिशी बाघाची. लेक नाना दयाळांची..." असं सांगून मोकळी होते. हिला आपल्या माहेरचा भारी अभिमान. म्हणून भरल्या घरात जरा कुठं खुट्ट झालं तरी ती रुणझुणत्या पाखराबरोबर सांगावा धाडीलच. म्हणेल की, "कमानी दरवाजा आहे. चिरेबंदी वाडा आहे. झाडावर पारवे घुमताहेत. तर त्या खुणेनं जायचं. पंचमीला घेऊन जा म्हणून सांगावा द्यायचा. यमना जमना काठाचं इरकली लुगडं नेसलेली, कुंदळपोत घातलेली, आई तिथं आहे. दंडी तिच्या बाजूबंद, मनगटात गोटपाटल्या आणि बारा बिघ्यांच्या शेतावर भल्या दांडग्या विहिरीवर मोट धरलेला भाऊ आहे. त्याच्या हाती खिलार नंदींची दोरी न् गळ्यात गीत आहे. तर म्हणावं की, ये तू मला घेऊन जायला; तट्ट्याची गाडी आण; बैलांच्या गळ्यात घुंगूरमाळा असू देत."

परंतु मनात आलं की, थोडंच जायला मिळणार? घर संसारातून मुक्तता व्हायला नको? दादाराया न्यायला आले तरी सासऱ्यांची परवानगी? मोठं अवघड काम. दारी मूळ आलंय तर माहेरी जायला परवानगी द्या असं कुणाकुणाला विनवायचं! तर तपकीर वढत्या सासूला, चिलीम वढत्या मामंजींना, सोन्याच्या सुपलीनं खेळत्या नणंदेला, मोत्यांच्या विटीदांडूनं खेळत्या भाऊजींना, सोन्याच्या रवीनं ताक करत्या जावेला आणि घरात आणखी कोण असेल नसेल त्याला न् सरतेशेवटी आरशात बघत्या पतीला. मोठ्या मिनतवारीनं स्वारी दीड-दोन दिवसांची रजा देत राणीला जा म्हणते. पण सासूबाई? छे! त्या कारल्याचं आळं करून बी लावायला सांगीत पार त्याची कारली येऊन भाजी करून होस्तोवर थांबच म्हणते! तद्यातूनही जर का ही रंभा गेलीच माहेरी तर शंभर वेळा 'तुझं माहेर दुबळं आहे, तू लवकर ये' असं हिचा नवरा सांगेल. पण मग हीही म्हणेल की, "असू दे असू दे. दुबळं असलं तरी तुपात भिजवलेल्या शेवया केळीच्या

पानावर खाऊन येईन न् हिरव्याच्या का होईना साखळ्या लेवून येईन तरच नावाची."
अशी ही राधा मनाची मोकळी. आई भेटली की, दुधाला उकळी फुटावी तशी बोलत सुटते. गुजाच्या गोष्टी उसवल्या जातात. चंद्र अस्ताला जास्तोवर खामणीवर चिमणी जळते पण गुजाचा झाडा म्हणून होतच नाही. शुक्राची चांदणी उगवली तरी हे हितगुज चालूच हं! ह्या राजसवाळीला आई म्हणजे खजिन्याची पेटी वाटते. सारा मनोभाव तिथं ठेवायचा, कडीकुलूपात. किल्लीची मालकीण फक्त आई. चिंचेची पत्रावळी करून देत त्यावर जिरेसाळीचा भात खाणाऱ्या ह्या लेकीचं आईला भारी नवतीक. दारावरून गेलेल्या राघूच्या रंगाची चोळी लेकीनं पाहिजे म्हणायचा अवकाश की, सप्तीपाताळातून हुडकून आणील. बाजारपेठेत कोणती पण धाटणी येऊं दे. ह्या लेकीसाठी तिनं नवा वाण घेतलाच म्हणावा. अगदी. लेकीची लेक म्हणजे हिला दुधावरची साय. तिचं कवतीक तर विचारू नका. भिंगाच्या चोळीपासून न् धारवाडी कशीदाच्या परकरापासून तो पार नक्षीच्या चूळबोळक्यापर्यंत झाडून सगळी हौस दर्पभर ती आपली जमवीतच असते. म्हणून तिच्या चंद्रावळीला ती गंगा वाटते न् वडील सागर. त्या दोघांच्या सावलीत आपल्या भावाप्रमाणे हिला देखील गाढ झोप घेत पवित्र व्हायचं असतं. म्हणून दारी मूळ येतेल्या भावाची वाट बघताना हिचा जीव कावराबावरा होतो. एका डब्यातील हे दोन मोती एकत्र आले, जेवले खावले तरीही ती आपली हुरहूर बोलून दाखवतेच. आपल्या भावाची चाल वाकडीतिकडी, धावतीपळती, धांदरट. तर नागिणीपद्मिनींना ही वाटेत येऊ नका म्हणून हात जोडील आणि काजव्यांची विनवणी करून वाटेवर चंद्रज्योती पाजळा म्हणून गळ घालील. अशा वेळी वेडी कल्पना मनात आणून वळचणीच्या पालीलाही कुचकुचू नको म्हणायला ही मागंपुढं पहात नाही. भावाच्या एकी सगळं काही हिला चांगलं पाहिजे असतं. त्यासाठी त्याच्याबद्दल नेहमीच शुभ वर्तमान यावं असं तिचं म्हणणं. म्हणून ढगांच्या संगतीनं वाऱ्यांचे पंख लावून जाणाऱ्या मनमोराला ही म्हणते कशी, "शेलका पाण्याचा ढग दादाच्या शेतावर उतरव. तिथं पाण्याचे सागर पसरू देत. आणि लवलवत्या वीजबाईला म्हणावं की, तू राखण कर हं शेताची. लक्ष्मीआई अमृताचा कलश घेऊन बांधावर आली की, तिचा धरला पालव सोडू नको असं सांग दादारायांना."
आभाळ्या बाळांनी चंग बांधलेल्या बाबड्या छोटीत मामांची नगरी येऊन टाकावी आणि झाडाझुडांवर चढून शेजाऱ्यांची तक्रार आणीत आजी आजोबांच्या कवतिकाला ऊत यावा असा हिचा ध्यास. म्हणून माहेरी जायच्या अगोदर ही आपल्या लेकीला मामांनी आणलेली वेलंगाडी नेऊन गावाच्या वेशीवरील बुरुजावर उभी राहिलेली पाहील! वर हो! माहेरच्या एकी हिचा तेगारा विचारून नका. हिला राजसबाळ व्हायचं हे कळल्यापासूनच सोनाराच्या घरी बिंदुल्या घडवताना ठिणग्या

ही नाजुक नार खेळली तिथं मूठभर माती घ्यायची देखील सत्ता नाही अशी वेळ येते मग. आई-वडिलांना वेगळं ठेवून ही भावजई आपला संसार मांडील न् पाहिजे त्यावर पाहिजे ते कुभांड घेईल. पंचमीच्या सणाला चुकून नणंद आलीच तर तिच्यावर ल्यायला नेसायला काही नाही या सबबीवर घरातलं काय पण दिलं म्हणेल आणि नणंदेनं सारं वाटोळं केलं असा दंगा करून सोडील. एखादी भावजई तिच्यापेक्षा वरचढ निघेल. कुणी सांगावं! तिचा तोरा आणखीनच वेगळा. दारी नणंद आलेली दिसली रे दिसली की लगेच बोलून दाखवील, "काय करू बैन्सं, बसाय जागा दीन म्हटलं तर जागा हाय वल्ला न् भाकरी करीन म्हटलं तर तवा वाळूनं खाल्ला! आता वो?" भैन बिचारी काय ते त्यातलं ओळखती न् घरी निघून जाती आपल्या.

इकडे तोवर भाऊ घरी येतो. अशानं असं झाल्याचं त्याच्या कानावर जातं. म्हणताना तो चितागती होतो. विचार करतो न मग दिवस देतो बात ठोकून! अगदी!! गाडीबैलं जुंपून घरी येतो न् आपल्या नाटकशाळ बायकोला म्हणतो कसा घाबऱ्याघुबऱ्या, "अग अग, तुझ्या बाच्या घराला आग लागली!" तशी मग ही हंबरडा फोडून "आता कसं करायचं?" असं म्हणून विचारते. मग हा सगळं घर उलथंपालथं करतो. सगळं सामान उचलून गाडीत भरतो न् थेट जातो आपल्या भैनीकडं. भावाला बघून तिला केवढा आनंद दाटलेला. हारखून गेली बिचारी. भावाला जेवण केलं. शिकरण चपाती. आंबेमोहोराचा भात, खारवडे कुरवते तळले. तर भाऊ आनंदानं जेवला. पण हातावर पाणी पडलं न् गेला की गाडी तिथंच ठेवून धूम पळत! आता वो? बहीण कावरीबावरी झाली. तिनं मोठ्यानं ओरडून भावाला हाटकलं. तर हा म्हणतो कसा, "तुझ्या बाचं हाय. असू दे." आणि गेला की! इकडे तोवर बायको वाट बघतेली. नवरा आला म्हणताना तिनं घाईघाईनं विचारलं, "कशी हाईत माणसं?" तर "बेस हाईत" म्हटला. मग हिनं गाडीबैलांची चौकशी केली तर कसा म्हणतो, "काय सांगू? असा वारा आला, असा वारा आला की, बैलं उडून गेली न् असा पाऊस आला, असा पाऊस, की गाडी वाहून गेली." पण तिला ते खरं वाटेना. आक्रित आहे म्हणाली. म्हणताना मग ह्यानं पण टोमणा मारला तिच्या बोलण्यावर, "बसायला जागा दीन म्हटलं तर जागा हाय वल्ला न् भाकरी करीन म्हटलं तर तवा वाळूनं खाल्ला, ह्या बोलण्याला काय म्हणत्यात?" तशी ती गप का गार झाली.

तर ह्या साळूबाईचं काय म्हणणं की, अशी वेळ येण्याइतकं आपण वागावंच का? भाऊबीजेला दारात हा चन्द्र उगवला की पुरे. बाकीचं हवंय कशाला काय? देऊन घेऊन काही एक पुरत नाही. म्हणून ती बांगडीवरल्या काचेत चमकणाऱ्या दर्पणात भाऊ दिसला की, खुशालीचा सांगावा आण म्हणून माहेरच्या जासुदाला हात जोडते. दाण्या वाघासारखा भाऊ मजेत असू दे एवढंच तिचं म्हणणं.

त्यामुळं रपकईवाणाचं लुगडं न् मुगव्या रंगाची चोळी माहेरपणाला लेवून नेमून आल्यावर ही भेटेल त्याच्याजवळ तारीफ करीत सुटते. किती बोलू न् किती नको होतं

ही नाजुक नार खेळली तिथं मूठभर माती घ्यायची देखील सत्ता नाही अशी वेळ येते मग. आई-वडिलांना वेगळं ठेवून ही भावजई आपला संसार मांडील न् पाहिजे त्यावर पाहिजे ते कुभांड घेईल. पंचमीच्या सणाला चुकून नणंद आलीच तर तिच्यावर ल्यायला नेसायला काही नाही या सबबीवर घरातलं काय पण दिलं म्हणेल आणि नणंदेनं सारं वाटोळं केलं असा दंगा करून सोडील. एखादी भावजई तिच्यापेक्षा वरचढ निघेल. कुणी सांगावं! तिचा तोरा आणखीनच वेगळा. दारी नणंद आलेली दिसली रे दिसली की लगेच बोलून दाखवील, "काय करू वैन्सं, बसाय जागा दीन म्हटलं तर जागा हाय वल्ला न् भाकरी करीन म्हटलं तर तवा वाळूनं खाल्ला! आता वो?" भैन बिचारी काय ते त्यातलं ओळखती न् घरी निघून जाती आपल्या.

इकडे तोवर भाऊ घरी येतो. अशानं असं झाल्याचं त्याच्या कानावर जातं. म्हणताना तो चिंतागती होतो. विचार करतो न मग दिवस देतो बात ठोकून! अगदी!! गाडीबैलं जुंपून घरी येतो न् आपल्या नाटकसाळ बायकोला म्हणतो कसा घाबऱ्याघुबऱ्या, "अग अग, तुझ्या बाच्या घराला आग लागली!" तशी मग ही हंबरडा फोडून "आता कसं करायचं?" असं म्हणून विचारते. मग हा सगळं घर उलथंपालथं करतो. सगळं सामान उचलून गाडीत भरतो न् थेट जातो आपल्या भैनीकडं. भावाला बघून तिला केवढा आनंद दाटलेला. हारखून गेली बिचारी. भावाला जेवण केलं. शिकरण चपाती. आंबेमोहोराचा भात, खारवडे कुरवते तळले. तर भाऊ आनंदानं जेवला. पण हातावर पाणी पडलं न् गेला की गाडी तिथंच ठेवून धूम पळत! आता वो? बहीण कावरीबावरी झाली. तिनं मोठ्यानं ओरडून भावाला हाटकलं. तर हा म्हणतो कसा, "तुझ्या बाचं हाय. असू दे." आणि गेला की! इकडे तोवर बायको वाट बघतेली. नवरा आला म्हणताना तिनं घाईघाईनं विचारलं, "कशी हाईत माणसं?" तर "बेस हाईत" म्हटला. मग हिनं गाडीबैलांची चौकशी केली तर कसा म्हणतो, "काय सांगू? असा वारा आला, असा वारा आला की, बैलं उडून गेली न् असा पाऊस आला, असा पाऊस, की गाडी वाहून गेली." पण तिला ते खरं वाटेना. आक्रित आहे म्हणाली. म्हणताना मग ह्यानं पण टोमणा मारला तिच्या बोलण्यावर, "बसायला जागा दीन म्हटलं तर जागा हाय वल्ला न् भाकरी करीन म्हटलं तर तवा वाळूनं खाल्ला, ह्या बोलण्याला काय म्हणत्यात?" तशी ती गप का गार झाली.

तर ह्या साळूबाईचं काय म्हणणं की, अशी वेळ येण्याइतकं आपण वागावंच का? भाऊबीजेला दारात हा चन्द्र उगवला की पुरे. बाकीचं हवंच कशाला काय? देऊन घेऊन काही एक पुरत नाही. म्हणून ती बांगडीवरल्या काचेत चमकणाऱ्या दर्पणात भाऊ दिसला की, खुशालीचा सांगावा आण म्हणून माहेरच्या जासुदाला हात जोडते. ढाण्या वाघासारखा भाऊ मजेत असू दे एवढंच तिचं म्हणणं.

त्यामुळं रुपकईवाणाचं लुगडं न् मुगव्या रंगाची चोळी माहेरपणाला लेवून नेसून आल्यावर ही भेटेल त्याच्याजवळ तारीफ करीत सुटते. किती बोलू न् किती नको होतं

दिला. कृष्णदेवाच्या रुक्मिणीला भिष्मकराजांनी सागर आंदण दिला तर आपणाला पण पानमळा आंदण दिलेल्या वडिलांच्याबद्दल बोलताना ही जशी हवेतूनच चालते बाई. जमिनीला म्हणून पाय ठरतच नाही. चन्द्रमौळी घरात लंकेचं वैभव सांगणाऱ्या हिला बोलावं कुणी जरा दमानं घे म्हणून!

हिरव्या चोळीनं रसरसलेल्या दंडाचा दिमाख दाखवीत हावशा कांताबद्दल तर ही काय कमी बोलते म्हणता? छे! इथं तर तिची आणखीन् कळी खुलते. अगदी बघत रहावी अशी.

घरात सासुरवास कसा तर चिताकाचा फासा रुतावा तसा म्हणून नशिबाला दोष देणारी ही कंबळजा. पण प्रीतीच्या भर्ताराची डाव्या डोळ्याची वराटणी आणि नागाच्या फुस्काऱ्यागत राग विसरून त्याचा चांगुलपणाच तेवढा लक्षात घेते. गावा गेलेल्या वकिलाची रतांबाची पानं सुकली, बागेतील जाई-मोगऱ्याची दरवळ कोमेजली, बंगल्यातील चित्रं कोम्यावली, उठता बसता पाल कुचकुचली अशा जीव अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी कधी कुणाजवळ बोलली असली तरी घटकाभर त्या बाजूला ठेवते. त्यानं आणलेल्या पानपोतीची, कोलापुरी साजाची, दाटदुटणाऱ्या कंगण्यांची हिला भारी ऐट. अंगावर विसाचं, खुंटीवर तिसाचं, वळचणीवर पन्नासाचं आणि पेटीत भर्जरीचं लुगडं आहे एवढी ह्या सर्व्यांची हौस सांगताना तो दृष्टावणार नाही ना याबद्दल ती दक्षता घेते. म्हणून पानमळ्याच्या शेवरीला, मोटेवरच्या नाड्याला, दडावरच्या गवताला, नांगरल्या बैलाला, पेरल्या कुरीला अशी ही आपली नवस बोलतेलीच. हिचा हा चंद्रहिल्लाळ आपला लाड केवढा करतो म्हणून विचारलं तर ही राधा म्हणते कशी, "सर्व्या नथीचा दांडा सख्याच्या मुखातील तांबुलानं लाल झाला!" बघा बाई! चार-चौघीत मुरके मारून असल्या गोष्टी करीत ही मग अशी रंगात येते की, भर दिवसा सूर्यानं माथ्यावरच उभं राहून मिटल्या मारीत हे गोड भर्ताराचं सुख ऐकताना डोलावं!! हिला मग केवढा अभिमान या गोष्टीचा. स्वतः एका क्षणात राधा होईल न् नवऱ्याला कृष्णदेव करून रासक्रीडेत दंगून जाईल. मी मासोळी झाले तर तू भोया होऊन आधा जाळं फेकित पकडायला ये सांगणारी ही सोनसळी तशी मुलखाची द्वाड. भारी दमवते नवऱ्याला. उगीचच काहीतरी खुसपट काढून हे असं का न् ते तसं का म्हणून जीव नको करील त्या रायमालाचा! पण चावडीवर यहीं जाणार नाही हं! अंहं! ही गरतीची लेक. काही चुकलंच तर अशी लवेल विजेसारखी आणि बाळराजाला अवचितच मालकांच्या मांडीवर नेऊन ठेवील की पाहातच रहावं बाई. तिच्या आणि बाळराजाच्या गोड हसण्यानं मग पतिदेवही राग विसरून जातील. दिव्याच्या उजेडात चौकोनी विडा बांधायची लटपट करणाऱ्या राणीवर राग तरी कसा धरणार हा धनी! ही ते ओळखून असते. म्हणूनच संसारातल्या सुखदुःखांचा उगम बाळाच्या मध्यस्थीनं करताना हिचा जीव सुखावतो.

आपलं बाळराजस म्हणजे हिचा जीव की प्राण. काळजाचा तुकडा. हिच्या

रक्तामांसाचं हिरेमाणिक. म्हणून हातांचा न दंडांचा पाळणा, नेत्रांचा दिवा, मांडीचा चौरंग आणि काळजाचं अंथरूण घालीत ती बाळाला खेळविते. उगवत्या नारायणागत रूप घेऊन आलेल्या बाळराजाला गुडघ्यावर रांगताना पाहिला की, हिला सोन्याचा ढीग दिसतो. म्हणून खेळून खेळून दमलेल्या राजाला चक्कर भोवरा जाणून ध्यायचं आश्वासन देत ती नीजबाईला बोलावते. बाळाच्या डोळ्यात येऊन बैस पण त्याला दुखापत करू नको म्हणते. घरातल्या वडील बहिणीची, मावशीची, आत्याची, आजीची, काकीची, अगर आईची जागा घेऊ नको म्हणून बजावते. हिचा बाळ म्हणजे जणु कृष्णदेवाचा अवतार. आणि ही? यशोदा न् देवकीही आपणच. मंचकावर बसून दंडी बाजूबंद न् मुद्रिका करीं ल्यालेली ही भामिनी आपला बाळ हीच धनदौलत मानते आणि त्याच्या जिवावर उद्या मोठी होईन म्हणते. अशा वेळी हसऱ्या नाजुक बाळाला दृष्ट होऊ नये म्हणून घरात येसबंदाचा तुरा बांधते. मीठमोहऱ्या उतरून टाकते. रानपांखरांचं कवतीक करते. शेजाराणीच्या जाई-चाफ्यांना गोंजारते. मोडका खेळ उचलून टाकते. आपलं आयुष्य बाळाला दे म्हणून देवाच्या पाया पडते. रात्रंदिवस बाळाला मोठा कसा करीन हा एकच ध्यास या गौळणीला.

म्हणून सातानवसाच्या बाळाला कुठं ठेवू न् कुठं नको करीत त्याला कडेवर घेऊन ती मोठ्या हौसेनं कामाचा रगाडा उपसते. त्याच्या शिणजोडीचे साथीदार गोळा करून त्याच्याबरोबर आपणही खेळते. बाळाला सुखी ठेवावं म्हणून कुलदैवताला किती साकडं घालावं या मैनेनं त्याला काही माप?

घरधनी आणि बाळराज सुखी असावेत म्हणून ही रोज तुळशीची पूजा करते. घरातले देव पुजते. वार असेल त्याप्रमाणं देवदेवतांचं दर्शन घेऊन येते. सणावारी कुळाचार पाळते. घरची ही दौलत सुखी ठेव नाहीतर रक्ताचं शिंपणं घालीन म्हणते देवाला! पाहिजे तर देवानं हिला म्यावं पण ही दम्म म्हणणार नाही. अंगारा धुपारा लावताना देखील घरात अमूक एक सुख आण म्हणून देवीला बजावील तरच नावची म्हणावी हिला.

सणावाराला पुरण शिजायला घालून हिची उडणारी धांदल बघावीच एकदा. उन्हाळ-काम म्हणून केलेले पापड, कुरडया, लोणची, शेवया, गव्हले, नकुले, ह्याचा उपसा तर सणावारी ही करतेच. पण सुग्रणपणा पणाला लावीन म्हणते. पुरणपोळी ओठांनी खावी अशी करेल ही यमुना. जेवणारानं हिची आठवण पुन्हा काढलीच पाहिजे. दसऱ्याला कडकणी आणि दिवाळीला फराळाचं असं काही चवीचं बनवील की जिभेवर त्या चवीनं ठाण मांडलंच पाहिजे खाणाराच्या. पुडाच्या वड्या कराव्यात तर ह्याच सखुबाईसारखून असा हिचा बोलबाला.

• त्यामुळं ल्गीनदेवाकारणानं हिच्या घरी मदतीसाठी सून धाडायची म्हणजे देखील बाकीच्यांना केवढा धाक! हिच्यापेक्षा वरचढ राहू देत पण निदान हिच्या इतपत तरी सुग्रीणपणा हिला यावा असं जिचं तिचं म्हणणं. त्या कारणानं हिनं हळद दळायला

घातली आणि पानवंतांच्या बायकांना बोलावलं की, सगळ्याजणी गीतांची पोथी संगं घेऊन हडबडून उठतात जशा. कारण हिच्याजवळ पोत्यानं गीतं आणि ढिगानं 'गळे'! मग तालेवारी करावी कुणी हिच्याजवळ? जिला तिला हिचा धसकाच. म्हणताना, "मोत्यांनीं गुंफला पाळणा, रेशमानं विणली वाज न् ह्यांनी कोणचं मंगलकार्य घरात काढलंय आज?" असा पुकारा करीतच गडयिनी गोळा होतात हिच्या घरी.

पण ही कुळवंतांची लेक मनाची मोकळी. सगळ्यात सगळी. प्रेमळ. आगत स्वागत दांडगं. एक घास कुणाला सोडून खायची नाही.

त्यामुळं हिच्यावर सगळ्यांचा जीव. हिचा एक शब्द खाली पडणार नाही याचीच प्रत्येकाला काळजी. म्हणून ही सदेवच तोंडानं काढलं न् हातानं पेरलं या दिमाखात राहाते. तर तिची बरोबरी कुणी न् कशी करावी देवा? तिचं तिलाच हे सारं लखलाभ. नव्हं तिला जे दंडतंय ते आम्ही लायकी नसताना आपल्याला लावून बघावं हे कसं गा?

७

आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री

दुर्गादास काशीनाथ संत

डॉ. दुर्गादास काशीनाथ संत, एम्. ए., पीएच्. डी. (जन्म ९–५–१९१६) शिवाजी विद्यापीठातील गोखले कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक. मराठीच्या अत्युच्च पदवीकरिता मार्गदर्शक. 'साहित्य आणि संस्कृति' व 'मराठी स्त्री' हे प्रबंध लिहून दोनदा तर्खडकर पारितोषिकाचे मानकरी. याशिवाय 'साहित्य संमेलने आणि साहित्यक प्रश्न' व 'संशोधन पद्धती, प्रक्रिया अंतरंग' या ग्रंथांचे, संशोधक अभ्यास वृत्तीचे लेखक. ('मातृ-पितृ-छाया', १४३९ ब, मंगळवार पेठ, कोल्हापूर)

पूर्वकालीन भारतीय जीवनरथ एकचाकी

मराठी स्त्रीची आधुनिक काळात — विशेषतः ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात — प्रगतीच्या दिशेने झालेली वाटचाल, साहित्यात त्या प्रक्रियेचे पडलेले प्रतिबिंब, तसेच साहित्याने त्या प्रगतीस लावलेला हातभार ह्याचे विवेचन एक दशकापूर्वी प्रकाशित झालेल्या 'मराठी स्त्री' या प्रबंधात प्रस्तुत लेखकाने केले आहे. त्यातील विवेचनामागे एक विशिष्ट भूमिका आहे. ती भूमिका ऐतिहासिक दृष्टीने पाहणी करताना अत्यंत उपयुक्त ठरणारी अशी आहे. तीमुळेच तेथील विवेचनात एक प्रकारचा नेमकेपणा आला आहे. त्याबरोबर एक प्रकारचे परिमाणही लाभले आहे. प्रस्तुत लेखाचे उद्दिष्ट तेच असल्याने तीच भूमिका याही ठिकाणी उपयुक्त ठरण्यासारखी वाटल्याने तिचा स्वीकार केला आहे.

ब्रिटिश राजवटीने आम्हां भारतीयांच्या जीवनविषयक जाणिवांत जर कोणती महत्त्वाची भर घातली असेल तर ती म्हणजे व्यक्तिविषयक जाणिवेची होय. म्हणूनच व्यक्तिवाद या व्यक्तिस्वातंत्र्यवाद हे ब्रिटिश राजवटीचे अपत्य म्हटले जाते. आमचे ब्रिटिशपूर्वकालीन जीवन इतर बाबतीत जरी सरसनिरस असले तरी ह्या जीवनात व्यक्तिवादाला स्थान नव्हते, पुरुषांच्या व स्त्रियांच्याही. ब्रिटिशांनीच दीक्षा दिलेल्या व्यक्तित्वाचा स्वीकार पुरुषांनी पायरीपायरीने केला व स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे हे महत्त्वाचे अंग आहे.

पण स्त्रियांच्या बाबतीत ही प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होती, जटिल होती.

कारण ब्रिटिश राजवटीच्या पूर्वीच्या काळात येथील स्त्री-पुरुषांच्या जीवनात फार मोठी तफावत होती. स्त्रीचे जीवन हे पुरुषाच्या जीवनापासून पूर्णतया भिन्न होते. जीवनाच्या रथाला स्त्री व पुरुष ही दोन चाके आहेत असे म्हटले जाते. पण भारतीयांचा जीवनरथ ब्रिटिश राजवटीपूर्वी सूर्याच्या रथाप्रमाणे एकचाकी होता. म्हणजे, दोघांची जीवन-विषयक ध्येये, कार्यक्षेत्र इत्यादी संपूर्णतया भिन्न होती. त्या जीवनाची धारणा पूर्णतया पुरुषप्रधान होती. स्त्रीला ते जीवन सह्य वाटावे म्हणून तिनेच स्वतःसाठी पातिव्रत्यासारखे जीवनमूल्य निर्माण करून घेतले होते. आधुनिकतेचा सुवर्णस्पर्श होण्यापूर्वी प्रत्येक राष्ट्रात जवळजवळ अशीच परिस्थिती असते. युरोपमध्ये सुद्धा वेगळी परिस्थिती होती असे नव्हे. 'He for God, She for God in him' हा विचार युरोपातही मध्ययुगात प्रबळ होता.

अशा रीतीने ब्रिटिश राजवटीच्या सुरवातीला स्त्री व पुरुष हे एकाच समाजाचे घटक असले तरी त्यांच्यात जीवनविषयक दृष्टी, कार्यकक्षा एवढेच नव्हे तर पारमार्थिक ध्येये इत्यादी बाबतीत पूर्णपणे भिन्नपण होते. स्त्रीचे कर्तृत्व हे गृहजीवनापुरतेच मर्यादित होते. जीवनाला सार्थकत्व प्राप्त होण्यासाठी जी जीवनविषयक ध्येये होती ती इतकी पुरुषांसाठीच होती की, त्यांना 'पुरुषार्थ' हेच अभिधान प्राप्त झालेले होते. ह्याचा प्रत्यक्षातला परिणाम म्हणजे भारतीय समाजात तिचे कार्यक्षेत्र कुटुंबापुरतेच मर्यादित झाल्यामुळे म्हणा अगर इतर कारणांनी म्हणा, स्त्रीला कोणतेच — आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी — अधिकार नव्हते.

ब्रिटिश अमलातील स्त्रीविषयक जागृति

ब्रिटिश राजवटीचे मुख्य कार्य म्हणजे स्त्री आणि पुरुष यांची जीवनध्येये, कार्यकक्षा इत्यादी बाबतची ही तफावत कमी करणे, व त्या दोघांना समान भूमिकेवर आणणे हे होय. हे 'कार्य' ब्रिटिश राजवट संपुष्टात आली तेव्हा 'सिद्धीस' गेले असे सामान्यतः म्हणावयास हरकत नाही. निदान या बाबतीतला वैचारिक वा ध्येयात्मक अडथळा स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर दूर झाला. त्याचे एक गमक म्हणजे आपण स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर तयार केलेल्या आपल्या राज्यघटनेत स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या समानतेस कायदेशीर मान्यता दिलेली आहे. त्यानंतर झालेल्या कायद्यांनी बरेचसे व महत्त्वाचे आर्थिक, राजकीय व सामाजिक अधिकारही स्त्रियांना आज दिलेले दिसतात.

वाङ्मयातील स्त्रीचे अवलोकन करीत असताना ही व्यापक व ऐतिहासिक दृष्टी धारण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्त्रीजागृतीचे मर्मच कळणार नाही. ब्रिटिशपूर्व काळात भारतीय पुरुषाला जे सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादी प्रकारचे हक्क होते त्यांतील राजकीय हक्कांना परकीय राजवटीने संकोच झाला. त्यामुळे आपल्या मनात स्वातंत्र्याकांक्षा निर्माण झाल्यानंतर त्यांच्याशी संघर्ष होणे प्राप्त होते. तसा तो ; संघर्ष झालाही. त्यात आपण आपल्या, तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या शहाणपणामुळे

व कर्तृत्वामुळेही स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यात अपेक्षेपेक्षा लवकर यशस्वी झाली. ब्रिटिशांशी आपला प्रामुख्याने राजकीय झगडा होता. ते अतिशय प्रबल प्रतिस्पर्धी होते म्हणून म्हणा, अगर आपल्या एकंदर धार्मिक, सामाजिक, राजकीय परंपरेचे दडपण म्हणून म्हणा, ब्रिटिश राजवटीच्या काळात सामाजिक उन्नयनाकडे आपले दुर्लक्ष झाले. कित्येक वेळा आपल्यापैकी अनेक नेत्यांनी ते जाणूनबुजूनही केले. ह्याचा परिणाम मात्र असा झाला की, स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतीय पुरुष हा सर्वाधिकारसंपन्न झाला पण भारतीय स्त्रीची जागृतीच्या बाबतीत फरफरच झाली.

याचा अर्थ स्त्रीला स्वातंत्र्यकालात अधिकार प्राप्त झाले नाहीत असे नव्हे, पण ते अशा रीतीने प्राप्त झाले आहेत की तसले अधिकार मिळाले आहेत याची बहुसंख्य स्त्रियांना जाणीव आहे असे दिसत नाही. काहींना जाणीव होत असली तरी बहुसंख्य पुरुषांची त्यासाठी तयारी नाही व त्यांची मनोवृत्ती ही सर्वस्वी प्रतिकूलच आहे. असा अनुभव आल्याने अर्धजागृत स्त्री मांबावून गेली आहे. मांबावण्याचे आणखी एक कारण म्हणजे स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आपल्याला प्राचीन संस्कृतीचा एवढा उमाळा आलेला आहे की, त्या संस्कृतीतील, आधुनिकतेला पूर्णपणे विरोधी अशा जीवनध्येयांचा पण तितक्याच कंठरवाने पुरस्कार आपण करीत आहोत. त्यामुळे त्या अर्धजागृत स्त्रीला आपण खरोखरच कोठे आहोत, आपली खरोखरीच कर्तव्ये कोणती आहेत हे समजेनासे झाले आहे.

एका मोठ्या व विविध प्रकारच्या घडामोडींनी भरलेल्या विशाल कालखंडातील स्त्रीचे साहित्यातील जीवनचित्रण तपासताना कुठून निघाले व कुठपर्यंत आले हे निश्चित करणे आवश्यक वाटले, त्यासाठी हे विवेचन केले. ह्यावरून हे स्पष्ट होईल की, ब्रिटिश राजवटीपूर्वीच्या कालातील स्त्रीदास्यापासून तो स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंतच्या कालात समानतेपर्यंत व नंतरच्या कालात विविध अधिकारांची प्राप्ती होऊनही आजची मांबावलेली अवस्था प्राप्त झाली आहे. हा जो स्त्रीजीवनाच्या गतिविधीचा आलेख आहे, तो साहित्यातून कसा पहावयास मिळतो व साहित्याने त्यात कोणती भर घातली आहे हे पहाणे बरेच उद्बोधक होईल. तेच येथले मर्यादित उद्दिष्ट आहे.

साहित्यातील स्त्रीजीवन-चित्रणाचे स्वरूप पहाण्यासाठी ही वैचारिक पार्श्वभूमी विचारात घेणे आवश्यक आहे. ब्रिटिश राजवटीबरोबर भारतीय पुरुषाने आधुनिक कालात प्रवेश केला. त्याच्या जीवनात आधुनिक वृत्ती व जीवननिष्ठा यांचा प्रादुर्भाव सुरू झाला. त्याच्या जीवनाची मध्ययुगीन साचेबंद घडण मोडली. त्याची दृष्टी पारमार्थिकावर केंद्रित झालेली होती, ती हलके हलके इहलोकाधिष्ठित – ऐहिक – होऊ लागली. नवी राजकीय, सामाजिक, वैचारिक ध्येये साकार होऊ लागली.

जागृतीचे भिन्न टप्पे

परंतु स्त्रियांच्या जागृतीची प्रक्रिया एवढी साधी व सरधोपट नव्हती. त्यांच्या

लक्ष्याचे दोनतीन टप्पे पडतात. पहिल्या अवस्थेत ती स्वतः सुप्त आहे. झालेला फरक हा तिच्याप्रत आलेलाच नाही. पुरुषालाच नवविचारांचे व ध्येयांचे दर्शन घडल्यामुळे तो नव्या दृष्टीने आपल्या सहचरीकडे, बहिणीकडे, आईकडे पहावयास लागला, तेव्हा त्यांच्या दृष्टीला तिच्या जीवनाची पदोपदी होणारी ससेहोलपट, अवहेलना दिसली, व त्याचे मन एक प्रकारच्या कारुण्याने भरून आले. ही भूतदया होती. तीव्र न्याय, अन्याय, योग्य-अयोग्य इत्यादी निकषांना फारसे स्थान नव्हते. लोकहितवादी, ज्योतिबा फुले यांचे कार्य मुख्यतः या अवस्थेचे द्योतक होय. आगरकरांच्या विचारांच्या प्रभावाची दुसरी अवस्था होय. या अवस्थेत स्त्रीला थोडी जागृती येत आहे असे दिसते. विविध नागरी हक्कांसाठी व व्यक्ति म्हणून विशिष्ट मान्यतेसाठी तिची धडपड या अवस्थेची द्योतक होय. समाजवादाच्या प्रचाराच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा पुढल्या दोन अवस्था होत.

प्रत्येक युगाचा (कालाचा) जीवनाच्या प्रत्येक बाबीकडे किंवा अंगाकडे पहाण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो. स्त्रीजीवनही त्याला अपवाद नाही. ज्या कालखंडातील साहित्यातील स्त्रीचा आपण येथे विचार करीत आहोत तो कालखंड भारतीय इतिहासात अनेक दृष्टींनी, अत्यंत खळबळीचा, धडामोडींचा, विविध प्रकारच्या जागृतीच्या उप-क्रमांनी भरलेला व वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. या कालात जीवनाच्या प्रत्येक अंगात एक प्रकारची अभिनव जागरूकता प्रत्ययास येते. उदाहरणार्थ, वृत्तपत्रे, शाळा इत्यादी संस्था, तसेच राजसंघटना, ग्रंथालये, मंडळे इत्यादींना जीवनात स्थान प्राप्त झाले. मध्ययुगीन दीर्घकालीन निद्रेतून समाज जागृत झाल्याची सर्व लक्षणे या कालातील जीवनात व त्यामुळे साहित्यातही दिसून येतात.

साहित्यात पडणारे जीवनाचे प्रतिबिंब

साहित्यात समाजजीवनाचे जे प्रतिबिंब उमटते, त्याची काही वैशिष्ट्ये व काही मर्यादा पण असतात. साहित्यात येणारे जीवनाचे अंग हे लेखकाच्या द्वारे येत असते. त्यामुळे लेखकाचे व्यक्तिमत्व, त्याच्या कालाचा त्याच्यावर उमटलेला ठसा, त्याचे समाज, साहित्य, जीवन, समकालीन परिस्थिती इत्यादी गोष्टींबाबतचे विचार, निष्ठा, समकालीन वैशिष्ट्यपूर्ण विचार, तसेच एकंदर वाङ्मयीन वा वैचारिक वातावरण (क्लायमेट ऑफ द एज) या सर्वांचा परिणाम त्या त्या कालातील लेखकांच्या लेखनावर होत असतो. याशिवाय लेखनाचा प्रकार जर ललित वाङ्मयात मोडणारा असेल तर लेखकाचे वाङ्मयविषयक आदर्श, उद्दिष्ट, संस्कार इत्यादींचाही भाग त्याच्या लेखनास विशिष्ट घाट देण्यास कारणीभूत असतो. त्याच्या सृजनशीलतेमुळे जीवनचित्रणास वेगळाच अर्थ प्राप्त होत असतो.

या दृष्टीने या विशाल कालखंडातील स्त्रीचे स्वरूप पाहात असता युगाने वैशिष्ट्य कोणते होते, त्यातील एकंदर विविधप्रकारच्या हालचालींचा, धडामोडींचा रोख कोणत्या

दिशेने होता हे लक्षात येण्यासाठी ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात स्त्रीजीवनविषयक जाणिवांच्या व कल्पनांच्या कोणत्या नव्या परिसीमा दृग्गोचर झाल्या हे समजून घेणे आवश्यक होते. पूर्वकालीन साहित्यातील जीवनचित्रणापासून ब्रिटिश राजवटीतील साहित्यातील जीवनचित्रण कसे भिन्न आहे, हे त्या विवेचनाच्या आधारे समजू शकेल.

पहिल्या पिढीतील सुधारक : भूतदयावादी दृष्टिकोण

यांपैकी विचारात घ्यावयाचा पहिला कालखंड म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभापासून तो आगरकर, टिळकांच्या उदयकालापर्यंतचा, म्हणजे सामान्यतः इ. स. १८८० पर्यंतचा होय. ह्या कालखंडात आधुनिकतेचा महाराष्ट्रास परिचय करून देणारे प्रमुख विचारवंत व समाजसुधारक म्हणजे लोकहितवादी, ज्योतिराव फुले, न्यायमूर्ती रानडे, व विष्णुशास्त्री पंडित आदि होत. आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रीजीवनाचे हे सारे जण प्रारंभीचे भाष्यकार होत. प्रत्येकाचा दृष्टिकोण भिन्न होता तरी एकसमयावच्छेदेकरून असे म्हणता येते की, महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनातील विविध शल्ये, रूढिग्रस्ततेमुळे तिच्या जीवनाची झालेली परवड, व तिच्या जीवनाला आलेली अगतिकता या गोष्टी, या साऱ्यांनी आपापल्या परीने व आपापल्या मार्गाने समाजाच्या निदर्शनास आणल्या. पुरुषांच्या व एकंदर समाजाच्या ठायीच्या भूतदयावादी वृत्तीला आवाहन केले. विविध प्रकारच्या युक्तिवाद, वादविवादादी मार्गांनी समाजाची स्त्रीविषयक मनोधारणा बदलण्याचा प्रयत्न केला. पराकोटीच्या परस्वाधीनतेतून बाहेर काढण्यासाठी या साऱ्यांनी प्रामुख्याने स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला आणि समाजाच्या रूढिग्रस्ततेवर प्रहारही केला.

सतीसारखी मानव्याच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीने घृणास्पद असलेली चाल बंद होण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी प्रयत्न केले. तेथून भारतीय स्त्रीच्या आधुनिक कालातील जागृतीस सुरुवात झाली. स्त्रीच्या दुःखांना प्रभावीपणाने वाचा फोडणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत लोकहितवादी ऊर्फ गोपाळराव देशमुख होत. लोकहितवादींना स्त्रियांची अवनत अवस्था पाहून अपार दुःख होत होते. त्यांच्या उन्नतीच्या उपायाचा विचार करून लोकहितवादींनी बालविवाहप्रतिबंध, विधवाविवाह इत्यादी सुधारणांचा पुरस्कार केला. किंबहुना या कालखंडात स्त्रियांच्या जीवनविषयक प्रश्नांत ह्याच गोष्टींना अतिरिक्त महत्त्व प्राप्त झाले होते. या सुधारणांसाठी समाजाचे मन कसे वळवावे व त्याला या गोष्टी मान्य कशा करावयास लावाव्या हा या कालातल्या सुधारकांपुढचा महत्त्वाचा प्रश्न होता.

तथापि स्त्रियांच्या दृष्टीने या कालातला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे स्त्रीशिक्षण होय. हिंदू समाज मुलींना शिक्षण द्यावे या गोष्टीलाही प्रारंभी अनुकूल नव्हता. सुधारकांना अनेक प्रकारचे युक्तिवाद करुन, धोके पत्करुन मुलींना शिकविण्याचे महत्त्व समाजाच्या गळी उतरवावे लागले आहे. लोकहितवादी व विशेषतः ज्योतिराव फुले यांचे कार्य ह्या संबंधात विशेष लक्षणीय आहे.

स्त्रियांच्या उन्नतीबाबत वाङ्मयेतर क्षेत्रात अनेक प्रयत्न साक्षेपाने करणाऱ्यात ह्या कालात न्यायमूर्ती रानडे यांचे कार्य अमोल आहे. 'स्त्रीविचारवती सभा' यासारखी संघटना त्यांनी अस्तित्वात आणली. राजकीय स्वरूपाचे कार्य करण्यासाठी त्यांनी 'राष्ट्रीय सभा' स्थापन केली, त्या सभेला जोडून सामाजिक परिषद असावी असा त्यांचा अभिनव प्रयत्न होता. याच्या जोडीलाच आपल्या न्यायक्षेत्रातील विविध प्रकरणांत स्त्रीच्या हक्कांना मान्यता मिळेल, तिला न्याय मिळेल ही आधुनिक दृष्टी एतद्विषयक निर्णय देताना त्यांनी ठेविली होती. संमतिवयाच्या वादाच्या प्रकरणात तसेच पुनर्विवाहसंबंधी झालेल्या प्रसिद्ध वादविवादात त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

सुधारकांची पुढची पिढी : व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचार

या तिघांच्या व इतर अनेक सुधारकांच्या प्रयत्नांनी सुशिक्षितांच्या मनात स्त्रियांच्या स्थितीविषयी एक व्यापक सहानुभूती निर्माण झाली होती. सुशिक्षितांचे प्रमाण जसजसे वाढत गेले तसतसे नवनवे विचार पुढे येऊ लागले. केवळ भूतदयेशी न थांबता स्त्रीचे काही विशिष्ट व महत्त्वाचे हक्क मान्य झाले पाहिजेत, अशी काही सुशिक्षितांना आवश्यकता वाटू लागली. स्त्रीजागृतीला काही तात्त्विक अधिष्ठान असावे, या दिशेने उपक्रम सुरू होण्याची अवस्था निर्माण झाली. या दृष्टीने ह्या अवस्थेत आगरकरांचे कार्य लक्षणीय आहे. ते प्रामुख्याने वैचारिक आहे. स्त्री व पुरुष यांच्यात एक प्रकारची समता असावी, जे जे अधिकार पुरुषाला आहेत ते सर्व स्त्रीला प्राप्त व्हावयास हवेत, स्त्री म्हणून कोणतीही संधी तिला नाकारली जाऊ नये, जीवनातही त्याला केवळ सहानुभूतीच्या आधारावर नव्हे तर मानाने व हक्काने जगता यावयास हवे; कोणतेही क्षेत्र तिला प्रतिबंधित असता कामा नये, शिक्षणातही कोणत्याही प्रकारचा पक्षपात नको. थोडक्यात स्त्रीविषयक आजची सारी तत्त्वे महाराष्ट्रात तरी आगरकर-प्रणीत आहेत. या साऱ्या गोष्टींमुळेच आगरकरांबरोबर स्त्रीजीवनविषयक जागृतीचे दुसरे पर्व सुरू झाले असे म्हणता येते.

ह्या अवस्थेत स्त्रीच्या, कौटुंबिक, शिक्षणविषयक, विवाहविषयक हक्कांबरोबर तिच्या सामाजिक व राजकीय हक्कांची, कार्यक्षेत्रांची इत्यादी चर्चा सुरू झाली. परंतु स्वातंत्र्या-सारख्या प्रमुख राजकीय हक्काला पुरुषच वंचित झालेला असल्याने आणि त्यासाठी त्याचा परकीय सत्तेशी लढा सुरू झाल्याने, स्त्रियांच्या राजकीय हक्कांचा प्रश्न निर्माण होणे शक्य नव्हते. सामाजिक हक्कांबाबतही तसे म्हणता येईल. आपले सामाजिक

अधिकार कोणते हा प्रश्न सामाजिक न्यायाचा विचार उद्भूत झाल्यानंतर निर्माण होतो. ती अवस्था अद्याप दूर होती. स्त्रीजीवनविषयक जागृतीची ही सारी चर्चा, प्रामुख्याने मिल, स्पेन्सर आदी आद्य व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंतांच्या एतद्विषयक विचारांवर आधारलेली होती. सामाजिक हक्कांचा प्रश्न हा समाजवादी विचारांच्या प्रसाराबरोबर जो सामाजिक न्यायाचा आग्रह सुरू होतो त्याच्याशी संबद्ध आहे. ती अवस्था अद्याप दूर होती. अशा परिस्थितीमुळे ह्या कालात विधवाविवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, विवाहविच्छेदनाचा स्त्रीचा आधिकार इत्यादी प्रश्नांनाच महत्त्व प्राप्त व्हावे हे क्रमप्राप्तच होते. या कालातील स्त्रियांचे प्रश्न हे पुनर्विवाह वा शिक्षण ह्यासारख्या आज क्षुल्लक वाटणाऱ्या सुधारणांवर का केंद्रित झाले व त्या प्रश्नांचीही व्याप्ती केवळ पुढारलेल्या वर्गांतील (विशिष्ट जमातीतील) स्त्रियांपुरतीच का मर्यादित होती, याचे उत्तर वरील युक्तिवादात मिळू शकेल. सुधारकांचे विचार हे व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यावर आधारलेले होते. पुढे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराच्या मर्यादा स्पष्ट झाल्या; व सामाजिक न्यायाची कल्पना जीव धरू लागली. पण हे सारे पुढे स्पष्ट झाले. ती अवस्था १९३० च्या पुढे इकडे आली.

साहित्यविषयक पाहणीच्या दृष्टीने ही अवस्था अतिशय महत्त्वाची आहे. ह्या (१८८० नंतरच्या) कालखंडात व्यक्तिवादी विचाराची मुहूर्तमेढ रोवली गेली (आगरकरांसारख्यांचे तेच महत्त्वाचे कार्य) हे वर पाहिलेच. पुढल्या अवस्थेच्या दृष्टीने (जरी हे व्यक्तिस्वातंत्र्याचे विचार तकलुपी होते, आभासमय होते, तरी) तो कालोचित अशा प्रकारचा आविष्कार होता, तो युगविचार होता हे अमान्य करण्यात अर्थ नाही. हा युगविचार असल्याने संवेदनाशील व्यक्तींना त्याचे जबरदस्त आकर्षण असणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे त्यांच्या ठायीच्या विविध शक्तींना आवाहन पोचले. आपापल्या प्रवृत्तीप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे त्यांनी आपापली कार्यक्षेत्रे निवडली. आगरकरांच्या प्रवृत्तीला निबंध जवळचा वाटला. हरिभाऊ आपटे यांना कथाकादंबरी हे वाङ्मयप्रकार जवळचे वाटले. श्रीपाद कृष्णांना नाटक विनोद हे प्रकार जवळचे वाटले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराचे आवाहन केवळ सुधारकाना पोचले असे नव्हे, तर खाडिलकर, देवल, गडकरी आदी भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या, प्रकृतीच्या लेखकांनाही पोचले. त्यांच्या ठिकाणची प्रतिमा, सृजनशीलता जागृत झाली व उदंड तेजस्वी असे साहित्य या कालात निर्माण झाले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराची ही सारी किमया होय. हे सारे लेखक आंग्लविद्याभूषित असल्याने त्यांच्यापुढे इंग्रजी वाङ्मयातील विविध ग्रंथकाराचा आदर्श असावा हे क्रमप्राप्त होते. केशवसुतांनी स्त्रीस भूपृष्ठस्थित आद्य दैवत मानून नव्या विचाराचा प्रत्यय काव्यप्रांतातही आणून दिला.

हरिभाऊ आपटे : वास्तवाबरोबरच स्त्रीजीवनाचे नवे आदर्श

साहित्याच्या व स्त्रीजीवन चित्रणाच्या दृष्टीने या कालखंडातील अत्यंत महत्त्वाचे ग्रंथकार म्हणजे हरिभाऊ आपटे हे होत. आगरकरांची प्रतिमा चिंतनशील होती

तर हरिभाऊंची प्रतिभा सर्जनशील होती. आगरकरांच्या तसेच मिल, स्पेन्सर आदी विचारवंतांच्या लेखनामुळे, त्यातील युगप्रभावाच्या आवाहनामुळे हरिभाऊंच्या सृजनशील मनात एक नवीनच स्त्रीजीवनविषयक जाणीव निर्माण झाली. त्या नव्या दृष्टीतून त्यांनी आपल्या भोवतालच्या स्त्रीचे जीवन पाहिले व आपल्या प्रतिभेच्या आधाराने ते समूर्त केले. प्रतिभेचे लेणे लाभल्याने ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराशी न थांबता मानवतेपर्यंत त्यांची झेप गेली. हरिभाऊंची स्त्रीसृष्टी म्हणजे एक वास्तवाधिष्ठित जग आहे. समकालीन स्त्रीजीवनातील सर्वच प्रवृत्ती त्यांनी साकार केल्या. सुष्ट, दुष्ट, विचारी, विकारी, हलक्या, प्रेमळ, कजाग, भावड्या, कावेबाज इत्यादी. प्रत्येकीच्या बाबतीत त्यांची सहानुभूती गाढ आहे. हरिभाऊंच्या कादंबरीविश्वातील सर्व वा महत्त्वाच्याही स्त्रीरेखांची पाहाणी करणे येथे अशक्य आहे. पण त्यांच्या दोनतीन स्वभावरेखा (किंवा दोनतीन कादंबऱ्यांतील प्रमुख स्वभावरेखा) लक्षणीय आहेत. 'पण लक्षात कोण घेतो' मधील यमुना, दुर्गी, यमूची आई, या तसेच 'मी' मधील ताई, सुंदरी इत्यादी स्वभावरेखा उल्लेखनीय आहेत. या दोन्ही कादंबऱ्यातून हरिभाऊंनी वास्तवाबरोबरच स्त्रीजीवनाचे विविध नवे आदर्श निर्माण केले आहेत. आदर्श कन्या, पत्नी, माता, समाजसेविका, मैत्रिणी, भगिनी, ह्या तर निर्माण केल्या आहेतच, पण त्या सर्व वास्तवाधिष्ठित असल्याने समाजमानसाची पकड त्यांनी घेतली आहे. मध्यम वर्गातील का होईना समकालीन स्त्री हरिभाऊंच्या प्रतिभेतून साकार झाली, चिरंजीव झाली आहे.

म्हणून मराठी स्त्रीच्या भाष्यकारांत तसेच शिल्पकारांत हरिभाऊंचे स्थान फार वरचे आहे. त्यांनी सुशिक्षित पुरुषाच्या मनात आपल्या आईविषयी, बहिणीविषयी, सहचरीविषयी, कन्येविषयी एक व्यापक व अथांग सहानुभूती निर्माण केली आहे. त्याचा परिणाम समकालीनच नव्हे तर उत्तरकालीनांवरही झालेला आहे. स्त्रियांच्या उन्नतीसाठी आपण काही करावयास हवे अशी बुद्धी समकालीनांत निर्माण झाली. भारतरत्न अण्णासाहेब कर्वे हे अशांपैकीच होत. मराठी स्त्रीच्या दृष्टीने पाहाता तिला आपले प्रतिबिंब प्रथम वास्तवपूर्ण रीतीने हरिभाऊंच्या कथासृष्टीतच पाहावयास मिळाले. ते विविध व्यक्तींचे वा कुटुंबाचे चित्र असले तरी एका परीने ते समाजाचे चित्र आहे. या ठिकाणी प्रथमच महाराष्ट्रीय स्त्री आपले हृद्गत, आपली दुःखे बोलून दाखवीत आहे. तिचे ते हृद्गत तिच्या जीवनातून सहजगत्या उत्क्रांत झाले असल्याने आपल्या अंतरंगाचा ठाव घेते. अशा रीतीने पूर्वीच्या कालात पूर्णपणे मूक असणारी अशी स्त्री हरिभाऊंनी जागृत करून तिची दुःखे तिच्या तोंडून वदविली आहेत.

वामन मल्हारांचे मदनीय कार्य

हरिभाऊंच्या नंतरचे स्त्रीजीवनाचे भाष्यकार म्हणजे प्रसिद्ध तत्त्वज्ञ, कादंबरीकार व टीकाकार वामनराव जोशी हे होत. हरिभाऊंच्या वाङ्मयातील स्त्री ही शिक्षणाच्या

एका अवस्थेची द्योतक आहे. सामान्यतः इ. स. १९१५-२० पर्यंतच्या कालाचे प्रतिनिधित्व हरिभाऊंनी केले. वामनरावांच्या कादंबऱ्यातील स्त्रीपात्रे आज कित्येकांना वाङ्मयीन दृष्ट्या फारशी प्रत्ययकारी वाटणार नाहीत. पण वामनरावांपुढे चित्रणासाठी असणारी स्त्री ही सुशिक्षित आहे. हाही वर्ग त्यावेळी अल्पसंख्य होता. किंबहुना या वर्गाविषयी समाजात एक प्रकारचे औत्सुक्य होते. बहुसंख्यांचे मत स्त्रीशिक्षणाविषयी अतिशय प्रतिकूल होते. शिक्षणाने स्त्रिया बिघडतात, त्यांच्यामधील स्नेह, शालीनतादी गुण कोळपून जातात, व्यक्तिस्वातंत्र्याच्या जाणिवेने त्यांच्यांत वेगळ्याच व्यक्तिगत आकांक्षा निर्माण होतात व पर्यायाने हा वर्ग समाजाला पारखा होतो. अशा प्रकारचे मत अगदी दुसऱ्या महायुद्धाच्या कालापर्यंत जवळजवळ सर्वत्र रूढ होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर वामनरावांनी आपल्या 'रागिणी', 'सुशिलेचा देव', 'इंदू काळे आणि सरला भोळे' इत्यादी कादंबऱ्यांनी विशेषतः त्यातील त्यागपूर्ण विवेकी, सोज्वळ अशा प्रमुख स्त्रीपात्रांच्या निर्मितीने मराठी स्त्रियांची व मराठी समाजाची फार मोठी सेवा केली आहे, हे मान्य करावे लागेल. आगरकरांच्या मृत्यूनंतरच्या काळापासून तो महात्मा गांधींच्या उदयापर्यंतच्या दीर्घकालात महाराष्ट्रातला सुधारणावादी विचार मागे पडला होता. राष्ट्रीय वृत्तीच्या नावाखाली टिळकांच्या युगात फक्त परंपरावादच पोसत होता; हे जर लक्षात घेतले तर वामन मल्हाराचे महनीय कार्य डोळ्यात भरल्याविना राहत नाही. 'इंदू काळे आणि सरला भोळे' या कादंबरीत आलेल्या 'स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड आहे' या विधानाने तत्कालीन सुशिक्षित समाजाला खूप विचार करावयास लावले होते. त्यांची सरला, इंदू, काशी ही पात्रे अमर आहेत.

इ. स. १९३० नंतर महाराष्ट्रात समाजवादी विचार वाढीला लागायला सुरुवात झाली. ह्या विचारामुळे जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक इत्यादी क्षेत्रांतील रूढ विचारांचे, संकेतांचे, कल्पनांचे पुनर्मापन सुरू झाले. त्याचा परिणाम स्त्रीजीवनविषयक जागृतीला एक वेगळीच कलाटणी मिळण्यात झाला. स्त्रियांचा लढा हा पुरुषांविरुद्ध नसून दलितांचा स्वतःच्या हक्कासाठी जो लढा सुरू आहे, त्याचा एक भाग आहे, असे नवे अधिष्ठान स्त्रीजागृतीच्या चळवळीला मिळाले. सर्व समाजातच एकप्रकारची जागृतीची लाट निर्माण झाली. समाजवादी विचाराच्या नेतृत्वाखाली स्त्रीजागृतीची चळवळ त्याचाच एक प्रवाह म्हणून सामावली गेली.

तथापि व्यापक, सखोल, मूलभूत स्वरूपाचे असे सामाजिक चिंतन मोठ्या प्रमाणात सुरू झाले. त्यात उलटसुलट विचारही मोकळेपणाने पुढे आले. समाजवादी विचाराच्या या प्रारंभकाळी निर्माण झालेल्या विविध वाङ्मयीन व सामाजिक प्रवृत्तींचे जर अवलोकन केले तर या नव्या कलखंडात स्त्रीजीवनाच्या कोणत्या प्रश्नांना, समस्यांना, जाणिवांना महत्त्व प्राप्त झाले याची कल्पना येऊ शकेल. या विविध प्रवृत्तींच्या प्रातिनिधिक लेखकलेखिकांत वामनरावांबरोबर डॉ. केतकर, विभावरी शिरूरकर, प्रो. फडके, खांडेकर, माडखोलकर, वरेरकर, वा. वि. जोशी आदी अनेकांचा समावेश करावा लागेल. त्यांनी

आपल्या ललित लेखनाच्या द्वारे स्त्रीजीवनाचे जे चित्रण केले त्याच्या स्थूल अवलोकनाने महाराष्ट्रीय स्त्रीची झेप कोठपर्यंत आली होती, याची कल्पना येऊ शकेल.

डॉ. केतकर : स्त्रीजीवनाचे व्यापक दर्शन

वामन मल्हाराचे समकालीन डॉ. केतकर यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून स्त्रीजीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण करून मराठी समाजाला व सुज्ञ माणसांना स्त्रीजीवनाविषयी वेगळ्या दृष्टीने विचार करावयास लावले. डॉ. केतकरांचे व्यक्तिमत्त्व वेगळ्या प्रकारचे होते. ते समाजशास्त्राचे अभ्यासक होते. परदेशात राहून त्यांनी त्याविषयीचे शिक्षण घेतले होते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांत त्यांनी काही प्रश्न अधिक व्यापक स्वरूपात मांडले. हरिभाऊंनी स्त्रीचे क्षेत्र कुटुंब हे मानले व त्याच्या पार्श्वभूमीवरच स्त्रीचे जीवन चित्रित केले. डॉ. केतकरांनी स्त्रीजीवनाचे अधिक व्यापक दर्शन घडविले. समाजाच्या विविध थरांतील, विविध व्यवसायांतील, विविध प्रवृत्तींच्या स्त्रियांचे जीवन चित्रित करून अनेक विषयांवर समाजाला विचार करावयास लावले. वेश्या, कलावंतिणी अशा वर्गांचे जीवन त्यांनी अतिशय सहानुभूतीने रंगविले. त्यांच्या जीवनात काही उदात्तता आहे, काही श्रेष्ठतर नीती आहे हे त्यांनी दाखवून दिले. अनुदनात्वासारखा प्रश्नही काही कादंबऱ्यांतून त्यांनी धीटपणे मांडिला आहे. मराठी स्त्रीच्या जीवनाची व्याप्ती केतकरांनी खूप वाढविली. वैजनाथस्मृतीसारखी 'स्मृती' रचून एका अभिनव समाजनीतीचे सूतोवाचही त्यांनी एका कादंबरीत (ब्राह्मणकन्येत) केले आहे. तीतील विचारांची झेप आजही दिपवून टाकणारी आहे. वामन मल्हार जोशी व डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यांनी व त्यांतील चित्रणाने स्त्री व पुरुष यांच्यामधील जीवनध्येये, कार्यकक्षा इत्यादींबाबतचे अंतर गळून पडले. दोघांची ध्येये, समस्या, नैतिक धारणा ही समान झाली. मराठी स्त्रीच्या जागृतीमधला फार मोठा टप्पा गाठला गेला. स्त्री ही केवळ मानवदेहधारी प्राणी, भोगदासी न राहता तिला काही व्यक्तित्व आहे, हक्क आहेत, तिची कर्तव्ये पुरुषाइतकीच व्यापक आहेत ही गोष्ट समाजाच्या गळी उतरविली गेली. विचारवंतांनी जे काम सुरू केले होते त्याला ह्या थोर कलाकारांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतील चित्रणाद्वारे व्यापक सामाजिक व नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

स्त्रीला बोलके केले

वामनराव जोशी, डॉ. केतकर यांच्या लिखाणाने, समाजवादी विचाराच्या उद्भवाने व प्रसाराने, डॉ. अण्णासाहेब कर्वे यांच्या प्रयत्नाने प्राप्त होत असलेल्या शिक्षणाने, तसेच महात्मा गांधींच्या स्त्रीविषयक सहानुभूतिशील धोरणाने भारतीय — विशेषतः महाराष्ट्रीय — स्त्रीच्या ठिकाणी वेगळीच अस्मितेची जाणीव निर्माण झाली. तिला स्वतःची दुःखे स्वतःच्या भूमिकेवरून स्वतःच्या शब्दांत, स्वतःच्या पद्धतीने बोलून दाखवावी अशी फार प्रबळ इच्छा निर्माण झाली. ती विभावरी शिरूरकर यांच्या तेजस्वी

साहित्याने मुखरित झाली. त्यामुळे मराठी स्त्रीच्या साकारतेत विभावरी शिरूरकरांच्या साहित्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे लेखन विस्ताराच्या दृष्टीने, तुलनेने अल्प पण त्यातील आशयाच्या दृष्टीने अतिशय सघन असल्याने त्यावेळी ते बरेच गाजले. जी सुशिक्षित स्त्री हरीभाऊंनी कल्पनेने पाहिली, जिच्यापुढील नवप्र्येयांचे व प्रमुख मूलभूत समस्यांचे चित्रण वा. म. जोशी व डॉ. केतकर यांनी केले, तिचीच दुःखे, वेदना, आवेग, विविध नव्या समस्या, ही विभावरींनी साकार केली. स्त्रीच्या विकासक्रमातील ही पुढची व फार महत्त्वाची पायरी होय.

सुशिक्षित स्त्रीपुरतेच त्यावेळपर्यंतचे चित्रण मर्यादित होते. याचे कारण वाङ्मयाचा वाचक असा हाच वर्ग होता. त्याला आपलेच जीवन परिचित असणे व आपलेच प्रश्न महत्त्वाचे वाटणे स्वाभाविक होते. लेखकही याच वर्गातून पुढे येत असल्याने दीर्घकाल अशी परिस्थिती राहणे स्वाभाविक होते. तथापि आतापर्यंत झालेल्या वैचारिक जागृतीचा परिपाक म्हणून म्हणा, अगर अन्य प्रवृत्तींचा उद्भव म्हणून म्हणा वाङ्मयात स्त्रीचे जीवनचित्रण जरी मध्यमवर्गीयांपुरते अगर सुशिक्षित स्त्रीपुरतेच मर्यादित असले तरी ते, जीवनचित्रण अपुरे आहे, एकांगी आहे, बरेचसे काल्पनिकही आहे याची जाणीव वाचकांना तसेच लेखकांनाही झाली होती. तथापि त्यांच्यावरील संस्कारांमुळे, त्यांच्यापुढील वाङ्मयीन आदर्शांमुळे आहे तीच परिस्थिती काही काल चालणे अपरिहार्य होते. आपल्या मर्यादांची जाणीव ठेवून त्यांच्याबाहेर पडण्याचा प्रयत्न जर कोणी केला असेल तर तो वि. स. खांडेकरांनी होय. खांडेकरांनी प्रामुख्याने मध्यमवर्गीय स्त्रीचेच जीवन चित्रित केले, तरी समाजजीवनातील विविध प्रकारच्या संघर्षात्मक पार्श्वभूमीचा त्यांना कधीच विसर पडला नाही. स्त्रीला समाजवादाभिमुख करून समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, वर्गीय संघर्षांची जाण मराठी स्त्रीच्या कक्षेत आणून सोडण्याचे कार्य खांडेकरांनी फार चांगल्या रीतीने केले आहे. समाजवादी, गांधीवादी ध्येये, त्यांच्यामधील चिंतकाने समजून घेतली, जाणून घेतली व त्यांच्यामधील लेखकाने ती चित्रित केली. त्यात लेखकास कितपत स्वातंत्र्य लाभले, यश लाभले हा प्रश्न चिंतनास अवसर देणारा असला तरी लेखकाच्या ठायीचा ध्येयात्मक साक्षेप, उदात्त व्यापक सहानुभूती, मानवता व एक प्रकारची अदम्य तळमळ यांमुळे खांडेकरांनी स्त्रीला पुष्कळच बोलके केले आहे. महाराष्ट्रीय स्त्रीच्या विकासात त्याला विशिष्ट स्थान आहे.

खांडेकरांच्या बरोबरीने प्रा. फडके व माडखोलकर यांचा विचार करणे योग्य होईल. आपल्या कादंबऱ्यांतून विविध प्रवृत्तींची अनेक पात्रे रंगवूनच हे कादंबरीकार थांबले नाहीत, तर काही स्त्रीजीवनविषयक समस्या सर्जनशीलतेच्या पातळीवरुन मांडण्याचा प्रयत्न या लेखकांनी केला आहे. सुशिक्षित स्त्री आर्थिक दृष्ट्या जरी स्वावलंबी झाली तरी तिच्या जीवनातील इतर अनेक प्रश्न अनुत्तरितच राहतात. 'उद्धार' व 'भंगलेले देऊळ' या कादंबऱ्यांच्या नायिकांच्या व्यथा चित्रित करून फडके व माडखोलकर यांनी

आपली समाजमनस्कता सिद्ध केली आहे. तर वा. वि. जोशी यांनी कायद्याच्या पातळीवरून कादंबरीतील जीवनचित्रण केले.

वरेरकर : झगडणाऱ्या स्त्रीचे आगळे दर्शन

मराठी स्त्रीच्या वाङ्मयीन चित्रणात कै. भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर यांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान द्यावे लागेल. वरेरकरांची साहित्यविषयक, जीवनविषयक व विशेषतः स्त्रीजीवनविषयक विशिष्ट मते होती. त्यांच्या साहित्यातील जीवनचित्रणाची मीमांसा करताना त्यांच्या मतांचा मागोवा घेणे अत्यवश्य होईल. वरेरकरांनी निर्माण केलेली स्त्री ही सर्वांहून आगळी वेगळी आहे. जीवनाच्या संघर्षात ती अतिशय निर्धाराने सिद्ध झालेली आहे. कितीही संकटे आली तरी निराशा, रुदन हे तिला माहीत नाही. वरेरकरांनी स्त्रीचे चित्रण सहानुभूतीने केले, पण हळवेपणाने केले नाही. स्वतःच्या व्यक्तिगत हक्कांच्या संपादणीसाठी वरेरकरांनी निर्मिलेली वाङ्मयीन स्त्री सिद्ध झालेली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत तिने पुरुषाच्या बरोबरीने स्थान स्वकर्तृत्वाने पटकाविले आहे. केवळ नोकरी नव्हे तर व्यापार, उद्योग, स्वतंत्र व्यवसाय इत्यादी क्षेत्रांचाही तिने स्वीकार केला आहे. व्यक्तित्वाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यावर स्त्रीने कसे वागणे शक्य आहे, ह्याचे दर्शन वरेरकरांच्या प्रतिभेला कितीतरी पूर्वी घडलेले आहे. स्त्री म्हणजे केवळ मार्दव, सौंदर्य, हळवेपणा, कारुण्य यांची मूस अशी ज्यांची समजूत झाली आहे, त्यांना वरेरकरांचे जीवनचित्रण कमालीचे आक्षेपार्ह वाटणे स्वाभाविक आहे. या आक्षेपात काही तथ्य आहे हे मान्य करूनही महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनविकासाचे एक आगळेवेगळे आविष्करण वरेरकरांच्या लेखनात झाले आहे, हे अमान्य करता येणार नाही. ज्या स्त्रीला न्याय मिळावा म्हणून हरिभाऊंनी महाराष्ट्रीय पुरुषांच्या ठायीच्या स्नेहशीलतेस

आपली समाजमनस्कता सिद्ध केली आहे. तर वा. वि. जोशी यांनी कायद्याच्या पातळीवरून कादंबरीतील जीवनचित्रण केले.

वरेरकर : झगडणाऱ्या स्त्रीचे आगळे दर्शन

मराठी स्त्रीच्या वाङ्मयीन चित्रणात के. भा. वि. उर्फ मामा वरेरकर याना वैशिष्ट्यपूर्ण स्थान द्यावे लागेल. वरेरकरांची साहित्यविषयक, जीवनविषयक व विशेषतः स्त्रीजीवनविषयक विशिष्ट मते होती. त्यांच्या साहित्यातील जीवनचित्रणाची मीमांसा करताना त्यांच्या मतांचा मागोवा घेणे अत्यवश्य होईल. वरेरकरांनी निर्माण केलेली स्त्री ही सर्वांहून आगळी वेगळी आहे. जीवनाच्या संघर्षास ती अतिशय निर्धाराने सिद्ध झालेली आहे. कितीही संकटे आली तरी निराशा, रुदन हे तिला माहीत नाही. वरेरकरांनी स्त्रीचे चित्रण सहानुभूतीने केले, पण हळवेपणाने केले नाही. स्वतःच्या व्यक्तिगत हक्कांच्या संपादणीसाठी वरेरकरांनी निर्मिलेली वाङ्मयीन स्त्री सिद्ध झालेली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत तिने पुरुषाच्या बरोबरीने स्थान स्वकर्तृत्वाने पटकाविले आहे. केवळ नोकरी नव्हे तर व्यापार, उद्योग, स्वतंत्र व्यवसाय इत्यादी क्षेत्रांचाही तिने स्वीकार केला आहे. व्यक्तित्वाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यावर स्त्रीने कसे वागणे शक्य आहे, ह्याचे दर्शन वरेरकरांच्या प्रतिभेला कितीतरी पूर्वी घडलेले आहे. स्त्री म्हणजे केवळ मार्दव, सौंदर्य, हळवेपणा, कारुण्य यांची मूस अशी ज्यांची समजूत झाली आहे, त्यांना वरेकराचे जीवनचित्रण कमालीचे आक्षेपार्ह वाटणे स्वाभाविक आहे. या आक्षेपात काही तथ्य आहे हे मान्य करूनही महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनविकासाचे एक आगळेवेगळे आविष्करण वरेरकरांच्या लेखनात झाले आहे, हे अमान्य करता येणार नाही. ज्या स्त्रीला न्याय मिळावा म्हणून हरिभाऊंनी महाराष्ट्रीय पुरुषांच्या ठायीच्या स्नेहशीलतेस आवाहन केले, वामनरावांनी व डॉ. केतकरांनी ज्या स्त्रीच्यापुढे कालोचित नवीन ध्येये, कर्तव्ये मांडून त्यांच्यासाठी जीवन कंठण्यास बद्धपरिकर केले, शिक्षण घेतल्यानंतर तिच्या ठिकाणी ज्या नव्या जाणिवा झाल्या, जे नवे जीवन व भावसंघर्ष तिच्या कक्षेत किंवा वाट्यास आले त्यांचे प्रतिबिंब प्रा. फडके, खांडेकर, माडखोलकर आदी अनेकांच्या ललितसाहित्यातून उमटले; त्याच स्त्रीच्या जीवनांगाचा एक पैलू वरेरकरांनी आपल्या लेखनातून साकार केला आहे.

स्वातंत्र्यकालातील साहित्यातील स्त्रीजीवनाची पाहाणी करताना अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. वाङ्मयेतिहासातील कालखंड हे काटेकोरपणे पाडायचे नसतात, तसे शक्य नसते. कोणतेही कालमान अगर कोणताही कालखंड घेतला तरी त्यात पूर्वकालीन प्रवृत्ती जिवंत असतातच. जुन्या पिढीतील लेखकांची मनोधारणा अगोदरच्या कालखंडातच निश्चित झालेली असते. नव्या प्रवृत्तींचा विशेषसा परिणाम त्यांच्यावर जाणवत नाही. प्रा. फडके, खांडेकर, वरेरकर आदी लेखक याच प्रकारचे होत. त्यांच्या मनाची ठेवण, जीवनविषयक तत्त्वज्ञान, साहित्यविषयक भूमिका इत्यादी पूर्वकालीन परिस्थिती, संस्कार

इत्यादींचा परिणाम होऊन ठरलेली असणे स्वाभाविक आहे. नव्या प्रवृत्तींची किंवा जाणिवांची बीजे नव्या परिस्थितीत असू शकतात. त्यातील काही प्रवृत्ती प्रयोगावस्थेत अस्फुट असतात तर काही स्थिरावयाच्या असतात. काही प्रवृत्तींमागे एकप्रकारची सखोल चिंतनशीलता असते. उलट कित्येक वेळा त्या केवळ अनुकरणाने आलेल्या असतात. समाजाची विशिष्ट विकासावस्था तसेच विवक्षित वाङ्मयीन ध्येयेही प्रभावीपणाने आपला संस्कार त्या प्रवृत्तींवर उमटवू शकतात. पण या सर्व गोष्टींच्या संमिश्र म्हणजेच गुंतागुंतीच्या प्रभावामुळे वाङ्मयातील जीवनचित्रणाची प्रत वा प्रकार तपासणे कमालीचे विवाद्य तसेच केवळ तर्काच्या स्वरूपाचे होऊ शकते. कालाच्या जवळ असल्याने अभ्यासकालाही तटस्थ किंवा त्रयस्थपणाची भूमिका घेणे कठीण होते. जो जो आपण आपल्या कालाच्या जवळ जवळ येत जातो, तो तो जीवनचित्रणातील व्यापकपणा एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढलेला असतो की त्याचे विवेचन वा विवरण बरेच कठीण होते.

स्वातंत्र्योत्तर काल : विषमतेचा अस्त

स्वातंत्र्योत्तर म्हणजेच आजकालच्या वाङ्मयातील स्त्रीजीवनाच्या चित्रणाचे स्वरूप तपासतांना अशा प्रकारच्या अनेक अडचणी येतात. महाराष्ट्रीय स्त्रीने जीवन-विकासाचा जो पल्ला गाठला आहे त्याचाही विचार करणे अवश्य आहे. स्त्रीपुरुषांमधली विविध प्रकारची अंतरे या काळात गळून पडलेली स्पष्टपणे दिसून येतात. नागरिक राजकीय, सामाजिक इत्यादी सर्व प्रकारचे हक्क प्राप्त झाल्याने एक वेगळेच वातावरण निर्माण झालेले आहे. थोडक्यात ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आगमनाबरोबर जी प्रक्रिया सुरू झाली ती या कालखंडात पूर्णावस्थेस गेली असे म्हणता येईल. या व यापुढच्या काळात स्त्रीपुरुषांची ध्येयात्मक, कार्यक्षमात्मक, नैतिक इत्यादी क्षेत्रांतील विभिन्नता संपूर्णतया तत्त्वतः व बव्हंशाने प्रत्यक्षात निकालात निघालेली आहे, असे दिसून येते. म्हणजे स्त्रीची, समाजजीवनातील एक घटक, व्यक्ती, जाणीवपूर्ण नागरिक या दृष्टीने विविध प्रकारची मूर्ती साहित्यात यापुढे साकार होऊ लागली. तिच्या जीवनाची जडण-घडण *ही संपूर्णतया बदलल्याने तिच्यापुढील प्रश्न व पुरुषापुढील प्रश्न* यांतील काटेकोर भिन्नता यापुढे नष्ट झालेली दिसते. निदान पुष्कळ प्रमाणात कमी झालेली आहे त्यामुळेच तिच्या जीवनचित्रणातली व्यापकता, सखोलता लक्षणीयतेने वाढलेली दिसते.

ब्रिटिश राजवटीतील विशिष्ट इतिहाससिद्ध विकासक्रमामुळे स्वातंत्र्यकालाच्या आगमनापर्यंत स्त्रियांचे प्रश्न म्हणजे केवळ मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न होत असे एक समीकरण होते. डॉ. केतकरांसारख्यांनी त्यावर आक्षेप घेऊन ते व्यापक करण्याचा प्रयत्न केला तरी परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. याचे कारण या वाङ्मयाचा वाचक वा लेखक हा प्रामुख्याने सुशिक्षित वर्गातीलच होता. त्याचे लक्ष स्वतःवरच केंद्रित झालेले होते. स्वातंत्र्यकालात समाजाच्या सर्वच थरांना एक विलक्षण चैतन्ययुक्त अशी जाग येत आहे. विविध समाजस्तरांतून लेखक-लेखिका पुढे येत आहेत. त्यामुळे

साहित्यातील जीवनचित्रणाचा कल वाढत आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, उद्धव शेळके, शंकर पाटील, तल्हार, नेमाडे, रणजीत देसाई इत्यादींचे साहित्य या दृष्टीने लक्षणीय आहे. इतर गोष्टींबरोबर या विशिष्ट प्रकारच्या लेखकांच्या लेखणीतून उतरलेले स्त्रीजीवनचित्रणही बरेच रेखीव आहे असे म्हणता येईल.

आजच्या लेखकांचा आत्मकेंद्रित व्यक्तिवाद

आजच्या स्त्रीपुढील विविध समस्यांचे चित्रण आजच्या वाङ्मयात होत आहे काय ? हा या संदर्भात विचारात घेण्यासारखा प्रश्न आहे. याचे उत्तर पूर्णपणे होकारार्थी देता येणे अशक्य आहे. असे का व्हावे, हे शोधावयास गेले तर त्याचे उत्तर आज सर्वत्र रूढ असलेल्या विशिष्ट वाङ्मयीन ध्येयवादात, तसेच बहुसंख्य लेखक-लेखिकांच्या विवक्षित आत्मकेंद्रित व अतिरिक्त व्यक्तिवादी प्रवृत्तीत सापडेल. आजचे साहित्य हे लेखकांकडून प्रामुख्याने साहित्य म्हणूनच निर्माण होत आहे, व तसेच ते निर्माण व्हावे असा विचार आज चांगलाच बद्धमूल झाला आहे, आणि त्यास तसा विरोध करण्याचे काही कारण नाही. पण साहित्याचे साहित्यत्व कशात असते ? ते घडवीत असलेल्या जीवनदर्शनात असते, का लेखकास प्रतीत होत असलेल्या मानसिक कोलाहालात असते ? आजच्या बहुसंख्य लेखकांचे मत दुसऱ्या बाजूने पडेल. आज व्यक्तिवादाला व त्यातही आत्मकेंद्रित व्यक्तिवादाला उधाण आले आहे. हा व्यक्तिवादही आमच्या जीवनातून निर्माण झालेला नाही तर परकीय वाङ्मयाच्या अनुकृतीत त्याची बीजे आहेत. तो समाजविन्मुखच आहे. त्यामुळे राज्यसंस्थेने समाजवादी समाजरचनेचे ध्येय पुढे ठेवलेले आहे, पण बहुसंख्य लेखकांना त्याचे आवाहन पोचत नाही. त्याऐवजी आत्मकेंद्रित व्यक्तिवादच त्यांना जवळचा वाटतो. कारण त्यांच्यापुढे ठेवल्या जाणाऱ्या वाङ्मयीन ध्येयवादाला तो जवळचा आहे. पूर्ण विकसित देशांना कदाचित हे आक्षेपार्ह वाटणार नाही, पण आपल्यासारख्या अल्पविकसित देशाला ही जीवन-विन्मुखता कशी काय व किती काल परवडणार आहे याची शंका वाटते. यामुळे सामाजिक दृष्टीतून विचार करणारे विचारवंत तरी आज विचलितचित्त झालेले आहेत.

आजच्या साहित्यात जीवनचित्रण विशेषतः समाजजीवनचित्रण हे विरळत्वाने येते. समाजाच्या निरनिराळ्या थरांतील व्यक्तींचे चित्रण आजच्या कथा-कादंबरीत येते. नाही असे नाही. पण ते सारे चित्रण केवळ पार्श्वभूमीरूप आलेले असते. लेखकाला त्याबाबत आग्रहाने काहीही म्हणावयाचे नसते, प्रतिपादावयाचे नसते. सारा भर प्रामुख्याने मानसिक आंदोलनांवर, पात्रांच्या अपवादात्मक मानसिक ठेवणीवर, विविध प्रकारच्या मानसिक संघर्षांवर वा कित्येकदा विकृतिचित्रणावर असतो. त्याच्याकडे लक्ष केंद्रित व्हावे इतपतच सामाजिक किंवा तत्सम पार्श्वभूमी आलेली असते. समाजजीवन वा तत्सम जीवनचित्रण करणे हे आजच्या कथाकारांचे उद्दिष्ट नाही. वाङ्मयीन क्षेत्रातील वातावरणच असे आहे की, साहित्यातून सामाजिक जीवनचित्रणासारखी

काही अपेक्षा करणे हे नुसते सनातनीपणाचेच नव्हे तर अडाणीपणाचे लक्षण गणले जाते. त्यामुळे आजकाल सामाजिक-समस्याप्रधान काव्य, कथा, कादंबरी, नाटके जवळ जवळ निर्माणच होत नाहीत. साहजिकच स्वातंत्र्यकालात स्त्रीजीवनचित्रणाकडे, स्त्रियांच्या जीवनातील प्रमुख व खऱ्या समस्यांकडे लेखकाचे जवळ जवळ दुर्लक्ष होत आहे असे दिसते. समाजजीवनाचा व साहित्याचा केवळ पार्श्वभूमीपलीकडे कसलाही संबंध नसतो, अशा प्रकारच्या विचारांचा स्वीकार या प्रकारच्या वाङ्मयामागील प्रवृत्तीच्या मुळाशी आहे. समाजजीवनाचे चित्रण करणे हा लेखकाचा हेतू नसतो, पण समाजजीवनाचे स्वतःला दिसलेले स्वरूप तो विवेकाने दाखवीत असतो (निदान दाखवावे). त्यातून नकळत समाजपरिवर्तनाची नवी दिशा दृग्गोचर होते. अर्थात हा कलाकृतीपासून होणाऱ्या परिणामांचा भाग असतो. पण तो अत्यंत महत्त्वाचा असतो.

आजच्या कथाकादंबरी या वाङ्मयप्रकारांतून मनाच्या निरनिराळ्या व्यथा, विवंचना, विविध अनुभव इत्यादी गोष्टींना प्राधान्य असते. त्याच्या अनुषंगाने आलेले जीवनचित्रण इतके व्यक्तिनिष्ठ असते की त्यामागील सामाजिक जीवनातील विशिष्ट समस्यांचा पूर्ण संकोच होतो. साहजिकच त्या जीवनचित्रणाला कोणतेही प्रातिनिधिक स्वरूप असत नाही. इतके की या भागाबाबत लेखक पूर्णपणे उदासीन असावा असेही कित्येक वेळा वाटते. 'रथचक्र' ही अलीकडच्या कालातील एक गाजलेली कलाकृती, विशेष म्हणजे स्त्रीजीवनाला प्राधान्य असलेली कादंबरी. पण कादंबरीतल्या प्रमुख व्यक्तिरेखा एवढ्या आत्मनिष्ठ आहेत की त्या सामाजिकता पूर्णपणे हरवून बसल्या आहेत. या कादंबरीतील पात्रांची दुःखे, वेदना, विवंचना ह्या सर्व कमालीच्या व्यक्तिगत आहेत. त्यांना काही सामाजिक कारणे आहेत, ती विशेष लक्षणीय आहेत, असे लेखकाला वाटत नाही. आजच्या लेखकांमधील ही एक प्रबल प्रवृत्ती.

ह्या प्रवृत्तीच्या प्रभावामुळे असे दिसते की, आजच्या कथाकादंबऱ्यांतून स्त्रीजीवन-विषयक प्रश्नांना कोणतेही महत्त्वाचे असे स्थान राहिलेले नाही. कारण कलाकारांच्या चिंतनाचे विषयच वेगळे झालेले आहेत. आजचे वाङ्मय वाचून ह्या देशातील सारे सामाजिक व स्त्रीजीवनविषयक प्रश्न सुटलेले आहेत, आता उरलेले आहेत ते विविध मानसिक वा मनोवैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे उलगडणारे विविध प्रश्न किंवा संघर्ष; हे अर्थातच सदैव तसेच राहणार आहेत; मानवजातीचे ते प्रारंभापासूनचे सांगाती आहेत, व पुढेही अनंतकाळ तसेच ते राहणार आहेत; अशी एखाद्याची कल्पना होते. ही प्रतिक्रिया कितपत वास्तव आहे, व ती होणे योग्य आहे काय? हा विचारात घेण्यासारखा प्रश्न आहे.

मराठी स्त्रीच्या भाष्यकारांची परंपरा कुंठित?

त्यामुळे हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, डॉ. केतकर, मामा वरेरकर, खाडेकर, विभावरी शिरूरकर आदी लेखक-लेखिकांनी निर्माण केलेली विशिष्ट परंपरा आज खंडित

झाली आहे असे वाटते. कित्येकांना असेही वाटते की, या ग्रंथकारांनी निर्माण केलेले प्रश्न, समस्या काल्पनिक होत्या. वास्तवात त्यांना स्थान नव्हते. तेव्हा त्यांची वासलात अशीच लागावयाची. तसेच विविध राजकीय, सामाजिक सुधारणांनी पूर्वीचे स्त्रीजीवन-विषयक प्रश्न जवळजवळ सर्व सुटले आहेत. उरलेल्या आहेत त्या व्यक्तिगत विवंचना व दुःखे. हे दोन्ही युक्तिवाद वास्तवाधिष्ठित आहेत काय हे ज्याचे त्याने ठरवावे.

तथापि काव्याकभिन्न ढगालाही रुपेरी कडा असतात. तसेच येथे आहे. अर्थात येथेही सामाजिक भेदाभेद आढळतो. मागासलेल्या व उपेक्षित लोकांचे जीवन अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, उद्धव शेळके आदी लेखक एक प्रकारच्या पोटतिडकेने वर्णन करीत आहेत. त्याचप्रमाणे डॉ. इरावती कर्वे, मालतीबाई दांडेकर, डॉ. सुमती क्षेत्रमाडे, विजया राजाध्यक्ष, शांता शेळके, दुर्गा भागवत, वसुंधरा पटवर्धन, डॉ. सरोजिनी बाबर आदी लेखिकांकडून स्त्रीजीवनाचे विविध प्रश्न, विविध संघर्ष मोठ्या बारकाईने व सूक्ष्मतेने चित्रित होतात, चर्चिले जातात. तसेच सखोल सामाजिक चिंतन विभावरींच्या लेखनात दिसून येते. त्यांच्या शबरीचे दुःख व्यक्तिगत असून पूर्णपणे सामाजिकही आहे. ह्या दृष्टीने 'रथचक्र' व 'शबरी' या दोन प्रमुख स्त्रीजीवनविषयक कादंबऱ्यांची तुलनात्मक पाहाणी चांगलीच उद्बोधक होईल. आजचे बहुसंख्य लेखक व लेखिका आत्मनिष्ठ भूमिकेवरुन लेखन करीत असल्याने व्यक्तिगत सुखदुःखे, आशानिराशा, विवंचना इत्यादींना काही सामाजिक अंग वा अधिष्ठान असते, ही गोष्ट त्यांच्याकडून पूर्णपणे दुर्लक्षित होत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात विकृत व एकांगी जीवनचित्रण आजच्या कथाकादंबऱ्यांतून होत असते. मागासलेल्या वर्गातून आलेल्या लेखकांना हे परवडणे शक्य नसते. पण वाङ्मयीन वातावरणात ह्या गोष्टींना एवढे महत्त्व प्राप्त झालेले आहे की तेही विशेष अलिप्त नसतात. तथापि त्यांच्या लेखनातूनच उद्याच्या श्रेष्ठ साहित्याची पाऊलवाट जाणार आहे असे दिसते.

त्यामुळे सामाजिक दृष्टीने पाहता आजच्या स्त्रीचे जीवन थोडेसे प्रगत पण निरनिराळ्या प्रकारच्या कौटुंबिक, सामाजिक, व्यक्तिगत समस्यांनी पूर्णपणे झाकळून गेले आहे. वाङ्मयात तिच्या दुःखांना वाचा प्रामुख्याने प्रमुख लेखिकांकडूनच फुटते, कित्येकदा ती अतिशय हृद्यही असते, पण विशिष्ट साहित्यविषयक भूमिकेमुळे त्याचे जीवनचिंतन कोठेतरी कमी पडत आहे, अशी जाणीव होते. हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, डॉ. केतकर, मामा वरेरकर, खांडेकर, विभावरी शिरूरकर या मराठी स्त्रीच्या भाष्यकारांची परंपरा आज कुंठित झाली आहे, असे म्हणणे फारसे चूक होणार नाही.

कादंबरीचे क्षेत्र सोडून नाट्याचे क्षेत्र घेतले तरी आपणास हेच आढळून येते. देवल, गडकरी, कोल्हटकर यांच्यानंतर वरेरकर, आचार्य अत्रे, रांगणेकर, मुक्ताबाई दीक्षित, मालतीबाई बेडेकर इत्यादि काळच्यापरवाच्या पिढीतल्या नाटककारांनी मराठी स्त्रीच्या जीवनातील कित्येक समस्या आपापल्या नाटकातून मुखरित केल्या आहेत. तशा प्रकारचे प्रयत्न आज होताना दिसत नाहीत. नाट्यवाङ्मयाला आज विशेष बहर

आलेला आहे. प्रयोगांच्या आकड्यावरून त्यांच्या लोकप्रियतेचे मोजमाप करता येईल. पण वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने व विशेषतः सामाजिक आशयाच्या दृष्टीने आजचे नाटकही वरील नाटककारांनी निर्माण केलेली परंपरा हरवून बसले आहे की काय अशी शंका यावी अशी एकंदर परिस्थिती आहे.

काव्याच्या बाबतीत तर परिस्थिती अधिकच स्पष्ट आहे. केशवसुतांच्या तुतारीत स्त्री-दास्यमुक्तीला महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या संप्रदायातील कवींमध्ये तसेच नंतरच्या रविकिरण मंडळाच्या कालखंडात माधवराव पटवर्धन, गिरीश, यशवंत, इत्यादी सर्व कवींच्या ठिकाणी याबाबत जागरूकता स्पष्टपणे दिसत होती. कुसुमाग्रज, अनिल, बोरकर इत्यादींच्या काव्यात एक प्रकारच्या उदात्ततेत व मानवतेत तिचे रुपांतर झाले. पण आजच्या काव्यात पडणारे स्त्रीमनाचे प्रतिबिंब इतके त्रुटित आहे की वरील वाङ्मय-प्रकारांसारखीच परिस्थिती याही ठिकाणी आहे. संजीवनी मराठे यांची 'स्त्री माझे नाव असे' अशा कवितेचा अपवाद विरळाच.

मराठी लघुकथा ही या गोष्टीस अपवाद आहे असे कित्येकांना वाटते. पण या अपवादभूततेस लेखकांच्या स्वभाव प्रकृती इत्यादीपेक्षा लघुकथेचे विशिष्ट स्वरूपच जबाबदार आहे. तरीही मामा वरेरकरांसारखा वारंवार नवे सामाजिक विषय शोधणारा वा समस्याप्रधान कथा लिहिणारा कथाकार आज प्रयत्नाने शोधावा लागेल.

सामाजिक चिंतनातून वाङ्मयाची निर्मिती नाही

हे असे का? याचे उत्तर आजच्या वाङ्मयीन ध्येयवादात आहे, हे वर आलेलेच आहे. त्यामुळे असे झाले आहे की, पर्वतातून उगम पावलेली एखादी नदी नित्यानुभवाप्रमाणे एखाद्या दुसऱ्या नदीस अगर समुद्रास न मिळता तिचा सारा प्रवाह एखाद्या वाळवंटात जिरून जावा तसा प्रकार मराठी वाङ्मयातील स्त्रीजीवनाविषयक परंपरेबाबत झाला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या कालापर्यंत स्त्रीने सारे अधिकार प्राप्त करून घेतले; पण पुढे काय? याचे उत्तर हे असे मन विषण्ण करणारे मिळते.

यात कोणालाही दोष देण्याचा हेतू नाही. प्राचीन मराठी वाङ्मयात आध्यात्मिकतेला विशेष स्थान आहे. पण आजच्या कवितेत ते पाहावयास लागले तर जसे काही प्रत्ययास येईल तसेच येथे झाले आहे. स्त्रीजीवन त्यातील विशिष्ट समस्या हा आजच्या काळातील लेखक-लेखिकांच्या तसेच बहुसंख्य वाचकांच्याही चिंतनाचा वा अपेक्षेचा विषयच राहिला नाही. हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, डॉ. केतकर, वरेरकर, आचार्य अत्रे, खांडेकर इत्यादींच्या चिंतनाचा विषय तो होता. त्याप्रमाणेच, आजच्या लेखकांचा साहित्यातील समाजचिंतनावरही विश्वास राहिलेला दिसत नाही. त्यामुळे या विषयाला फारसे महत्त्व द्यावेसे त्यांना वाटत नाही. असे होण्याला अनेक कारणे असतील. मराठी वाङ्मयच नव्हे तर एकंदरीने जागतिक वाङ्मयच या अशा अवस्थेत सापडले आहे.

याचे कारण आजच्या वाङ्मयाची निर्मिती समाज वा व्यापक मानवी जीवन यांच्या चिंतनातून होत नसून विविध अनुभूतींच्या अभिव्यक्तीकरणासाठी होते. ह्या अनुभूती व्यक्तिगत असतात वा असाव्यात अशी अपेक्षा असते. तसेच साहित्याचा समाजजीवनाशी असणारा संबंध हा केवळ धूसर दूरान्वयाचा, प्रतीकात्मक वा पार्श्वभूमीस्वरूपाचा असतो असे मत आज जवळजवळ सर्वसंमत झालेले आहे. त्यामुळे असे झाले आहे की, समाजजीवनाचा रोख वर्धिष्णुतेकडे आहे, समाजजीवनात अनेक दुःखे, विवंचना, संघर्ष असले तरी विधायक व कृतिशील प्रवृत्ती तितक्याच तळमळीने कार्यवाही झालेल्या आहेत, सर्वत्र नव्या समाजाची उभारणी चालू आहे, नव्या इमारती होत आहेत संस्था, संघटना अस्तित्वात येत आहेत, विधायकताही वाढत आहे. पण आजचा लेखक त्याच्या मनाच्या विशिष्ट ठेवणीमुळे अगर अन्य परिस्थितीमुळे या वर्धिष्णू जीवनातून चैतन्यही घेऊ शकत नाही व जे नवे घडत आहे त्याला नवे नैतिक अधिष्ठानही देऊ शकत नाही. सामाजिक विचारवंतांना वेदनाकुल करणारी ही वस्तुस्थिती आहे!

यातून मार्ग कसा काढावा?

ह्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी एक सूचना करून हे आजच्या साहित्यातील स्त्रीचित्रणाबाबतचे चिंतन पुरे करतो.

महर्षी अण्णासाहेब कर्वे हे आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ स्त्री-उद्धारक होते, हे सर्व विदित आहे. त्यांनी निर्माण केलेली समाजसेवापरंपरा कालपर्यंतच्या वाङ्मयाने प्रमाण मानली व तिला आपापल्या परीने साह्यही केले. आज स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचे शास्त्रीय संशोधन वा चिंतन सामाजिक लेखनाच्या पातळीवर चालू असेल. पण आताच पाहिल्याप्रमाणे वाङ्मयाच्या क्षेत्रात एकंदरीने सामसूम दिसते. म्हणजे आजचे वाङ्मय वाङ्मयीन दृष्ट्या कमी वा हलक्या दर्जाचे आहे असे नव्हे पण त्यालाही विशिष्ट परिमिती (डायमेन्शन) लाभलेली नाही एवढेच. काही अपवाद मानावे लागतील हे खरे. सामाजिक वा स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची ललितवाङ्मयाच्या क्षेत्रातील उपेक्षा थांबवयाची असेल तर एखाद्या संघटनेने वर्षातील अगर काही विशिष्ट कालखंडातील स्त्री-जीवन-विषयक चित्रणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या वाङ्मयीन कलाकृतीस अगर प्रबंध इत्यादींस काही श्रेष्ठ पारितोषिके ठेवावीत. म्हणजे या विषयाबाबत लेखकांच्या ठायी जे सामाजिक औदासीन्य आहे ते कदाचित कमी होईल. निदान नवीन लेखकापुढे सामाजिक स्वरूपाचे नवे आविष्कारक्षेत्र उपलब्ध करून दिल्यासारखे होईल. असे काही केले तरच आजची ही कोंडी फुटण्याची शक्यता आहे.

विभाग दुसरा

स्त्री आणि समाज : कर्तबगारी व

८

स्त्रीजीवनातील संक्रमण

चंद्रकला हाटे

डॉ. श्रीमती चंद्रकला आनंदराव हाटे, एम् ए., पीएच्. डी. (जन्म १२-९-१९०३) सेवानिवृत्त प्राध्यापिका, श्री. ना. दा. ठा. महिला पाठशाला, मुंबई. संशोधनाकरिता युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशनचे अध्यासन. आर्थिक व सामाजिक विषयांवर संशोधन व लेखन, (स्नेहसदन, मंगलवाडी, गिरगाव, मुंबई ४).

सुरवातीपासून स्त्री ही पुरुषावलंबित

अंदाजे दशलक्ष वर्षांपूर्वी हिमकालातील पूर्वअश्मयुगात मानवाचा जन्म पृथ्वीतलावर झाला असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. अनेक शतके मानवापुढे एकच समस्या होती आणि ती म्हणजे निसर्गाच्या तडाख्यातून व इतर वन्य प्राण्यांपासून आपल्या जीविताचे संरक्षण करावयाचे. पुरुषांबरोबर स्त्री पण ह्या समस्येला तोंड देत होती. त्याबरोबर मातृत्वाची जबाबदारीही तिला पार पाडावी लागे. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीत जीवनकलहाला तोंड देता देता वरचेवर सारख्या येणाऱ्या गरोदरावस्था व प्रसूतिकाल येणेकरून जीवितरक्षणार्थ तिला पुरुषावर विसंबून राहावे लागत असल्यास नवल नाही. शिकार करणे, आपले व आपल्या कुटुंबाचे रक्षण करणे, त्याकरिता जरूर तेव्हा लढणे ही पुरुषवर्गाची कामे आणि ह्या पुरुषाच्या कामात जमेल तितकी अल्पशी मदत करून प्राप्त परिस्थितीत स्वतः व स्वतःची अपत्ये ह्यांना तगवून धरणे हे स्त्रीच्या वाट्यास येई. अशा तऱ्हेने मूलभूत श्रम-विभाजन स्त्रीपुरुषांमध्ये जे झाले ते अगदी गेल्या शतकापर्यंत कायम होते.[१] जीवनाच्या धकाधकीला पुरुषाने तोंड द्यावयाचे व स्त्रीने जीवन संवर्धित करावयाचे असे कार्यक्षेत्राचे विभाजन झाल्यावर स्त्री ही बरीचशी पुरुषावलंबित झाल्यास नवल नाही.

---

१. "अगदी प्राथमिक अवस्थेतील मूळचे योग्य असे हे श्रमविभाजन हरएक सामाजिक संस्थेतील मुख्य घटक बनले आहे." सोशल एन्सायक्लोपीडिया व्हॉल्यूम ५ पान ४४२

ह्या प्राथमिक अवस्थेतून मानवी जीवनाला थोडीफार स्थिरता येण्यास हवामान अधिक समशीतोष्ण व्हावे लागले आणि तो बदल होईपर्यंत हजारो वर्षांचा काळ निघून गेला. मानव स्थायिक झाल्यानंतर हळूहळू समाजात दोन वर्ग निर्माण झाले. श्रमजीवी व राज्यकर्त्यांचा वर्ग. कालांतराने त्यात आणखी एका वर्गाची भर पडली. ती म्हणजे बुद्धिजीवी अगर मध्यम वर्ग. वर्गनिर्मितीबरोबर स्त्रीच्या जीवनात वर्गावर्गानुसार निरनिराळे बदल झाले. श्रमजीवी वर्गातील स्त्री ही श्रमजीवीच राहिली. पूर्ववत तिला दोन आघाड्या संभाळाव्या लागत. पिता अगर पती यांच्या कामात सहभागी होऊन आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता मदत करणे व निसर्गाने टाकलेल्या अपत्यजन्म आणि बालसंगोपन ह्या जबाबदाऱ्या पार पाडीत राहाणे हेच स्त्रीचे रुळलेले जीवन होते. त्यामुळे त्याही अवस्थेत तिचे अवलंबित्व कायम राहिले.

मानवी इतिहास हा सदा संघर्षाने भरला आहे. त्या संघर्षात जो समाज विजयी होई तो जित समाजातील स्त्रियाना आपले गुलाम बनवीत आला आहे. ह्या स्त्रियांना आपल्या सुखोपभोगार्थ राबविणे म्हणजे पुरुषार्थाचे लक्षण समजले जाई. किंबहुना जेत्याशी आपले सख्यसंबंध राहाण्यासाठी जित लोक आपल्या कन्याही अर्पण करीत. सुमित्रा–दशरथ, हिडिंबा–भीम, जोधपूरची कन्या व अकबर ही उदाहरणे आपल्या नजरेसमोर आहेत. ह्यामुळे जित स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम असे.

राज्यकर्ते आदिकरून समाजात जो सरंजामी वरचा वर्ग उदयास आला त्या वर्गाला उदरनिर्वाहाकरिता प्रत्यक्ष शारीरिक कष्ट करण्याची जरुरी नसे. राज्यरक्षण, उद्योगधंदे, कलासंवर्धन वगैरे वरच्या दर्जाची कामे ह्या वर्गाकडे आली. अर्थातच हा वर्ग अधिक सधन व सुखवस्तू बनला. त्या वर्गाला समाजात मानप्रतिष्ठा, सवलती, सुखसाधने उपलब्ध झाली. ह्याचा फायदा त्या वर्गातील स्त्रीलासुद्धा झाला. अतःपर तिला शारीरिक कष्ट करण्याची जरुरी राहिली नाही. तिचे कार्यक्षेत्र घरापुरते नव्हे घराच्या आतच मर्यादित झाले. अनुषंगाने तिच्यावरील बंधनेही वाढू लागली बंधनांची पराकाष्ठा म्हणजे तिला गोषात राहावे लागले. वैदिक ब्रह्मवादिनी भरसभेत विश्वोत्पत्ती-सारख्या गंभीर विषयांवर पुरुषांबरोबर चर्चा करू शके. तीच महाभारतकालात दरबारामध्ये बसताना पडद्याआड बसू लागली. कण्वाश्रमात मुक्तविहार करणारी शकुंतला दुष्यंतपत्नी म्हणून राजदरबारी प्रवेश करते तेव्हा ती अवगुंठित असते.

स्त्री उपभोग्य वस्तु–वेश्यावर्गाचा उदय

समाजाच्या ह्या अवस्थेमध्ये वरिष्ठ वर्गाचा स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोण बदलला. जीवनसंग्रामात आपणास साथ देणारी जोडीदारीण हे तिचे स्थान नष्ट होऊन उपभोग्य वस्तु ह्या निकृष्टावस्थेपर्यंत ती अवनत झाली. म्हणूनच वेश्यावर्ग निर्माण झाला. केवळ पुरुषाच्या विषयवासनेचे स्थान बनून स्वतःचा उदरनिर्वाह करावयाचा. समाजाने बाजूला सारलेली, खऱ्या प्रेमाच्या ओलाव्यास मुकलेली, अनेक रोगांचे आश्रयस्थान

झालेली ही दुर्दैवी स्त्री! त्यात आणखी विशेष हे की एकदा ह्या गर्तेत ती जाऊन पडली की तिलाही त्यातून वर यावेसे वाटत नाही.[१] सुधारलेल्या विसाव्या शतकातसुद्धा हा वर्ग कायम असून त्याला अधिक संघटित स्वरूप प्राप्त झाले आहे. आमच्या देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर मुलींचा व्यापार करणारे हरीचे लाल आहेत! ह्या पतितावस्थेतून केव्हातरी स्त्री वर येईल का?

सुधारणेच्या वाटचालीबरोबर मनुष्य आपली ज्ञानक्षेत्रे वाढवू व व्यापकही करू लागला. कुठे चित्रकलेची वृद्धी कर तर कुठे वाङ्मयाची निर्मिती कर तर केव्हा विश्वाचे गूढ उकलण्याचा प्रयत्न करून तत्त्वज्ञानाची निर्मिती कर. तत्त्वज्ञानाच्या जोडीला इतरही शास्त्रांची प्रगती झाली. पण ह्यात स्त्रीला फार थोडा हातभार लावता आला. मातीच्या भांड्यावर चित्रे चितारण्यापलीकडे तिने फारशी कलोपासना केली नाही. भास्कराचार्यांच्या लीलावतीसारख्या अपवादात्मक स्त्रिया सोडल्यास सर्वसामान्य स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादितच राहिले. धार्मिक विधींतसुद्धा स्त्रियांना क्वचितच भाग घेता येई. आमच्याकडे मात्र यज्ञाकरिता सोमरस पिळण्यापासून तो आजवर हरएक धर्मकृत्य 'दम्पती'ने मिळून केले पाहिजे अशी शास्त्राज्ञा आहे.[२]

निरनिराळ्या प्राचीन संस्कृतींमध्ये स्त्रीचे स्थान

असे हे सर्वसामान्य विवेचन केल्यावर आजपर्यंत ज्या निरनिराळ्या संस्कृती उदयास आल्या त्यांमध्ये स्त्रीचे स्थान काय होते ते पाहू.

बॅबिलोनिअन संस्कृतीमध्ये पितृसत्ताक, क्वचित् मातृनामी कुटुंब आढळते व तेथेसुद्धा मामाच्या हातात सर्व कारभार असतो. कुटुंबपद्धती मातृनामी होती. पण पत्नीचे रक्षण व पालनपोषण करण्याची जबाबदारी पतीवर असे. तसेच काही विशिष्ट परिस्थितीत तिला आपली मालमत्ता विकता येई. उद्योगधंद्यातही ती भाग घेऊ शके. ग्रीक पित्याला हरएक प्रकारचे कायदेशीर व धार्मिक अधिकार असत. कुटुंबातील पत्नी, मुले व गुलाम ह्यांना एका पातळीवर वागविले जाई. ग्रीक नगरराज्यांपैकी अथेन्समध्ये मुलींना जेमतेम शिक्षण देत असत परंतु स्पार्टामध्ये मुलींच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था होती. मात्र 'Hetaerae' (सुसंस्कृत वेश्या) म्हणून जो अल्पसा स्त्रीवर्ग असे तो बराच हुशार असून वेळेला पुरुषांना सल्लामसलत देण्याचे काम करीत असे. ग्रीक तत्त्वज्ञांपैकी प्लेटो हा फार ध्येयवादी होता. त्याला स्त्रीपुरुष असा भेद केलेला पसंत नसे. उभयतांचे हक्क समान व कर्तव्येही समान, असा त्याचा ध्येयवाद होता. त्याच्या उलट ॲरिस्टॉटलच्या मते पुरुष हा श्रेष्ठ व पत्नीने त्याच्या कह्यात असले पाहिजे. ग्रीक संस्कृतीच्या पाठोपाठ

---

१. ४२५ वेश्यांची पाहाणी केली. त्यांपैकी बऱ्याचजणी म्हणाल्या की, "आम्हाला हे मोकळे जीवन आवडते." – ए स्टडी ऑफ् प्रॉस्टिट्यूट्स इन् बॉम्बे – एस. डी. पुणेकर, पान १९५

२. ऋग्वेद VIII ३१.५ व VIII २७.७

ह्या प्राथमिक अवस्थेतून मानवी जीवनाला थोडीफार स्थिरता येण्यास हवामान अधिक समशीतोष्ण व्हावे लागले आणि तो बदल होईपर्यंत हजारो वर्षांचा काळ निघून गेला. मानव स्थायिक झाल्यानंतर हळूहळू समाजात दोन वर्ग निर्माण झाले. श्रमजीवी व राज्यकर्त्यांचा वर्ग. कालांतराने त्यात आणखी एका वर्गाची भर पडली. ती म्हणजे बुद्धिजीवी अगर मध्यम वर्ग. वर्गनिर्मितीबरोबर स्त्रीच्या जीवनात वर्गावर्गानुसार निरनिराळे बदल झाले. श्रमजीवी वर्गातील स्त्री ही श्रमजीवीच राहिली. पूर्ववत तिला दोन आघाड्या संभाळाव्या लागत. पिता अगर पती यांच्या कामात सहभागी होऊन आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता मदत करणे व निसर्गाने टाकलेल्या अपत्यजन्म आणि बालसंगोपन ह्या जबाबदाऱ्या पार पाडीत राहाणे हेच स्त्रीचे रुळलेले जीवन होते. त्यामुळे त्याही अवस्थेत तिचे अवलंबित्व कायम राहिले.

मानवी इतिहास हा सदा संघर्षाने भरला आहे. त्या संघर्षात जो समाज विजयी होई तो जित समाजातील स्त्रियांना आपले गुलाम बनवीत आला आहे. ह्या स्त्रियांना आपल्या सुखोपभोगार्थ राबविणे म्हणजे पुरुषार्थाचे लक्षण समजले जाई. किंबहुना जेत्याशी आपले सख्यसंबंध राहाण्यासाठी जित लोक आपल्या कन्याही अर्पण करीत. सुमित्रा–दशरथ, हिडिंबा–भीम, जोधपूरची कन्या व अकबर ही उदाहरणे आपल्या नजरेसमोर आहेत. ह्यामुळे जित स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम असे.

राज्यकर्ते आदिकरून समाजात जो सरंजामी वरचा वर्ग उदयास आला त्या वर्गाला उदरनिर्वाहाकरिता प्रत्यक्ष शारीरिक कष्ट करण्याची जरुरी नसे. राज्यरक्षण, उद्योगधंदे, कलासंवर्धन वगैरे वरच्या दर्जाची कामे ह्या वर्गाकडे आली. अर्थातच हा वर्ग अधिक सधन व सुखवस्तू बनला. त्या वर्गाला समाजात मानप्रतिष्ठा, सवलती, सुखसाधने उपलब्ध झाली. ह्याचा फायदा त्या वर्गातील स्त्रीलासुद्धा झाला. अतःपर तिला शारीरिक कष्ट करण्याची जरुरी राहिली नाही. तिचे कार्यक्षेत्र घरापुरते नव्हे घराच्या आतच मर्यादित झाले. अनुषंगाने तिच्यावरील बंधनेही वाढू लागली. बंधनांची पराकाष्ठा म्हणजे तिला गोषात राहावे लागले. वैदिक ब्रह्मवादिनी भरसभेत विश्वोत्पत्ती-सारख्या गंभीर विषयांवर पुरुषांबरोबर चर्चा करू शके. तीच महाभारतकालात दरबारामध्ये बसताना पडद्याआड बसू लागली. कण्वाश्रमात मुक्तविहार करणारी शकुंतला दुष्यंतपत्नी म्हणून राजदरबारी प्रवेश करते तेव्हा ती अवगुंठित असते.

स्त्री उपभोग्य वस्तु–वेश्यावर्गाचा उदय

समाजाच्या ह्या अवस्थेमध्ये वरिष्ठ वर्गाचा स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोण बदलला. जीवनसंग्रामात आपणास साथ देणारी जोडीदारीण हे तिचे स्थान नष्ट होऊन उपभोग्य वस्तु ह्या निकृष्टावस्थेपर्यंत ती अवनत झाली. म्हणूनच वेश्यावर्ग निर्माण झाला. केवळ पुरुषाच्या विषयवासनेचे स्थान बनून स्वतःचा उदरनिर्वाह करावयाचा. समाजाने बाजूला सारलेली, खऱ्या प्रेमाच्या ओलाव्यास मुकलेली, अनेक रोगांचे आश्रयस्थान

झालेली ही दुर्दैवी स्त्री! त्यात आणखी विशेष हे की एकदा ह्या गर्तेत ती जाऊन पडली की तिलाही त्यातून वर यावेसे वाटत नाही.[1] सुधारलेल्या विसाव्या शतकातसुद्धा हा वर्ग कायम असून त्याला अधिक संघटित स्वरूप प्राप्त झाले आहे. आमच्या देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर मुलींचा व्यापार करणारे हरीचे लाल आहेत! ह्या पतितावस्थेतून केव्हातरी स्त्री वर येईल का?

सुधारणेच्या वाटचालीबरोबर मनुष्य आपली ज्ञानक्षेत्रे वाढवू व व्यापकही करू लागला. कुठे चित्रकलेची वृद्धी कर तर कुठे वाङ्मयाची निर्मिती कर तर केव्हा विश्वाचे गूढ उकलण्याचा प्रयत्न करून तत्त्वज्ञानाची निर्मिती कर. तत्त्वज्ञानाच्या जोडीला इतरही शास्त्रांची प्रगती झाली. पण ह्यात स्त्रीला फार थोडा हातभार लावता आला. मातीच्या भांड्यावर चित्रे चितारण्यापलीकडे तिने फारशी कलोपासना केली नाही. भास्कराचार्यांच्या लीलावतीसारख्या अपवादात्मक स्त्रिया सोडल्यास सर्वसामान्य स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादितच राहिले. धार्मिक विधीतसुद्धा स्त्रियांना क्वचितच भाग घेता येई. आमच्याकडे मात्र यज्ञाकरिता सोमरस पिळण्यापासून तो आजवर हरएक धर्मकृत्य 'दम्पती'ने मिळून केले पाहिजे अशी शास्त्राज्ञा आहे.[2]

निरनिराळ्या प्राचीन संस्कृतींमध्ये स्त्रीचे स्थान

असे हे सर्वसामान्य विवेचन केल्यावर आजपर्यंत ज्या निरनिराळ्या संस्कृती उदयास आल्या त्यांमध्ये स्त्रीचे स्थान काय होते ते पाहू.

बॅबिलोनिअन संस्कृतीमध्ये पितृसत्ताक, क्वचित् मातृनामी कुटुंब आढळते व तेथेसुद्धा मामाच्या हातात सर्व कारभार असतो. कुटुंबपद्धती मातृनामी होती. पण पत्नीचे रक्षण व पालनपोषण करण्याची जबाबदारी पतीवर असे. तसेच काही विशिष्ट परिस्थितीत तिला आपली मालमत्ता विकता येई. उद्योगधंद्यातही ती भाग घेऊ शके. ग्रीक पित्याला हरएक प्रकारचे कायदेशीर व धार्मिक अधिकार असत. कुटुंबातील पत्नी, मुले व गुलाम ह्यांना एका पातळीवर वागविले जाई. ग्रीक नगरराज्यांपैकी अथेन्समध्ये मुलींना जेमतेम शिक्षण देत असत परंतु स्पार्टामध्ये मुलींच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था होती. मात्र 'Hetaerae' (सुसंस्कृत वेश्या) म्हणून जो अल्पसा स्त्रीवर्ग असे तो बराच हुशार असून वेळेला पुरुषांना सल्लामसलत देण्याचे काम करीत असे. ग्रीक तत्त्वज्ञांपैकी प्लेटो हा फार ध्येयवादी होता. त्याला स्त्रीपुरुष असा भेद केलेला पसंत नसे. उभयतांचे हक्क समान व कर्तव्येही समान, असा त्याचा ध्येयवाद होता. त्याच्या उलट ॲरिस्टॉटलच्या मते पुरुष हा श्रेष्ठ व पत्नीने त्याच्या कह्यात असले पाहिजे. ग्रीक संस्कृतीच्या पाठोपाठ

१. ४२५ वेश्यांची पाहाणी केली. त्यांपैकी बऱ्याचजणी म्हणाल्या की, "आम्हाला हे मोकळे जीवन आवडते." –ए स्टडी ऑफ् प्रॉस्टिट्यूट्स इन् बॉम्बे–एस. डी. पुणेकर, पान १९५

२. ऋग्वेद VIII ३१.५ व VIII २७.७

युरोपमध्ये रोमन संस्कृती उदयास आली. रोमन संस्कृतीचा काल खि. पू. ७५४ पासून दीड हजार वर्षांपर्यंत होता. तेथे विवाहानंतर कन्या पतीच्या घरी जाई तेव्हा तिच्यावर त्याला संपूर्ण अधिकार गाजविता येत असे. नंतर हळूहळू विवाहाला तिच्या अनुमतीची आवश्यकता मान्य झाली. पतीपत्नीचे न पटल्यास तिला घटस्फोट घेता येऊ लागला. तिला वाटल्यास विभक्त राहून पोटगी मागता येत असे. असे करता करता त्या संस्कृतीच्या उत्तरकाळात स्त्री ही कायद्याने पूर्ण स्वतंत्र झाली. पण अनेक कारणांमुळे ही रोमची स्थिती दीर्घ कालपर्यंत टिकली नाही व रोमन साम्राज्यही लौकरच संपुष्टात आले.

त्याच सुमारास ख्रिश्चन धर्माचा उदय झाला आणि त्या धर्माने स्त्री ही पुरुषाला मोह घालणारी, ॲडमला 'मना केलेले फळ' खाण्यास लावणारी ईव्ह आहे अशी विचारसरणी प्रस्तुत केली. त्यामुळे रोमन कायद्याने स्त्रीला दिलेले हक्क काढून घेण्यात आले. जरी ख्रिश्चन चर्चने प्रियाराधन व विवाहास कन्येच्या अनुमतीची आवश्यकता मान्य केली असली तरी ती पूर्णपणे परावलंबी होती. ह्या कालातील युरोपमधला सरदार पराकाष्ठेचे स्त्री-दाक्षिण्य दाखवीत असला व तिच्या रक्षणार्थ प्राणार्पण करण्यास तयार असला तरी ही प्रथा फक्त वरच्या वर्गापुरतीच मर्यादित होती. आमचे रजपूत व मराठे सरदार नव्हते का स्त्रीच्या पातिव्रत्याच्या संरक्षणार्थ स्वतःचे प्राण पणास लावीत?

सोळाव्या शतकात ख्रिश्चन धर्माच्या सुधारणाचळवळीची सुरुवात झाली. ह्या चळवळीमुळे प्रॉटेस्टंट पंथ उदयास आला आणि तदनंतर स्त्रीविषयक दृष्टिकोणही अनुकूल झाला. तिला क्रूरता आदिकरून काही कारणांकरिता घटस्फोट घेता येऊ लागला. परंतु एकंदरीने तिला कायदेशीर हक्क फारसे नव्हते.

फ्रेंच राज्यक्रांतीने दिलेला हादरा

धर्मसुधारणाचळवळीपूर्वी पंधराव्या शतकात आणखी एक महत्त्वाची घटना घडून आली. इ. स. १४४० मध्ये मुद्रणकलेचा शोध लागला. त्यातच कॉन्स्टेंटिनोपल हे शहर मुसलमानांनी इ. स. १४४३ मध्ये जिंकल्यामुळे ख्रिश्चन पंडित युरोपभर सर्वत्र पसरले. त्यांनी ठिकठिकाणी विद्येचा प्रसार केला. त्यामुळे युरोपियन संस्कृतीला उजाळा आला. विविध विचारप्रसारांनी मानवी हक्कांबद्दल जागृती झाली. त्याचे पर्यवसान फ्रेंच राज्यक्रांतीत झाले. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ह्यांची घोषणा १७८९ मध्ये फ्रेंच आमजनतेने करून त्याला अनुकूल अशी राजवट बनविण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या आधीच स्त्री ही थोडीफार जागृत होत होती. परंतु तिलाही खडबडून हादरा दिला असा ह्या क्रांतीनेच. १७९२ मध्ये मेरी वुलस्टोनेक्राफ्ट ह्या बाईने "Vindication of the Rights of Women" (स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन) हा ग्रंथ प्रसिद्ध करून अठराव्या शतकात स्त्रियांना आपल्या हक्कांबद्दल जाणीव करून दिली. ह्या ग्रंथाचे व ग्रंथकर्तीचे स्वागत त्या काळात कसे झाले असेल ह्याची वाचकांनीच कल्पना करावी.

औद्योगिक क्रांतिपूर्व काळात श्रमजीवी स्त्रियांचा नाव घेण्यासारखा व्यवसाय

म्हणून चळवळ करू लागली. या संघटनेमुळे ह्या चळवळीला धार चढली. पण पार्लमेंटच्या मतदारगटात ती समाविष्ट होईना. १९०७ मध्ये फक्त स्थानिक संस्थांच्या मतदारगटात तिला स्थान मिळाले. १९१४ त महायुद्ध सुरू झाले आणि स्त्रियांनी स्वतःचा प्रश्न मागे टाकून राष्ट्राच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ तनमनधन अर्पण करण्यास सुरुवात केली. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरिता नाही का स्त्रिया पुढे आल्या?

पहिल्या महायुद्धाने केलेली क्रांती : मतदानाचा हक्क

१९१४ ते १९१८ पहिले महायुद्ध झाले. स्त्रीच्या दृष्टीने ह्या काळात व तदनंतरही अनेक घडामोडी घडून आल्या. १९१७तल्या रशियन क्रांतीनंतर जी साम्यवादी समाजरचना झाली तिने स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य व समानता दिली. विवाहनोंदणी व घटस्फोटास कोर्टाच्या मान्यतेची अनावश्यकता, गर्भपातास मंजुरी, पुरुषाच्या बरोबरीने जडमारी शारीरिक कामे करणे वगैरे बराच अतिरेकही करण्यात आला. पण कालांतराने अनिष्ट परिणाम दिसून आल्याबरोबर तेथे सुधारणाही झाली.

महायुद्धाचा आणखी एक परिणाम म्हणजे इंग्लंडमध्ये १९२१-२२च्या कायद्यानी स्त्रियांना मतदानाचा व उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क दिला गेला. युरोप व अमेरिकेतही हळूहळू ह्या दृष्टीने वाटचाल झाली. मात्र अजूनही स्वित्झर्लंड-सारख्या पुरोगामी लोकशाही देशात स्त्रियांना मतदान करता येत नाही. १९२१ मध्ये भारताला ज्या सुधारणा ब्रिटिश सरकारने दिल्या त्यांत स्त्रियांच्या मताच्या हक्काला मान्यता देण्यात आली होती. महायुद्धातील पराभवामुळे जर्मनीत लोकशाही स्थापन झाली. पण ती फार दिवस टिकून राहिली नाही. हिटलरने आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी श्रमजीवी वर्गातल्या स्त्रियांना राबवयास लाविले परंतु वरच्या हुद्द्यावरून मात्र त्यांना काढून टाकले.

बौद्धिक उपासमार दूर करण्याकरिता लढा

केवळ राजकीय आघाडीवरच नव्हे तर इतर क्षेत्रातही स्त्रीला हक्कसंपादनाकरिता लढा द्यावा लागला. फ्लॉरेन्स नाइटिंगेलने म्हटले आहे, "जर आपणांस खावयास अन्न नसले तर आपण किती ओरड करतो आणि ती जगाच्या दुसऱ्या टोकाला ऐकू जाते. 'उपासमारीने मृत्यू' असा ठळक मथळा देऊन वर्तमानपत्रे त्याची प्रसिद्धी करतात! परंतु तेच 'उपासमारीने विचाराचा मृत्यू किंवा नैतिक चळवळीचा मृत्यू', असा मथळा टाइम्समध्ये द्या की सारे वाचक टक लावून वाचतील आणि हसत सुटतील असा हा

१८७० पर्यंत इंग्लंड आदिकरून पाश्चात्य देशात स्त्रियांची जी बौद्धिक of the होत होती तिला उद्देशून वरील उद्गार आहेत. विद्यापीठांच्या परीक्षेस स्त्रियां टराव्या यकर्तीचे.

१. विमेन — विनिंकड हॉल्टबी पा. ५३

प्रथमतः वसता येऊ लागले तेव्हा त्यांच्यात 'आत्मविश्वास व स्वतंत्रवृत्ती निर्माण होईल आणि स्वतःची दुय्यम पायरी त्या विसरतील' अशी भीती व्यक्त करण्यात आली. विद्यापीठाची द्वारेसुद्धा सहजी उघडली गेली नाहीत. स्त्री लढतच राहिली आणि त्या लढ्याचे सार्थक म्हणजे शास्त्रीय, तांत्रिक व इंजिनिअरिंग क्षेत्रातही ती शिरू लागली आहे. परंतु स्त्रियांच्या समान हक्कांचा यक्षप्रश्न तिने अगर विज्ञानशास्त्राने सोडविला आहे काय ? विज्ञानशास्त्रे, तांत्रिकशास्त्रे (टेक्नॉलॉजी), राजकारण, संरक्षणखाते ही आजवर केवळ पुरुषाची क्षेत्रे म्हणून समजण्यात आली होती. त्यापैकी एकेका क्षेत्रात ती आज कुठे आहे आणि मानवतेच्या प्रगतीला ती कितपत हातभार लावू शकते हे थोडक्यात पाहू.

स्त्रीपुरुष-समानतेचे युग

राजकारणाचाच प्रथम विचार करू. भारत हा सर्वांत फार विस्तृत लोकशाही देश. त्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रीला समानता देण्यात आली. कोणत्याही क्षेत्रात तिला मज्जाव नाही. पंतप्रधानकीपासून तो इतर अनेक महत्त्वाच्या पदावर ती आज विराजमान झालेली दिसते. पण भारतातल्या ५० कोटी जनतेचा हा किती अल्पांश आहे हे आकड्याने सिद्ध करण्याची जरुरी नाही. ज्यांना परिस्थिती, शिक्षण व संधी अनुकूल आहे त्या पुढे येत आहेत. मात्र त्या करीत असलेल्या त्यांच्या कार्याचे मूल्यमापन येथे करणे पुरेशा माहितीच्या अभावी अयोग्य व अकाली ठरेल.

इतर लोकशाही देशांतील स्त्रियांच्या राजकीय कामगिरीचे मूल्यमापन १९५५ मध्ये युनेस्कोच्या समितीने केले होते. 'पुरुषांइतक्याच स्त्रियाही मतदानाचा अधिकार उपयोगात आणतात. परंतु उमेदवार म्हणून फार कमी संख्येने उभ्या राहातात व निवडून आल्यानंतरही त्या त्या देशाच्या लोकसभेत त्यांनी आपले कार्य स्त्रिया व मुले इतकेच मर्यादित ठेवले आहे. म्हणजे मतदानाचा हक्क मिळविण्याकरिता पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वी ज्या काही ब्रिटिश स्त्रियांनी प्राणार्पण केले त्यांच्या आजच्या वंशज तो अधिकार मिळालेला असूनही फारसा उपयोग करीत नाहीत. राजकारणास स्त्रिया अपात्र की त्यांच्याआड पुरुषवर्ग येत आहे ? दुसऱ्या प्रश्नास वरील पाहाणीत होकारार्थी उत्तर दिले आहे.'[1]

दुसऱ्या महायुद्धानंतर इस्राएल हे एक नवे राष्ट्र उदयास येत आहे. युरोपमधील ख्रिश्चन राष्ट्रांमध्ये ज्यू लोकांबद्दल सर्वसाधारणतः असूयेची व थोडी शत्रुत्वाची भावना येते. अशा देशांतल्या निर्वासित ज्यू लोकांचे हे स्वतंत्र राज्य आहे. तेथे अपत्यसंगोपनाची जबाबदारी सरकारने आपणाकडे घेतली आहे. शेतकरी होताक्षणीच त्याची जोपासना साधिकरीत्या केली जाते. आईवडिलांना दररोज मुलाजवळ घालविता येतो. अशा तऱ्हेने मुक्त झालेली स्त्री सर्व क्षेत्रांत—

[1] ...टिकल रोल ऑफ विमेन — युनेस्को पा. १२३-२४

संरक्षक दलातही — पुरुषांबरोबर काम करीत आहे. पण त्याचे दूरगामी परिणाम कोणते ते अजमावण्यास थोडा कालावधी जावा लागेल.

भारतातील परिस्थितीविषयी बोलावयाचे तर स्वातंत्र्योत्तर काळात विद्यार्थिनींची संख्या वाढत आहे. १९४७ साली विद्यापीठात २ लक्ष ४४ हजार मुलगे व २३ हजार मुली शिकत होत्या तर १९६६ साली त्यांची संख्या १६ लक्ष ८९ हजार व ३ लक्ष २१ हजार झाली.' स्त्रियांच्या शिक्षणाच्या वाढीबरोबर त्यांच्यामधील बौद्धिक श्रम करणाऱ्यांना अधिक वाव मिळत आहे.

संततिनियमनामुळे स्वातंत्र्य

विसाव्या शतकातील आणखी एका महत्त्वाच्या घटनेचा स्त्रीच्या जीवनाशी फार निकट संबंध आहे आणि ती म्हणजे कृत्रिम उपायांनी संततिनियमन करणे ही होय. आपण लोकसंख्येच्या वाढीला निरोधन करण्याच्या दृष्टीनेच कुटुंबनियोजनाचा विचार करतो. तसे पाहिले तर लोकसंख्या रोखून धरण्याकरिता पूर्वापार अनेक मार्ग चालत आलेले आहेत. सामाजिक व धार्मिक अशी पतीपत्नीसंबंधावर अनेक नियंत्रणे होती. मुले जन्मल्यानंतर वर्ष दोन वर्षेपर्यंत त्याला दुग्धपान करीत राहिल्याने गर्भधारणा होत नाही अशी समजूत होती व भारतात अजूनही प्रचलित आहे. ह्या योगाने निश्चित गर्भधारणा होणार नाही असे मात्र म्हणता येत नाही.

आज भारतालाच काय पण सर्व जगाला भेडसावणारा एक प्रश्न म्हणजे वाढत्या लोकसंख्येचा. ह्या प्रश्नाकडे प्रथम लक्ष वेधण्याचे श्रेय इंग्लंडमधील धर्मगुरू थॉमस माल्थसकडे जाते. त्याने १७९८मध्ये आपला प्रबंध प्रसिद्ध केला. १८२२मध्ये "नैतिक नियंत्रण हे मनुष्यस्वभावाशी विसंगत आहे. तेव्हा प्रतिबंधक उपाय हाच एक मार्ग आहे." असे उद्गार फ्रॅन्सिस प्लेसनी काढले. १८३२ मध्ये डॉ. नोल्टन ह्यांनी 'दि प्रायव्हेट कम्पॅनियन ऑफ यंग मॅरिड पीपल' ही पुस्तिका प्रसिद्ध केली. त्याच्या ४००० प्रती लगेच संपल्या. पुढे ह्या पुस्तिकेवरून खटलाही झाला. ब्रॅडला व ॲनी बेझंट हे लोकांचा रोष पत्करूनही कुटुंबनियोजनाचा प्रचार करीत होते. पहिल्या महायुद्धानंतर संततिनियमनास लोकमत अनुकूल होऊ लागले. त्याच सुमारास भारतात व विशेषतः महाराष्ट्रात प्रा. र. धों. कर्वे यांनी संततिनियमनाच्या प्रचारास सुरुवात केली. मिसेस सॅंगर ह्या बाईंने १९२२ मध्ये ह्या प्रचाराकरिता जगभर दौरा काढला. त्यात भारतालाही भेट दिली. परंतु महात्मा गांधी ह्यांचा वसून विरोध असल्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेपर्यंत त्या चळवळीला सरकारी पाठिंबा मिळाला नव्हता. आज ह्या बाबतीतले सरकारचे प्रयत्न सर्वश्रुत आहेत. परंतु स्वातंत्र्यानंतरची पहिली दहा वर्षे फुकट घालविल्याचे परिणाम आज दिसत आहेत.

संततिनियमनाचा विचार सर्वजण लोकसंख्येच्याच दृष्टिकोणातून करतात. परंतु त्यामुळे स्त्रीच्या जीवनात कोणती क्रांती झाली आहे, ही गोष्ट फारच थोड्यांच्या लक्षात येते. मानवतेच्या जन्मापासून जीवशास्त्राच्या नियमानुसार ती ज्या बंधनांमुळे असहाय बनली होती त्यातून ती आज स्वतंत्र झाली. आपल्याला हवी तेव्हा व तितक्याच अपत्यांना जन्म देणे तिच्या हातात आले आहे. मातृत्व ही ऐच्छिक बाब झाली आहे. मोजकी अपत्ये झाल्याने त्यांचे संवर्धन अधिक चांगल्या प्रकारे करता येते. तिच्या प्रकृतीवरही इष्ट परिणाम झाला असून तिचे आयुर्मान वाढले आहे. मुले शाळेत जाऊ लागण्याइतकी मोठी झाली की तिला अधिक फुरसत मिळते आणि हा फुरसतीचा वेळ वरच्या वर्गातील स्त्री इतर कार्याकरिता देऊ शकते तर मध्यम व खालच्या वर्गातील स्त्री अशा वेळात अर्थोत्पादन अधिक सुलभतेने करू शकते. अमेरिका आदिकरून पाश्चात्त्य देशांत तरी आज अशी स्थिती आहे.

नव्या परिस्थितीतील संधी आणि समस्या

अमेरिकेत आयुर्मान बरेच दीर्घ आहे. तसेच तेथील सुबत्तेमुळे आरोग्यमान अधिक त्यामुळे अर्थोत्पादनाची सुरुवात करण्यास लागणारे वयोमान ५० पर्यंतही असू शकते. तीच गोष्ट सेवानिवृत्तीची. अशा परिस्थितीत कुटुंबातील मुले मोठी झाली की बाईला मनात आणल्यास नोकरीस सुरुवात करता येते. याचा अर्थ असा नव्हे की अविवाहित अगर लहान मुलांच्या माता तेथे काम करीत नाहीत. तोही वर्ग आहेच. पण भारतात सरकारी नोकरीची सुरुवात अधिकात अधिक २५ पर्यंतच करता येते. त्यामुळे आज मध्यम वर्गातील स्त्री, एस. एस. सी. अगर पदवीधर झाल्याबरोबर नोकरीचा विचार करू लागते. नोकरी धरल्यास वेळेला तिचे लग्न लांबणीवर पडते, अगर सर्वच कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर पडते. कर्त्या वडील मुलाप्रमाणे ती आनंदाने ही जबाबदारी स्वीकारते. भावंडे मोठी होतात. पण ही एकाकी होऊन मागे पडते. अशा प्रौढ कुमारिका कितीतरी दिसतात. ज्यांचे लग्न होते त्यांच्यापुढील समस्या म्हणजे केलेली नोकरी सोडावीशी वाटत नाही, आणि मुलांची तर आबाळ होते. त्यातून एकत्र कुटुंब असून घरी कोणी पाहाण्यास असले तर मुलांची चिंता कमी असते. पण अशा सर्वच भाग्यवान असतात असे नाही. येथे संततिनियमन तिला मदत करते. एक-दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास जरूर तर शस्त्रक्रिया करूनही ती मोकळी होते. कारण आजकाल तीच गोष्ट प्रशंसनीय समजली जाते. एकूण काय की संततिनियमनामुळे तिला आपले जीवन हवे तसे आखता येते.

संततिनियमनाचा गैरफायदा घेतला जात नसावा असे म्हणणे धाष्ट्र्याचे होईल. अग्नीचा उपयोग विधायक व विध्वंसक दोनही मार्गांनी करता येतो. तसेच कोणत्याही शास्त्रीय शोधाबद्दल म्हणता येईल. तोच नियम संततिनियमाला लागू पडतो. जर समाजाने विशिष्ट नैतिक मूल्ये घट्ट धरून ती शिक्षणद्वारे प्रसृत केली—नव्हे करणे

त्याखेरीज सारा लग्नखर्च नवरदेवाला करावा लागे. मुलीच्या घरी लग्न करावयाचे झाले तरी लग्नखर्चाकरिता धान्य, कपडालत्ता, व इतर खर्चास रोख पैसे नवरदेवाकडून मुलीच्या बापास 'देज' म्हणून मिळत असत. धान्यात ज्वारी, गहू, तांदूळ, डाळ, गूळ इत्यादी वस्तू असत आणि त्या किती लागतात त्याचा निरख ठरलेला असे. तसेच कपड्यालत्त्यात मुलीसाठी लुगडी, चोळ्या, मानपानाची लुगडी इत्यादी कपडे असत. शिवाय किराणा माल, वाजंत्री इत्यादीसाठी रोख पैसे लागत तेही मिळत असत. अशा प्रकारे लग्नाचा सर्व खर्च नवरदेवास करावा लागे. मुलीच्या बापाला लग्नासाठी पैचाही खर्च नसे. उलट थोडीफार प्राप्तीच असे.

आता ही पद्धती जवळजवळ नाहीशी झाली आहे. आता मुलीच्या बापाला नवरदेवाकडून काही मिळत नाही. हा फरक होण्याची कारणे नीटशी कळत नाहीत. परंतु मुलीचा पैसा घेऊन आपल्या संसाराला लावणे हे कमीपणाचे मानले जाऊ लागले, आणि मुलींचे बाप 'ठेव' वा 'देज' घेईनासे झाले, एवढे खरे. गरीब मुलीचा बापही पैसे न घेता फक्त मुलगी स्वाधीन करू लागला. मुलीचा आणि त्या अनुषंगाने स्त्रीचा कुटुंबातील दर्जा उंचावल्याचेच हे लक्षण मानावे लागेल. कारण एका दृष्टीने पूर्वीचा व्यवहार ही मुलीची विक्रीच होती आणि म्हणूनच मुलीचे पैसे घेणे कमीपणाचे समजले गेले. स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने झाला हा फरक योग्यच म्हणावा लागेल.

परंतु एवढ्यावरच थांबले नाही, तर पारडे पार उलटले. मुलीचा बाप मुलीचे पैसे घेईनासा झाला आणि उलट मुलीसाठी पैसे खर्च करू लागला. आज नवरदेवाला थोडाफार रोख हुंडा, सायकल, घड्याळ, किंवा सोन्याची अंगठी देऊन शिवाय सारा लग्नखर्च मुलीच्या बापास सोसावा लागतो. मुलाची परिस्थिती जेवढी बरी तेवढा हुंडा जास्त द्यावा लागतो. विशेषेकरून मुलगा नोकरदार असेल तर हुंड्याशिवाय भागतच नाही. आर्थिक परिस्थिती बरी नसेल तर मुलाला हुंडा मिळत नाही; उलट येनकेन प्रकारेण मुलीलाच थोडेफार पैसे द्यावे लागतात. तात्पर्य मुलीकडून हुंडा न घेणे हे गरिबीचे म्हणून कमीपणाचे मानले जाते. त्यामुळे गरीब मुलीच्या बापाची कुचंबणा होऊ लागली आहे.

या पद्धतीने मुलगी नवऱ्याच्या घरी गेल्यानंतर तेथे तिचा दर्जा पूर्वीच्या मानाने उंचावण्यास मदत झाली की नाही हे सांगणे कठीण आहे. कदाचित झाली असेल. कारण पूर्वीच्या पद्धतीत एका अर्थाने एखादी बटीक विकत आणावी तशी नवरी विकत आणली जात असे; आणि त्या कारणाने थोडीफार बटकीसारखी वागणूक मिळत असणे असंभवनीय नाही. आता परिस्थिती बदलली. मुलीला पैसे देण्याऐवजी मुलगी स्वतः-बरोबर पैसे घेऊन नवऱ्याच्या घरी जाऊ लागली. याचा अर्थ नवऱ्याघरी तिला पूर्वीपेक्षा मानाने वागणूक मिळावयास हवी. परंतु तिच्या बापाने हुंडा दिला तो तिचे लग्नच होईना म्हणून, नाइलाजाने दिला, असाही अर्थ लावणे अशक्य नाही. तात्पर्य, हुंडा घेऊन घरात आली एवढ्याच कारणाने मुलीचा दर्जा नवऱ्याच्या घरी सुधारलाच असेल असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही.

बापाच्या घरी मुलीची कुचंबणा

मात्र बापाच्या घरी मुलीची परिस्थिती काहीशी अवघडच झालेली असण्याचा संभव आहे. गेल्या काही वर्षांत मुलगे व मुली यांच्या शिक्षणात जी प्रगती झाली त्यावरून हे उघड दिसते. ग्रामीण भागात पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ५०–६० टक्के झाले आहे. परंतु स्त्रियांत ते अजूनही १०–२० टक्के एवढेच आहे. ग्रामीण भागातील शाळातून सुद्धा मुलींचे प्रमाण अजून तिसरा किंवा चवथा हिस्साच आहे. ग्रामीण भागात मुलांच्या शिक्षणाकडे जारीने लक्ष देण्यात येत आहे. मुलाला शिकवून कोठेतरी नोकरीस लावून द्यावा या हेतूने मुलाच्या शिक्षणावर लक्ष आहे. परंतु मुलीस शिकवून काय उपयोग? ती दुसऱ्याच्या घरी जाणार आणि जाताना हुंडा घेऊन जाणार; मग त्यात आणखी तिच्या शिक्षणावर खर्च कशाला करा? या भावनेने अजूनही मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्षच आहे.

लग्नाचे वय वाढल्यामुळेही अविवाहित मुलींची तिच्या बापाच्या घरी काहीशी केविलवाणीच परिस्थिती आहे. पूर्वीच्या काळी लहानपणीच वरसंशोधनास सुरुवात होत असल्याने योग्य वराकरता खटपट करण्यास भरपूर फुरसत असे. आता मुलगी वयात आल्याखेरीज कोणी लग्नाच्या खटपटीस लागत नाही. त्यामुळे एकेक वर्ष जाईल तसे बापावर मुलीच्या लग्नाचे दडपण येते. त्यामुळे शेवटी कमीअधिक खर्च करून मुलगी कशीतरी उजवावी म्हणून तो धडपडीस लागतो. अशा परिस्थितीत उपवर मुलींची परिस्थिती साहजिकच केविलवाणी झालेली असते.

मुलीला सासरी मिळणारी वागणूक : पूर्वी व आता

लग्न होऊन नवऱ्याच्या घरी गेलेल्या मुलीला सासरी मिळणाऱ्या वागणुकीत मात्र आता पुष्कळच फरक पडला आहे. पूर्वीच्या कुटुंबातील सून म्हणजे शेतकामासाठी विकत घेतलेली एक मोलकरीणच होती. पूर्वी द्विभार्याप्रतिबंधक कायदाही नव्हता. त्यामुळे ज्याच्या घरी शेती जास्त आहे तो दोन किंवा तीन बायकासुद्धा करीत असे. या बायका म्हणजे शेतीत राबणारी हक्काची माणसे होती. सासूसुद्धा सुनेला नेहमी कामात ठेवून राबवीत असे. काम नसले तरी सुनेने दुपारी झोप घेतलेली सासूला खपत नसे. सुनेने सकाळी उठल्याबरोबर तोंड धुतलेले सासूस चालत नसे. जेवणापूर्वीच सुनेने तोंड धुवावे असे होते. आजची नवविवाहित सून सकाळी उठल्याबरोबर तंबाखूने मिश्रीने दात घासून, तोंड धुऊन, चहा घेऊन मग कामास लागते. पूर्वी चहा नव्हताच. पहाटे कोंबडा आरवला की लगेच उठून सुना तशाच दळणास बसत. आता खेडोपाडी पिठाच्या गिरण्या झाल्याने दळणाचे काम सोपे झाले आहे. कांडण अजून पुष्कळ ठिकाणी घरीच करतात. परंतु तेही अधिकाधिक पिठाच्या गिरणीतील हलरवर जाऊ लागले आहे. दळणकांडणाचे काम कमी झाल्याने सुनांना सकाळी उठून तोंड धुण्यास आणि चहा घेण्यास फुरसत असते.

सुनेने कोणाशी बोलावयाचे, कोणाशी नाही हे सासूने ठरवावयाचे असे. सुनेला स्वतःच्या नवऱ्याशी सुद्धा बोलण्याची चोरी असे. वडीलधारी बायामाणसे आजही अभिमानाने सांगतात की चार मुले होईपर्यंत आम्ही नवराबायको एकमेकांशी बोलली नव्हतो.

सुनेचे जेवण बहुधा शिळ्या अन्नावरच होत असे. शिळे अन्न नसेल तर तिने ताजी भाकरी खावी असा संकेत होता. तसेच कोणी पाहुणे आले तर मोठ्या कुटुंबात फक्त पुरुषमंडळीपुरतेच चांगले जेवण होत असे. स्त्रियांना सरसकट नेहमीची भाकरी खावी लागे. केवळ सणासुदीलाच स्त्रियांना गोड अन्न मिळत असे.

आज या परिस्थितीत पुष्कळच फरक पडत आहे. त्याला अनेक कारणे आहेत. त्यात द्विभार्याप्रतिबंधक कायदा हे एक महत्त्वाचे कारण आहे. या कायद्यामुळे दुसरी बायको करणे अवघड झाले आहे. बायकोला नीट न वागविली आणि त्यामुळे जर ती नांदेनाशी झाली तर आता दुसरे लग्न करणे तेवढे सोपे नाही याची जाणीव नवीन नवरदेवास झाली आहे. त्यामुळे नव्या नवरीस सासरी मिळणाऱ्या वागणुकीत बराच फरक झाला आहे. शिवाय आता नवराबायकोचे बोलणे होऊ लागले आहे, त्यामुळे एकमेकाना एकमेकांच्या अडचणी कळू लागल्या आहेत. त्यामुळे सासूने सुनेला छळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. मुलगा परगावी नोकरीस असला आणि घरात दुसरा कर्ता पुरुष नसला तर घरचा कारभार सासूऐवजी सुनेच्या हाती जाऊ लागला आहे. आजच्या सासवांच्या मानाने आजच्या सुना थोड्याफार शिक्षण झालेल्या, निदान साक्षर तरी असल्याने सासूचे वर्चस्व कमी होण्यास मदत झाली आहे.

राहणीत नीटनेटकेपणा वाढत आहे

आजच्या स्त्रियांच्या राहणीत नीटनेटकेपणा वाढत आहे. पूर्वी स्त्रिया दररोज वेणीफणी करीत नसत. सणासुदीला किंवा सवड असेल त्या दिवशी वेणीफणी करीत. दररोज वेणीफणी करणे खर्चाला परवडत नसेच शिवाय घरकाम आणि शेतकामाचे पायी सवडही होत नसे. आजच्या स्त्रिया सवड काढून रोजची वेणीफणी करतात. आज कोणी रोज वेणीफणी केली नाही तर तिला आळशी समजतात.

आजकाल साबणाचा वापरही पुष्कळ प्रमाणात सुरू झाला आहे. पूर्वी ग्रामीण स्त्रियांना साबण माहीत नव्हता. लुगडी, चोळ्या इ. धुण्यासाठी त्या वेलफळे, हिंगण किंवा खारी, पांढरी माती वापरीत असत. आजकाल कपडे धुण्याकरता सरसकट साबणाचा वापर सुरू झाला आहे. कपड्याचाच साबण क्वचित अंगालाही वापरतात. डोकीचे केस धुण्याकरिता मात्र पूर्वीप्रमाणे अजूनही शिकेकाईचाच वापर आहे. अंगाला लावण्याचा साबण फक्त दिवाळीलाच वापरतात.

ग्रामीण स्त्रियांच्या पेहरावातही पुष्कळच फरक पडत चालला आहे. पूर्वीच्या स्त्रिया कपाळी कुंकू मोठ्या आकाराचे लावीत. कुंकू कोरडे असे आणि ते मेणावर

लावीत. पंढरपूरचे पिंजरीचे कुंकू चांगले मानले जाई. आजकाल स्त्रियांच्या कुंकवाचा आकार कमी होऊ लागला आहे आणि तरुण मुली कोरड्या कुंकवाऐवजी बाटलीतील ओले गंध लावू लागल्या आहेत.

पेहराव आणि दागदागिने यांतील परिवर्तन

दागिन्यांमध्येही फरक पडत आले. पूर्वी लग्नप्रसंगी मुलीला नवीन दागिने करीत असत. त्यात पायात घालण्यासाठी चांदीचे अगर रुप्याचे १०० भार वजनाचे तोडे व त्यावर २० भार वजनाचे वाळे असत. गळ्यामध्ये सोन्याच्या ९ पुतळ्या अंदाजे दोन सव्वादोन तोळ्यांच्या, त्यावर एक तोळ्याची वज्रटीक आणि मंगळसूत्र घातलेले असे. आता पायातील चांदीचे तोडे मुलींना वेड्यांसारखे वाटू लागल्यामुळे ३०–४० भार वजनाचे चांदीचे पैंजण मुलीला लग्नप्रसंगी घालू लागले आहेत. जुन्या वज्रटिकेला नवीन मुली कुत्र्याचा पट्टा म्हणू लागल्याने गळ्यातील सोन्याच्या दागिन्यात एकदाणी, बोरमाळ, चपलाहार आणि मंगळसूत्र असे दागिने आले आहेत. एकूण जुने जाडजूड दागिने जाऊन नाजूक आणि वजनाला हलके दागिने वापरात येत आहेत.

जी गोष्ट दागिन्यांची तीच कपड्यांची. जुने जाडेभरडे, हातमागाचे कापड कमी होऊन आता त्याऐवजी गिरणीचे बारीक सुताचे तलम कापड प्रचारात येत आहे. पूर्वी लग्नप्रसंगी मुलीला नवीन कपडे म्हणजे साखरपुड्याचे वेळी लुगडे, हळदीचे वेळी हिरव्या रंगाचे लुगडे, लग्नाचे वेळी साडीचे लुगडे आणि साड्याचे वेळी तेलसाडीचे लुगडे अशी चार लुगडी मिळत असत. ही लुगडी साळ्या-कोष्ट्याच्या हातमागावरील असत. त्यांपैकी साडी आणि तेलसाडी ही ठेवणीची लुगडी असत. बाकीची लुगडी नेहमी वापरावयाची असत. ही लुगडी ४० किंवा ६० नंबरी सुताची असत. आता लुगडी कमी होऊन पातळे वापरण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे साखरपुड्याचे पातळ, हळदीचे हिरवे पातळ, लग्नाचे पातळ आणि साड्याचे वेळी शालू किंवा चांगले जरीचे पातळ अशी कापडे नवरीस मिळू लागली आहेत. ही पातळे ८० नंबरी सुताची तलम असतात.

पूर्वी खेडेगावातून ९ वारी म्हणजे १६ हात लांबीची लुगडी गोल म्हणजे बिनकासोट्याने नेसण्याची पद्धत होती. गोल लुगडे नेसून शेतात काम करता येत नसे त्यामुळे शेतकामापुरताच कासोटा घालीत असत. घरात किंवा घराबाहेर पडताना लुगडे गोल नेसलेले असे. आजकाल तरुण स्त्रिया घरात, रस्त्यात किंवा शेतात बहुधा कासोटा घालून जात असतात. ५ ते ६ वारी गोल पातळे फक्त शाळेतील मुली वापरीत आहेत.

पूर्वी खेडेगावात स्त्रिया सरसकट चोळ्या वापरीत असत. चोळीला कटकीचे रेशमी खण असत. आजच्या मुलींचे म्हणणे की चोळीमुळे पोट उघडे राहाते ते आम्हास आवडत नाही. पोलक्याने सर्व पाठपोट झाकले जाते म्हणून चोळ्या कमी होऊन पोलकी प्रचारात येत आहेत. त्यामुळे पूर्वी नव्या नवरीला चोळीचे खण मिळत असत. आता त्याऐवजी जरीचे खण किंवा पोलक्याची कापडे मिळू लागली आहेत.

पायात चालवयाच्या चपलातही फरक झाला आहे. पूर्वीच्या स्त्रिया गावच्या चांभाराकडून करून घेतलेल्या जुन्या मोटेच्या कातड्याच्या वहाणा वापरीत असत. या वहाणांना दोन्ही बाजूला पंखे असून ते वर एकत्र शिवलेले असत. त्यापुढे अंगठा असे. आता तरुण मुली शहरी पद्धतीच्या चपला वापरू लागल्या आहेत. तसल्या चपला खेडेगावातील चांभारांना करता येत नाहीत. त्यामुळे त्या शहरातून आणाव्या लागतात. त्यांच्या दुरुस्तीचे काम तेवढे खेडेगावातील चांभाराकडे राहिले आहे.

चुडे आणि सौभाग्यालंकार

हातातील बांगड्याही बदलत चालल्या आहेत. पूर्वीच्या जाड, भडक रंगाच्या बांगड्या आजच्या स्त्रिया वापरीतनाशा झाल्या आहेत. आता त्यांना नाजूक, नक्षीदार, चमकणाऱ्या बांगड्या लागू लागल्या आहेत. पूर्वी नागपंचमी आणि संक्रांत या निमित्ताने किंवा जवळच्या नातेवाइकाकडे लग्न असले तर त्या निमित्ताने बांगड्या भरल्या जात. आता या निमित्ताने बांगड्या भरतातच; परंतु शिवाय केव्हाही बांगड्या फुटल्या म्हणून भरून घेतात.

पंढरपूर किंवा दुसऱ्या तीर्थांच्या ठिकाणी गेले असता लाखी चुडे घालण्याची पद्धत जुन्या स्त्रियात होती. ती पद्धत आता कमी पडू लागली आहे. त्याऐवजी सोन्याच्या पाटल्या, किंवा बांगड्या घालू लागल्या आहेत. परंतु हातातील सोन्याच्या पाटल्या किंवा बांगड्या नेहमी कोणी अंगावर घालीत नाही. सणासमारंभाचे निमित्तानेच घालतात.

धनगर, माळी, इत्यादी समाजांतील स्त्रिया पूर्वी हातात चांदीचे गोठ, पाटल्या, व दंडांत वेळा किंवा वाकी घालीत असत. पण त्या समाजांतील तरुण मुलींनी हे दागिने वापरणे कमी केले आहे. तसेच पूर्वीच्या स्त्रिया पायाच्या अंगठ्यात अंगुस्ठा, शेजारच्या बोटात जोडवी, करंगळीच्या शेजारच्या बोटात मासोळ्या आणि करंगळीमध्ये करंगुळ्या हे चांदीचे दागिने घालीत असत. हे दागिने मुलीची आई करून देत असे. आता या दागिन्यांपैकी फक्त जोडवी वापरली जातात. बाकीचे दागिने आता कमी झाले आहेत. पूर्वी जोडवी जाड असत ती आता बारीक झाली आहेत. तसेच पूर्वी जोडवी म्हणजे दोन स्वतंत्र वर्तुळे असत. आता चांदीच्या एकाच तारेची दोन वर्तुळे असतात. जोडवी हा सौभाग्यालंकार आहे. तो विवाहित स्त्रियांच्या दोन्ही पायांत अंगठ्याशेजारच्या बोटात घातलेला असतो. गळ्यामध्ये जसे मंगळसूत्र तसेच पायात जोडवी असावीच लागतात. हे दोन्ही दागिने अजून कायम आहेत.

सासरची चालरीत : सासूच्या वर्चस्वाला हादरा

खेडेगावातील स्त्रिया मासिक विटाळ अजूनही पाळतात. या चार दिवसांत स्त्रिया शेतात जाऊन काम करतात. परंतु घरात काहीही काम करीत नाहीत. विटाळात घरात शिवाशिव करणे खेडेगावात फार निषिद्ध आणि अशुभ मानतात. त्याविषयी अशी म्हण

आहे की 'शेत गेलं आळशानं आणि लक्ष्मी गेली विटाळानं'. पूर्वापार चालत आलेली ही रुढी आजही चालत आहे. एकत्र कुटुंबात या गोष्टीचा त्रास वाटत नव्हता. परंतु विभक्त कुटुंबात याचा त्रास होतो. नवऱ्याला हाताने सैपाक करून घ्यावा लागतो, किंवा दुसऱ्याकडून करून आणावा लागतो. असे झाले तरी बायकोने विटाळात सैपाक करणे खेडेगावातील पुरुषांनाही सहसा पटणार नाही. मासिक विटाळाच्या निमित्ताने पुरुषांना स्त्रियांच्या सैपाकघरांतील जीवनाचा महिन्यांतून चार दिवस जो थोडाबहुत अनुभव येतो त्यामुळेही स्त्री-पुरुषांचे संबंध समान नात्याने दृढ होण्यास मदतच होत आहे.

पूर्वीच्या मानाने आता सासूचे वर्चस्व कमी होत असल्याचे सांगितलेच आहे. त्यात द्विभार्याप्रतिबंधक कायद्याचा जसा उपयोग झाला तसा स्त्रियांच्या वाढत्या नीट-नेटक्या राहाणीचाही उपयोग होत आहे. स्त्रियांची राहाणी ज्या मानाने नीटनेटकी त्या मानाने पुरुषाचे लक्ष घरात राहाते आणि त्याच प्रमाणात सासूचे वर्चस्व कमी होते. सासूनंतर आज घराचा कारभार साहजिक सुनेकडे जाऊ लागला आहे. कुटुंब एकत्र असले तर थोरली सून कारभार पाहाते आणि धाकट्या जावा मदत करतात. थोड्याच दिवसात सगळ्यांची स्वतंत्र घरे सुरू होतात. पूर्वी असे होत नसे. घरात सहसा एखादी विधवा नणंद असावयाची आणि सासूनंतर नणंदेकडे कारभार जावयाचा. साऱ्या भावजया तिच्या धाकात असत.

विधवेची परिस्थिती : पूर्वी व आता

आता परिस्थिती उलटी झाली आहे. आता विधवा नणंद घरात अडचण वाटू लागली आहे आणि तिला पांढऱ्या पायाची म्हणू लागल्या आहेत. विधवा नणंदांना माहेरी नीट वागणूक मिळत नाही. यामुळे विधवाही आता पूर्वीच्या मानाने माहेरी परत न येता सासरीच राहाणे पसंत करू लागल्या आहेत. हा फरक पडण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे विधवांना सासरच्या स्थावरात वाटणी मागण्याचा मिळालेला हक्क होय. पूर्वी विधवा स्त्रीला एकत्र कुटुंबाच्या जमिनीत वाटणी मागता येत नसे. सासरची माणसे फार तर तिला पोटगीपुरते धान्य व अंगाला वस्त्र देत असत. पोटगी घेऊन ती माहेरी भावाकडे राहाण्यास जात असे. आता विधवा भावजयींना जमिनीत वाटणी मागण्याचा हक्क मिळाल्यामुळे वाटणीसाठी त्या सासरी राहू लागल्या आहेत. सासरी राहाण्याने भावजयींची मानहानीकारक बोलणी ऐकून घ्यावी लागत नाहीत. दिरांशी प्रेम असेल तर एकत्र कुटुंबात हक्काने आणि मानाने, नाही तर स्वतंत्रपणे त्या राहू लागल्या आहेत.

विधवा निपुत्रिक असली तरी एकत्र कुटुंबाच्या स्थावरात तिला वाटणी मिळत असल्याने ती दिराचा मुलगा दत्तक घेऊन नवऱ्याचे नाव चालू ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेही विधवेला सासरच्या कुटुंबात मानाने राहाता येते. मात्र त्याबरोबर निपुत्रिक विधवेला दत्तक घालण्यासाठी अनेक उपद्व्यापी माणसांच्या खटपटी सुरू

होतात, त्यांना शहाणपणाने तोंड द्यावे लागते. बाई शहाणी असेल तर म्हातारपणीच दत्तक घेते, आधी घेत नाही. परंतु अविचारी स्त्रिया तरुणपणीच कोणाच्या तरी सिडेखातर दत्तक घेऊन बसतात आणि पुढे पस्तावतात. विधवांचे स्थावर आणि त्यांना दिलेले किंवा द्यावयाचे दत्तक यांचे मोबती आज खेडेगावात असंख्य भांडणे आणि दिवाणी दावे चालू आहेत. या दृष्टीने दत्तक कायद्यात अलीकडे झालेली दुरुस्ती शहाणपणाची आहे. या दुरुस्तीनुसार विधवा स्त्रीला ४०-४५ वयानंतर दत्तक घेता येईल आणि त्यावेळी दत्तकाचे वय १५च्या आतच असावे लागेल; म्हणजे दत्तक आईमुलांत आईमुलाइतका वयात फरक राहील अशी तरतूद आहे.

विधवा स्त्रीला सासरच्या स्थावरात मिळालेली वाटणी तिला विकता येत नाही. तिने त्या मिळकतीचा उपभोग घ्यावा परंतु तिची विल्हेवाट लावण्याचा तिला हक्क नाही. एकत्र कुटुंबाच्या कारणा-करताच तिला आपली मिळकत विकता येते. या निर्बंधामुळे अनेक उपरी दत्तकपत्रके होत असतात की जी वास्तविक खरेदीपत्रके असतात. अशल्या दत्तकप्रकरणांचे राजकारणही खेडेगावातून चालू असते. तसेच विधवेच्या जमिनी एखाद्या अडाणी माणसास विकत देऊन मग विधवेस दत्तक घालून जुन्या विकलेल्या जमिनी उलटविणे असले उपद्व्यापही काही मंडळी करीत असतात. तात्पर्य विधवेस कायद्याने हक्क मिळाले आणि तिला सासरीच मानाने जगणे शक्य झाले हे खरे. परंतु त्याचबरोबर शहाणपणाने वागण्याची जबाबदारीही विधवांवर पडली आहे. ती त्यांनी सांभाळली नाही तर स्थानिक राजकारणी, उपद्व्यापी आणि व्यसनी माणसांच्या कारस्थानात सापडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

ग्रामीण स्त्रीजीवनातील मूलगामी फरक

वर केलेल्या विवेचनावरून हे लक्षात येईल की ग्रामीण स्त्रीजीवनात गेल्या पाचपन्नास वर्षांत जे फरक झाले त्या सर्वांत महत्त्वाचा आणि मूलगामी फरक असा : पूर्वी ग्रामीण स्त्री लग्न झाल्यानंतरही माहेरास चिकटून असे. सासरी शेत आणि घरकाम करण्याकरता आवश्यक म्हणून विकत घेतलेली एक दासी असेच तिचे स्वरूप होते. तिला स्वतःला मुलेबाळे होऊन तिचे मुलगे मोठे होऊन तिच्या सुना घरात येऊन तिला स्वतःला सासूपण लाभेपर्यंत तिच्या जीवनाला स्वास्थ्य आणि सुरक्षितता नव्हती. प्रसंगाला संकटात उपयोगी पडेल हा भरंवसा तिला प्रत्यक्ष नवऱ्याबद्दलही वाटत नव्हता. दुर्दैवाने नवरा वारला आणि वैधव्य आले तर मग सासरी तिला थाराच नव्हता. मग माहेराखेरीज तिला गत्यंतरच नव्हते. जुन्या ग्रामीण स्त्रीजीवनात माहेर आणि भाऊ यांना असलेले महत्त्व, आणि त्याविषयी स्त्रीस वाटणारा जिव्हाळा अनेक ग्रामीण स्त्रीगीतांत ओतप्रोत भरलेला आहे. माहेर व भाऊ यांजबद्दल जुन्या स्त्रीगीतांतून व्यक्त होणारा हा जिव्हाळा व प्रेम ही ग्रामीण स्त्रीस तिच्या सासरी न मिळालेली आत्मीयता आणि सुरक्षितता यांचीच द्योतक आहेत.

ग्रामीण स्त्रीजीवनात होणाऱ्या या परिवर्तनाची मुख्य कारणे म्हणजे शिक्षणाचा प्रसार, सर्वसामान्य आर्थिक विकास, शहराशी वाढते दळणवळण व संबंध आणि ग्रामीण समाजात झपाट्याने पसरत जाणारे सामाजिक व राजकीय नेतृत्व ही होत. परंपरेने आणि रूढीने स्त्रीवर घातलेली बंधने नाहीशी व्हावीत आणि स्त्रीस घरात आणि समाजात पुरुषाबरोबर समान दर्जा मिळावा ही कल्पना समाजातील सर्व जाणत्या आणि नेत्या पुरुषांना मान्य आहे हीही या प्रभावावत फार मुद्देवाची गोष्ट आहे. घटनेने स्त्रियांना पुरुषाबरोबर दिलेला समान मतदानाचा हक्क हाही स्त्रियांचे समान हक्क हळूहळू परंतु निश्चितपणे प्रस्थापित करण्यास उपयोगी पडत आहे. असे असले तरी स्त्रीजीवनाची प्रगती आणि उन्नती होत आहे यापेक्षा अधिक झपाट्याने व्हावी, स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक समता शक्य तितक्या लवकर प्रस्थापित व्हावी आणि स्त्रियांनी देशाचे समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण यांत पुरुषांच्या बरोबरीने भाग घेण्यास सिद्ध व्हावे म्हणून सरकारने काही विशेष प्रयत्न करावयास हवे होते तसे अजून केलेले नाहीत. ते करणे आवश्यक आहे.

विकासयोजनेत स्त्रियांचे स्थान अत्यल्प

आजच्या सरकारी विकासयोजनेत स्त्रियांकरिता म्हणून जे खास कार्यक्रम आहेत त्यांत भजनी मंडळे, महिला-मंडळे अशा तऱ्हेचे कार्यक्रम आहेत. ते आपापल्या परीने उपयुक्तही आहेत. पूर्वीच्या काळी स्त्रिया नागपंचमी, संक्रांत, लग्नकार्य, यात्रा, जत्रा इत्यादी निमित्ताने समाजात एकत्र येत असत; आणि याच निमित्ताने त्यांना घराबाहेर पडता येत असे. आता भजनी मंडळे, महिला-मंडळांच्या निमित्ताने सुद्धा थोड्याच का होईना परंतु काही स्त्रिया घराबाहेर पडतात. परंतु स्त्रीजीवनाची प्रगती झपाट्याने व्हावयाची असेल तर एवढ्याने भागणार नाही. आर्थिक स्वातंत्र्य हा सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याचा आणि समतेचा पाया आहे. या दृष्टीने अर्थव्यवहारातील काही क्षेत्रे स्त्रियांकरिता राखून ठेवणे किंवा काही क्षेत्रांत त्यांना अग्रहक्क देणे उपयुक्त ठरेल. प्राथमिक शिक्षण हे असे एक क्षेत्र आहे. आज ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होत आहे. प्राथमिक शिक्षकांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. यांत स्त्रीशिक्षकही आहेत. परंतु आज प्राथमिक शिक्षकांत स्त्रियांचे प्रमाण जेमतेम दहा टक्केच आहे. थोड्या प्रयत्नाने हे सहज वाढविता येईल आणि वाढविणे इष्ट ठरेल. कारण घराबाहेर स्त्रियांनी करण्यासारखी जी कामे आहेत त्यांत प्राथमिक शिक्षण सर्वांत महत्त्वाचे आहे. आरोग्य खात्यातील दुय्यम दर्जाच्या कामांचेही असेच आहे, ही कामे पुरुषांपेक्षा स्त्रियांनी करण्यासारखी आहेत. या खात्यांतील नोकऱ्यांत स्त्रियांना अग्रहक्क दिला आणि या खात्यांतील नोकऱ्यांचे नियम स्त्रीजीवनाच्या गरजा आणि सोयी-गैरसोयी लक्षात घेऊन ठरविले तर ग्रामीण स्त्रीजीवनाची प्रगती होण्यास पुष्कळच मदत होईल.

प्राथमिक शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन खात्यांतील नोकऱ्यांप्रमाणेच दुसरी अनेक क्षेत्रे स्त्रियांना अनुरूप आहेत. उदाहरणार्थ, कुक्कुटपालनाचा व्यवसाय. आज खेडेगावांतून कोंबड्यांचा व्यवहार हा बहुधा स्त्रियांच्या हाती आहे. असे असूनही या धंद्यासंबंधीच्या विकासयोजनेत स्त्रियांना मुळीच स्थान नाही असे का? या धंद्यात निव्वळ स्त्रियांच्या सहकारी संस्था निर्माण करून त्यांना प्रोत्साहन देणे सहज शक्य आहे. तीच गोष्ट गावोगावी असलेल्या पिठाच्या गिरण्यांची. अशीच आणखीही स्त्रियांना अनुरूप अशी आर्थिक क्षेत्रे निवडता येतील. अशा सर्व क्षेत्रांत स्त्रियांच्या सहकारी संस्था निर्माण करून त्यांना अग्रहक्क दिला गेला तर ग्रामीण स्त्रियांच्या प्रगतीस निःसंशय मदत होईल.

ग्रामीण भागात बुद्धिपुरस्सर प्रगतीचे प्रयत्न केले पाहिजेत

✓ स्त्रियांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांतही पुरुषांच्या बरोबरीने भाग घ्यावा म्हणून घटनेने त्यांना समान मतदानाचे हक्क दिले आहेत. असे असूनही ग्रामीण समाजातील स्त्रिया याबाबत अजून म्हणावी तशी प्रगती करू शकलेल्या नाहीत. ग्रामपंचायत समित्या किंवा जिल्हा परिषदा इत्यादी लोकनियुक्त संस्थांत स्त्रियांचे प्रमाण अगदीच कमी आहे. पुष्कळ ठिकाणी एकही स्त्री निवडणुकीस उभी राहून निवडून न आल्याने मुद्दाम निमंत्रण देऊन आणून बसवावी लागते. ही परिस्थिती सुधारावयाची तर केवळ घटनेने आणि कायद्याने अधिकार आणि हक्क दिले, आता तुमचे तुम्ही पाहा असे म्हणून भागणार नाही. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत स्त्रियांना अनुरूप अशी क्षेत्रे कोणती ती ठरवून ती स्त्रियांकरता राखून ठेवणे किंवा निदान त्यांत स्त्रियांना अग्रहक्क देणे हे योग्य आणि आवश्यक ठरेल. या दृष्टीने ग्रामपंचायतीच्या कारभाराचा विचार करावयास हवा. सध्याच्या ग्रामपंचायत कायद्यान्वये ग्रामपंचायतीस अनेक कामे दिली आहेत. तरीसुद्धा गावाची स्वच्छता आणि पाणी व दिवाबत्तीची सोय हीच महत्त्वाची कामे आहेत. ही कामे सर्वस्वी स्त्रियांनी करण्याजोगी आहेत. पुरुषांना या कामांची आस्था नाही. ती हातात घेऊन पुरुषांनी त्याचे केवळ राजकारण केलेले आहे. तरी चालू ग्रामपंचायत कायदा दुरुस्त करून ग्रामपंचायतींचा कारभार सर्वस्वी स्त्रियांच्या हाती देता येईल का याचा अवश्य विचार करावा.

आपल्या समाजातील परंपरागत आर्थिक आणि सामाजिक विषमतेमुळे समाजातील अनेक वर्ग मागे राहिलेले आहेत. त्यांत संख्येने मोठा वर्ग स्त्रियांचा आहे. विषमतेने जो दडपून ठेवलेले हे वर्ग उन्नत करावयाचे तर त्याकरिता हेतुपुरस्सर धोरण आणि क्रम असावयास हवेत.

सरकारी नोकऱ्यांतून वेतनाबाबत स्त्री-पुरुष असा भेद केला जात नाही. ५ औद्योगिक क्षेत्रांत पूर्वी असा भेद असे. स्त्रीला कमी मजुरी मिळे. आता इंडस्ट्रियल ट्रिब्यूनल, स्टॅन्डर्डायझेशन स्कीम, प्रत्येक धंद्याचे कमीत कमी वेतनमान ठरविणारी समिती, इत्यादी उपायांनी खालच्या थरांवरील कामातही स्त्री-पुरुष असा भेद न करता एखाद्या कामाचे वेतन ठरविले जाते, मग तेथे पुरुष, स्त्री कोणीही काम करो, तितकेच वेतन दिले जाते. तरी अशा वेतनश्रेणी सर्वच लहानमोठ्या धंद्यांत अजून स्थापित झालेल्या नाहीत. त्यामुळे लहान धंद्यांतून अजूनही बाईला मजुरी कमी व पुरुषाला जास्त असा प्रकार दृष्टीस पडतो. पण त्या बाबतीत स्त्रीसंघटनांनी जागरूकता बाळगून लक्ष घातले पाहिजे. अजूनही असे निर्नियंत्रित धंदे पुष्कळ आहेत, आणि तेथे घटनेचा राजरोस भंग होतो आहे.

स्त्रियांचे वरच्या खालच्या सर्व स्तरांवरील अर्थार्जन लक्षात घेतले तर वरच्या स्तरापेक्षा खालच्या स्तरावरील स्त्रियांना त्या अडाणी असल्याने संघटनांच्या मदतीची व श्रमिक संघांच्या मदतीची चांगलीच गरज आहे असे लक्षात येते. पण तसे संघ आपल्याकडे फारसे नाहीत.

त्याचप्रमाणे अर्थार्जन करीत असता मुलाबाळांची हेळसांड होऊ नये म्हणून गिरण्यांसारख्या नियंत्रित धंद्यांतून पाळणाघरे, शिशुविहार, जसे सक्तीचे केले आहेत तशा सोयी, व्यवसाय किंवा नोकरीपेशाच्या स्त्रियांना अद्याप उपलब्ध नाहीत. अखिल भारतीय महिला परिषद, नॅशनल विमेन्स कौन्सिल किंवा त्याच्या शाखा यांनी या बाबतीत जसे लक्ष घालावयास पाहिजे तसे अजून घातलेले दिसत नाही. त्यामुळे पुष्कळ वेळा नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्यावर घरची, बाहेरची, व मुलांची अशी तिहेरी जबाबदारी पडून विशेषतः विवाहित स्त्री अगदी पिचून निघते.

रशियाने सर्व क्षेत्रांत स्त्रीला उत्पादक घटक म्हणून प्रवेश दिला. पण वरील सर्व सोयी केल्या. आपल्याकडे ही विधायक कामगिरी कोणी करावयाची याचा खलसुद्धा अजून झालेला नाही. वर उल्लेखलेल्या स्त्रीसंघटना तर ते आपले काम नव्हे म्हणून हात झटकून मोकळ्या होतात. कदाचित आमच्या स्त्रीसंघटनांची चळवळीची आवड अजून गेलेली तरी नसावी किंवा विधायक कामगिरीला लागणारे कौशल्य आणि चिकाटी अजून त्यांना आत्मसात करता आली नसावी असे म्हणणे भाग पडते.

स्त्रियांच्या संघटना

आतापर्यंत आपण स्त्रीस्वातंत्र्याची राजकीय, शैक्षणिक, कायदा, सामाजिक क्षेत्र व अर्थार्जन इत्यादी क्षेत्रांत कसकशी वाटचाल होत गेली हे पाहिले. ही वाटचाल म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांचाच एक प्रकारे इतिहास आहे. आता फक्त राहिला तो आरोग्याबाबत हक्क, व विश्रांतीचा हक्क. पहिल्या हक्काबाबत कोणाचेही दुमत होणे संभवनीय नाही. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळापासून अशा प्रयत्नांना सुरुवात

सरकारी नोकऱ्यांतून वेतनाबाबत स्त्री-पुरुष असा भेद केला जात नाही. ५ औद्योगिक क्षेत्रांत पूर्वी असा भेद असे. स्त्रीला कमी मजुरी मिळे. आता इंडस्ट्रियल ट्रिब्यूनल, स्टॅन्डर्डायझेशन स्कीम, प्रत्येक धंद्याचे कमीत कमी वेतनमान ठरविणारी समिती, इत्यादी उपायांनी खालच्या थरांवरील कामातही स्त्री-पुरुष असा भेद न करता एखाद्या कामाचे वेतन ठरविले जाते, मग तेथे पुरुष, स्त्री कोणीही काम करो, तितकेच वेतन दिले जाते. तरी अशा वेतनश्रेणी सर्वच लहानमोठ्या धंद्यांत अजून स्थापित झालेल्या नाहीत. त्यामुळे लहान धंद्यांतून अजूनही बाईला मजुरी कमी व पुरुषाला जास्त असा प्रकार दृष्टीस पडतो. पण त्या बाबतीत स्त्रीसंघटनांनी जागरूकता बाळगून लक्ष घातले पाहिजे. अजूनही असे निर्नियंत्रित धंदे पुष्कळ आहेत, आणि तेथे घटनेचा राजरोस भंग होतो आहे.

स्त्रियांचे वरच्या खालच्या सर्व स्तरांवरील अर्थार्जन लक्षात घेतले तर वरच्या स्तरापेक्षा खालच्या स्तरावरील स्त्रियांना त्या अडाणी असल्याने संघटनांच्या मदतीची व श्रमिक संघांच्या मदतीची चांगलीच गरज आहे असे लक्षात येते. पण तसे संघ आपल्याकडे फारसे नाहीत.

त्याचप्रमाणे अर्थार्जन करीत असता मुलाबाळांची हेळसांड होऊ नये म्हणून गिरण्यांसारख्या नियंत्रित धंद्यांतून पाळणाघरे, शिशुविहार, जसे सक्तीचे केले आहेत तशा सोयी, व्यवसाय किंवा नोकरीपेशाच्या स्त्रियांना अद्याप उपलब्ध नाहीत. अखिल भारतीय महिला परिषद, नॅशनल विमेन्स कौन्सिल किंवा त्यांच्या शाखा यांनी या बाबतीत जसे लक्ष घालावयास पाहिजे तसे अजून घातलेले दिसत नाही. त्यामुळे पुष्कळ वेळा नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्यावर घरची, बाहेरची, व मुलांची अशी तिहेरी जबाबदारी पडून विशेषतः विवाहित स्त्री अगदी पिचून निघते.

रशियाने सर्व क्षेत्रांत स्त्रीला उत्पादक घटक म्हणून प्रवेश दिला. पण वरील सर्व सोयी केल्या. आपल्याकडे ही विधायक कामगिरी कोणी करावयाची याचा खलसुद्धा अजून झालेला नाही. वर उल्लेखलेल्या स्त्रीसंघटना तर ते आपले काम नव्हे म्हणून हात झटकून मोकळ्या होतात. कदाचित आमच्या स्त्रीसंघटनांची चळवळीची आवड अजून गेलेली तरी नसावी किंवा विधायक कामगिरीला लागणारे कौशल्य आणि चिकाटी अजून त्यांना आत्मसात करता आली नसावी असे म्हणणे भाग पडते.

स्त्रियांच्या संघटना

आतापर्यंत आपण स्त्रीस्वातंत्र्याची राजकीय, शैक्षणिक, कायदा, सामाजिक क्षेत्र व अर्थार्जन इत्यादी क्षेत्रांत कसकशी वाटचाल होत गेली हे पाहिले. ही वाटचाल म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांचाच एक प्रकारे इतिहास आहे. आता फक्त राहिला तो आरोग्याबाबत हक्क, व विश्रांतीचा हक्क. पहिल्या हक्काबाबत कोणाचेही दुमत होणे संभवनीय नाही. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळापासून अशा प्रयत्नांना सुरुवात

तरी तोकीच होती. स्वातंत्र्यानंतर ते प्रयत्न खूपच वाढले. अजूनही ते पुरेसे आहेत असे म्हणता येत नाही. तथापि स्त्रियांची प्रसूतीकाळी होणारी मृत्युसंख्या किती घटली आहे ते पाहिले की या सुखसोयींची परिणामकारकता पटू लागते. अजूनही त्या दृष्टीने वाटचाल चालू आहे, व जे होईल ते करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आता अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न उद्भवला असल्याने स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे जास्तच लक्ष खेचले गेले आहे, व त्यांना अग्रस्थान मिळाले आहे.

दुसरा हक्क विश्रांतीचा. त्याबाबत अजून पुष्कळच विचार व्हावयास पाहिजे आहे. स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण आमूलाग्र बदलल्याशिवाय सध्या दिसणारी स्त्रियांची ससेहोलपट बंद होणार नाही. एकतर समाजात, घरच्या कामाच्या कंटाळवाण्या ओझ्यातून (ड्रजरी) स्त्रीची मुक्तता होईल अशा सोयी व साधने उपलब्ध होणे अत्यंत जरूर आहे. शिवाय बालसंगोपनाबाबतही तिला काहीसा विसावा मिळेल अशा संस्था म्हणजे पाळणाघरे, शिशुगृहे अस्तित्वात येणे जरूर आहे. पण हे काम एकट्या दुकट्याचे नाही. स्वतः स्त्रियांनी व त्यांच्या संघटनांनी ते करावयाला पाहिजे म्हणूनच स्त्री-संघटनांचा विचार (राइट टू ॲसोसिएट) करून हे प्रकरण पुरे करू.

अगदी आरंभी म्हणजे जेव्हा भारतीय स्त्री चांगलीशी उभी राहू शकत नव्हती तेव्हा तिला प्रागतिकांनी हात देऊन अशा संघटना तयार केल्या. २० व्या शतकाच्या पहिल्या काही वर्षांपासून स्त्रिया स्वतः संघटित होऊ लागल्या. मागे उल्लेखिल्याप्रमाणे १९०७ मध्येच मेडिकल विमेन्स असोसिएशन व १९०८ मध्ये नर्सेस ॲसोसिएशन या संघटना अस्तित्वात आल्या. त्यानंतर पुष्कळच व्यवसायांतून संघटनांचे प्रयत्न झाले. अजूनही चालू आहेत. मात्र ज्या ठिकाणी स्त्रियांचे असे वेगळे प्रश्न नसतील त्या सर्व व्यवसायांतून अलीकडे अलीकडे पुरुषांच्या संघटनांतून बायका भाग घेऊ लागल्या व स्वातंत्र्यानंतर तर सर्व व्यवसायधंद्यांतील अशा संघटनांतून स्त्रिया भाग घेत असलेल्या दिसतात.

कामगार स्त्रियाही त्याला अपवाद नाहीत. पण याशिवाय करमणूक, मनोविनोदन, खेळ व थोडीशी बौद्धिक करमणूक याकरता सुशिक्षित, अल्पशिक्षित स्त्रियाही महिलामंडळे स्थापू लागल्या आहेत. किंबहुना नव्या काळाची ती एक गरजच होऊन बसली आहे. त्यामुळे लहानमोठ्या शहरांतून, विभागाविभागांतून अशी महिलामंडळे अस्तित्वात येतात व स्त्रिया अत्यंत मनोभावाने त्यांत भाग घेतात. स्त्रियांच्या नाना प्रश्नांवर चर्चा करतात. थोडेसे समाजिक कार्य, थोडीशी बौद्धिक करमणूक, क्रीडा, मनोविनोदन असे या संघटनेचे स्वरूप असते.

यापेक्षा वरच्या पातळीवर काम करणाऱ्या संघटना म्हणजे नॅशनल विमेन्स कौन्सिल (एन्. डब्ल्यू. सी) व त्याच्या शहरोशहरी असलेल्या शाखा. ही संघटना १९१६ पासून सुरू झाली व तिची शाखा आंतरराष्ट्रीय विमेन्स कौन्सिलला जोडली गेली. किंबहुना या संघटनेच्या व विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधर

स्त्रीसंघटनेच्या मागे पाश्चात्त्य स्त्रियांची प्रेरणा होती असे म्हणण्यास हरकत नाही. पदवीधर स्त्रीसंघटना शिक्षणाच्या क्षेत्रात जास्त लक्ष घालते पण स्त्रियांचे इतर प्रश्न तिला वर्ज्य नाहीत. एन्. डब्ल्यू. सी व तिच्या शाखा तर स्त्रिया व मुले यांसंबंधीच्या साऱ्याच प्रश्नांवर विचार करतात. पण या सर्वांत स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय, साऱ्याच प्रश्नांवर खल करणारी व जास्त प्रातिनिधिक असल्याने प्रभावी झालेली, स्त्रियांची संघटना म्हणजे अखिल भारतीय महिला परिषद. पहिल्याने ही परिषद शिक्षणाचा प्रश्न घेऊन १९२६ साली निघाली. पण पुढे स्त्रियांचे सामाजिक प्रश्न, कायदेविषयक प्रश्न, मतदानाच्या हक्काविषयीचे प्रश्न, स्त्रिया व मुले यांना होत असलेला अनैतिक व्यापार, देवदासींची चाल, वेश्यावरे चालविणारे व्यापारी, इत्यादी सारे प्रश्न परिषदेच्या कक्षेत आले. त्याबाबतीत शिक्षित स्त्रीवर्गांत जागृती उत्पन्न करून मध्यमवर्गीय स्त्रियांना आपलेकडे ओढून ही परिषद प्रभावी व प्रातिनिधिक बनली. जरी परिषदेने कोणत्याही राजकीय पक्षाचे बिरुद लावले नाही, तरी देशकल्याणाच्या प्रश्नावरही तिने विचार करण्याचे टाळले नाही. औद्योगिक क्षेत्रात स्त्रीकामगारांची स्थिती सुधारण्यास या संघटनेचे बरेच प्रयत्न व चळवळ कारणीभूत झाली. वेश्या-व्यवसायासंबंधीचे अनैतिक व्यापारावर निर्बंध घालणारे कायदे, सामाजिक परिषद व तशाच इतर स्त्रीसंघटना यांच्याच प्रयत्नाने झाले. सामाजिक कायद्याचे श्रेय तर याच स्त्रीसंघटनांकडे जाईल.

असे असताही स्त्रियांना याबाबतीत बरीच वाटचाल करावयाची आहे असे मनात आल्याशिवाय राहात नाही. देशस्वातंत्र्याच्या लढ्यामुळे ज्या हक्कांकरिता पावलोपावली स्वतंत्र देशांतील पाश्चात्त्य स्त्रियांना लढा द्यावा लागला ते सारे हक्क, त्या संधी व पुरुषांबरोबरीचे सामाजिक स्थान भारतीय स्त्रीला दीड शतकाच्या आतच मिळाले. पण ते अजून पचनी मात्र पडलेले दिसत नाही. अखिल भारतीय महिला परिषदेसारखी संघटना अजूनही खेडोपाडी पोहोचली नाही, की सामान्य खालच्या वर्गांच्या स्त्रिया व खेड्यांतील स्त्रियांचा त्यांत अंतर्भाव झालेला नाही. हा बहुजन स्त्रीवर्ग अजून वेगळाच अलगपणे वावरतो आहे. त्यात जागृती, शिक्षणाचा प्रसार व हक्काविषयी जागरूकता निर्माण झाल्याखेरीज खरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही. पण ते करायचे असेल तर जागृत झालेल्या व चिकाटीने काम करणाऱ्या महिला संघटना पाहिजेत. त्यांनी विधायक कामगिरीची जबाबदारी अंगावर घेतली पाहिजे. कारण आता कायद्याचे, घटनेचे काम संपलेले आहे पण त्यांचा परिणामकारक राबता होतो की नाही याविषयी डोळ्यांत तेल घालून जागरूकता ठेवली नाही तर घटनेने, कायद्याने, मिळालेले स्वातंत्र्य अखेर फोल ठरेल.

११

स्त्रिया आणि राजकारण

अनसूया लिमये

सौ. अनसूया श्रीधर लिमये बी. ए. (ऑ), बी. टी. (जन्म ३१–१२–१९१६) पुण्याच्या टिळक कॉलेजात अवर प्राध्यापक. नंतर १९४२ च्या आंदोलनात प्रत्यक्ष भाग. राष्ट्रसेवादलाच्या महाराष्ट्रातील स्त्रीसंघटक. सहकारी महिला संस्थांचे कार्य. युरोप व इस्राइलमधील महिला, शिक्षक व इतर सामाजिक प्रश्नांचा प्रत्यक्ष अभ्यास. भाववाढ-विरोध, संयुक्त महाराष्ट्र, गोवा स्वातंत्र्य इत्यादी लढ्यांत भाग. पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षम सभासद व शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष. (१५५७ सदाशिव, पुणे ९)

संधी मिळाली तेथे स्त्रियांनी कर्तृत्व दाखविले

'स्त्रिया आणि राजकारण' या जणू परस्पर विसंगत गोष्टी आहेत; स्त्रियांचा राजकारणाशी काही संबंध नाही; असलाच तर फार दूरत्वाने आहे, अशा कल्पना युगानुयुगे चालत आलेल्या आहेत. म्हणूनच 'स्त्रिया आणि राजकारण' हा विषय अनेकदा चर्चेला घेतला जातो. अशा कल्पना चालत येणे सहाजिकच आहे. राजकीय इतिहास पुरुषांच्या नावांनी भरलेला आहे. या असंख्य नावांत अधून मधूनच स्त्रियांची नावे उठून दिसतात. याचे कारणही स्पष्ट आहे. लोकशाहीचे युग सुरू होईपर्यंतच्या काळात राजकारण म्हणजे राजघराण्यांचा इतिहास होता. आणि गादीचा वारसाहक्क मुलाकडे, भावाकडे प्रथम जात होता. मुलीकडे त्यानंतर. म्हणजे राजकारणात आणि तत्पूर्वी धर्मकारणात स्त्री ही कनिष्ठ मानली गेली होती. असे असतानाही ज्या स्त्रियांना राजकारणात अग्रभागी येण्याची संधी मिळाली त्यांनी विविध प्रकारचे कर्तृत्व दाखवले आणि स्त्रियाही राजकारण करू शकतात हे सिद्ध केले. अहल्याबाई, ताराबाई, या भारतातील स्त्रियांनी किंवा राणी व्हिक्टोरियासारख्या इंग्लंडमधील स्त्रियांनी शासनाची धुरा हाती आल्यावर कुशलतेने राज्यकारभार चालवला. राजकारण हे प्रजेच्या हितासाठी आहे ही कसोटी लावली तर अहल्याबाईंचा क्रमांक फारच वर लागेल. राणी लक्ष्मी, चांदबिबी यासारख्या स्त्रियांनी रणांगणावर शौर्य गाजवले. ज्या धैर्याने आणि जिद्दीने लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असा मंत्र दिला किंवा

ज्या निर्धाराने महात्मा गांधींनी इंग्रज राज्यकर्त्यांना 'चले जाव' असे सांगितले जिद्दीने, त्याच धैर्याने महाराणी लक्ष्मीबाईने 'मेरी झांसी कभी नहीं दूंगी' असा निर्धार व्यक्त केला आणि पोटच्या मुलाला पाठीशी घेऊन रणांगणावर लढता लढता मरण पत्करले. आधुनिक काळात स्वातंत्र्यचळवळीत सुभाषबाबूंकडून स्फूर्ती घेतलेल्या कॅप्टन लक्ष्मीने आपली पल्टण उभी केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूलची चळवळ उभी केली. डॉ. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय किंवा अरुणा असफअली यांसारख्या सुप्रसिद्ध स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास घडविण्यात मोठी कामगिरी बजावली. त्याबरोबर महात्माजींच्या हाकेला ओ देऊन अनेक छोट्या मोठ्या स्त्रियांनी सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगवास पत्करला, लाठीमार सहन केला किंवा गोळ्याही झेलल्या. गोमंतकाच्या आंदोलनात सुधाबाई जोशींसारखी एक गृहिणी वीरांगना म्हणून पुढे आली आणि बारा वर्षांची सजा तिने हसत खेळत पत्करली. आज भारताच्या पंतप्रधानपदाची अतिशय जबाबदारीची धुरा श्रीमती इंदिरा गांधींनी पत्करली आहे. ही सर्व उदाहरणे थोडी असली तरी अंगावर पडल्यास मनाने कोमल असणाऱ्या स्त्रियाही कठोर बनू शकतात आणि राजकारणातल्या विविध भूमिका यशस्वी करू शकतात हे कुणालाही मान्य करावे लागेल.

संस्कृतिपूर्व काळ

समाज प्राथमिक अवस्थेत होता, म्हणजेच संस्कृतीची सुरुवातही नव्हती अशा काळात मनुष्य टोळी-जीवन जगत होता. शेतीचा शोध अद्याप लागावयाचा होता. त्याचप्रमाणे लग्नसंस्था आणि कुटुंबसंस्था यादेखील जन्माला आल्या नव्हत्या. रानात हिंस्र पशूंपासून संरक्षण व्हावे म्हणून टोळीने राहावयाचे व एका रानातील श्वापदे संपली म्हणजे दुसऱ्या रानात तळ द्यावयाचा, श्वापदे मारून खावयाची, हेच जीवन होते. टोळीमध्ये स्त्री-पुरुष दोघेही असत. मुले जन्माला येत परंतु ती साऱ्या टोळीची मुले म्हणून असत. शिकार करण्याचे काम पुरुष करीत आणि श्वापदे ओढून आणून मांस भाजण्याचे व वाटण्याचे काम स्त्रिया करीत. टोळीचे नायकत्व नेहमीच पुरुषाकडे असे, असे नाही. पुष्कळदा स्त्रीकडेही हे नेतृत्व येई. त्यावेळच्या स्त्रिया बुद्धिबलाने पुरुषापेक्षा कमी नव्हत्याच पण शरीरबलानेही त्या फारशा कमी नव्हत्या असे वर्णन पं. राहुल सांकृत्यायन यांनी 'व्होल्गा से गंगा' या पुस्तकात केले आहे. 'राजकारण' आजच्या अर्थाने आणि इतके व्यापक त्यावेळी अर्थातच नव्हते. परंतु समाजाचे नेतृत्व त्या प्राथमिक अवस्थेत स्त्रीने देखील केले आहे असे आढळते.

वेदकाल

५,००० वर्षांपूर्वी वेदकालात भारतीय संस्कृती जगात एक श्रेष्ठ संस्कृती होती असे आपण वाचतो. पुरुषांचा दर्जा श्रेष्ठ आणि स्त्रियांचा कनिष्ठ अशी विषमता

.: स्त्रियांनाही शिक्षण दिले जाई. स्वयंवर आणि प्रौढ विवाह प्रचलित होते. त्यावेळीही समाजरचनेची सूत्रे राजकारणाकडे नव्हती. धर्मकारणाकडे ते काम होते. आणि धर्मकारणात स्त्रीला हक्क होते. गार्गी, मैत्रेयीसारख्या स्त्रियांनी वेदाभ्यासात प्रावीण्य मिळविले होते. आणि ऋषिमुनींना देखील प्रश्नोत्तरांत हरवले होते. लोपा किंवा घोषासारख्या ब्रह्मवादिनी स्त्रियांनी आपले जीवित वेदाभ्यासालाच वाहिले होते. ही सारी उदाहरणे प्रसिद्ध आहेत.

अंधकाराचा प्रदीर्घ काळ

पण वेदकाळातील ही उच्च संस्कृती स्मृतिकाळाच्या उत्तरार्धात पूर्णतया विसरली आणि स्त्रियांना आपले सारे हक्क गमवावे लागले. मनूसारख्या ज्येष्ठ मुनींनी 'पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने' या वचनांनी स्त्रीला पुरुषाची दासी बनवली. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे सांगून तिला स्वातंत्र्याला अपात्रच ठरवून टाकली. स्त्रीचा शिक्षणाचा अधिकार गेला. बालविवाह रूढ होऊ लागले. स्त्रीच्या मातृत्वाचाच फक्त गौरव शिल्लक राहिला.

या सर्व अधःपतनाची कारणे अनेक दिली जातात. धर्मकारणात सोमरसाचे सेवन आवश्यक मानले जाई. स्त्रियांना सोमरस उष्ण पडू लागला व म्हणून त्यांचा धर्मकारणातला अधिकार गेला असे एक कारण सांगितले जाते. कालांतराने भारतावर परकीय स्वाऱ्या आल्या. आर्यांच्या संस्कृतीवर इतर अनेक संस्कृतींची सावली पडू लागली. युद्धामुळे स्त्री ही एक संरक्षणाची वस्तू बनली. तिला घरातच सुरक्षित ठेवणे हितावह वाटू लागले हेही एक कारण संभवते.

खऱ्या अर्थाने समाजावर राजकारणाचे वर्चस्व हे याच काळात सुरू झाले आणि त्याच वेळी स्त्री ही अंधकारात लोटली गेलेली होती. हा अंधारयुगाचा काळ फार प्रदीर्घ होता. या अंधारयुगात भारतात स्त्रीचा दर्जा इतका अधोगतीला गेला होता की श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गातील विधवा स्त्रियांचे केशवपन करण्याची प्रथा आणि मुसलमान स्त्रियांचा पडदा ही दोन हिंदू व मुसलमान या प्रमुख समाजांतील स्त्रियांच्या दास्याची ढळढळीत उदाहरणे आहेत. ज्यावेळी स्त्रियांना चार भिंतींच्या बाहेरील जगच नष्ट झाले त्यावेळी स्त्रिया राजकारणात किंवा समाजकारणात भाग त्या काय घेणार? चूल आणि मूल हीच कार्यक्षेत्रे स्त्रीच्या कक्षेत राहिली. बाकीच्या जगाला ती पूर्णतया पारखी झाली. ब्रिटिश अमदानीच्या सुरुवातीपर्यंत हे अंधारयुग असेच चालत राहिले.

राजघराणी हा अपवाद

या सर्वांना राजघराणीच मात्र काही वेळा अपवाद होती. दुर्दैवाने का होईना पण स्त्रीकडे गादीचा वारसा येण्याची शक्यता असे, आणि म्हणून की काय पण राजघराण्यांतील स्त्रियांना राजपुत्राच्या बरोबरीचे नसले तरी काही प्रमाणात युद्धाचे —

गांतून स्त्रियांसाठी राखून ठेवलेले तुरुंग भरून गेले. काही ठिकाणी ही संख्या इतकी मोठी झाली की दुसरे तुरुंग उघडावे लागले. 'कडेवरी मुले घेऊ क्रांतीमध्ये सामील होऊ' हे त्यावेळचे साने गुरुजींचे गीत म्हणजे वस्तुस्थितीचेच काव्य होते.

सत्याग्रहाच्या तत्त्वामध्ये शौर्याबरोबर नैतिक मूल्यांवर भर होता. गांधीजींनी भ्याडाची अहिंसा कधीच सांगितली नाही, तर शूराची अहिंसा सांगितली हे लक्षात घेतले पाहिजे. या शस्त्राच्या मागे त्यांनी स्त्रीसमाजाचीही शक्ती उभी केली. इतकेच काय गांधीजींनी स्त्रियांशी केलेले 'हितगुज' वाचले, तर त्यांनी एके ठिकाणी असेही म्हटले आहे की, 'आजच्या समाजात पाशवी शक्ती, यांत्रिक शक्ती, पैसा, यांचेच महत्त्व आहे म्हणून आजच्या समाजाचे नेतृत्व पुरुष करतो आहे. पण माझ्या डोळ्यासमोर जे समाजाचे चित्र आहे त्याचा पाया प्रेम, सेवा, त्याग या मूल्यांवर आधारलेला असेल आणि त्याचे नेतृत्व स्त्रिया करतील.'

गांधीजींनी या शब्दांत स्त्रियांच्या ठायी असलेल्या सुप्त शक्तीबद्दलचा केवढा विश्वास व्यक्त केलेला आहे!

मतदानाचा अधिकार

लोकशाहीच्या विचारामुळे एका राजाकडे, एका घराण्याकडे, किंवा एका गटाकडे असलेली सत्ता सामान्य लोकांकडे आली. लोकशाही पद्धतीचे मुख्य गमक म्हणजे मतदानाचा अधिकार. हा मतदानाचा अधिकार देखील स्त्रियांना प्रथमक्षणी मिळाला नाही. त्याकरिता इंग्लंड, फ्रान्ससारख्या पाश्चिमात्य देशांत स्त्रियांना मोठी चळवळ करावी लागली.

१९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले आणि राष्ट्रावरच संकट आल्यामुळे स्त्रियांनी आपली चळवळ स्थगित केली. युद्धाच्या काळात तरुण पुरुष आघाडीवर गे[…] त्यामुळे कारखाने, इस्पितळे, शाळा यांतून काम करणाऱ्यांची अधिक गरज भासू लागली. […]यांनी या क्षेत्रांतून भराभर नावे नोंदविली. विशेषतः रेडक्रॉस पथकातून फार मोठ्या […]णात स्त्रियांनी काम केले. तेव्हा त्यांच्या कर्तबगारीने व राष्ट्रभक्तीने प्रभावित होऊन १९१८ साली इंग्लिश पार्लमेंटने स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला. युरोपमधील स्त्रि[…]यांना मताधिकार मिळविण्यासाठी जी चळवळ करावी लागली किंवा जे सहन करावे ला[…] ते भारतीय स्त्रियांना करावे लागले नाही. स्वातंत्र्यचळवळीत त्यांनी स्वयंस्फूर्तीने आ[…]पला वाटा उचलला. १९५० साली डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताची घटना तयार झाली तीत २१ वर्षांच्या वरील पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही मताचा अधिकार मिळाला.

विधायक प्रवृत्तींकडे स्त्रियांचा अधिक कल

भारतात लोकशाही युगाला आता आता सुरुवात झाली आहे. घटनेने आणि कायद्याने आता स्त्रियांना सर्व नागरिकस्वातंत्र्य लाभले आहे. घटनेने स्त्री आणि पुरुष

असा भेद ठेवलेला नाही. परंतु अद्यापही राजकारणात स्त्रियांचा भाग मोठ्या प्रमाण दिसून येत नाही. भारताचे पंतप्रधानपद एका स्त्रीकडे आले. पण सामान्य स्त्रिया, मग त्या सुशिक्षित असोत की अशिक्षित असोत, अजून राजकारणापासून दूर राहिलेल्या आढळतात. याची कारणे अनेक असू शकतील. राजकारणात भाग घेणारांना धकाधकीचे जीवन व्यतीत करावे लागते. एखाद्या पदावर स्थानापन्न होण्याची संधी मिळाली तरी नागरिकांना, मतदारांना हरघडी तोंड द्यावे लागते. चालू घडामोडी-बाबत अत्यंत तत्पर राहावे लागते. आपली त्याबाबतची प्रतिक्रिया ताबडतोब व्यक्त करावी लागते. विरोधी पक्षांतील कार्यकर्त्यांना तर जनतेवर होणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकारार्थ सिद्ध असावे लागते. प्रसंगी प्रतिकार करताना तुरुंगवास भोगावा लागतो. दैनंदिन घराची आणि मुलाबाळांची जबाबदारी अंगावर असणाऱ्या स्त्रियांना या धकाधकीला तोंड देणे कठीण जाते. राष्ट्रावरील आपत्तीच्या प्रसंगी घरादाराचे पाश बाजूला सारून स्त्रिया तुरुंगवास पत्करण्यास देखील तयार होतात, हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. स्वातंत्र्यचळवळीत तर अनेक स्त्रियानी कारावास भोगलाच पण स्वातंत्र्योत्तर देखील भाववाढविरोधी आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, गोव्याचे आंदोलन, अशांसारख्या जनतेच्या चळवळींत स्त्रियांनी हिरीरीने काम केले व कारावासही भोगला.

हे सर्व खरे असले तरीही दैनंदिन राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण फार कमी दिसते, हे मान्य केले पाहिजे. त्याउलट महिलामंडळ, सहकारी चळवळ, ग्रामोद्योग यांसारख्या विधायक क्षेत्रातून स्त्रिया अधिक संख्येने उतरलेल्या दिसतात. यावरून स्त्रियांचा कल लढाऊ किंवा धकाधकीच्या राजकारणापेक्षा विधायक प्रवृत्तींकडे अधिक असावा असे अनुमान निघते.

आज सार्वत्रिक निवडणुकांतून विविध पक्ष स्त्रियांना उभे करीत नाहीत अशी तक्रार अनेकदा ऐकू येते. ही तक्रार पुष्कळ अंशी खरीही आहे. परंतु उभे करावयाचे म्हटले तरी सत्ताधारी पक्ष सोडला तर विरोधी पक्षातून अशा स्त्रियाही मिळत नाहीत. लायक स्त्रिया असल्या तरी त्या तयार होत नाहीत, अशीही उदाहरणे पुष्कळ आहेत.

आज भारतात मंत्रिपदावर व गव्हर्नरपदावर आरूढ झालेल्या स्त्रिया क्वचित दिसतात. राज्यसभा, लोकसभा, विधानसभा, विधानपरिषदा यांतून निवडून आलेल्या स्त्रियांचे प्रमाण फारच अल्प आहे. ही स्थिती भारतातच आहे असे नाही, तर युरोप, अमेरिका यांसारख्या लोकशाही अनेक शतके रुजलेल्या देशांतही आहे. निवडून आलेल्या व विविध लोकनियुक्त पदांवर असलेल्या स्त्रिया फार कमी प्रमाणात दिसत[ात]. इंग्लंडमध्ये हे प्रमाण १५ टक्के देखील नाही. भारतातही ते साधारण तेवढेच [आहे] व अमेरिकेत नुकतीच प्रे. जॉन्सन यांच्या प्रेरणेने एक चळवळ झाली. त्यात संपत्ती-व महत्त्वाच्या पदांवर काम करण्यास लायक असणाऱ्या स्त्रियांची नोंद करावी व

या साहित्याचा उगम विद्वत्तेत नसून उत्कट भावनात आहे. या स्त्री-हृदयातल्या भावना विवाहादी शुभप्रसंगी, माहेरचे मूळ, सासरची पाठवणी, बाळराजाचे न्हाणे माखणे आंदुळणे वगैरे प्रसंगी उचंबळून येतात व वात्सल्यात भिजलेल्या ओवीवृत्तातून वाहू लागतात. स्त्रीजीवनातल्या नाना अनुभूति जात्यावरच्या व झोपाळ्यावरच्या या ओव्यांतून नानाविध रूपाने प्रगट होतात. देवादिकांच्या ओव्यांतून हा जिव्हाळा भक्तिरसात डुंबतो. उत्कटता, एकतानता, एकनिष्ठा व समर्पणबुद्धी हा या साहित्याचा स्थायीभाव मानला पाहिजे.

या ऋजु, सात्त्विक व उत्कट भावना त्यांना साजेशा साध्या, सरळ व सुंदर भाषेत अवतरतात. रोजच्या व्यवहारातली, अकृत्रिम व म्हणूनच कुठेही न अडखळणारी ही ओघवती भाषा ऐकणाराच्या हृदयाची पकड घेते. पण रोजची असली तरी ही भाषा रटाळ वाटत नाही. कारण चटकन वीज चमकून तिने आभाळ दैदीप्यमान करून टाकावे त्याप्रमाणे एखादी साधी पण समर्पक व कल्पक उपमा या भाषेला रम्यत्वाचा शिणगार चढवते.

'घर माझं निर्मळ, दगावाचून आभायीळ' असे अभिमानाने म्हणणारी गृहिणी, किंवा —

> बंधुजी विचारितो मैना सासुरवास कसा
> चिताकाचा फासा गळी रुतला सांगू कसा

असे भावापाशी सासरच्या जीवनाचे अत्यंत मार्मिक वर्णन करणारी बहीण; (चिताक हे एका दागिन्याचे नाव. दागिना तर हवा, मग फासा टोचतो म्हणून कसे चालेल !) किंवा

> सासर एवढा वस नको करूंसा सासूबाई
> दारीच्या चाफ्यापाशी दुरदेशाची आली जाई

असे सांगणारी सून या भाषाप्रभुत्वाची साक्ष पटवील.

जात्यावरच्या ओव्या हे वाङ्मय तर खरोखर अवर्णनीय आहे. पहाटेच्या शांत, निवांत वेळी स्त्री आपले मन जात्यापाशी मोकळे करते व नानाभाव सहजस्फूर्त शब्दात मंजुळ निनादात पाझरू लागतात.

> जात्या ईसवरा तुला घडुनी पाहिलं
> मावलीचं दूध तुझ्या कारनीं लाविलं
> जाम्यावर बसावं तंवर जाम्याशी बोलावं
> सव्वशेराचं लुगडं आपल्या ध्याइनं (देहानं) तोलावं

अशा माहेरचा व स्वकर्तृत्वाचा अभिमान व फुलासारखं हलकं उंची वस्त्र देहावर ल्यायची हौस स्त्रीच्या या 'जन्माच्या संवगड्यापाशी' ती प्रकट करते. आपल्या सबंध

भावजीवनाचे चित्रच या ओव्यांतून स्त्री उभे करते. लहानपणी खेळलेले खेळ, भोंडले, भुलाबाई, नागपंचमीचे फेर, माहेरच्या माणसांची ओढ, सासरच्यांचे तिखट अनुभव, 'हवशा' कांत, काळजाचा घड, 'बाळराजा' व चिमणी सईबाई, अशा नाना विषयांवर ओवीमागून ओवी बाहेर पडू लागते.

ओव्यांतून गुंफलेले हे वाङ्मय डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात त्याप्रमाणे मूल्यवान 'स्त्रीधन' आहे; तसेच मराठी साहित्याचा तो जुना, साधा पण बहुमोल अलंकार आहे. त्यात प्रगट झालेले स्त्रीजीवनाचे व समाजाचे चित्र जपून ठेवले पाहिजे. सानेगुरुजी, दुर्गाबाई भागवत, सरोजिनी बाबर, मालतीबाई दांडेकर, कमलाबाई देशपांडे यांच्या प्रयत्नांनी त्यांतील अनेक अमोल रत्ने गवसली आहेत. संशोधकांच्या श्रमांनी प्रांतोप्रांतीच्या आणखीही रत्नमंजूषा उजेडात येत आहेत.

स्त्रियांची गाणी

यानतरच्या काळातील स्त्रियांची गाणीही उल्लेखनीय आहेत. श्रुटित ओव्यांपेक्षा यांना बाळसे जास्त. पौराणिक कथानकांवर ही गाणी स्त्रियांनी वेळोवेळी रचलेली असावीत. शेवटच्या ओळीत क्वचित कवयित्रींच्या नावाचा उल्लेख आढळतो. निंबी, द्रौपदीचा बंधु शोभे नारायण, गोकुळचा कान्हा, रासक्रीडा, अक्रुराची व उद्धवाची गाणी, मुद्रिका, धावे, शकुनाची गाणी, ही सर्व अत्यंत रसाळ, सोज्वळ व कोमल जिव्हाळ्यात भिजलेली असतात. त्यांत शृंगार (कृष्णसत्यभामेची गाणी, तुरा), हास्यरस (गंगापार्वती, लक्ष्मीसरस्वती कलह), करुण रस (अभिमन्यूची, चिलयाची गाणी), अद्भुत रस (द्रौपदीवस्त्रहरण, दुर्वासभोजन) नेहमीच्या वत्सल व भक्तिरसाबरोबर प्रगट होतात. वृद्ध स्त्रिया आपल्या गोड, कापऱ्या स्वरात ही गाणी म्हणू लागल्या की ऐकणारांचे अष्टभाव जागृत होतात.

अर्थात या प्राचीन स्त्री साहित्यातले विश्व संकुचित होते. स्वतःचे कुटुंब, स्वतःचा गाव या पलीकडे या अज्ञ, भाबड्या जीवांची नजर पोचत नव्हती. स्वतःच्या सासर-माहेरच्या कुटुंबाचे भले व्हावे यापलीकडे आदर्श नव्हते. ध्येये नव्हती. लोकसाहित्याचे सर्व गुण पूर्णांशाने या ओव्यांत, गीतांत, कहाण्यांत, लोककथांत होते. पण ज्याला ललित म्हणता येईल असे वाङ्मय अजून मराठीच्या कुशीत जन्मले नव्हते.

बहिणाबाईंच्या ओव्या

जुन्या स्त्रीगीतांच्या वळणावर लिहिणाऱ्या पण आधुनिक अभिजात वाङ्मयाच्या प्रसादखुणा प्रतिभेवर ल्यायलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. त्यांच्या ओव्या ग्रामीण स्त्रीजीवनाच्या दैनंदिनीवर आधारलेल्या आहेत व त्यांमध्ये जिव्हाळा, सहजसुंदर शब्दयोजना व समर्पक उपमा, उत्प्रेक्षा वगैरे गुण आढळतात. पण याहीपेक्षा उच्च पातळीवर जाऊन जीवनविषयक तत्त्वज्ञान अत्यंत

प्रगल्भ व उदार स्वरूपात प्रकट करण्याचे सामर्थ्य बहिणाबाईंच्या प्रतिभेत आहे. माणुसकीला विसरलेल्या, स्वार्थी, संकुचित जगाकडे पाहून त्यांचे कविहृदय पिळवटते व 'मानसा, मानसा, कधी व्हशील मानूस' असे कळवळ्याचे उद्गार बाहेर पडतात. त्यांची कल्पकता व सखोल चिंतनात्मकता 'मन पाखरू पाखरू' सारख्या हृदयंगम गीतात आढळून येते. खानदेशी, वऱ्हाडी भाषा व विनोदाची झालर यांनी या प्रसादपूर्ण, प्रगल्भ, उदात्त व प्रतिभाशाली गाण्यांची गोडी व रंजकता अधिकच वाढली आहे.

संत व भक्त कवयित्री

मराठी ललित साहित्याचा आरंभ महानुभावांपासून म्हणजे सुमारे सातशे वर्षांपूर्वी झाला असे मानतात. हे वाङ्मय गेल्या साठ-सत्तर वर्षांतच उजेडात आले व त्याच्या अभ्यासास सुरुवात झाली. स्त्रियांना अभिमान बाळगण्याजोगी गोष्ट आहे की त्या जुन्या काळात सुद्धा नाव घेण्याजोगी एक कवयित्री मराठी साहित्य भूषवून गेली. आद्य मराठी कवयित्री म्हणून महदाइसा (महदंबा किंवा रुपाई या नावानीही ही ओळखली जाते) प्रसिद्धी पावली आहे. शके १२०८ चे सुमारास हिने आपले 'धवळे' रचले. धवळे म्हणजे लग्नसमारंभात गावयाची वरविषयक गीते. महदाइसेने आपल्या धवळ्यात रुक्मिणीस्वयंवराची कथा गाइली आहे. भाषा ज्ञानेश्वरीसारखी असून आपल्या सहजसुंदर शैलीने, हुबेहूब वर्णनांनी, कौटुंबिक भावनांच्या जिव्हाळ्यांनी व स्त्रीस्वभाव-सहज बारीकसारीक तपशीलाच्या चटकदार मांडणीने हे धवळे संस्मरणीय झाले आहेत.

मराठी साहित्याच्या उषःकालात, संतवाङ्मयात, स्त्रियांची भक्तिरसपूर्ण वाणी माधुर्याने निनादली. त्या काळची स्त्री सुशिक्षित नसेल पण सुसंस्कृत खात्रीने होती. ज्ञानेश्वरी, अमृतानुभवासारखे अध्यात्मविद्येच्या गाढ व्यासंगावर आधारलेले ग्रंथ स्त्रियांनी लिहिले नाहीत. पण भक्तिरसाने ओथंबलेले व सर्वभूतीं समबुद्धी, निरभिमान, दया, क्षमा इत्यादी उदात्त तत्त्वे जिचे व्यवच्छेदक लक्षण त्या भारतीय मनोभूमिकेचे दर्शन घडवणारे शेकडो प्रासादिक अभंग लिहिणाऱ्या थोर कवयित्री या काळात होऊन गेल्या. समर्पणबुद्धी, सेवा, निष्ठा, हे स्त्रियांचे अंगभूत गुण भक्तिरसाला पोषक ठरले. अवघ्या पंधरा-सोळा वर्षांच्या मुक्ताबाईंचे ज्ञानेश्वरांना उद्देशून लिहिलेले ताटीचे अभंग अमर झाले आहेत. नामदेवाची 'दासी जनी' हिच्या अभंगातील साधा, सरळ, भाव, पांडुरंगाबद्दलची—'पंढरीची आई, विठाबाई' हिच्या ठायीची—निष्ठा व त्यामुळे कवनात आलेली उत्कटता कौतुकास्पद वाटते. तिसरी उल्लेखनीय कवयित्री संत तुकारामांची शिष्या बहिणाबाई. पंढरी व पंढरीनाथ यांच्या प्रेमाने भरलेले हिचे अभंग साधे व मोहक आहेत. अभंगवृत्तात लिहिलेले हिचे आत्मचरित्र रसाळ, प्रांजळ व तत्कालीन समाजरचनेवर व जनमनावर उत्तम प्रकाश टाकणारे आहे. समर्थ रामदासांच्या शिष्या वेणूबाई यांचे ओवीबद्ध सीतास्वयंवर, रेखीव व्यक्तिचित्रे व प्रभावी

निवेदन या वाङ्मयगुणांनी युक्त आहे. त्यांची मनुष्यस्वभावाची ओळख व उपहासगर्भ विनोदबुद्धी 'वद्दे राम लक्ष्मणा हे लिही रे' या मौजेच्या प्रकरणात स्पष्ट दिसते.

दीडशे वर्षे स्त्री मूक राहिली

संतकवींच्या नंतर मराठेशाहीत पंतकवी व शाहीर उदयास आले. या दोन्ही गटांत स्त्रिया चमकल्या नाहीत. पंतकवींच्या काव्यात व्युत्पन्नता, वृत्तबद्ध रचना, विद्वन्मान्य भाषालंकार, व संस्कृतप्रचुरता अपेक्षित असे. पद्धतशीर शिक्षणाला आचवलेल्या स्त्रियांना ही गुणाढ्यता आपल्या काव्यात आणणे शक्यच नव्हते. पेशवाईत पोवाडेलावण्यांनाही बहर आला होता. 'अबला' व 'भीरू' ठरलेली स्त्री वीररसाला अनभ्यस्त असल्यामुळे तिने पोवाडे रचणे शक्यच नव्हते. लावण्यांतल्या शृंगाररसाची स्त्री ही अधिष्ठात्री देवता असली तरी स्त्रीसहज शालीनतेमुळे 'तशा' लावण्या स्वतः लिहिण्याचा धीर तिला होणे सर्वस्वी असंभवनीय होते. 'सजणा'ला उद्देशून लिहिलेल्या लावण्या, त्यांतील विरहव्यथेची व्याकूळ, निर्भीड वर्णने, प्रणयमीलनाची आवाहने व आव्हाने पुरुषरचितच आहेत.

पेशवाईनंतर आंग्लाई आली. संतपंत कवींचा भाव उतरला, भक्तीचे मळे सुकून गेले. परमेश्वरस्तुतिपर काही वृत्तबद्ध रचना आढळते. पण बदललेली राजवट नवे दृष्टिकोण, नवे आदर्श व भिन्न आचारविचार घेऊन आली. त्यांचे प्रतिबिंब साहित्यात साहजिकच पडू लागले. इंग्लिश वाङ्मयाच्या अभ्यासाचा परिणाम मराठी साहित्यात अभिनव विषय व अभिव्यक्तीच्या व रचनेच्या नव्या पद्धती यांत दिसू लागला. नवे पाश्चात्य शिक्षण देणारी विद्यापीठे उघडली. स्त्रीशिक्षणावर त्या काळात बहिष्कार असल्यामुळे या नव्या शिक्षणाचा फायदा स्त्रियांना मिळाला नाही. पूर्वीच्या कवयित्रींना उपयोगी पडलेले पुराणकीर्तनश्रवण, भजन व त्यायोगे येणारी बहुश्रुतता व मिळणारे ज्ञान या आधुनिक साहित्यनिर्मितीला पुरे पडणारे नव्हते. स्त्रियांना सहज जमणारी ओवी, अभंग इत्यादी कवनवाहनेही मागे पडली. त्यामुळे या मध्यंतरीच्या जवळजवळ दीडशे वर्षांच्या काळात स्त्रियांचा आवाज मराठी साहित्यात उमटला नाही.

जुन्या पिढीतील लेखिका व कवयित्री

आंग्लाईच्या प्रारंभीचा मराठी वाङ्मयाचा हा 'इंग्लिश अवतार' फारसा मौलिक व उच्च दर्जाचा नव्हताच, पण मग एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, चिपळूणकरी युग सुरू झाले व खऱ्या अर्थाने अर्वाचीन मराठी साहित्याचा नारळ फुटला. यावेळेपावेतो पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रीशिक्षणाला सुरवात झाली होती. मराठी साहित्यात, देशाच्या इतर दुखण्यांप्रमाणे 'स्त्रियांच्या परवशते'लाही वाचा फुटत होती. हरिभाऊ आपटे, आगरकर, वगैरे स्त्रियांच्या कैवाऱ्यांनी स्त्रियांच्या दुर्दशेचे चित्र वाङ्मयात उभे केले. पूर्वी चार भिंतीत कोंडलेली स्त्री हळूहळू मोकळ्या हवेत येऊ

लागली. पडद्यामागची पडद्यावर दिसू लागली. तिचे अस्तित्व जाणवू लागले. तिची दखल घेण्याची जरुरी उत्पन्न झाली. स्त्रियांना शिक्षण घेऊन पुढे येण्याला पुरुषांनी मदत केली. हळूहळू उदारमतवादी पुरुष स्त्रियांना वाङ्मयनिर्मिती करण्यास उत्तेजन देऊ लागले. सुसंस्कृत वर्तुळात वावरणाऱ्या स्त्रियांनी साहित्याच्या दालनात डोकावण्यास सुरुवात केली. काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, साधे सोपे गद्य निबंध, कथा, कादंबरी या स्वरूपात लिहू लागल्या. पण वाङ्मयकर्तृत्वातील स्त्रियांची मूळ परंपरा कवित्वाची. त्यामुळे काव्यप्रांतात स्त्रियांचा संचार जास्त सहजपणे होऊ लागला. जुन्या स्त्रीगीतांच्या वळणावर श्री. पार्वतीबाई गोखले, कृष्णाबाई गाडगीळ व केशवसुती संप्रदायात लक्ष्मीबाई टिळक, सरस्वतीबाई भिडे, सारजाबाई बापट, अपर्णाबाई देशपांडे वगैरे कवयित्री लिहू लागल्या. पतिप्रेम, अपत्यस्नेह, माहेरचा जिव्हाळा या जुन्या विषयांना नवीन कलाटणी मिळाली व निसर्ग, देश, दलितवर्ग वगैरे नवीन विषय व समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व वगैरे नवीन तत्त्वज्ञान प्रकट होऊ लागले. स्त्रियांच्या जिव्हाळ्याचे विषय, विधवेची करुण स्थिती, परित्यक्तेचे केविलवाणे जीवन वगैरे विषय अर्थात वरचेवर या काव्यात येतच.

केशवसुतांनंतर सुरू झालेल्या रविकिरण-मंडळाच्या संप्रदायात मनोरमाबाई रानडे यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. कमलाबाई देशपांडे, विमलाबाई देशपांडे, इंदिरा संत वगैरे कवयित्री या काळात लिहू लागल्या. विषय व भावना या काळात पूर्वीचीच होती पण अभिव्यक्तीत बंधनापलीकडे जाण्याची ऊर्मी होती.

नवकाव्याच्या पाईक कवयित्री

१९३० चे सुमारास नवकाव्याचे युग सुरू झाले. मर्ढेकर हे या युगाचे प्रणेते. 'सत्यं शिवं सुंदरम्' चे जुने साहित्यसंकेत नवकवींनी धाब्यावर बसविले. ध्येयवादाची रोमँटिक धुंदी झाडून टाकून कठोर, नागडी वास्तवता तितक्याच नागड्या शब्दात उघडी केली. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमेत आलेले वैफल्य, उजाड झालेले जीवन, दारुण वर्तमानकाळ व भकास भविष्यकाळ यांची 'कालीघटा' आमच्याकडेही दाटून राहिली. बहुजनसमाजातील नकारघंटा कानात घणघणू लागून वीणेचा मधुर झंकार लोपून गेला. वृत्ताच्या, जातीच्या, लयबद्धतेच्या, कुठल्याच काव्यगुणाच्या खोड्यांतील अडकवून घेणे नवकवींना पसंत नव्हते. आपला आशय व्यक्त करण्याला उपलब्ध शब्दविश्व नवकवींना पुरेनासे झाले. जुन्या उपमा उत्प्रेक्षा शिळ्या झाल्या. यंत्रयुगातल्या नव्या प्रतिमा उपयोगात आल्या. अभिव्यक्तीच्या या धडपडीत काव्यात क्लिष्टता, अर्थहीनता, असुंदरता, शिरली. कवी व वाचक दोघेही गोंधळून गेले. अनोळखी रुक्ष, गद्य भासणाऱ्या प्रतिमांच्या चक्रव्यूहात दोघेही सापडत व आशयाच्या मध्यबिंदूला पोचण्याचा रस्ता हरवून बसत. काही काळाने नवकाव्यातले तत्त्वज्ञान, गृहीतमूल्यांविरुद्ध बंड — मग ती मूल्ये जीवनातली असोत की साहित्यातील असोत — काहीसे वाचकांच्या पचनी पडले.

पण नवकाव्यातील वास्तवदर्शनाच्या अट्टाहासाने त्यांत शिरलेली अभद्रता, नव्या प्रतिमांच्या आग्रहामुळे आलेली सौंदर्यहीनता व खडबडीत शब्दांमुळे व बेबंद रचनेमुळे आलेली अर्थहीनता व लोपलेले नादमाधुर्य वाचकांना अजून रुचत नाही.

स्त्रियांच्या अंगोपांगी कोमलता, सुरेलपणा व शालीनता मुरलेली असल्यामुळे अगदी नव्या म्हणविल्या जाणाऱ्या कवयित्रींमध्येही कर्कशपणा, खडबडीतपणा व अभद्र अश्लीलता आढळत नाही. इंदिरा संत, संजीवनी मराठे, शांता शेळके, पद्मा, शिरीष पै, निर्मला देशपांडे, मेघल, अनुराधा पोतदार, वगैरे कवयित्री नव्या युगाच्या पाईक आहेत. यापैकी इंदिरा संत यांच्या नावाने पहिले बोट घालावे लागेल. आरंभी पतीच्या जोडीने केशवसुती संप्रदायात त्यांनी कविता लिहिल्या. पतिप्रेम हा त्यांच्या कवितांचा स्थायीभाव होता. वात्सल्य वगैरे स्त्री-हृदयातील नाजुक भावनांची गुंफणही त्या हळुवार हाताने उकलून दाखवीत. शेला, मेंदी या कवितासंग्रहात ही जुन्या वळणाची कविता आढळते. पण इंदिराबाईंनी फार झपाट्याने नवकाव्याच्या परंपरेत प्रवेश करून घेतला. मुक्तछंदाचा वापर, आशयाच्या अभिव्यक्तीसाठी यंत्रयुगातल्या प्रतिमांचा उपयोग व अंतर्मनात खोल खोल शिरून तेथील भावनांची पिंजण, ही नवकाव्याची लक्षणे त्यांनी आत्मसात केली. इतर नवकवींइतक्या वैफल्याने त्या ग्रासल्या नसल्या तरी नैराश्याची दाट छटा त्यांच्या निसर्ग व मानवविषयक काव्यात स्पष्ट दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लाभणाऱ्या अपार समृद्धीची सुखस्वप्ने नियतीच्या व प्रतिकूल परिस्थितीच्या टाचेखाली चिरडून जात असलेली पाहून इंदिराबाईंचे कविहृदय कातर होते. 'मृगजळ' 'रंगबावरी' या अलीकडच्या कवितासंग्रहात ही अगतिकता व तद्भव विषण्णता स्पष्ट दिसते.

शांताबाई शेळके या जुन्या रोमँटिक संप्रदायातल्या. त्या काव्य जगतात व काव्य लिहितात. कुसुमकोमल भावना वीणाझंकारासारख्या नादमधुर शब्दात गुंफणे हा त्यांचा कविमनोधर्म. 'वर्षा' मधल्या धुंद प्रणयाच्या मोहिनीची जागा पुढे 'रूपसी'त विषण्णतेने घेतली आहे. जगातील दुःखदैन्याने जीव घुसमटून कवयित्री जणू स्वतःच्याच अंतर्मनात मान खुपसून बसते. शांताबाईंना सौंदर्याची तहान आहे. निसर्गावर त्यांची प्रीति आहे. त्यांच्या प्रसादपूर्ण शैलीत या भावना संथ, शांत लयीत वाहात राहतात.

संजीवनी मराठे याही जुन्या रोमँटिक परंपरेतल्याच. पण त्यांच्या 'छाया' व 'चित्रा' या अलीकडच्या संग्रहांत त्या आपली प्रेरणा नवीन आशयाच्या संदर्भात नव्या रचनाप्रकारात बसवू पाहात आहेत असे वाटते. कौटुंबिक जिव्हाळा, अपत्यस्नेह, ईश्वरनिष्ठा, सृष्टिप्रेम, देशभक्ती हे जुनेच विषय नवीन आशयात नटवण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. भारताच्या फाळणीने त्यांचे कविहृदय फाटलेले दिसते. स्त्रीच्या नव्या युगातील नव्या अवताराची त्यांना जाणीव आहे. 'स्त्री माझे नाव'या कवितेत स्त्रीजीवनात प्रकटलेल्या नव्या क्षितिजांची त्यांनी दखल घेतली आहे. स्त्रीने कुटुंबाच्या पसाऱ्यातच केवळ गुरफटून न राहाता आदर्श नागरिक, वैज्ञानिक, समाजसेवक,

राजकारणी व्यक्ती वगैरे बनण्याची महत्त्वाकांक्षा ठेवली पाहिजे, या स्त्रियांत जागृत होणाऱ्या नव्या जाणिवेला या कवितेत वाचा फोडली आहे. सुरेल व भावपूर्ण आवाजाने कवींच्या मैफलीत आपल्या कविता गाऊन दाखवणाऱ्या संजीवनीबाईंची मराठी साहित्यातील कामगिरी उल्लेखनीय आहे. 'पद्मा' यांच्या 'नीहार' मध्ये मातृवात्सल्य, प्रणय, निसर्ग या विषयांवर मनोज्ञ कल्पकतेने मृदु भावना गुंफल्या आहेत. 'आपाद' सारख्या कवितांत त्यांनी नवीन प्रतिमा व छंदाचाही उपयोग केलेला आढळतो. त्या समतावादाच्या कैवारी असून 'नवीन स्त्री' त्यांच्या काव्यात वजावताना दिसते.

'नाही मी नुसती मादी, मी माणूस, माणूस आधी.'

निर्मला देशपांडे याच्या 'गंधखुळी'मध्ये प्रणयभावना, सृष्टिसौंदर्य, निरागस वाल्य, सौंदर्यपूजा यांच्या जोडीला खेळकरवृत्ती व विनोदबुद्धी आहे. शिरीष पै, मेवल यानी स्त्रीमनाबरोबर बालमनाचेही विश्लेषण केलेले त्यांच्या कवितांवरून दिसून येते. अपर्णा देशपांडे, इंदिरा तेलंग, ललितकुमारी भट इत्यादी कवयित्रींनी स्त्री-जीवनातल्या विविध पैलूंभोवती वेढलेल्या भावनांचा आविष्कार मधुर कवितांतून केला आहे. लक्ष्मीबाई टिळक यांच्या ख्रिस्तायनसारखे महाकाव्य रचण्याचा प्रयत्न मात्र अद्याप कोणा कवयित्रीने केला नाही.

जुन्या जमान्यातील गद्य लेखिका—तंत्राचा विकास

प्राचीन ओव्या व स्त्रीगीते जितक्या प्रमाणात उपलब्ध आहेत व प्रचारातही आहेत, तितक्या प्रमाणात गद्य लोकसाहित्य, नागरी भागात तरी आढळत नाही. वेळोवेळी कहाण्यांची काय उजळणी होत असेल तेवढीच. पण आंग्लाईनंतर स्त्रीने साहित्यात प्रवेश केला तो मुख्यत्वे गद्यविभागात. काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, वामनसुता वगैरे पहिल्या लेखिका लहान लेख व गोष्टी 'मनोरंजन'सारख्या मासिकात लिहू लागल्या. यात समाजातील व्यावहारिक गोष्टींचा उहापोह व साध्या नीतितत्त्वांचा बोध असे. या 'चांदण्यातील गप्पा' व 'शिळोप्याच्या गोष्टीत विशेष कलेचे अवडंबर नसून अगदी रोजच्या भाषेत सरळ गोष्ट किंवा वागण्याबोलण्याबद्दल उपदेश गोवलेला असे. स्त्रीच्या नजरेतून रेखाटलेले स्त्रीजगत पहिल्यानेच आधुनिक वाङ्मयात आणणाऱ्या, या लेखिकांचे महत्त्व विशेष आहे. त्यांचे लेखन काहीसे पाल्हाळिक असले व त्यात रचनाकौशल्याचा अभाव भासला तरी स्त्रीसाहित्यात त्यांचे स्थान अढळ आहे. आनंदीबाई शिर्के यांच्या लेखनात कलात्मक मांडणीचे प्रथम दर्शन होते. 'बेगम दिलआरा'ही त्यांची गोष्ट खूप गाजली. कथानकातील गुंतागुंत, त्यात गुंफलेले रहस्य व शेवटची आश्चर्यजनक उकल यायोगे त्यांनी अद्भुत रस निर्माण केला. "साहित्य निर्माण करण्याला नुसते वास्तवदर्शन पुरत नाही. त्या दर्शनात एक तंत्र असते. नीतिबोध 'खरे सत्य बोला, यथातथ्य चाला' या रामदासी थाटात करणे ललित

साहित्यात वसत नाही. कलात्मक सूचकता इच्छित हेतू जास्त यशस्वी रीत्या साधून देते." वगैरे दंडक लेखिकांना हळूहळू ज्ञात होत होते व त्यांच्या लेखणीत उतरत होते.

स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबरोबर माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. त्यांचे चार भिंतींतले जग हळूहळू रुंदावू लागले. स्त्रियांच्या प्रगतीच्या मार्गावर समाजाकडून व कुटुंबियांकडून कळत वा न कळत निर्माण होणारे अडथळे, तिची आर्थिक परवशता व कायदेशीर दुर्दशा स्त्रियांच्या लिखाणात प्रकट होऊ लागली. कथेचे तंत्रही आटोपशीर, एकसूत्री व प्रभावी होऊन ती 'लघुकथा' बनली. १९२० ते १९३२ या वर्षांत अनेक स्त्रियांनी लघुकथेच्या प्रांतात हजिरी लावली. शहरातील मध्यमवर्गाचे जीवन व विशेषतः या वर्गातील स्त्रियांचे जीवन हा मध्यवर्ती विषय बहुतेक सर्व लेखिकांचा होता. क्षमाबाई राव या नामवंत लेखिकेने तर कोळी, कोष्टी व कामकरी वर्ग यांच्या जीवनावर व समस्यांवरही कथा लिहिल्या. वास्तवपूर्ण वातावरण निर्माण करण्याचे त्यांचे कौशल्य व कथांतील रेखीव व्यक्तिचित्रण वाखाणण्याजोगे आहे. 'कृष्णाबाई' या नावाने लिहिणाऱ्या मुक्ताबाई दीक्षित याही एक अत्यंत समर्थ कथालेखिका होत्या. ढोबळ घटनांचे स्थूल चित्रण करण्यापेक्षा त्यांच्या मागली व्यक्तींची मनोभूमिका विश्लेषण्याची त्यांची हातोटी वर्णनीय आहे. वैवाहिक जीवनातील अनेक समस्या त्यांनी आपल्या कथांतून हाताळल्या. कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या चिंतनशील मनोवृत्तीने व तिच्या काव्यात्मक आविष्काराने लघुकथेला आगळीच शोभा आणली. लघुकथेच्या आता ठरून गेलेल्या पारंपरिक तंत्राकडे त्या विशेष लक्ष देत नसत. त्यांच्या कथांना 'भावचित्रे' हे नाव कदाचित जास्त साजून दिसेल. विदर्भातल्या श्रमजीवी वर्गातल्या व्यक्तींचे त्यांचे चित्रण वास्तवदर्शी व हृदयस्पर्शी आहे. नाना थरांतल्या स्त्रियांच्या भावनांचे त्यांनी अत्यंत नाजूक कलात्मक हाताने विश्लेषण केले आहे.

लघुकथेचे तंत्र आत्मसात करून प्रवाही निवेदनशैलीने स्त्रीजीवनाचे यथातथ्य चित्रण करणाऱ्या कितीतरी लेखिकांची नावे सांगता येतील. कुमुदिनी रांगणेकर, पिरोज आनंदकर, शशिकला आळंदकर, शांताबाई नाशिककर, कमला फडके, तारा कुलकर्णी, दया पटवर्धन, हिरा कर्नाड, आनंदीबाई जयवंत वगैरे लेखिकांनी मराठी साहित्यात चांगली कामगिरी बजावली आहे.

लघुकथेच्या दालनात क्रांतिकारक बदल — विभावरी शिरूरकर

१९३३ च्या सुमारास लघुकथेच्या प्रांतात विशेषतः लेखिकांच्या दालनात एक क्रांतिकारक बदल घडून आला. विभावरी शिरूरकर यांच्या 'कळ्यांच्या निःश्वासाने' खूपच खळबळ उडवून दिली. य. गो. जोशींप्रमाणे लघुकथेच्या तंत्राविरुद्ध बंड या कथांत होतेच. शिवाय समाजाच्या स्त्रियांच्या भावनांबद्दलच्या सोयीस्कर समज वा अपसमजां-विरुद्ध बंडाचे निशाण उभारले होते. या सुमारास महाराष्ट्रात सुशिक्षित स्त्रियांची

एक पिढी शिकून तयार झाली होती. पांढरपेशा समाज आपल्या या स्त्रीविषयक उदार धोरणाबद्दल आत्मसंतुष्ट वृत्तीने पाठ थोपटून घेत होता. पण शिक्षण घेतल्यामुळे ज्या नव्या समस्या स्त्रीजीवनात उभ्या राहिल्या त्या विभावरीबाईंनी परखडपणे, वेळी स्त्रीसहज संकोच मोठ्या धैर्याने बाजूला सारून समाजापुढे ठेवल्या. शिक्षणामुळे आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर 'बाबांचा संसार' सावरण्याचे प्रौढ कुमारिकांच्या नशिबी येते व त्यांचे स्वतःचे संसार बाजूलाच राहातात. ह्या कळ्या न उमलताच कोमेजून जातात. शिक्षणामुळे स्त्री आपल्या पायावर उभी राहिली, अशा भ्रमात असलेल्या समाजाला, समाजकंटक त्यांच्या मार्गात सुरुंग कसे पेरीत असतात हे विभावरीबाईंनी दाखवून दिले. प्रौढ कुमारिकांच्या विवाहाच्या मार्गात येणारे अडथळे, आंतरजातीय विवाहितांची दु:खे, स्त्री घराबाहेर पडून पुरुषसमाजात मिसळू लागल्यामुळे तिला सोसावी लागणारी लोकनिंदा, विवाहापूर्वी अमृत भासणाऱ्या प्रेमाचे नंतर होणारे विष, वगैरे विषयांभोवती कथानके गुंफून केवळ स्त्रीशिक्षण वाढल्याने स्त्रीजीवनातील समस्या सुटणार नाहीत, त्यासाठी समाजाचा व स्वतः स्त्रीचाही स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोण बदलला पाहिजे हे विभावरीबाईंनी प्रांजळपणे दाखवून दिले. पुरुष हा मधुकर वृत्तीचा स्वभावतःच असतो अशी त्याच्या निष्ठाभावाबद्दल सारवासारव करून समाजाने एकनिष्ठता स्त्रीवर लादली आहे. पण स्त्रीलाही भिन्न भिन्न व्यक्तिमत्वाचे आकर्षण असणे अपरिहार्य आहे असे धीटपणे विभावरीबाईंनी प्रतिपादिले. स्त्रियांबद्दलच्या गोंडस, सोईस्कर, खोट्या कल्पना खोडून काढून त्यांच्या भावनांचे सत्य चित्रण धीटपणे करणाऱ्या व त्यांत अनैसर्गिक असे काही नाही असे बजावणाऱ्या विभावरीबाईंची साहित्यातील कामगिरी प्रशंसनीय व अविस्मरणीय आहे. ।

'नवकथे'चा उदय — स्त्रियांनी केलेली विपुल निर्मिती

१९२० ते १९४५ या काळाला फडके-खांडेकर युग म्हणता येईल. फडक्यांची कला व खांडेकरांचा समाजचित्रण व समाजशिक्षण याबद्दलचा अभिनिवेश बहुतेक सर्व लेखिकांनी या काळात उचलला होता. १९४५ पासून 'नवकथा' साहित्यात प्रवेश करू लागली. गाडगीळ, गोखले वगैरे लघुकथालेखकांनी लघुकथेच्या आशयात व अभिव्यक्तीत क्रांती घडवून आणली. लघुकथेच्या तंत्राची चौकट धोंडज व बध्धड म्हणून त्यांनी निखळून टाकली. आकर्षक आरंभ, परिणामकारक शेवट वगैरे विशेषांनी नटलेले कथानक त्यांना कृत्रिम, अवास्तव वाटू लागले. परिणामाची उत्कटता साधणे, कथानकाच्या वाटचालीत एकसूत्रीपणा कटाक्षाने राखणे अनैसर्गिक व म्हणून त्याज्य ठरले. प्रत्यक्ष जीवनात कुठे एकसूत्रता, सुसंगती, उत्कटता असते? जीवन जसे त्रुटित, विस्कळित असते तसेच त्याचे प्रामाणिक चित्रण पाहिजे. वातावरणनिर्मितीपेक्षा व्यक्तीच्या सुप्त अंतर्मनाचा धागा न् धागा पिंजणे हाच लघुकथेचा आत्मा ठरला. निवेदन शैलीतही क्रांती झाली. व्यक्तीच्या अंतर्मनातल्या संज्ञाप्रवाहाचे वर्णन नानाविध प्रतिमांच्या योगे जास्त समर्पक

होईल अशी धारणा झाली. सुसंगत निवेदन कृत्रिम व म्हणून दोषपात्र ठरले. या अभिनव अभिव्यक्तीमुळे वाचकाला प्रथम आशयाचा समज पडत नाही. पण एकदा सूर पकडला गेला की मग मात्र विजेसारखा आशय अंतःकरणाला चटका देऊन जातो. मानव, समाज, निसर्ग यांकडे बघण्याचा नवकथालेखकांचा हा दृष्टिकोण व त्यांच्या अनुभूतीचे हे चित्रण वाचकाला एका नव्याच उच्च पातळीवरच्या जगात घेऊन जाते.

या नवकथासंप्रदायातल्या लेखिकांत विजया राजाध्यक्ष, वसुंधरा पटवर्धन, कमल देसाई, इंदिरा संत व शिरीष पै यांची नावे घालता येतील. अंतर्मनातील अतिसूक्ष्म भावनाकल्पनांचे चित्रण, या चित्रणांची वाहने म्हणून वापरात आलेल्या नवनव्या प्रतिमा, कथानकाची एकसूत्रता व परिणामाची उत्कटता यांपेक्षा कल्पनाभावनांच्या पिंजण्यावर भर ही या लेखिकांची वैशिष्ट्ये. पुरुष लेखकांच्या नवकथांत आढळणारी दुर्बोधता व अभद्रता मात्र या नवकथालेखिकांत सापडत नाही. त्यांचा प्रांजळपणा व वास्तवाशी राखलेली प्रामाणिकता शालीनतेची मर्यादा कधी ओलांडीत नाही. स्त्रीजीवनातल्या समस्या वाचकांच्या मनावर ठसवण्याची कळकळ त्यांना दुर्बोधतेपासून दूर ठेवते. मिळवत्या स्त्रियांच्या समस्या, गृहसंसार व व्यवसाय या द्विदल जबाबदारीमुळे स्त्रियांच्या जीवनात उडणारी तारांबळ पुरुषांच्या व समाजाच्या स्त्रीजीवनाकडे पाहाण्याच्या सरंजामशाहीत शोभणाऱ्या दृष्टिकोणामुळे स्त्रीजीवनात उद्भवणारी संकटपरंपरा हे नव्या पिढीतील लेखिकांचे विषय आहेत. विजया राजाध्यक्ष यांच्या लघुकथांमध्ये जीवनाकडे पाहाण्याचा अभिनव दृष्टिकोण स्पष्ट प्रतीत होतो. प्रतिमांच्या साहाय्याने मनोविश्लेषण रेखाटण्याची त्यांची हातोटी प्रशंसनीय आहे. अविवाहित मुलींना पुरुषसहवासाबद्दल वाटणारे आकर्षण, स्त्रीच्या भावनाशी पुरुषांचा खेळ, नवीन जीव जगात आणताना स्त्रीला होणाऱ्या विलक्षण संवेदना, स्त्रीपुरुषसमागमाचे निःसंकोच वर्णन वगैरे विषय लघुकथांतून मांडताना विजयाबाईंची असामान्य संवेदनक्षमता व अभिव्यक्तीची समर्थता दिसून येते. कमल देसाई यांच्या लेखणीत मनोविश्लेषणाचे कसब व प्रतिमानिर्मितीचे कौशल्य आहे. शिरीष पै स्त्रीजीवनातील नाना प्रश्न व स्त्रीहृदयातील विविध भावना पुढे मांडतात. उत्कृष्ट निवेदनशैली व रेखीव व्यक्तिचित्रे यांनी त्यांच्या लघुकथा मनात भरतात. वसुंधरा पटवर्धन यांचे लेखन विपुल, विविध व गुणाढ्य आहे. मनोविश्लेषण, साध्या विषयात मोठा आशय हुडकणे, सामान्य व्यक्तीतील लक्ष वेधून घेईल अशा विशेषावर नेमके बोट ठेवून तिचे आकर्षक चित्र रेखाटणे हे त्यांचे विशेष गुण होत. याखेरीज सरोजिनी बाबर, स्नेहलता दसनूरकर, योगिनी जोगळेकर, सुशीला चिकटे, शांता शेळके, तारा वनारसे, सरिता पदकी, कृष्णाबाई मोटे, हिरा कर्नाड, दुर्गा भागवत, सुमती घनवटे, इंदिरा संत, इंद्रायणी सावकार, दीपा गोवारीकर, विजया काळे, वगैरे अनेक लेखिकांनी लघुकथेच्या क्षेत्रात नाव कमावले आहे. स्त्रीजीवन, बालमानस, दलितदैन्य वगैरे जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून त्यांनी साहित्यात बहुमोल भर घातली आहे.

कादंबरी लेखिका—जुन्या व नव्या

लघुकथेच्या क्षेत्रात स्त्रियांनी जितका विपुल संचार केला तितका कादंबरीच्या क्षेत्रात केलेला दिसत नाही. एक तर कादंबरी लिहिण्याला जितका दीर्घ अवसर व चिंतनक्षात्तत्य लागते तितके प्रापंचिक व व्यवसायात पडलेल्या स्त्रियांना लाभत नाही. दुसरे लघुकथांना मासिकांतून चटकन प्रसिद्धी मिळते. कादंबरी प्रकाशित करणे कठीण पडते. नवोदित लेखिकांना प्रकाशक भेटत नाही व स्वतः पदरमोड करून कादंबरी प्रसिद्ध करणे सर्वच लेखिकांना शक्य नसते. कादंबरीलेखनाचे तंत्र जास्त कठीण असते. लघुकथेपेक्षा कादंबरीला कल्पनेची जास्त व्यापक भरारी व मोठ्या प्रमाणावर सृजनक्षमता आवश्यक असते. जुन्या पिढीतल्या स्त्रिया इथे उण्या पडत. नव्या पिढीला जास्त पुस्तकी शिक्षण लाभत असल्यामुळे व त्यांच्या अनुभूतीच्या कक्षा समाजाच्या बदलत्या घडीमुळे जास्त रुंदावल्यामुळे कादंबरीलेखिकांची संख्या दिवसानुदिवस वाढत आहे.

मराठी कादंबरीला सुरुवात बाबा पदमनजी यांच्या 'यमुनापर्यटन' पासून म्हणजे १८५७ पासून झाली. पुढे हरि नारायण आपटे युग, वा. म. जोशी युग व फडके-खांडेकर युग आले. काशीताई कानिटकर, जानकीबाई देसाई, इंदिराबाई सहस्रबुद्धे, शांताबाई नाशिककर वगैरे काही लेखिकांची नावे स्त्रीजीवनावर आधारलेल्या कादंबऱ्यांच्या लेखिका म्हणून आपटे संप्रदायात घालता येतील. कमला फडके, शांता दोळके, सुमती धनवटे, शकुंतला गोगटे यांनी फडक्यांचा कलावाद व सौंदर्यवाद उचललेला दिसतो. पण १९३० पासून बहुतेक लेखिकांवर खांडेकरांच्या 'जीवनासाठी साहित्य' या तत्त्वज्ञानाचा परिणाम झालेला दिसून येतो. स्त्रियांच्या जीवनात शिक्षणामुळे, समान हक्कांच्या मागणीमुळे व आर्थिक स्वातंत्र्यामुळे जी क्रांती झाली तिच्या परिणामाचे खळबळ उडविणारे चित्र कादंबरीतून रेखाटणाऱ्या पहिल्या कादंबरीकार विभावरी शिरूरकर ऊर्फ मालतीबाई बेडेकर होत. विरलेले स्वप्न, हिंदोळ्यावर, दोघांचे विश्व, शबरी या कादंबऱ्यांतून स्त्रियांच्या भावविश्वांची झालेली उलथापालथ त्यांनी समर्थपणे व कलात्मकतेने रेखाटली आहे. गीता साने यांच्या 'वठलेला वृक्ष', 'हिरवळीखाली' वगैरे कादंबऱ्यांतही स्त्री जीवनातल्या समस्यांची रोखठोक चर्चा आहे.

कादंबरीक्षेत्रातील दोन प्रवाह

१९३६चे सुमारास नवेनवे विचारप्रवाह साहित्यावर आपले ठसे उमटवू लागले. जुन्या सामाजिक मूल्यांना 'नवनीतिवाद' आव्हान देऊ लागला. या बदलत्या सामाजिक मूल्यांचे चित्रण कादंबऱ्यांतून होऊ लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमेकडे सर्वत्र जुनी जीवनमूल्ये कोलमडून पडली व त्यांचे पडसाद पूर्वेकडे उमटू लागले. देशभक्ती, कौटुंबिक जिव्हाळा, एकनिष्ठा, प्रेम, स्वार्थत्याग, ही सर्व वरवरची पांघरुणे असून त्यांच्या पाठीमागे स्वार्थ, फितुरी, लोभ, मौर्य, वासना, द्वेष यांचा नंगा नाच चालू

असतो हे समाजातील 'नाही रे'च्या अनुभवास येऊ लागले. मूठभर सत्ताधारी 'आहे रे'चे मुखवटे ओढून काढून पाठीमागील कटू व ओंगळ सत्याचे दर्शन साहित्यातून घडवण्याकडे साहित्यिकांची प्रवृत्ती होऊ लागली. पूर्वीच्या 'सत्य सुंदर शिव'च्या मागले 'खोटं खराब खवट' बाहेर पडू लागले. समाजात व मानवी मनात दाटून राहिलेल्या या घाणीचा निचरा झाल्याखेरीज समाजाचे व देशाचे 'श्रेयस्' साधणार नव्हते. यामुळे 'प्रेयस्'ची आराधना सोडून देऊन 'श्रेयस्'वर अंतिम हित साधणाऱ्या गोष्टींवर साहित्य केंद्रित होऊ लागले. या उपसलेल्या घाणीने उबग येऊन, साहित्य-मूल्यांचा लोप झाल्याचा ओरडा होऊ लागला. पण खरे पाहू जाता, साहित्याचे अवमूल्यन झाले नसून मानवी जीवनाची मूल्ये ढासळत आहेत, व त्यांना सावरण्यासाठी हा साहित्यशिमगा साजरा करावा लागत आहे; तथाकथित मूल्यांची–चौदा कॅरट मूल्यांची–होळी करून दोन्ही हातांनी फाल्गुनमास गाजवल्याखेरीज बावनकशी साहित्यसुवर्ण गवसणार नाही व भविष्याचा वसंतकाल जीवनात व तदनंतर साहित्यात अवतणार नाही अशा या नवसाहित्यिकांचा दावा आहे. 'एक शून्य बाजीराव' सारखी नाटके, 'वासुनाका', 'अजगर' वगैरे कादंबऱ्या यामागची ही भूमिका असावी.

या नव्या प्रेरणेनुसार मराठी कादंबरीवाङ्मयात दोन नवीन प्रथा सुरू झाल्या. मनुष्याच्या अंतर्मनातले संज्ञाप्रवाह त्यांच्या अतीव सूक्ष्म स्वरूपात निरखून, त्या संदर्भात त्यांच्या समाजातील वागणुकीचा अर्थ उलगडणे हा पहिला प्रकार. इंग्लिश वाङ्मयातील डी. एच. लॉरेन्स, व्हर्जीनिआ वुल्फ वगैरेंपासून स्फूर्ती घेऊन मर्ढेकर, कानेटकर, खानोलकर, शेळके, दळवी, भाऊ पाध्ये वगैरे लेखक लिहू लागले, व अभद्र, असुंदर व विसंगत लिहिल्याबद्दल समाजाच्या तिरस्काराचे व काही समीक्षकांच्या दारुण टीकास्त्राचे लक्ष्य बनले. मात्र या संज्ञाप्रवाहाच्या मार्गावर लेखिकांची पावले अजून उमटलेली दिसत नाहीत. लघुकथेच्या क्षेत्रात काही लेखिकांनी या तंत्राचा वापर केलेला आपण पाहिलाच; पण कादंबरीक्षेत्रात तसे प्रयत्न झालेले नाहीत.

मराठी कादंबरीक्षेत्रातला दुसरा प्रवाह म्हणजे प्रादेशिक कादंबऱ्या. स्वतंत्र भारतात भावनात्मक एकता येण्यासाठी प्रांताप्रांतांतले, समाजातले निरनिराळे थर उजेडात आणून समजून देणे आवश्यक वाटू लागले आहे. बर्वे, दिघे, दांडेकर, पेंडसे, माडगुळकर या लेखकांनी अशा प्रादेशिक कादंबऱ्या लिहून दलित, रुग्ण, गुन्हेगार मानवांचे व अज्ञात व उपेक्षित भूभागाचे जीवन सहानुभूतीच्या 'क्ष' किरणांनी प्रकाशित केले. लेखिकांनीही या महत्त्वाच्या कामगिरीला हातभार लावला आहे. मांगगारुडी जातीच्या जीवनावर मालतीबाई बेडेकर यांनी 'बळी' ही कादंबरी लिहिली आहे. शांता शेळके यांनी कोष्टी लोकजीवनावर व सरोजिनी बाबर यांनी ग्रामीण जीवनावर कादंबऱ्या लिहून त्या त्या थरातील समाजाचे व व्यक्तीचे यथातथ्य दर्शन घडवले आहे. प्रांजळ हृदयाची, फटकळ जिभेची, उथळ सभ्यतेला अनभ्यस्त अशी ही माणसे नागरी मनाला निराळेपणामुळे चटका लावतात, व खडबडीत आवरणाखाली

पाझरणाऱ्या निर्मळ माणुसकीची व सुसंस्कृत जग ज्या मानवतेची पूजा बांधते तिची जात एकच आहे ही अंतरीची खूण पटून नागरीग्रामीण एकात्मता होते.

स्त्रीलेखकांची कामगिरी खांडेकरी परंपरेमध्ये

*याप्रमाणे कादंबरीक्षेत्रातल्या या दोन प्रवाहांनी सामाजिक परिस्थिती व अंतर्मना*तील दुराकलनीय भावनोद्रेक यांनी मानव कसा घडला गेला आहे याचे दर्शन घडवून महाराष्ट्रातील प्रांतांच्या व समाजाच्या विविध थरात समीपता आणली व सर्वाभूती वास करणाऱ्या माणुसकीच्या एकाच धाग्याची जाणीव उत्पन्न करून सायुज्यता साधली. पण या अत्युच्च भूमिकेवरून कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखिकांची संख्या अद्यापि अत्यल्प आहे, व बव्हंशी खांडेकरी परंपरेत सामाजिक आशयाच्या कादंबऱ्या लिहिण्याकडे लेखिकांची प्रवृत्ती विशेष आढळते. एकंदरीत जीवनातील ध्येयशून्यता व तत्वभ्रष्टता, वैवाहिक जीवनातील समस्या व बदलत्या स्त्रीजीवनातली बदलती मूल्ये यांचे दर्शन घडवणाऱ्या लेखिकांची संख्या बरीच आहे. कादंबरीलेखनाचे तंत्र, विषयाची कलापूर्ण मांडणी, रेखीव व्यक्तिचित्रण, वास्तवपूर्ण वातावरणनिर्मिती व निवेदनशैली यांमध्ये या लेखिकांनी वाखाणण्याजोगे नैपुण्य मिळविले आहे. कृष्णाबाई मोटे, आनंदीबाई जयवंत, कुमुदिनी रांगणेकर, मालतीबाई दांडेकर, प्रेमा कंटक, डॉ. सुमती क्षेत्रमाडे, सिंधु गाडगीळ, लीला देशमुख, शालिनी हळदीपूरकर, सरोजिनी दबले, तारा दोले, सुधा साठे, लीला श्रीवास्तव, शशिकला आळंदकर, विजया नरवणे, सुधा फडके, सुमती वेलणकर, यमुना शेवडे वगैरे अनेक लेखिका रंजक व प्रबोधक कादंबऱ्या लिहून मराठी साहित्यात चांगली कामगिरी बजावीत आहेत.

नाट्य लेखनात स्त्रियांची कामगिरी अत्यल्प

लघुकथा कादंबरी क्षेत्रांच्या मानाने नाट्याच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपला प्रभाव फारच कमी पाडलेला दिसतो. खरे म्हणजे नाटक हे लोकशिक्षणाला जास्त पोषक व म्हणून 'जागृत' व 'मुमुक्षू' स्त्रियांनी या साधनाचा जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. दीड दोन हजार प्रेक्षकांवर एखाद्या तत्वाचा एकदम उत्कट परिणाम करण्याला नाट्यासारखे दुसरे हत्यार नाही. पण अर्थात या मार्गात अडचणी पुष्कळ. नाटक लिहून झाले तरी रंगभूमीवर आणणे महा कठीण; नवोदित लेखिकेचे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर येणे जवळजवळ अशक्यच. नाटक लिहिण्याचे तंत्रही इतर साहित्य प्रकारापेक्षा जास्त अवघड आहे. एकाच वेळी निरनिराळ्या थरांतील, भिन्न पार्श्वभूमी, भिन्न आचारविचार, भिन्न शिक्षण-संस्कृती अशा लोकांच्या मनाची पकड घेणे, तसेच नुसत्या तत्वज्ञानाचे घुटके पाजणे व निव्वळ मनरंजन करणे या दोहोंमधला सुवर्णमध्य साधणे, हे फार मोठे कसब आहे. पण हळूहळू या क्षेत्रातही लेखिका पुढे येत आहेत.

मराठी नाटक १८४३ पासून विष्णुदास भावे यांनी सुरू केले. त्या कीर्तनवजा नाटकात, नंतरच्या 'अल्लुल्-हुर्र' नाटकात, पुढच्या 'बुकिश' नाटकात लेखिकांची नावे आढळत नाहीत. इंग्लिश व संस्कृत नाटकांची भाषांतरे, १८८० पासून सुरू झालेली किर्लोस्करी संगीत नाटक परंपरा, कोल्हटकरी रोमँटिक नाटके, वरेरकरांची सामाजिक नाटके, अल्लादीनच्या गुहेप्रमाणे शब्दरत्नांच्या लखलखाटाने डोळे दिपवून टाकणारी गडकरी नाटके; यांपैकी कुठल्याच संप्रदायात लेखिकांचा स्वैर संचार दिसत नाही. काशीबाई सहस्रबुद्धे, हिराबाई पेडणेकर, राधाबाई करमरकर यांनी काही पौराणिक नाटके लिहिली. पण त्यात कुठेच विशेष कलोत्कर्ष साधलेला नाही. गिरिजाबाई केळकर यांनी मात्र उल्लेखनीय अशी दोन सामाजिक नाटके लिहिली आहेत. एकंदरीने खाडिलकरी ऐतिहासिक व नव्या संदर्भाने लिहिलेल्या पौराणिक नाटकापेक्षा सामाजिक नाटके स्त्रीप्रकृतीला मानवलेली दिसतात. विशेषतः सामाजिक नाट्यतंत्रात 'नाट्यमन्वंतरा'ने इब्सेनपासून स्फूर्ती घेऊन जो कायापालट घडवून आणला त्याने बऱ्याच लेखिका नाट्यक्षेत्राकडे आकर्षित झाल्या.

मुक्ताबाई दीक्षित आणि इतर नाटक-लेखिका

या लेखिकांमध्ये मुक्ताबाई दीक्षित यांना अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. त्यांच्या 'जुगार' या पहिल्याच नाटकात त्यांची नाट्यतंत्रावरची पकड, आणि कला व वैचारिक बैठक यांचा प्रीतिसंगम साधण्याचे कौशल्य स्पष्टपणे निदर्शनास आले. नाट्यातील संघर्ष, व्यक्ति-रेखनातील सखोल मनोविश्लेषण व चटकदार संवाद या कलागुणांच्या जोडीला नाट्यमहर्षि केशवराव दाते यांचे दिग्दर्शन लाभल्यामुळे 'जुगार' खूपच गाजले. मध्यंतरी मृतवत् झालेली मराठी रंगभूमी १९४३ च्या शतसांवत्सरिक सोहोळ्या नंतर नवचैतन्याने रसरसली. ऐतिहासिक, सामाजिक, निव्वळ विनोदी, निव्वळ संगीत-प्रधान, रहस्यात्मक व न-नाट्यात्मक असे अनेक संप्रदाय नाट्यक्षेत्रात आले. बहुतेक लेखिकांनी सामाजिक आशयावर उभारलेल्या नाटकावर भर दिलेला आढळतो. तारा वनारसे, सरिता पदकी, सुमती धनवटे, वसुंधरा पटवर्धन, लीला चिटणीस, विमल वैसास वगैरेंची नाटके उल्लेखनीय आहेत. एकांकिका लिहिण्याकडे स्त्रियांचा कल विशेष दिसतो. सुटसुटीत तंत्र व आकाशवाणीद्वारा किंवा हौशी मंडळांकडून चटकन रंगभूमीवर येण्याची शक्यता यामुळे हा नाट्यप्रकार स्त्रियांना सुलभ वाटतो. कुमुदिनी रांगणेकर, लीला भागवत, दया पटवर्धन वगैरे पुष्कळच नावे या क्षेत्रात आढळतात. महिला मंडळांसाठी लिहिलेली पुरुष-पात्रविरहित नाटके हाही एक खास नाट्यप्रकार आहे. मालतीबाई बेडेकर, पद्मा गोळे, कुमुदिनी रांगणेकर, आनंदीबाई किर्लोस्कर यांनी या प्रकाराची बंधने पाळूनही चांगली कलात्मक नाटके लिहिली आहेत. बालरंगभूमीच्या क्षेत्रात सुधा करमरकर व सई जोगळेकर यांनी नाटुकली लिहून व ती कौशल्याने रंगभूमीवर सजवून फार प्रशंसनीय कामगिरी बजावली आहे.

वाङ्मयाची इतर क्षेत्रे स्त्रिया समृद्ध करीत आहेत

याप्रमाणे काव्य, कादंबरी, नाटक व लघुकथा या चार प्रमुख ललितवाङ्मयाच्या क्षेत्रांतील स्त्रियांची कामगिरी थोडक्यात वर्णिली. याखेरीज वाङ्मयसमीक्षेच्या क्षेत्रात गोदावरी केतकर, बाळूबाई खरे (मालतीबाई बेडेकर) व कुसुमावतीबाई देशपांडे यांनी नाट्यशास्त्र, अलंकारशास्त्र व कादंबरीचे तंत्र यांवर ग्रंथ लिहून उत्तम भर घातली आहे. ललित निबंधाच्या क्षेत्रात इरावती कर्वे, कुसुमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन यांनी नाव केले आहे. इरावतीबाईंचे निबंध तत्त्वचिंतनात्मक पण खेळकर शैलीत लिहिलेले, कुसुमावतींचे काव्यात्मक व वसुंधराबाईंचे मनोविश्लेषणात्मक असतात. लेखिकांत क्वचितच आढळणारी विनोदबुद्धी प्रामुख्याने प्रकट करणारे शकुंतला परांजपे यांचे लघुनिबंधही उल्लेखनीय आहेत. मुक्ताबाई दीक्षित यांच्या 'प्रचीती'त मिस्किलपणे वावरणारा विनोद मनोज्ञ आहे.

दुर्गाबाई भागवत यांच्या 'ऋतुचक्र' या निबंधसमुच्चयात दिसून येणारी निसर्गप्रीती, सूक्ष्म निरीक्षण, कल्पनाविलास व हृदयंगम वर्णनशैली अत्यंत आल्हाददायक आहे. 'व्यासपर्व' या निबंधसमुच्चयातील व्यक्तिरेखा विचारांना चालना देणाऱ्या आहेत. त्या रेखाटताना प्रकट झालेली दुर्गाताईंची मौलिक तर्कपद्धती, चतुर व अंतर्भेदी मनोवगाहन व मनोज्ञ भाषाशैली यांनी या पुस्तकाला मराठी साहित्यात अढळ स्थान प्राप्त करून दिले आहे.

'आत्मचरित्रे' या दालनात लेखिकांनी अविस्मरणीय कामगिरी बजावली आहे. लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रे' हे मराठी वाङ्मयाचे बहुमोल लेणे आहे. जीवन खडतर असताना सुद्धा त्याकडे पाहाण्याची खेळकर दृष्टि, रुक्ष जीवनातसुद्धा गंमत हेरण्याची हातोटी, तत्कालीन समाजाचे व व्यक्तींचे हुबेहूब चित्रण व साधी पण हृदयंगम भाषा या गुणांनी या थोर लेखिकेने आपले व आपल्या साधुवृत्तीच्या, कविमनाच्या पण काहीशा लोकविलक्षण पतीचे चरित्र नटवले आहे. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे रमाबाईसाहेब रानडे यांचे आत्मचरित्र तत्कालीन समाजाचे चित्र, लेखिकेची उत्कट पतिपरायणता व सहज ओघवती भाषा यांमुळे चिरस्मरणीय आहे. कमलाबाई देशपांडे, लीलाबाई पटवर्धन, पार्वतीबाई आठवले, आनंदीबाई कर्वे, यशोदाबाई जोशी, सत्यभामाबाई सुखात्मे, यांची आत्मचरित्रेही निवेदनशैली व तत्कालीन स्त्रीजीवनाचे व सामाजिक जीवनाचे यथातथ्य दर्शन यांमुळे वाचनीय आहेत. चरित्रलेखनातही स्त्रियांनी हातमार लावला आहे. अवंतिकाबाई गोखले यांचे गांधीचरित्र, काशीताई कानिटकर यांचे डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र, इंदिरा भागवत यांचे 'या सदाशिव', वेणूताई पानसे यांचे 'हरि नारायण आपटे' चरित्र, दुर्गा भागवत यांचे पंडित राजारामशास्त्री भागवत यांचे चरित्र, हे चरित्रवाङ्मयाचे चांगले नमुने आहेत.

ललितवाङ्मयाखेरीज समाजशास्त्रीय, पंडिती व संशोधकीय वाङ्मयातही स्त्रियांनी स्थान मिळवले आहे. इरावती कर्वे यांचे 'मराठी लोकांची संस्कृती' व 'हिंदु समाजरचना व शास्त्र' गीता साने यांचे 'चंबळची दस्युभूमि', नलिनी पंडित यांचे 'जातिवाद व वर्गवाद', डॉ. कमलाबाई देशपांडे यांचे 'स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल' वगैरे ग्रंथ लेखिकांच्याच काय पण एकंदर मराठी साहित्यातही अग्रेसरत्व पटकावतील असे आहेत.

अशा हा मराठीतल्या लेखिकांच्या वाङ्मयनिर्मितीचा आराखडा. हे वाङ्मय विस्ताराने तसेच गुणांनी वाढत आहे हे स्पष्टच आहे. साहित्य हे जीवनाचा 'आदर्श' दोन अर्थांनी आहे. ते जीवनाचे प्रतिबिंब हुबेहूब दाखविते, तसेच पूर्णत्वात काही व्यंगे असल्यास ती सुधारण्यासही कारणीभूत होते. ही द्विदल कामगिरी लेखिकांच्या हातून उत्तरोत्तर वाढत्या गुणाढ्यतेने पार पडेल अशी उमेद बाळगण्यास हरकत नसावी.

0

ललितकला आणि स्त्री

[१] संगीत

केशव वामन भोळे

श्री. केशव वामन भोळे (जन्म २३-५-१८९६) चित्रपट व्यवसायात १७ वर्षे व आकाशवाणीमध्ये ७ वर्षे संगीतज्ञ व संगीत निर्माते. संगीत, नाट्य, चित्रपट व क्रिकेट यांवर पुष्कळ लिखाण. 'अस्ताई'ला महाराष्ट्र शासनाचे बक्षिस. (स्वरवंदना, आपटे रोड, पुणे ४).

साधे शिक्षण नाही; गाणे-बजावणे कुठले

पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजांच्या संस्कृतीचा एकंदर महाराष्ट्रीय जीवनावर हळूहळू परिणाम होत गेला. आपण जिंकले गेलो असलो तरी आपण या परकीय अंमलापासून आपली सुटका लवकर करून घेतली पाहिजे हा विचारच प्रथम प्रमुख ठरला. लोकजागृतीचे साधन म्हणून वर्तमानपत्रे निघाली. शाळा निघाल्या. पण यांत स्त्रियांविषयी कोणी विचार केला नाही. स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न कै. ज्योतीबा फुल्यांनी प्रथम हाती घेतला. त्यांनी मुलींना शिक्षण देणारी शाळा काढली. मुली जास्तीत जास्त मराठी चार बुके शिकून लग्न करून संसार करू लागल्या. हुजूरपागेसारख्या संस्था स्थापन होईपर्यंत स्त्रियांना इंग्रजीचा गंधही नव्हता. अशा या अज्ञानावस्थेत परवशतेत काल कंठणाऱ्या स्त्रीला ललितकला हा शब्दही ठाऊक नव्हता. गाणे, बजावणे व नाच ह्या गोष्टी कलावंतिणींवर (म्हणजे नायकिणी कसबिणींवर) सोपविल्या गेल्या होत्या. *बाहेरख्याली लोक अशा कलांचा चोरून परामर्श घेत असत. लग्नामुंजीत कलावंतिणीचे* गाणे करणे ऐपतदार लोकांनाच परवडे. हे गाणे समारंभाचा एक भाग समजले जाई. त्याला समाजात स्वतंत्र असे स्थान नव्हते. एरवी ते ऐकणे निषिद्धच मानले जाई आणि असा श्रोता बाहेरख्याली म्हणून गणला जाई. समाजात त्याला प्रतिष्ठा नसे.

मुलींना गोड गळ्याची हौस पुरविण्याचे प्रसंग फक्त धार्मिक स्वरूपाचे असत. मंगळागौर हरताळका जागविणे, हदग्याची गाणी फेर धरून म्हणणे, व्रताची गाणी

(एकादशी शिवरात्र) म्हणणे हेच काय ते अपवादात्मक प्रसंग. पण या प्रसंगी मात्र मुली आणि पोक्त बायकासुद्धा अहमहमिकेने उत्साहाने भाग घेत. डोहाळ्यावरील ओव्या, भाऊबीजेवरील, घरातील विविध नात्यावरील ओव्या, आणि दळणकांडण करताना, गव्हले वळताना, शेवया, पापड्या, कुरड्या करताना गात ती स्त्री-गीते अत्यंत बोलकी, भावदर्शी, सरस आहेत. यांखेरीज दुसरी गाणी म्हणणे गैर ठरले होते. शारदा नाटक निघाल्यानंतर मुली वल्लरी, जाह्नवी, शारदेची काही गाणी वरील प्रताच्या प्रसंगी गात असत. त्या नाटकाचा विषय आणि त्या नाटकाची असामान्य लोकप्रियता याच्या मुळाशी होती. आणि ती गाणी सोज्वळहि (म्हणजे शृंगारिक नव्हेत) होती. स्त्रियांची परवशता ('आम्ही दीन गाई') हतबलता व्यक्त करणारी, पुरुषांची कठोर हजेरी घेणारी गाणी (काय पुरुष चळले बाई, जन खुळावले, म्हातारा इतुका) म्हणणाऱ्या काही चिटुकल्या वल्लरीही मी लहानपणी पाहिल्या आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस किंचित आरंभ

हे सर्व झाले तरी गरती स्त्रीने गायनवादन (नर्तन ? छेः अब्रह्मण्यम्) कला यावी या बुद्धीने शिकायला विसावे शतक उजाडावे लागले. मुंबईसारख्या मोठ्या शहरी ऐपतदार मुली बाजाची पेटी वाजवायला शिकू लागल्या. नाटकातील वापरामुळे हे वाद्य लोकप्रिय होऊ लागले होते. पेटीवर मुली नाटकातील पदे, काही स्त्रीगीते (मुद्रिका, गौळणी, संतांची पदे, अभंग,) वाजवून गाऊ लागल्या. क्वचित् एखाद्या घरी आधी सतार, नंतर दिलरुबा ऐकू येऊ लागला. ही घरे सुधारकांची (म्हणजे स्त्रीसुधारणा-वाद्यांची) मानली जात होती. माझी मावशीच १९०३ साली बाजाची पेटी वाजवू लागली होती. सर मोरोपंत जोशांच्या मुलींना संगीत शिकवायला गवई ठेवले होते. त्यांच्याच घरी प्रथम मी पियानो हे वाद्य पाहिले. पण ते दिवाणखान्याचे भूषण म्हणून असावे. जोशांच्या स्नेह्याची मुलगी माई चिटणीस सतार शिकत असे. तिने तीत बरीच प्रगती केली होती. पण लग्न झाले आणि सतारीला गवसणी घातली गेली. तिच्या मुलीने (कुसुमावती देशपांडे) संगीताशी कधीच (श्रवणाखेरीज) संपर्क राखला नाही. पुण्यात १९१२ साली के. भास्करबुवा बखल्यांनी भारतगायन समाज काढला पण तेथे विद्यार्थिनी असल्याचे ऐकिवात नाही. पुरुषांची संगीताची आवड कीर्तनभजनाने पोसली गेली. पण स्त्री फक्त श्रोताच राहिली. संगीत नाटकामुळे स्त्रीला गाण्यावाजविण्याचे द्वार खुले झाले. सौभद्र, शारदेतील गाणी शिकण्यास मज्जाव नव्हता. माझ्या परिचयातील कितीतरी मुलींचे गोड गळे रूढिप्रिय समाजामुळे संगीताला मुकले. श्रीमंतांच्या, सुधारकांच्या मुली अपवाद मानल्या जात. माझ्या माहितीप्रमाणे मुंबईत खास स्त्रियांना बाजाची पेटी शिकविण्याचा क्लास गायवाडीत श्री. शारदाबाई भाटे यांनी प्रथम काढला होता. या सर्वांच्या मुळाशी ललितकलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन एक नाद म्हणून किंवा करमणुकीचे, वेळ घालविण्याचे साधन म्हणून होता. भरतकाम, विणकाम, शिवणकलांइतके उपयुक्ततेचे

महत्त्व त्यांना नव्हते.

पण पुढे पुढे प्राथमिक व दुय्यम शिक्षणात मर्यादित असा संगीताचा शिरकाव झाला. सभा, संमेलने भरविताना स्वागताचे गाणे म्हणण्याच्या हेतूने, बादशहाच्या वाढदिवसाच्या समारंभाचे वेळी स्तुतिपर गाणे म्हणायला मुली 'तयार' हव्यात हाच त्यातला मुख्य हेतू असावा. जेथे मुली बोर्डिंगात रहात तेथे सायंकाळी प्रार्थना म्हणणे, भजने म्हणणे असा प्रघात सुरू झाला. यात प्रामुख्याने गळा चांगला असणाऱ्या मुलींना थोडे रागदारी संगीत शिकविले जाई. बाकीच्या प्रार्थनागीते म्हणण्यात भाग घेत.

उच्च शिक्षणात संगीत शिक्षणाचा शिरकाव

स्त्रीशिक्षणात संगीताला असे स्थान मिळायला फार काळ जावा लागला. संगीत हा विषय ऐच्छिक घेण्याची सोय प्रथम महिला विद्यापीठाने केली. मागाहून नागपूर विद्यापीठात प्रवेश परीक्षेपासून पुढे पदवी परीक्षेपर्यंत संगीत विषय घेण्याची सोय झाली. उत्तर प्रदेशात खास संगीत शिक्षणाचे मॅरिस कॉलेज स्थापन झाले. तेथे कै. पं. भातखंडे आणि नंतर त्यांचे शिष्य शिक्षक म्हणून काम करू लागले. त्यांच्या आधी विष्णु दिगंबर पलुस्करांनी लाहोरला गांधर्व महाविद्यालयाची स्थापना करून संगीताला प्रतिष्ठा मिळवून दिली. विद्यालयाच्या शाखा अलहाबाद, कानपूर, कराची, मुंबई येथे निघाल्या. मुंबईत मुलीही गांधर्व विद्यालयात प्रथम व्हायलिन, दिलरुबा शिकू लागल्या. नंतर गायन. यांत पारशी समाजातील स्त्रियाही येऊ लागल्या. पाश्चात्त्य संगीतावरील या समाजाचे लक्ष उडवून भारतीय रागदारी संगीताकडे खेचण्याचे महत्कार्य पंडितजींनी केले. बनारस हिंदु विद्यापीठात, अलिगड विद्यापीठात संगीत दाखल झाले. दक्षिणेकडील विद्यापीठाने तर आधीच संगीताचे शिक्षण देणे सुरू केले होते. परंतु ज्या मुंबईत गांधर्व महाविद्यालय आपले कार्य करीत होते, तेथे तत्पूर्वी कै. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्या. तेलंग, कै. म. चि. आपटे यांसारखे प्रतिष्ठित विद्वान, पलुस्करांचे गुरु कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांकडे रागदारी संगीत शिक्षण घेत होते. यांचा मुंबई विद्यापीठाशी संबंध होता तरीही त्यात या संगीताचे अध्यासन स्थापण्याचे त्यांना सुचले नाही हे एक नवलच मानले पाहिजे. पांढरपेशा समाजाला गायनाची गोडी लावण्यास पं. पलुस्कर, त्यांचे गुरु इचलकरंजीकर बुवा, काही उत्तम गायक कीर्तनकार (फलटणकरबुवा, राशिनकर, काशीकर, वेडेकरबुवा) काही तंतकार (रावजीबुवा बेलबागकर, कृष्णराव मुळे इत्यादी) हेच जास्त कारणीभूत झाले. मराठी गवई व्यसनात बुडून गेलेले नव्हते. भातखंड्यांनी जुने ग्रंथ वाचून, अभ्यास करून प्रचलित संगीताला शास्त्राची जोड दिली, प्रतिष्ठाही मिळवून दिली, विद्यालये स्थापन केली. किती स्त्रिया गायन शिकल्या हे कळायला मार्ग नाही. परंतु संगीताला समाजात प्रतिष्ठा आणि आदराचे स्थान विष्णु दिगंबराप्रमाणे त्यांनीही मिळवून दिले.

स्त्रियांकडून संगीताची आराधना

इकडे दक्षिण महाराष्ट्राचा काही भाग आणि गोवा प्रांतातील कलावंत वर्गाने संगीताची आराधना अत्यंत आस्थेने चालविली होती. ह्या वर्गाने गवई व नर्तकांचा उत्तम परामर्श घेऊन संगीताचे अध्ययन व संवर्धन जिव्हाळ्याने केले. हा देवदासींचा वर्ग महाराष्ट्रातील मोठ्या शहरांत येत राहिला. तेथे त्याने अर्थार्जन केले; संगीताची परंपरा चालू ठेवली. देवदेवतांच्या उत्सवांत, पैकीनांच्या उत्रांत यांचे कार्यक्रम होत असत. यांच्यांतील काही स्त्रियांनी स्वतःच्या नाटक मंडळ्या काढल्या. त्यांपैकी बेळगावकर स्त्रीसंगीत मंडळी फार गाजली. ती दोन नाटकांमुळे. पहिले 'दंडधारी' आणि दुसरे 'मनोविजय'. दंडधारी नाटकात टिळक आणि गोखले यांची सोंग त्या बायका हुबेहूब काढीत असत. यात गोखल्यांची वैयक्तिक नालस्ती असल्याने सरकारने हे नाटक बंद पाडले. पण मनोविजय चांगले चालले. सर्व भूमिका स्त्रियाच करीत असत. त्या उत्तम गायिका होत्या व त्यांचा अभिनयहि प्रेक्षणीय असे. कंपनीत शिस्त फार कडक असे. याच कंपनीतून मनोहर स्त्रीसंगीत मंडळी निघाली. मुंबईत कलावती स्त्रिया शाळा-कॉलेजांत जाऊन उच्च शिक्षण घेऊ लागल्या. त्यांतील बहुसंख्य स्त्रियांनी संगीताचा व्यवसाय सोडला आणि विवाह केले. काही थोड्या स्त्रियानी शिक्षण घेऊनही संगीताचे अध्ययन चालू ठेवले. पुढे मुंबईत फाजलभाई कंपनीने रेडिओ स्टेशन स्थापले तेव्हा या कलावती स्त्रियाना आपल्या कलेकरता नवे क्षेत्र सापडले. रेडियोवर पुण्याच्या कै. सुंदराबाई जाधव यानी असामान्य गायिका म्हणून कीर्ती मिळविली. मुंबईतील इंदिरा वाडकर, सरस्वतीबाई फातर्फेकर, वत्सलाबाई कुमठेकर इत्यादी स्त्रियाचे कार्यक्रम चांगले होत असत. हिराबाई, सुंदराबाई थिएटरमध्ये कार्यक्रम करीत. १९२६ साली श्री. हिराबाई बडोदेकरानी स्वतःची नाट्यसंस्था स्थापली. तीत त्यांच्या भगिनी कमलाबाई, सरस्वतीबाई कामे करू लागल्या. त्यांच्या संशयकल्लोळ, सौभद्र, साध्वी मीराबाई या नाटकांनी अमाप यश मिळविले. १९३३ साली 'नाट्यमन्वंतर' ही सुशिक्षितांची नाट्यसंस्था निघाली. त्यांचे पहिलेच नाटक 'आंधळ्यांची शाळा' फारच गाजले. त्यात सौ. गोदूताई दर्वेक, सौ. ज्योत्स्ना मोघे यांनी भूमिका सर्वांगसुंदर केल्या. पुढे श्री. मो. ग. रांगणेकरांनी 'नाट्यनिकेतन' ही संस्था काढली. त्यांची आशीर्वाद, कुलवधू, माझे घर, वहिनी, एक होता म्हातारा, कोणे एके काळी, ही नाटके लोकप्रिय झाली. कुलवधू तर सौभद्राइतके लोकप्रिय झाले. राणीच्या बागेत श्री. स्नेहप्रभा प्रधान यांचे काम चांगले होत असे. या संस्थेत सौ. ज्योत्स्ना मोघे, श्री. मंगला रानडे, सौ. इंदिरा चिटणीस, सौ. विमल वैशंपायन, कै. बाळाबाई, श्री. ललिता होनावर, श्री. चित्रा ओगले, सौ. सुचेता जोशी इत्यादि स्त्रियांनी कामे उत्तम करून स्त्रियांच्या भूमिकांचे वैशिष्ट्य सिद्ध केले. आणि 'स्त्रियांनी नाटकात कामे करावी का?' हा वाद बंद पाडला. अशा प्रकारे अनेक संस्था स्थापन झाल्या. त्यांत नवनवीन नटी दाखल झाल्या. चित्रपटसृष्टीत

कै. दीनानाथ मंगेशकरांच्या मुलींनी (लता, आशा, उषा, मीना यांनी) पार्श्वगायिका म्हणून खूप नाव मिळविले. लतेने आपले अग्रस्थान आजही कायम ठेवले आहे. आकाशवाणी, नाट्यसंस्था यांत नवोनव गायिका चमकू लागल्या आहेत. तसेच स्त्रियांमध्ये रागदारी संगीत, ललित संगीत लोकप्रिय झाले असून आकाशवाणीतील दप्तरात अशा गायिकांची संख्या शेकडो-हजारोपर्यंत वाढली आहे. हे यश विलोभनीय आहे. गायिका स्त्रियांनी समाजात आपल्या संगीत कलेने यशाबरोबर प्रतिष्ठाही मिळविली आहे.

सर्वांगीण उन्नतीस ललितकलांचा अभ्यास अवश्य

हे सारे खरेच. पण मनुष्याची सर्वांगीण उन्नती होण्यास शिक्षण अवश्य आहे हे असे सर्वमान्य झाले आहे, तसेच ललितकलांचा अभ्यास व्यासंगही त्याच कार्याकरिता उपयोगी पडतो, संगीताने माणसाची सौंदर्यदृष्टी पोसली जाते, नसल्यास ती उत्पन्न करता येते, हे अगदी अलीकडे मान्य होत आले आहे. मुलींनी गायनवादन शिकायला काही हरकत नाही, त्यांची लग्ने जमण्यास त्या कला उपयोगी पडतात या व्यवहारी विचारापासून, शिक्षण उन्नतीकरिता अवश्य आहे या विचारापर्यंत मजल गाठायला शंभर वर्षांचा काल जावा लागला. आता विद्यापीठात संगीताचे अध्ययन चालू होऊन पदव्याही ठेवल्या आहेत. संगीत ही कला शिकण्याकरिता मध्यवर्ती सरकार, संगीत-नाटक अकादमी याजकडून विद्यार्थिनींना भरपूर शिष्यवृत्ती मिळते. नृत्य आणि नाट्य शिक्षणाची व्यवस्था दिल्ली येथे उत्कृष्ट शिक्षकांच्या साहाय्याने चालू आहे. सर्वश्री अलकाझी, बिरजू महाराजासारखे अव्वल दर्जाचे शिक्षक तेथे आहेत. आकाशवाणीच्या उत्तेजनामुळे हजारो स्त्रिया आज रागदारी आणि ललित संगीत अनेक केंद्रांवर गात आहेत. परंतु अजूनही संगीत कलेचा उपयोग लग्न होईपर्यंत वेळ काढण्याकरिता किंवा विवाह जमविण्याचे एक साधन म्हणून होत आहे. कारण विवाह झाल्यावर मुली संगीताचा रियाज करीत नाहीत. संसार, मुलांचे संगोपन अशी कारणे त्या पुढे करतात. परंतु काही (अपवादात्मक का होईना) स्त्रिया संसारात रंगूनही संगीताचे संगोपन करतात. अर्थात पुरुषवर्गाचे सक्रिय साहाय्य असल्याशिवाय हे कार्य कठीण आहे. पण संसारातही संगीताचे स्थान तो अधिक रम्य आणि मधुर करण्याकरिता नक्की आहे हे पुरुषवर्गाने ओळखले पाहिजे. पुरुषांना संगीत नको असते अशातला प्रकार मुळीच नाही. पण स्वतःच्या पैदी शरिरास त्रास न होता ते करता आले तर आयतोबासारखे त्यांना हवे असते हेही एक अप्रिय सत्य आहे.

नृत्याच्या बाबतीत प्रगतीला अधिकच विलंब

नृत्याच्या बाबतीत आम्हांला जवळजवळ एकशेतीस वर्षांचा काल काढावा लागला. अड्यारला प्रतिष्ठित कुलातील एक सुकन्या रुक्मिणी देवी अरुंडेल हिने भरतनाट्यम् या तंजावर येथील नृत्यप्रकाराचा अभ्यास करून त्यात खूप प्रावीण्य मिळविले.

[२] चित्रकला

धुंडिराज भास्कर ओंकार

प्रा. भय्यासाहेब ओंकार, जी. डी. आर्ट, ए. एम्. (जन्म ६-२-१९३१) प्राध्यापक, श्री. ना. दा. ठा. महिलापाठशाळा, पुणे. चित्रकार, चित्रकला समीक्षक, अनेक पुस्तकांचे चित्रकार व लेखक. चित्रकलाविषयक संस्थांमध्ये पदाधिकारी. अभ्यासक्रम समित्यांचे सभासद. (४९५ शनिवार, पुणे २)

स्त्रीजीवनात नाना रूपांनी अवतरणारी चित्रकला

तसे पाहिले तर स्त्रियांचा आणि चित्रकलेचा बराच निकटचा संबंध मानावा लागेल. केशभूषा करताना, वस्त्राभरणे निवडताना, अंगावर दागदागिने घालताना स्त्रियांना सौंदर्यदृष्टी वापरावी लागते. सुंदर फुलांचे गजरे असोत की हातावरची मेंदी असो, त्यातून स्त्रिया आपली कलाकौशल्याची रुची दाखवीत असतात. अंगणात रांगोळ्या घालणे, सुंदर तोरणांनी प्रवेशद्वारे नटवणे, उशांचे अभ्रे, गालिचे, टेबलक्लॉथ यांच्यावर सुंदर भरतकाम करणे या स्त्रियांच्या आवडीच्या कला-हस्तकौशल्याच्या वर्गांना प्राधान्येकरून महिलांचीच संख्या अधिक असते. या सर्व गोष्टींतून स्त्रियांच्या कलाभिरुचीची साक्ष मिळते.

या त्यांच्या कलोपासनेला परंपरा आहे. काव्यात जसे स्त्रीगीतांचे स्वतंत्र दालन आहे, तद्वतच या हस्तकलांचे मानावे लागेल. रांगोळीची कला घेतली तरी कितीतरी वर्षांची तिची परंपरा आहे. आणि ती परंपरा प्रामुख्याने गृहिणींनीच जतन करून ठेवली आहे, वाढविली आहे. भारतातल्या प्रांताप्रांतातून या रांगोळीकलेच्या विविध स्वरूपांचे दर्शन घडते.

बंगालमध्ये या रांगोळ्यांना 'अल्पना' म्हणतात. तांदुळाची पिठी पाण्यात कालवून त्याने अल्पना रेखाटली जाते. महाराष्ट्रातील रांगोळी भुकटीच्या स्वरूपात असते. हळद, कुंकू, बुक्का, गुलाल वापरून मूळच्या पांढऱ्या रांगोळीला इतर रंगांची जोड देऊन महाराष्ट्रीय महिला सुंदर रेषाकृति शेणाने सारवलेल्या अंगणात रेखाटतात. केरळमध्ये फुलांचे माहात्म्य. तेथील रंगावली फुलांनी तयार होते, त्यांना 'पुपिडल' म्हणतात. गोंड, संताळ वगैरे आदिवासी स्त्रिया रांगोळीऐवजी भिंतीवर चित्राकृति रेखाटतात. या चित्राकृतींना 'इत्ताल' म्हणतात. पांढऱ्या चुन्याच्या भिंतीवर काविने व काळ्या रंगाने हे इत्ताल चितारले जातात.

कोणत्याही गृहिणीला सुलभतेने रेखाटता येतील असेच हे रंगावलीचे प्रकार होत. अगदी स्वस्तात मिळणारे रंग आणि ब्रशाऐवजी चिंधीचा बोळा वापरून या रंगावली चितारल्या जातात. आकाराची रचना इतकी सुलभ असते की प्रत्येक आकृति काही टिंबांच्या जोडण्याने निर्माण होते. पण त्या आकारात सुलभतेबरोबरच सौंदर्य, प्रतीकात्मता

आणि प्रसन्नता सामावलेली असते. सूर्य, चंद्र, स्वस्तिक, पद्म, शंख, गदा, चक्र, कासव, गोपद्म अशा अनेक आकारांना या रंगावलीत मनोहर स्थान प्राप्त झाले आहे. स्त्रीगीतातल्या भावना-कल्पनांना जसे आगळे सौंदर्य लाभले आहे तसेच या रंगावली प्रकारांना. हा प्रकार आजपर्यंत स्त्रियांनीच जोपासला आहे. आणि स्त्रियांच्या नाजूक हातानी सोप्या पण डौलदार अशा या चित्रप्रकाराला मांगल्य प्राप्त झाले आहे.

भारतीय स्त्रियांचे कशिदाकामही अपूर्वाईचे मानावे लागेल. मण्यांचा, आरशांचा, रेशमी धाग्यांचा, कापडाच्या तुकड्याचा, पिसांचा, शिंपल्यांचा वापर करून भरतकाम करण्याची रीत फार जुनी आहे. अगदी जंगलात राहणाऱ्या आदिवासी स्त्रियासुद्धा सुंदर भरतकामाचे नमुने तयार करतात. हिमालयात राहणाऱ्या 'मिश्मी'सारख्या जमातीतही सुंदर रंगसंगतींनी नटलेल्या शालीचे विणकाम पाहिले म्हणजे त्या जमातीतल्या स्त्रियांच्या सौंदर्यदृष्टीचे कौतुक वाटते.

गृहसजावटीचे असे अनेक कलाप्रकार स्त्रियांनी आपल्या प्रतिभेने आजपर्यंत नटवले आहेत. या कलाची जाणीवपूर्वक दखल घेऊन त्यांची कलासंग्रहालये निर्माण होण्याची गरज आहे. या कलाच्या इतिहासाचा मागोवा घेतला गेला पाहिजे म्हणजे वेगवेगळ्या प्रांतांतल्या स्त्रियांनी या कलाप्रकारांना कसे समृद्ध केले आहे हे कळून येईल व स्त्रियांच्या कलाक्षेत्रातील कर्तृत्वाचे मूल्यमापन होईल.

प्रत्यक्ष चित्रकलेत स्त्रियांचा भाग अल्प

स्त्रियांच्या या गृहोपयोगी कलेचा भाग सोडला आणि प्रत्यक्ष चित्रकलेसंबंधी विचार करू लागलो तर थोडी निराशाच पदरी येते. संगीत, नृत्य, वाङ्मय या ललित-कलाच्या क्षेत्रात स्त्रियांची नावे जशी विपुलतेने सांगता येतात तशी ती चित्रकलेच्या क्षेत्रात नाही. संगीत आणि नृत्य या कलांना लागणारी शरीरसंपदा स्त्रियांना निसर्गानेच बहाल केली आहे. संगीताला लागणारा सुरेल आवाज आणि नृत्याला लागणारे शरीरसौष्ठव हे स्त्रियांना उपजतच लाभते, अर्थात यामुळे या क्षेत्रात स्त्रियांच्या कर्तृत्वाला स्वतंत्र स्थान आहे. साहित्यक्षेत्रातही स्त्रियांची कामगिरी उल्लेखनीय ठरेल. हळुवार भावनांची जपणूक स्त्रीसाहित्यात पाहायला मिळेल. वात्सल्य, कारुण्य, भक्ति, प्रेम, दया अशा विविध भावनांचा स्त्रियांच्या लेखणीतून झालेला अविष्कार मनोज्ञ ठरला आहे.

चित्रकलेच्या क्षेत्रात मात्र थोडी निराळी स्थिती आहे. चित्रकर्त्या स्त्रियांची संख्या कमी आहे. मात्र एवढे खरे की चित्रकला क्षेत्राकडे वळलेल्या स्त्रियांची संख्या फार कमी असली तरी ज्या स्त्रियांनी हे क्षेत्र निवडले त्यांनी या क्षेत्रात मोठी कामगिरी केली.

काही नामवंत चित्रकार स्त्रिया

प्राचीन काळात विविध राजांची स्मरणाने चित्रे रेखाटणाऱ्या चित्रलेखेच्या कलाकर्तृत्वावरून त्या काळीही चित्रकलाक्षेत्रात स्त्रिया किती पुढे होत्या हे लक्षात येते.

भारतीय कलेच्या इतिहासात दुसरी एक अद्वितीय स्त्री म्हणजे अमृता शेरगील. विसाव्या शतकाच्या आरंभी, इ. स. १९१३ मध्ये जन्माला आलेली ही स्त्री. केवळ अठ्ठावीस वर्षांच्या हयातीत तिने भारतीय कलेच्या इतिहासात फार मोठी कामगिरी करून दाखविली. तिची आई हंगेरियन होती आणि वडील शीख यामुळे पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतींचा तिच्या कलागुणावर ठसा उमटलेला होता. तिने स्वतःचे एक व्यक्तिचित्र रेखाटले आहे त्यात तिने भारतीय वेष परिधान केला आहे आणि जवळच्या आरशात स्वतःचे प्रतिबिंब दाखवले आहे ते मात्र युरोपीय विदुषीच्या पोषाखातील. हे चित्र म्हणजे अमृताच्या सर्व जीवनाचेच प्रतीक होय. तिचे कलाशिक्षण युरोपात झाले पण तिने चित्रित केले ते सारे भारतीय जीवन. इथल्या जीवनातली करुणा तिने चित्रित केली. इथले ऋतू, इथले उत्सव, इथली माती आणि इथली माणसे यांचे मनोज्ञ दर्शन अमृताने आपल्या नाजुक कुंचल्याने घडवले. तिच्या कलेत पारंपारिकता होतीच, पण त्याबरोबरच नवकलेचा प्रकाश होता. नवकलेतले अनेक गुण तिने आत्मसात केले होते. रंग, आकार आणि छायाप्रकाश यांचे विविध प्रयोग तिने भारतीय चित्रकलेच्या इतिहासात चिरस्थायी केले. म्हणूनच भारतीय कलेला नवकलेचा साज चढवणाऱ्या कलावंतांत अमृता शेरगील हे नांव प्रामुख्याने घेतले जाते. ती अल्पायुषी ठरली; नाहीतर कलाक्षेत्रात तिने याहूनही अधिक कामगिरी करून दाखविली असती. अमृता शेरगीलची चित्रे आज दिल्लीच्या म्युझियममध्ये एअरकंडिशन केलेल्या खोल्यांत ठेवून देण्यात आली आहेत. तिच्या कलाकृती हा भारतीय कलेचा मोठा ठेवा आहे.

अंबिका धुरंधर, अंजला त्रिनिदाद, प्रफुल्लता जोशी ही आणखी काही भारतीय चित्रकर्त्या स्त्रियांची नांवे. या स्त्रियांनी आपापल्यापरीने कलाक्षेत्रात कामगिरी केली आहे. अंबिका धुरंधर आणि अंजला त्रिनिदाद या दोघींचेही वडील कलामहर्षी होते. आपल्या थोर पित्यांचा वारसा त्यांनी कलाक्षेत्रात समर्थपणे चालविला. प्रफुल्लता जोशी ही आधुनिक कालातील चित्रकर्त्री. नवकलेच्या क्षेत्रातील तिची कामगिरी. विविध रागिण्यांची तिने नव्या पद्धतीने काढलेली चित्रे कलारसिकांना आवडली आहेत.

स्त्रियांच्या कर्तृत्वाला अवसर आहे

या स्त्रियांच्या कामगिरीकडे पाहिले म्हणजे चित्रकलेच्या क्षेत्रात स्त्रियांच्या कर्तृत्वाला अवसर मिळणे सहज शक्य आहे हे दिसून येईल. मात्र त्यासाठी स्त्रियांनी पुढे व्हायला पाहिजे आणि त्यांच्याकडून उपेक्षित राहिलेले हे क्षेत्र त्यांनी आपल्या कलागुणांनी भूषित केले पाहिजे. दिवसानुदिवस स्त्रीजीवन अधिक समृद्ध होत आहे, स्त्रियांवरील बंधने जाऊन स्वतंत्र वृत्तीने त्या विविध क्षेत्रांत वावरत आहेत. अशा या काळात चित्रकला क्षेत्रातही स्त्रियांच्या कामगिरीला भरपूर वाव आहे.

चित्रकला क्षेत्राच्या मर्यादाही आता वाढत्या आहेत. चित्रकला ही आता केवळ कॅन्व्हासवर राहिलेली नाही. जाहिराती, मासिके, पुस्तके, गृहसजावट, विविध

कारखान्यातील आलेख, युद्ध आघाड्या, चित्रपटसृष्टी अशा विविध बाबतींत चित्रकलेचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. या दृष्टीने चित्रकला ही एक शोभेचीच कला राहिली नसून मानवी जीवनाला गरज वाटावी इतकी तिची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. अशा या वेळी या कलाक्षेत्रात काही कामगिरी करून दाखविण्याची आकांक्षा स्त्रियांनी धरली तर ती स्वागतार्ह ठरेल.

❦

[२] नृत्यकला

प्रभा मराठे

श्रीमती प्रभा मराठे (जन्म ८-१०-१९३६) रोहिणी भाटे यांनेकडे सुरुवातीचे नृत्यशिक्षण. संगीत नाटक अकादमीची राष्ट्रीय शिष्यवृत्ती. पं बिरजू महाराज यांच्याकडे लखनौ घराण्याच्या कत्थकचा तपशीलवार अभ्यास नृत्यावर स्फुट लेखन व नृत्यप्रयोगाचे परीक्षण. 'कलाछाया' नृत्यसंस्थेच्या सचालिका. (७५०।९४ ब, प्रभात रस्ता, पुणे ४)

माणूस आणि नृत्य, परस्परांचा अतूट संबंध

खरे म्हणजे स्त्री आणि नृत्यकला यांच्यातील संबंधाच्याही आधी मनुष्य आणि नृत्यकला यांच्यातील संबंधाबद्दल अनेक विचार मनात येतात. वेगवेगळ्या कालखंडातील समाजजीवनात नृत्यादी कलाविषयीची जाणीव भिन्न भिन्न दिसते. वर्तमानकालीन समाजात या कलांना आलेले स्वरूप व या समाजजीवनाशी त्यांचे असलेले नाते, यातून तर रोजची वाटच काढायची असते : आणि मग मनात एकावर एक प्रश्नचिन्हे उभी राहतात.

नटराज हे श्रीशंकराचे नृत्यस्वरूप. नटराजाच्या हातातील डमरूच्या निनादाने जग जागे झाले आणि त्याच्या तालावर नाचू डोलू लागले. म्हणजे नृत्य प्राणिमात्राच्या जीवनाशी असे जन्मापासून निगडित. बरे, ही कथा म्हणजे कुणाला कल्पनेचा खेळ वाटेल, पण आजही आदिवासींच्या जीवनात नृत्याचे केवढे महत्त्व! नेसायला चतकोर फटकुर आणि खायला कोरभर तुकडा असे हे जगतात, आणि तरीदेखील नाचतात, गातात. भरल्या पोटी खरे म्हणजे सुचाव्यात अशा या 'सांस्कृतिक' गोष्टी त्यांना अर्धपोटी सुचतात तरी कशा? प्रपंचाचा गुंता बाजूस सारून ईश्वरचरणी विलीन होण्यासाठी झटणारी, भौतिकतेपासून दूर जाऊ इच्छिणारी अनेक संतमंडळी

नृत्यासारख्या भौतिक गोष्टींच्या साहाय्याने आपली वाटचाल करतात, मग सर्वसाधारण लोकांची काय कथा? विविध वृत्तींच्या, विविध देशांतल्या आणि विविध आर्थिक स्तरातल्या माणसांना नृत्य सारखेच आकर्षित करते. असे असूनही नृत्यकलेत रमणाऱ्या स्त्रीला पुरातन काळापासून आजपर्यंत कमीअधिक प्रमाणात संघर्षाचे जीवन जगावे लागले आहे, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. भगवान कृष्णाबरोबर रास रंगविणाऱ्या गोपी आणि राधा, त्या काळच्या समाजात टीकानिर्देसच पात्र ठरल्या. कुठल्या ना कुठल्या देवमूर्तीच्या सेवेला वाहून घेणाऱ्या नृत्यकार स्त्रियांची अनेक रूपे—देवदासी, महारी, मुरळी, मंदिरनर्तकी इत्यादी, अशा स्त्रियांची जणू एक वेगळी जातच. कलावंत म्हणून समाजाने चार कौतुकाचे शब्द त्यांच्यावर फेकावे, पण आपल्या कुलीन जीवनापासून मात्र त्यांना चार हात दूर ठेवावे. आजचे आधुनिक युग संस्कृतिसंवर्धनाचे! दर चार दिवसांनी कुणातरी नृत्यकार स्त्रीचे नाव, फोटो चमकतो. एकसारखी कुणाला तरी सुवर्णपदके, पदव्या, मानसन्मान मिळतात. आणि तरीसुद्धा या 'सन्माननीय' नृत्यकार स्त्रीच्या जीवनातील संघर्षात फार मोठा फरक पडलेला नाही. ही परिस्थिती विचार करायला लावणारी निश्चित आहे.

नृत्याचा संबंध ईश्वराराधनेशी जोडून ठेवला

आमचे पूर्वज मोठे कलक होते. जीवनातल्या प्रत्येक लहानसहान गोष्टीचा संबंध त्यांनी ईश्वराशी जोडून ठेवला. ८४ लक्ष योनी हिंडून मनुष्यजन्म मिळावयाचा. तेव्हा या मनुष्यजन्माचे सार्थक मोक्षप्राप्तीमध्ये व्हावे ही कल्पना. आत्म्याचे परमात्म्याशी मीलन म्हणजे मोक्षप्राप्ती. एकपेशी प्राण्यापासून मनुष्यप्राण्यापर्यंत प्राण्याची शारिरिक उत्क्रांती होत गेली. मनुष्य हा शारीरिक दृष्ट्या परिपूर्ण प्राणी. आता यापुढे उत्क्रांती व्हायची, ती बुद्धितत्त्वाची. शरीर आणि बुद्धी दोन्ही जेव्हा पूर्णावस्थेला पोहोचतील तेव्हा दोन्ही गळून पडून उरते फक्त सूक्ष्मस्वरूप आत्मज्योत; जी त्याच क्षणी परमात्मज्योतीमध्ये विलीन होऊन जाते. मोक्ष मोक्ष म्हणतात तो हाच. ह्या मोक्षाच्या अनेक मार्गांपैकीच एक मार्ग कलासाधनेचा. मोक्षप्राप्तीसाठी नृत्यासारख्या भौतिक गोष्टीचाच सोपान करणारे मन केवढे प्रगल्भ असेल! आमच्या पूर्वजांनी नृत्याचे मनुष्यजीवनातील महत्त्व ओळखले. आणि त्यांनी हेही जाणले की, ही कला अत्यंत सामर्थ्यवान आणि प्रसंगी मनुष्याला रसातळाला नेऊ शकणारी आहे. विशेषतः स्त्रीमध्ये या कलात्मक गुणाची बीजे अधिक; आणि म्हणूनच तरल्प्रकृती स्त्रीला या कलेपासून धोका अधिक. तेव्हा या धोकादायक वाटेचे वळणच बदलले तर? बहुधा याच विचाराने नृत्याला भक्तीचे अधिष्ठान दिले गेले. नृत्यवेड्या मीरेची कथा या संदर्भात आठवते. मीरेच्या पतीला मीरा कृष्णापुढे काय नाचते ते पाहण्याची फार इच्छा होती. मीरा नेहमी नकार देत असे. अखेर एक दिवस त्याने फारच हट्ट घेतला तेव्हा ती म्हणाली, 'मी तुमच्यासमोर नाचेन पण एका अटीवर. इथून पुढे आपले संबंध बहीणभावासारखे

राहतील.' राण्याने कबूल केले. मीरा त्याच्यासमोर मुक्तपणे नाचली, आणि...... राणा अंतर्बाह्य थरारून गेला; परंतु तो वचनबद्ध होता. अखेर याच संघर्षात त्याचा बळी गेला. मला या कथेत फार मोठा अर्थ वाटतो. आपल्या नृत्याचे पेटते सामर्थ्य आणि राण्याच्या नश्वर कुडीचे दौर्बल्य मीरा पूर्णपणे जाणून होती. ती त्याला वचनबद्ध ना करती तर तिच्या नृत्याच्या मोहपाशात राणा आणि राण्याच्या मायापाशात ती अडकून पडती. कौशल्याने तिने हा अधःपात टाळला.

देवदासी : देवाला वाहिलेल्या नर्तिकांची निराळी जमात

दक्षिणेतल्या देवदासी किंवा उत्तरेतल्या मंदिरनर्तकींच्या जन्माचे रहस्य हेच आहे. यांना लौकिक जीवन निषिद्ध असे. दक्षिणेतल्या देवदासीच्या परंपरेने 'भरतनाट्य' आणि 'कथाकलि' या दोन शास्त्रोक्त नृत्यपद्धती अगदी अलिकडच्या काळापर्यंत टिकविल्या. उत्तरेत 'कथिकां'च्या घरात कुणीतरी एक मुलगी देवाला दिली जाई. बाकीच्या लौकिक जीवन जगत. मणिपूरचा एक राजा भाग्यचंद्र याने आपल्या मुलीला रासलीला शिकवून तिला कृष्णार्पण केली होती. अगदी आत्ताआत्तापर्यंत मणिपुरी मुली फक्त देवळात नाचत. अशा रीतीने नृत्यकलेची उपासना करणाऱ्या स्त्रियांचा एक समूह समाजापासून तुटून निघाला. कलासाधना आणि तिचे ईश्वराच्या मूर्तीसमोर प्रदर्शन एवढेच यांचे जीवन असे. अर्थात या नृत्यकार्यक्रमाच्या वेळी मंदिराचा मुख्य पुजारी आणि अनेक विद्वज्जन प्रेक्षक म्हणून हजर असावयाचेच. अशा तऱ्हेचे अलौकिक जीवन या स्त्रियांच्या वाट्याला देण्यात आले, आणि आदर्श आणि वास्तव यांचा संघर्ष सुरू झाला.

या स्त्रिया ईश्वरचरणी वाहिल्या गेल्या खऱ्या; परंतु हा ईश्वर होता अचेतन पत्थराची मूर्ती, आणि या स्त्रिया होत्या सचेतन रक्तमांसाच्या मूर्ती. या जड शरीराच्या निसर्गदत्त मागण्यांची व्यवस्था लावण्याचे राहूनच गेले. मेहनतीने तेजाळलेला त्यांचा बांधा, बुद्धीच्या विकासाने लखलखणारे डोळे आणि अंगप्रत्यंगांतून ओसंडणारे डौलदार मोहक तारुण्य. कार्यक्रम पाहणारे विद्वज्जन आणि पुजारी हे सगळेच काही मीरेच्या वचनबद्ध राण्याइतके संयमी नव्हते, किंवा सर्वच देवदासी काही मीरेइतक्या समर्थ नव्हत्या. हळूहळू देवाच्या दारीच पापाचा शिरकाव झाला. काही देवळांचे महन्त देवापुढे पडणाऱ्या तांदूळपैशाप्रमाणेच देवदासींनाही आपली मालमत्ता समजू लागले. पुढे देवाच्या मंडपातून राजदरबारी त्यांचा प्रवेश झाला. देवदासी नाचू शकते तोवर तिचा मान, तोवर तिची बडदास्त. पुढे काय? हा प्रश्न होताच. अर्थात एखाद्या धनिकाला धरून राहणे व्यवहार्य ठरू लागले. उत्तरेत मुसलमान शहेनशहा आले. मंदिरे उद्ध्वस्त झाली. देवापुढे पुष्पांजली वाहणाऱ्या नर्तिका नबाबांपुढे सलामी करू लागल्या. 'कलावती' म्हणून समाजाकडून ज्या स्त्रीचा मानसन्मान होई, तिची 'कलावंतीण' म्हणून अवहेलना होऊ लागली. कथिकांच्या मुली तर नाचायच्याच बंद झाल्या.

राजेमहाराजांच्या दरबारच्या कलावंतिणी

परंतु, राजेमहाराजांच्या दरबारी, 'कलावंतिणी'लासुद्धा एक प्रकारचा दर्जा होता. तिचा धनी एकच असे. अंगी कलागुण असलेली स्त्री दरबारी नर्तिका होण्याची जिद्द बाळगी; कारण केवळ सौंदर्याच्या जोरावर दरबार व राजा जिंकण्याचा तो काळ नव्हता. कुलीन संसारी आयुष्याचे भाग्य दुरावले, समाज चार हात दूर राहू लागला. पण त्याच्या बदल्यात कर्तृत्वसंपन्न आयुष्याची देणगी मिळत होती. अखंड मेहनत करावी, विद्वानांची नवनवी आव्हाने स्वीकारावी आणि प्रौढ वयात पुन: आपल्या (अनौरस) लेकीभाचीला आकार द्यावा. परंतु पारतंत्र्याच्या काळात राजेमहाराजांची आणि देवळांची रया गेली आणि त्याबरोबरच स्त्री नृत्यव्यवसायाला पारखी झाली. तेव्हापासून आत्तापर्यंत अनेक बदल होत गेले. स्त्रियांनी नृत्य करणे म्हणजे 'शांतं पापम्' या अवस्थेपासून नृत्यकार स्त्रीला सन्मानपूर्वक पदव्या देण्यापर्यंत आम्ही येऊन ठेपलो, पण नृत्यामुळे स्त्रीचे जीवन समृद्ध होण्याची ती अवस्था आम्ही जी गमावली ती गमावलीच. आज तर त्या अवस्थेपासून आम्ही फारच दूर गेलो आहोत. नृत्यामुळे स्त्रीचे जीवन समृद्ध होण्याऐवजी तिच्या जीवनात ती एक घातक गोष्ट होऊन बसली आहे.

माझे हे विधान कदाचित फार धाडसाचे आणि आश्चर्यकारक वाटेल. कारण स्त्रियांनी नृत्य करण्यात काहीच वावगे नाही असा एक विचारप्रवाह आज झपाट्याने वाढत चालला आहे. नृत्यव्यवसायात असलेले स्त्रीपुरुष आज या बदलाने आनंदित झालेले आहेत. मी स्वतः एक नृत्यकार स्त्री असून नृत्य शिकण्यासाठी मी घरोदारी झगडा केलेला आहे. मुलींना सुलभतेने नृत्य शिकावयास मिळावे या ओढीने मी एक नृत्यशाळा जिद्दीने चालवते आहे. मुलींच्या नृत्य करण्याबाबतचा समाजाचा उदार दृष्टिकोन पाहून मला देखील फार फार आनंद होतो, आणि तरीही मी असे म्हणते की स्त्रीच्या जीवनात नृत्य ही एक घातक गोष्ट होऊन बसली आहे. निःसत्त्व अन्न जसे उत्तम शरीरसंवर्धनाच्या दृष्टीने घातक ठरते, अगदी त्याचप्रमाणे नृत्यकलेबाबतच्या आमच्या निःसत्त्व दृष्टिकोणामुळे, नृत्य आम्हा स्त्रियांच्या जीवनात घातक ठरत आहे.

ज्यावेळी नृत्यकार स्त्रिया संख्येने फार नव्हत्या आणि समाजापासून चार हात अंतरावर त्यांना ठेवले जाई, त्याकाळी नृत्यामुळे या स्त्रियांचे जीवन केवढे समृद्ध असे. त्यांच्यापुढे आपल्या गुरूंच्या, आईच्या, आजीच्या रूपाने कलेची उंच उंच शिखरे असत. एका विशिष्ट बिंदूवर नजर ठेवून त्या ईर्ष्येने मेहनत करीत. या मेहनतीत त्यांच्या शरीरमनाची शुद्धी होई, बुद्धीचा विकास होई. आपल्या ज्ञानाच्या त्यांना वारंवार कडक परीक्षा द्याव्या लागत. एक दोन मास्तरांच्यापुढे नव्हे, तर जाणत्या विद्वानांच्या साहित्यिकांच्या नि कलावंतांच्या परिषदेत. एकाहून एक सरस कलावंतांना अनेकदा पाहिलेल्या अनुभवी, रसिकराजांसमोर या परीक्षा होत. भरसभेत आव्हाने दिली जात. व्यंकटाम्मा या म्हैसूरच्या जुन्या विदुषीने सांगितलेली गोष्ट पहा. म्हैसूरची

एका सिद्ध नर्तिका बडोद्याला गेली असता तिच्या नृत्यावर प्रसन्न होऊन गायकवाड महाराजांनी तिचा अपूर्व सन्मान केला. त्यांनी तिला चांदीचे घुंगुरे इनाम म्हणून दिली. म्हैसूरला परतल्यावर हे घुंगुर बांधून ती कार्यक्रम करणार होती. म्हैसूरच्या विद्वानांनी हरकत घेतली, 'ही घुंगुरे घालण्याचा तुझा अधिकार तुला सिद्ध करावा लागेल.' विद्वानांची परिषद् बोलावली गेली. त्यांनी कसून परीक्षा घेतली. दुर्दैवाने ती नर्तकी त्यांचे संपूर्ण समाधान करू शकली नाही, आणि तिला ती घुंगुरे कधीच वापरता आली नाहीत. वास्तविक बडोद्याचे महाराज अतिशय जाणकार व गुणग्राही होते; पण किती झाले तरी ते 'महाराज'. त्यांच्या निर्णयावर विद्वानांचे शिक्कामोर्तब व्हायलाच हवे. आज परिस्थिती उलटी आहे. विद्वानाच्या निर्णयावर आज गव्हर्नरांचे, मंत्र्यांचे शिक्कामोर्तब लागते. त्याखेरीज विद्वानाच्या निर्णयाची नोट बाजारात चालत नाही. अर्थातच आम्ही मुली नृत्यामध्ये प्राविण्य मिळविण्याऐवजी, मंत्र्यांचे नि गव्हर्नरांचे ताल सांभाळण्यात कुशल होतो आहोत. नृत्यातला ताल संभाळताना बुद्धीचा निरोगी विकास होतो, तर हे ताल संभाळताना बुद्धी बुळबुळीत होते.

नृत्यामुळे शरीर, मन, बुद्धी यांची प्रगल्भता

ॲरिस्टॉटलसारख्या तत्त्ववेत्त्याने केलेले नृत्याचे वर्णन आम्ही विसरलो आहोत. "What in truth is Dance ?" असा प्रश्न विचारून ॲरिस्टॉटलने त्याचे मोठे अर्थपूर्ण उत्तर दिले आहे. त्याने नृत्याचे वर्णन व व्याख्या 'Flame' या एकाच शब्दात केले आहे. "O Flame! But what is a Flame, O my friends if not the moment itself? All that passes through the moment of fire and light....is not the Great Dance, O my friends, that deliverence of our body entirely possessed by the spirit of falsehood. (श्रेष्ठ नृत्याचे स्वरूप एखाद्या तेजस्वी ज्योतीसारखे असते. या नृत्यामध्ये आपले जड शरीर विलीन होऊन सूक्ष्म बनते)

तसेच ॲनी बेझंट म्हणतात, "Beauty diversified into the Arts is the true refiner and uplifter of Humanity" (कलेमध्ये भरून राहिलेले सौंदर्य हेच मानवाला सुसंस्कृत करू शकेल, त्याचा उद्धार करू शकेल.)

स्त्रियांच्या वृत्ती नाजूक असतात व त्यांची नजर कोणत्याही गोष्टीतले सौंदर्य चटकन टिपते. त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास नृत्यासारख्या कलेद्वारा सहजपणे होऊ शकेल. नृत्यकला एक संमिश्र कला आहे. तिच्यामध्ये प्राविण्य मिळविता मिळविता स्त्री आपल्या बुद्धीचा अनेक तऱ्हेने विकास करू शकते. नृत्यातील लयकारीसाठी गणिताची केवढी आवश्यकता. शिक्षणाचा गंध नसलेले नर्तक वसल्या जागी अवघड लयबंध सहजपणे निर्माण करतात. अपूर्णांकाच्या हिशेबात मधले अंतर मोजून बंदिशी बनवितात दृष्टिगोचर नसलेला काळ असा आपल्या मर्जीनुसार वळवतात आणि त्याची वाटणी

करतात. चार बोटांच्या बारा पेरांवर सारे गणित-शास्त्र ते मांडून ठेवतात. तीच त्यांची वहीपेन्सिल. जॉमेट्री कशाशी खातात माहीत नसणाऱ्या नर्तिका सुंदर, रेखीव डिझाइन्स तयार करतात. चित्रकलेला सजीव करून सोडतात. नृत्यकार निर्माण करीत असलेले वेगवेगळे आकृतिबंध म्हणजे चित्रकलेचे सुंदर सजीव नमुनेच. नृत्यातील भावाभिव्यक्ती साधता साधता नृत्यकार उत्तम मानशास्त्रज्ञ बनून जातो. केवळ डोळे, भुवया, हस्तक, मान इत्यादी अंगांच्या हालचालींवर ताबा मिळविल्याने भावाभिव्यक्ती साधत नाही. त्यासाठी ती ती विशिष्ट घटना, विशिष्ट भूमिका समजू शकणारे प्रगल्भ मन प्रथम लागते. स्त्रियांनी मनावर घेतले तर या कलेचा अभ्यास करता करता त्या विदुषी बनू शकतात. नृत्यकलेच्या अवनतीच्या काळात ज्यांनी कष्टाने नृत्यकला जतन केली, अशा २-३ स्त्रियांची नावे आठवली तरी याचा पुरावा मिळेल. श्रीमती रुक्मिणी अरुंडेल, श्रीमती मृणालिनी साराभाई आणि कै. मॅडम मेनका सोखी. एकाहून एक उंच व्यक्तिमत्त्वाच्या बायका. रुक्मिणीदेवींचे पति, श्री. अरुंडेल हे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ तर ॲटोमिक एनर्जीचे श्री. विक्रम साराभाई आणि हाफकिन् इन्स्टिट्यूटचे जनरल सोखी हे पट्टीचे शास्त्रज्ञ. अशा समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या पतींना साथ देणाऱ्या, तितक्याच समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या तीन नृत्यकार स्त्रिया. यांनी कितीतरी मोठा मानसिक झगडा पदरी घेऊन, देवदासी आणि राजनर्तकींच्या सरत्या काळात, विद्रूप होऊन भटकणाऱ्या नृत्यकलेला आसरा दिला. आपल्या कामगिरीने समाजाचे परिवर्तन केले. आपला पैसा, श्रम आणि प्रतिष्ठा यासाठी राबविली आणि फार मोठे आंतरिक समाधान मिळविले. मॅडम मेनका आता हयात नाहीत परंतु श्री. रुक्मिणीदेवी आणि श्री. मृणालिनीदेवी यांचेबरोबर बोलू लागले, म्हणजे आपण एका नर्तकीशी बोलत आहोत की प्रगाढ तत्त्वज्ञाशी बोलत आहोत, असाच कुणालाही प्रश्न पडेल. नृत्यकलेने ही किमया त्यांच्या आयुष्यात केली, परंतु हेही खरेच की अलिकडच्या काळात नृत्यकला अशी किमया करताना क्वचितच दिसते. कारण आता आम्ही नृत्यकलेचा अभ्यास करीत नाही. आम्ही फक्त 'नाचतो'. आम्हा स्त्रियाच्या आयुष्यात घातक ठरते आहे ती नृत्यकला नव्हे, तर नृत्यकलेबाबतची ही आमची चुकीची वृत्ती.

नृत्यकला ही हौस की व्यवसाय

आमचा सर्वांत पहिला गैरसमज म्हणजे, नृत्य शिकणाऱ्या प्रत्येक मुलीने स्टेजवर 'आर्टिस्ट' म्हणून चमकले पाहिजे. ही कल्पना आमच्या मनात इतकी पक्की होत चालली आहे, की नृत्य शिकायला लागल्या दिवसापासून आम्हाला 'स्टेज-आर्टिस्ट' बनण्याचे वेध लागलेले असतात. आधुनिक युगात प्रत्येक गोष्टीला एक तंत्र असते. तसे ते यासाठीही आहे. पण माणूस विसरतो की, या तंत्राने हस्तगत होणाऱ्या कोणत्याही गोष्टीला अल्पायुष्याचा शाप असतो. शिवाय, ते तंत्र पुन्हा पुन्हा वापरताही येत नाही. आज स्त्रिया असेच तंत्र अचूक वापरून 'स्टेज-आर्टिस्ट' तर बनतात, आणि अक्षरशः

फुलबाजीतून पडणाऱ्या, जमिनीवर पडण्यापूर्वीच विझणाऱ्या चांदण्यांप्रमाणे अल्पावकाशात विझून जातात. उरलेल्या आयुष्यात राहते फक्त निरर्थक पोकळी. याचा अर्थ असा अजिबात नव्हे की, स्त्रीने व्यावसायिक रंगभूमीवर येण्यास माझा विरोध आहे. परंतु जी स्त्री स्टेजवर चमकते, जिचा फोटो व नांव प्रतिथयश वर्तमानपत्रांतून झळकते, जी एकदा तरी परदेशात नाचून येते, तीच खरी नर्तिका असा भ्रामक समज कोणत्याही नृत्यकार स्त्रीने करून घेण्याचे कारण नाही. वर उल्लेखिलेल्या गोष्टी व्यावसायिक नृत्यकारांसाठी आजच्या युगात कदाचित आवश्यकही असतील, परंतु नृत्य शिकणारी प्रत्येक स्त्री व्यावसायिक नृत्यकार होऊ शकेल का? आणि ते आवश्यक व इष्ट तरी आहे का? या तीनही प्रश्नांची उत्तरे नकारात्मक आहेत. पुरुषांच्या बाबतीत त्यांचा व्यवसाय व बौद्धिक उन्नति एकाच गोष्टीमध्ये होण्याचा पुष्कळ संभव असतो. स्त्रीला मात्र एक व्यवसाय इच्छा असो, नसो, करावाच लागतो आणि तो म्हणजे गृहिणीचा. आधुनिकतेच्या कितीही टोकाला गेले तरी या व्यवसायापासून तिची सुटका होणे शक्य नाही, आणि एकाच वेळी दोन व्यवसाय कुणीही करायचे म्हटले, तर त्यातील यशाला मर्यादा पडणारच. पुरुष किंवा स्त्री व्यवसाय करतात, तो अर्थार्जन आणि त्यामुळे मिळणारे स्थिर जीवन, यासाठी. हाच व्यवसाय स्वतःच्या मानसिक प्रवृत्तीशी जुळणार असला, तर एकाच वेळी अर्थार्जन आणि व्यक्तिमत्त्वाचा उत्कर्ष साधतो आणि आयुष्याचा सारा वेळ त्यात घालविला तरी चालतो. तसे नसले म्हणजे मात्र प्रश्न निर्माण होतात. स्त्रीने नृत्यव्यवसाय पत्करणे याच कारणामुळे आज तरी तेवढेसे शक्य नाही. या व्यवसायात भांडवल आणि नफा याचे प्रमाण व्यस्त आहे. श्री. नयना झव्हेरींच्या पतीशी (सुशीलभाईंशी) बोलताना मी एकदा म्हटले, 'शास्त्रोक्त नृत्याच्या मागे लागणे म्हणचे किती खर्चाचे काम आहे, नव्हे का!' तेव्हा चटकन् ते म्हणाले, 'अहो म्हणून तर मी धंदा करतो.' एवढे सहकार्य प्रत्येक स्त्रीला आपल्या पतीकडून वा कुटुंबियांकडून मिळणे सहसा शक्य नसते. एका माणसाच्या कमाईवर कुटुंब चालणे दिवसानुदिवस कठीण होत चालले आहे. अशा परिस्थितीत पैसा कमविण्याच्या व्यवसायाऐवजी पैसा गमविण्याचा व्यवसाय स्त्रिया करू लागल्या, तर कितपत परवडेल? तेव्हा व्यवसाय म्हणून नृत्यकला स्वीकारणे हे अपवादात्मकपणे हजारी एखाद्या स्त्रीलाच जमण्यासारखे आहे. आपण वर उल्लेखिलेल्या पूर्वीच्या काळाकडे नजर टाकली तर आपल्याला दिसून येईल, की देवदासी किंवा राजनर्तकी या नृत्यकार स्त्रियांचा एक वेगळा समूह समाजात अस्तित्वात होता. त्यांना कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा अंकुश नसे. आता जीवन एकूणच अधिक गुतागुंतीचे झाले आहे. प्रत्येक माणसाला अनेक भूमिका वठवाव्या लागत आहेत. त्यामुळे स्वतःच्या छंदाला भरपूर वेळ देणे कठीण होऊन बसले आहे. कुटुंबात राहून स्त्रीने नृत्य करावयाचे म्हटले म्हणजे किती समस्या येतात. पहिली गोष्ट म्हणजे पतीला तिची ही कलासक्ती कळायला हवी. तो संवेदनाक्षम मनाचा असला तर ठीक, नाहीतर त्याला पटवता पटवताच निम्मी शक्ती जाते. नृत्य ही अतिशय ताकदीची

कला आहे. ही ताकद टिकविण्यासाठी गृहकृत्यातल्या अनेक गोष्टींत तिची ताकद खर्च न होणे इष्ट असते. स्वतःच्या शरिराची सामान्य स्त्रीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने तिला जोपासना करावी लागते. कारण शरीर हेच या कलाविष्काराचे साधन आहे. चित्राला जसा उत्तम कागद हवा, शिल्पाला जसा उत्तम दगड हवा तसे नृत्याला उत्तम शरीर हवे. आणि यासाठी ती घरात काळजी घेऊ लागली की, 'चोचले करते', 'नखरेल' इत्यादी संज्ञा आल्याच. वाटेल तसले आणि वाटेल तेवढे न खाणे. घासणे, वाटणे इत्यादी गोष्टी शक्यतो टाळणे, चेहेरा, हात नियमाने क्रीम लावून मऊ ठेवणे, तसेच दोन दोन शेरांच्या पोळ्या लाटणे, वर्षभराच्या लोणच्याच्या कैऱ्या चिरणे, लग्नाच्या पंक्ती वाढणे, अशा हात-पाय, पाठ दमविणाऱ्या गोष्टी नेमक्या कार्यक्रमाच्या दिवशी न करणे इत्यादी पथ्ये तिने पाळायलाच हवीत. अशा वेळी कुटुंबियांनी तिला हिणवू नये. रोजचा रियाज ही महत्त्वाची गोष्ट. तो ठराविक वेळी करावयाचा म्हणजे त्या वेळातली कामे नोकराकडून करून घेणे आणि त्यासाठी त्याला तसेच साथीदारांना पैसे देणे हे आलेच. तसेच नेमक्या त्यावेळी आलेल्या पाहुण्यांच्या आदरतिथ्यात थोडे उणेअधिक हे होणारच. मुलांचे संगोपन ही महत्त्वाची गोष्ट. ती स्त्री नृत्याची नादी आहे तेव्हा तिच्या हातून मुलांकडे दुर्लक्ष होणारच, असे गृहीत धरूनच तिच्या प्रत्येक कृतीकडे बघितले जाते. खरे म्हणजे बहुधा सुशिक्षित कलावंत स्त्री मुलांची वाढ फार सुंदर रीतीने करीत असते. परंतु मुलांचे संगोपन म्हणजे मुलांसाठी खस्ता काढणे व त्याग करणे या परंपरागत समजुतीत तिचे वागणे बसत नसल्यामुळे तिच्यावर आक्षेप येतात.

वरील गोष्टी क्षुल्लक दिसल्या तरी प्रत्यक्ष जगताना डोंगराएवढ्या मोठ्या होऊन बसतात आणि नृत्याचा व्यवसाय कुटुंबात राहून पत्करणाऱ्या स्त्रीला पदोपदी संघर्षाला तोंड द्यावे लागते. नृत्याच्या बाबतीत हौस आणि व्यवसाय यातली सीमारेषा पुसट असते त्यामुळे हौसेचे रूपांतर नकळत व्यवसायात होते आणि मग हौसेचा आनंदही हातून निसटतो आणि व्यवसायही साधत नाही. हे कसे होते पाहा. नृत्यामध्ये थोडे प्राविण्य मिळू लागले की चार लोकांनी आपले नृत्य पाहून कौतुक करावे ही नैसर्गिक अपेक्षा निर्माण होते. येथपर्यंत हौसच राहते, पण कुठे १-२ ठिकाणी कार्यक्रमासाठी म्हणून मुलगी बाहेर पडली की, आपल्या वाढत्या आकांक्षांना लगाम घालणे बहुतेकांना साधत नाही. घरगुती कार्यक्रम, छोट्या महफिली, कुठे मदतीसाठी कार्यक्रम यांतून वाढणारी रंगभूमीची आवड मग सुटत नाही आणि नकळतच व्यावसायिक संचात भाग घेणे, कान्फरन्सेसमध्ये कार्यक्रम देणे हे चक्र वाढत जाते. त्यात अधिकाधिक वेळ गुंतू लागतो. रियाज, पोषाख यासाठी अधिक पैसा लागतो. मोठ्या मोठ्या गुरुजनांकडे शिकावेसे वाटू लागते आणि यासाठी लागणाऱ्या पैशासाठी कार्यक्रमाला पैसे घेणे सोयीस्कर वाटू लागते. पुढे मग 'पब्लिसिटी', अनेक लोकांशी ओळखी राखणे, इतर नृत्यकारांशी चुरस आणि सतत प्रकाशात राहण्याची गरज, हे सर्व ओघाने आलेच.

या सर्व उलाढालीत त्या कलावतीला आपल्या मूळच्या सरळसोप्या कौटुंबिक जीवनात रस वाटेनासा होऊन त्यापासून ती हळूहळू दुरावते आणि दुसरीकडे व्यवसायाच्या तंत्रात अडकून, हौसेच्या काळात मिळणाऱ्या कलासाधनेतल्या खऱ्याखुऱ्या आनंदालाही मुकते. सुरुवातीस आपल्या कलाविष्कारात हरवून गेलेले, मग्न झालेले आणि या खऱ्या मग्नतेमुळेच रसिकांच्या श्रद्धाआदराला पात्र ठरून प्रचंड व्यावसायिक यश मिळविलेले कित्येक कलावंत नंतर स्वतःच्या कलेशीच उद्दाम झालेले मी पाहिले आहेत. कला माणसाइतकी सहनशील नाही. तिच्याशी तुम्ही प्रामाणिक आहात तोवर ठीक. एरवी ती तुमच्यावर सरळ उलटून प्रहार करते. कलावंत लहान मुलासारखा असतो. कलेच्या कुशीत तो आईच्या कुशीतल्यासारखा निर्धास्त असतो. पण स्वतःच्या उद्दामपणामुळे एकदा का याने आईची कुशी गमावली, की तो सैरभैर होतो आणि पोरक्या मुलासारखे वणवण भटकण्याची पाळी त्याच्यावर येते. जी कला त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या उन्नतीस कारणीभूत झाली, तीच त्याच्या व्यक्तित्वाचा ऱ्हास करते. व्यवसायात राहून आपला असा ऱ्हास न होऊ देणे फार थोड्या कलावंतांना साधते.

कौटुंबिक जीवन आणि कलासाधन

म्हणून हौसेची मर्यादा ओलांडताना स्त्रीने काळजीपूर्वक पाऊल टाकावे. आपल्या पतीचा स्वभाव, कुटुंबाची व्याप्ती व जबाबदारी, आपली आर्थिक परिस्थिती आणि शारीरिक ताकद या बाह्य परंतु महत्त्वाच्या गोष्टी आणि आपल्याला नक्की काय हवे आहे, आपल्या मनाचा पिंड काय व आपले मनोधैर्य किती यांचा नीट अंदाज घेऊन पुढे पाऊल टाकावे. मनाचा पिंडच धवधवत्याचा असेल तर कोमळणे नि विराट होणे भागच पडेल. मर्यादा घालू म्हटलेत तरी शक्य होणार नाही. तसे नसेल तर मात्र, स्त्रीने या क्षेत्रात आपण कुठवर जायचे व काय करावयाचे याच्या मर्यादा ठरवून घ्याव्यात आणि त्या मार्गावरून चालत असता मग स्वतःची कुणाशीही तुलना करू नये. रंगभूमीवरच्या झगझगाटातली नृत्यकार स्त्री जे करू शकणार नाही ते कदाचित इतर नृत्यकार स्त्रिया करू शकतील. घरगुती समारंभात नृत्य करून समाजाच्या शिक्षणाचे एक मोठे काम साधेल. मध्यमवर्गीतला हा समाज ५-१० रु. खर्चून न कळणाऱ्या अभिजात नृत्याच्या कार्यक्रमाला वर्षातून फार तर एखादा जाणार. या उलट सर्वांत कमी दरातली करमणूक म्हणून सिनेमाला मात्र ही माणसे पुष्कळदा जातात. नृत्याविषयीचे फार मोठे गैरसमज सिनेमातल्या नृत्यावरून त्यांच्या मनात पक्के झालेले असतात. आपल्या कार्यक्रमातून या समाजाला अभिजात नृत्यात काय पहावे हे हसत खेळत सांगता येते. 'तुम्हाला नृत्यातले काय कळते?' असे म्हणून त्यांचा उपहास करण्यापेक्षा 'तुम्हाला कळलेच पाहिजे' अशा निर्धाराने आम्ही त्यांच्याजवळ गेलो तर अभिजात नृत्यकारांना आणखी थोडी चाहते ठरपूर प्रेक्षकवर्ग मिळेल. आणि हे काम कौटुंबिक क्षेत्रातून स्त्री फार प्रभावीपणे करू शकेल. 'अगो,

तिची सून नाचणार आहे. तिची भाची नाचणार आहे; अन शिवाय तिकिट वगैरे नाही.' मोठ्या उत्साहाने नि कौतुकाने आमची कुटुंबवत्सल मंडळी या कार्यक्रमाला जमतात. ही संधी घेऊन, जमलेल्या माणसांच्या कुवतीनुसार सोपेपणाने, नृत्यकार स्त्रीने आपले ज्ञान त्यांच्या डोक्यावर अक्षरशः लादावे. पन्नास चेहेऱ्यांतून चार सहा डोळे तरी चमकू लागतातच लागतात. हे यश कमी नव्हे. आविष्कारामधला आनंद अशा रीतीने व्यावसायिक रंगभूमीवर न जाताही मिळविता येईल. जाणकारांच्या छोट्या मेहेफिलीमध्ये अशा आनंद फार मिळतो. तिथे मुक्तपणे नाचता येते. समोर तिकिटे काढून आलेला जमाव नसतो, त्यामुळे त्याल अमूक दिलेच पाहिजे असे बंधन नसते. स्वतःला जे हवे ते नाचता येते आणि एक गुपित म्हणून सांगते की व्यावसायिक रंगभूमीवरचे प्रसिद्ध गायक नर्तकसुद्धा अशा मेहेफलीसाठी फार उत्सुक असतात. मोसमातल्या दहाबारा धडाकेबाज कार्यक्रमासाठी आवश्यक ती स्फूर्ती ते अशा एखाद्या मेहेफिलीतूनच मिळवितात. आपल्याबरोबरचे दहाबारा गायकवादकनर्तक कलावंत आणि दहाबारा शिष्यमंडळी यांच्याबरोबर जन्माष्टमीच्या रात्री बारा दोन वाजता श्री. बिरजूमहाराजांचा अभिनय जसा खुलताना मी पहिला आहे तसा कार्यक्रमात क्वचितच खुलतो. मोठ्या कार्यक्रमात कलावंताच्या कसबाला तेज चढत असते, तर अशा छोट्या मेहेफिलीत त्याचा आत्मा उमलून येतो.

फसव्या यशाच्या मागे लागू नये

नृत्यव्यवसायातल्या फसव्या, तकलादू यशावर स्त्रियांनी आपली महत्त्वाकांक्षा केंद्रित न करता, अभ्यासू वृत्तीने जर या कलेकडे पाहिले, आणि अधिक भरीव महत्त्वाकांक्षा ठेवली तर शरीरमनाला आनंद देणारी व शरीरमनाचा विकास करणारी नृत्यकलेसारखी दुसरी प्रभावी गोष्ट नाही. स्त्रीच्या आयुष्यात उल्हास, ताजेपणा चैतन्य आणि बौद्धिक तरतरी शेवटपर्यंत कायम ठेवण्यासाठी नृत्य फार उपयोगी पडणारे आहे, फक्त 'जरा जपुन टाक पाउल साजणी' म्हणजे झाले!

()

१४

गेल्या दीडशे वर्षांतील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग

गंगूताई पटवर्धन

श्री. गंगूताई पटवर्धन, बी. ए., टी. सी. व मॉंटेसोरी डिप्लोमा (लंडन). (जन्म १६–५–१९००) निवृत्त मुख्याध्यापिका, सरकारी ट्रेनिंग कॉलेज फॉर विमेन, बडोदे. तेथेंल श्री. ना. दा. ठा. विद्यापीठास जोडलेल्या महिला पाठशालेच्या दहा वर्षे ऑनररी प्रिन्सिपल व मानसशास्त्राच्या प्राध्यापिका. शिक्षण व समाज क्षेत्रात सेवाकार्य. पुणे विभागाच्या भारत स्काउट-गाइड असिस्टंट स्टेट कमिशनर. (विसावा, १२९१ शुक्रवार, सुभाषनगर, पुणे २)

शिक्षण संपादन करणे (Right to educate) हा मानवी मूलभूत हक्कांपैकी महत्त्वाचा हक्क आहे. आंतरराष्ट्रीय संघटनेने त्या बाबतीत स्त्रीपुरुष समानता मान्य केली आहे व १९५० साली भारतीय राज्यघटनेतही तिला मान्यता मिळाली आहे. आज घटनेप्रमाणे भारतीय स्त्रीस ज्ञानमंदिराची सर्व दालने खुली झाली आहेत. हा हक्क प्राप्त होण्यापूर्वीच्या दीडशे वर्षांच्या कालाचे सिंहावलोकन केल्याशिवाय तो प्राप्त होण्यासाठी कोणी किती कष्ट केले व किती आणि कोणत्या प्रकारचे उपाय योजले हे ध्यानी येणार नाही. ज्यांना हा हक्क आज आपोआप जन्माबरोबर प्राप्त झाला आहे त्यांना तो किती मेहनतीने संपादन करण्यात आला हे नीट समजले तर त्याचे खरे मोल लक्षात येईल. त्या दृष्टीने गेल्या दीडशे वर्षांतील स्त्रीशिक्षणाची सामान्य वाटचाल व ती होत असता वेळोवेळी झालेले तद्विषयक प्रयोग थोडक्यात वर्णन करण्याचे ठरविले आहे.

एकोणिसावे शतक

स्त्री जातीचा सर्व बाजूंनी कोंडमारा

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला भारतामध्ये सर्वत्र राजकीय अशांतता होती. इंग्रज व मराठे ह्यांच्यामध्ये लढाया सुरू होत्या. मोगल राज्य मोडकळीला आले होते. ह्या काळी स्त्रियांचा सामाजिक दर्जा स्वाभाविकपणेच अत्यंत खालावलेला होता. हिंदु

स्त्रियांची लग्ने आठ वर्षांच्या आतच होत असत. घरकाम व हलक्या दर्जाची मजुरी कामे याशिवाय, उपजीविकेचे दुसरे साधन उपलब्ध नव्हते. सामाजिक व नैतिक बंधने अतिशय कडक होती. घराच्या चार भिंतीच्या बाहेरचे जग त्यांना माहीत नव्हते. बहुपत्नीकत्वाची चाल, बालपणी वैधव्यप्राप्ती, पुनर्लग्नास बंदी इत्यादी परिस्थितीमुळे स्त्रीजातीचा अत्यंत कोंडमारा होत होता. मुसलमानी स्त्रियांची लग्ने जरा प्रौढपणी होत असली तरी कडक पडदा पद्धतीने त्यांचीही कुचंबणा होत होती. काही पारशी कुटुंबांत मात्र स्त्रियांना थोडीफार मोकळीक असावी असे आढळते. स्त्रियांचे ह्या काळातील शिक्षण म्हणजे घरात आई किंवा सासू अशा वडीलधाऱ्या स्त्रियांचे हाताखाली काम करताना, घरकाम, कौटुंबिक रीतिरिवाज, व्रतवैकल्ये यांची प्रत्यक्ष माहिती मिळविणे. जरा वरच्या वर्गातील स्त्रियांना, मोठे झाल्यावर पुराणे, कीर्तन व प्रवचने ऐकून आपल्या धर्माचे व धर्मग्रंथाचे श्रवणभक्तीने साध्य होईल ते ज्ञान व त्यातून जी अक्षरओळख होईल तेवढेच शिक्षण. आपण शालेय शिक्षण म्हणतो त्याचा त्यावेळी गंधही नव्हता.

१८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला व इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य निष्कंटकपणे सुरू झाले. कंपनी राज्य स्थापन करीत असता इंग्लंडच्या पार्लमेंटने तिच्या कारभारावर अंकुश ठेवण्यासाठी रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला व वीस वीस वर्षांनी कारभार तपासून पुढची सनद देण्याचे ठरविले. एतद्देशीय प्रजा बिथरून इंग्रज व्यापाराचे बस्तान बिघडू नये ह्या हेतूने ताब्यातील प्रजेच्या धर्म, रीतरिवाज, शिक्षण इत्यादी बाबतीत कंपनीने ढवळाढवळ करू नये असा आदेश तिला देण्यात आला. कंपनीचे अधिकारी त्या धोरणाने वागत. ते धोरण १७९३ पर्यंत चालू होते. त्या साली सनद वाढविण्याचा प्रश्न आला तेव्हा चार्लस ग्रांट, विल्बरफोर्स वगैरे विचारवंतांनी पार्लमेंटात भाषणे करून, 'मिळविलेले राज्य स्थिर करण्यासाठी व टिकविण्यासाठी एतद्देशीय प्रजेच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणे कंपनी सरकारचे कर्तव्य आहे' ह्याची जाणीव करून दिली. त्यावेळी त्याचा उपयोग झाला नाही. पण १८१३ तील सनदेच्यावेळीं त्याचा विचार मान्य होऊन वार्षिक १ लक्ष रुपये शिक्षणासाठी खर्च करण्यास परवानगी मिळाली. तसेच कंपनीच्या राज्यात धर्म प्रसाराच्या हेतूने मिशनरी येत त्यांना दवाखाने काढण्यास परवानगी होती, पण शिक्षणसंस्था काढण्यास सरकारी धोरणानुसार बंदी होती; ती त्यावेळी उठविण्यात आली. अशा रीतीने शिक्षणक्षेत्रात प्रवेश करण्यास प्रारंभ होऊन आधुनिक शिक्षण पद्धतीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

स्त्रीशिक्षणास सुरुवात मिशनरी संस्थांकडून

मिशनरी संस्थांनी ह्या संधीचा फायदा तावडतोब घेण्यास सुरवात केली. मुलांच्यासाठी त्यांनी शाळांतूनेही काढलीच, पण स्त्रियांना आधुनिक शिक्षण देण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. कलकत्ता फीमेल ज्युव्हेनाईल सोसायटीने १८२० साली कलकत्याला बंगाली मुलींची शाळा व हिंदी मुलींची पहिली शाळा काढली. १८२१

मध्ये ब्रिटिश फॉरिन स्कूल सोसायटीतर्फे स्त्रीशिक्षणप्रसार करण्याच्या हेतूने मिस कुक हिंदुस्थानात आल्या व त्यांनी कलकत्यालाच दुसरी शाळा उघडली. १८२४ साली लेडी ॲमर्स्ट ह्यांनी कलकत्ता व त्याचा परिसर ह्यात मुलींच्या शाळा काढण्याच्या हेतूने 'सोसायटी फॉर नेटिव्ह फीमेल एज्युकेशन' नावाची संस्था काढली. बंगालमध्ये असे प्रयत्न चालू असता 'अमेरिकन मिशनरी सोसायटीने' मुंबई शहरात १८२४ मध्ये ह्या इलाख्यातील मुलींची पहिली शाळा उघडली. ती इतकी लोकप्रिय झाली की १८२९ पर्यंत निरनिराळ्या भागांत अशा ९ शाळा निघून त्यांत ४०० मुली शिकू लागल्या. भायखळ्याला शाळेला जोडून वसतिगृहही सुरू केले. त्याच सोसायटीने १८३१ मध्ये नगरला दोन शाळा व एक वसतिगृह काढले. चर्च मिशनरी सोसायटीने १८२४ मध्ये आपली पहिली शाळा मुंबईस काढून १० वर्षांत ठाणे, नाशिक, इत्यादी जिल्ह्यातही अनेक शाळा काढल्या. अमेरिकन मिशनचे काम पाहून स्कॉटिश मिशनला स्फूर्ति झाली. त्यांनी डॉ. विल्सन व मिसेस विल्सन (पूर्वीच्या मिस कुक) यांचे नेतृत्वाखाली मुंबई व मुंबईजवळील जिल्ह्यांतून आपल्या शाळांचे जाळे पसरविले. कलकत्ता मुंबईत झाले तेच मद्रास वगैरे ठिकाणी झाले. मद्रास इलाख्यात तर स्त्रियांस पडदा नसल्याने शिक्षणाचा फैलाव होण्यास चांगलीच अनुकूल भूमी मिळाली.

येथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे की, मिशनरी संस्थांचा अंतस्थ हेतू ख्रिस्ती धर्मप्रसाराचा होता. त्यांच्या तऱ्हेच्या प्रार्थना, धर्मविषयक पाठ ह्यांना विद्यार्थिनींना उपस्थित राहाणे भाग पडे. त्यामुळे हिंदू लोकांच्या मुलींना ह्या शाळांचा लाभ फारच कमी मिळे. खालच्या समाजाला जवळ करून मिशनऱ्यांनी त्यांना मोठ्या प्रमाणावर शिक्षित केले. थोड्याशा शिक्षणानेही, कंपनी सरकारच्या नोकरीत त्यांना प्रवेश मिळू लागला, त्यामुळे पुरुषसमाज आकर्षित झालाच, पण स्त्रियांनाही शिक्षित केले पाहिजे ह्याची त्याला जाणीव होऊ लागली. त्यामुळे पुढारलेल्या समाजाने व पारशी समाजाने ह्या शाळांचा फायदा घेतला. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय ह्यांनी १८ व्या शतकाचे शेवटी सामाजिक सुधारणा व स्त्रीशिक्षण ह्याबद्दल लोकांत जागृती उत्पन्न केली. ईश्वरचंद्र विद्यासागर ह्यांनीही त्याला जोड दिली. सतीची चाल बंद करण्याच्या खटपटीसाठी राजा राममोहन रॉय विलायतेत गेले असता, हिंदी माणसांना शिक्षण देऊन व तेही इंग्रजी भाषेद्वारा देऊन त्यांना कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांमध्ये स्थान द्या, अशी मागणी त्यांनी केली होती. इंग्रजी शिक्षणाने दृष्टी बदलून स्त्रियांची दुर्दशा नष्ट होण्यास मदत होईल अशी त्यांची खात्री होती.

ईस्ट इंडिया कंपनीला १८३३ मध्ये सनद वाढवून देताना त्यापूर्वी राजा राममोहन रॉय ह्यांनी आपल्या विलायतेतील वास्तव्यात हिंदुस्थानातील परिस्थितीविषयी जे वर्णन केले त्याचा परिणाम होऊन मेकॉले साहेबास शिक्षणविषयक धोरण ठरविण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे इंग्लंडमधील शिक्षण-पद्धतीच्या धर्तीवर येथील अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली व इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम ठरविण्यात आले.

त्यामुळे येथील संस्कृत पाठशाळा, मद्रसा ह्यांना मिळणारी आर्थिक मदत बंद झाली व इंग्रजी शाळांसाठी तो पैसा खर्च होऊ लागला. अर्थात त्या शाळा हळूहळू बंद पडल्या. ह्यापुढे दुय्यम व उच्च शिक्षणाच्या संस्था स्थापन करण्याकडे सरकारने लक्ष पुरविले. अशा शाळांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पुरुषांना मोठमोठ्या नोकऱ्या, मानाच्या जागा मिळू लागल्या. इंग्रजांच्या इतिहासाचे व संस्कृतीचे ज्ञान मिळाल्याने त्यांच्या राहाणीकरणीप्रमाणे वागण्याची इच्छा उत्पन्न होऊ लागली. त्यामुळे आपल्या देशातील स्त्रीसमाज मागासलेला आहे, त्याला शिक्षण नाही, तो आपल्या विचाराशी सहमत होऊ शकत नाही, ह्याची त्यांना खंत वाटू लागली; पण मिशनरी शाळांत धाडण्याची तयारी संस्कारामुळे होईना. त्यामुळे खाजगी शिक्षण-प्रयोग करण्याची स्फूर्ती होऊन काही देशी शाळा निघाल्या.

स्वकीयांनी केलेले पहिले वहिले प्रयोग

अशा शाळांपैकी पहिला प्रयोग महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८४८ मध्ये केला. स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय देश वर येणार नाही; हिंदु धर्मातील जातिभेद, अस्पृश्यता, दुरस्ट धर्मकल्पना ह्या नाहीशा करावयाच्या असतील तर स्त्रियांचे विचार सुधारले पाहिजेत; त्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. ह्या उद्देशाने त्यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यास काढली. लोकमताची पर्वा न करता, लोकांच्या छळाला न जुमानता त्यांनी मुलींना शाळेत घेतले. शिक्षिका मिळत नव्हत्या म्हणून स्वतःच्या पत्नीस स्वतः शिकवून तयार केले व शिक्षिकेचे काम करविले. पुढे सरकारने मुलींच्या शाळा काढण्याचे ठरविल्यावर त्यांनी आपली शाळा सरकारकडे सोपविली. ह्या त्यांच्या कामाबद्दल समाजाने त्यांचा छळ केला पण कंपनी अधिकाऱ्यांनी त्यांचा गौरव करून त्यांना रु. २०० चे इनाम दिले. राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर ह्यांनी ब्राह्मोसमाजाच्या मार्फत स्त्रीशिक्षणाचे कार्यास बंगाल मध्ये सुरुवात केली. अशा रीतीने महाराष्ट्र व बंगालमध्ये हिंदी स्त्रियांच्या आधुनिक शिक्षणास खाजगी प्रयत्नांनी उठाव मिळाला. ह्याच सुमारास मुंबईस एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या श्री. दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी, रावसाहेब मंडलीक, न्यायमूर्ति रानडे इत्यादी पुढाऱ्यांनी विद्यार्थीदशेत असतानाच स्त्रीशिक्षणास मदत केली. प्रो. पॅटन ह्यांच्या प्रोत्साहनाने १८४७ मध्ये स्टूडन्ट्स लिटररी व सायंटिफिक सोसायटी नावाची संस्था त्यांनी काढली व १८४९ मध्ये सोसायटीच्या वतीने स्त्रियांसाठी शाळा काढल्या. दुपारी दोन तास शिक्षकाचे काम विनावेतन करून त्यांनी त्या चालविल्या. समाजाकडून आर्थिक मदत मिळाल्यावर पगारी शिक्षक नेमले व पूर्णवेळच्या शाळा केल्या. जगन्नाथ शंकरशेट यांनी स्त्रीशिक्षणास आर्थिक मदत दिली. अहमदाबादमध्ये श्री. मगनभाई करमचंद ह्यांनी मुलींच्या शाळा काढण्यासाठी रु. २०,००० देणगी दिली, त्यामुळे तेथे दोन शाळा निघाल्या.

अशा रीतीने आपल्या संस्कृतीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मुलींच्या खाजगी शाळा खाजगी प्रयत्नाने निघत होत्या. पण कंपनी सरकारने मात्र हिंदी स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात कोणतीही जबाबदारी स्वीकारली नाही. कंपनीच्या अधिकाऱ्यांचे असे मत पडे की, स्त्रीशिक्षण हे लोकांस मान्य नसून त्याबद्दल सामान्य जनतेच्या मनात तर एक प्रकारची अढी आहे. त्यामुळे बायका बिघडतील अशी तिला भीती व धास्ती वाटते. तेव्हा सरकारने त्यात हात घातल्यास हिंदुमुसलमान ह्यांच्या धर्मकल्पनांवर आघात होऊन धार्मिक भावना दुखावतील. माउन्ट स्टुअर्ट यांनी मुलांच्या शिक्षणासाठी अतोनात खटपट केली; पण मुलींच्या शिक्षणाबद्दल एक अवाक्षरही आपल्या निवेदनात काढलेले नाही. ह्याला काही इंग्रज अपवाद होते हेही येथेच सांगितले पाहिजे. १८४८ ते १८५१ पर्यंत गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचे लॉ मेंबर व शिक्षण मंडळाचे अध्यक्ष असणारे बेथ्यून ह्यांनी स्वतःच्या खर्चाने हिंदी मुलींसाठी एक शाळा चालविली. ती 'सेक्युलर' म्हणजे कोणत्याही धर्माचा पुरस्कार करावयाचा नाही अशा तत्त्वावर चालविली. बंगाली भाषा, साधे व फॅन्सी शिवणकाम व हवे असेल त्यांना इंग्रजी भाषा असे शिक्षणाचे स्वरूप ठेवण्यात आले. पुढे ती पूर्ण वेळची शाळा बनून कॉलेजवर्गही तिला जोडले गेले. (१८४९)

१८५३ मध्ये ले. कर्नल जेकब ह्यानी पार्लमेंटच्या सिलेक्ट कमिटीपुढे निवेदन करताना असे स्पष्ट सांगितले की, पश्चिम हिंदुस्थानामध्ये सरकारी शिक्षणपद्धतीचा लाभ घेणारी एकही स्त्री नाही. हे विधान इंग्रजी शाळेसंबंधी असावे.

सरकारचे अलिप्ततेचे धोरण बदलले

स्त्रीशिक्षणासंबंधीचे अलिप्ततेचे सरकारी धोरण बदलून टाकण्याचे श्रेय लॉर्ड डलहौसींना दिले पाहिजे. त्यांनी गव्हर्नर जनरल ह्या नात्याने शिक्षण मंडळाचे मार्गदर्शन करताना असे स्पष्ट फर्मावले की, 'स्त्री शिक्षणाची देखरेख हाही शिक्षण मंडळाच्या कक्षेतील विषय आहे व त्याला सरकारने आस्थेने अगत्यपूर्वक व मोकळेपणाने पाठिंबा दिला पाहिजे.' १८५४च्या वुडच्या खलित्यात डलहौसींच्या ह्या हुकुमाला संमति मिळून स्त्रियांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उघड रीतीने स्वीकारली. पुरुषाच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्यास सरकारने १८१३मध्ये सुरुवात केली. स्त्रियांच्या बाबतीत ती स्वीकारण्यास आणखी चाळीस वर्षे लागली. ही जबाबदारी स्वीकारल्यावर १८५७ साली मुलींचे खास वर्ग चालविणाऱ्या शिक्षकांना इनामे मिळू लागली. तरीही १८६४–६५पर्यंत ह्या दिशेने फारशी प्रगती झाली नाही. १८६४ला लोकल फंड सेस सरकारने बसविला व मुलींच्या शिक्षणावर अधिक खर्च करता येऊ लागला व अधिक शाळा उघडणे शक्य झाले. १८६५ मध्ये मुलींच्या खास शाळा २३ होत्या त्या १८७१ मध्ये २१८ झाल्या व शाळेतील मुलींची संख्या ६३९ होती तो ९११० झाली.

ह्याच सुमारास मिस मेरी कार्पेंटर ह्या इंग्रज समाजकार्यकर्त्या हिंदुस्थानात भेट देण्यास आल्या. राजा राममोहन रॉय ह्यांच्या भेटीमुळे त्यांना ह्या देशाबद्दल आत्मीयता व कुतूहल निर्माण झाले होते. त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या कार्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. स्त्रीशिक्षणास गती द्यावयाची असल्यास स्त्रियांसाठी ट्रेनिंग कॉलेजे काढून स्त्रीशिक्षक तयार केले पाहिजेत; स्त्रीशिक्षक असल्या शिवाय शाळा व मुली वाढणार नाहीत, हे त्यांनी अधिकाऱ्यांना पटवून दिले. सरकारने त्या सल्ल्यानुसार ट्रेनिंग कॉलेजे काढण्याचे ठरविले व १८७० साली पुण्यास व १८७१ मध्ये अहमदाबादेस अशा दोन संस्था मुंबई इलाख्यात सुरू केल्या. इतर इलाख्यांतही तशा काढण्यात आल्या. ट्रेनिंग कॉलेजे निघाली, पण त्यात पुरेशा विद्यार्थिनीच मिळेनात. पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजात केवळ ८ विद्यार्थिनी दाखल झाल्या, कारण विद्यार्थिनी प्रौढ हव्या व अशा स्त्रियांना धुळाक्षरापासून आरंभ करणे भाग होते. अशा पाठशाळेत दाखल होण्यास किमान वय व किमान शैक्षणिक लायकी असणाऱ्या उमेदवार हव्यात, त्या मिळणे कसे शक्य होते ? प्राथमिक शाळांत दाखल होणाऱ्या मुली तिसरी चौथीपर्यंत गेल्या तरी वय १८ पर्यंत असणे शक्य नव्हते. १७–१८ वर्षाला त्या शिकलेले विसरलेल्या असायच्या. बरे, प्रौढ स्त्रिया घ्याव्या तर त्या निरक्षर असायच्या. त्यामुळे दाखल होण्यास कबूल असतील अशा स्त्रियांना प्रवेश देऊन त्यांना प्रथम प्राथमिक शाळेचे शिक्षण द्यावयाचे व मग प्रशिक्षण द्यावयाचे; असेच प्रत्येक इलाख्यात करावे लागले. १८७८ पर्यंत ट्रेनिंग कॉलेजच्या प्रवेशासाठी निश्चित शैक्षणिक लायकीची अट ठेवता आली नाही. प्राथमिक तिसरी पास असल्याचा दाखला त्यासाठी पुरत असे. तरीही पुण्याच्या संस्थेमधून १८७० ते १८८२ ह्या काळात ३४ स्त्रिया शिक्षिका म्हणून बाहेर पडल्या; म्हणजे वर्षाला सरासरी तीन असे त्याचे प्रमाण पडले. ह्याच काळात अहमदाबादेच्या संस्थेतून ३८ स्त्रिया पास झाल्या म्हणजे सरासरी प्रमाण तेच. १८८२ साली सर्व हिंदुस्थानात ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकणाऱ्या स्त्रियांची संख्या केवळ ५१५ होती. शिक्षिका कमी म्हणून शाळा कमी. सहशिक्षण देण्यास लोक तयार नव्हते. तरीही १८८२ साली १,२७,०६६ मुली शिकत होत्या, त्यांपैकी ४२,०७१ मुली मुलांच्या शाळेत जात होत्या.

स्त्रियांसाठी निराळा अभ्यासक्रम; स्त्रियांना व्यवसायशिक्षण

ह्या कालातील लक्षात घ्यावयाची दुसरी एक बाब म्हणजे मुलींच्या स्वतंत्र शाळा स्थापन होऊ लागल्यावर मुलींसाठी विशेष अभ्यासक्रम असावा अशी मागणी होऊ लागली. १९ व्या शतकापर्यंत सामान्य प्रचलित मत असे होते की मुलींना पुढील आयुष्यात नोकरी करावयाची नसून संसार करावयाचा आहे, तेव्हा दिलेले शिक्षण संसारोपयोगी असले पाहिजे. तेव्हा त्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम व स्वतंत्र पाठ्यपुस्तके असावी. मुलांच्या व मुलींच्या अभ्यासक्रमात फरक करण्याचे मान्य होऊन १८७७–७८

मध्ये मुलींसाठी निराळा अभ्यासक्रम रचण्याचे ठरले व शिवण-टिपण, चित्र वगैरे विषयांचा समावेश करण्यात आला. तसेच मुलींची लग्ने लवकर होत असल्याने चार वर्षांचाच प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम असावा हेही मान्य करण्यात आले. स्वतंत्र पाठ्यपुस्तके तयार करणे मात्र १९०६ पर्यंत अमलात आले नाही.

स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाचे सरकारी तारू अशा रीतीने धिमेपणाने मार्ग क्रमीत असता, मिशनरी संस्थांनी मुलींच्या माध्यमिक शाळा काढण्याच्याही मार्गावर पुढचे पाऊल टाकले. त्याचा फायदा युरोपियन, अँग्लो इंडियन, हिंदी ख्रिश्चन व पारसी ह्या समाजांनी घेतला, तितका पुढारलेल्या हिंदू समाजाने घेतला नाही. हिंदू स्त्रिया बोटावर मोजण्याइतक्याच दाखल झाल्या. माध्यमिक शिक्षणाप्रमाणे धंदेवाईक शिक्षणाचीही थोडीफार सोय झाली. प्राथमिक ट्रेनिंग कालेजे स्थापन झाली, त्यानंतर १८७५–७६ मध्ये ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये मिडविफरी (सूतिकाविद्या) वर्ग निघून नर्सिंग (रुग्णशुश्रूषा) ह्या धंद्याचेही शिक्षण स्त्रियांस मिळू लागले. काही मिशनरी संस्थांत शिवणविणकामासारखे साधे धंदे शिकविण्याची सोय करण्यात आली. ह्याचाही फायदा वर सांगितलेल्या समाजांनीच घेतला. पण धंदेशिक्षणात स्त्रियांस प्रवेश मिळू लागला ही घटना महत्त्वाची होय. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची सुरुवात मात्र अजून व्हावयाची होती; १८८१–८२ साली एकही स्त्री कॉलेजमध्ये शिकत नव्हती.

पुराणमतवादामुळे प्रतिकूल परिणाम

स्त्रीशिक्षणाच्या ह्या काळच्या परिस्थितीचा विचार करताना दुसऱ्या एक विचारप्रवाहाचाही परामर्ष घेतला पाहिजे. वुडच्या खलित्यानंतर पुरुषांच्या उच्च शिक्षणाला वेग मिळाला. तिन्ही इलाख्यात विश्वविद्यालये स्थापन झाली. कॉलेजातून इंग्रज प्राध्यापकांच्या नेमणुका झाल्या. विश्वविद्यालयीन शिक्षणात पाश्चात्य वाङ्मय, पाश्चात्य समाजरचना, पाश्चात्य संस्कृती, ह्यांची ओळख झाल्याने आपल्याकडील काही आंग्लभाषा कोविदांनी इंग्रज लोकांची भाषा, इंग्रज लोकांचे रीतरिवाज, इंग्रजांचा पेहेरवेश यांचा स्वीकार केला. इतकेच नव्हे तर काहींनी ख्रिस्तीधर्म स्वीकारला. ह्याचा परिणाम असा झाला की सामान्य जनतेला हे शिक्षण म्हणजे आपल्या धर्मावर व संस्कृतीवर आघात आहे असे वाटू लागले. लोक मिशनरी व सरकारी शाळांतून मुलेमुली पाठविण्यास तयार होईनात. तसेच काही विचारवंतांनी आपल्या धर्मात वाटणारी वैगुण्ये दूर करण्यासाठी ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज किंवा आर्यसमाज स्थापून धर्माला कालानुरूप नवे वळण देण्याचे प्रयत्न केले व अशा रीतीने समाजात नव चैतन्य आणले. काही विचारवंतांना हे प्रयत्न आपल्या संस्कृतीस पोषक वाटले नाहीत. अशा रीतीने सुधारणेच्छू व पुराणमताभिमानी असे हिंदू समाजाचे दोन विभाग पडत चालले. ह्या विचारांच्या विविध लाटांनी मुलींच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला. प्राथमिक शिक्षणाच्या एकदोन इयत्ता पुऱ्या होताच मुलींची लग्ने करून देण्याची प्रवृत्ती बहुजन हिंदू समाजात

पुनः बळावली. शाळात नेमल्या जाणाऱ्या शिक्षिका बहुतांशाने ख्रिश्चन, ॲंग्लो इंडियन, ज्यू किंवा पार्शी असावयाच्या व माध्यमिक शाळेच्या मुख्य शिक्षिका इंग्रज असायच्या. त्या कारणांनी स्त्रीशिक्षणाचे पाऊल ह्या काळात थोडे मागेच आले.

ह्या कोंडीतून मार्ग काढण्याचा सुधारणावादी विचारवंतांनी खूप प्रयत्न केला. स्वतःच्या बायकांना व मुलींना स्वतः किंवा खाजगी शिक्षकाकडून शिक्षण देण्याची काहींनी व्यवस्था केली. काहींनी दुसरे उपाय योजले. बंगालमध्ये झनाना स्कूल स्थापन करण्यात आले. १८८०–८१ मध्ये पंडिता रमाबाईंच्या खटपटीने व न्या. रानडे, डॉ. भांडारकर ह्यांच्या मदतीने आर्य महिला समाज स्थापन होऊन प्रौढ स्त्रियांना बहुश्रुत करण्याचा प्रयत्न झाला. त्याच्या सभासदांस पुराणे, व्याख्याने, चर्चा ह्यांच्या द्वारा आपल्या संस्कृतीचें तसेच सद्य:स्थितीचे सम्यक ज्ञान मिळू लागले. सभा दर शनिवारी भरत. सामान्य कार्यक्रमाबरोबर भाषा, खगोलशास्त्र, इतिहास, शरीरशास्त्र, भूगोल, इतिहास इत्यादी विषयांचेही ज्ञान पुरुष वर्गाच्या मदतीने देण्यात येई. केरोपंत छत्रे पुण्यास व सदाशिवराव केळकर हे मुंबईस ह्या समाजकार्याकडे विशेष लक्ष देत. श्री. रमाबाईसाहेब रानडे, काशीबाई कानिटकर वगैरे स्त्रिया अशाच मार्गाने शिकल्या.

बडोद्याला श्रीज्ञानशाळा ह्याच हेतूने अमलात आल्या. शाळेत न जाणाऱ्या स्त्रियांसाठी शिक्षिका पाठवून घरोघर ज्ञान देण्याची प्रथा सुरू झाली. वेळ दुपारी २ ते ५. विद्यार्थिनींचे वय ११ वर्षांवरील. विषय : स्वच्छता, आरोग्य, शिशुसंगोपन रुग्णपरिचर्या, ह्याशिवाय भाषा. ज्ञान कायम ठेवण्यासाठी फिरते वाचनालय, व्याख्याने, मॅजिक लॅटर्न ही साधने. शिवण, भरतकामाची प्रदर्शने भरविणे, परीक्षा सहामाही घेणे, उत्तम यशासाठी बक्षिसे व शिष्यवृत्त्या देणे, अशा रीतीने ह्या ज्ञानशाळांचे काम चाले. स्त्रियांनी शाळेत येण्याऐवजी शाळा त्यांचे घरी जाई. बंगालची झनानाशाळा व बडोद्याची श्रीज्ञानशाळा ह्यांची जात एकच. पण श्रीज्ञानशाळा अधिक व्यवस्थित व योजनाबद्ध असावी असे दिसते.

पुढचे पाऊल : 'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स'

१८८२ साली हंटर कमिशन नेमून सरकारने शिक्षणाचा आढावा घेतला. कमिशनच्या शिफारसीत सेक्युलर शाळांना अनुदान देण्याबद्दल, मुलींचा अभ्यासक्रम स्वतंत्र व त्यांच्या अभिरुचीस अनुसरून करण्याबद्दल, त्यासाठी योग्य पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करण्याबद्दल, फी व शिष्यवृत्त्या देण्याबद्दल, माध्यमिक शिक्षणास उत्तेजन देण्याबद्दल, स्त्रीविषयक सर्व खाजगी प्रयत्नांस उत्तेजन देण्याबद्दल, अशा अनेक स्त्रीशिक्षणास उपकारक शिफारसी होत्या. ह्या कमिशनपुढे इतर विद्वान पुढाऱ्यांबरोबर पंडिता रमाबाईंनी साक्ष दिली होती. त्यांच्या विद्वत्तेचा व बहुश्रुततेचा फार प्रभाव पडला. त्यामुळे कमिशनच्या शिफारसी स्त्रीशिक्षणास सर्व प्रकारे अनुकूल होऊन त्याला फार वेग मिळाला.

ह्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे पुण्यात १८८४ मध्ये स्थापन झालेली मुंबई इलाख्यातील पहिली मुलींची माध्यमिक शाळा. सर वेडरबर्न या उदारधी इंग्रज अधिकाऱ्याने मुलींच्या माध्यमिक शाळेसाठी स्वतःच्या भावाच्या स्मरणार्थ रु. १०,००० ची देणगी देऊ केली व न्यायमूर्ति रानडे प्रभृतींनी ती कल्पना उचलून धरून आपल्या स्त्रीवर्गाच्या मदतीने सरकारची त्यासाठी मान्यता मिळविली. सरकारकडे मागणी करतांना आर्य महिला समाजाच्या सदस्य श्री. रमाबाईसाहेब रानडे व काशीताई कानिटकर ह्यांनी पुढाकार घेतला होता. 'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स' ह्या नावाने ती स्थापन झाली. पुढे 'हुजूरपागा' या व्हान नावानेच ती ओळखली जाऊ लागली. खिश्चन शाळांतून मुली पाठविण्यास तयार नसलेल्या पालकांना ते एक वरदानच झाले. थोड्याच दिवसात शाळेची भरभराट झाली. पुराणमतवादी समाजाने ह्या संस्थेच्या स्थापनेस कडवा विरोध केला. इंग्रज बाई मुख्य अध्यापिका, पारसी व ख्रिश्चन मास्तरणी व अभ्यासक्रम मुलांचाच ह्या कारणासाठी लोकमान्य टिळक प्रभृती मंडळींनी ह्या शाळेचा पुरस्कार केला नाही. सुधारणावादी समाजाने (ज्यात पारशी, मुसलमान, खिश्चन ह्यांचाही समावेश होता) ह्या संस्थेला संपूर्ण पाठिंबा दिला.

ह्या शाळेनंतर मुंबईस 'चंदारामजी हायस्कूल फॉर गर्ल्स,' 'आर्यन गर्ल्स हायस्कूल' इत्यादी शाळा निघाल्या. इतर इलाख्यांनूनही मुलींच्या माध्यमिक शाळा स्थापन होऊ लागल्या. जेथे मुलींच्या शाळा नव्हतील तेथे मुलांच्या शाळेतही मुली पाठविण्याची काही लोकांची तयारी झाली. माध्यमिक शाळांतील अभ्यास पुरा झाल्यानंतर माध्यमिक शालान्त परीक्षेला त्या बसू लागल्या. ती परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना कॉलेज प्रवेशास अडचण पडली नाही. मुंबई इलाख्यात मुली विश्वविद्यालयाच्या परीक्षांसाठी अर्ज करू लागल्या. तेव्हा मुंबई विश्वविद्यालयाच्या सीनेटने कोणताही विपमतावाद उत्पन्न केला नाही. 'नियमात ज्या ठिकाणी पुरुष शब्द असेल तेथे स्त्री ह्या शब्दाचाही त्यात अंतर्भाव होतो असे समजावे' असा एक सामान्य स्वरूपाचा ठराव करून ह्या प्रश्नाचा निकाल लावला. इंग्रज अमेरिकन स्त्रियांना हा हक्क मिळविण्यास कसे व किती झगडावे लागले ते आपण जाणतोच. कदाचित त्यांच्या लढ्याचाच हिंदी स्त्रीला फायदा मिळाला असावा.

१८८८ मध्ये बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मिस कार्नेलिया सोराबजी ह्या मुंबई विश्वविद्यालयातील पहिली पदवीधर स्त्री. ह्याच्या आधी अमेरिकेत जाऊन १८८६ मध्ये एम्. डी. पदवी मिळविण्याचे दिव्य पुण्याच्या एका महाराष्ट्रीय स्त्रीने केले होते. ती पहिली हिंदी स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी होय. महाविद्यालयीन स्त्रियांची संख्या आस्ते आस्ते वाढू लागली, पण मुंबई इलाख्यात स्त्रियांसाठी स्वतंत्र महाविद्यालय काढण्याचे त्यावेळी कोणाच्या मनात आले नाही. कारण संख्या फार कमी व पडदा वगैरेची अडचण नव्हती. स्वतंत्र बाके ठेवून भागे. १९०१ मध्ये मुंबई इलाख्यात ७५ स्त्रिया महाविद्यालयीन शिक्षण घेत होत्या व ३४५ धंदेशिक्षणाच्या संस्थांतून शिकत होत्या. स्त्रियांच्या माध्यमिक व उच्च शिक्षणात इतर इलाख्यापेक्षा मद्रास इलाखा फार

पुनः बळावली. शाळात नेमल्या जाणाऱ्या शिक्षिका बहुतांशाने खिश्चन, अॅग्लो इंडियन, ज्यू किंवा पार्शी असावयाच्या व माध्यमिक शाळेच्या मुख्य शिक्षिका इंग्रज असायच्या. त्या कारणानी स्त्रीशिक्षणाचे पाऊल ह्या काळात थोडे मागेच आले.

ह्या कोंडीतून मार्ग काढण्याचा सुधारणावादी विचारवंतांनी खूप प्रयत्न केला. स्वतःच्या बायकांना व मुलींना स्वतः किंवा खाजगी शिक्षकाकडून शिक्षण देण्याची काहींनी व्यवस्था केली. काहींनी दुसरे उपाय योजले. बंगालमध्ये झनाना स्कूल स्थापन करण्यात आले. १८८०–८१ मध्ये पंडिता रमाबाईंच्या खटपटीने व न्या. रानडे, डॉ. भांडारकर ह्यांच्या मदतीने आर्य महिला समाज स्थापन होऊन प्रौढ स्त्रियांना बहुश्रुत करण्याचा प्रयत्न झाला. त्याच्या सभासदांस पुराणे, व्याख्याने, चर्चा ह्यांच्या द्वारा आपल्या संस्कृतीचें तसेच सद्य:स्थितीचे सम्यक ज्ञान मिळू लागले. सभा दर शनिवारी भरत. सामान्य कार्यक्रमाबरोबर भाषा, खगोलशास्त्र, इतिहास, शरीरशास्त्र, भूगोल, इतिहास इत्यादी विषयांचेही ज्ञान पुरुष वर्गाच्या मदतीने देण्यात येई. केरोपंत छत्रे पुण्यास व सदाशिवराव केळकर हे मुंबईस ह्या समाजकार्याकडे विशेष लक्ष देत. श्री. रमाबाईसाहेब रानडे, काशीबाई कानिटकर वगैरे स्त्रिया अशाच मार्गाने शिकल्या.

बडोद्याला श्रीज्ञानशाला ह्याच हेतूने अमलात आल्या. शाळेत न जाणाऱ्या स्त्रियांसाठी शिक्षिका पाठवून घरोबर ज्ञान देण्याची प्रथा सुरू झाली. वेळ दुपारी २ ते ५. विद्यार्थिनींचे वय ११ वर्षांवरील. विषय : स्वच्छता, आरोग्य, शिशुसंगोपन रुग्णपरिचर्या, ह्याशिवाय भाषा. ज्ञान कायम ठेवण्यासाठी फिरते वाचनालय, व्याख्याने, मॅजिक लॅटर्न ही साधने. शिवण, भरतकामाची प्रदर्शने भरविणे, परीक्षा सहामाही घेणे, उत्तम यशासाठी बक्षिसे व शिष्यवृत्त्या देणे, अशा रीतीने ह्या ज्ञानशाळांचे काम चाले. स्त्रियांनी शाळेत येण्याऐवजी शाळा त्यांचे घरी जाई. बंगालची झनानाशाळा व बडोद्याची श्रीज्ञानशाळा ह्यांची जात एकच. पण श्रीज्ञानशाळा अधिक व्यवस्थित व योजनाबद्ध असावी असे दिसते.

पुढचे पाऊल : 'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स'

१८८२ साली हंटर कमिशन नेमून सरकारने शिक्षणाचा आढावा घेतला. कमिशनच्या शिफारसींत सेक्युलर शाळांना अनुदान देण्याबद्दल, मुलींचा अभ्यासक्रम स्वतंत्र व त्यांच्या अभिरुचीस अनुसरून करण्याबद्दल, त्यासाठी योग्य पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करण्याबद्दल, फी व शिष्यवृत्त्या देण्याबद्दल, माध्यमिक शिक्षणास उत्तेजन देण्याबद्दल, स्त्रीविषयक सर्व खाजगी प्रयत्नांस उत्तेजन देण्याबद्दल, अशा अनेक स्त्रीशिक्षणास उपकारक शिफारसी होत्या. ह्या कमिशनपुढे इतर विद्वान पुढाऱ्यांबरोबर पंडिता रमाबाईंनी साक्ष दिली होती. त्यांच्या विद्वत्तेचा व बहुश्रुततेचा फार प्रभाव पडला. त्यामुळे कमिशनच्या शिफारशी स्त्रीशिक्षणास सर्व प्रकारे अनुकूल होऊन त्याला फार वेग मिळाला.

ह्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे पुण्यात १८८४ मध्ये स्थापन झालेली मुंबई इलाख्यातील पहिली मुलींची माध्यमिक शाळा. सर वेडरबर्न या उदारधी इंग्रज अधिकाऱ्याने मुलींच्या माध्यमिक शाळेसाठी स्वतःच्या भावाच्या स्मरणार्थ रु. १०,००० ची देणगी देऊ केली व न्यायमूर्ति रानडे प्रभृतींनी ती कल्पना उचलून धरून आपल्या स्त्रीवर्गाच्या मदतीने सरकारची त्यासाठी मान्यता मिळविली. सरकारकडे मागणी करतांना आर्य महिला समाजाच्या सदस्य श्री. रमाबाईसाहेब रानडे व काशीताई कानिटकर ह्यांनी पुढाकार घेतला होता. 'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स' ह्या नावाने ती स्थापन झाली. पुढे 'हुजूरपागा' या व्हान नावानेच ती ओळखली जाऊ लागली. ख्रिश्चन शाळांतून मुली पाठविण्यास तयार नसलेल्या पालकांना ते एक वरदानच झाले. थोड्याच दिवसात शाळेची भरभराट झाली. पुराणमतवादी समाजाने ह्या संस्थेच्या स्थापनेस कडवा विरोध केला. इंग्रज बाई मुख्य अध्यापिका, पारसी व ख्रिश्चन मास्तरणी व अभ्यासक्रम मुलांचाच ह्या कारणासाठी लोकमान्य टिळक प्रभृती मंडळींनी ह्या शाळेचा पुरस्कार केला नाही. सुधारणावादी समाजाने (ज्यात पारशी, मुसलमान, ख्रिश्चन ह्यांचाही समावेश होता) ह्या संस्थेला संपूर्ण पाठिंबा दिला.

ह्या शाळेनंतर मुंबईस 'चंदारामजी हायस्कूल फॉर गर्ल्स,' 'आर्यन गर्ल्स हायस्कूल' इत्यादी शाळा निघाल्या. इतर इलाख्यांतूनही मुलींच्या माध्यमिक शाळा स्थापन होऊ लागल्या. जेथे मुलींच्या शाळा नसतील तेथे मुलांच्या शाळेतही मुली पाठविण्याची काही लोकांची तयारी झाली. माध्यमिक शाळांतील अभ्यास पुरा झाल्यानंतर माध्यमिक शालान्त परीक्षेला त्या बसू लागल्या. ती परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना कॉलेज प्रवेशास अडचण पडली नाही. मुंबई इलाख्यात मुली विश्वविद्यालयाच्या परीक्षांसाठी अर्ज करू लागल्या. तेव्हा मुंबई विश्वविद्यालयाच्या सीनेटने कोणताही विमतावाद उत्पन्न केला नाही. 'नियमात ज्या ठिकाणी पुरुष शब्द असेल तेथे स्त्री ह्या शब्दाचाही त्यात अंतर्भाव होतो असे समजावे' असा एक सामान्य स्वरूपाचा ठराव करून ह्या प्रश्नाचा निकाल लावला. इंग्रज अमेरिकन स्त्रियांना हा हक्क मिळविण्यास कसे व किती झगडावे लागले ते आपण जाणतोच. कदाचित त्यांच्या लढ्याचाच हिंदी स्त्रीला फायदा मिळाला असावा.

१८८८ मध्ये बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मिस कॉर्नेलिया सोराबजी ह्या मुंबई विश्वविद्यालयातील पहिली पदवीधर स्त्री. ह्याच्या आधी अमेरिकेत जाऊन १८८६ मध्ये एम्. डी. पदवी मिळविण्याचे दिव्य पुण्याच्या एका महाराष्ट्रीय स्त्रीने केले होते. ती पहिली हिंदी स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी होय. महाविद्यालयीन स्त्रियांची संख्या आस्ते आस्ते वाढू लागली, पण मुंबई इलाख्यात स्त्रियांसाठी स्वतंत्र महाविद्यालय काढण्याचे त्यावेळी कोणाच्या मनात आले नाही. कारण संख्या फार कमी व पडदा वगैरेची अडचण नव्हती. स्वतंत्र बाके ठेवून भागे. १९०१ मध्ये मुंबई इलाख्यात ७५ स्त्रिया महाविद्यालयीन शिक्षण घेत होत्या व ३४५ धंदेशिक्षणाच्या संस्थांतून शिकत होत्या. स्त्रियांच्या माध्यमिक व उच्च शिक्षणात इतर इलाख्यांपेक्षा मद्रास इलाखा फार

पुढे होता. तेथे महाविद्यालयात जाणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक प्रमाणात असल्याने पडद्याची चाल नसतानाही, स्वतंत्र महाविद्यालये स्थापन करण्याची गरज भासली. बंगाल्यात व उत्तर हिंदुस्थानात इतर ठिकाणी पडद्याच्या चालीमुळे स्वतंत्र महाविद्यालये स्थापन करणे भाग पडले.

शतकाच्या अखेरीस स्त्रीशिक्षणाची मंद प्रगती

१८८२ ते १९०१ पर्यंतच्या कालखंडात माध्यमिक व उच्च शिक्षणाचे द्वार स्त्रियांस खुले झाले असले, तरी एकंदर स्त्रीशिक्षणाची वाटचाल विशेष गतिमान नव्हती असेच म्हणणे प्राप्त आहे. कारण १९०१ च्या खानेसुमारीप्रमाणे मुंबई इलाख्यात स्त्रियांची संख्या ८९,६२,७०८ होती पण शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या केवळ ९३,०६३ होती आणि त्यांपैकी ११,५८६ मुली सरकारमान्य नसलेल्या शाळांतून शिकत होत्या. ह्यावरून साक्षरतेचे प्रमाण केवळ १% पडले. हे समाधानकारक कसे म्हणावयाचे ? ही गती खुंटण्याची थोडीशी कारणमीमांसा करणे इष्ट होईल.

१८८५ मध्ये राष्ट्रीय महासभा स्थापन झाली. तिच्या अधिवेशनाबरोबर सामाजिक परिषदही भरविण्यात येऊ लागली. राजकीय हक्कांच्या मागणीबरोबर सामाजिक सुधारणांबद्दल जागृती करण्याचे काम त्यामुळे सुरू झाले. हिंदुस्तानात निरनिराळ्या ठिकाणी ती अधिवेशने भरत असल्याने सामाजिक सुधारणांना वेग मिळाला. स्त्रियाही त्या अधिवेशनांत भाग घेऊ लागल्या, पण ह्यातूनच राजकीय सुधारणा आधी, की सामाजिक सुधारणा आधी या मुद्यावर लोकाग्रणींत मतभेद होऊन त्यातून 'पुराणमतवादी' व 'सुधारक' ह्या नावांऐवजी 'जहाल' व 'मवाळ' या नावांचे हिंदी पुढाऱ्यांचे दोन पक्ष निर्माण झाले. ह्या वादामुळे स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्याच्या कामी व्यत्यय येऊन स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीवरही त्याचा परिणाम झाला. त्यामुळे प्रयत्न करूनही मुलींचे लग्नाचे वय फारसे वाढेना. १८५६ मध्ये विधवाविवाहाचा कायदा होऊनही पुनर्विवाहाचे प्रमाण वाढत नव्हते व बालविधवांची संख्या घटत नव्हती. व संमतिवयाचे दोन कायदे पास होऊनही १२ वर्षांचे वर ती वयोमर्यादा जाऊ शकली नाही. प्रागतिक विचारांना अज्ञानामुळे सामान्य जनतेचा पाठिंबा नव्हताच, त्यात सुशिक्षित पुढाऱ्यांत दोन तट पडून जहालांकडून विरोध होऊ लागला त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक प्रगतीचा वेग थोडा काळ मंदावला.

पंडिता रमाबाईंचे प्रयत्न

ह्या काळात सरकारी, निमसरकारी प्रयत्न चालू असता स्त्रीशिक्षणास हातभार लावण्याने काही वैयक्तिक प्रयत्न झाले. त्यांचाही उल्लेख केला पाहिजे. पंडिता रमाबाईंनी अमेरिकेन असनाना 'Hindu High Caste Woman' नावाचे पुस्तक लिहून व तुफानी व्याख्यान-दौरे काढून हिंदी स्त्रीसमाजाची त्या वेळची स्थिती तेथे

समजावून सांगितली व हिंदी विधवा स्त्रीच्या उद्धारासाठी कार्य करण्यास असोसिएशन स्थापून लाखो रुपये मिळविले. इंग्लंडमध्ये त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. १८८९ मध्ये हिंदुस्थानात आल्यावर 'रमाबाई असोसिएशन'तर्फे मुंबई व पुणे येथे खास विधवांसाठी 'शारदासदन' नावाची संस्था कशी काढली व काही हिंदू स्त्रिया ख्रिश्चन झाल्याने प्रागतिक लोकांचा मिळणारा पाठिंबा बंद होऊन, त्यांना केडगाव येथे 'ख्रिस्ती मिशन' कसे स्थापावे लागले हा इतिहास त्यांच्या चरित्रावरून सर्वांस माहीत आहे. ज्यांना ठाऊक नाही त्यांनी अवश्य वाचला पाहिजे. एक बाणेदार हिंदी स्त्री स्वतःच्या विद्वत्तेने व कर्तृत्वाने जगाला कशी थक्क करून सोडते, त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. अजूनही हजारो गरीब व असहाय, विधवा, सधवा, व मुले त्यांच्या संस्थेचा फायदा घेऊन स्वतःचे जीवन सुखाने कंठीत आहेत. हिंदू समाजाला त्यांच्या कार्यापासून विन्मुख रहावे लागले ही दुर्घटना होय. त्या ख्रिस्ती बनल्याने हिंदू समाज त्यांना मुकला. तरीही त्यांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचे ऋण स्वीकारणे आपले कर्तव्य आहे. विधवा स्त्रियांच्या शिक्षणाचे द्वार त्यांनीच खुले केले.

अण्णासाहेब कर्वे यांचे कार्य

'शारदासदन' अशा रीतीने बंद झाल्यावर हिंदू विधवांच्या शिक्षणाचा प्रश्न पूज्य अण्णासाहेब कर्वे यांनी सोडविला. विधवा पुनर्विवाहाने विधवांच्या जीवनाचा प्रश्न सुटणार नाही याबद्दल खात्री झाल्यावर त्यांनी त्याना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अनाथ बालिकाश्रम नावाची संस्था काढली व पंडिता रमाबाईने सुरू केलेले काम पुढे चालविले. १८९६ मध्ये पुण्यास सुरू केलेली ही संस्था १९०० साली हिंगणे खेड्यात नेण्यात आली व तिचा पुढे कसा विकास झाला ह्याची साद्यंत हकिकत त्यांच्या चरित्रात आलेली आहेच. अनेक विधवांना आश्रमाचा आसरा मिळून शिक्षणाने त्या स्वावलंबी झाल्या व मानाचे जीवन जगल्या. 'शारदासदनाची' पहिली विधवा विद्यार्थिनी होती बाया. अण्णांशी तिने पुनर्विवाह केल्यावर, शारदासदनातून नंतर बाहेर पडलेल्या श्री. काशीताई देवधर, श्री. वेणूताई नामजोशी, वगैरे स्त्रियांनीच अण्णाच्या ह्या कार्याला उठाव दिला हेही नमूद करण्यासारखे आहे.

शारदासदन, अनाथबालिकाश्रम स्थापन झाल्याने बाल व प्रौढ विधवांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. प्रौढ स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने सुरू झालेल्या उपक्रमातही भर पडली. बंगालमध्ये ब्राह्मो समाजाने या दिशेने प्रयत्न केले. ईश्वरचंद्र विद्यासागर ह्यांचे कार्य ह्या संदर्भात अवश्य ध्यानात घेतले पाहिजे.

ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराला आळा घालण्याचे जे प्रयत्न ह्या काळी चालू होते, त्यात केशवचंद्र सेन व स्वामी विवेकानंद ह्यांची कामगिरी विशेष मोलाची होती. इंग्लंड अमेरिकेत दौरे काढून हिंदू वेदांत तत्त्वज्ञानाला त्यांनी जगाव मान्यता मिळवून दिली. हिंदू धर्मीयांचा स्वधर्मावरचा विश्वास पुनरुज्जीवित करून आर्यधर्माच्या श्रेष्ठतेची

साक्ष विचारवंतांस पटवून दिली. हिंदू स्त्रीचे पूर्ववैभव व सामर्थ्य तिला प्राप्त व्हावे ह्या दृष्टीने तिला ज्ञान देण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी सिस्टर निवेदितेच्या मदतीने 'बालिकासदन' नावाची संस्था काढली. १८९८ मध्ये ती स्थापन होऊन १९०५ पर्यंत ती चालू होती. इतर शिक्षणाबरोबर हिंदू धर्मतत्त्वांच्या अभ्यासास विशेष महत्त्व दिले होते. वेदकालीन स्त्रियांप्रमाणे ब्रह्मवादिनी स्त्रिया निर्माण व्हाव्या ही मनीषा होती. सिस्टर निवेदितांच्या मृत्यूनंतर तिचे कार्य पुढे चालले की नाही ह्याचा पत्ता लागत नाही वंगभंगानंतरच्या राजकीय धुमश्चक्रीत ती विलयास गेली असावी. अल्पकाळ टिकली तरी एक नवीन दिशा या दृष्टीने तिचे फार महत्त्व आहे. आर्य समाजाने ह्याच दिशेचे पुढे अनुकरण केले हे दिसेलच.

आतापर्यंतच्या विवेचनात १९ व्या शतकातील स्त्रीशिक्षणाची वाटचाल व प्रयोग ह्यासंबंधीचा आढावा घेतला आहे. त्यावरून त्या शतकाआरंभीची शैक्षणिक परिस्थिती व शतक पुरे झाले तेव्हाची परिस्थिती ह्यात महदंतर पडले होते असे कबूल करावे लागेल. त्यातील प्रगती एकंदरीने मंद असली तरी अडचणीही दुर्गम होत्या. जेथे एकही प्राथमिक शाळा व एकही मुलगी शिकत नव्हती, तेथे लाखांनी मुली शिकू लागल्या होत्या. स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाला संपूर्ण समाजाची मान्यता मिळून माध्यमिक व उच्च शिक्षणासही विशेष विरोध होईनासा झाला होता.

विसावे शतक : १९०१–१९३७

राजकीय विचारमंथनामुळे स्त्रीशिक्षणास चालना

विसाव्या शतकाची सुरुवात झाली, तेव्हा नुकत्याच पडून गेलेल्या भयंकर दुष्काळामुळे व प्लेगसारख्या रोगराईमुळे प्रजा संत्रस्त झाली होती. इंग्रज राज्यकर्त्यांनी त्या वेळेस केलेल्या बेजबाबदार वर्तनाने सुशिक्षित समाजाला त्यांच्याबद्दल चीड आली होती. सरकारने जुलमाने केलेल्या वंगभंगामुळे सुधारणावादी समाजही असंतुष्ट झालेला होता. चहुबाजूंनी परिस्थितीवर मात करण्याचे प्रयत्न सुरू होते. मवाळ पुढाऱ्यांची राष्ट्रीय महासभेद्वारा राजकीय हक्कासाठी चळवळ व समाजसुधारकांची सामाजिक परिषदेद्वारा समाजसुधारणेबद्दल जागृती आणि जहाल पुढाऱ्यांची अराजक कारस्थानांचे द्वारा सरकारच उलथून पाडण्याची खटपट असा तिहेरी सामना हिंदुस्थानभर चालू झाला. अशा वेळी राज्य टिकविण्यासाठी इंग्रज सरकारने प्रजेला विश्वासात घेऊन शक्य तितके मिळते घेऊन वेळ निभाऊन नेण्याचे धोरण स्वीकारले. ही सर्व परिस्थिती स्त्रीशिक्षणाचे विकासास उपकारक ठरली. कशी ते पाहणे मनोरंजक होईल.

स्त्रीशिक्षणास फारसे महत्त्व न देणाऱ्या जहाल पक्षास हिंदुस्थानची अर्धी प्रजा अशिक्षित अशानी ठेवणे धोक्याचे आहे हे उमगले. देवी सरोजिनी नायडू, डॉ. ॲनी बेसंट ह्या स्त्रियांनी राष्ट्रीय परिषदेत व होमरूल चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला. महात्मा

गांधींनी तर असहकार चळवळीत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सामील करून घेतले.

सरकारने प्रजेस खूष करण्यास १९०९ व १९१९ साली दोन राजकीय सुधारणा-कायदे पास करून सरकार लोकानुवर्ती करण्याचे प्रयत्न केले. त्यात स्त्रियांनाही मर्यादित मतदानहक्क मिळाला. त्याचा फायदा घेऊन सुधारणावादी पक्षाने स्त्रियांच्या प्रगतीस अनुकूल असे कायदे पास करून घेतले. संमतिवयाची मर्यादा १४ झाली. बालविवाहास बंदी झाली. अधिक कालपर्यंत शालेय शिक्षण घेण्यास व देण्यास संधी प्राप्त झाली. १९१८ च्या युद्धामुळे आर्थिक परिस्थिती खालावल्याने नोकरी मिळेपर्यंत मुलाचे लग्न करणे लांबणीवर पडू लागले व वधू शिक्षित असावी अशी मागणी वाढली, इत्यादी कारणांनीही मुलींना शिक्षणास पुरेसा अवसर मिळू लागला.

लॉर्ड कर्झनच्या १९०४ च्या शैक्षणिक निवेदनात 'मुलामुलींचे शाळेतील प्रमाण नवास एक आहे. शेकडा २.४९ मुलीच शाळेत जातात' असे म्हटले होते. १९१३ च्या ठरावाने ही परिस्थिती सुधारण्यास पडदास्त्रियांसाठी गव्हर्नेस नेमण्याची व प्रत्येक प्रांतातील रीतिरिवाज निरनिराळे असल्याने त्यांस अनुसरून शैक्षणिक उपाय योजण्याची शिफारस केली. व्यवहारी शिक्षण, मुलांपेक्षा वेगळे अनुरूप विषय व आरोग्यास योग्य वातावरण यावरहि भर दिला. अधिक शिक्षिका व स्त्रीतपासनीस नेमण्याची सूचना दिली.

माध्यमिक आणि उच्च शिक्षण वाढीला लागले

त्या सूचनांनी माध्यमिक शिक्षण वाढीला लागले. उच्च शिक्षणाचे क्षेत्रही विस्तृत झाले. गेल्या शतकात स्त्रिया बुद्धीने कमी असल्याने त्यांना मुलांच्याबरोबर तेच शिक्षण देणे बरोबर नाही. त्यांच्या नाजुक प्रकृतीस ते मानवत नाही असा बहुजनसमाजाचा समज होता. मॅट्रिक व नंतरच्या उच्च परीक्षांत पहिले दुसरे नंबर मिळवून मुलींनी ह्या जनमताला सुरुंग लावला. १९०५ मध्ये कुमारी रुवेन मॅट्रिकला पहिल्या आल्या. १९१६ मध्ये श्री. तापीबाई हर्डीकर ह्यांनी (उशीरा शिक्षणास सुरुवात करूनही) एम. ए. व बी. एससी. ह्या दोन्ही परीक्षा एकाच वर्षी देऊन वरचा वर्ग पटकावला. त्यानंतर हा विक्रम अनेकांनी केला व आनुषंगिक मान व पदव्या मिळविल्या. 'प्रगतिपथावर' ह्या हुजुरपागेच्या सुवर्ण-महोत्सव ग्रंथात अशी नावे नमूद आहेत. मुलींच्या अशा पराक्रमाने स्त्री वर्गात आत्म-विश्वास उत्पन्न झाला आणि मुंबई विश्वविद्यालयाच्या विविध परीक्षांसाठी महाविद्यालयांतून प्रवेश मिळवून शिक्षणक्षेत्रातील अनेक शाखांत त्या चमकू लागल्या. १९०१ मध्ये कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींची संख्या ७५ होती ती १९३७ मध्ये १२४५ वर गेली. मुंबई इलाख्याप्रमाणे इतर प्रांतांतही घडले. महाराष्ट्रात मुंबई विश्वविद्यालयास जोडलेली मुलींची स्वतंत्र महाविद्यालये निघाली नाहीत, पण माध्यमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेजे निघाली. ह्या बाबतीत सरकारी प्रयत्नाबरोबर काही खाजगी प्रयोगही सुरू झाले.

पदवीधर स्त्रियांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही माध्यमिक शाळा काढण्यास पुष्कळ मदत केली. अण्णासाहेब कर्व्यांनी कुमारिका मुलींकरिता 'महिला विद्यालय'

घोळू लागले. त्यांपैकी आण्णासाहेब कर्वे हे प्रमुख होत. इतर बाबतीत त्यांनी जसे प्रयोग केले तसेच ह्याही बाबतीत करण्याचे त्यांनी निश्चित केले. स्त्रियांपुरता विचार करून त्यांनी तो अंमलात आणण्याचे ठरविले. असे विचार मनात येण्याला व जपानच्या स्त्रियांच्या विश्वविद्यालयाचे माहितीपत्रक हाती येण्याला कशी एक गाठ पडली व हिंदुस्थानातील स्त्रियांचे पहिले विद्यापीठ स्थापण्याचा विडा त्यांनी कसा उचलला हा अद्भुत वृत्तांत त्यांच्या भाषेत त्यांच्या आत्मवृत्तातूनच वाचावा. १९१६ मध्ये 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' अस्तित्वात आले. (१) मातृभाषेला बोधभाषेचे स्थान (२) इंग्रजी दुय्यम पण आवश्यक विषय (३) स्त्रीजीवनास उपयोगी शास्त्रांचा आवश्यक विषयात समावेश (४) बाकीची शास्त्रे, भाषा ह्यांचे बरोबर ललितकला विषयांना ऐच्छिक विषयांत स्थान व (५) मातृभाषेचा आवश्यक अभ्यास ह्या पंचसूत्रीवर त्यांनी युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम रचला. महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची मुदत तीन वर्षे, खाजगी अभ्यास करून परीक्षा देण्याची सवलत, ज्या विषयात ५० टक्के गुण मिळतील त्या विषयात सूट देण्याची व परीक्षा हप्त्याहप्त्याने उत्तीर्ण होण्याची व्यवस्था इत्यादी तिची दुसरी आकर्षणे होती.

ह्या अभिनव विश्वविद्यालयाचा अभ्यासक्रम लोकसंमत व लोकप्रिय करण्यास कै. बापूसाहेब चिपळूणकर ह्यांच्यासारखे खंदे प्रचारक त्यांस लाभले. लवकरच प्रयत्नास यश येऊन अनेक शहरी विद्यापीठाला जोडलेल्या शाळा निघाल्या. ह्या विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या पदवीधर स्त्रियांनीही ह्या कामी पुष्कळ हातभार लावला. पुढे १९२० मध्ये दानशूर शेठ विठ्ठलदास ठाकरसी ह्यांच्या देणगीने विद्यापीठ भक्कम पायावर स्थिर झाले. आज सामान्य पदवीपरीक्षेशिवाय, माध्यमिक प्रशिक्षण पदवी, गृहविज्ञान पदवी, परिचारिका पदवी वगैरे खास अभ्यासक्रम ह्या विद्यापीठाने सुरू केले आहेत. जोडलेल्या महाविद्यालयांची संख्या वाढून हजारो स्त्रिया त्याचा लाभ घेत आहेत. आजही स्त्रियांसाठी असे हे एकमेवाद्वितीय असे विद्यापीठ आहे. स्त्रियांच्या माध्यमिक व उच्चशिक्षणाची प्रगती करण्यात ह्या शतकात ह्या विद्यापीठाने निश्चितपणे उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

इतर प्रांतांतील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग

मुंबई प्रांतात झाले तशा तऱ्हेचे पण जरा वेगळे असे स्त्रीशिक्षणाचे प्रयोग उत्तर हिंदुस्थानातही झाले. पंजाबमध्ये जालंदर येथे स्वामी श्रद्धानंद ह्या आर्यसमाजनेत्याच्या प्रेरणेने लाला देवराज सोंधी ह्यांनी १८९८ च्या सुमारास स्त्रियांच्या शिक्षणासाठी एक संस्था सुरू केली. धर्मसुधारणा हा मूळ उद्देश असल्याने कुमारिका मुलींसाठी 'गुरुकुल कांगडी' च्या धर्तीवर एक गुरुकुल त्यांनी सुरू केले. त्यास 'जलंदर कन्या गुरुकुल' नाव दिले. तेथील शिस्त फार कडक असे. हातात बांगड्या किंवा अंगावर अलंकार धारण करण्यास बंदी होती. शाळेचा पोशाख पिवळी साडी व पिवळे पोलके असे. अभ्यास पुरा होईपर्यंत पालकांचे घरी जाणे वर्ज्य असे. ८ व्या वर्षी मुलीची मुंज झाल्यावर त्यांना होमहवनादी क्रिया सांजसकाळ कराव्या लागत. अभ्यास-विषयात संस्कृत, हिंदी,

अ. भा. परिषदेने स्वतःच्या काही कल्पनांना मूर्तस्वरूप देण्याचे ठरविले. त्यासाठी शिक्षण फंड उभा करून १९३३ साली दिल्ली शहरात 'लेडी अर्विन कॉलेज' स्थापन केले. गृहविज्ञान व त्याच्या अंगोपांगांचा सर्वांगीण अभ्यास व्हावा ह्या दृष्टीने सर्व साधनसामग्री जमविली व ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तयार करून काम सुरू केले. हे ह्या विषयालाच वाहिलेले हिंदुस्थानातील पहिले महाविद्यालय होय. महर्षी कर्वे ह्यांनी गृहशास्त्राला माध्यमिक व उच्च शिक्षणात स्थान देण्यास सुरुवात केली पण पैसा व साधने ह्यांच्या अभावी तात्त्विक चर्चेवरच (थिअरी) भर दिला गेला. प्रायोगिक ज्ञानाची बाजू लंगडी पडली होती. हे कॉलेज निघाल्यावर इतर विश्वविद्यालयांनीही ह्या विषयांच्या अभ्यासाचा आपल्या अभ्यासक्रमात अंतर्भाव केला. त्यांना जोडलेल्या स्त्रियांच्या महाविद्यालयांतून त्यांचे शिक्षण सुरू झाले. श्री. ना. दा. ठा. विद्यापीठाला सरकारी मान्यता मिळवून देण्यासाठी महिला परिषदेने पुन्हा पुन्हा खास ठराव करून मदत केली. त्या विद्यापीठाची बोधभाषा मातृभाषा असल्याने इंग्रज सरकारच्या राज्यात त्याला मान्यता मिळाली नाही. हिंदुस्थानातील सुधारणावादी प्रागतिक पुढाऱ्यांचाही स्त्रीशिक्षणातील ह्या प्रयोगाला सक्रिय पाठिंबा नव्हता. त्याचाही विद्यापीठाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम झाला.

हर्टॉग कमिशनच्या अनुकूल शिफारसीमुळे व विमेन्स कौन्सिल, अ. भा. म. परिषद ह्या अखिल भारतीय संघटनांच्या प्रचारामुळे व खटपटींमुळे ह्या कालखंडाच्या शेवटल्या भागात हिंदुस्थानातील सर्व मोठ्या व लहान शहरांतून स्त्रियांच्या शैक्षणिक प्रगतीला जोराचा वेग मिळाला. विस्तारभयास्तव सर्व थरातील शिक्षण प्रगतीचा आढावा न घेणे बरे. इतके निश्चित विधान करण्यास हरकत नाही की १९०१ च्या सुमारास मुलींचे प्राथमिक शिक्षण जसे लोकमान्य झाले तसेच १९३७ च्या सुमारास माध्यमिक शिक्षणही लोकमान्य झाले आणि उच्च शिक्षणास होणारा विरोध नष्टप्राय झाला. स्त्रियांना कोणता शिक्षणक्रम द्यावा व त्यांच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप काय असावे यासंबंधी तज्ज्ञांचे जे काही मतभेद असतील तेवढेच.

समानतेचे सर्व हक्क त्यांना विनायासे बहाल झाले. १९४७ नंतरचा काल हा मिळालेले हक्क कृतीत कसे उतरतील ते पहाण्याचा व त्यासाठी प्रयत्न करण्याचा आहे.

मूलोद्योग शिक्षणाचे प्रयोग

१९३७ ते १९४७ पर्यंतचा स्त्रीशिक्षणविषयक आढावा घेताना त्यावेळी चाललेले सामान्य शिक्षणातील प्रयोग पाहाणे जरूरीचे आहे. महात्मा गांधींनी राजकीय चळवळीला जोडूनच धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक पुनर्रचनेचे व पुनरुत्थानाचे प्रयत्न केले. ह्या विषयीच्या आपल्या कल्पनांना व विचारांना, त्यांनी वर्धा आश्रमात असता, मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. गांधीप्रार्थना हा धर्मकारणाचा भाग होता. अस्पृश्योद्धार, आंतर जातीय रोटीबेटीव्यवहार इत्यादी समाजकारणाचा भाग व ह्यांना उपकारक होईल अशी ज्ञान-योजना (शिक्षणपद्धती) हा शैक्षणिक भाग होता. आपणास शैक्षणिक पद्धतिविषयीचा विचार करावयाचा आहे. १९३७ मध्ये त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी इंग्रजी शिक्षणपद्धतीतील गुणदोषांचा विचार करून शिक्षणाची एक योजना तयार केली. व तिला 'वर्धायोजना' असे नाव दिले. 'मूलोद्योगपद्धती' हे तिचे दुसरे नाव. खेडोपाडी शिक्षणप्रसार करण्यास उपयोगी पडेल, ग्रामीण जनतेला जिचे महत्त्व पटेल व ती आकर्षित होईल, आणि ग्रामीण व नागरी जीवनातील अंतर जिच्यामुळे कमी करता येईल अशी शिक्षणपद्धती शोधण्याच्या प्रयत्नात ह्या पद्धतीने जन्म घेतला. सर्व भारतात प्राथमिक शिक्षणात ह्या पद्धतीचा अवलंब करावा अशी त्यांनी शिफारस केली. १९३७ ची काँग्रेस मंत्रिमंडळे १९४० लाच विलीन झाल्याने ही योजना लागू करून मोठ्या प्रमाणावर ह्या पद्धतीचा प्रयोग होऊ शकला नाही.

ह्या पद्धतीचा स्त्रीशिक्षणातील पहिला प्रयोग वर्ध्याच्या महिलाश्रमात झाला. सर्वधर्मप्रार्थना, अस्पृश्यता निवारण्यासाठी संडास सफाई, श्रमगौरव शिकविण्यासाठी सूतकताई-विणकाम, कृषिउद्योग, साफसफाई. उद्योग करीत असता त्याच्या अनुषंगाने व अनुरोधाने भाषा, इतिहास, भूगोल, शास्त्र ह्यांचा अभ्यास ह्या सर्व गोष्टी समाविष्ट करून वर्धा महिलाश्रमातील बालिकांना शिक्षण देण्यात येई. येथील आश्रमवासियांत सर्वधर्मसमभाव, वस्त्रस्वावलंबन, अन्नस्वावलंबन, श्रमगौरव व सहजीवन इत्यादी सुखी समाज जीवनास अवश्य अशा गुणांचे पोषण होईल अशी त्यांची दिनचर्या ठरविलेली होती. 'वर्धा शिक्षण योजना' तयार होण्यापूर्वीही येथे हा प्रयोग चालू होता.

'वर्धा योजनेची' अभ्यासपद्धती निश्चित झाल्यानंतर जो प्रयोग झाला तो नडियाद येथे 'श्री विठ्ठल कन्या विद्यालय' ह्या संस्थेने केला. ही संस्था कै. वल्लभभाई पटेल यांच्या प्रोत्साहनाने अस्तित्वात आली. १९३७ नंतर ती स्थापन झाली असावी. शाळेला छात्रालय जोडलेले असून ते शाळेच्या आवारात होते. सर्व विद्यार्थिनींना छात्रालयात राहाणे आवश्यक होते. अभ्यासक्रम सहा वर्षांचा असून प्रवेशासाठी प्राथमिक चौथी पास ही शैक्षणिक लायकी ठरविलेली होती. अभ्यासविषयांचे चार भाग

असून गृहविद्या, मूलोद्योग, समाजविद्या व वर्गशिक्षण अशी नावे त्यांस दिली होती. (१) गृहविद्या विषयात गृहकार्य व गृहविज्ञान असे प्रात्यक्षिक व तात्त्विक ज्ञान देण्याची व्यवस्था असून छात्रालयातील स्वच्छता, संडाससफाई, स्वयंपाकपाणी, धुणेभांडी, ह्या सर्व रोजच्या कामाला महत्त्व दिले होते. त्याला इतर विषयांप्रमाणे गुण ठेवलेले असून त्यात उत्तीर्ण होणे आवश्यक होते. (२) मूलोद्योगात वस्त्रविद्या व कृषिविद्या ह्यांचा समावेश असे. पहिल्या तीन वर्षांत कृषिविद्येचे ज्ञान गृहविद्येत समाविष्ट केलेले होते. पुढील तीन वर्षांत तो निराळा गणला जाई. (३) समाजविद्या म्हणजे इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र. (४) वर्गशिक्षणात बाकीचे सर्व विषय येत. गुजराती व हिंदी भाषा सर्व वर्षांत आवश्यक, यांशिवाय गणित, सामान्यविज्ञान, संगीत, चित्रकला हे विषय असत, पण प्रत्येक विषय जीवनातील उपयुक्ततेकडे दृष्टी ठेवून प्रात्यक्षिक पद्धतीने शिकविला जाई.

वर्गाला श्रेणी म्हणत. पहिल्या तीन श्रेणींत अभ्यासाचे सर्व विषय असत. पण पुढच्या तीन श्रेणीत दोन शाखा पडत. एक विनीत परीक्षेची व दुसरी लोकशालान्त परीक्षेची. विनीत परीक्षेला संस्कृत व इंग्रजी आवश्यक असत. लोकशालान्त परीक्षेला इंग्रजीऐवजी विशेष गणित व अर्वाचीन भाषा हे विषय अधिक असत. विनीत परीक्षा पास होऊन गुजरात विद्यापीठाच्या समाजसेवा महाविद्यालयात व लोकशालान्त परीक्षा पास होऊन अध्यापनमंदिरात विद्यार्थिनींना प्रवेश मिळावा अशी योजना होती. आज ही शाळा कोणत्या स्वरूपात काम करते याची माहिती नाही. १९४८ पर्यंत तिचे स्वरूप वर वर्णन केल्याप्रमाणे होते.

ह्याच प्रकारचा अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती असणारी दुसरी संस्था होती. तिचे नाव श्री. कडवीबाई वीराणी कन्याशाळा. ही राजकोटला काठेवाडमध्ये स्थापन झाली. तिचे निराळे वर्णन देण्याची आवश्यकता नाही. श्री जुगतराम दवे यांनी सुरतेजवळ वेडछीच्या खेड्यातही हा प्रयोग केलेला आहे.

आणखी एका निराळ्या दृष्टीच्या शैक्षणिक प्रयोगाचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे.— श्री. पूर्णिमाबेन पक्वासा ह्यांनी १९५६ मध्ये 'शक्तिदल' नावाची संस्था स्थापन केली आहे. ग्रामीण व शहरी स्त्रियांना इतर सामान्य ज्ञानाबरोबर लष्करी शिक्षण देण्याची योजना आहे. घोड्यावर बसणे, बंदूक मारणे, जंबिया, जुजुत्सु, पर्वतारोहण, परेड इत्यादी बाबतीत स्त्रियांना तरबेज करण्याचा प्रयत्न असून स्त्रिया स्वतंत्र भारताच्या उत्तम नागरिक बनून आत्मरक्षण करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावे ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

ग्रामसेविका वर्ग काढले व केंद्रीय समाजकल्याण मंडळाने बालसेविका वर्ग काढले, तेही प्रयोगावस्थेतच आहेत. प्राथमिक शाळांसाठी शिक्षिका म्हणून प्रौढ स्त्रिया अधिक मिळाव्या याकरिता श्री. दुर्गाबाई देशमुख ह्यांनी प्राथमिक व माध्यमिक शालान्त परीक्षेचा अभ्यास दोन वर्षांत तयार करून हा परीक्षा प्रौढ स्त्रियांना हस्तगत करून देण्यासाठी 'कन्डेन्स्ड कोर्स' काढण्याचा प्रयोग सुरू केला. या सर्व प्रयोगांचे लक्ष ग्रामसुधारणा, ग्रामशिक्षण ह्यांच्याकडे आहे. ह्या कार्यखंडाची आता तीव्र गरज आहे.

स्त्रीपुरुषसमानतेच्या काळात

१९५१ च्या घटनाकायद्याने स्त्रीपुरुष समानता मान्य झाल्यावर त्या समानतेच्या भूमिकेवरून शिक्षणाचाही विचार होऊ लागला आहे. त्यामुळे स्त्रीशिक्षणाचा निराळा असा 'प्रश्न' राहिलाच नाही. उच्च शिक्षणासाठी अनेक नव्या विद्यापीठांची भर पडली असून इतर विषयांप्रमाणे गृहविज्ञानाची स्वतंत्र महाविद्यालये निघू लागली आहेत (सयाजीराव विद्यापीठ). जेथे स्वतंत्र महाविद्यालये स्थापणे शक्य नाही तेथे ह्या विषयाचा स्वतंत्र अभ्यासक्रम मान्य होऊन पदव्या वा प्रमाणपत्रे देण्याची व्यवस्था झाली आहे (मराठवाडा विद्यापीठ). स्वतःच्या कुवतीप्रमाणे इतर कोणत्याही ज्ञानशाखेत प्रवेश मिळवून अत्युच्च पदव्या स्त्रिया मिळवू शकतात. उच्च शिक्षणात १९१६ मध्ये दूरदर्शी भारतरत्न अण्णासाहेब कर्वे ह्यांनी जी शिक्षणप्रणाली सुरू केली तिचा बहुतेक सर्व बाबतींत स्वीकार झाला आहे. इंग्रजी ह्या बोधभाषेचा खोडा मात्र सर्वत्र नाहीसा झाला नाही ही उणीव शक्य तितक्या लवकर दूर होणे आवश्यक आहे.

भारतीय संघराज्याचे लोकशाही समाजवादाचे ध्येय साध्य व्हावयाचे असेल तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झालेच पाहिजे. वीस वर्षांचा काल लोटला तरी ते शक्य झालेले नाही. वर्धा योजना विसाडघाईने अमलात आणण्यामुळे अलोट पैसा खर्च होऊनही साक्षरतेचे प्रमाण फारसे वाढले नाही. १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणे ते स्त्रियांच्या बाबतीत शेकडा १२·९ व पुरुषांचे बाबतीत ३४·४ आहे. भगीरथ प्रयत्न केल्याशिवाय, खाजगी व सरकारी प्रयत्नांची शिकस्त केल्याशिवाय राष्ट्रपुरुषाला जखडून ठेवणारी ही शृंखला तुटणार नाही व सर्वोदयी समाजाची स्थापना होणार नाही. भारतातील स्त्रीसंघटनांना हे राष्ट्राचे आव्हान आहे. त्यांनी ते स्वीकारले पाहिजे.

कोठारी कमिशन नेमून सर्व शिक्षणकक्षांचा साकल्याने विचार करून, भारतास सर्व दृष्टीने अनुकूल व लाभदायक शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याचे काम भारत सरकारने उशीरा का होईना आता हाती घेतलेले आहे. स्त्रियांच्या दृष्टीने त्याचा अभ्यास करून भारतीय स्त्री संघटनांनी आपल्या सूचना वेळेवर सादर केल्या पाहिजेत. ही सुवर्णसंधी वाया जाता कामा नये.

१५

शिक्षणात स्त्रीचे स्थान

चंद्राताई कर्नाटकी

कु. चंद्राबाई श्रीनिवास कर्नाटकी, एम्. ए., बी. टी., टी. टी. (लंडन) एच्. डी. ईडी. (डब्लिन). (जन्म २६-४-१९०६) सेवानिवृत्त डेप्युटि डायरेक्टर ऑफ एज्युकेशन महाराष्ट्र राज्य. १८ वर्षे शिक्षिका, ४ वर्षे मुख्याध्यापिका, ·९ वर्षे इन्स्पेक्ट्रेस ऑफ गर्ल्स स्कूल्स. शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक विषयांवर सुमारे ५० लेख. गर्ल गाइडच्या जिल्हा कमिशनर. ('माया', २४९ रास्ता पेठ, पुणे ११)

सामाजिक क्रांतीचे प्रधान लक्षण : स्त्रीवर्गाची जागृती

भारताच्या सामाजिक इतिहासात इंग्रजी अमदानीत सुरू झालेल्या शिक्षणापासून आधुनिक युग सुरू झाले. त्या कालखंडात बुद्धिमान राष्ट्रप्रेमी भारतीयांच्या वैचारिक प्रवाहांना जोर मिळाला आणि तेव्हापासून सुरू झालेल्या क्रांतीने भारतीय जीवनाची सर्व क्षेत्रे आज व्यापली आहेत.

या क्रांतीला प्रामुख्याने शिक्षणातील प्रगती आणि स्त्रीवर्गाचा उद्धार याबद्दलच्या विचारांनी सुरवात झाली. स्त्रीला जागृत करण्यात यश येऊ लागले, तसतसा शिक्षणातील प्रगतीनेही वेग घेतला. हळूहळू स्त्रीची व शिक्षणाची प्रगती परस्परावलंबी बनली. कारण जागी झालेली स्त्रीही इतरांना जागे करण्यात हातभार लावू लागली. तिला स्वत्वाची जाणीव होऊ लागली तसतशी ती अधिकाधिक पायबंदण झाली व समाजाला तिच्या कर्तृत्वाचा फायदा मिळू लागला.

स्त्रीला जागृत केल्याशिवाय राष्ट्राचे पाऊल पुढे पडणार नाही हे ओळखणारे अनेक द्रष्टे भारताला लाभले. त्यांनी निरनिराळ्या बाजूंनी स्त्रीला पुढे यायला मदत केली. तिच्यावर होणारा अन्याय आणि छळ नष्ट करणारे कायदे झाले, तर एकीकडे सत्याग्रहाच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या व्यापक चळवळीतही महत्त्वाचा भाग घेण्याइतकी मानसिक ताकद तिच्यात निर्माण केली गेली. परंतु सर्वांत जास्त जोरदार प्रयत्न तिला शिक्षण देण्याच्या बाबतीत झाले आणि त्यामुळेच तिच्या कर्तृत्वाला सर्वच क्षेत्रांत उठाव आला.

करते, पुरुषवर्गाचे बरोबरीने, किंबहुना जास्तच चमकतेही. पण आजही स्त्रीच्या कर्तृत्वाचा सर्वांत अधिक व्याप शिक्षणक्षेत्रात व त्याच्या खालोखाल वैद्यकीय क्षेत्रात आहे.

आपल्या कर्तृत्वासाठी प्रथम शिक्षणक्षेत्र व दुसरे वैद्यकीय क्षेत्र स्त्रीने पसंत करणे व्यावहारिक परिस्थितीला अनुसरून घडले. स्त्रियांना स्वावलंबनाचे महत्त्व पटले, त्यांची कर्तृत्वशक्ती जागृत झाली. वैद्यक शिक्षण घेतल्यावर अर्थात त्याच क्षेत्रात काम करणे सर्वच दृष्टींनी हितावह होते व आहे. पण सामान्य शिक्षणक्रम एकतर असा ठोकळेबाज होता की शिकणे व शिकवणे यापलीकडे त्याच्या ठराविक साच्यात कशालाच वाव नव्हता. त्या शिक्षणक्रमाने दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात कार्य करण्यासाठी लागणारी पूर्वतयारी होऊ शकत नसे. शिक्षण घेतले पाहिजे म्हणून शिकायचे आणि मग घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा म्हणून शिकवायचे, अशीच विचारसरणी कित्येक वर्षे चालू राहिली. आज अवतीभोवती दिसणाऱ्या इतर नोकऱ्या, किंवा कला, कारागिरी, हस्तोद्योग, इत्यादींचा अर्थार्जनासाठी आधार घ्यावयाला स्त्रीचे मन घेत नसे. शिक्षणाच्या कार्यात एक प्रतिष्ठितपणा होता, आणि वातावरण सुरक्षिततेचे, स्त्रीला मानवणारे होते. शिवाय शिक्षणप्रसाराबरोबर शिक्षिकांना मागणीही मोठी होती. त्यामुळे स्त्रीवर्गाचा शिक्षणक्षेत्रात खोल पाय रुतला.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर पुष्कळ दालने मोकळी झाली असून आज समाजात वेतनी काम करणाऱ्या स्त्रियांपैकी बहुसंख्य गट शिक्षणक्षेत्रात गुंतलेला आहे. आज पुणे जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांपैकी ३२ टक्के स्त्रिया आहेत. फक्त प्राथमिक विभागात ३२.९३ टक्के शिक्षिका आहेत. या विभागात १९५६–५७ मध्ये सबंध मुंबईप्रांतात २०.३४ टक्के शिक्षिका होत्या. अलीकडच्या पन्नास वर्षांत माध्यमिक शिक्षणातही शिक्षिकांचे महत्त्व वाढत आहे. दहा वर्षांपूर्वी मुंबई प्रांतात २०.२८ टक्के स्त्रीशिक्षक होत्या. आता पुणे जिल्ह्यात त्या २७.९ टक्के आहेत. येथील शहरी विभागात तर एकंदर शिक्षकांपैकी ३४.३५ टक्के शिक्षिका आहेत. गेल्या दोन दशकांपासून विश्वविद्यालयात स्त्रिया अध्यापन करू लागल्या असून त्यांचेही प्रमाण झपाट्याने वाढत आहे. १९५६–५७ मध्ये एकंदर प्रांतात १०.४५ टक्के प्राध्यापिका होत्या. आता एका विद्यापीठात गेल्या वर्षी ७.३७ टक्के व चालू वर्षी ९.०९ टक्के प्राध्यापिका आहेत. गेल्या पंधरा वर्षांत शिक्षणक्षेत्राचे आणखी एक दालन उघडले आहे — पूर्वप्राथमिक शिक्षणाचे. हे दालन तर स्त्रीने जवळजवळ सगळे व्यापले आहे. महाराष्ट्रातील बालमंदिरांचा आकडा चार वर्षांपूर्वी ५२७ होता.

समाज हे एक कुटुंब आहे अशी कल्पना केली तर मुलांच्या शिक्षणाच्या जबाबदारीत स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावण्याइतकी समर्थ झाली आहे हे कुणालाही मान्य करावे लागेल. स्त्रीला हे स्थान फक्त शिकवण्याचे काम करणाऱ्या स्त्रियांनी मिळवून दिले नाही. रमाबाई रानडे, आनंदीबाई कर्वे अशा शिक्षिका नसलेल्या स्त्रियांनी स्त्रीशिक्षणाच्या संस्थांमार्फत हजारो स्त्रियांना प्रेरणा व प्रोत्साहन देऊन जी अजोड जागृती केली, तिचे मोल शब्दांनी सांगता येणार नाही.

जीवनाला सुरुवात करणारा एखादा माणूस जरा स्थिरस्थावर झाल्यावर जमा-खर्चाची तपासणी करू लागतो व मिळकतीच्या विनियोगाच्या तपशिलाचा अभ्यास करू लागतो. स्त्रीच्या जीवनाचा व कार्याचा तसा अभ्यास करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. स्त्रीचे आधुनिक युगातले जीवन सुमारे ७०–७५ वर्षांचे आहे. त्यात अलिकडे दोन दशक शिक्षण घेण्यासाठी सवलती देण्याचे धोरण मुख्यतः सरकारने व आपापल्या परी व्यक्तींनी व संस्थांनी पूर्वीपेक्षा जास्त उदार केले आहे, त्यामुळे शिक्षणक्षेत्रात वाढलेल्या कार्याचा व्याप पुष्कळांच्या अभ्यासाचा विषय झाला आहे. शिक्षणक्रमाचीही छाननी वेळोवेळी होत आहे, व विषयांची विविधता व व्याप्ती यांवर संबंधितांमध्ये सतत विचारविनिमय होत आहे. शिक्षणविषयक घडामोडींशी नागरिक व माता या नात्याने स्त्रीचा संबंध निकटचा आहेच, पण वेतनी काम करणाऱ्या स्त्रीवर्गाचा सर्वांत मोठा गट शिक्षणक्षेत्रात गुंतलेला असल्यामुळे शिक्षणविषयक प्रत्येक मुद्द्याशी स्त्रियांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. आपले कार्यक्षेत्र म्हणून उत्पन्न झालेल्या महत्त्वाबरोबरच कार्यकर्त्री या नात्याने लागून आलेल्या जबाबदारीच्या जाणिवेने शिक्षणक्षेत्रातील सुशिक्षित स्त्रीने शिक्षणविषयक परिस्थितीचा विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

शिक्षणात व्यावहारिक उद्देशाला प्राधान्य

शिक्षणाबद्दल आज विचार करता पहिली गोष्ट ही लक्षात येते की मानवी जीवनात आवश्यक असलेल्या व 'शिक्षण' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्काराची व्याप्ती अलीकडेच कुठे आपल्याला भासू लागली आहे. भारतातील आधुनिक शैक्षणिक युगातील १५२ वर्षे लोटली आहेत. इ. स. १८१५ साली हिंदमधील युरोपियन लोकांनी मुंबईला आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी एक संस्था स्थापली व त्या संस्थेने सुरू केलेल्या शाळांत, या देशात प्रथमच, एतद्देशीय मुलांना प्रवेश देण्यात आला अशी नोंद आहे. पण या शिक्षणाचा जन्मच अशा काही वातावरणात झाला की सुरुवातीपासून आजपर्यंत व्यक्तीला मिळू शकणारे खालपासून उच्चतम मर्यादेपर्यंतचे सर्व शिक्षण व्यावहारिक मापाने मोजण्याची आपल्याला सवय लागली. आता स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रावर स्वयंशासनाची जबाबदारी आली. तीही बरीचशी अचानक— स्वयंशासनासाठी राष्ट्रीय पातळीवर आवश्यक असणारी पूर्वतयारी होण्यापूर्वी. त्यातून लगेच अकस्मात राष्ट्रजीवनाचा नेता नाहीसा झाला. कुटुंबातला कर्ता गेला. साहजिकच या अवाढव्य कुटुंबात दारुण

परिस्थिती, अस्वस्थता, अव्यवस्था उत्पन्न झाली. या परिस्थितीतून मार्ग काढताना ज्या गोष्टींना महत्त्व द्यावे लागले, त्यात जगणे हे सर्वप्रथम होते. सर्व क्षेत्रांत आर्थिक बाजूवर भर आवश्यक होता. अर्थात शिक्षणातही व्यावहारिक उपयुक्ततेचे वर्चस्व झाले. शिक्षणाने मानसिक संस्कार झाले पाहिजेत, ही गरज भासत असली, तरी अगोदर शिक्षण व्यावहारिक जीवनाला पोषक झाले पाहिजे, या विचारसरणीचा जोर झाला व आजतागायत तो कायम आहे. मानसिक विकास, दृष्टीची विशालता, दैनंदिन सामाजिक जीवनातील आचारांमधील सुव्यवस्थितपणा या गोष्टी शिक्षणातून अपेक्षित आहेत, पण शिक्षणाचे उद्दिष्ट द्रव्यार्जनाची लायकी हेच. पुरुषांनी आधुनिक शिक्षण घ्यायला सुरुवात केली ती मुळी उपजीविकेचे साधन म्हणूनच. स्त्रियांच्या बाबतीत आर्थिक स्वावलंबन हे आरंभी काही प्रमाणात, काही स्त्रियांना आवश्यक म्हणूनच, तात्पुरते उद्दिष्ट मानण्यात आले होते, आणि स्त्रीची कर्तृत्वशक्ती जागृत व्हावी, तिला स्वत्वाची जाणीव होऊन तिच्यामध्ये धैर्य, आत्मविश्वास यावा हा स्त्रीशिक्षणाचा हेतू प्रबल होता. परंतु मुली प्रथमपासून शिक्षणक्रम मात्र मुलांचाच करीत आल्या. स्त्रियांच्या विचारांना व आकांक्षांना पुरुषांप्रमाणेच वळण लागत आले. इकडे देशात आर्थिक परिस्थिती झपाट्याने घसरू लागली आणि स्त्रीपुरुषांच्या शिक्षणाच्या आरंभी बाळगलेल्या उद्दिष्टांतील तफावत आणखीच कमी झाली. त्यात पुढारलेल्या देशांतील भौतिक प्रगतीचा आदर्श आपल्या शिक्षणाला अधिक व्यावहारिक बनवू लागला. अशा रीतीने एकंदर शिक्षणातच आज व्यावहारिक उपयुक्ततेला प्राधान्य आले आहे.

आता शिक्षण सामान्य जीवनाशी गरजेच्या दृष्टीने जवळजवळ एकरूप झाले आहे. जगात चालू असलेल्या बुद्धिविलासापासून शिक्षण अलग ठेवून तर चालणार नाही आणि मानव तर प्रत्यक्ष सृष्टिकर्ता पाहून तोंडात बोट घालील असे नवे नवे वैज्ञानिक चमत्कार रोज करीत आहे. पण विज्ञानाच्या या आश्चर्यकारक करामतीच्या संपर्काने आणि प्रभावाने आपण आपल्या शिक्षणाचे बहिरंग कितीही सजवू पाहात असलो तरी त्याच वेळी चाललेली अंतरंगाची उपेक्षा तीव्रतेने जाणवल्याशिवाय राहात नाही. दैनंदिन जीवनाचे सर्व व्यवहार मानवाच्या अंतरंगावर अवलंबून आहेत. मोठमोठ्या कालखंडांचा आढावा घेताना मानवाच्या अंतरंगाचा विकास हाच प्रगती अजमावण्याचा निकष मानला जातो. अंतरंगाचा विकास म्हणजे मानवता. बाह्य भौतिक विकास कितीही नेत्रदीपक असला तरी मानवतेत त्याला खालचे स्थान असते. जीवनाच्या सुखसोयीत भर घालण्यासाठी, किंवा विश्वातील कोनाकोपऱ्याला पोचून आजवर अज्ञात असलेल्या वस्तुजाताचा शोध घेण्याची हौस भागवण्यासाठी किंवा केवळ वरचढपणासाठी मनुष्य आज वैज्ञानिक प्रगतीमागे धुंदपणे लागला आहे. पण मनुष्य मनुष्याला ओळखतो की नाही, यावर त्याच्या मनुष्यत्वाची किंमत ठरते. मनुष्यामनुष्यामधील जीवन विनासंघर्ष, सुकर, व्यवस्थित चालावे म्हणून संघटित शासनसंस्था, व नियमांचे व कायद्याचे काटेकोर पालन अपेक्षित व आवश्यक आहे. तरी तेथेही कायद्याच्या रुक्षतेवर मानवी अंतरंगाने केलेला शिडकावाच माणसाला जगवतो, असा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाशी अंतरंगाचा निकट संबंध आहे. तेव्हा समाजातील नवीन पिढी घडवताना तिच्या अंतरंगाची अत्यंत काळजी घेतली पाहिजे. दुर्दैवाने या गरजेच्या गंभीरतेबद्दल मोठे पुढारी म्हणवून घेणारे खालपासून वरपर्यंत अनेक लोक अजिबात बेपर्वा झाले असल्याने शिक्षणाचे गांभीर्य व पवित्रता नाहीशी झाली आहे, आणि शिक्षणसंस्थांतही एकीकडून आर्थिक टंचाई, व दुसरीकडून स्वार्थ व सत्तालोलुपता यांनी गोंधळ माजवला आहे. या सर्व गोष्टींचा संकलित परिणाम हा की मुलांच्या अंतरंगाच्या जोपासनेतील उणीवेच्या झळा प्रतिक्षणी सोसाव्या लागल्यामुळे उबगलेला नागरिक शिक्षणावर खापर फोडीत आहे.

शिक्षणात प्रगती चालली आहे की अधोगती ?

अलिकडे काही वर्षे भारतात शिक्षणात प्रगती चालली आहे की अधोगति असा संभ्रम मोठ्या माणसांतही उत्पन्न झाला आहे. कित्येकदा काही विशिष्ट जाहीर प्रसंगी शिक्षणातील उन्नतीचे विजयोत्साहाने कौतुक करणारी माणसेच स्वतः दुसऱ्या काही, बहुधा खाजगी, प्रसंगी 'हे काय शिक्षण की खेळखंडोबा !' अशा शब्दांत निःसंदिग्ध नापसंती व्यक्त करतात. अर्थात शिक्षणाचे यशापयश अनेक घटकांवर अवलंबून आहे. तथापि एक गोष्ट खरी की शिक्षण ही एक अत्यंत व्यापक शक्ती असून ती माणसाचे जीवन सर्व बाजूंनी घडवीत असते, आणि या प्रक्रियेत तिला मिळणारा प्रतिसाद एकेका

माणसाच्या वाबतीतही इतका वेगळा असतो की काही एक व्यक्तने शिक्षण घेतलेल्या माणसात एका दृष्टीने सुसंस्कार तर दुसऱ्या एकाद्या दृष्टीने निकृष्टता असे विलक्षण आविष्कार झाल्याचे आढळते. एकाच गुरुकडून एकाच ठिकाणी, एकाच प्रकारच्या मिळालेल्या शिक्षणाची विचित्रता थोडीफार पुरातन काळीही अनुभवास आली. कौरव-पांडवांमध्ये तर जमीनअस्मानाचा फरक होताच, पण युधिष्ठिर, दुर्योधन, अर्जुन, कर्ण, इत्यादी एकेकट्या व्यक्तीमध्येही विविध व परस्परविरोधी वृत्ती विकास पावल्या. मग आजच्या शिक्षणाच्या विराट विविधतेत तसे झाल्यास नवल काय ? मोठमोठ्या पदव्या धारण करून शासनात, निरनिराळ्या बुद्धिप्रधान जीवनव्यवसायात, किंवा खुद्द शिक्षण क्षेत्रातही उच्च स्थानी विराजमान होणाऱ्या व्यक्ती सामाजिक परस्परसंबंधाच्या क्षेत्रात मात्र सरासरीच्या आसपास घोटाळत असतात. काही तर व्यस्त प्रमाणाने सरासरीच्या खाली उतरलेल्या आढळतात. हा अनुभव अलिकडे विशेष तीव्रतेने येत असल्यामुळे साहजिक शिक्षणावर ठपका ठेवण्यात येतो.

शिक्षणावर येणाऱ्या आरोपाचा सर्वांत मोठा वाटा शिक्षकाकडे जावा हे अपरिहार्य आहे. कारण अभ्यासक्रम कोणताही, कसाही असो, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व ती करीत असताना शिक्षणाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा, याबद्दलची जबाबदारी सर्वस्वी शिक्षकाची असते. शिवाय मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अप्रत्यक्षपणे विकास पावणाऱ्या पैलूवर शिक्षकाच्या आचारविचाराची छाप सतत पडत असते. ती स्वतः शिक्षकालाही टाळता येत नाही.

अज्ञ व बेफिकीर असे कितीतरी लोक शिक्षक म्हणून 'भरती' झालेले आहेत व होत आहेत. त्यांत पुरुषाला उदरनिर्वाह व कुटुंबपोषणाची जितकी जबाबदारी घ्यावी लागते, तितकी स्त्रीला सामान्यतः लागत नाही. त्यामुळे 'वाट चुकलेल्या' शिक्षकांमध्ये पुरुष शिक्षक स्त्रियांपेक्षा मोठ्या प्रमाणात आहेत. अर्थात शिक्षकाच्या अपात्रतेमुळे शिक्षणक्षेत्रात जी हानी होते तीत स्त्रीपासून झालेल्या हानीचा हिस्सा कमी आहे.

हे खरे की केवळ द्रव्यार्जनासाठतर काम पत्करणाऱ्या स्त्रिया आहेतच. त्यांच्यातही दोन प्रकार आहेत. काहींना द्रव्यार्जन आवश्यक असते, त्या ओढूनताणून का होईना, कार्याचे स्वरूप समजून घ्यावे, कामात कसूर राहू नये, अशी धडपड करतात. काहींना द्रव्यार्जनाची खरी गरज नसते. या स्त्रियांची वृत्ती उघडउघड पाट्या टाकण्याची असते. त्यातून काही बुद्धिमान असल्या तर क्वचित् त्यांच्या बुद्धीची प्रेरणा त्यांच्या कृतीत उतरलेली दिसते. पण बहुधा त्यांच्यामध्ये आपल्या देशात आजकाल सर्वत्र विषारी वायूप्रमाणे व्यापून राहिलेली हिरोचीपणाची प्रवृत्ती प्रबळ असते. त्यामुळे त्यांच्या बुद्धिमत्तेचा विद्यार्थ्यांवर बौद्धिक सुसंस्कार घडवण्याच्या दृष्टीने उपयोग होतोच असे नाही. अशा शिक्षिका समाजाचे दुहेरी नुकसान करतात. एकतर विद्यार्थ्यांवर त्यांच्याकडून व्हावयाला पाहिजेत ते संस्कार होत नाहीत आणि अधिक गरजू, अधिक पात्र, अधिक कार्यक्षम अशा कार्यकर्त्यांना मिळू शकणाऱ्या जागा त्यांनी अडवलेल्या असतात. या गटात शिक्षण घेतल्यानंतर मुख्यतः रिकामा वेळ घालवण्याकरता व जाता जाता होईल तो अधिक फायदा मिळविण्याकरिता काम करू इच्छिणाऱ्या तरुणींचा समावेश आहे. अशा तरुणींना आता मोठ्या शहरांतून तरी कचेऱ्यांसारख्या ठिकाणीही काम मिळू शकते व पुष्कळ मुलींना शाळांतील कामापेक्षा त्या तऱ्हेचे 'टेबलवर्क' पसंत पडते, असे दिसते. शिक्षणाच्या दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे.

काही स्त्रिया मात्र काहीतरी सार्वजनिक काम करण्याची हौस म्हणून शिक्षिका बनलेल्या असतात. शिक्षिकेला जरूर असलेले विशेष गुण त्यांच्यामध्ये स्वभावतः पुष्कळ प्रमाणात नसले तरी आपल्या हातून चीज होण्याजोगे काम व्हावे अशी त्यांना ओढ असते.

याहून उच्च गट शिकवण्याच्याच आवडीने शिक्षिका बनणाऱ्या स्त्रियांचा. या शिक्षिकांकडून 'अंगचे सर्वोत्कृष्ट' विद्यार्थीवर्गाला मिळते.

आजही शिक्षिकांमध्ये या दोन प्रकारच्या स्त्रियांची संख्या बरीच आहे. याचे कारण हे असावे की स्त्रीशिक्षणाला सुरुवात झाली तेव्हापासूनच समाजकार्याच्या हेतूने शिक्षिका बनणाऱ्यांची परंपरा पडली आहे.

'ट्रेनिंग' पाहिजे, पण कळकळ आणि आत्मीयता अधिक आवश्यक

इतर कोणत्याही क्षेत्रातील कामात व शिक्षणाच्या कामात फार मोठा फरक आहे. इतर क्षेत्रांत यंत्रे, कागदपत्रे, अशा अचेतन वस्तू हाताळल्या जातात. शिक्षणक्षेत्रात

प्रत्यक्ष चैतन्य हाताळायचे असते. म्हणून शिक्षकांवर मुलांच्या व पर्यायाने समाजाच्या सांस्कृतिक घडवणुकीची जबाबदारी पडते. दुसरे असे की जीवनातल्या प्रत्येक क्षेत्राला शिक्षण मूलभूत असल्यामुळे व समाजातील प्रत्येक स्तरातील मुलामुलींचा शिक्षकाशी निकट संबंध येत असल्यामुळे त्याच्या कार्याची व्याप्ती व खोली अपार असते. शिवाय, इतर क्षेत्रांत काम करणाऱ्याला त्या त्या कामाचे तांत्रिक शिक्षण (ट्रेनिंग) पुरेसे असते. शिक्षकाला तांत्रिक शिक्षण सामान्यपणे लागतेच — अशी निदान मोठमोठ्या शिक्षण-शास्त्रज्ञांची श्रद्धा आहे. अनुभवाची साक्ष अशी आहे की तांत्रिक शिक्षणाशिवायही विद्यार्थ्यांची सर्वांगीण घडण भारतातल्या कित्येक शिक्षकांनी उत्कृष्ट बनविलेली आहे. तथापि विद्यार्थी व विषय दोन्ही संख्येने वाढू लागल्यापासून जुन्या परंपरेत न भासलेली तंत्राची गरज निर्माण झाली आहे खरी. नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे इतक्या मुलांची जबाबदारी आज प्रत्येक शिक्षकावर पडत असल्यामुळे त्याचे काम सुकर होण्याच्या दृष्टीने ट्रेनिंग आवश्यक आहे. पण ट्रेनिंग घेतल्यानंतरही शिक्षकाला त्याचा उपयोग डोळे मिटून जशाचा तसा करून भागत नाही. कुठे केव्हा काय केले पाहिजे हे त्याला सदैव जागरूक राहून शोधत राहावे लागते. व पावलोपावली डोके वापरावे लागते. हे सर्वसामान्यतः शिक्षकामध्ये विद्यार्थ्यांविषयी कळकळ आणि विषयाशी समरसता असली म्हणजे चांगल्या प्रकारे साध्य होते. आणि या बाबतीत नैसर्गिक वत्सलतेमुळे स्त्री पुरुषापेक्षा बहुधा सरस ठरते.

दुसरा एक अनुभव स्त्रीपुरुष दोघेही जेथे काम करतात त्या प्रत्येक क्षेत्रातून सांगण्यात येतो की स्त्री पुरुषापेक्षा कामाबद्दल अधिक इमान राखते व अधिक मनापासून काम करते. मिश्र शाळात किंवा वेगवेगळ्या वेळी मुलांच्या व मुलींच्या शाळात शिकवण्याचा अनुभव घेतलेल्या शिक्षकांचा मुलींबद्दल हाच अभिप्राय आहे. उच्च शिक्षणक्षेत्रातही तरुणी अलिकडे तरुणांना पुष्कळच वेळा मागे टाकतात असे दिसून येते, याची कारणमीमांसा संबंधित प्राध्यापक अभ्यासावर मन लावण्याच्या मुलींच्या गुणाकडे लावतात. जीवनातही दिसून येते की संसार दोघांचा, पण संसाराबद्दल स्त्रीची आत्मीयता पुरुषापेक्षा जास्त असते. आपल्या कामात सर्वस्व ओतण्याचा हा स्त्रीचा गुण भारतात प्रकर्षाने दिसून येतो. पण जगतात सर्वत्रच स्त्रीच्या आकांक्षा आत्मनिष्ठ, मर्यादित, घराभोवती घुमणाऱ्या व म्हणून तीव्र व केंद्रित झालेल्या असतात असे आढळते. आजकाल भौतिक प्रगतीच्या झंझावातात सापडलेल्या स्त्रीची मनोवृत्ती बरीच उथळ सुखलोलुप झाली आहे अशी सर्वत्र तक्रार आहे. पण तरीही स्त्रीमधील प्रेमळपणा व त्याच्या पोटी वसणारी एकनिष्ठा, त्याग व पद्धाळूपणा यांचा साक्षात्कार ठिकठिकाणी वारंवार होतो आणि भौतिक उत्कर्ष साधण्याच्या स्पर्धेत सापडून विफल झालेल्या मानवाला त्या साक्षात्कारातूनच दिलासा मिळत आहे. तात्पर्य, पुरुषवर्गापेक्षा अल्पसंख्यातता आणि कार्यतत्परतेतील वरचढपणा या दोन्हीमुळे शिक्षणात आढळून येणाऱ्या कमतरतेची जबाबदारी आज तरी स्त्रीवर कमी आहे.

बालकाला प्रेमाने वळविणे स्त्रीस्वभावातच आहे

शिक्षणक्षेत्रात कार्यकर्त्री म्हणून प्रवेश करण्याचे श्रेय सर्वस्वी स्त्रीचे स्वतःचे नव्हे हे खरे. तिच्या परिस्थितीची जाणीव झालेल्यांनी तिला हात दिला, पुरुषवर्गापुढे उभ्या राहिलेल्या आर्थिक व शैक्षणिक समस्यांमुळे विवाहाची वयोमर्यादा पुढे सरकत जाऊ लागली, ही गोष्ट मुलींच्या माध्यमिक व उच्च शिक्षणप्रसाराला अनुकूल झाली, आणि अलिकडील घसरत्या आर्थिक परिस्थितीमुळे स्त्रीला द्रव्यार्जन बरेचसे आवश्यक झाले, या घटनांचे श्रेय स्त्रीला अर्थातच नाही. पण स्त्री काम करावे लागलेच तर शिक्षणक्षेत्राला अग्रहक्क प्रथमपासून आजवर देत आली आहे, यांत खूप अर्थ आहे. या पसंतीचे, शिक्षणप्रसाराच्या प्रचंड योजना आहेत, आणि त्यामुळे या क्षेत्रात नोकऱ्या सुलभ आहेत, हे कारण नव्हे. पुरुष जीवनाचा विचार बहिर्मुख होऊन करतो. त्याच्या आकांक्षा चारी बाजूंना बाहेर झेप घेतात. स्त्रीने बाह्य जीवनात रस घ्यावा अशा विचारांची जोरदार लाट उसळली आहे. स्त्रीला उत्तेजित करणाऱ्या लहानमोठ्या चळवळीही झाल्या आहेत, आणि अजून होतील. पण घराबाहेर काम करण्याच्या मोहात पडल्याने मनःशांती गमावून बसावे लागते, हा अनुभवही स्त्रीला वाढत्या प्रमाणात येत आहे, आणि साहजिकच काम करावेच लागले तर निदान मन रमण्याजोगे क्षेत्र पत्करून हरपलेल्या समाधानाची भरपाई करून घ्यावी अशी स्त्रीची प्रवृत्ती आहे. तिने ही प्रवृत्ती अजून जपली आहे. यात तिचे कौतुक आहे.

खरेखुरे शिक्षक व्हायचे असेल तर बालकांवर प्रेम केले पाहिजे. स्त्रीला हे 'सहज' आहे. तिच्या स्त्रीत्वाचाच तो एक पैलू आहे. पुरुषही बालकावर प्रेम करतो पण स्त्रीइतक्या सहजपणे तो त्याला जिंकू शकत नाही. बालकाला (पुरुषालाही) प्रेमाने आपलेसे करणे स्त्रीच्या स्वभावातच आहे. मुलांना जन्म दिला नसला तरी स्त्री माता असते. मुलांवर रागावतानाही तिच्या हृदयांत निरपेक्ष प्रेम असते. ते तिला उदार बनवते. चुकांकडे ती क्षमाशीलपणे पाहाते. चुकलेल्यांना संधी देण्यासाठी लागणारा धिमेपणा (patience) तिच्यामध्ये निसर्गानेच ठेवलेला आहे. स्त्रिया उतावळ्या असतात, पण स्त्री उतावळी नाही. ती सोशीक आहे, जरूर तितका वेळ द्यायला तयार आहे. दुसरे असे की स्त्रीला दुसऱ्यांच्या भावनांची संवेदना पुरुषांपेक्षा जलद व बिनचूक होते. म्हणून मुलांचे मनोव्यापार ओळखून त्यांना योग्य तो प्रतिसाद देणे व इष्ट वळण लावणे तिला सोपे असते. तात्पर्य शिक्षकाला अत्यावश्यक असणारे सर्वप्रथम गुण खुद्द स्त्रीत्वातच आहेत. पुरुष ते कमावू शकतो, पण त्याला ते कमवावे लागतात.

मात्र संघटित शिक्षणव्यवस्थेत आवश्यक असलेल्या एका गुणाचे प्रमाण स्त्रीच्या मातृसदृश प्रेमळपणामुळेच तिच्यात कमी असते. शिस्तीच्या बाबतीत ती शिथिल असते. स्वतः सोसण्याचा कणखरपणा तिच्यामध्ये पुरेपूर असतो पण शासन करून दुसऱ्याला सोसायला लावणे तिला जमत नाही. शासन करावेच लागले तर पुरुष निर्विकारपणे करू शकतो. स्त्रीहृदय कचरते. शिक्षा देण्याचा प्रसंग टळेल तर बरे म्हणते.

शिक्षणाच्या उच्च स्तरात स्त्रिया कमी

हे सत्य लक्षात घेतले तर पूर्वप्राथमिक अवस्थेपासून महाविद्यालयीन अवस्थे-पर्यंतच्या शिक्षणकार्यात पायरीपायरीने स्त्रीच्या कर्तृत्वाचा प्रभाव कमी कमी होत चालल्याचे दिसते, या घटनेचा अर्थ लागतो. खालच्यापेक्षा वरच्या क्षेत्रात स्त्री कार्य-कर्त्यांची संख्या आपल्या सामाजिक जीवनपद्धती-अनुसार कमी होत जाते, इतकेच या घटनेचे कारण वा स्वरूप नाही. इतर व्यवसायांशी तुलना करता शिक्षणव्यवसाय आर्थिक दृष्ट्या निकस आहे हेही या घटनेच्या मुळाशी नाही. कारण इतर क्षेत्रे खुली असताना अर्थार्जनाकरता काम करणाऱ्या स्त्रिया माध्यमिक शिक्षणातही क्वचितच टिकतात. उच्च शिक्षणविभागापर्यंत त्या येतच नाहीत. शिक्षणक्रमात वरवर जावे तसे स्त्रीकर्तृत्व उतरणीला लागलेले दिसते, त्याचे कारण मुख्यतः हे की शिक्षणक्षेत्रातील खालच्या स्तरात स्त्री जशी रमते, वातावरणाशी एकरूप होते तशी वरच्या स्तरात होत नाही. तारुण्योन्मुखावस्थेपर्यंतच्या मुलांमुलींना आपलेसे करून त्यांच्यावर ती वचक ठेवू शकते; त्यांची श्रद्धा मिळवू शकते. वरच्या स्तरात शैक्षणिक पात्रता जास्त लागते हा एक अडथळा असतो ही गोष्ट खरी. पण त्यापेक्षा विद्यार्थ्यांशी शिक्षकाच्या भूमिकेवरून समरस होण्याच्या तिच्या प्रवृत्तीला वरच्या स्तरात, अनुकूल व संघटित शिक्षणव्यवस्थेला सुसंगत असा प्रतिसाद मिळेल, असा आत्मविश्वास विषयावर प्रभुत्व असले तरी तिला वाटत नाही. म्हणून स्त्री उच्च-शिक्षण-क्षेत्र पसंत करीत नाही असे दिसते.

स्त्रीचा बौद्धिक विकास पुरुषाच्या बरोबरीने आजवर झाला असला व पुढेही निश्चित असला तरी तो विकास साधण्याच्या प्रयत्नात स्त्रीसहज मानसिक प्रवृत्ती अजून पूर्णतया दडपल्या गेलेल्या नाहीत ही आनंदाची गोष्ट आहे. पण असा धोका आहे खरा. नवीन दालन खुले होऊन त्यात मनसोक्त विहार करण्याची मोकळीक मिळाल्याने स्त्रीचे कर्तृत्व त्यांत गुंग झाले आहे, तोपर्यंत गुणावगुणांकरता आत्मपरीक्षण करण्याकडे तिचे लक्ष जाणार नाही. ते गेले की तिला स्पष्ट होईल की पुरुषाचे पौरुष जितके इष्ट आहे तितके स्त्रीचे मार्दव इष्ट आहे. पौरुषाबरोबर वसणारा मनोविकारांचा उच्छृंखलपणा जितका क्षम्य आहे, तितकी मार्दवाबरोबर वसणारी शिथिलता क्षम्य आहे. या उणीवा खऱ्या, पण त्या नष्ट करताना मूळ गाभ्याला धक्का बसत असेल तर त्यांचा नायनाट करण्याचा अट्टाहास कशाला धरायचा? परस्परांच्या अपूर्णतेची सहानुभूतिपूर्वक जाणीव ठेवल्याने सहकार्य साधून जो लाभ होईल त्याला असाध्य पूर्णत्वाच्या मागे लागल्याने उलट मुकावे लागेल. कारण त्यात श्रम व वेळ अस्थानी खर्च होतील व प्रगतीत खंड पडेल.

स्त्रीचे वैशिष्ट्य तिथे प्रकट होत नाही

उच्च शिक्षणाच्या पातळीवर उत्कृष्ट ठरलेल्या स्त्रीशिक्षिका आज आहेत, पुढेही निघतील. पण सामान्यपणे विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांच्या

स्त्रीवर्गाचे अर्थार्जन ही एक वाढती समस्या झाली आहे. कोणत्याही पातळी-वरील संसारात स्त्रीपुरुष दोघेही मिळवती असल्याचे पुष्कळ पांढरपेशा कुटुंबात आज आढळते. पैसा मिळवण्याच्या नादाने समाजधारणेतील आपल्या आद्य कर्तव्याकडे स्त्रीचे दुर्लक्ष होते की काय याची आकडेवारी काढल्याशिवाय काही विधान करणे योग्य होणार नाही. शिवाय या विषयावर मतभेद आहेच. परंतु आज जी परिस्थिती दिसते त्यात स्त्रीला द्रव्यार्जन करायला पुरुष फारसा खुशीने लावीत नाही असे दिसते. थकूनभागून आल्यावर घरात कुटुंबात मिळणारी शांती व विश्रांती गमवायला त्याची तयारी नाही. अंशतः या कारणाने व अंशतः स्त्रीचे स्वतःचेच हृदयबंध घर, संसार, कुटुंब, यामोवतीच गुंतलेले असल्यामुळे पैसा मिळविण्यासाठी बाहेर पडणे टाळता येईल तर टाळणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी आहे.

पुरुषी शिक्षणक्रम स्त्रीला वर की शाप ?

आपल्या देशात झालेल्या स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराचे खरोखर कोणीही कौतुक करील. इंग्लंड अमेरिकेसारख्या देशापेक्षा स्त्रीशिक्षणाचा प्रसार येथे अधिक वेगाने झाला. त्याला भारतातील गेल्या दोन पिढ्यांतील विचारवंतांची तळमळ, चिकाटी व त्याग कारण झाला. याचे भारतीय स्त्रीने कृतज्ञतापूर्वक चिरकाल स्मरण ठेवले पाहिजे. पण अंशतः त्या विचारवंतांचे ध्येय व तत्वप्रणाली पुरती आत्मसात होण्यापूर्वीच शैक्षणिक प्रसाराला चहूकडे वेग व उठाव आला म्हणून व अंशतः आपले राजकीय धोरण व आर्थिक स्वावलंबन यांची सुसंबद्ध सांगड होऊ शकली नाही म्हणून आपल्या शिक्षणाची समृद्धी योग्य प्रकारे झाली नाही. शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध राहिला नाही हे प्रत्यक्ष जीवन जगताना लक्षात येऊ लागले आहे. आता मोठमोठ्या मान्यवरांचे विचार वाचण्यात व ऐकण्यात येतात की, मानवी जीवनात स्त्रीचे पुरुषांच्या जोडीचे, पूरक, पण निश्चितपणे भिन्न, असे विशिष्ट कार्य आहे, हे सत्य लक्षात घेतल्याशिवाय समाज सर्व बाजूंनी भक्कम बनणार नाही. स्त्रीला आपले शिक्षण सफल करायचे असेल तर या विचारांचा अभ्यास तिने स्वतः स्वतंत्रपणे कोणताही अभिमान व अभिनिवेश न बाळगता केला पाहिजे.

मौज अशी आहे की शिक्षणक्रम आखताना स्त्रीला विशिष्ट स्थान आजवर कोणी दिले नाही आणि तिने मागितले नाही. मुलांसाठी शिक्षणक्रम बनवायचे व ते गुणदोषांसह मुलींना लागू व्हायचे, ही आरंभापासूनची प्रथा. स्त्रीने याबद्दल कधी तक्रार केली नाही, कारण तिने स्वतःच्या जीवनाचा स्वतंत्र भूमिकेवरून विचारच केला नाही. स्त्रीजीवनाचे सुगृहिणी व सुमाता हे ध्येय भारतात एकुलत्या एका द्रष्ट्याने— महर्षि कर्व्यांनी मांडले. स्त्रीला व जनतेला ते एकदम पटले, पसंत पडले. पण मग अधिक मोहक ध्येये समोर येऊ लागली. कर्तृत्व व आत्मविश्वास वाढला तशी ईर्ष्या वाढली. स्त्रीपुरुषांमधील नैसर्गिक असलेल्या सर्व प्रकारच्या फरकाचा नायनाट करायचा चंग बांधून प्रयत्नाला लागलेल्या बुद्धिवादी पाश्चात्यांच्या विचारांचे वारे जोरात इकडे वाहू

लागले. त्यांनी उठवलेले वादळ अजून शांत झालेले नाही. आता 'पुरुषांना मिळतं ते, तसेच, तितकेच, आम्हाला पाहिजे' ही स्त्रीची मागणी आहे. स्वतःचे श्रेष्ठत्व आणि या मागणीतील वेडी लाचारी तिला दिसत नाही. सर्व तऱ्हेचे उत्तेजन, सर्व तऱ्हेच्या सवलती, प्रयत्न, इत्यादींनी 'अनंत हस्ते' उपलब्ध करून दिलेल्या शिक्षणाने स्वत्व जागृत झाल्याचा अभिमान मिरवणाऱ्या स्त्रीचे वैचारिक परावलंबित्व होते तसेच आहे.

स्त्री ही कुटुंबाच्या द्वारा समाज घडविणारी आहे

स्वतंत्रपणे विचार केला तर स्त्रीला आढळून येईल की समाजाला घडवण्याच्या आपल्या कार्याची कक्षा अपार आहे. शिकलेल्या स्त्रियांची संख्या शहरी विभागात तरी चांगलीच मोठी आहे. पण यांपैकी बहुसंख्य स्त्रिया नोकऱ्या वा अर्थार्जन करीत नाहीत. सामान्यतः स्त्री घर संभाळीत आहे. आणि ही परिस्थिती निसर्गाला व जीवनपरंपरेला धरुन आहे. इतकेच नव्हे, तर ती सर्वथैव इष्ट आहे. जगात कुठेही कुटुंबजीवनाचे सौख्य गमवायला माणूस तयार नाही. भारतात तर धर्मानेच आश्रम-व्यवस्था बसवून कुटुंबजीवनाची श्रेष्ठता प्रस्थापित केली आहे. कुटुंबापासून अलग असा जीवनाचा अर्थच लावता येत नाही. शिक्षण जीवनापासून दूर पडत गेल्याने घर व कुटुंब यातील वाजवी बंधनाबद्दल विकृत कल्पना उद्भवल्या आहेत. पुरुषाला मनःशान्ती व मुलांना आस्थापूर्ण संगोपन मिळवून देणाऱ्या स्त्रीचा दर्जा बाहेरील जीवन पत्करून नव्या नव्या कृत्रिम बंधनात जखडून घेणाऱ्या स्त्रीपेक्षा समाजधारणेच्या दृष्टीने काकणभर अधिकच श्रेष्ठ ठरतो. 'When you educate a boy, you educate an individual, and when you educate a girl, you educate a family,' हे नुसते प्रचाराचे घोषवाक्य नव्हे. ते एक सत्य आहे. स्त्रीचे प्रत्यक्ष कर्तव्यक्षेत्र अत्यंत लहान कुटुंबाने मर्यादित दिसले तरी ते अत्यंत व्यापक व अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण बहुसंख्य स्त्रीवर्गाचे जीवन या क्षेत्रात व्यतीत होत आहे व दुसरे असे की कुटुंबाकुटुंबातून बादलेल्या घटकांचा समाज बनत असल्याने प्रत्येक घटकाचा विकास समाजविकासाला अनुकूल, पुरेसा व सर्वांगीण झाला पाहिजे ही कुटुंबप्रमुखाची जबाबदारी असते. या दृष्टिकोनातून पाहिले तर घर संभाळणारी स्त्री जे शिक्षण अहर्निश देत असते त्याचे महत्त्व लक्षात येईल.

हे शिक्षण शाळा–कॉलेजांच्या बाहेरचे सर्व वातावरण व्यापून राहिलेले आहे. त्याने फक्त बुद्धी विकसित होत नाही, मनही विकसित होते. माणसाची माणुसकी जागृत राहील, सहिष्णुता वाढीला लागेल, कोतेपणा नाहीसा होईल, समाजाबद्दलच्या व राष्ट्राबद्दलच्या कर्तव्याची भावना जोपासली जाईल, कष्ट करण्याची तयारी राहील, जीवनातले गांभीर्य ओळखण्याची सवय लागेल, थोडक्यात म्हणजे आज 'शिक्षण' मिळत असूनही जे दुरापास्त झाले आहे असे दिसते, पण जे प्रगती हवी असेल तर अत्यावश्यक आहे ते सर्व शिक्षण घर संभाळणारी स्त्रीच देऊ शकेल. जीवनात

आपल्याला स्थान आहे, आपल्याला विचार करता येतो, कार्य करता येते, जबाबदारी उचलता येते, हे तिला शिक्षणाने पटवले आहे. आता समाजाशी आपला अविभाज्य घटक म्हणून असलेला संबंध व त्यामुळे आपल्यावर समाजाच्या उत्कर्षापकर्षाची असलेली जबाबदारी तिने ओळखली पाहिजे.

मातेच्या जबाबदारीची व्याप्ति

प्रथम स्त्री माता-पालक असते. शिक्षक पालकांचा परस्परांच्या कार्याबद्दल वाद नेहमी कानावर येतो. दोघांचे सहकार्य किती आवश्यक आहे हे सांगायला नको. काही बाबतीत मुलाच्या विकासाची सर्व जबाबदारी शिक्षकाची व काही बाबतीत सर्व जबाबदारी पालकाची असते. ही आपापली जबाबदारी दोघांनी मनापासून पूर्णतया उचलली पाहिजे. मुलांच्या विकासाच्या दृष्टीने काही उणीवा किंवा अनपेक्षित वा अनिष्ट परिणाम परस्परांच्या कार्यक्षेत्रात घडत असल्याचे लक्षात आले की लगेच परस्परांचे तिकडे लक्ष वेधून तेवढ्या बाबतीत स्वतः अलिप्त राहिले पाहिजे. वैयक्तिक व सामाजिक जीवनात आवश्यक असलेल्या शारीरिक व मानसिक योग्य त्या सवयी मुलांना लावणे हे पालकांचे काम आहे. अर्थात् माता याबद्दल जबाबदार आहे. या जबाबदारीची व्याप्ती फार मोठी आहे. ती यशस्वी रीतीने पेलण्यासाठी मातेला पूर्वतयारीही जबर केली पाहिजे. अखंड बदलत्या जीवनाचा व समाजाला सतत उन्नतिपथावर राखण्याकरिता कशा प्रकारचे वळण आवश्यक आहे याचा विशाल दृष्टी ठेवून तिने अभ्यास करीत राहिले पाहिजे, व त्या कार्यात आपला अटळ वाटा आहे हे ओळखून त्या कार्याला अनुकूल अशा आचारविचारांच्या सवयी प्रथम कटाक्षाने स्वतःला लावून घेतल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, आर्थिक हलाखी आ वासून आली असताना द्रव्योत्पादनाच्या अगोदर काटकसरीचा अवलंब आवश्यक आहे हे ओळखणारी स्त्री आपल्या मुलांना साधेपणाच्या सवयी लावण्याबद्दल जागरूक राहील आणि त्याकरिता स्वतः साधी राहू लागेल. आपल्या मुलांना मागतील त्या वस्तू, उंची तऱ्हेतऱ्हेचे कपडे वगैरे पुरवीत राहण्याने तशी शक्यता नसलेल्या कुटुंबातील मुलांच्या मनात आपण असंतोष, मत्सर, विरोधवृत्ती, पालकांबद्दल अढी, अपहाराची इच्छा इत्यादी अनेक विकृती निर्माण करतो व पर्यायाने समाजघातक कृती करतो, ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या मुलांच्या व त्यांच्या निमित्ताने आपल्या स्वतःच्या हौशी भागवण्याच्या मोहावर विचारी माता संयम घालायला शिकेल. तात्पर्य, घर संभाळणारी स्त्री सतत स्वतः शिकत असते, स्वतःच्या मुलांना शिकवीत असते आणि समाज घडवीत असते.

स्त्रियांचे समाजकार्य आणि लेखनकार्य

कुटुंबाबाहेरच्या अमर्याद जीवनाच्या क्षेत्रातही निरनिराळ्या विभागात स्त्री शिक्षण देत असते. वेतनी काम न करणाऱ्या कितीतरी स्त्रिया समाजसेवा म्हणून काही करीत

असतात. बहुधा स्त्रियांचे सांसारिक प्रश्न सोडवण्यास हातभार लावणे व त्यांच्यामध्ये जागृती उत्पन्न करणे असे या समाजसेवेचे स्वरूप असते. या कार्याचे मोजमाप करणे फार कठीण आहे. आपल्या स्त्रीवर्गामध्ये प्रगतीबद्दल आस्था उत्पन्न झाली आहे यात शंका नाही. पण याला सर्व बाजूंनी वातावरणात वाहात असलेले प्रोत्साहक विचारप्रवाह किती कारण आहेत, सरकारने कोणत्याही हेतूने का होईना पुरस्कारलेल्या योजना किती कारण आहेत, रेडिओ सिनेमासारखी सर्वत्र पसरलेली करमणूकद्वारा ज्ञान पुरविणारी साधने किती कारण आहेत, अज्ञात रीतीने जीवनसर्वस्व वाहून फक्त दोन वस्त्रे व दोन वेळचा घास यावर राहून रात्रंदिवस झिजणारे तुरळक पुण्यात्मे किती कारण आहेत व समारंभाने समाजसेवेचा झेंडा फडकवीत जयगीत गात फिरणारे स्त्रीपुरुष किती कारण आहेत हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय होईल. सध्या दिसते ते इतके की स्त्री खडखडीत जागी होऊन इतरांना जागे करीत आहे. जागे होऊन आपण करीत आहो काय याबद्दल मात्र तिला संभ्रमच आहे. कारण तिच्या उन्नतीबद्दल, तिला पुढे आणण्याबद्दल, ते कसे पुढे आणावे याबद्दल, योजना झाल्या तर त्यांच्या अंमलबजावणीबद्दल, अजून ती स्वतंत्रपणे काही निर्णय किंवा कृती करू शकत नाही. स्वतंत्रपणे विचार करून स्वतःच्या जबाबदारीचा तिने अभ्यास केला तर खरोखर तिच्या हातून खरी समाजसेवा घडेल.

दुसऱ्या एका विभागातही स्त्री मोठ्या आवडीने पडली आहे. कदाचित या क्षेत्रात तिला अलिकडे मोबदल्याचे आमिष काही प्रमाणात आकर्षीत असेल. पण केवळ मोबदल्यावर नजर ठेवून ती येथे विहार करीत नसावी. मुख्यतः मनातील उर्मीचा आविष्कार करण्याची तलफ, क्वचित स्वतःला मिळालेली माहिती इतरांना देण्याची सदिच्छा, क्वचित आवश्यक वाटलेल्या ठिकाणी अधिकारवाणीने मार्गदर्शन करण्याची तळमळ, इत्यादी प्रेरणा स्त्रीच्या या क्षेत्रातील संचाराच्या मागे आहेत. हे क्षेत्र लेखनाचे. हे क्षेत्र शिक्षणाच्या बाबतीत किती प्रभावी आहे हे अजून दुर्दैवाने पुष्कळ लेखक-लेखिकांनी ओळखलेले नाही, किंवा निदान त्याविषयीच्या स्वतःच्या जबाबदारीबद्दल ते बेदरकार आहेत. म्हणूनच समाज भक्कम करण्याऐवजी खिळखिळा करायला आपण कारणीभूत होत आहोत हे त्यांना सुचत नाही. स्त्रीने या क्षेत्राचे सामर्थ्य लक्षात घ्यावे. कुटुंबातील पुरुषाच्या इष्टानिष्ट कृतींच्या परिणामावर सतत नजर ठेवून अनिष्ट गोष्टींना शह देण्यासाठी ती प्राणपणाने कंबर कसून उभी असते. समाजकुटुंबातील अनिष्टता निकामी करण्याचे काम स्त्रीशिवाय कोण करणार? स्वतःचे स्थान व जबाबदारी ओळखून तिने वाङ्मयक्षेत्रातील क्षुद्र विचारविकारांवर प्रतिहल्ले चढवीत राहिले पाहिजे. लेखनाचा वाचकांचे मनरंजन व उदात्त विचारांचा प्रसार असा उपयोग व्हावा आणि अशा लेखनातून स्त्री ही एक शक्ती आहे असा साक्षात्कार व्हावा. वृत्तपत्रातील व नियतकालिकातील पोरकट विनोदाचा किंवा हीणकस 'कले'चा स्त्री विषय होणार नाही, असा वचक स्त्रीने स्वतःच बसवला पाहिजे. याकरिता अर्थात तिला आत्मपरीक्षण करून

स्वतःला कडक शिस्त लावून घ्यावी लागेल. पण ही तिची जबाबदारीच आहे.

स्त्रीने आपले प्रचंड सामर्थ्य योग्य रीतीने वापरले पाहिजे

जीवनात स्त्रीचे स्थान ' शिक्षिका ' म्हणून कसे व किती विशिष्ट आहे, याची कल्पना थोडासा आजूबाजूच्या वातावरणाचा विचार केला असता सहज येईल. आज हेतुपुरःसर वापरण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या साधनामध्ये चित्रपट हे एक साधन आहे. या साधनाला फक्त काही मर्यादित कार्यक्रमापुरता शिक्षणाच्या प्रत्यक्ष आवारात प्रवेश व वापर आहे. पण त्या आवाराबाहेर हे साधन उपयोगात असते तेव्हाही ' शिक्षण देण्याचे ' काम त्याच्याकडून होतच राहते. या शिक्षणक्रमावर कोणी नियंत्रण घालू शकत नाही. त्यात भाग बजावणाऱ्या पुरुषांचे समाजावर वजन व स्त्रियांचे वजन याची तुलना केली तर खुद्द मानवी जीवनालाच स्त्री कसे वळण लावू शकते हे लक्षात येईल.

आपल्या या प्रचंड दुर्दम्य सामर्थ्याची व त्या सामर्थ्यामुळे अनिवार्यपणे आपल्यावर असणाऱ्या समाजविषयक जबाबदारींची जाणीव स्त्रीने ठेवली पाहिजे. स्वतःच्या स्थानाचा मान व पावित्र्य राखण्याची पात्रता अंगी आणण्याबद्दल ती सदैव जागरूक राहिली पाहिजे. स्त्रीने जगात पुरुषाला कर्तबगार बनवले असल्याचे कितीतरी दाखले आहेत. प्रेम, साहाय्य, प्रेरणा, आणि संरक्षणसुद्धा स्त्रीपासून सतत पुरुषाला मिळत आले आहे. पण स्वतःबद्दलची ही जाणीव लुप्त झालेली आणि नैसर्गिक शक्ती मात्र जागृत, क्रियाशील, शिक्षणाने अधिक तीक्ष्ण बनवलेली. यामुळे आपल्या हातून गोंधळ माजत आहे व अहितकारक, समाजविघातक वर्तन घडत आहे ही परिस्थिती ओळखण्याचे ज्ञान आता स्त्रीजातीला हवे.

विभाग तिसरा

स्त्रीजीवनाच्या समस्या

१६. भारतीय कायद्याने स्त्रीला दिलेले संरक्षण
विरूपाक्ष अवाजी नाईक

१७. समाजधारणेत स्त्रीचे स्थान
मालतीबाई बेडेकर

१८. स्त्रीजीवनातील समस्या
गीता साने

१९. स्त्रीजीवनाची चित्रे
श्रीपाद शंकर नवरे

२० आंतरभारतीय स्त्रीजीवन
श्रीपाद जोशी

१६

भारतीय कायद्याने स्त्रीला दिलेले संरक्षण

विरूपाक्ष अवाजी नाईक

श्री. विरूपाक्ष अवाजी नाईक, बी. ए. एलएल्. बी. (जन्म १९-४-१९०५) औद्योगिक न्यायालय प्रमुख, मुंबई. १९३० पासून १८ वर्षे बेळगावात वकिली, शैक्षणिक व सामाजिक कार्यांत भाग. नंतर अकरा वर्षे जिल्हा न्यायाधीश. १९६६ पर्यंत मुंबई हायकोर्टात न्यायमूर्ती. विविध विषयांवर स्फुट लेखन. 'मानवी स्वातंत्र्य – प्रेरणा व साधना' नुकतेच प्रसिद्ध झाले. अनेक संस्थांमध्ये महत्त्वाचे स्थान. ('प्रबोधन', प्रभात रस्ता, पुणे ४)

कायद्याने सामाजिक सुधारणा

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात समाज-परिवर्तन अथवा सामाजिक सुधारणा कायद्याने घडवून आणाव्या की नाही याबद्दल या देशात व विशेषतः महाराष्ट्रात एक मोठा वाद निर्माण झाला होता. १८९१ साली तत्कालीन कौन्सिलमध्ये संमतिवयाचे बिल (एज ऑफ कन्सेंट बिल) जेव्हा दाखल करण्यात आले त्या वेळेला या वादाला मोठेच भरते आले होते. कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणणे इष्ट नव्हे असे म्हणणाऱ्या पक्षाचे नेतृत्व लोकमान्य टिळक यांच्याकडे होते. न्यायमूर्ती तेलंग यांसारखे काही नेमस्त सुधारक कायद्याने विवाहविषयक अगर अन्य कोणतीही सुधारणा घडवून आणू नये अशा तऱ्हेच्या मताचे प्रतिपादन पूर्वीपासून करीत आले होते. रानडे आगरकर प्रभृतींनी मात्र कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणणे नुसते इष्टच नव्हे तर अपरिहार्य आहे अशा मताचा पाठपुरावा जोराने केला. परंतु हळूहळू पण निश्चयेकरून कायद्याचा हस्तक्षेप सामाजिक चालीरीती बदलण्याच्या दिशेने व समाजात इष्ट ते फेरफार करण्याच्या दिशेने वाढत्या प्रमाणात होत गेला. कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणावी की नाही हा वाद आता कालबाह्य ठरलेला आहे. व्यक्तीच्या व समाजाच्या दैनंदिन जीवनामध्ये कायद्याचा हस्तक्षेप दिवसेदिवस वाढत चाललेला आहे. लोककल्याणकारी राज्य स्थापन करण्याकरिता बद्धपरिकर झालेल्या राज्यसंस्थेला सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याकरिता कायद्याचा आश्रय घेतल्याशिवाय गत्यंतर नाही

हे उघड आहे. एक गोष्ट मात्र खरी की नुसत्या कायद्याने सामाजिक सुधारणा अगर परिवर्तन पूर्णांशाने यशस्वी करणे कठीण आहे. कार्य पूर्ण करण्याकरिता लोकमतामध्येही बदल घडवून आणण्याचा प्रयत्न समाजधुरिणांनी सतत केला पाहिजे. कायदा व लोकमत यांमध्ये तफावतीचे मोठे खिंडार राहिले तर ते भरून काढणे कठीण होऊन जाते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेने व भारतीय संसदेने वेळोवेळी कायदे करून स्त्रियांना अनेक बाबतीत संरक्षण दिलेले आहे. घटनेने व इतर स्त्रीविषयक कायद्यांनी भारतीय स्त्रीला जे संरक्षण मिळालेले आहे त्याचे स्वरूप व व्याप्ती नीटपणे समजून घेण्याकरिता भारतीय समाजात स्वातंत्र्यपूर्व काली स्त्रीचे स्थान काय होते याचे संपूर्ण चित्र समोर उभे करणे आवश्यक आहे. 'स्वातंत्र्यपूर्व काल' हा शब्दप्रयोग सुद्धा वरील दृष्टीने मोघम स्वरूपाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व कालाची विभागणीसुद्धा दोन कालखंडांत करणे आवश्यक आहे. पहिला कालखंड म्हणजे ब्रिटिशांचे राज्य हिंदुस्थानांत येण्यापूर्वीचा व दुसरा कालखंड म्हणजे ब्रिटिश अमदानी सुरू झाल्यानंतरचा.

ब्रिटिश अमदानीपूर्वीची स्थिती

भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान सुमारे १५०० वर्षांपूर्वी मनूच्या वेळेस निश्चित झाले. स्त्रीला भारतीय समाजात अत्यंत दुय्यम किंबहुना हीन प्रतीचे स्थान मिळालेले होते. स्त्री ही स्वातंत्र्याला पात्र नाही अशी निःसंदिग्ध घोषणा मनूने केलेली आहे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' अशा अर्थाची जी वचने मनुस्मृतीत व अन्य ठिकाणी सापडतात ती अर्थवादात्मक समजली पाहिजेत. गार्गी व मैत्रेयी यांसारख्या विदुषी प्राचीन काली होऊन गेल्या यावरून सामान्य स्त्रीसंबंधी अंदाज बांधणे चुकीचे होय. कारण स्त्री व शूद्र वेदाच्या म्हणजे विद्येच्या व ज्ञानाच्या क्षेत्रात एकाच पंगतीवर बसविण्यात आलेले आहेत. दोघांनाही ज्ञानापासून वंचित केले आहे. विवाह हा एक संस्कार आहे व विवाहसंबंध अविच्छेद्य आहे असे मानण्यात आलेले होते. बायको मेली असता किंवा ती हयात असतानासुद्धा दुसरे किंवा तिसरे लग्न करण्याचा अधिकार पुरुषाला बहाल करण्यात आला असला तरी स्त्रीने पतिनिधनानंतर एक तर सती जावे किंवा केशवपन करून वैधव्यात जन्मभर पिचत राहावे अशी व्यवस्था करण्यात आलेली होती. बालविवाह मान्य होते इतकेच नव्हे तर बालपणीच विवाह झाले पाहिजेत असा आग्रह होता. 'अष्टवर्षा भवेत् कन्या' हे मनुवचन सुप्रसिद्ध आहे. बालविवाहाच्या चालीमुळे बालविधवांची संख्या समाजात फार मोठी असे. त्यांची स्थिती अत्यंत अनुकंपनीय असे. आंतरजातीय विवाह वर्ज्य होते. एका जातीमधील पोटजातीतील विवाहांनासुद्धा बंदी घालण्यात आली होती. विवाहाच्या बाबतीत अनुलोम व प्रतिलोम गोत्रप्रवरविषयक बंधने (प्रोहिबिटेड डिग्रीज) यांसारखी अनेक कृत्रिम बंधने घालण्यात आली होती.

स्त्रीला मिळकतीवर मालकी हक्क नव्हता

हिंदू कुटुंब प्राय: अविभक्त कुटुंब असायचे. अविभक्त कुटुंबात स्त्रीला फक्त अन्नवस्त्राचा अधिकार असायचा. अविभक्त कुटुंबातील विधवेची स्थिती अत्यंत दयनीय अशी असे. तिला दत्तक घेण्याचाही अधिकार नसे. विभक्त कुटुंबात मिळकतीवर स्त्रीला मर्यादित स्वरुपाचे हक्क देण्यात आले होते. आपल्या हयातीपर्यंत नवऱ्याच्या मिळकतीचा उपभोग तिला घेता येत असे. तिच्या हक्काची मर्यादा हयात उपभोगापुरतीच असे. स्त्रीधन म्हणजे ज्या मिळकतीवर स्त्रीला संपूर्ण अधिकार आहे ती. अशी मिळकत अति अल्प व वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या स्वरुपात व प्रमाणात असे. मुलीचे कन्यादान करण्याच्या वेळेस काही ठिकाणी व काही जातीत बाप पैसे घेत असे त्याला शुल्क हे नाव प्राप्त झाले. बापाने या शुल्कापैकी काही भाग मुलीला अर्पण केला तर ते मुलीचे स्त्रीधन होत असे. त्याचप्रमाणे लाजाहोम होण्यापूर्वी किंवा मिरवणुकीच्या वेळेस आई, भाऊ वगैरे जवळच्या नातेवाईकांकडून प्रेमापोटी जी देणगी वधूला मिळे ती तिचे स्त्रीधन मानले जात असे. याज्ञवल्क्याच्या मताप्रमाणे नातेवाईकांकडून लग्नानंतर सुद्धा मिळालेल्या देणग्या स्त्रीधन ठरत असत. कात्यायनाच्या मताप्रमाणे कलकतेच्या जोरावर व कलाकुसरीने संपादन केलेल्या द्रव्यावरसुद्धा नवऱ्याचे स्वामित्व असायचे. नवऱ्याकडून शुद्ध प्रेमाने मिळालेली देणगी ही बायकोची स्त्रीधन मिळकत आहे, असे नारदाचे मत आहे. सारांश, स्त्रीधनासंबंधी स्मृतिकारांची कल्पना अत्यंत कोत्या स्वरुपाची होती.

भाष्यकारांनी स्मृतिकारांच्या कल्पनेचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. विज्ञानेश्वराने स्त्रीला कन्यावारसाने मिळालेली मिळकत हे स्त्रीधन मानले आहे. त्याचप्रमाणे स्त्रीने आपण जमविलेल्या पैशाने विकत घेतलेली मिळकत किंवा विरुद्ध कब्जाने प्राप्त करुन घेतलेली मिळकत हेसुद्धा स्त्रीधन होते असे विज्ञानेश्वराचे म्हणणे आहे. जीमूतवाहन याने ज्या मिळकतीवर नवऱ्याचा अधिकार नसेल ती मिळकत स्त्रीधन या सदराखाली टाकावी अशी ऐसपैस व मोघम व्याख्या केली आहे.

स्त्रीचा वारसा हक्क अत्यंत मर्यादित स्वरुपाचा असे. अविभक्त कुटुंबात स्त्रीला कोणत्याही स्वरुपाचा वारसा हक्क मिळत नसे. तिचा हक्क अन्नवस्त्रापुरता मर्यादित असे. स्थूलमानाने विधवा, मुलगी, आई, बापाची आई व बापाची आजी यांना वारसा हक्क प्राप्त होत असे. मुंबई बेटात ज्या ठिकाणी नीलकंठभट्टाचे मयूख प्रचलित आहे त्या ठिकाणी बहिणीलाही वारसा हक्क मिळत असे. नंदपंडित व बाळंभट यांचेही मत वरीलप्रमाणेच आहे. गोत्रज सपिंडाची विधवा व मुलगी यांचाही वारसदारामध्ये समावेश वरील टीकाकाराने केला आहे. मात्र बंगाल, बनारस, मद्रास व मिथिला या प्रदेशांत स्त्रीला मिळालेला वारसा हक्क मर्यादित स्वरुपाचा म्हणजे हयात मालकीचा आहे. महाराष्ट्रात व मुंबईमध्ये मात्र कन्यावारसाने आलेली मिळकत स्त्रीची स्वतंत्र मालकीची मिळकत म्हणजे स्त्रीधन मानलेली आहे.

स्त्रियांच्या हक्कांची स्थूलमानाने वर निर्दिष्ट केलेली रूपरेषा ब्रिटिशांचा अंमल हिंदुस्थानात चालू होईपर्यंत अस्तित्वात होती.

ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर

ब्रिटिश अंमल आल्यानंतर पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसाराबरोबर समतेचे व स्वातंत्र्याचे व बंधविमोचन करणारे विचार या देशात प्रसृत होऊ लागले. न्याय व समतेच्या पायावर नव समाजाची उभारणी केली पाहिजे, असे विचार तत्कालीन समाजसुधारकांनी जोराने पुढे मांडण्यास सुरवात केली. समाजात स्त्रीला मानाचे स्थान मिळाले पाहिजे हा त्यांच्या सामाजिक पुनर्रचनेच्या विचाराचाच एक भाग होता. स्त्रीला समाजामध्ये योग्य स्थान मिळवून देण्याकरिता स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली पाहिजे असा या समाजधुरिणांचा योग्य आग्रह होता. कायद्याने पहिला प्रहार सतीच्या अमानुष चालीवर केला व सती/जाण्यास कायद्याने मज्जाव करण्यात आला. १८५६ साली विधवांच्या पुनर्विवाहाला अनुमती देणारा कायदा मंजूर करण्यात आला. शास्त्रांचा अर्थ चुकीचा लावल्यामुळे व रूढीच्या दबावाखाली विधवांच्या पुनर्विवाहाला बंदी करण्यात आली आहे व ही बंदी शास्त्रसंमत नाही अशा तऱ्हेचे या कायद्याचे समर्थन करण्यात आले. १८७२ साली 'स्पेशल मॅरेज ॲक्ट' या नावाचा कायदा पसार होऊन जे कोणी आपण हिंदू नाही अशी घोषणा करण्यास तयार असतील त्यांना जातिबंधने बाजूस सारून विवाह करण्यास या कायद्याने मोकळीक करून देण्यात आली. १९२३ साली या कायद्यात फेरबदल होऊन हिंदू धर्माचा त्याग न करताही कोणालाही स्पेशल मॅरेज ॲक्टप्रमाणे आंतरजातीय विवाह करण्यास मोकळीक मिळाली. १९२९ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा मध्यवर्ती विधिमंडळाने हरविलास शारदा या सभासदाच्या नेतृत्वाने मंजूर केला. यालाच रूढ भाषेत 'शारदा कायदा' असे नाव मिळाले. या कायद्याने मुलीच्या विवाहाची मर्यादा १४ वर्षांपर्यंत वाढविण्यात आली. कन्यावारसाने मिळालेली मिळकत हे स्त्रीचे संपूर्ण मालकीचे धन असते हा महाराष्ट्र व मुंबई येथे प्रचलित असलेला नियम ज्या ज्या ठिकाणी मिताक्षरेचा अंमल (विज्ञानेश्वराचे भाष्य) चालू आहे तेथे तेथे लागू करावा अशा अर्थाचा कायदा १९२९ साली 'हिंदू लॉ ऑफ इन्हेरिटन्स ॲक्ट' नावाने मंजूर करण्यात आला.

१९३७ साली स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कात वाढ करणारा कायदा 'हिंदू विमेन्स राइट टु प्रॉपर्टी ॲक्ट' या नावाने पसार करण्यात आला. या कायद्यान्वये अविभक्त कुटुंबातसुद्धा विधवेला आपल्या नवऱ्याच्या इस्टेटीवरील अंश हयात उपभोगाकरता मिळू लागला. १९४६ साली 'हिंदू मॅरेज डिसॅबिलिटीज ॲक्ट' या नावाचा कायदा संमत होऊन एका जातीतील निरनिराळ्या पोटजातींमध्ये, सगोत्र व सपिंड वधूवरांमध्ये विवाह होण्यास मज्जाव असू नये अशी तरतूद करण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर काळ

१९४९ साली ' हिंदू मॅरेज व्हॅलिडिटी ॲक्ट ' या नावाचा कायदा करून अनुलोम व प्रतिलोम अशा तऱ्हेच्या सर्व विवाहांना मान्यता देण्यात आली. दरम्यान मुंबई प्रांतात द्विभार्याप्रतिबंधक कायदा व विवाहविच्छेदास परवानगी देणारा कायदा अशा तऱ्हेचे कायदे १९४६ व १९४७ साली करण्यात आले. पार्लमेंटमध्ये वारसा, विवाह, दत्तक वगैरे हिंदू कायद्याच्या सर्व क्षेत्रांत एकरूप बदल घडवून आणणारा कायदा ' हिंदू कोड ' या नावाने मांडण्यात आला. अत्यंत परिश्रम घेऊन या बिलाची कलमे डॉ. आंबेडकर यांनी तयार केली. मात्र विधिमंडळात त्या बिलाला सनातनी मंडळाकडून कडवा विरोध झाला. त्यामुळे शेवटी हे बिल मागे घ्यावे लागले. ही माघार मात्र तात्पुरती ठरली.

१९५० ची भारतीय राज्यघटना

१९५० साली भारतीय जनतेने घटना समितीच्या द्वारा एक नवीन घटना घोषित केली. या घटनेच्या उपोद्घातात आर्थिक, सामाजिक व राजकीय न्याय मिळवून देण्याची ग्वाही देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्याच उपोद्घातात व्यक्तिस्वातंत्र्य व संधीची समता या तत्त्वांची घोषणा करण्यात आली आहे. मार्गदर्शक तत्त्वे या चौथ्या परिच्छेदात सारख्या कामाला सारखे वेतन, कामाकरिता सहृदयतेने आखलेल्या सोयी व बाळंतपणाकरिता लागणाऱ्या सुखसोयी याचीही तरतूद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे वयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस स्त्री व पुरुष यांना मताचा अधिकार बहाल करण्यात आला ही होय. सारांश, घटनेने स्त्री आणि पुरुष यांचा समान दर्जा मान्य करण्यात आला. आणि अशा तऱ्हेने स्त्रीला भारतीय समाजात मानाचे व बरोबरीचे स्थान देण्यात आले.

तिच्या इस्टेटीचा वारसा कसा, कोणाकडे व किती जातो याची तरतूद करण्यात आलेली आहे. एकंदरीत वरील विधेयकाने स्त्रियांना नवऱ्याच्या व वडिलांच्या इस्टेटीमध्ये वारसा हक्काची तरतूद करून देऊन स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पाया घातला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

दत्तकाच्या कायद्यामध्येसुद्धा स्त्रियांची होणारी कुचंबणा व छळणूक यांना काट देणाऱ्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. मुलीलासुद्धा दत्तक जाण्याचा अधिकार आहे. अशी या कायद्यात केलेली तरतूद क्रांतिकारक मानावी लागेल. त्याचप्रमाणे दत्तकाच्या बाबतीत प्राचीन हिंदू कायद्याने स्त्रीवर जी अनेक कृत्रिम बंधने घातली होती ती सर्व काढून टाकण्यात आलेली आहेत.

वेश्याव्यवसायाचे निर्बंधन

त्याच साली (१९५६) संसदेने केलेल्या दुसऱ्या एका समाजहितपोषक कायद्याचा निर्देश करावा लागेल. स्त्रिया व मुले यांना अनैतिक मार्गाला लावण्याच्या ज्या निरनिराळ्या क्लृप्त्या आहेत त्यांवर निर्बंध घालणे हा या कायद्याचा उद्देश आहे. या कायद्याचे नाव 'सप्रेशन ऑफ इम्मॉरल ट्रॅफिक इन विमेन ॲन्ड गर्ल्स ॲक्ट' या कायद्याने वेश्याव्यवसायावर बंदी घातली नाही ही गोष्ट खरी आहे. परंतु कायद्याने वेश्याव्यवसायावर बंदी घातली म्हणजे हा व्यवसाय बंद होईल असे मानणे भाबडेपणाचे लक्षण आहे. दारूबंदीच्या बाबतीत आलेले अनुभव या बाबतीत अत्यंत मार्गदर्शक आहेत. ज्या कायद्याची अंमलबजावणी शासनसंस्थेला करता येत नाही किंवा जे कायदे मूलतः माणसाच्या सहज प्रवृत्तीच्या विरुद्ध आहेत, असे कायदे करण्याने लोकांना कायदा मोडायला एक प्रकारचे आवाहन केल्याप्रमाणेच होते. म्हणून सप्रेशन ऑफ इम्मॉरल ट्रॅफिक ॲक्टने आपले उद्दिष्ट मर्यादित ठेवले हे एका परीने बरे झाले. वेश्याव्यवसायावर नियंत्रण घालणे व त्याचे दुष्परिणाम कमी करणे हेच या कायद्याचे उद्दिष्ट आहे. या कायद्याचा कटाक्ष मुख्यतः वेश्यागृहावर आहे. देवळे, शाळा व इतर सार्वजनिक व्यवहार चालण्याच्या ठिकाणापासून अशा तऱ्हेची वेश्यागृहे दूर असली पाहिजेत असा कटाक्ष आहे. त्याचप्रमाणे गिऱ्हाइकांना निरनिराळ्या मार्गांने पटविण्याच्या ज्या क्लृप्त्या लढविल्या जातात त्यांना आळा घालण्याची तरतूद या कायद्याने करण्यात आलेली आहे. वेश्यागृहे कोणती हे शाबीत करणे अवघड काम असते. 'ज्या ठिकाणी वेश्याव्यवसाय चालतो ते वेश्यागृह,' अशी व्याख्या करणे सोपे आहे. परंतु वेश्याव्यवसाय चालतो हे शाबीत करणे सोपे नाही. म्हणून कित्येक वेळा बनावट गिऱ्हाईक खुणा केलेल्या नोटा देऊन वेश्यागृहात पाठविण्याची प्रथा पडलेली आहे. हा प्रकार अत्यंत किळसवाणा आहे हे उघड आहे. वेश्याकरिता असे कृत्य करायला प्रवृत्त होणाऱ्या माणसाच्या साक्षीवर कोर्टाने कितपत भरवसा ठेवायचा या प्रश्नालाही समर्पक उत्तर सापडत नाही.

१९६१ साली संसदेने हुंडा प्रतिबंधक कायदा मंजूर केला. लग्नाचा मोबदला म्हणून हुंडा देणे बेकायदेशीर आहे. असे या कायद्याने ठरविले. याही कायद्याचा उद्देश स्तुत्य आहे. पण कायद्याची अंमलबजावणी कशी करायची हा खरा अडचणीचा प्रश्न आहे. त्याच साली स्त्रियांना बाळंतपणाकरिता काही सोयी उपलब्ध करून देण्याचा कायदा पसार करण्यात आलेला आहे.

कायद्यामुळे समस्यांचा परिहार होत नाही

कायद्याने स्त्रीला दिलेले हक्क व संरक्षण यांची रूपरेषा वरीलप्रमाणे आहे. स्वातंत्र्याला, माणुसकीला व समतेला सर्वस्वी पारख्या झालेल्या स्त्रीला आज कायद्याने बरेच श्रेष्ठ व मानाचे स्थान समाजात मिळवून दिलेले आहे. कायद्यापुरतेच बोलावयाचे असेल तर स्त्री व पुरुष यांना बरोबरीचे हक्क मिळालेले आहेत असे मानावे लागते. पण निव्वळ कायद्याने स्त्रियांच्या समस्यांचा परिहार होऊन त्यांना समता प्राप्त होईल असे मानणे भोळेपणाचे आहे. समाजाच्या मनात बदल घडल्याशिवाय म्हणजे त्याचे हृदयपरिवर्तन झाल्याशिवाय व स्त्रियांना सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य पूर्णांशाने उपलब्ध झाल्याशिवाय स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त होणे सुतराम् शक्य नाही. कायद्याने घडवून आणलेल्या बदलांचे परिणाम कसे होतात व त्या परिणामाची तीव्रता कमी करण्याकरिता काय केले पाहिजे याचा उहापोह केल्याशिवाय हा लेख पूर्ण होणार नाही. म्हणून त्याचा थोडक्यात विचार खालील परिच्छेदात केलेला आहे.

लग्न व घटस्फोट — एक सामान्य नियम असा सांगता येईल की माणसाला ज्या ज्या प्रमाणात स्वातंत्र्य मिळते त्या त्या प्रमाणात त्याची असुरक्षितता वाढते. लहान मूल जेव्हा गर्भाशयात असते तेव्हा ते सर्वस्वी परतंत्र असते. आईच्या श्वासाने श्वास घ्यावा, आईच्या अन्नावर पोसावे अशा तऱ्हेची क्रिया चालू असते. परंतु ते मूल सर्वस्वी सुरक्षित असते. मूल जन्माला आले म्हणजे ते स्वतंत्र होते. पण ते असुरक्षित असते. बरीच वर्षेपर्यंत मुलाला आईवर सर्व बाबतीत अवलंबून रहावे लागते. दुसरे उदाहरण सरंजामी समाजव्यवस्थेचे देता येईल. अशा तऱ्हेच्या समाजव्यवस्थेमध्ये प्रत्येक माणसाचे स्थान निश्चित असते. सुताराचा मुलगा सुतार, लोहाराचा मुलगा लोहार, दुकानदाराचा मुलगा दुकानदार, असा क्रम वंशपरंपरा चालत असे. कोणालाही व्यवसाय बदलण्याचे स्वातंत्र्य नसे. पण प्रत्येकाला स्वतःच्या पोटापुरते काही ना काही मिळत असे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर माणसाला व्यवसाय-स्वातंत्र्य मिळाले. परंतु व्यवसाय मिळण्याची शाश्वती राहिली नाही. याचाच अर्थ स्वातंत्र्याबरोबर असुरक्षितता आली असा होतो. घटस्फोटामुळे लग्नविच्छेदनाचे स्वातंत्र्य मिळाले. पण पुनर्विवाहाचा प्रश्न अधिक बिकट झाला. घटस्फोटिता या नात्याने त्या दुर्दैवी स्त्रीवर एक प्रकारचा सामाजिक कलंक आलेला असतो. अविवाहित स्त्रीचेच लग्न होण्याची जेथे अडचण तेथे घटस्फोटितेचे काय होईल हे विस्ताराने सांगण्याचे कारण नाही. त्यातल्या त्यात

प्रस्तावना

ज्ञान व मानवी स्वातंत्र्य यांचा कार्यकारणभाव संबंध आहे. शेतीचे ज्ञान झाल्याने मनुष्य भुकेच्या व शीतोष्णांच्या बाधेतून मुक्त झाला. शरीर व बाह्य जग यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे ज्ञान जसे वाढत आहे तसा माणूस रोगांच्या बंधनातून मुक्त होत आहे. निसर्ग, मानवाचे जीवन व समाजसंघटना यांचा अर्थ जितका अधिक कळत जाईल तितके मानवी स्वातंत्र्य अधिकाधिक विस्तारत जाईल. म्हणून स्त्री अशिक्षित व पुरुष शिक्षित अशा परिस्थितीत स्त्रीचे बंधन सुटणे अशक्य आहे याची जाणीव जेव्हा समाजसुधारकांना झाली तेव्हा स्त्रीस्वातंत्र्याची क्षितिजे त्यांना दिसू लागली. अशाच एका भारतीय समाजसुधारकाला म्हणजे भारतरत्न कै. अण्णासाहेब कर्वे यांना स्त्री-स्वातंत्र्य व स्त्रीशिक्षण यांच्या प्रत्यक्ष कार्यकारणभावाचा साक्षात्कार झाला, ते अप्रतिम स्वार्थत्यागास तयार झाले व त्यांनी भारतीय स्त्रीशिक्षणाचा भक्कम पाया रचला.

१. भारतातील समाजसुधारणेच्या चळवळीचा शुभारंभ स्त्री-शूद्र दास्यविमोचनाच्या प्रेरणेने झाला. ही प्रेरणा एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बुद्धिवादावर आधारलेल्या इंग्रजी शिक्षणाने वैचारिक स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या भारतीय सुशिक्षितांना लाभली. त्यांचा विचार बंधमुक्त झाला, त्यामुळे बंधमुक्तीचे आंदोलन निर्माण झाले. सत्रा नवविचारांचे आकंठ सेवन केलेली नवीन पिढी जन्माला आली. त्यांना नवीन मूल्यांचा प्रत्यय आला, प्रत्ययामुळे स्फूर्ती प्राप्त झाली. हिंदुधर्मसंस्थेची समीक्षा पहिल्या शिक्षितांनी सुरू केली. हिंदूंच्या सामाजिक जीवनाचा प्राण हिंदुधर्म होय. या धर्माच्या गाभ्यात बुद्धिवादाने प्रकाश टाकला. धर्मदृष्टी बदलल्याशिवाय दुष्ट रूढी नष्ट होणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. अशा सुशिक्षितांमध्ये राजा राममोहन रॉय व ज्योतिराव फुले हे

सहानुभूती या स्त्रीमध्ये अंगभूत असलेल्या गुणांचा उपयोग होईल. व परिणामतः नवराबायकोची भांडणे विकोपाला जाणार नाहीत.

वारसा हक्क व आर्थिक स्वातंत्र्याची समस्या

स्त्रीस्वातंत्र्याचा व समतेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटावयाचा असेल तर स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रथमतः लग्नसंस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले पाहिजे. याकरिता वधूवरांना समान पातळीवर आणले पाहिजे. वरपक्षाने वधूपक्षाकडून हुंडा घ्यायचा ही चाल प्राचीन कालापासून अस्तित्वात आहे व हुंडा-प्रतिबंधक कायद्याने या पद्धतीला आळा बसलेला नाही. फक्त हुंडा घेण्याच्या स्वरूपात फरक पडलेला आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या असमानतेला येथूनच सुरुवात होते. विवाहानंतर स्त्रियांना काही ना काही उत्पन्नाच्या प्राप्तीची साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्त्रियांनी काही ना काही व्यवसाय करून द्रव्यार्जन केले तरच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल आणि स्त्री व पुरुष यांच्या समान दर्जाचा पाया घातला जाईल. अर्थातच स्त्रियांनी कोणते व्यवसाय करावेत व कोणते करू नयेत या बाबतीत समाजधुरिणांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने विचार करायला हवा. स्त्री आणि पुरुष यांमध्ये नैसर्गिक भेद असल्याने एकच तऱ्हेचा व्यवसाय दोघांनी करावा या म्हणण्यात काही हशील नाही. स्त्रियांचे पुरुषीकरण करणे हे शक्यही नाही व इष्टही नाही. कारखान्यातील अवजड कामे स्त्रियांनी शक्यतो करू नयेत. जेथे शारीरिक शक्तीचा वापर अधिक प्रमाणात करावा लागतो ती कामे स्त्रियांना वर्ज्य असली पाहिजेत. वैद्यक, रासायनिक प्रक्रिया, आहारविषयक व्यवसाय, शिक्षण, ललितकला, साहित्य व कायदा या क्षेत्रातील व्यवसायात स्त्रियांनी अवश्य भाग घ्यावा. संसाराला हातभार लावण्याच्या दृष्टीने व्यवसाय करायचा हा दृष्टिकोण स्त्रियांनी सतत बाळगणे अवश्य आहे. स्वयंपाक व मुलांचे संगोपन कोणी करायचे हा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होत चाललेला आहे. नोकरांची वाढत जाणारी अडचण हा एक स्त्रियांच्या व्यवसाया-मधील अडसर आहे. व्यवसाय चालू असताना मुले ठेवण्याकरिता क्रेशसारख्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत. कुटुंबनियोजनावर स्त्रियांनी अधिक कटाक्ष बाळगला पाहिजे. कुटुंब मर्यादित ठेवणे जितके आवश्यक तितकेच दोन मुलांमधील अंतर ४ ते ५ वर्षांचे राखणे आवश्यक आहे. कुटुंबनियोजन करण्याकरिता गर्भपाताला कायद्याने परवानगी द्यावी किंवा काय हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. गर्भपाताचा कायदा पुष्कळसा सैल करून गर्भपाताच्या बाबतीत काही विशिष्ट परिस्थितीत वैद्यकीय व अन्य सोयी करून देणे आवश्यक आहे. गृहिणीला वाढत्या महागाईशी तोंड देणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. जमा आणि खर्च यांची तोंडे कशी मिळवावयाची ही एक दिवसेंदिवस कठीण होत जाणारी समस्या होऊन बसली आहे. गृहकृत्याच्या बाबतीत नोकरांच्यावर अवलंबून न राहता यंत्रांच्या (गॅजेट्स) साहाय्याने सर्व कार्ये

उरकण्याची सवय लावून घेतली पाहिजे. गृहाचा गाडा चालविण्याच्या बाबतीत पुरुषांनीही स्त्रियांना हातभार लावणे आवश्यक आहे. कुटुंब चालविणे ही एक भागीदारी आहे. ही भावना स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही मनात रुजली पाहिजे. इतकेही करून महागाईशी टक्कर देता येईलच असे नाही. वाढत्या महागाईला तोंड देता यावे म्हणून काही सामाजिक सुरक्षिततेची योजना सरकारने अंमलात आणणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मानसिक उपचाराची केंद्रे व बाळंतपणाकरिता विनाखर्च सोयी शासनाने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. वरील प्रपंच विस्ताराने करण्याचे कारण म्हणजे निव्वळ कायद्याचे संरक्षण कसे अपुरे पडते हे मनावर बिंबवावे हे आहे.

बंधमुक्त स्त्री म्हणजे बंडखोर स्त्री नव्हे

स्त्रीचे दास्यातून विमोचन करणे व तिला समानतेचा दर्जा प्राप्त करून देणे याचा अर्थ तिला अनिर्बंध स्वातंत्र्य देणे असा नाही. कुटुंब व समाज या बाबतीतील जबाबदारीची जाणीव स्त्रीला करून दिल्याने स्त्री निश्चितपणे संयमाने वागेल यात संदेह नाही. सर्व नैतिक व सामाजिक बंधने ही अंतिमतः स्वयंनिर्णित बंधने आहेत. निसर्गाविरुद्ध बंड करण्याचा सल्ला जॉर्ज बर्नाड शॉ याने आपल्या सुप्रसिद्ध बॅक टू मेथ्यूसेला या नाटकात स्त्रियांना दिलेला आहे. अशा तऱ्हेचा सल्ला निराशावादातून व पराभूत मनोवृत्तीतून जन्म पावलेला आहे. वंशसातत्याची जबाबदारी निसर्गाने स्त्रीजातीवर टाकली हा स्त्रियांवर घोर अन्याय आहे, हे शॉचे म्हणणे तत्त्वतः मान्य केले तरी निसर्गनियम मानवाला मान्य असलेल्या समतावादाच्या तत्त्वाला अनुसरून बनलेले आहेत, असे मानणे म्हणजे निसर्गनियमांचे मानवीकरण करण्यासारखे आहे. वंशसातत्याच्या जबाबदारीमुळे स्त्री शारीरिक दृष्ट्या दुबळी व परावलंबी झाली ही गोष्ट खरी आहे. संस्कृतीच्या प्रारंभकाळात मातृत्वाचा गौरव होऊन मातृप्रधान कुटुंबसंस्था प्रचलित झाली अशी इतिहासाची साक्ष आहे. परंतु जीवनार्थ कलह जसजसा तीव्र होत गेला, निरनिराळ्या हिंस्र श्वापदांशी व रानटी टोळ्यांशी टक्कर देण्याची आवश्यकता अधिकाधिक भासू लागली त्यावेळेस माणसाला शक्तीची आराधना करणे भाग पडले. या आराधनेतूनच पितृप्रधान कुटुंबसंस्था, जी आजतागायत प्रचलित आहे, ती जन्माला आली. स्त्री आणि पुरुष हे परस्परांना पूरक आहेत. पुरुष हा शक्तीचा व दीर्घोद्योगाचा प्रतीक असला तर स्त्री ही सहृदयतेचे, सौंदर्याचे, विवेकशीलतेचे व समजूतदारपणाचे प्रतीक आहे. स्त्री-पुरुषसंबंध या मूलभूत जाणिवेतूनच नियंत्रित केले पाहिजेत.

पात्रतेप्रमाणे कायदा

ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो याने लोकांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना कायदे मिळतात असा सिद्धांत २००० वर्षांपूर्वी सांगून ठेवला आहे. त्यात बरेच तथ्य आहे. कायदा कसाही असला तरी अंतिमतः स्त्रियांच्या विकसनक्षमतेवर व त्यांनी प्राप्त करून घेतलेल्या

समाजातील स्थानावर त्या कायद्याची अंमलबजावणी अवलंबून राहाते. स्त्रीशिक्षण व स्त्रियांची सर्वांगीण सुधारणा या मूलभूत प्रश्नाकडे सदोदित लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्याचप्रमाणे न्याय्य तत्त्वावर समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे. समाजाचे हृदय-परिवर्तन व मनःक्रांती झाल्याशिवाय निव्वळ कायद्याने स्त्रीला तिचा योग्य दर्जा प्राप्त होणे अशक्य आहे. अस्पृश्यता निवारणाचा कायदा होऊनही व्यवहारात अद्याप अस्पृश्यतेचे उच्चाटन झालेले नाही. शारदा कायदा व हुंडा-प्रतिबंधक कायदा लोकांनी धाब्यावर बसवले म्हणून कायद्याप्रमाणेच सामाजिक आघाडीवर सुद्धा जागरुकपणे दक्षता ठेवली पाहिजे. कायदा समाजापुढे एक प्रकारचा आदर्श ठेवतो. त्या आदर्शाप्रत पोचण्याकरिता शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये स्त्रियांची उन्नती घडवून आणून त्यांची कार्यक्षमता वाढवली पाहिजे. स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न समाजाच्या इतर पददलित घटकांच्या उन्नतीच्या प्रमाणेच कठीण व दीर्घ काळ टिकणारा आहे. आपण जसजसे पुढे सरकत जाऊ तसतसे आपले ईप्सित ध्येय क्षितिजाप्रमाणे सतत अप्राप्य होत जाईल हे ध्यानात ठेवून आपण धीमेपणाने व निश्चयाने पावले टाकली पाहिजेत.

۩

१७

समाजधारणेत स्त्रीचे स्थान

मालतीबाई बेडेकर

सौ. मालती बेडेकर (कु. बाळूताई खरे) बी. ए. (जन्म १-१०-१९०५) हिंगणे येथे भारतीय महिला विद्यापीठात शिक्षण. तेरा वर्षे शिक्षिका व मुख्याध्यापिका, पुण्याच्या श्री. ना. दा. ठा. कन्याशाळेत व हिंगणे महिलाश्रम हायस्कूलमध्ये. नंतर सोलापूर गुन्हेगार वस्तीत लेडी सुपरिंटेंडेंट. विवाहोत्तर विनावेतन समाजकार्य. प्रथितयश लेखिका व वक्त्या, समाजाला हालवून सोडणारे विविध प्रकारचे (कादंबऱ्या, नाटके, प्रहसने, लघुकथा, प्रबंध, भाषांतर, वगैरे) विपुल लेखन. अनेक पारितोषिकांच्या मानकरी. ('मनुस्मृति', डेक्कन जिमखाना, पुणे ४)

आताच हा प्रश्न निकडीचा झाला आहे?

समाजधारणेत स्त्रीचे स्थान कोणते? दर्शनी हा प्रश्न निरर्थक वाटतो. स्त्रीदाक्षिण्याने गोंडस उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी प्रत्यक्षात स्त्रीचे स्थान कोणते याचे उत्तर हजारो हजार वर्षे आणि साऱ्या पृथ्वीतलावरील देशांत एकच एक आहे. (आता काही देश अपवाद झाले आहेत.) ते उत्तर हे: प्रजोत्पादन व अपत्यसंगोपन हे निसर्गाने लावलेले काम व पुरुषप्रणीत आचारधर्माने लावून दिलेली गृहकर्तव्ये या दोहोंमुळे प्रत्यक्षात जे असेल ते स्त्रीचे सामाजिक धारणेतील स्थान.

आजवर या विषयावरील चर्चा स्त्रियांचा उद्धार करणारांनी तळमळीने केली असली, किंवा इतरांनी फावल्या वेळची करमणूक म्हणून केली असली तरी आता एका तऱ्हेच्या अशा काही क्रांतीची चाहूल येते आहे की यापुढे वरील प्रश्नाचे उत्तर अविचाराने देऊन चालणार नाही. छचोर उत्तर देऊन चालणार नाही. काळकाढूपणानेही उत्तर देऊन चालणार नाही. इतकी निकड या प्रश्नाची आहे.

भारतीय घटनेने स्त्रीपुरुषांना समान संधी, समान हक्क इत्यादी दिल्याने स्त्रीला आता कोणत्याही क्षेत्रात काम करण्याला प्रतिबंध नाही. तिचे समाजधारणेतील स्थानही पुरुषाच्या बरोबरीचे राहील असे वाटण्याचा संभव आहे. एवढेच नव्हे तर कित्येकजण आता विचारतातही की आता सारे मिळाल्यावर स्त्रियांची रड कशासाठी! आता बायकांचे प्रश्न नि बायकांची दुःखे राहिली तरी कोठे!

हा प्रश्न विचारणाऱ्यांच्या एक गोष्ट लक्षात येत नसावी. कागदोपत्री मिळालेली समानता ही खरोखर पदरी पडण्यासारखी परिस्थिती नाही. मृगजळाप्रमाणे माणसे सुखाच्या मागे लागतात आणि सुखी तर जगात कुणीच नसते हे जरी खरे, तरी साऱ्या जगातील बायकांची एकच रडकथा कां? त्यांचे समाजधारणेतील आसन हे आळवावरच्या पाण्यासारखे आहे काय? ते तसे असण्याचे कारण काय?

हजारो वर्षे समाजातील तिसऱ्या श्रेणीतील स्त्रियांचा फार प्रचंड वर्ग प्रजोत्पादन, अपत्यसंगोपन, गृहकर्तव्ये आणि घराबाहेरही पोटासाठी काबाडकष्ट करीत आला आहे. मध्यमवर्गीय कित्येक स्त्रिया घराबाहेर काबाडकष्ट पूर्वी करीत नव्हत्या. त्याही आर्थिक परिस्थितीमुळे, शिक्षणाने बुद्धी जागी झाल्याने, घराबाहेरची कामे करण्याच्या हौसेने किंवा सामर्थ्याने प्रजोत्पादन, अपत्यसंगोपन, गृहकर्तव्ये व नोकऱ्या करू लागल्या आहेत. श्रीमंत वर्गातील स्त्रिया प्रजोत्पादन करतात आणि कित्येक अपत्यसंगोपन व गृहकर्तव्ये ही मोलाने करवून घेतात. त्यांच्यापैकी अर्थार्जनासाठी फार थोड्या बाहेर पडतात. पण 'समाजकार्य' या नावाची कार्ये करण्यासाठी किंवा दिवस काढण्यासाठी किंवा शोभेसाठी बाहेर पडतात. त्या फार थोड्या असतात. पण या तिन्ही वर्गांस अर्थार्जनाची मुभा गेल्या पंचवीस चाळीस वर्षांत मिळाली असली तरी स्त्रीला अश्मयुगानंतर थोड्याच काळात चिकटलेली कामे तशीच्या तशीच राहून बहुसंख्य स्त्रियांवर तिहेरी जबाबदारी पडत आहे. त्याबद्दल समाजातील फार थोड्यांना सहानुभूती असते. तिसऱ्या श्रेणीतील लाखो स्त्रिया हजारो वर्षे घरात व घराबाहेर काबाडकष्ट करीत आल्या तरी त्याबद्दल समाजाने कधी चर्चा केली नाही. पण मध्यमवर्गातील स्त्रिया तेच करू लागल्याबरोबर सर्वत्र चर्चा सुरू झाल्या. विवाहित स्त्रियांनी नोकऱ्या कराव्या की नाही, नोकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांचे संसाराकडे दुर्लक्ष होते, विवाहित स्त्रिया घराकडे लक्ष असल्याने नोकरी नीट करीत नाहीत, अर्थार्जनाची स्त्रियांना चटक लागून त्या चैनबाज होतात, सुशिक्षित स्त्रिया संसाराला लायक नसतात, सुशिक्षित स्त्रियांना मुलांवर संस्कार करता येत नाहीत, सुशिक्षित स्त्री सुखी आहे का? हे नि असले विषय सतत चर्चेला येतात. हजारोंनी स्त्रीपुरुष त्या ऐकायला येतात. जणू काय साऱ्या स्त्रिया बुद्धिजड होऊन घरात राबत होत्या तेव्हा सुखी होत्या, उत्कृष्ट संसार करीत होत्या, चैनी नव्हत्या.

स्त्रीचे स्थान सतत दुय्यम राहिले

या साऱ्या प्रश्नांची चर्चा वारंवार होत असते याचे कारण पुरुषप्रधान समाजात स्त्रीच्या प्रतिबंधाला जे तडे जात आहेत ते समाजाला मानवत नाहीत. स्त्री आणि पुरुष हे घटक पूर्वी अविरोधाने नांदत असल्यासारखे दिसत, कारण स्त्रीची मुस्कटदाबी आचारधर्मांनी करून ठेवली होती. ती नाहीशी होत चालल्यावर स्त्री व पुरुष अविरोधाने प्रत्यक्षात नांदत नाहीत, हे सत्य बाहेर पडू लागले.

घटनेने दिलेले हक्क, रूढीने बनवलेली मनोवृत्ती आणि प्रत्यक्ष भोवती असणारी

परिस्थिती या सर्वांचा आपसांत विरोध असल्याने स्त्रीपुरुषांतील वेद्रिली खोलकी होऊ लागली आहे.

प्रत्येक पुरुष — मग तो मजुरी करणारा मजूर असो की मंत्री असो — आपल्या घरात तो 'राव' असतो. स्त्रीला शब्दांनी घरात राज्ञीपद दिले असले, तिला आपल्या-बरोबर मिरवली, तरी हे पुरुषाचा अहंकार दुखवला जात नाही तोपर्यंतच. कोणत्याही सामाजिक थरात पुरुषाचे 'रावा'चे स्थान दुखवले गेले, त्याचा अहंकार दुखवला गेला तर स्त्रीला मिळालेले राज्ञीपद पत्त्यांतील राणीच्या किंमतीचे होते. समाजातील बहुसंख्य कनिष्ठ वर्गात सर्व तऱ्हांनी कावाडकष्ट करणाऱ्या, पुरुषाच्या बरोबरीने मोलमजुरीने पैसा घरात आणणाऱ्या स्त्रीला पुरुषाच्या अहंकारामुळे मारपीट होत असते. मध्यमवर्गातील स्त्रीला कदाचित मारपीट होत नसेल. पण तिहेरी जबाबदारी घेऊनही पुरुषाचाच अहंकार फुलवावा लागतो. न फुलवल्यास तो घर मोडायलाही तयार असतो. हजारो हजार वर्षे पुरुषाचे स्थान पुरुषप्रधान समाजात श्रेष्ठ ठरले आहे. स्त्रीचे नेहमीचे दुय्यम ठरले आहे. ते का?

परिणाम : स्त्री काचली जाते

स्त्रिया शिकल्यानंतर त्यांच्याकडून अपेक्षा मात्र वाढल्या. पण त्यांचे स्थान दुय्यमच राहिले. अर्थार्जन करणाऱ्या पुरुषाला घरातून कित्येकदा नोकरीनिमित्त, धंद्या-निमित्त घरापासून दूर जावे लागते, घरात असला तरी नोकरीधंद्यात त्याचा फार वेळ जातो, किंवा तो आळशी असतो; किंवा जबाबदारी घेऊ इच्छीत नाही, म्हणून मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी स्त्रीवरच पडते. शिक्षणाने तिने हे करावेच अशी समाजाची अपेक्षा असते, परंतु मुलांवर संस्कार हे फक्त आईनेच करून भागत नाही. तिला पित्याची, शिक्षकाची, अवतीभवतीच्या सुसंस्कृत वातावरणाची साथही मिळावी लागते हे फारसे कोणी लक्षात घेत नाही. लहान घरे, अपुरा पैसा, वाढत्या गरजा, तळमळीशिवाय दिलेले शिक्षण, समाजातील सर्व थरांतील अनाचार यांमुळे आई असमर्थ ठरते. पुरुष नोकरी करतो आणि ही स्त्री नोकरी करून शिवाय घरातील जबाबदारी उचलते. तरी पुरुषी अहंकारालाच तिला जपावे लागते. समाजालाच नव्हे तर तिलाही पुरुषी अहंकाराला फुलवीत राहणे हे अगत्याचे वाटत असते. याचे फार गूढ कारण आहे. पण यामुळे ती काचली जाते. समाजाची धारणा या सतत असलेल्या असमाधानाने होऊ शकत नाही. कारण हा कनिष्ठ व मध्यमवर्गीय स्त्रियांचा कोंडमारा निराळे रूप घेतो. त्यांना स्वतःच्या गौरवाची कोणतीच भावना पोसता येत नसल्याने उत्तेजनरहित निर-पेक्षपणे राबणे ही पुरातन काळातील परिस्थिती तशीच चालू असल्याने स्त्रियांची मने कळाहीन होत जातात. रटाळ आयुष्यात राबत राहून सक्तीने मुक्या होऊन बसलेल्या स्त्रिया आता गप्प बसत नाहीत. त्या किरकिरतात, कजाग बनतात, रडतात, त्रागा-वतात, विनशुद्धाचे वाद घालतात, क्षणभर स्त्रियांचाच वरचष्मा पुरुषांवर आहे असा

भास होऊ लागतो. नव्हे अनेक घरांतून गरीब स्वभावाच्या पुरुषांवर या आत्मगौरव नष्ट झालेल्या स्त्रिया, असमाधानी, तोल गेलेल्या स्त्रिया, चांगला सूड घेतानाही दिसतात.

केवळ हजारो वर्षे डांबून पडल्याने स्त्रिया पुरुषाच्या मानाने संकुचित मनाच्या, कमी ज्ञानी, कमी अनुभवी, तोटक्या बुद्धीच्या नि अदूरदृष्टीच्या होऊन बसलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचा चाललेला थयथयाट पुरुषाला अविवेकाचा वाटतो. घरातल्या घरातही सल्लामसलतीला त्या पुरेशा लायकीच्या नाहीत असे पुरुषाला वाटू लागते. उलट, गौरवास्पद म्हणून स्त्रियांच्या माथी मारलेली कामे रटाळ, जिगजिगीची, वक्तशीरपणा नसलेली, ती करूनही कुणाला त्यांची काडीइतकी किंमत नसलेली अशी वाटून त्याने आराम शय्यासोबतीण आणि मोलकरीण झाल्याची भावना स्त्रियांना येते. याचे कारण एकच. ते म्हणजे, 'सेक्स'. समाजधारणेच्या संदर्भात 'सेक्स'चा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

वेदिलीच्या इतिहासाचे पहिले पर्व

घटनेने कितीही समानता दिली असली तरी माणसांच्या श्रद्धा, विश्वास, अपेक्षा या परंपरेत, रुढीत रुजून पडलेल्या असतात. त्यामुळे समानता ही कागदोपत्री असते आणि प्रात्यक्षिक हे वरीलप्रमाणे सुरू असते. त्यामुळे निसर्गनिर्मित अशा या दोन जातींत निर्माण झालेली वेदिली आता झाकापाक करून छपवण्यासारखी राहिलेली नाही. हे सारे असे का याचा विचार फार निराळ्या रीतीने करायला हवा आहे. वाटते तसे केवळ वरवर हक्कांचे हे भांडण नाही. हे सेक्समुळे निर्माण झालेले भांडण आहे. अश्मयुगापासून अणुयुगापर्यंत या वेदिलीच्या इतिहासाची प्रमुख दोन पर्वे आहेत. त्यांची स्थूलपणे थोडक्यात रूपरेखा सांगून मग पृष्ठांच्या मर्यादेत त्याबद्दल विचार करण्याचे योजले आहे. (१) प्रजोत्पादन हे केवळ निसर्गाच्या हाती असण्याचे एक पर्व आणि (२) प्रजोत्पादन हे माणसाच्या हाती आल्यानंतरचे दुसरे पर्व. या दोन पर्वांचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

समाजधारणेतील स्त्रीचे स्थान हे शिक्षण, अर्थार्जन यांमुळे केवळ ठरणारे नाही. त्यामुळेच स्त्रीपुरुषांतील वेदिली असूनही तिचा अर्थ लागत नाही. स्त्रीचे स्थान हे प्रजोत्पादनामुळेच ठरणारे आहे.

१. प्रत्यक्ष प्रजोत्पादनाची क्रिया ही निसर्गाने स्त्रीच्या मागे लावली.

२. मानवप्रणीत संस्कृतीने समाजधारणेसाठी विवाहसंस्था काढली. विवाहबाह्य प्रजोत्पादन झाल्यास ते गर्ह्य ठरवले आणि असे प्रजोत्पादन करणारी स्त्री नीच ठरवली. पुरुषालाही विवाहबाह्य प्रजोत्पादन करण्यास प्रतिबंध केला असला तरी त्याने प्रजोत्पादनात लावलेला हातभार कळण्याची शक्यता नसल्याने तो उजळ माथ्याने राहण्यास त्याला निसर्गाने हात दिला. उलट निसर्गाने स्त्रीचे 'पाप' चव्हाट्यावर आणले.

३. स्त्रीपुरुष ही निसर्गाने एकमेकांच्या आकर्षणासाठीच निर्माण केल्याने ते आकर्षण टळावे म्हणून समाजधारकांनी स्त्री व पुरुष यांना जास्तीत जास्त नियमनांनी दूर ठेवले. प्रजोत्पादन विवाहबाह्य होऊ नये म्हणून स्त्रीच्या स्वतंत्र संचाराला पायबंद घातला गेला.

४. स्त्रीचे प्रमुख कार्य प्रजोत्पत्ती. ती विशुद्ध असायला हवी यासाठी विवाह झाल्यावर स्त्रीच्या चारित्र्याचा रखवालदार पुरुषाला केले. तिच्यावर लग्नाचे बंधन घालून तिला अर्थार्जनाची व शिक्षणाची बंदी केली. तिचे जिणे सर्वस्वी पुरुषावर अवलंबून ठेवले.

५. मिळवत्या पुरुषाच्या मिळवतेपणाची किंमत खूप झाली आणि अर्थाबाबत सर्वस्वी लाचार करून ठेवल्याने स्त्री केवळ शय्यासोबतीण आणि दासीमोलकरीण, पण नवऱ्याच्या प्रेमामुळे यापेक्षा निराळ्या नावाखाली घरात स्थानापन्न झाली. नवऱ्याचे प्रेम नसल्यास उघडपणे तेच स्थान तिला मिळत गेले. इतरत्र दासीच्या कष्टाचे पैशांत मोल होत असले तरी घटकेत राणी आणि घटकेत पत्यांतील राणीही नाही अशी स्त्रीच्या काबाडकष्टाचे मोल पैशात करण्याइतकीही त्या कष्टांना किंमत राहिली नाही.

या प्रथम पर्वाची अखेर म्हणून स्त्रीला अनेक नाजूक गुण चिकटले, तिचे मन कुजले. 'वीरप्रसू' या नावाखाली वैध प्रजोत्पादन हेच तिचे मुख्य काम व त्याला आनुषंगिक म्हणून घरातील सर्वांची निमूट सेवा हे दुय्यम काम अहोरात्र करण्याचे असे ठरले. स्त्रीच्या या कामाला सोईचा असा मुलगी, सून, बायको, आई या नात्यांनी तिने पाळावयाचा आचारधर्म घालून दिला गेला.

हे पर्व अश्मयुगात सुरू झाले आणि अणुयुगाची चाहूल लागण्यापूर्वी न्हावाला लागले.

आता दुसरे पर्व अवतरत आहे

आता 'बहुप्रसवा' स्त्री हास्यास्पद ठरू लागली. प्रजोत्पादनाची किंमत फारच घटली. कारण अमर्याद लोकसंख्येने जगावर उपासमारीचे संकट कोसळू लागले. यापूर्वीच समाजाची कुचंबणा झाल्यामुळे स्त्रियांना शिक्षण मिळू लागले. अर्थार्जन पूर्वी करीत नव्हत्या त्यांना ते करण्याची सवड मिळाली. कित्येकांना अर्थार्जन करणे भागच पडू लागले. अर्थार्जन करू लागणाऱ्या स्त्रीने विवाहसंस्थेने आणलेल्या गुलामगिरीला जबरदस्त धक्का दिला. स्त्री-पुरुषांच्यात अनाचार होऊ नये म्हणून ज्या तटबंद्या उभय गोटात घातल्या होत्या त्या ढासळू लागल्या. मूलतःच आकर्षणासाठी निर्माण केलेली स्त्री-पुरुषांची जुनी नीतिबंधने कालून तुटू लागली. अवैध प्रजोत्पत्ती करणाऱ्या स्त्रीला आत्मघात करावा लागे. त्याऐवजी अवैध प्रजा वराबाहेर ठेवण्याच्या सोयी झाल्या. पण अवैध प्रजोत्पादन हे अजून समाज गर्ह्य मानीत असल्याने स्त्रीपुरुषसंबंध चोरटेपणाने होऊ लागले. याच सुमारास अमर्याद लोकसंख्या हटवण्या-

साठी संततिनियमनाची साधने निर्माण करून गर्भपाताने माणसाने निसर्गाला दावण घातली. हे नवे पर्व सुरू झाले आहे. ते क्रांतिकारी आहे. त्यात स्त्रीपुरुष जुन्या विवाहसंस्थेला आणखी धक्के देण्याची चिन्हे दिसत आहेत. स्त्रीपुरुषसंबंधाची भीती नष्ट होण्याची शक्यता दिसू लागली आहे. याचा परिणाम म्हणून आजवर अवैध प्रजोत्पादनाच्या भीतीने दडपणात राहिलेली स्त्री निर्भय होण्याच्या मार्गावर आली आहे. कायद्यांनीही स्त्रीपुरुषांतील विषमतेला कक्षात आणले आहे.

स्थूलमानाने प्रजोत्पादनाची ही दोन पर्वे लक्षात घेऊन समाजधारणेत स्त्रीच्या स्थानाबद्दल विचार करणे भाग झाले आहे. तो विचार केल्यानंतर शेवटी विचार करावयाचा तो हा की समाजात लग्न करून पुरुष आजवर गैर संबंधाला पूर्णपणे मोकळा होता. आता प्रजोत्पादनच खुंटवणे शक्य झाल्यास स्त्रिया गैर संबंधाला पूर्णपणे मोकळ्या होतील. यानंतर समाजधारणेत स्त्रीचे स्थान सर्वस्वी पुरुषाच्या समान—बरोबरीचे झाले, तर सर्वत्र आनंदीआनंद होईल काय ? पुरुषप्रधान समाज न राहता स्त्रीपुरुषांची समानता असलेला समाज तोल घेईल काय ? आणि तो कसा ? हा विचार महत्त्वाचा आहे. तो शेवटी करू.

स्थूलपणाने जी दोन प्रजोत्पादनाची पर्वे सांगितली त्यांचा क्रमाने काहीसा बारकाईने इतिहास पाहिला पाहिजे.

आरंभीची मातृवंशपद्धती पुढे ढासळत चालली

रानटी अवस्थेत कोणतेच ज्ञान नसताना भूक लागली की 'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाने शिकार करून माणूस जगत होता. तेव्हा स्त्री आणि पुरुष यांच्यात आकर्षण नव्हते असे नाही. ते विचित्र आकर्षण सातत्यासाठी पिंडाचे ठिकाणी ठेऊनच स्त्री आणि पुरुष निसर्गाने जन्माला घातली. पण या आकर्षणातून पुढे प्रजोत्पत्ती होते हे माणसाला कळत नव्हते. स्त्रीला मूल होते एवढे स्त्रीपुरुषांना कळत होते. त्यामुळे मूल हे स्त्रीचे. मुले, मुलांची मुले हा सारा संततिप्रपंच स्त्रीचा. ती नाजूक आहे, कोमल आहे, रक्षणीय आहे इत्यादी गोडस कल्पनांचा उदय नसल्याने प्रजोत्पादनामुळे तिच्या शिकारीला जाण्यात कायमचा अडथळा उत्पन्न झाला नाही. तीच शास्ती होती. प्राथमिक अवस्थेत निसर्गाच्या सरळ नियमांनी *मातृवंशपद्धतीच निर्माण झाली.*

स्त्री आणि पुरुष यांच्या संबंधातूनच मूल होते हे कळल्यावर उत्पन्न होणाऱ्या प्रजेबाबत निर्मात्यांची दृष्टी बदलली. स्त्री हे क्षेत्र आहे. पुरुष हा क्षेत्री आहे. क्षेत्री नसेल तर क्षेत्र काय करील या न्यायाने क्षेत्र्याने आपले श्रेष्ठत्व गळी उतरवले. क्षेत्रावाचून क्षेत्री तरी काय करील हा उलट प्रश्न मध्येच जिरला असावा. वास्तविक प्रजोत्पत्ती ही स्त्री-पुरुष या दोघांमुळे होते तेव्हा निर्माण झालेली बहुमोल प्रजा ही दोघांना समानस्थान देणारी ठरावयास हवी. पण तसे झाले नाही. आकर्षणापोटी स्त्रीने याला

हरकत घेतली नाही की अन्य काही कारणांनी हे घडले हे कळणे कठीण आहे. स्त्री असमर्थ आहे, तिला शक्तीची कामे होत नाहीत, हे स्वतंत्रतेच्या काळी खरे नव्हते! काही पुरुष अशक्त तशा काही स्त्रिया अशक्त. शेतीत राबणारी, घरकाम करणारी, गरीब स्त्री ही प्रासादात निरुपयोगी बसलेल्या स्त्रीपेक्षा कष्टाच्या सवयीनेच सशक्त असते. स्त्री-स्त्रीतही परिस्थितीने आणि सवयीने हा फरक पडतोच. प्राथमिक अवस्थेत स्त्रीच्या दुबळेपणाची कल्पना दृढमूल होण्याचे काहीच कारण नव्हते.

कची शिकार भाजून खाण्याचा शोध लागून घर, घरात संग्रह करणे, तो राखीत बसणे या कल्पनांतून स्त्रीचे घराशी नाते जुळले की काय कोण जाणे. पण एवढे खरे की हळूहळू मातृवंशपद्धती नष्ट होऊन पितृवंशपद्धती सुरू झाली. पुरुषाची श्रेष्ठता सिद्ध झाली. समाज पुरुषप्रधान झाला. पुरुषाने कायदे केले. पुरुषाने अंमलबजावणी केली. कायदा मोडणारांना पुरुष शिक्षा करू लागला. समाजधारणेची चौकट त्याने ठरवली.

पुरुषाची श्रेष्ठता प्रस्थापित झाली

समाजधारणेला पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे प्रजेची उत्पत्ती आणि प्रजेचे सातत्य. हे सातत्य स्त्रीमुळेच राखले जाते असे नसले तरी क्षेत्री म्हणून स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या पुरुषाने प्रजेच्या सातत्याचे श्रेय स्त्रीला दिले. समाजधारणेतील एक महत्त्वाचे कार्य ती करते असा तिचा गौरव केला आणि गृहराज्ञी म्हणून तिची घरात स्थापना केली.

टोळ्याटोळ्यांनी समाज वाढत असता त्यांच्यात लढाया होणे अटळ होते. त्या अटळ लढायांतूनही स्त्रीचे स्थान ठरले. पुरुषाला वासनांमुळे प्रेमामुळे स्त्री हवी असते. तशीच शत्रुपक्षातील पुरुषाला द्वेषापोटी चुरडून टाकायलाही ती हवी असते. स्त्री आणि पुरुष यांच्यात निसर्गाने असे काही आकर्षण उत्पन्न केले आहे की त्यात जोपासनेची भावना आणि गिळंकृतीची भावना ही दोन्हीही आहेत. स्त्रीपुरुषसंबंधात पुरुषाची समर्थता आणि करणात्मक प्रवृत्ती असते आणि स्त्रीची असहायता आणि अकरणात्मक प्रवृत्ती असते. अशा परस्परांपेक्षा भिन्न असलेल्या प्रवृत्तींनीच रतिसुख दम्पतींनाही मिळते. स्त्रीला अकरणात्मक प्रवृत्तीमुळे तिला हवे असेल तेव्हा पुरुषाकडून सुख मिळेल असे नाही. पण पुरुषाला हवे असेल तेव्हा स्त्रीच्या खुशीनाखुशीव्यतिरिक्तही पुरुष स्त्रीसुख मिळवू शकतो. या त्याच्या प्रवृत्तीमुळे टोळ्या टोळ्यांत होणाऱ्या लढायांत शत्रुपक्षाची हानी करताना त्यांच्या स्त्रियांवर सूड घेऊन त्यांचा अपहार केला जाई. उपभोगाचे आकर्षण असलेल्या पुरुषाने आपल्या स्त्रिया शत्रूपासून संरक्षित ठेवण्यासाठी स्त्रीला घरात रक्षणीय म्हणून ठेवली आणि पुरुषाच्या उपभोगाचे आकर्षण असलेल्या स्त्रीने ते संरक्षण मानले. हे सर्व आपुलकीच्या पोटी झाले असे मानणे कठीण जाणार नाही. हजारो हजार वर्षांच्या मानवाच्या इतिहासात लढाया सतत होत असल्याने

स्त्री ही सइकन्या शत्रूच्या हाती न लागता तिचे रक्षण व्हावे यासाठी घर हे तिचे आश्रयस्थान ठरले असावे.

ज्या घरात स्त्री राहू लागली तेथील कामे ती करू लागली. प्रजोत्पादन निसर्गानेच तिच्याकडे दिले होते. उत्पन्न झालेल्या प्रजेचे संगोपन तिच्याकडेच आले हे सारे क्रमप्राप्त झाले. परंतु लढाया नसतील तेव्हा ती पुरुष करीत असतील ती कामे करीत नव्हती असे मुळीच नाही. उलट ओझी वाहणे, शिकार करणे, शेतकामात सहभागी होणे हे स्त्री नेहमी करीत आली आहे. असे असताना आणि शत्रू नसताना तिच्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडल्या त्या का हा प्रश्न पडतो. तेव्हा स्त्रीची बरोबरी का मानली गेली नाही ?

टोळ्यांचे नेतृत्व लाभलेल्या पुरुषाने केवळ रतिसुखाच्या वेळी त्याची असलेली करणात्मक प्रवृत्ती ही स्वतःच्या श्रेष्ठतेचे गमक मानली हेच त्याचे उत्तर आहे. स्त्रीची इच्छा नसताना स्वतःच्याच केवळ इच्छेने तिच्यावर बळजबरी करता येते, तिला नामोहरम करता येते. हे राकट मनाच्या अवस्थेत असलेल्या टोळीतील पुरुषांना उमगले. त्यामुळे स्त्री ही त्याची भोगवस्तू ठरली. एकाच्या स्नायूंची समर्थता व दुसऱ्याची असमर्थता यामुळे वर्चस्वाची भावना उफाळल्यावर स्त्रीच्या असमर्थतेचा तुच्छतेने उद्धार करण्याची पुरुषांना सवय लागली ती आजतागायत. या तुच्छतेत आणि असमर्थतेतच स्त्रीचे घरात या समाजात दुय्यम स्थान कायमचे ठरले असावे. दरवेळी तिच्या असमर्थतेच्या जाणिवेतून तिचे घराबाहेरील स्वातंत्र्य मर्यादित होत गेले असावे. एरवी मातृवंश पद्धतीत समर्थ मानली जाणारी स्त्री कायमची असमर्थ ठरण्याला दुसरे सयुक्तिक कारण दिसत नाही.

बळजबरीवर सुकुमार भावनांचे आवरण

पुरुषाला स्त्रीबद्दल तुच्छता होती तसे आकर्षणही होतेच. तिच्यावाचून पुरुषाला किंवा पुरुषावाचून स्त्रीला जगणे अशक्य आहे हे दोन्ही जातींनी ओळखले होते. त्यामुळे अत्यंत संमिश्र भावनेने त्या दोघांत श्रमविभाग होत गेला. सोपी कामे स्त्रीने करावी, आपण धकाधकीच्या जगात राबून सर्वांच्या पोटाची व्यवस्था करावी ही भावना पुरुषाची होती असा इतिहास नाही. जड अवघड कामे स्त्रिया करीत होत्या. आजही बहुसंख्य समाजात त्या करीत आहेत. पण मनुष्याचे मन हे संस्कारशील असल्याने ओबडधोबड राकट मनातून सुसंस्कार उमटले. हळूहळू त्या सुसंस्कारांत वागणुकीचा राकटपणा जाऊन तिला मार्दव येऊ लागले. काव्यमयता आली. सुकुमार भावनाचा उदय झाला आणि स्त्रीपुरुषांतील राकट आकर्षणालाही सुंदर अभिव्यक्ति लाभली. त्यात वर्चस्वाची भावना तळाशी राहिली आणि प्रेमाचा गुलाबी रंग वर आला. त्यातच स्त्री ही नाजुक आहे, तिचा देह नाजुक, वाणी नाजुक, तिला राकट कामे होणार नाहीत, तिच्या सौंदर्याला भूषणांनी शोभा येते. सुंदर वस्त्रप्रावरणांनी शोभा येते. ती प्रेमळ आहे. तिने घराच्या सावलीत

राहावे, उन्हाच्या तिरिपीने ती घाबरीघुबरी होईल, बाहेरच्या जगातील दुष्ट वारे झोंबले तर तिला ते सहन होणार नाही अशा नाजुकसाजुक कल्पनांचा फुलोरा सुसंस्कृत पुरुषाने फुलवला आणि त्या फुलोऱ्याने धुंद झालेल्या स्त्रीने जगाकडील दारे बंद करून घरात स्वतःला बंदिस्त ठेवण्यास राजीखुषीची संमती दिली. उघड्या राकट आकर्षणातून सुसंस्कारित आकर्षणापर्यंत कोणकोणत्या टप्प्यांनी माणसे आली हे सांगणे कठीण आहे. परंतु आकर्षणातील उदात्तता, लोलुपता यांनीच स्त्रीचे समाजधारणेत दुय्यम स्थान ठरले. तिला कारण नसताही कित्येक गोष्टींमध्ये प्रतिबंध झाला, आणि केवळ रटाळपणे तीच ती कामे युगानुयुगे करण्याचे तिच्या नशिबी आले. ती स्त्री जगाच्या ज्ञानाला, जगाच्या अनुभवाला पारखी झाली. तिचे त्याच त्या गोष्टींचे चर्वितचर्वण किंवा रवंथ करीत बसणारे मन संकुचित झाले. मासिक पाळी, गर्भारपण, बाळंतपण, पतीचे आकर्षण एवढ्याच तिच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना ठरल्या आणि त्या लहानशा जगातील क्षुद्र हेवेदावे, क्षुद्र विषय, क्षुद्र भावनाच ती चविष्टपणे चाखू लागली. शृंगाररसासाठी राखून ठेवलेल्या या बाहुलीच्या जीवनात संकुचितपणामुळे क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सरांनी वरीच पोखरापोखर केली. आणि तेच तिचे घरातील राजकारण तिला घेरून बसले. तिचे स्त्रीमन अनेक विरोध विसंगती घेऊन बसले.

स्त्रीच्या स्त्रीत्वाचा हा इतिहास कसकसा केव्हा केव्हा घडत गेला हे सांगता आले नाही, तरी पृथ्वीच्या पाठीवरील साऱ्या पुरुषजातीने साऱ्या स्त्रीजातीला घरात बंदिस्त केले ते एकाच तऱ्हेने. ती संकुचित, व्यवहाराला पारखी ठरली ती एकाच तऱ्हेने, शिक्षणाला पारखी झाली ती तिच्या स्त्रीत्वामुळेच आणि असहाय स्त्रीत्वाचा फायदा घेऊन पुरुषप्रधान समाज उदयाला आला. अश्मयुगापासून विसाव्या शतकातील आजच्या दिवसापर्यंत कोणत्याही आर्थिक स्थितीतील, कोणत्याही सामाजिक पातळीतील, कोणत्याही रांगड्या वा उत्कृष्ट संस्कृतीतील सर्व स्त्रियांची एकच जात आणि त्यांचे काम एकच एक. पुरुषांचे असे झाले नाही. सर्व पुरुषांनी अनेकविध धंदे केले. जीवनाची विविधता भोगली.

मानवाचा विकास साधण्यास स्त्री खरोखर असमर्थ होती का ?

आजवरच्या सर्व मानवी विकासाचे श्रेय हे पुरुषजातीला आहे. निसर्गाची गूढे उकलून माणसाने निसर्गावर मात करण्याचा जो प्रयत्न केला त्यात हरएक पुरुष सहभागी होता असे मुळीच नाही. बहुसंख्य पुरुषांनी सर्वसामान्य आयुष्य घालवले हेही खरे. तरी काही थोड्या पुरुषांनी जे केले ते स्त्रीला कधीच करता आले नाही. पृथ्वीच्या पाठीवर निसर्गाच्या पार्श्वभूमीवर चिरंतन स्वरूपाचे अनंत तऱ्हांचे शिल्प माणसाने केले, केवळ दगडधोंड्यातून, बिकट जंगलातून, बिकट दऱ्याखोऱ्यांतून माणसाच्या संस्कृतीचा सारा इतिहास मूर्तस्वरूप घेऊन ठाकला आहे, तो पुरुषप्रयत्नांनी. त्यानेच शास्त्रे उदयाला आणली. त्यानेच समाज घडवले. यात प्रजाजननाखेरीज स्त्रीचा काय भाग हे

सांगणे कठीण आहे. पुरुषाला घरात स्त्रीने प्रेरणा आणि सुख दिले म्हणून हे घडू शकले असे सांत्वन केले तरी त्यांतील सत्य पटायला जड जाते. निसर्गाशी झगडणारा, त्याची गूढे उकलणारा पुरुष हा त्या नादब्रह्मात आवतभोवतही विसरला असण्याचीच जास्त शक्यता. त्याशिवाय हा एवढा पराक्रम त्याच्याने झालाच नसता. त्या त्या काळी त्याने स्त्रीसुख व इतर सुखे भोगलीही असणार; पण त्याला भान होते ते त्याच्या नादाचे, ध्येयाचे. त्याने मानवाच्या विकासाला अखंड गती दिली.

पुरुषजातीने निर्माण केलेले हे मानवी शिल्प, त्याने साधलेला हा विकास पाहिला की सतत जननक्रियेत, अपत्यसंगोपनात आणि घराच्या चार भिंतींत गृहकर्तव्ये करीत बसलेली स्त्री ही जड शिळा झाल्यासारखी वाटते. ज्या प्रजेच्या सातत्याला ती जुंपून पडली त्या प्रजेने तिचे नावही कधी लावले नाही; जो धर्म उदयाला आला त्यासाठी जे होमहवन झाले तेथे रांधून वाढून उष्टी काढूनसुद्धा तिला बुद्धीने मंत्रोच्चारही करण्याची मुभा राहिली नाही. एकमेव कामाला जुंपलेल्या स्त्रीचे जीवन असे काही धर्मरज्जूंनी बांधले गेले की निरपेक्षपणे, सोशिकपणे, हसऱ्या चेहऱ्याने रटाळ आयुष्य काढण्यानेच ती श्रेष्ठ ठरली. खरोखरच कोणतीही स्त्री पुरुषाने केलेला विकास करण्यास असमर्थ होती का ? निसर्गाकडून एक गर्भाशय मिळाल्यामुळे खुल्या जगातील कोणताही व्यापार, व्यवहार स्वतःच्या बुद्धीने करण्यास ती असमर्थ झाली असेल का ?

इतर दलितांपेक्षा स्त्रीची दलित जात वेगळी

आजतागायत मानवाच्या इतिहासात महत्त्वाच्या क्रांत्या झाल्या. सुरुवातीला स्पर्धा, पराक्रम, जय, स्थैर्य यासाठी मानवी संबंधांनी काही निरगाठी घातल्या. त्यानी निभेना तेव्हा निरगाठी तोडून सुरगाठी माराव्या लागल्या, एवढेच नव्हे तर कोणत्याच प्रकारची गाठ असण्याचे कारणच नाही हेही मान्य झाले. उदाहरणच घ्यायचे तर सर्व मानव सारखे असताना स्पर्धेमुळे, हावेमुळे, सत्तेमुळे आणि सत्तेसाठी काहींच्या बाबतीत जितजेते संबंध निर्माण झाले, उच्चनीचता आली, धनी–दास संबंध निर्माण झाले, मालक-गुलाम संबंध जन्माला आले, मालक–मजूर संबंध जन्माला आले. या विषम मानवी संबंधां-मुळे काही माणसांना शेकडो वर्षे पशूंचीही किंमत राहिली नाही. सहानुभूतीचा स्पर्श तर राहोच पण निर्दयता, क्रूरता यांखेरीज काहीच भोगता आले नाही. हे विषम संबंध केव्हाना केव्हा अत्यंत विखारी होऊन बसले. इतके की ते विष, धनी, मालक, सत्ताधारी यांनाही जाचक होऊ लागले. मग निरगाठी तुटू लागल्या, नाती बदलू लागली. अखेर समतेची भाषा आली. शेतकरी-कामकऱ्यांची राज्ये आली. धनी, मालक, राजे म्हणवून घेणारांचा उच्छेद तरी झाला किंवा त्यांना नमते तरी घ्यावे लागले. दलक आणि दलित यांचे विषम संबंधही युगानुयुगाचे असले तरी त्यांना समता प्राप्त होण्याचे युग आले.

मानवी संबंधात ही जी क्रांती झाली, त्याला जो अर्थ आहे तोच स्त्री-पुरुषांच्या विषमतेला आहे का ? समाजातील इतर दलितांपेक्षा स्त्रीची दलित जात वेगळी आहे.

प्रत्येक दलिताने आपली स्त्री दलित केली. स्त्रीचा संबंध आला तेव्हा कोणताही दलित हा दलकच झाला. कारण स्त्री ही उपभोगाची वस्तू स्वतःच्या मालकीची ठेवण्याची त्याला इच्छा होती. आणि स्त्रीला पुरुषाचा उपभोग हवा पण ती वस्तू म्हणून राहणार नाही. थोडक्यात सांगायचे तर हा लढा एकमेकांना आकर्षून घेणाऱ्या स्त्रीत्वाचा आणि पुरुषत्वाचा असल्याने तो इतर दलितांच्या लढ्यापेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाचा होत गेला. आणि मानवी विकासाच्या इतिहासात धर्मयुग सुरू झाले, बहरले आणि त्याचा ऱ्हास सुरू झाला. हे होताना अनेक गोष्टींना मोल आले आणि धर्माच्या ऱ्हासाबरोबर ते मोल घसरले. धर्मयुग माणसांनीच सुरू केले आणि त्यांनीच त्याचा ऱ्हास सुरू केला आहे. माणूस हा अनेक वासनांचा गोळा आहे मग ती स्त्री असो वा पुरुष असो. ज्ञानी पुरुषांनी वासनात लोळल्यास त्याचे परिणाम काय होतात हे इतिहास व वर्तमान-काल पाहून लक्षात घेतले आणि माणसाला वासनांपासून अलिप्त राहण्यासाठी अनेक तऱ्हाच्या आचारधर्मांना बांधून टाकले. पाप-पुण्याची स्वर्ग-नरकाची कल्पना दृढतेने सांगून माणसांना भय दाखवून वासनांना आवरावयाचे शिक्षण दिले. अध्यात्मपरंपरा असलेल्या भारतासारख्या देशात विज्ञानाचे युग अवतरले नसेल, पण मनाच्या विलक्षण शक्ती पोसण्यासाठी प्रखर वासनासंयम अनेकांनी हजारो वर्षे केला. अशा या देशातील श्रुतिस्मृतिग्रंथ चाळल्यास स्त्रीबद्दलच्या कल्पना अभ्यासण्यासारख्या वाटतात. अध्यात्म-ग्रंथात सर्वत्र स्त्रीबद्दल अत्यंत तिटकारा दाखवलेला आहे. स्मृतीतही तसेच, आणि याचे कारण पुरुषाचा आकर्षणापासून बचाव करणे गरजेचे होते.

मनुष्यनिर्मित सामाजिक विषमता ही एकेका कालखंडाला उपयुक्त झाली असेल. पुढे ती विषमता निरुपयोगी झाली. कदाचित निराळ्या तऱ्हेची विषमता उत्पन्न होईल किंवा कदाचित समता निर्माण होईल. पण मनुष्याचे षड्रिपूंनी युक्त असलेले मन पाहिले की कायमची समता निर्माण होण्याची शक्यता फार कमी वाटते. समुद्राच्या भरती-ओहोटीत एक समकाल असतो. तसेच काहीसे या समविषमतेचे स्वरूप आंदोलित राहील असे वाटू लागते. सर्व धर्मांचे व वादांचे इतिहास ही साक्ष देतात. पण हे जे मनुष्यनिर्मित विषमतेत घडत आले तेच निसर्गनिर्मितीत घडेल का ?

निसर्गाशी झगडून स्वतःची समर्थता सिद्ध करू पाहणारा माणूस अणुयुगात अनेक ग्रहांवर जाईल हे जसे खरे तसे षड्रिपूंनी उचल घेतल्यास सर्वस्वी आत्मनाश करून घेईल हेही खरे. निसर्गाने सातत्यासाठी जीवसृष्टीत सर्वत्र स्त्री-पुंबीजाची पेर केलेली आहे. निसर्गनिर्मित स्त्री आणि पुरुष यांच्यात विषमता असावी की समता असावी या बाबतीत निसर्गाने कोणताच नियम घातलेला नाही. ते सारे माणसाने ठरवायचे आहे. आणि ते ठरवण्याची अनेक युगांनंतर आता वेळ आली आहे.

पूर्ण स्वातंत्र्याचा रशियातील प्रयोग

स्त्रीपुरुषांची असमता ज्यामुळे निर्माण होते त्या 'सेक्स'च्या बाबतीत संपूर्ण

स्वातंत्र्य स्त्रीपुरुषांना देण्याचा प्रयोग यापुढेच नव्याने व्हावयाचा आहे असे नाही. विषमता समूळ नाहीशी करण्यासाठी रशियात जी क्रांती झाली त्या क्रांतीत स्त्रीपुरुषांतील विषमता नाहीशी करण्यासाठी उभयतांनाही 'सेक्स'चे स्वातंत्र्य दिले. स्त्रीच्या मार्गांत मुले असतात. त्यांची काळजी सरकारने घेण्याचे ठरविले. मुलांचे खाणे, पिणे, शिक्षण उत्कृष्ट व्हावे यासाठी मोठमोठ्या तज्ज्ञ डॉक्टरना, नर्सना हाताशी धरले, शिक्षणशास्त्रज्ञांना हाताशी धरले. आबाळ किंवा अनारोग्य दिसल्यास कडक शासन केले जाईल ही कार्यकर्त्यांना भिनेल अशी जाणीव दिली. ज्यावेळी मातृहृदयाला मुले जवळ असावीसे वाटेल त्यावेळी स्त्रीला आपली मुले आपल्याजवळ घेणे सुलभ केले. 'मुले झाली की ती मुलांच्या पांजरपोळात सोडली' असे हे स्वरूप निश्चित नव्हते. मुले कायमची आईला पारखी झाली असेही त्याचे स्वरूप नव्हते. पण चोवीस तास घर नि मुले या रटाळ जीवनातून मुक्त होऊन स्त्रीला दुसरीही कामे करता यावी, दिवसाकाठी मुलांवर मायाही करण्यास भरपूर अवधी मिळावा अशी व्यवस्था केली गेली.

मानवनिर्मित स्त्रीपुरुषातील विषमतेला मानवानेच सम करण्याचा प्रयोग सुरू झाला आहे. या प्रयोगाने समाजधारणेत स्त्रीने पुरुषाच्या बरोबरीने काही महत्त्वाची कामे केली का? या प्रश्नाला 'होय' असेच उत्तर मिळते. प्रत्येक पुरुष जसा शोध लावीत नाही तशी प्रत्येक स्त्री शोध लावणार नाही. प्रत्येक पुरुष जसा अर्थार्जन करतो, त्यासाठी काम करतो, जेवतो, खातो, करमणूक करून घेतो, रतिसुख घेतो तसेच स्त्रीही करते. पण स्वतंत्रपणे विशेष कामगिरी करून समाजाचा विकास करणारे असे पुरुष आहेत तशा येथे स्त्रियाही आहेत हे निश्चित. जी जी कामे पुरुष करतो ती ती करण्याला स्त्रीला प्रत्यवाय नाही आणि स्त्री ती करतानाही दिसते. रशियात कुटुंबसंस्था नष्ट झालेली नाही. तिचे स्वरूप बदलले आहे. पृथ्वीभोवती निरवकाश यानात पुरुष फिरून आला तशी रशियन स्त्रीही फिरून आली. सर्व पुरुष विशेष काही करतीलच असे नाही. तशा स्वातंत्र्य मिळालेल्या सर्व स्त्रिया विशेष काही करतील असे मुळीच नाही. एखादाच पुरुष विशेष दिसावा तशी एखादीच स्त्री विशेष दिसेल. पण चार भिंतींत अश्मयुगापासून अणुयुगापर्यंत गाडलेल्या स्त्रीला आपल्या शक्ती अन्यत्र पडताळता आल्या तर ती समाजधारणा आहे असे समजण्यास प्रत्यवाय कोणता? परंतु रशियात स्त्री हजारो वर्षे करीत असलेल्या एकमेव कार्यातून मुक्त झाली याला कारण तेथे मिळालेले राजकीय मतप्रणालीने बद्ध असे सेक्सचे स्वातंत्र्य हे स्पष्ट म्हणणे भागच आहे. सेक्सचे स्वातंत्र्य अनेक देशांत आताही स्वैरपणे घेतले जात असले तरी अवैध संततीला कायद्याने मानली आहे असे नाही. रशियात स्त्रीला मूल होते ते कायदेशीरच आहे असे मानल्याने सर्व प्रश्न सुटले. विवाहबाह्य संततीची इतर देशांतून होणारी परवड रशियात होत नाही. ज्या पुरुषाशी संबंध येऊन स्त्रीला मूल झाले असेल त्या पुरुषाशी लग्न करणे किंवा लग्न करून लग्नव्यवच्छेदन करणे यासाठी भयंकर यातायात करावी लागत नाही. त्याचा दुसराही एक निर्दोष परिणाम होतो. स्वखुशीने,

छपवाछपवीने स्त्री-पुरुष संबंध होऊ लागल्यावर अनेक स्त्रियांच्या व अनेक पुरुषांच्या वासनासंबंधाच्या अनेक भाकड रोगट कथांच्या गप्पा मारण्यात भयंकर वेळ जात नाही. सामर्थ्य खर्च होत नाही. पैशांचा अपव्यय होत नाही. वासनाविषयांची शिकार करण्याने वेळ रोगटपणे घालवला जात नाही आणि त्यातून स्वैरवर्तन इतक्या सवलतीनंतर करणारांना फार कडक शासन होते हे लक्षात ठेवले पाहिजे.

रशियातील क्रांती सर्व देशांना मानवणारी नाही

विषमतेविरुद्ध झालेल्या रशियातील क्रांतीतील ही सेक्सची क्रांती सर्व देशांना मानवण्यासारखी नाही. विशिष्ट तत्त्वप्रणालीची अंगोपांगांनी कडक अंमलबजावणी होते, तेथेच कडक शिस्तीने सेक्सची क्रांती हा निर्कोपपणा आणू शकली. हे सर्व देशांत जमणारे नाही. पण लोकसंख्या भयानक होऊन कुटुंबनियोजनाची साधने सहजसाध्य झाल्याने नको म्हटले तरी आपण होऊन सेक्सची क्रांती आपल्यावर आदळणार आहे. अतिप्रजा झालेल्या आपल्या देशात स्त्रीच्या लग्नाचे वय एकवीसपर्यंत नेल्यास प्रजेला आवर पडेल हे जसे खरे तसेच विवाहबाह्य संतती आताच पुष्कळ होत आहे त्यात भर पडेल. त्यामुळे विवाहातील संतती होण्याचे टळले तरी दुसरे संकट टमे राहण्याचा फार संभव आहे.

असतील तर मानवाचा 'विकास' कसा काय म्हणता येईल हे कळणे कठीण आहे.

सेक्सच्या स्वातंत्र्याने निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीपुरुष संबंध ही मानवाची न आवरणारी वासना आहे, तिला प्रजोत्पादनाची, विवाहसंस्थेची, आचारधर्माची भीतीच राहिली नाही तर चालेल का? दोघांची समानता राखून सेक्सचे स्वातंत्र्य हे प्रगल्भ संयमी मनांनीच फक्त नीट वापरता येण्याचा कदाचित संभव. कोट्यवधी जीवांना आज तरी हे मन लाभण्याची शक्यता नाही, असे असताना कामवासनेत अहर्निश लोळणारांची बहुसंख्या झाल्यास समाजधारणा होण्याचा सुतराम संभव नाही. स्त्रीपुरुष आकर्षण ही गोष्टच अशी आहे की, ती दोघे केव्हाही एकत्र आली तरी हीच भावना जागी असते. संयमी विवेकानेच माणसे ती आवरतात. एरवी स्त्रीपुरुष असंयमी मनांनी वावरल्यास आणि सेक्सचे स्वातंत्र्य मिळाल्यास एकमेकांचा तिटकारा यावा इतका उपभोग घेतील. कामवासना उपभोगाने कधीच शमत नाही. दुबळी शरीरे मृत्युपंथाला लागली तरी मनात वांझोट्या कामाचा विचार करीत राहण्याची शक्यता असते. त्यामुळेच बऱ्याच अनुभवांनी आणि विवेकाने विचारवंतांनी संयमाची महती सांगितली आहे.

प्रजोत्पत्तीची वाढ कमी करावी असे म्हटले तरी प्रजोत्पत्ती संपूर्णपणे थांबावी असे क्वचितच एखाद्याला वाटेल. एरवी प्रजेचे सातत्य असावे, मूल असावे असेच माणसांना वाटणार. ते नसेल तर कित्येक स्त्रियाच नव्हत, पुरुषही विमनस्क, वेडे होतील. मात्र सौंदर्यवाद्यांनी चोवीस तास स्त्रीत्वाची उधळमाधळ करीत स्त्रियांनी पुरुषांच्या वासना चेतवीत जगावे असे म्हटले तरी हे सौंदर्यवादी समाजधारणेचे शत्रूच होत. स्त्रीपुरुष संबंधातील पुरुषाची करणात्मक प्रवृत्ती व स्त्रीची असहायता यांत स्वैर उन्मत्ततेने स्त्रीवरच अत्याचाराचा संभव जास्त. तेव्हा संयम हा आधी स्त्रीनेच पाळावा लागेल.

सेक्सचे स्वातंत्र्य हे अविचाराने, असंयमाने वापरल्यास स्त्रीपुरुष विटून कुणी तरी दुसऱ्याचे दास्य पत्करणे बरे असे मानतील. पण पुन्हा ते अकरणात्मकतेने स्त्रीकडेच येईल. माणसांत षड्रिपूंचा थयथयाट आहे तसे प्रखरतेने त्यांना जाळून टाकण्याची मानसिक शक्तीही सिद्ध झालेली आहे. या सेक्सच्या क्रांतीत मानवी सुख व विकास यांचा रेखीव अर्थ लावणे भागच पडेल.

स्वातंत्र्य म्हणजे स्वैरता नव्हे हे सेक्सच्या क्रांतीत काय किंवा इतर स्वातंत्र्यात काय लक्षात ठेवावेच लागते. शिस्तबद्ध स्वातंत्र्यासाठी सारा समाज कर्तव्यनिष्ठ झाला पाहिजे. त्या कर्तव्यनिष्ठेत जीव भरण्यासाठी समाजाला आपल्या विशिष्ट मनप्रणालीने बद्ध झालेले राष्ट्र हवे. म्हणजेच माणसे सेक्समधून मन काढून वरच्या पातळीवर कर्तव्यात स्वतःला गुंतवतील. नाहीतर ह्या सेक्सच्या क्रांतीने विनाश ओढवेल.

१८

स्त्रीजीवनातील समस्या

गीता साने

सौ. गीता साने, एम्. एस्सी., बी. टी. (जन्म ३-९-१९०७) बिहारमधील शैक्षणिक व सामाजिक कार्यकर्त्या व प्रसिद्ध लेखिका. महाराष्ट्र सरकारचे बक्षीस मिळालेला 'चंबळची दस्युभूमि' हा चंबळ खोऱ्यातील विशिष्ट समस्यांवर प्रकाश टाकणारा ग्रंथ लिहिला. जिल्हा परिषद, शिक्षणसंस्था आणि कोळसा खाण मजुरांमध्ये कार्य. (द्वारा-डी. नरसिंह, ॲडव्होकेट, चिरागोडा, हिरापूर, धनबाद, बिहार)

आजच्या स्त्री-जीवनाकडे ओझरती नजर टाकली तरी त्याला वेटाळणारे अनेक प्रश्न दृष्टीस पडतात. त्यांतले काही क्षुद्र तर काही जटिल, काही प्रयत्नसाध्य तर काही स्त्रीला एकटीला न पेलणारे, काही समाजाच्या अस्तित्वाला धोका आणणारे तर काही मानवजातीला नाशाकडे नेऊ शकणारे असे दिसतात.

स्त्रीजीवनाचे थर उतरंडीप्रमाणे

ह्या विविध समस्यांमध्ये गुरफटलेले स्त्रीजीवन एकजिनसी नसून एखाद्या उतरंडी-प्रमाणे दिसते. ह्या उतरंडीच्या चुडाशी एक सुंदर अडणी आहे, स्त्रीच्या स्वाधिकाराची, आत्मविश्वासाची, कर्तृत्वाची. ह्यावरती विसावलेली स्त्री सुशिक्षित, सुसंस्कृत व जागृत आहे, आदरप्राप्त आहे. मागच्या पिढीत शिक्षणाने तिचे व्यक्तिमत्व सर्वांगांनी उमलून आले व स्वातंत्र्यसंग्रामात पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत, सामाजिक अन्यायाचा प्रतिकार तिने संघटना उभारून केला. स्वतंत्र भारताने तिचे कर्तृत्व व तिचा दर्जाही अनेक नवीन कायद्यांच्या स्वरूपात मान्य केला. ही स्त्री बहुशः धनिक आहे. तिच्या जीवनाला जाति-धर्मांच्या, रूढ सामाजिक परंपरांच्या मर्यादा पडलेल्या नाहीत. ती भारताची पंतप्रधान होते, परदेशात वकील होते. ती उद्या राष्ट्राध्यक्ष वा मुख्य न्यायाधीश होईल. तिच्याबद्दल स्त्रीला सार्थ अभिमान आहे.

ह्या स्त्रीचा थर अगदी लहान व तो पायात पडलेला आहे, तिचे प्रश्न तिने सोडवलेले आहेत.

ह्या उतरंडीचा दुसरा कलश थोडा मोठा आहे. ह्या स्त्रिया सुखवस्तु आहेत. दुसरे महायुद्ध व स्वतंत्र भारताचे औद्योगीकरण ह्या घटनांमध्ये बऱ्यावाईट मार्गांनी संपन्न झालेले नवधनिक व चार आकड्यात पगार मिळवणारे कुशल तंत्रज्ञ ह्यांच्या कुटुंबांचा ह्या थरात समावेश होतो. ह्या थरात सुशिक्षित-अशिक्षित, सुंदर-कुरूप, अल्पवयी, प्रौढ, अशा विविध स्त्रियांची खिचडी आहे. त्यांना गुंफणारा धागा आहे त्यांच्या संपन्नतेचा. इंग्रजांचे उथळ अनुकरण बहुशः हा वर्ग करीत असतो. ह्या स्त्रियांचे प्रश्न आहेत, पण ते डोळ्याच्या पाण्यात विरून जाणारे.

तिसरी घागर पांढरपेशा स्त्रीची. ही मुख्यतः येते 'उच्च' जातींमधून, भारताच्या विस्तृत प्रदेशात मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण, थोड्या प्रदेशात कायस्थ, राजपूत, क्षत्रिय. ही साक्षर आहे. सुविद्य स्त्रियांचा भरणा ह्याच थरात आहे. ती मोठ्या प्रमाणावर अर्थार्जन करते आहे व त्यासाठी नित्य नवी क्षेत्रे शोधते आहे. तिला अनेक समस्या आहेत; कारण प्रश्न करण्याइतपत ती जागृत व समजदार आहे. ही स्वतंत्र नाही; पण मनोधैर्य असल्यास झुंज देण्याचे सामर्थ्य तिला आहे, हे ती अनेकदा दाखवून देते.

त्यानंतरचा थर शेतकरी व कुशल कारागिरांच्या स्त्रियांचा आहे. त्या बहुतेक अशिक्षित आहेत. व त्या शूद्र जातीमधून येताना दिसतात. आपल्या मुलींना शिकवण्याची ह्या थरातील स्त्रीला महत्त्वाकांक्षा आहे. पुरुषाने आणलेल्या कोंड्याचा मांडा करण्याचे कौशल्य तिच्या अंगी आहे. एका पिढीपूर्वीची मध्यमवर्गीय स्त्रीच तिच्यात आपल्याला ओळखता येते, व त्यामुळे तिचे प्रश्न आपण हाताळलेले आहेत.

सर्वात वरती एक प्रचंड रांजण आहे कामकरी व भूमिहीन मजूर स्त्रीचा. ही अतिशूद्र व अंशतः शूद्र जातीची, सर्वदा पददलित आहे. तिच्या जीवनात सर्व गोष्टींचा अभाव भरपूर आहे. ती सारे अन्याय मुकाट सोशीत आलेली आहे. एका शतकापूर्वी तिचा पुरुषवर्ग तिच्याइतकाच दलित होता व आजही जुलमाशी सतत संग्राम करण्यात गुंतलेला आहे. अशरण असणे ही तिची प्रकृती आहे, विकृती नव्हे.

ह्या सर्व उतरंडीला एकत्र जखडणारी चौकट कायद्याची आहे कारण आपले फौजदारी व दिवाणी कायदे तसेच आपले संविधान निदान तत्वतः, सर्वांना एकाच मापाने मापणारे आहे.

वरील सर्व थरांचे प्रश्न आजवर काही प्रमाणात वेगळे होते. पण आज लोकशाही समतेच्या काळात, कामकरी स्त्रीचे जीवन सुकर होण्याऐवजी पांढरपेशा थरातल्या स्त्रीच्या वाट्याला मात्र, मजूर स्त्रीवर होणारा अन्याय व अपमान येऊ लागले आहेत. ती स्त्री त्यामुळे गोंधळली, गांगरली आहे.

ह्या स्त्री-जीवनाच्या समस्या विविध स्वरूपाच्या असल्या तरी जाणिवतेच्या पातळीवर त्याचे (१) ज्ञात असलेल्या (२) अर्धवट उमजलेल्या व (३) तिच्या मनाच्या कक्षेत न आलेल्या असे भाग स्पष्ट पडतात.

पांढरपेशा स्त्रीवर्गाची दशा

पांढरपेशा स्त्रीवर्गाने ह्यापैकी पहिल्या भागातल्या समस्यांची दखल घेतलेली असल्याने, त्या समस्या आपल्या पूर्ण परिचित आहेत.

पांढरपेशा वर्गातही स्त्रियांचे, अर्थार्जन करणाऱ्या व न करणाऱ्यांचे प्रश्न किंचित भिन्न आहेत व त्यांपैकी नवऱ्याच्या तुटपुंज्या मिळकतीवर अवलंबून राहाणाऱ्या स्त्रीची स्थिती अत्यंत केविलवाणी आहे. अपुरे अन्नवस्त्र, घरे असतील तर ओंगळ, पडायला झालेली, गलिच्छ! संतती भरपूर, पण प्राथमिक मोफत शिक्षणानंतर मुलांना शिकवण्याची ऐपत नाही. अल्पवयात काम मिळण्याचा संभव वा पात्रता नाही. ह्याच अपुऱ्या मिळकतीवर इतर कुटुंबियांचा भारही अधूनमधून पडत राहावयाचा. रिकाम-टेकडी मुले रस्त्यावर काळ कंठीत असतात. दुखण्यांना रोज निमंत्रण असते. औदार्याचा, विपुलतेत वाढणारा गुण, कोणीही पाहिलेला नाही. ह्या स्त्रीचे जीवन, संकुचित स्वार्थामुळे अधिक कळकट होते. लहानसहान भांडणे, हेवेदावे ह्यात ती सडत राहाते.

नोकरी करणाऱ्या स्त्रीची स्थिती थोडी बरी आहे. मुलांच्या तोंडात ती ओला-कोरडा घास घालू शकते. पण 'घर व बाहेर' दोन्ही एकदम सांभाळताना तिच्यावर असह्य ताण पडत आहे. लग्न होताच, पहिले कौतुकाचे पोर वर्षाभरात येते, दुसऱ्याची पावले केव्हा तिच्या जीवनात प्रवेश करतात ते समजतही नाही. संततिनियमनाबद्दल एवढा प्रचार चालू असता, आवश्यक ती माहिती व मदत तिला सहज उपलब्ध होत नाही. अनेकदा नवऱ्याचे सहकार्यही ह्या कामी तिला मिळत नाही. त्यामुळे आणखी दोन पोरांची भर तिच्या संसारात पडते. मग मात्र पाळी चुकताच धावत जाऊन ती एखाद्या डॉक्टरकडे धावते आणि सुटकेसाठी विनवू लागते. गर्भपातासाठी डॉक्टरकडे जाणाऱ्या विवाहित स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे कुठलाही डॉक्टर सांगू शकेल.

प्रसूती व मुलांचे संगोपन हेही काळजी करण्याचेच प्रश्न आहेत. नोकरी न करणाऱ्या स्त्रियांजवळ पैसे नाहीत, तर अर्थार्जितांना प्रसूती-रजा मिळतेच असे नाही. नोकरीसाठी घराबाहेर रहा ते दहा तास रखडावे लागत असल्याने मुलांना सांभाळ ही देखील एक समस्याच आहे. नोकर मिळत नाहीत, मिळाले तर विश्वासू नाहीत, केव्हा निघून जातील सांगवत नाही, परवडण्याचा प्रश्नही असतोच. शेजारी न मिळणाऱ्या गरीब स्त्रिया असतात पण अर्थार्जितेच्या मदतीला धावण्याइतके उदार मातृत्व भारतीय मातेमध्ये नाही. कामाच्या जागी नर्सरी नाहीत. मूल आजारी पडले म्हणजे रजा मिळवण्याचा प्रश्न असतोच.

पाठी मुले बाहेर ठेऊन, घराला कुलूप घालून ही स्त्री पुष्कळदा कामावर जाते व आई परत येईतो मूल घर असूनही वनवासी होते. घरात विसावा नाही. कुटुंबियांना अल्प स्वल्प मदत घावीच लागते, त्यांना त्याचे समाधान नाही व संकटप्रसंगी मदत

मागावी अशी माणसे भोवती नाहीत. तिची त्यातल्या त्यात घरी राहाणी डोळ्यात येते व तिच्यावर संकट आले म्हणजे लोकांना साधारणतः बरे वाटते.

अर्थार्जनासाठी ती जी कामे करते त्यातही मनाला समाधान लाभावे अशी स्थिती नाही. बहुसंख्य स्त्रिया कारकुनी किंवा मास्तरकी करीत असतात. कारकुनाचा पगार बरा पण काम यांत्रिक आणि पूर्ण सात तासांचे. ती नोकरीत शिरतेही निम्नश्रेणी कारकून (एल. डी. सी.) म्हणून; त्यामुळे तिला मान व दर्जा नसतो.

अध्यापिकेची स्थिती भिन्न असायला पाहिजे, कारण ज्या स्त्रीच्या हाती आपण कोवळी पोरे निरवतो, तिला पैसा उणा मिळाला तरी मान तरी मिळायला पाहिजे; पण वस्तुस्थिती मात्र अशी नाही. एका बाजूने सरकारी वा निमसरकारी उगीरदंड खाती व दुसऱ्या बाजूने अहंमन्य पालक ह्यांच्यामध्ये तिचा चुराडा होत राहातो. शाळेची अपुरी जागा, मुलांची वाढती संख्या व अध्यापकांची उणीव, क्रीडांगणाचा अभाव, पुस्तकांचा खेळखंडोबा, बेपर्वा पालकवृन्द, ह्यांच्यामधून मार्ग काढू शकणारे अध्यापक विरळा. त्यामुळे निरुपाय म्हणून स्त्री नोकरी करते. व निरुपाय म्हणूनच समाज तिला हा गाडा रेटू देतो.

नोकरी करणाऱ्या स्त्रीची अवघड समस्या

ह्या संदर्भात स्त्रीपुढे एक महत्त्वाची समस्या सदैव उभी असते, व जिथे पूर्वी पडदापद्धती रूढ होती, अशा विस्तृत क्षेत्रात ती वेताळाचे स्वरूप धारण करते. उंबरठा ओलांडून शिक्षणाच्या व नंतर नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या स्त्रीने सरमिसळ समाजात कसे वागावे व समाजाने तिला कसे वागवावे ह्याचे रूढ असे संकेत तिला उपलब्ध नाहीत. त्यामुळे कसे वागले म्हणजे अपवाद येणार नाहीत हे तिला समजत नाही. मोकळेपणाने वागल्यास समाजाला तिच्या हेतूबद्दल शंका येतेच; पण संबंधित व्यक्तींनाही साशंकता वाटू लागते. त्यातून अधिक प्रसंग करणाऱ्या व्यक्ती उद्भवतात वा तिरस्कार करणाऱ्याही ! दोन्ही प्रसंगी दोषी तीच ठरते व अतिप्रसंगाला तोंड देण्याचा प्रसंग आल्यास तिला कोणाचेही साहाय्य उपलब्ध नसते. मोकळे न वागावे तर इतरांच्या सहकार्याविना जबाबदारी नीट पार पाडणे अशक्य होते.

नित्य संपर्कामधल्या अधिकाऱ्यांबद्दलच्या तक्रारी अनेकदा कानावर येतात. त्याबाबत बोभाटा झाल्यास बेअब्रू स्त्रीची होते. तिच्या कुटुंबाची प्रतिक्रियाही अनिश्चित असते. तिला संरक्षण देऊ शकणारी कुटुंबे विरळा. कधी नवरा संशयग्रस्त होतो तर कधी तिचे पालक, तिने अधिकाऱ्याला प्रोत्साहन देऊन बढती मिळवावी म्हणून तिच्यावर दडपण आणतात. बहुशः 'उत्तेजन देण्याबद्दल', 'उत्तान (?) वेशाबद्दल' वा 'तिचा प्रतिकार वरवरचा असल्याबद्दल' तिला उणीदुणी ऐकून घ्यावी लागतात; कुटुंबाच्या अब्रूसाठी हे अवघड जागेमधले दुखणे सोसून घ्यावे लागते. ह्या सर्व बनावामुळे, कामापासून स्त्रीला सुख-संतोष न मिळता ती सदैव संत्रस्त व भयभीत मात्र असते.

स्त्रीची अब्रू समाजाने काचेपेक्षा ठिसूळ व प्राणापेक्षा मूल्यवान मानली असली तरी आपल्या दंडसंहितेला त्या अब्रूचे मोल दोन तोळे सोन्यापेक्षा जास्त वाटत नाही.

चोरीचा माल रु. २५०पेक्षा जास्त किंमतीचा असेल तर गुन्हा कॉग्निझिबल (दखल घेणे आवश्यक असलेला), जामीन नसलेला ठरतो. तो सिद्ध झाल्यास शिक्षा दोन वर्षेपर्यंत सक्त वा साधी कैद आणि/अथवा दंड अशी आहे.

विनयभंगाचा गुन्हा काग्निझिबल नाही. जामीन मिळतो व सिद्ध झाल्यास शिक्षा एक वर्ष पर्यंत साधी आणि/अथवा दण्ड अशी आहे.

विनयभंगाचा गुन्हा शाबीत करताना स्त्रीच्या अब्रूच्या चिंधड्या उडतात, आणि त्यानंतरही गुन्हा सिद्ध होणे कठीण जाते. व्यभिचाराच्या कलमानेही स्त्रीच्या अब्रूची अशीच थट्टा होते व तिला गोत्यात आणणाऱ्या तिच्या नातलगांविरुद्ध मदत देणे बिकट होऊन बसते.

पांढरपेशा स्त्रीपेक्षा मजूर स्त्रीची कायदेशीर स्थिती थोडी भिन्न आहे. तिला प्रसूती-रजा, क्रेश ह्या सोई सर्व उद्योगांमधून कायद्याने मिळाल्या आहेत. तिच्या कामाचे तास व वेळाही अशाच नियंत्रित आहेत. ह्या कायद्याची स्फूर्ती मात्र जागतिक मजूर संघटनेच्या (आय. एल. ओ.) कन्व्हेन्शन्सला भारताने दिलेल्या मान्यतेत आहे. त्यामुळे भारताच्या पुरोगामित्वाचा लेखी परिचय दिल्यावर भारताच्या विस्तृत क्षेत्रात हे कायदे दप्तर-दाखल होतात. अशा तऱ्हेने कायदा असून मजूर स्त्री व कायदा नसून पांढरपेशा स्त्री दोघींच्या समस्या सारख्याच तीव्र राहातात.

कायद्याच्या आंधळेपणाने उद्भवणारे प्रश्न

कायद्याच्या ह्या आंधळेपणाने स्त्री-जीवनात निर्माण होणाऱ्या विचित्र प्रश्नांची दोन उदाहरणे विचारप्रवर्तक म्हणून खाली दिलेली आहेत.

(१) शारदा कायदा आजही भारताच्या विस्तृत भागात पूर्णपणे अंमलबजावणीत आलेला नाही. . सरकारच्या ह्या हलगर्जीपणाची शिक्षा मात्र अल्पवयी अज्ञान पोरींना अनेकदा होत राहाते.

तीन वर्षांची अज्ञान गुड्डी कोळसा कापणारा[१] मालकट्टा शनिचर ह्याची कन्या. पहिला मुलगा निमाईच्या पाठीवर बुधियाची खूप मुले जाऊन गुड्डी जगल्याने नवसा-कौतुकाची. लग्न केल्याने मुले वाचतात ह्या परंपरागत भोळ्या समजुतीने तिचे लग्न ती दीड वर्षाची असताना झाले. वयात येईतो गुड्डी सासरी जाणार नाही, पण नवरा मेल्यास खानेसुमारीत विधवा ह्या सदरात पडेल व तिचे लग्न 'पाट' समजले जाईल; ही तिच्या विवाहाची निशाणी.

यंदाच्या पावसाळ्यांत हे सारे कुटुंब आवरक्ताच्या हगवणीने ग्रस्त होऊन मजूर-

१. कोळसा कापणे = To cut coal

कल्याण-कोपाच्या सुसज्ज रुग्णालयात पोचले. येथे कोळसा मजुराला व त्याच्या कुटुंबाला विनामूल्य उपचार करण्यात येतात. कुटुंब ह्या शब्दाच्या व्याख्येत मजूर, त्याची बायको, अज्ञान मुलगा, अविवाहित मुलगी, वृद्ध आईबाप व विधवा बहीण ह्यांचा समावेश होतो. शनिचरच्या सर्व कुटुंबाला रुग्णालयात प्रवेश मिळून, विवाहित गुड्डो मात्र प्रवेशाला अपात्र ठरली. 'तिचा सासराही मालकट्टा आहे' ह्या शनिचरच्या युक्तिवादाची दखल कायदा घेऊ शकत नसल्याने दुखणेकरी गुड्डोकडे रुग्णालयाने पाठ फिरवली. तिचे भवितव्य तिच्या कपाळावर कोरताना सटवाईला काय सुचले असेल कोण जाणे!

(२) मायादेवी १९४२मध्ये राजकीय कैदी होत्या. सुटून आल्यावर त्यांनी प्रथम जिल्हा बोर्डात व नंतर पती श्री. रामदेव ह्यांच्यासह भारत सरकारच्या मजूर मंत्रालयात नोकरी केली. १९५५मध्ये मायादेवी निवृत्त झाल्या व त्यांना मिळालेल्या प्रॉव्हिडंट फंडातून रु. ३००० त्यांनी एका सहकाऱ्याच्या प्रेसमध्ये घातले.

१९६०मध्ये रु. १०००पेक्षा अधिक किंमतीची प्रॉपर्टी विकत घेण्याबद्दल रामदेवांना मजूर मंत्रालयाने विचारणा केली. ही इस्टेट पत्नीची स्वसंपादित आहे, हे त्यांचे म्हणणे विचारात न घेता त्यांच्याविरुद्ध चौकशी करण्यात आली व १९६६मध्ये 'तुमच्याविरुद्ध कारवाई करण्यात का येऊ नये?' अशी नोटीस येऊन थडकली आहे. स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेण्याइतक्या मायादेवी प्रबुद्ध होत्या पण सरकारच्या मते, रु. ३००० एखाद्या व्यवसायात गुंतवण्याइतकी स्वतंत्र बुद्धी त्यांना नव्हती!

नोकरीत व मजुरीत मेहनतीचे माप पूर्णपणे पदरात घातल्यावरही स्त्रीविरुद्ध होणारा पक्षपात सर्वसामान्य आहे. तिच्या मूलभूत गरजाही आपण कशा डावलतो हे ती काम करते त्या संस्थामधून मुताऱ्यांची सोय पाहिल्यास समजून येते. बहुसंख्य संस्थांमधून पुरुषांची ही सोय रस्ते भागवतात. स्त्रीला ते शक्य नसल्यामुळे तिची होणारी अवस्था आकलन होण्यास स्त्रीचा जन्मच घ्यावा लागेल.

पहिल्या गटामध्ये येणाऱ्या समस्यांचे हे धावते दर्शन. थोड्या प्रयत्नांती ह्या समस्यांचे समाधान फारसे कठीण ठरू नये, पण त्यांच्या पूर्ततेसाठी सखोल अभ्यास, भरीव संघटना, मौलिक विचार, व ओजस्वी मार्गदर्शन ह्यांची तीव्र आवश्यकता आहे. स्त्रीची खरी समस्या आहे वरील गोष्टी अस्तित्वात आणण्याची.

आहे, या माणूस म्हणून जगण्याचा त्या पिढीचा हा निकराचा प्रयत्न आहे, हे सांगणे कठीण आहे. पण आजची परिस्थिती पालटण्यासाठी आपण ही समस्या नीट अभ्यासणे आवश्यक आहे हे मात्र एक नितांत सत्य आहे.

शिलावत् झालेला समाज

ह्या परिस्थितीमधून समाज पूर्वीही गेलेला आहे. व त्या अवधीचे परिणाम स्वागतार्ह वाटण्याजोगे खचित नाहीत. भारताचा बहुजनसमाज कित्येक शतके अनिकेत, अहेतुक, निराधार जीवन जगत आला आहे. ग्रामपंचायती त्या काळी स्वायत्त होत्या, पण बहुजनसमाजाचे क्षेमकुशल त्याही वेळी वरिष्ठ वर्गाच्या दयेवर निर्भर असे. ह्या थरांतील मुलांना बौद्धिक शिक्षणाचे दरवाजे इंग्रजी अमदानीपर्यंत संपूर्णतः बंद होते. त्यानंतर, परंपरागत जडतेमुळे व दारिद्र्यामुळे, शालेय शिक्षणाचा लाभ त्यांच्यापैकी फार थोड्यांच्या पदरात पडला. स्वतंत्र भारताने त्यांना शिक्षणाचे दरवाजे उघडले, दारिद्र्यावर उपाय म्हणून प्राथमिक शिक्षण मोफत केले, जडतेवर उपाय म्हणून शिक्षण सक्तीचे झाले. त्याशिवाय मागस व अनुसूचित जातीच्या मुलांना विद्याभ्यासाला सरसहा आर्थिक मदत स्टायपेंड म्हणून मिळू लागली. ह्या सर्व व्यवस्थेचा लाभ त्यांना विशेष घेता आलेला नाही. कारण आपण त्यांची प्रतिभा खुडण्यात यश मिळवलेले आहे. ही वठलेली वनश्री पुन्हा बहरण्याला लागणारा अवधी आजच्या तीव्र संघर्षात मिळावा असे प्रयत्न करणे येवढेच आपल्या हाती उरले आहे.

ज्या जातींनी अध्ययन अध्यापन हे आपले इतिकर्तव्य मानले, त्या जातींमध्येही रूढीपरंपरांचे प्राबल्य वाढत जाऊन, समाजरचनेच्या मूलतत्त्वांना आव्हान देणे अशक्य झाले. त्यांच्यात परिवर्तन करण्याचा प्रश्नच नव्हता. एकाच भगवद्गीतेतून अनेक अर्थ काढण्याची चढाओढ त्यामुळे सुरू झाली. भारतात डोळे दिपवणारे प्रतिभाशाली पुरुष त्यानंतर झाले पण परंपरेच्या वेड्या त्यांनाही सर्वस्वी झुगारता आल्या नाहीत. भारत गेली अडीच हजार वर्षे प्रत्येक विदेशी आक्रमणासमोर हार खात आला आहे; तो ह्याच मौलिक विचाराच्या व तदनुगामी कृतीच्या अभावामुळे. आजच्या स्त्रीजीवनातही ह्या चाकोरीच्या आंधळेपणाचा प्रत्यय विचित्रपणाने येतो. स्त्रीवर जेव्हा अचानक हल्ला होतो तेव्हा ती बहुशः किंकर्तव्यमूढ होऊन बसते. एका वर्षापूर्वी पाटण्याला चतुर्थ वर्षाचा एक तरुण आपल्या सोळा वर्षांच्या पुतणीला शाळेत पोचविण्यास जात होता. मार्गात प्रथम वर्षाच्या एका विद्यार्थ्याने मुलीची खोडी काढल्याने त्याची मान मानाने धरली, म्हणून प्रथमवर्षीय विद्यार्थ्याने चाकू त्याच्या पोटात खुपसून ठार केला. भोवताली बघ्यांचे कडे पडले. त्यांनी खुनी माणसाला पकडले नाहीच पण त्या मुलीनेही हालचाल केली नाही व खुनी निसटून गेला. प्रसंगावधान हा उपजत स्वभावाचा गुण नव्हेच !

भारताची जातिसंस्था पोलादाची बनलेली आहे असा एक समज सर्वत्र दिसून

येतो. ते खरे असले तर आपला समाज गतिमानता हरवून शिलावत् झाला असला पाहिजे. आज जी परिवर्तने आपण घडवली आहेत, त्यांचे श्रेय आपल्या परकीयांशी आलेला संबंध व त्यांची उदार विचारसरणी ह्यांना द्यावे लागेल. स्वातंत्र्यानंतर पुन्हा एकदा जातिसंस्था दृढमूल होत आहे, परंपरांना उधाण येत आहे. इतिहासातून आपल्याला इष्ट असा अर्थ काढण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करतो आहे. ह्या वेड्यांमधून आपली मुले सोडविण्याची व पर्यायाने आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची पण अगोचर अशी समस्या स्त्रीजीवनात उभी आहे.

मुले पळविण्याचा भयंकर उद्योग

ह्या गटामधली आणखी एक समस्या आहे अल्पवयी मुलांच्या व्यक्ति (पर्सन) रक्षणाची. दुर्दैवाने स्त्रीला स्वतःलाही व्यक्तिसंरक्षणाची गरज आहे. तेव्हा ही समस्या दोन्ही पैलूंनी अभ्यासावी लागणार आहे. हरवलेल्या, नाहीशा झालेल्या मुलांबद्दल आपण वृत्तपत्रांमधून केव्हा केव्हा वाचतो. क्वचित एखाद्या छाप्यांत पोलिसांना मुले सापडल्याची वार्ता येते. ह्या वृत्ताचा अन्वयार्थ न लागण्याइतके आपण वरील समस्येला अपरिचित आहोत; त्यामुळे मुले चोरीला जातात हे आपल्याला समजत नाही.

भिकारी संघटना व चोरांचे गट मुले पळवून किंवा उचलून नेतात. त्यांना अल्पवयी मुलांचा उपयोग असतो. एखाद्या अनाथालयाचे कुंकू लावून बँडबरोबर भीक मागत फिरणारी मुले गावोगाव वर्गणी गोळा करतात. ह्या वर्गणीचा मोठा हिस्सा — एका विशिष्ट प्रकरणी पासष्ट टक्के — अनाथालयाचा चालक व मालक घेत असतो. गोरीगोमटी व चुणचुणीत मुले वर्गणी जास्त मिळवू शकतात, म्हणून अनाथालयात अशा मुलांना स्थान असते. वेश्याव्यवसायात पुरुषांची अनैसर्गिक मागणी पुरविण्यासाठीही अल्पवयी मुलांना आपले असे एक स्वतंत्र स्थान आहे.

भारतामध्ये देवतास्थाने व साधूंचे मठ भरपूर आहेत. तेथेही अल्पवयी मुलांना दीक्षा देण्यात येते. आईवडिलांनी वाहिलेल्या मुलांच्या जोडीला पळवून आणलेली मुलेही त्यांच्यात असतात असे अभ्यासकांचे मत आहे. चंगी-भंगी, विरक्ती न येताच संन्यास घेतलेल्या त्या ब्रह्मचाऱ्यांच्या हाताखाली ह्या मुलांचे जीवन कसे व्यतीत होत असेल कोणी सांगावे?

केव्हातरी पूर्वेच्या आसाम-बंगालमध्ये, तर कधी पश्चिमेच्या गुजराथमध्ये एखाद्या टोळीकडून, पोलिस छापा घालून, दहा पाच मुले मिळवतात. त्या मुलांना आपले नाव गाव सांगता येत नाही. ती सदैव भयचकित वागतात. व्यक्तित्व व वैशिष्ट्य गमावलेली दोन पायांची मेंढरे हे त्यांचे वर्णन योग्य होईल.

काही मुले घरून पळून आल्यावर कोणाच्या जाळ्यात सापडतात. कधी मादक पदार्थ चारून, बेशुद्ध मुले पोत्यात भरून भर वस्तीतून नेण्यात येतात. कधी कित्येक आठवडे मुलांना खाण्याची लालूच देऊन त्याचा विश्वास संपादन करण्यात येतो.

केव्हातरी मुलांवर मोहिनीप्रयोग करण्यात येतात असेही कानी येते. पोलिसांच्या फायलीमध्ये ह्या विषयावर भरपूर माहिती असते. पण क्वचित वृत्तपत्रे देखील, एखादे शहारे आणणारे वर्तमान प्रसिद्ध करून जातात.

मागे कलकत्त्याच्या एका हॉटेलवर छापा घालून पोलिसांनी नऊ ते चौदा वयाची सात-आठ मुले सोडवून आणली. ही सर्व शिकणारी मुले होती. वाढप्याचे काम त्यांच्याकडे असे. ही मुले छळाच्या भीतीने मौन पाळून होती. एका चुणचुणीत पोराने योग्य गिऱ्हाईक हेरून त्याला घरचा पत्ता दिला. त्या गृहस्थाने माहिती नीट पोचवल्याने हॉटेलवर पोलिसांनी छापा घालून मुले सोडविली. तेव्हा 'हटवादी' मुलांच्या अंगावर माराचे वळ व डाग दिल्याची चिन्हे होती.

पळवून नेण्यात येणाऱ्या मुलांची संख्या शेकडेवारीने काढता अगदी क्षुल्लक ठरते. पण एकही मूल हरवताच भयाची व साशंकतेची एक प्रचंड लाट समाजात उसळते. संशयावरून अनेक निरपराध माणसांना बेदम मार बसतो. मुलांच्या भोवती दहशतीचे विषाक्त वातावरण तयार होते. त्या वातावरणात वाढणारी मुले भ्याड-भेकड अपरिहार्यतेने बनतात. वरील स्थिती बदलायची ही स्त्रीला आकलन न झालेली तिच्या जीवनामधली आणखी एक समस्या.

मुलांमध्ये निर्भय वृत्ती आणणारी आई स्वतः निर्भय व आत्मनिर्भर असावी लागते. पण तिच्या व्यक्तिसंरक्षणाचा प्रश्न बिकट असून तो अधिक बिकट होत असल्याने ती स्वतः भयभीत आहे. तिला आत्मनिर्भरता शिकण्याची जरुरी अजून प्रतीत झालेली नाही.

मान व शील संरक्षणाचा प्रश्न गंभीर

व्यक्तिसंरक्षणाचा तिचा प्रश्न कदाचित औद्योगीकरणाच्या काळामधला असेल. पण 'मान व शील' संरक्षणाची पायमल्ली ती शतकानुशतके सोशीत आहे. पुरातन काळापासून स्त्रीला घरात मान नव्हता, बाहेर स्थान नव्हते. इंग्रजी अंमदानीत ही स्थिती पालटू लागली. घरात ती मानाला पात्र समजली जाऊ लागली, पुरुषाच्या प्रोत्साहनाने बाहेरची कामे करू लागली. रूढ मार्ग सोडल्यामुळे खवळलेला समाज तिचा अपमान विविध प्रकारे करू लागला. सुसंस्कृत पुण्यात सावित्रीबाई फुलेंच्या अंगावर थुंकण्यात आले. आज भारताच्या सर्व भागात स्त्रियांच्या मागे हिंडणे, अश्लील गाणी गाणे, घाणेरडे बोलणे, हात धरण्याच्या धमक्या देणे हे व असले 'रोडसाईड रोमिओ' प्रकार सरसहा होत आहेत.

हिंदु समाजात, शीलरक्षण — पुरुषाच्या कामवासनेपासून स्वसंरक्षण — हा महत्त्वाचा उद्योग स्त्रीला पुरातन काळापासून असावा; कारण त्या वासनेला संयम शिकवण्याचे प्रयत्न हिंदु संस्कृतीने केलेले नाहीत. ब्रह्मचर्याचा, तपस्येचा बडिवार करीत, वेश्याव्यवसाय हाच कुळधर्म असणाऱ्या कलावंत, नायक इत्यादी जाती हिंदु

धर्माने निर्माण केल्या, इतकेच नव्हे तर कुलवंतांच्या पोरी देवदासींच्या स्वरुपात मंदिरामधून पोचवल्या व देवद्वाराचाही कुंटणखाना बनवून टाकला. घरच्या स्त्रियांवर देवादिकही पापी दृष्टी ठेवीत, असे आपली पुराणे सांगतात. कामसूत्रात कुलीन स्त्रीला वश करण्याचे अनेक मार्ग सांगितलेले आहेत. बहुपत्नीकत्व होतेच पण त्या स्त्रियांचे भरणपोषणही न करता चैन करण्याचा मार्ग बंगालच्या 'कुलीन' भूदेवांनी शोधून काढला. आजही धार्मिक म्हणवणाऱ्या पुरुषांनी, भावजय, सून, मेहुणी, बहीण वा कन्या, अशा निकटवर्ती स्त्रियांशी व्यभिचार केल्याचे क्वचित कानावर येते. लोणी विस्तवाची उपमा ह्या असंयमातून जन्म पावली असावी. शस्त्रधारणेचे अधिकार नसलेल्या शूद्रजातीमधल्या स्त्रियांची स्थिती जास्त असहाय होती. सत्ताधारी द्विजांनी काय केले असेल ह्याची झलक आजही विविध संस्थानांच्या इतिहासात नमूद आहे. ह्याचा अर्थ सर्व पुरुष वासनेने लिप्त, असंयमी होते वा आहेत असा नाही पण समाजाचे स्वास्थ्य नासायला पाच टक्केही घाण पुरते. हिंदू समाजात घाण ह्यापेक्षा अधिक होती व ती घाण ह्या सदरात जमा न होता जीवनाचे अभिन्न अंग मानली जात होती.

स्त्रीच्या संरक्षणाचा प्रश्न आज जास्त गंभीर होतो आहे. कारण औद्योगीकरणाच्या युगात जुने संकेत पायदळी जात असून वरिष्ठ जातींचेच नव्हे तर सर्व जातींचे पुरुष आपल्या पुरुषार्थाचे प्रदर्शन करण्यास सजलेले आहेत. पेट्रोलच्या तीव्रगति वाहनामुळे चढत्या गुंडगिरीला आळा घालण्याचे सामर्थ्य एकाही नागरिकाला उरलेले नाही. त्यामुळे अनवस्थाप्रसंग उद्भवतो आहे. स्त्री ही आज स्वतंत्र नागरिक असल्याने तिचे संरक्षण ही राष्ट्रीय जबाबदारी आहे येवढाच एक आशेचा किरण.

दिल्लीच्या राजधानीत देखील दोन दिवसात दोन तरुण स्त्रिया नवऱ्याच्या शेजारुन उचलून नेऊन बलात्कार करुन रस्त्याच्या कडेला फेकल्या जातात (१९६६). दोन्ही प्रसंगी पेट्रोलची वाहने वापरण्यात येतात व त्या वाहनांचे क्रमांक टिपण्याची संधी नवऱ्यांना मिळाली हे भाग्य समजण्याचा प्रसंग येतो.

स्त्रियांच्या व्यापाराची भयानक कहाणी

स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारापेक्षाही त्यांच्या व्यापाराची कहाणी भयानक आहे. १९४१ साली पुण्यास उघडकीस आलेल्या मिरगी अड्डयात जबरीने आणून, त्यांच्यावर केलेल्या व्यापाराची करुण कहाणी आपण ऐकलेली आहे. स्वतंत्र भारतातील एका राज्याचा गुप्त (कॉन्फिडेन्शल) रिपोर्ट लेखिकेला पाहावयास मिळाला होता. स्त्रियांना फसवून आणल्याची व त्यांचा अमानुष छळ केल्याची उदाहरणे त्यात होती व समजदार कुटुंबानीही सुटका करुन आणलेल्या स्त्रीला तात्पुरता आश्रयही नाकारल्याचे एक कटु करुण उदाहरण त्यात होते. वरील सर्व कहाण्यांचा निष्कर्ष असा निघतो की सदैव घराच्या आडोशाला राहिलेल्या निरागस — का मूर्ख अज्ञान ! — स्त्रीला माणसाची पारख नसते. प्रसंग जिंकण्याइतके अवधान नसते व संधी सापडली तरी सुटका

करून घेण्याची युक्ती तिला सुचत नाही. तिच्या किंकर्तव्यमूढतेचा उल्लेख ह्या लेखात पूर्वीही आलेला आहेच.

ह्या व्यापाराचे धागेधोरे आज सर्वत्र व सर्वदूर पसरत आहेत. पूर्वी त्यांचे लक्ष्य व भक्ष्य अशिक्षित अडाणी स्त्रिया असत. त्यांच्या सुटकेचे प्रयत्न करण्याची ऐपत व कुवत त्यांच्या नातलगांना क्वचितच असे. ह्या धंद्यामधल्या दलालांचे धैर्य आज वाढले आहे. त्यांचे चोखंदळ गिऱ्हाईक सुसंस्कृत, कुलीन व शक्य तर कुमारी स्त्रीची मागणी करीत असून अस्सल 'माला'साठी अमाप पैसा मोजायला तयार आहे. अनैतिक मार्गांनी व्यापारात-उद्योगात भरमसाट पैसा मिळवलेल्या नवधनिकांची पुढची पिढी पुष्कळदा अशिक्षित असंस्कृत आहे. त्यांच्या पैशाच्या जोरावर त्यांना सर्वत्र प्रवेश मिळतो व त्यांना चांगल्या स्त्रियांची भूक लागते. अफाट मोबदल्याचा लोभाने दलालांची नजर ह्या स्त्रीकडे वळल्यावर, मानव म्हणून जगण्याच्या प्रयत्न करणाऱ्या स्त्रीला 'कायदा व सुव्यवस्था' ही थंड असल्याचे व निराशा देणारे अनुभव येतात. त्याचे स्वतःच्या माहितीमधले एक उदाहरण पुढे देत आहे.

सुशिक्षित स्त्री सदैव धोक्यात

नीरा व हिरा ह्या भारतीय सेनादलाच्या लेफ्टनंट (वय २२ व २३) बसमधून रात्री नऊला उतरल्या. व रिक्षा करून चार मैलांवरच्या कॅन्टोन्मेन्टकडे निघाल्या. 'फार दूर आहे, रस्त्यात अंधेर आहे' ह्या रिक्षावाल्याच्या कुरकुरीकडे त्यांनी दुर्लक्षच केले. अर्धे अंतर गेल्यावर मार्गदीप मागे पडले. तेव्हा रिक्षावाला खाली उतरला व पुढे जाण्याचे पुनश्च नाकारू लागला. त्यांचे बोलणे चालू असता समोरून आलेला एक सायकलवाला खाली उतरून मुलींना म्हणाला,

'बहन, आप लोग घर कभी नही पहुचेंगी, यहींसे वापस लौट जाव.'

नीरा-हिरा सावध झाल्या. उजव्या बाजूने एक कच्चा रस्ता येऊन मिळत होता तेथे गिऱ्हाईक नसलेल्या, रॉकेलच्या चिमणीचा भकभक धूर ओकणाऱ्या पानविक्यांच्या ठेल्याभोवती मवाली दिसणारे बरेच लोक त्यांना दिसले.

नीराने रिक्षा परत फिरवून घेतली व त्या आल्या मार्गाने मागे वळल्या. त्यांच्या रिक्षाच्या मागेपुढे आठ माणसे सायकलवर डबलसीट किंवा एकेकटी असल्याचे नीराने पाहिले. मुलींच्या मनाला भयंकर भय वाटत होते, कारण दुतर्फा असलेल्या शिक्षणसंस्था रात्री बंद म्हणून रस्ता निर्जन होता. थोड्या वेळानंतर दोन गुंड रिक्षाजवळ आले व 'कुठे जाणार ? पोचवून देऊ का ?' अशा विचारणा करू लागले. त्या मुली काय करणार याचा अंदाज त्यांना येत नसावा व आपल्या प्रसंगावधानाइतकाच गुंड चुचकल्यात पडण्याचाही मुलींना उपयोग झाला असावा. दीड मैल अंतर कापल्यावर स्थानिक सिव्हिल हॉस्पिटलचे गेट त्यांना लागले. नीराने रिक्षा आत घेववली, तेव्हा चार माणसे पुढे निघून गेली, दोन फाटकाशी उभी राहिली व दोन मात्र त्यांच्या

रिक्षाबरोबर आत गेली व ती माणसे, मुली वार्डात शिरल्यावर बाहेर दाराशी उभी राहिली. मुलींनी आपल्या अधिकाऱ्यांना फोन करून वाहन मागवले. वाहन आल्यावर वॉर्डाच्या दरवाजावरचे गुंड निघून गेले; बाहेरचे गुंडही तोपर्यंत निघून गेले असावेत.

हे प्रकरण धसास लावण्याच्या हेतूने लेखिकेने काही कालहरण करून, मिलिटरी हॉस्पिटलच्या कमांडिंग ऑफिसरची व नंतर त्याच्यासमवेत संबंधित जिल्हाधिकाऱ्याची भेट घेतली. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे 'अशा तक्रारी आमच्याकडे कधी आलेल्या नाहीत, आजवर असे कधी झाले नाही' इत्यादी उत्तरे लेखिकेला ऐकण्यात आली. कमांडिंग ऑफिसर व त्यांच्या पत्नींनी लेखिकेच्या म्हणण्याला आपल्या अनुभवाचा दुजोरा दिल्यावर जिल्हाधीशांचा पवित्रा बदलला. 'आधी तक्रार करायला हवी होती. गुंड पकडून खटला भरला असता.'

चारदोन गुंडांना रागेमधून, दोन पोरींनी हात धरून बाहेर काढल्यावर त्याचे परिणाम त्यांना किती भोगावे लागतील हेही त्या अधिकाऱ्याला समजावून सांगण्याचे काम लेखिकेवरच पडले. त्या भेटीत, कमांडिंग ऑफिसरला गुंडांच्या संघटना, निम्न श्रेणी (लोअर स्टाफ)चा त्यांना असणारा पाठिंबा व आपले विफल होणारे प्रयत्न, ह्यांची सविस्तर माहिती दुसऱ्या एका संदर्भात जिल्हाधिकाऱ्याने दिली हे नमूद करणे योग्य ठरेल.

राज्याच्या चीफ सेक्रेटरीची ह्याच प्रकरणी भेट घेऊन लेखिकेने त्यांच्याशी चर्चा केली. तेव्हा 'मुलींनी बाहेर जाण्यापूर्वी पुरेशी नोटीस दिल्यास त्यांच्या संरक्षणार्थ पोलिस कॉन्स्टेबल पाठवू' असा दिलासा त्यांनी दिला. 'देशाच्या संरक्षणासाठी, उत्तरेमधली अमाप खाजगी प्रॅक्टिस सोडून शॉर्ट सर्व्हिस कमिशन घेणाऱ्या तरुणींच्या संरक्षणासाठी पोलिस शिपाई ही कल्पनाही हास्यास्पद म्हणून लेखिकेने अमान्य केली. चर्चेच्या अखेर चीफ सेक्रेटरी म्हणाले, 'आम्ही शक्य त्या सर्व उपाययोजना करू, पण ह्या मुली माझ्या भगिनी वा कन्या असत्या तर तिन्हीसांजानंतर (डस्क) मी त्यांना एकट्या हिंडू दिल्या नसत्या.'

लेखिकेच्या विनंतीवरून 'एकट्या' शब्दाची व्याख्या त्यांनी 'बरोबर बंधु अधिकारी असल्याशिवाय' अशी केली. नीरा-हिराला व्यक्तिशः विशेष सवलत देण्यात आली. स्थानिक पोलिस सुपरिंटेंडंटला मदत देण्याचे लेखी हुकूम असून जरूर वाटेल तेव्हा पोलिसामार्फत त्या टॅक्सी मागवू शकतात. आज दोन वर्षांनंतरही नीरा व हिरा एकट्याने सायंकाळी शहरात जाऊ शकत नाहीत.

आज सैनिक स्त्रिया देशाच्या सीमेवरच नव्हे तर कांगोसारख्या अराजकग्रस्त प्रदेशातही जात आहेत. ही धैर्यसंपन्न स्त्री देशाच्या आत सुरक्षित नसावी ह्याचा अन्वयार्थ कसा लावावयाचा? व हे दुखणे कुठल्या वेशीवर टांगावयाचे?

सेनादलामधल्या स्त्रियांची ही स्थिती, बाहेरच्या स्त्रियांची स्थिती जास्त वाईट असणे स्वाभाविक आहे. दिवसाढवळ्या भर गर्दीतून मुली ओढून नेण्याचे प्रकार अलीकडे घडू लागले आहेत. मुलींना शाळा-कॉलेजासाठी, बाजारहाटासाठी पायी वा

बस-रिक्षाने घराबाहेर हिंडावे लागते. एखाद्या पोरीच्या दोन्ही बाजूंना दोन गुंडांनी उभे रहावे, ती आपली नातलग बहीण, भाची, पत्नी असून पळून जात आहे किंवा वेडी आहे असा दावा करावा व तिला जबरीने घेऊन जावे, मध्ये कोणी पडू लागल्यास दम व दाम यांचा उपयोग करावा अशी उदाहरणे वारंवार कानी येत आहेत. ह्या स्त्रियांनी मदतीसाठी केलेला धावा कानावर पोचून सहाय्य आले तर ते बहुशः अशिक्षित कामकरी पुरुषाचे असते, हे उल्लेखनीय आहे.

असे काही भयानक प्रसंग कानी आले म्हणजे आपण 'स्त्री'चाच काही दोष असेल असे मानतो. किंवा तिची उघड वा प्रच्छन्न संमति गृहीत धरतो. गेल्या महिन्यात धनबाद येथे पंधरा वर्षांच्या एका बालिकेला वडिलांचा (खोटा) निरोप सांगून मॅट्रिकच्या वाऱ्या करीत असलेले दोन तरुण रिक्षात घालून निघाले. तिच्या शाळेचे गेट मागे पडल्यावरही भोवतालच्या भरवस्तीत ओरडा करण्याचे तिला जमले वा सुचले नाही. ती रडत व परत नेण्यासाठी विनवीत राहिली. सुदैवाने ती युनिफॉर्ममध्ये असल्याने समोरून येणाऱ्या दोन विद्यार्थिनींचे लक्ष तिच्याकडे वेधून त्यांनी मुख्याध्यापिकेला रिपोर्ट दिला. पुढे तिच्यावर बलात्कार करण्याचे प्रयत्न, अचानक आलेल्या मदतीने फसून मुलीची सुखरूप सुटका झाली. गुन्हेगार पकडले गेले, पण तिची संमति नव्हती हे तिच्या सहाध्यायिनींच्या प्रसंगावधानामुळेच सिद्ध होऊ शकले. वस्तुस्थिती न समजून आपण मुलींच्या रहाणीवागणुकीवर ताशेरे झाडीत राहातो. ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्ससारख्या संघटनेने मुलींच्या उत्तान वेशाला अशा घटनांबाबत जबाबदार धरून कडक टीका केली. ती टीका किती बेजबाबदारपणाची व अन्यायाची आहे, हे पहाण्याची तसदी इतर स्त्रियांनी घेतली नाही.

सत्य असे आहे की, लालचावलेले धनिक व त्यांचे दलाल ह्यांच्यामुळे लज्जारक्षणासाठी आज स्त्रीच्या अंगावर लक्तरेही उरली नाहीत. खाली मान घालून झपाझप जाणारी लज्जावती, आत्मविश्वासाने पावले टाकणारी गर्वोद्धता, विद्या व कर्तृत्वाने समाजाला भूषणभूत झालेली गंभीर प्रौढा, कुठलीही स्त्री धनिकाचे मन चाळवू शकते. त्याची नजर ओळखून, त्याची वासना पुरविण्यासाठी दलाल सिद्धच असतात. ती स्त्री त्यांना न गवसली तरी तिच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले जातातच व तिला गुंडांचा उपसर्गही पोचतो.

जीवनात येणारे वैफल्य रंगवण्याच्या भरात, विवाहित स्त्रियांचा छीटा करणारे पति त्यांना दिसत नाहीत. गृहिणी व नागरिक ह्या नात्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र भयानक संघर्ष त्यांना आकलन झालेला नाही. त्यामुळे लोणची कशी घालाल, स्वेटर कसा विणाल, सुंदर कशा दिसाल, हे त्यांच्या लेखनाचे विषय झालेले आहेत. रेडिओही ह्याच सदरात पडतो आहे.

ह्या विषयाला तोंड एका जागतिक संघटनेने फोडले. न्यूयॉर्क येथील एका कन्व्हेन्शनवर सही केल्यामुळे १९५६ मध्ये भारताने Suppression of Immoral Traffic in Woman and Girls 'स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापाराला आळा' हा कायदा पास केला. त्या कायद्यान्वये कलकत्ता, दिल्ली, मुंबई इत्यादी ठिकाणी कुंटणखान्यांवर पोलिसांनी छापे घालून खटले दाखल केले. ह्या घटनेचा निषेध अत्यंत सात्त्विक व सत्त्वशील व्यक्तींनीही केला. त्यानंतर अलाहाबादच्या वेश्यांनी संविधानाकडे बोट दाखवून ह्या कायद्याविरुद्ध हायकोर्टाचे इन्जंक्शनही मिळविले. आता हा कायदा मरून पडला आहे. ज्ञात सभ्य वस्तीत चालणारे अज्ञात कुंटणखाने निर्वेधपणे आता आपल्या व्यवसायात दंग झाले आहेत, स्त्री सत्यानाशाच्या मार्गावर अविरोध ढकलली जाते आहे व तिला ह्या गोष्टीचे भान राहिलेले नाही.

ह्या उद्वेगजनक व विनाशकारी बनावाच्या काही रंजक पैलूंचा नामनिर्देश येथे करणे योग्य ठरेल. स्वेच्छेने परपुरुषरत होणाऱ्या स्त्रीचा आपल्याला सात्त्विक संताप येतो. आपल्याला तिची घृणा वाटते. पण तिने निवडलेला पुरुष सत्ता वा संपत्तिसंपन्न असला तर समाज तिचे काही वाकडे करू शकत नाही. तिला आवश्यक वाटणाऱ्या सर्व सुखसोयी उपलब्ध होतात. इतकेच नव्हे, तर तिला सर्व घरांचे दरवाजे उघडे असतात. तिच्या पाठीमागे समाज तिची निंदा करतो, पण तोंडावर स्तुतिसुमने वहातो. कालांतराने इतरेजनही तिची मर्जी संपादन करून, स्वार्थ साधण्याची धडपड करू लागतात.

स्वैरिणी स्त्रीच्या संपर्कामुळे, 'स्त्रीपुरुष संबंध लैंगिकच असतात' असे गृहीत धरणाऱ्या समाजात सभ्य पुरुषांना भय निर्माण होते व त्यांना आपल्या अब्रूला जपावे लागते.

स्त्री ही माणूस नसून निव्वळ मादी आहे, हे गृहीतकृत्य समजणाऱ्या समाजाला, कामेच्छा जीवनाचा एक छोटा भाग मात्र व्यापते, तहान भूक ह्यांच्याप्रमाणेच तिचेही समाधान होते हे न समजून अनेक हास्यास्पद, कधी घृणास्पद तर कधी विनाशक घटना घडत राहातात. ह्या गृहीतकृत्याचे विनाशक स्वरूप एखादे युद्ध किंवा अंतर्गत यादवी अशा होळ्या पेटल्या म्हणजे आपल्याला समजून येईल; पण आपली चूक सुधारण्याची संधी त्यानंतर आपल्याला मिळेल का ? — हे कोणी सांगावे ?

दुसऱ्या गटात येणाऱ्यांपैकी काही समस्यांचे ओझरते दर्शन घडवण्याचा वर प्रयत्न केलेला आहे. तेवढ्यावरूनही त्यांची गंभीरता विशद होऊन आपले लक्ष वेधून घेण्यात त्या यशस्वी व्हाव्यात इतक्या त्या भयानक आहेत. वस्तुतः ह्या समस्या

स्त्रीजीवनातील समस्या नसून त्या सर्व समाजाच्या निकडीच्या समस्या आहेत. महत्त्वाकांक्षी विकासोन्मुख भारताला त्या सोडवल्यावाचून आपले उद्दिष्ट साध्य करता येणार नाही. पण ही जाणीव समाजात तर काय स्त्रीमध्येही निर्माण होईतो, त्या तिच्या जीवनाचे जळवांप्रमाणे रक्तशोषण करणार आहेत.

उद्याच्या समस्या गंभीर व भयानक

तिसरा गट 'उद्याच्या' समस्यांचा असून त्यांचा येथे नामनिर्देश केला तरी पुरे होईल.

आपल्यावर निकट भविष्यकालात आक्रमण करणारी समस्या परचक्राची आहे. चीनने अण्वस्त्रावर प्रभुत्व मिळवले असून आपण त्याच्या माऱ्यात आहोत. चीन स्वतःला भारताचा शत्रू व पाकिस्तानचा मित्र मानतो. ह्या राष्ट्रांनी भारतावर चढाई केल्यास आपली स्थिती काय होईल व परिस्थितीला तोंड कसे देता येईल ही स्त्रीजीवनाची उद्याची समस्या आहे.

भारताच्या लोकसंख्येचा प्रश्न उन्हाळ्यात लागणाऱ्या वणव्याप्रमाणे सर्वसंहारक होत आहे. त्यामुळे संततिनियमनच नव्हे तर अवांछित मातृत्वाचे नवे पैलू स्त्रीच्या जीवनात नवे प्रश्न उभे करणार आहेत.

तिसरा प्रश्न ह्या दोघांपेक्षा सुदूर भविष्यामधला पण राष्ट्र सुखी संपन्न झाल्यावर आपल्यापुढे यावयाचा आहे. दुष्काळाच्या नद्या, मानवी कर्तृत्वामुळे ज्या देशांमधून वहातात त्यांना आपल्या रसनेवर विजय मिळवावा लागला, त्यातूनच खाद्यान्न शास्त्र (डायेटेटिक्स) निर्माण झाली. माणूस ह्या नात्याने स्त्री जेव्हा सरमिसळ हिंडू लागेल, तेव्हा कामवासनेचे परिवर्तन कामशक्तीत होऊन तिचा उपभोग व उपयोग योग्य तऱ्हेने व्हावा म्हणून प्रयत्न होतील व आजवरच्या इतिहासामुळे स्त्रीला त्यात पुढाकार घ्यावा लागेल. ही समस्या स्त्रीच्या समानतेमधून व समाजाच्या संपन्नतेमधून निर्माण होणारी असल्याने स्वागतार्ह मात्र आहे.

स्त्रीजीवनातील समस्यांचा साकल्याने विचार करता तिचे प्रश्न जितके जटिल व संकीर्ण, तितकाच तिचा एकलेपणाही प्रचंड दिसतो. दुसऱ्या स्त्रीची राहो, पण तिची स्वतःची सायही तिला सहसा नसते. ह्या संकुचित कोशामधून बाहेर पडून परिस्थितीवर *प्रभुत्व मिळवण्याच्या प्रयत्नातच तिचा जन्म सफल व संपूर्ण व्हावयाचा आहे.* सर्व समस्या सुटतात असे नव्हे, तसेच त्यांची उत्तरे आपल्याला समाधानकारक असतातच असेही नव्हे. परंतु वादळाशी धैर्याने झुंजण्यात पुरुषार्थ आहे, जिवंतपणा आहे. जगण्याचा, उमलण्याचा, गतिमानतेचा आनंद आहे. ह्या आनंदाचा अधिकार-आविष्कार ही मानवतेची परमावधी गाठण्यासाठी पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीलाही बद्धपरिकर व्हावे लागेल हे मात्र निश्चित.

१९

स्त्रीजीवनाची चित्रे

श्रीपाद शंकर नवरे

श्री. श्रीपाद शंकर नवरे, बी. ए. (जन्म १९००) ज्येष्ठ मराठी पत्रकार. वर्तमानपत्रांत विपुल लेखन. माटुंगा येथील श्रद्धानंद महिलाश्रमाचे कार्य त्याच्या संस्थापनेपासून चाळीस वर्षांवर अनन्यसाधारण निष्ठेने चालवीत आहेत. मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठी साहित्य महामंडळ, संयुक्त महाराष्ट्र परिषद, वगैरे संस्थांतील पूर्वीचे पदाधिकारी. (रामदास भुवन, शिवाजीपार्क रोड नं. ३, मुंबई २८)

स्त्रीजीवनाचा जिवंत बोलपट

माटुंगा येथील श्रद्धानंद महिलाश्रमाचा कारभार कार्यवाह या नात्याने गेली चाळीस वर्षे पहात असताना स्त्रीजीवनाचा एक दीर्घ चित्रपट मला अगदी जवळून पाहायला मिळाला. या चित्रपटाला बोलपट म्हणणे अधिक युक्त होईल. कारण डोळ्यांपुढून गेलेली सारी चित्रे जिवंत – चालती बोलती – होती. ती देखील दुरून चालणारी आणि बोलणारी नव्हेत, तर प्रत्यक्ष माझ्याशी बोलणारी, माझ्या प्रश्नांना उत्तरे देणारी, माझ्या समोरून जाणारी-येणारी, माझ्या देखरेखीखाली जीवन कंठणारी, आयुष्याचा पुढील मार्ग आशेने आणि उत्सुकतेने शोधणारी !

दोन पिढ्यांतील उलथापालथी

चाळीस वर्षांचा काळ लहानसहान नव्हे. चांगला दोन पिढ्यांचा. त्यातून हा काळ राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या इतिहासातील एवढ्याच कोणत्याही अवधीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान! जगाच्या कोणत्याही भागात या काळात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात जेवढ्या प्रचंड उलथापालथी झाल्या तेवढ्या पूर्वी होण्याला याच्या किती तरी पटींनी अधिक काल लागलेला आहे. आमच्या स्त्रीजीवनामध्येही गेल्या चाळीस वर्षांत अशीच उलथापालथ शीघ्र गतीने झालेली आहे!

सामाजिक सुधारणेला कायद्याचा आधार घ्यावा की नाही, हा वाद गेल्या शतकाच्या अखेरीस आणि चालू शतकाच्या प्रारंभी खूप झाला. समाजाची तयारी नसताना

त्याचेवर कायद्याने कोणतीही सुधारणा लादणे गैर आहे, ती अपेक्षेप्रमाणे फलद्रूप होत नाही, हा आक्षेपाचा एक भाग. दुसरा भाग असा की जेथे लोकमताचा पुरेसा प्रभाव पडू शकत नाही त्या परक्या सरकारच्या कायदेमंडळाच्या हातांत समाजसुधारणेचे हे कोलीत देणे परिणामी घातक ठरणारे आहे. राजकीय सुधारणा होत गेली, म्हणजे आपल्या देशाचा कारभार आपल्या लोकप्रतिनिधींच्या हाती आला, की समाजसुधारणेचा रस्ता मोकळा झाल्यासारखे होईल.

समाजसुधारणेला अनुकूल परिस्थिती

गेल्या चाळीस वर्षांच्या काळात परिस्थितीतील हा इष्ट फरक घडून आला. दोन जागतिक महायुद्धांनी त्याला फार मोठा हातभार लावला. स्वातंत्र्यासाठी चाललेल्या आमच्या प्रयत्नांचा वेग वाढला. या प्रयत्नांना जास्तीत जास्त जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणून धर्माने किंवा रूढीने घट्ट केलेले निर्बंध शिथिल करण्याचे उद्योग पुढाऱ्यांनी आरंभिले. ज्यांना ज्या सुधारणा आवश्यक वाटल्या त्यांनी प्रतिकूल लोकमताची पर्वा न करता किंवा कायद्याच्या पाठिंब्याची वाट न पहाता स्वतःच्या जबाबदारीवर त्या सुधारणा घडवून आणण्याचे कंकण बांधले. त्यामुळे सामाजिक सुधारणेसाठी अवश्य असलेली जनतेची भूमिका तयार होत चालली. दुसऱ्या बाजूला स्वराज्याच्या राजकीय चळवळीमुळे परकीय राज्यातील कारभारात लोकप्रतिनिधींच्या हक्कांची आणि अधिकारांची कमान हळूहळू वाढत चालली आणि १९४७ सालामध्ये तर संपूर्ण स्वातंत्र्यच पदरात पडले! सारांश, आंतरराष्ट्रीय आणि अंतस्थ परिस्थितीमुळे आमचे सामाजिक चित्र झपाट्याने बदलत गेले. त्याचे प्रतिबिंब महिलाश्रमासारख्या संस्थांतून उमटल्यावाचून कसे राहील!

जुन्या समस्या सुटत चालल्या, नवीन पुढे येत चालल्या!

जातीचा किंवा धर्माचा विचार न करता निराश्रित आणि अनाथ महिलेला आश्रयासारखे साहाय्य करणे या कल्पनेतून महिलाश्रमाचा जन्म झाला. 'निराश्रिता' आणि 'अनाथ' या शब्दांच्या प्रारंभीच्या अंधुक आणि अस्पष्ट कल्पना पुढे अनुभवाने स्पष्ट होत गेल्या. सहाय्य या शब्दाची व्याप्ती वाढवावी लागली. मुलावाचून केवळ महिलेचा विचार करता येत नाही, याचा साक्षात्कार होत चालला. स्त्री 'निराश्रित' होण्याच्या विविध कारणांचा हळूहळू शोध लागून ती कारणे नाहीशी करण्यासाठी सार्वजनिक संस्थांची उपयुक्तता वाटू लागली. परिस्थितीबरोबर स्त्रीजीवनातील समस्याही झपाट्याने पालटत चालल्या असून त्या सोडविण्याकडे विचारवंत पुरुषांनी लक्ष देण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. जुन्या समस्या सुटत चालल्या नाहीत तोच नवीन नवीन समस्या अचानकपणे पुढे येऊन पूर्वीचा गोंधळ बरा होता, असे म्हणण्याची पाळी कित्येकांवर आली आहे!

स्त्री-शिक्षण, प्रौढविवाह, विधवाविवाह, सार्वजनिक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता, इ० सुधारणा समाजाने आता पचनी पाडलेल्या आहेत. एकपत्नीकत्वाचे बंधन कायद्यानेच घातलेले आहे. त्याच्या जोडीला घटस्फोटाची आता मुभा मिळालेली असल्यामुळे दांपत्यातील वितुष्टातून मार्ग काढणे शक्य झाले आहे. या सवलतीमुळे उठल्या सुटल्या घटस्फोटाचे स्फोट होऊन कुटुंबसंस्था उद्ध्वस्त होते की काय या भीतीला अद्यापि तरी आधार मिळालेला नाही. तसे होऊ नये म्हणून कायद्यामध्ये आवश्यक त्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. पण घटस्फोटाचा दरवाजा अजिबात बंद होता तेव्हा काही जातींतील स्त्रियांचा मोठा कोंडमारा होत असे, ही गोष्ट अनुभवाने सिद्ध आहे. अनाथाश्रमात सनाथांचीच, म्हणजे सुवासिनींचीच, गर्दी विशेष असते हे आमच्या लक्षात अगदी पहिल्या वर्षीच आले! आणि वर्षामागून वर्षे लोटली तरी त्या अनुभवात फरक पडलेला नाही! 'बाई, तू पाहिजे तेवढे शीक. आम्ही तुझ्या शिक्षणाची सगळी व्यवस्था करतो. शिकल्यावर तुला नोकरी करता येईल व तू स्वावलंबी होशील' हा उपदेश ऐकून घेण्याच्या अवस्थेमध्ये फारच थोड्या स्त्रिया आढळल्या! 'आम्ही इथे शिकण्याकरिता आलो नाही. आमचे लग्न करून द्या. आम्हाला मुलाबाळांचा संसार करायचा आहे' असे ठणकावून सांगणाऱ्या विवाहित पण परित्यक्ता बायकाच फार! वय विशी-पंचविशीमधले असल्यामुळे त्यांना दोष देता येत नाही. अशा परिस्थितीत पुरुषांना आपली 'भूक' शमविण्याचे मार्ग जसे मोकळे असतात तसे स्त्रियांना नसतात. कायद्याप्रमाणे दुसरे लग्न करण्याची किंवा पहिल्या लग्नाचा विच्छेद मिळविण्याची स्त्रीला मुभा नव्हती. तेव्हा झिजून झिजून आमच्यासमोर अशा स्त्रिया मेल्याची उदाहरणे आहेत. विधवाविवाहाच्या कायद्यानंतर बरोबर शंभर वर्षांनी पास झालेल्या विवाह-विच्छेदाच्या कायद्याने परित्यक्ता स्त्रियांना आशेचा थोडातरी प्रकाश दाखविला आहे!

स्त्री शिकली; आता नोकरी!

'स्त्रियांना शिकून काय नोकरी करायची आहे थोडीच?' असा एक ठेवणीतला आक्षेप साठउत्तर वर्षांपूर्वी स्त्री-शिक्षणाविरुद्ध सनातनी लोकांकडून घेण्यात येई. पण आज स्त्रियांना नोकरीसाठी जास्तीत जास्त शिकण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. लग्नासाठी देखील शिकलेली किंवा नोकरी करणारी मुलगी लागते! म्हणजे पुरुषांप्रमाणे स्त्रियांना शिक्षणाचे जास्तीत जास्त मार्ग उपलब्ध करून देण्याची पहिली अडचण, आणि शिक्षणानंतर तिला कोठेतरी नोकरी शोधून देण्याची जबाबदारी आली, ही दुसरी अडचण! नोकऱ्यांच्या बाबतीत स्त्री पुरुषांशी स्पर्धा करू लागली. म्हणून पुरुषांच्या बेकारीत स्त्रियांच्या बेकारीची भर!

एकटी स्त्री समाजात असुरक्षित

नोकरीच्या या आवश्यकतेमधून आणखी एक समस्या निर्माण झाली आहे.

पुरुष नोकरीसाठी वाटेल त्या गावी, वाटेल त्या ठिकाणी, जाऊ शकतो. पण स्त्री जाऊ शकत नाही. तिला कोणाचा तरी आधार किंवा संरक्षण लागते. एकटी राहील तर तिला अहोरात्र भीती! सगळ्याचेच डोळे तिच्याकडे! शिक्षिका, ग्रामसेविका, परिचारिका, कुटुंबनियोजन-प्रचारिका, असे कितीतरी मार्ग आज थोडे शिकलेल्या केवळ स्त्रियांसाठी खुले झालेले आहेत. नोकरीपूर्वी केवळ शिक्षणासाठी देखील स्त्रियांना आपले घर आणि कुटुंब सोडून दुसरीकडे रहाण्याची पाळी येते. सर्वच ठिकाणी जवळचे नातेवाईक नसतात आणि क्वचित असले तरी जागेच्या सार्वत्रिक टंचाईमुळे आपल्या आधीच भरगच्च कुटुंबात आणखी एका प्रौढ मुलीची सोय करणे त्यांना अडचणीचे वाटते. शिकणाऱ्या किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी सुरक्षित जागा म्हणून हल्ली शहरातून वसतिगृहे निघू लागलेली आहेत. पण गरजेच्या मानाने त्यांची संख्या फारच तोटकी आहे. धंदा म्हणून खाजगी रीतीने ही गरज भागवू इच्छिणारे लोक 'गरजवंताला अक्कल नसते' या म्हणीचा पदोपदी प्रत्यय आणून देण्याकरिता की काय, मागणी-पुरवठ्याच्या चक्रातील बाजार उघडउघड मांडतात. सर्वांना ही पिळवणूक परवडण्या-सारखी नसते. पण या बाबतीत शहरापेक्षा खेड्यात सर्वच आकाश फाटल्यासारखे वाटते. शहरापेक्षा खेड्यात राहाण्याची जागा सुलभतेने मिळण्याची अधिक शक्यता. पण गावगुंडांपासून किंवा समाजकंटकांपासून आत्मसंरक्षणाच्या साधनांची तेथे अधिक दुर्मिळता! ज्यांच्याकडे दाद मागायची तेच गावगुंडांपैकी कोणीतरी! आणि कोणी रक्षणाला आलेच तर त्याचा जीव धोक्यात! परिचारिकेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही महिने कोठेतरी खेड्यात राहून काम करण्याची सक्ती असते. अशा बहुतेक मुली अविवाहित असतात. खेड्यात एकटे राहणे-वावरणे त्यांना भीतिदायक वाटते. गुंडांच्या उपद्रवाला अनिच्छेने बळी पडून अनाथाश्रमांचा उंबरठा चढावा, लागल्याची उदाहरणे आमच्या डोळ्यांपुढे आहेत. मग नातलगांचा दुरावा, नोकरीची पंचाईत, विवाहाची पंचाईत!

स्त्रियांसाठी वसतिगृहे

स्त्रीने नोकरी करणे गरजेच्या अपरिहार्यतेमुळे समाजात आता इतके रुळले आहे की त्याबद्दल आक्षेप घेण्यास जागा उरली नाही. नोकरीदार अविवाहित स्त्रीच्या अडचणींची कथा वर सांगितली. अशा स्त्रियांसाठी जबाबदार चालकांकडून शक्य तितक्या कमी खर्चात निभतील तितकी वसतिगृहे पाहिजे आहेत. स्त्री विवाहित असेल तर आणखी निराळ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. पहिली अडचण रहाण्याच्या जागेची. नोकरीच्या ठिकाणापासून राहाण्याचे ठिकाण दूर असेल तर वेळेवर वाहन मिळण्याची अडचण, जाण्यायेण्यात वेळेचा व्यर्थ क्षेप, जागा मिळविण्यासाठी प्रारंभीच भरावा लागणारा भुर्दंड, हे कर्ज फेडण्यासाठी दरमहा मिळकतीपैकी द्यावा लागणारा अंश, रहाण्याची जागा झोपडपट्टी असेल तर दैनंदिन हरएक अडचणी, दादा लोकांच्या

साह्याने चौदा वर्षांपूर्वी हा प्रयोग सुरू केला. नवरा असेल तर त्याची प्राप्ती अपुरी म्हणून आणि नसेल तर कुटुंबाच्या पोषणाची आणि मुलांच्या शिक्षणाची सर्वच जबाबदारी शिरावर पडली म्हणून, स्त्रीला मिळकतीचे काही साधन शोधावे लागते. याशिवाय आईबाप किंवा त्यांपैकी कोणी एक जिवंत असून मुले पुष्कळ, त्यांतील मुलींची लग्ने सहजासहजी होऊ शकत नाहीत आणि शिक्षणात त्यांची प्रगती होत नाही, अशा स्थितीत प्रौढ मुलींनी काही उद्योग करून कुटुंबाचा आर्थिक भार हलका करावा किंवा आपले भटकणारे मन कोठेतरी गुंतवून ठेवावे म्हणूनही नोकरीधंद्याची आवश्यकता उत्पन्न होते. नोकरीनिमित्त स्त्रियांना घराबाहेर बराच वेळ राहावे लागत असल्यामुळे पूर्वी ज्या गोष्टी स्त्रिया फावल्या वेळी घरी करीत असत त्या बाजारातून आयत्या विकत आणण्याची प्रथा आता निदान लहानमोठ्या शहरातून सर्रास पडत चाललेली आहे. याचा फायदा घेऊन पापड, लोणची, मेतकूट, मसाले विकणाऱ्या दुकानदारांनी मोठमोठी घरे बांधल्याची उदाहरणे डोळ्यासमोर आहेत. महिला मंडळांनी हा व्यवसाय उचलून आपल्या संघटनेमार्फत गरजू स्त्रियांना फावल्या वेळात प्राप्तीचे साधन पुरविण्याचा उपक्रम आरंभिला आहे. पण घरगुती पद्धतीने केलेले हे जिन्नस मोठ्या प्रमाणावरील कारखानदारांशी टक्कर देऊ शकत नाहीत, म्हणून व्यवसायाचे क्षेत्र मर्यादित आणि प्राप्तीही बेताबाताची. यापेक्षा अन्य उत्पादन करणाऱ्या कारखानदारांकडून जे काम विशेष प्रयासावाचून कारखान्याबाहेर अन्यत्र करवून घेता येण्यासारखे आहे ते महिला संस्थांना आपल्या जागेत गरजू स्त्रियांना पुरविता येईल. श्रद्धानंद महिलाश्रम चारपाच कारखानदाराकडून अशी कामे मिळवून ६०–७० स्त्रियांना त्यांचे संसार चालविण्याला मदत करीत आहे. पण मागणीच्या मानाने हे प्रयत्न कितीतरी तोटके पडतात. आर्थिक जीवन इतके कष्टाचे होत चाललेले आहे की असा एकही दिवस जात नाही की जेव्हा दोनचार स्त्रिया तरी डोळ्यात पाणी आणून आपल्या मकास चेहऱ्याने आश्रमाचे दाराशी काहीतरी कामाची मागणी करण्यासाठी येत नाहीत! पण एकटा-दुकटा महिलाश्रम हा बेकारीचा प्रश्न सोडवू शकणार आहे थोडाच! 'सगळ्या जागा कधीच भरल्या. सुतं तुम्हाला देता येण्यासारखे काम नाही' हे ठराविक उत्तर महिलाश्रमाच्या कार्यवाहाचे तोंडून ऐकले की डोळ्यातील पाणी धारांचे रूपाने वाहू लागते आणि जड पावलाने बाई पाठमोरी होते!

कुटुंबसंस्थेला क्षय

जातिसंस्थेवर प्रहार करण्याचे काम गेली कितीतरी दशके या देशात चालू आहे. पण जो जो ठेचावे तो तो तिला नवीन जीवन प्राप्त व्हावे असा विचित्र अनुभव येत आहे. याचे उलट कुटुंबसंस्था मात्र कोणी कधी प्रहार न करताच केवळ परिस्थितीमुळे डबघाईला आलेली आहे! त्याच्या कारणांचा विस्तार करण्याचे हे स्थळ नव्हे. या कारणांनी घडून आपलेले कार्य म्हणून एवढेच सांगता येईल की गेल्या दोनतीन

काय पण पूर्वी सौभाग्याचे अलंकार समजले जाणारे कुंकू व बांगडी यांचा वैधव्यामध्ये त्याग न करण्याची प्रवृत्ती सुशिक्षित स्त्रियांमध्ये वाढत आहे ती अनिष्ट समजण्याचे मुळीच कारण नाही. विधवाविवाह समाजाने पुनीत केलेला आहे. श्रद्धानंद महिलाश्रमाच्या प्रारंभीच्या काळात हे काम थोडे अवघड होऊन बसलेले होते. म्हणजे विधवेशी धिटाईने लग्न तयार करण्यास तयार होणारे क्वचित. कोणी तयार झालेच तर विवाहविधी करणारा ब्राह्मण मिळणे कठीण. विवाहानंतर कुटुंबात आणि चाळीत लोकांच्या कुचेष्टेचा विषय. पुनर्विवाहित दांपत्याच्या मुलामुलींच्या लग्नाची अडचण आणि अशी लग्ने लावणारे ब्राह्मण विरळा. अर्थात विधीसाठी अडेल तेथे आम्हा कार्यवाहांना पुढे व्हावे लागे! विधवा किंवा पतित यांमध्ये तत्त्वतः फारसे अंतर नसल्यामुळे सांगून सवरून पतितांची लग्ने होण्यास आता अडचण पडत नाही. हीच गोष्ट जातीजातीतील विवाहाविषयी म्हणता येईल. विवाहाचे बाबतीत जातीची व पोटजातीची बंधने आता पुष्कळच शिथिल झालेली असल्यामुळे विवाहाच्या निवडीचे क्षेत्र उत्तरोत्तर विस्तृत होत चालेले आहे.

बालविवाहाचा लंबक प्रौढविवाहाकडे वळला. आता तर कायद्यानेच विवाहाची वयोमर्यादा २१ पर्यंत नेण्याच्या सूचना पुढे येऊ लागलेल्या आहेत आणि नवीनच समस्या पुढे येऊ लागल्या आहेत. बालविवाहात मुलामुलींची लग्ने ठरविण्याचा मक्ता आईबापांकडे किंवा दुसऱ्या कोणा वडील मध्यस्थांकडे असे. तेव्हा वांधा उत्पन्न झालाच तर देण्याघेण्यावरून. पण आता आईबापांच्या बरोबरीने किंवा त्यांचा विचार न घेताच, वधुवरांची त्यांच्या इच्छेने निवड होऊ लागल्यामुळे विवाह जमणे जरा कठीण होऊन बसले आहे. त्यातूनच प्रौढ कुमारिकांचा प्रश्न पुढे आला. 'माझे वय ३५ आहे, माझ्यात कोणतेही व्यंग नाही. पण माझे लग्न झालेले नाही. स्वतः जमविल्यास फसली जाण्याची शक्यता आहे. विवाहसंस्थांचा अनुभव चांगला नाही. तेव्हा तुमच्या संस्थेचे या कामी मला काही साहाय्य होईल काय?' अशा पृच्छा मधूनमधून आमचेकडे करण्यात येत असतात. प्रेमविवाह यशस्वी किती आणि अयशस्वी किती याबद्दल संकलित आकडे सापडणे कठीण. पण या संदर्भात आमचेकडे बरीच पत्रे येतात की, 'अमुक माणसाने मला लग्नाचे वचन देऊन फसविले. आता तो बेपत्ता आहे. माहेरची माणसे मला थारा द्यायला तयार नाहीत. म्हणून आपल्या आश्रमात मला आश्रय मिळावा'. कुमारिका मातांची संख्या वाढू लागली आहे असे आमच्या संग्रहातले आकडे दर्शवितात. गर्भपाताला कायद्याची मान्यता मिळवून देण्याची नवीन मोहीम अलीकडे सुरु झालेली आहे त्यामुळे ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे!

बंदिस्त स्त्री बाहेर पडली, पण —

घरामध्ये बंदिस्त असलेली स्त्री शिक्षण, नोकरी, प्रवास, क्रीडा, करमणूक, न्यायपेयालये, बाजार, प्रदर्शने, इत्यादी कितीतरी निमित्तांनी आता घराबाहेर पडलेली

आहे. पुरुषांशी मिसळण्याचे प्रसंग तिला हरघडी येतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत वावरण्याची तिला मुभा मिळालेली आहे. यामुळे स्त्रीजातीची शारीरिक किंवा नैतिक दृष्ट्या हानी झालेली आहे, असे विधान करण्यास आधार नाही. त्याचे उलट असे विधान करण्यास हरकत नाही की अलीकडील स्त्री अधिक धीट, अधिक चौकस, अधिक बहुश्रुत, अधिक स्वावलंबी व म्हणून अधिक आत्मविश्वासपूर्ण होत चाललेली आहे. तथापि काही प्रसंग असे असतात की ज्या वेळी त्यांना योग्य मार्गदर्शन झाले तर त्यांचा पाय घसरणार नाही, किंवा त्यांचे हातून अज्ञानाने किंवा मोहाने होणाऱ्या चुका टाळता येतील. यासाठी जबाबदार महिलांची आणि कायदेपंडितांची सल्लागार मंडळे स्थापन झाली तर बरे होईल. अशा प्रश्नांची एका खाजगी बैठकीत चर्चा चालू असता एका हायकोर्ट जजाने स्वानुभवावरून असे सांगितले की अशा गोष्टी वकिलाकडे आणि कोर्टाकडे गेल्या तर अधिक नासतात, न्यायाची परवड होते. म्हणून शक्य तर खाजगी रीतीने जबाबदार लोकांकडून त्याची शहानिशा करण्याचा प्रघात पडणे जरूर आहे. समाजकार्य करणाऱ्या संस्थांनी हे कार्य हाती घेण्यासारखे आहे.

पुरुष नामानिराळा !

स्त्री मोहाला वश होऊन आपण होऊन भ्रष्ट होते किंवा पुरुष फसवून, कसले तरी आमिष दाखवून, किंवा बलात्काराने, तिला भ्रष्ट करतो. आजच्या सामाजिक कल्पने-प्रमाणे दोन्ही बाबतीत ती जन्माची कलंकित होते. समाज तिला दूर लोटतो. कुटुंबातून आणि जातीतून ती बहिष्कृत होते. अशा वेळी तिला तीनच मार्ग मोकळे असतात — आत्महत्या, परधर्मस्वीकार किंवा कुंटणखाना ! यातूनच कित्येक वेळा तिचे हातून बालहत्येचा गुन्हा घडून तिला जन्मठेपीच्या शिक्षेला पात्र व्हावे लागते ! तिला भ्रष्ट करणारा पुरुष मात्र नामानिराळा राहून समाजात उजळ माथ्याने फिरू शकतो, इतकेच नव्हे तर असले गुन्हे सहजासहजी पचू शकतात म्हणून अधिकच निर्ढावून तो तसले आणखी गुन्हे करण्यास प्रवृत्त होतो ! स्त्रीच्या साक्षीने गुन्हेगार शोधून काढणे कठीण नसले तरी न्यायालयात गुन्हा शाबीत होणे कठीण जाते. आधी त्या पुरुषाला न्यायालयात खेचण्यास स्त्री किंवा तिचे नातेवाईक तयार नसतात. कारण गुन्हा शाबीत झाला काय, किंवा न झाला काय, स्त्रीची अब्रू चव्हाट्यावर येते ही भीती ! एवीतेवी कलंक लागला आहे, आता चारचौघांत आणखी शोभा कशाला, झाले ते मुकाट्याने निस्तरले पाहिजे, अशी मनाची समजूत करून तोंड दाबून त्यांना बुक्क्यांचा मार सहन करण्यावाचून दुसरे गत्यंतर नसते. म्हणून अधिक सभ्रा न करता पुढील गोष्टी शक्य तितक्या गुप्तपणे पार पाडण्याकडे संबंधित लोकांची प्रवृत्ती असते.

पतित आणि विधवा एकच

पण अशा गोष्टी गुप्त राहूच शकत नाहीत. या ना त्या रीतीने त्यांना वाचा फुटल्यावाचून रहात नाही. निवडुंगांत फेकून दिलेले व्यभिचारोत्पन्न मूल सापडले आणि

पंढरपूरच्या अनाथ बालकाश्रमाचा जन्म झाला. त्यामुळे बालहत्येला प्रतिबंध बसला. पतित स्त्रीचा त्याग हे देशातील परमधर्मीयांची संख्या वाढण्याचे एक कारण आहेच. पण हिंदू समाजाने असल्या पतितांकरिता संस्था काढण्याचेही एक कारण आहे. हिंदू समाजाने असल्या पतितांकरिता संस्था काढण्याचे सुरू केल्यावर बालहत्येला काही अंशी आळा बसला आणि परधर्माकडे नाइलाजाने जाणारा ओघ थोडा आटला. कुंटण-खान्याचीही काही बाजू ओस पडली. समाज पूर्वीपेक्षा अधिक उदार आणि समंजस झाल्यामुळे विधवांप्रमाणे पतितांनाही भवितव्यामध्ये आशेचे काही किरण दिसू लागले. विधवा आणि पतित यांमध्ये तत्त्वतः काही फरक नसल्यामुळे सांगूनसवरून पतित स्त्रीचा विवाह होणे आता तीस वर्षांपूर्वीइतके कठीण राहिलेले नाही. एकदा पतित म्हणजे कायमची पतित या गणिताला अनुभवाचा आधार नाही. पतित स्त्रियांनी विवाहोत्तर चांगले संसार केल्याचे दाखले पाहिजे तेवढे आहेत. संस्थेतर्फे असले विवाह न होता नातेवाईकांनी ते केले तर मुलीच्या पूर्वेतिहासासंबंधी काहीएक लपवून न ठेवणे मुलीच्या हिताचे दृष्टीने अत्यावश्यक असते. कारण आपली पत्नी 'उपभुक्त' आहे हे नवऱ्याचे लक्षात येण्यास वेळ लागत नाही. आपली फसवणूक करून देण्यात आली तर तो पत्नीचा त्याग करील किंवा तिला अवहेलनेने वागवील, कदाचित फसवणुकीबद्दल पत्नीच्या नातलगांना न्यायालयात खेचील! इतकी गुंतागुंत निर्माण करून मुलीला चिखलात अधिक खोल लोटण्यापेक्षा सर्व गोष्टी एकमेकांना समजून करणे सर्वांच्याच हिताचे नाही काय? मुलीला भ्रष्ट करणारा माणूस तिच्याशी मागाहून विवाह करण्यास तयार असेल तर त्याच्यापासून विवाहापूर्वी झालेले तिचे मूल कायदेशीर होऊ शकते आणि जननिंदेपासून ती अजिबात सुटली नाही तरी दांपत्याचे मूल त्याचेजवळच राहून वाढविता येते. मुलाला आपले खरे आईबाप जन्मभर लाभू शकतात. पण गुन्हेगार माणूस आधीच विवाहित असतो, अशिक्षित किंवा बेकार असतो, वयाने मोठा असतो, किंवा मवाली असतो, तेव्हा तो तयार असला तरी त्याच्या गळ्यात मुलीला बांधून उघड्या डोळ्यांनी तिचे जन्माचे नुकसान करण्यास नातेवाईक किंवा संस्थांचे चालक स्वाभाविकच तयार नसतात.

पोटचे मूल स्वतःच 'बाळगावयास'

तीनचार उदाहरणे अशी घडली की मुलगी व मुलगा 'व्यभिचारानंतर' आणि मुलाच्या जन्मानंतर एकमेकांशी विवाहाने बद्ध होण्यास व ते मूल आपले म्हणून घेऊन जाण्यास आनंदाने तयार असताना केवळ नातेवाईकांच्या विरोधामुळे त्यांना ते मूल बरोबर नेणे अशक्य झाले. पोटच्या मुलाची ताटातूट करणे आईच्या जिवावर आले. तिने मोठा आकांतही केला! यावर पुढे अशी तोड काढण्यात आली की आईबापांनी हे विवाहपूर्व मूल काही महिने किंवा वर्षे आश्रमातच वाढू द्यावे व पुढे परिस्थिती थोडी अनुकूल दिसताच ते मूल 'बाळगावयास' म्हणजे दत्तक म्हणून न्यावे म्हणजे

मुलाला खरे आईबाप मिळाले आणि आईबापांना आपले मूल मिळाले! जननिंदेला थोडी मुरड घालायला मिळाली. पती आणि पत्नी प्रेमाने बद्ध, वय, जात, शिक्षण व संस्कृती यांचे दृष्टीने दोघांमध्ये कसली तफावत नाही, अशा वेळी या गोष्टी सहज होऊ शकतात. मूल संस्थेत असेपर्यंत त्याचा खर्च या दांपत्याकडून मिळत असे. तसेच मुलाची ओळख (किंवा लळा) कायम रहावा म्हणून मधूनमधून आई काहीतरी निमित्ताने त्याला भेटून आणि कुरवाळून जात असे.

दत्तकविधानात इष्ट परिवर्तन

गेल्या २०-२५ वर्षांमध्ये आपल्या समाजात जी अनेक इष्ट परिवर्तने सहजासहजी घडून आलेली आहेत त्यामध्ये दत्तकाच्या भावनेला बरेच वरचे स्थान दिले पाहिजे. म्हणजे ज्याच्या गणगोताची काही माहिती नाही अशा 'अनाथ' मुलाला निःशंकपणे आपले मूल म्हणून बाळगावयास नेणाऱ्या निपुत्रिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र मुलीपेक्षा मुलगा मागणारांची संख्या फार! मृत्यूनंतर आपणाला 'पिंड' द्यायला कोणी पाहिजे म्हणून नव्हे, तर मुलावाचून घर ओसाड दिसते, शेजाऱ्याप्रमाणे कोडकौतुक करायला घरात मूल नाही, या विषण्णतेमुळे! शिवाय हल्ली सर्वांची वयोमर्यादा वाढत चालली असल्यामुळे 'म्हातारपणाची काठी' म्हणूनही मूल हवेसे वाटते. किंवा कोणाला आपल्या मालमत्तेला वारसदार हवासा वाटतो! मुलगी लग्न झाल्यावर दुसऱ्याचे घरी जाणार — अर्थो हि कन्या परकीय एव — म्हणून ती दत्तक नको असते. तथापि या दत्तकविधानात कायद्याची एक गोम आहे. बाळगावयास नेलेले मूल कायदेशीर रीत्या दत्तक ठरत नसल्यामुळे त्याला वारसा हक्क मिळू शकत नाही. दत्तक बापाने त्याचेकरिता मृत्युपत्र करून ठेवले तर गोष्ट निराळी. पण तशी व्यवस्था करण्यास तो चुकला तर बापाचे टपून बसलेले दूरचे नातलग त्याच्या इस्टेटीभोवती माशांप्रमाणे घोंगावू लागतात आणि बाळगावयास नेलेले मूल अगदी उघडे पडते! कोर्टकचेऱ्या करून आपला हक्क शाबीत करणे त्या मुलाच्या शक्तीबाहेरचे काम होऊन बसते.

जातगोत न पहाता 'दत्तक' म्हणून बाळगावयास नेलेले मूल आणि परंपरागत धर्मशास्त्राप्रमाणे जातकुळी पाहून अगदी जवळचे दत्तक घेतलेले मूल यांचे अनुभव हा सामाजिक संशोधनाचा एक विषय होऊ शकेल. त्यासाठी पुरेशी माहिती जमवावी लागेल. तथापि एकाच आईबापाच्या मुलामुलांत आढळणारा फरक, जातकुळी पाहून धर्मशास्त्राप्रमाणे दत्तक मुलांचे डोळ्यापुढील बरेवाईट अनुभव, यांचेहून अनाथालयातील बाळगावयास नेलेल्या मुलांचे अनुभव यांमध्ये विशेष फरक आढळेल असे वाटत नाही. पत्रिका पाहून मुहूर्तावर केलेली लग्ने आणि पत्रिका न पहाता (मुहूर्तांऐवजी) सोयिस्कर दिवशी केलेली लग्ने यांत यशापयशाचे दृष्टीने कोठे तफावत आढळते?

सनातनी सुधारक होतात!

'वचनात् प्रवृत्तिः वचनात् निवृत्तिः' किंवा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मांचे कंकण

बांधून समाजसुधारणेला विरोध करणारे लोक अनाथाश्रमातील उदाहरणे प्रत्यक्ष पाहून पाझरू लागतात आणि उतार वयात आपले रूढिग्रस्त विचार व आचार सोडून देण्यास स्वतः तयार झाले नाहीत तरी 'तुम्ही करता हे काम सामाजिक न्हास थांबविण्यास उपकारक ठरणार आहे' असा आशीर्वाद देण्यापर्यंत तरी त्यांच्या मनाची तयारी होऊ शकते, असे अनुभव व्यक्तिशः मला अनेक येऊन गेले. माझे मित्र आणि महाराष्ट्र वर्णाश्रम स्वराज्यसंघाचे अध्यक्ष पुण्याचे (कै.) विश्वासराव डावरे यांनी आमच्या आश्रमाला भेट दिली, तेव्हा हा अनुभव आला. आमच्यापुढे रोजच्या रोज उत्पन्न होणाऱ्या विविध समस्या त्यांच्यापुढे प्रत्यक्ष उदाहरणासह मांडून त्यांवर त्यांची 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' अक्कल मी विचारली, तेव्हा ते निरुत्तर झाले, इतकेच नव्हे तर आपले उपरणे डोळ्यांना लावून घळघळा गळणारे अश्रू टिपू लागले! पुढे मला इतकेच म्हणाले की, "कालमानाने उत्पन्न होणारे हे प्रश्न, विशेषतः स्त्रिया व मुले यांचे प्रश्न, तुम्ही धिटाईने सोडवीत आहा. तुमची सेवा परमेश्वराचे घरी रुजू आहे. धन्यवाद!" लोकनायक माधवरावजी अणे अद्यापि विद्यमान आहेत. ३५ वर्षांपूर्वी मी त्यांना आश्रमात नेऊन, "अनाथाश्रमात अनाथ स्त्रियांपेक्षा सनाथ (म्हणजे परित्यक्ता) स्त्रियांचीच गर्दी विशेष असते. विवाहविच्छेदन कायद्याला (त्यावेळी) मंजूर नसल्यामुळे या स्त्रिया झिजून झिजून समाजाला शिव्याशाप देत मरतात. याला उपाय काय?" असा प्रश्न विचारला. कायदेभंगाच्या त्या काळाला अनुलक्षून बापूजी मला म्हणाले, "अप्रिय कायद्याचा भंग फक्त राजकीय क्षेत्रातच करावा असे थोडेच आहे? सामाजिक क्षेत्रांतही त्याची अमलबजावणी केली तर सरकार आणि जनता या दोघांची सदसद्विवेकबुद्धी जागृत केल्याचे श्रेय मिळणार नाही काय?" परित्यक्ता बायकांची उघडपणे लग्ने लावून देऊन त्यासाठी होणारे शासन संबंधित लोकांनी धिटाईने आणि मुकाट्याने सोसावे, असे अणे यांनी सुचविले! (आता विशेषप्रसंगी विवाह विच्छेदनाची अनुज्ञा देणारा कायदा स्वकीय सरकारने संमत केलेला आहे.) स्त्रियांना वारसाहक्क देणारे विधेयक जुन्या मध्यवर्ती कायदेमंडळात मांडताना मुंबईचे (कै०) डॉ. गोपाळराव देशमुख यांनी माझ्याकडून आश्रमातील स्त्रियांची माहिती जमवून नेलेली होती.

आमच्या स्त्रीजीवनामध्ये नवीन उत्पन्न झालेल्या समस्या अशा आहेत. या प्रत्येक समस्येची कितीतरी उदाहरणे प्रत्यक्ष कार्य करणारांच्या डोळ्यासमोरून नित्य जातात. वाङ्मयातून त्यांना वाचा फुटलेली आहे. ४०-५० वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिषदांमधून ज्या प्रश्नांचा मुख्यतः ऊहापोह होत असे ते प्रश्न सुटले म्हणून आता मागे पडत चालले असून या नवीन प्रश्नांनाच त्या परिषदांमधून प्राधान्य मिळू लागले आहे. म्हणजे राजकीय परिषदांप्रमाणे सामाजिक परिषदांचे स्वरूपही आता पालटले आहे. शासनाला स्वतंत्र समाजकल्याण खाते काढावे लागले आहे. त्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यासाठी दरसाल कोट्यवधी रुपये खर्ची पडत आहेत.

२०

आंतरभारतीय स्त्रीजीवन

श्रीपाद रघुनाथ जोशी

श्री. श्रीपाद रघुनाथ जोशी (जन्म २३-१-१९२०) पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमध्ये काम. महाराष्ट्रातील एक बहुभाषी व्यासंगी लेखक. वर्तमानपत्रांत व नियतकालिकांत विपुल लेखन. मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराती व बंगाली या भाषांतील अनेक उत्कृष्ट साहित्यकृतींचे अनुवादक अनेक स्वतंत्र पुस्तकांचे लेखक. काही पुस्तकांचे इतर भाषांत अनुवाद झाले आहेत. ('श्री. रघुवंश' डॉ. केतकर पथ, पुणे ४)

अखिल भारतीय पातळीवर विचार

राजकीय दृष्ट्या भारत हे एक सुसंघटित व संपूर्ण राष्ट्र असले तरी सांस्कृतिक दृष्ट्या त्याच्यात खूपच विभिन्नता आढळते. संस्कृतीमध्ये धर्माचा समावेश केल्यास ढोबळ मानाने भारताला एक संपूर्ण सांस्कृतिक घटक मानण्यास हरकत नाही. अर्थात जगातील बहुतेक सर्वच प्रमुख धर्म या देशात नांदत असल्यामुळे हे विधानही तितके तंतोतंत बरोबर ठरणार नाही. वेगवेगळ्या धर्मांच्या पार्श्वभूमीवर विभिन्न संस्कृती येथे नांदत आहेत असे म्हणावे लागेल. परंतु इतक्या खोलात न शिरता आपण ढोबळ अर्थानेच या प्रश्नाकडे पाहणे बरे. नेहमी वापरण्यात येणारी कमल-पुष्पाची उपमा घेऊन आपल्याला असे म्हणता येईल की, एकूण भारतीय जीवन हे कमळासारखे असून विभिन्न प्रदेशांचे त्यातील स्थान कमळाच्या पाकळ्यांसारखे आहे. याचा अर्थ असा की एकतेच्या एका सूक्ष्म सूत्राने या विविध अंगांना एकत्र बांधून त्यांतून एक सुंदर कलाकृती निर्माण केलेली आहे. हीच गोष्ट आंतरभारतीय स्त्रीजीवनासंबंधीही खरी आहे. बाहेरच्या लोकांच्या दृष्टीने अखिल भारतीय स्त्रीचे एक सर्वसामान्य स्वरूप असते. त्यातील बारकावे व भेद त्यांना कळतातच असे नाही. परंतु भारतीय माणसाला मात्र, त्याने डोळसपणे पाहिल्यास, आंतरभारतीय स्त्रीजीवनातील वैचित्र्य व वैविध्य सहज दिसू शकते. अखिल भारतीय पातळीवर या प्रश्नाचा विचार करताना आपण ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की कोणताही एक प्रदेश किंवा प्रांत घेतला तरी त्यातील

स्त्रीजीवनात खूपच वैचित्र्य आढळते. उदा० पश्चिम महाराष्ट्रातील शहरी स्त्रियांपेक्षा विदर्भ मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे जीवन अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. इतकेच काय पण नुसत्या ब्राह्मण स्त्रियांच्या पोटजातींचा विचार केला तरी मजेदार वैचित्र्य व वैविध्य दिसून येते. म्हणून हे सारे विवेचन फार सूक्ष्म आहे असे समजू नये.

एकतेचा सूक्ष्म परंतु मजबूत धागा

या वैचित्र्याचा किंवा वैविध्याचा विचार करण्यापूर्वी आंतरभारतीय स्त्री-जीवनात गुंफला गेलेला एकतेचा सूक्ष्म परंतु मजबूत धागा कोणता आहे, त्याचे स्वरूप काय आहे, हे पाहणे योग्य होईल.

या धाग्याचा विस्तार करताना सर्वांत प्रथम जी गोष्ट नजरेसमोर येते ती म्हणजे भारतीय स्त्रीची धार्मिकता, देवभोळेपणा, लोकभ्रमाभिभूतता, परलोकपरायणता, कर्मकांडदास्यता वगैरे गोष्टी सर्वच भारतीयांना लागू होतात. त्यात शिक्षित-अशिक्षित, शहरी-ग्रामीण, श्रीमंत-गरीब असा भेद करण्यास फारसा वाव नसतो. इतकेच नव्हे, तर हिंदु, मुसल्मान, ख्रिश्चन, बौद्ध, यहुदी, पारशी वगैरे धर्मांच्या अनुयायांतही फारसा फरक करता येत नाही. परंतु स्त्रियांतील धार्मिकतेचा एक त्याहून वेगळा असा प्रकार आहे. कृषिप्रधान समाजात स्त्री ही एक मालमत्ता व उपभोग्य वस्तू समजली जात असल्यामुळे भारतात तिला स्वाभाविकपणेच दुय्यम स्वरूपाचे स्थान परंपरेने प्राप्त झालेले आहे. सीतेशिवाय राम अश्वमेध यज्ञ करू शकतो, परंतु रामाशिवाय सीतेला अस्तित्व असू शकेल अशी कल्पना भारतीय मनाला करिता येत नाही. त्यामुळे येथे पती हा देव ठरला. सौभाग्य हे स्त्रीचे सर्वश्रेष्ठ धन समजले गेले. त्यातूनच मंगळागौर, वटसावित्री (महाराष्ट्र), गणगौर (राजस्थान), पंगुनी नोंबु (तामिळनाडमधील वटपूजेव्यतिरिक्त वटसावित्री) यांसारखी सौभाग्याला प्राधान्य देणारी पतिनिष्ठ व्रते निर्माण झाली. सौभाग्यालंकार हा आजही भारतीय स्त्रीचा जीव की प्राण आहे. या अलंकाराचे स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे आहे. महाराष्ट्रात मंगळसूत्र, कुंकू व बांगड्या, आंध्र-कर्नाटकात मंगळसूत्र, कुंकू व जोडवी, बंगालमध्ये वज्रचूडा (लोखंडाची बांगडी) व भांगात सिंदूर, राजस्थानात लाखेचा चुडा, कुंकू, मेंदी व काजळ, तामिळनाडमध्ये ताळी (मंगळसूत्र), सौराष्ट्रात हातातील बांगड्या व नाकातील चमकी अशी वेगवेगळी बाह्य प्रतीके असली तरी त्या सर्वांच्या मुळाशी असलेली भावना एकच आहे — सौभाग्याच्या ठेव्याचा अमोलपणा! पुरुषनिरपेक्ष स्त्रीजीवनाची कल्पनाच भारतीय व्यक्ती करू शकत नाही. त्यामुळे मोठ्या अधिकाराच्या जागेवर असलेल्या विद्वान बुद्धिवादी स्त्रिया देखील या सौभाग्यालंकाराच्या दडपणातून स्वतःला मुक्त करून घेऊ शकत नाहीत किंवा वैधव्य प्राप्त झाल्यानंतर सौभाग्यचिन्हे वापरण्याचा बंडखोरपणाही दाखवू शकत नाहीत, असा सर्वसामान्य अनुभव आहे. 'या देशाच्या संस्कृतीचे रक्षण भारतीय स्त्रियांनीच केले आहे' असे म्हणणाऱ्या लोकांनाही बहुधा या बाह्य गोष्टीच अभिप्रेत असतात. या

बाह्य वार्तात अखिल भारतातील स्त्रियांमध्ये अद्भुत एकरूपता आढळून येते, हे मान्य करावेच लागते.

अर्थात या संदर्भात भारतीय स्त्रीच्या स्वभावातील काही श्लाघ्य वैशिष्ट्यांचाही उल्लेख करणे उचित होईल. शालीनता, समर्पणवृत्ती, निष्ठा, कलाप्रियता, पापभीरुता, सहिष्णुता वगैरे गुणांबद्दल भारतीय स्त्रीची वाखाणणी करण्यात येते. तिच्यात पुष्कळच तथ्य आहे. तिच्या या गुणांमुळेच आमची कुटुंबे इतरांना शांतीची व समाधानाची माहेरघरे वाटतात. आधुनिक स्वातंत्र्याच्या कल्पना व आर्थिक ओढाताण यांचा प्रवेश ज्या कुटुंबांतून मोठ्या प्रमाणात झालेला नाही तेथे अशा प्रकारचे शांतीचे व समाधानाचे वातावरण बहुशः आढळते यातही शंका नाही. परंतु अज्ञान व विवशता यांतून निर्माण झालेली शांतता व समाधान ही ज्ञानयुक्त व सामर्थ्याधारित शांतता-समाधानापेक्षा कमी प्रतीची असतात, हे मान्य करावेच लागेल. ते कसेही असले तरी आमच्या कौटुंबिक जीवनाचे स्वास्थ्य टिकवून ठेवण्याचे श्रेय मुख्यतः आमच्या महिलांना आहे, यात शंका नाही.

विविधतेतील सौंदर्य

भारतीय स्त्रीमधील विविधतेचे सौंदर्य मोठे लोभसवाणे असते, असे सर्वच म्हणतात. दिल्ली, मुंबईसारख्या मोठ्या शहरातील एखाद्या भपकेबाज समारंभात किंवा अखिल भारतीय स्वरूपाच्या सभा-संमेलनात अथवा मेळाव्यात जमलेल्या स्त्रियांकडे पाहिले की आपल्याला रंगीबेरंगी फुलपाखरांच्या थव्याची आठवण येते. कादंबरीतल्या महाश्वेतेसारखी मुक्तकेशा शुभ्रवस्त्रावृता, निराभरणा, श्यामला केरळकन्या आणि तिच्याच शेजारी शकुंतलेसारखी अल्लड, अवखळ, 'हवामें उडता जाये मेरा लाल दुपट्टा मलमलका' असे दाखवून तुमचे लक्ष वेधून घेणारी पंचनद (पंजाब) कन्यका, हलक्या गुलाबी रंगाची सौम्य रेशमी वस्त्रे परिधान केलेल्या सुहास्यवदना वंग-उत्कल-आसामी महिलांशेजारीच हातभर घुंघट काढलेल्या व आपल्या भडक पिवळ्या-लाल कपड्याचे प्रखर किरण तुमच्या डोळ्यात खुपसणाऱ्या सौराष्ट्र-राजस्थानच्या भगिनी, असंद किनारीची झुळझुळीत सकच्छ नऊवारी(?) लुगडी चापून-चोपून नेसलेल्या व माफक दागिने घातलेल्या मराठमोळ्या नारींशेजारीच वीतवीत रुंदीचे काठ असलेल्या अत्यंत भडक रंगाच्या रेशमी, भरजरी साड्या नेसलेल्या आणि चैत्रगौरीसारख्या पिवळ्या धमक सोन्याच्या व चकाकणाऱ्या हिऱ्यांच्या दागिन्यांनी नटलेल्या आंध्र-कर्नाटक-तामिळनाडच्या काळ्यासावळ्या रमणी, हा मेळावा कोणाही रसिकाचे लक्ष खिळवून ठेवील इतका सामर्थ्यवान खात्रीने असतो. अर्थात अशी दृश्ये आता दिवसें-दिवस कमी होत जातील असे दिसते. कारण नव्या शिक्षणाबरोबर भडक रंगांची आवड कमी होत आहे आणि आपापल्या अवजड व खर्चिक वस्त्रालंकार पद्धतीऐवजी सुटसुटीत पाचवारी पातळे आणि मोजके एकदोन दागिने वापरण्याकडे सगळ्यांच

भारतीय पुरंध्रींची प्रवृत्ती वळू लागल्याचे आढळून येते. अर्थात सुधारणेचे हे वारे आमच्या ग्रामीण व आदिवासी भगिनींपर्यंत जाऊन पोचण्यास अजून पाचपन्नास वर्षांचा कालावधी लागल्यास आश्चर्य नाही.

स्त्रीचे सामाजिक स्थान

भारतीय स्त्रीच्या या बाह्य स्वरूपाप्रमाणेच समाजातील तिच्या स्थानाच्या बाबतीतही खूपच वैचित्र्य व वैभिन्य आढळते. एकूण भारतीय समाजात मुलगा हा पितरांना पिंडदान करून स्वर्गात पोचवणारा समजला गेल्यामुळे त्याचे महत्त्व खूपच अधिक आहे. मुलीला तसे काही धर्माधिष्ठित महत्त्व नाही. (कन्यादानामुळे मिळणारे पुण्य बहुधा फारसे विचारात घेतले जात नाही.) शिवाय म्हातारपणची काठी म्हणून मुलाचे माहात्म्य आहेच. मुलगी हे 'परक्याचे धन'. ते कसेबसे सांभाळून ज्याचे त्याच्या स्वाधीन करावयाचे ही भावना. तसे करताना तिची असुंदरता आड येते, हुंड्याचा प्रचंड डोंगर (आजही) मोठ्या कष्टाने ओलांडावा लागतो, आणि लग्नानंतरही तिच्या सासरच्या लोकांकडून काही बोल लावला जाईल की काय अशी धाकधूक मनात सतत बाळगावी लागते. तिच्या चारित्र्याची रखवालदारी तर डोळ्यांत तेल घालून वर्षानुवर्षे करावी लागते, आणि म्हणूनच एखादा कवी बोलून जातो 'कन्या ही रास संकटांची!'

ही स्थिती सामान्यतः भारताच्या सर्वच प्रांतांत आहे. परंतु तिच्यात उजवे-डावेही पुष्कळच आहे. एका बाजूला राजस्थानसारखा स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत देशातील सर्वांत अधिक मागासलेला प्रदेश (५·८ टक्के) डोळ्यांसमोर उभा राहतो. या प्रदेशात एके काळी कन्याजन्माची अशी दहशत लोकांनी घेतली होती की मुलगी जन्मताच तिला मातीच्या गाडग्यात घालून ते जमिनीत पुरून टाकीत. (त्यावरून 'बाईजी पेटमंस नीकल्या पण हॉडीमंस कोनी नीकल्या' यासारख्या म्हणीही त्या प्रदेशात प्रचलित झाल्या) तर दुसऱ्या बाजूला केरळ-आसामसारखीं (देशाच्या परस्परविरुद्ध टोकांना असलेली) इतरांना स्त्री-राज्याच्या अद्भुत परीकथेसारखी वाटणारी राज्ये. आजही केरळमध्ये घरची सूत्रे आजीच्या हाती असलेली एकत्र कुटुंबे पाहावयास मिळतात. मातृसत्ताक पद्धतीचा पगडा अजूनही कोठेकोठे जाणवतो. तेथे लग्नानंतर नवरीने नवऱ्याच्या घरी नांदावयास जाण्याऐवजी पतिराजच (भिजलेल्या मांजरासारखे!) पत्नीच्या घरी राहावयास जातात. (अर्थात आता पुरुष शिक्षित होऊन नोकरीधंद्याच्या निमित्ताने परप्रांतात जाऊ लागल्यामुळे पुरुषांचा हा 'सासुरवास' आता संपुष्टात आला आहे.) अगदी अशीच स्थिती आसाममध्ये आढळते. या दोन्ही प्रांतांत स्त्रियांना पूर्वीपासून वारसाहक्क प्राप्त झालेला होता. आसामी स्त्री ही कधीच निव्वळ घरात बसून राहाणारी शोभेची बाहुली नव्हती. जीवनाच्या अनेकविध क्षेत्रांत ती पुरुषाच्या बरोबरीने भाग घेत होती. शेतातील काम, घरातील सूतकताई व विणकाम वगैरे बाबतींत तो आघाडीवर होती. आपल्या कुटुंबाला ती कधीच भारभूत नव्हती. उलट संसाराला हातभार लावणारा

एक महत्त्वाचा घटक ती होती. आसामच्या काही भागांत मुलांपेक्षा मुलीच जास्त शिक्षित आहेत. आसामी स्त्री कधीच निराधार नव्हती. (त्यामुळेच बहुधा आसामी वेश्या कोठे आढळत नाही.) शिलाँग–गुवाहाटीच्या बाजारात अनेक आसामी स्त्रिया दुकाने चालवितात, हजारो रुपयांची उलाढाल करतात आणि आपण पुरुषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही हे सिद्ध करतात. (बहुधा म्हणूनच हुंड्याच्या आपत्तीची भयंकर झळ आसामला कधी लागली नाही आणि लग्नानंतरही बायकांचे नाव बदलण्याची पद्धत तेथे रूढ नाही.)

याच्या उलट वातावरण बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान व मध्यप्रदेश या हिंदीभाषी प्रदेशांत आढळते. पडदापद्धती व स्त्रियांचा मागासलेपणा याचा परिपाक बिहारमध्ये झाल्याचे दिसून येते. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत खालून पहिला क्रमांक राजस्थानचा. त्यानंतर मध्यप्रदेश (६·७ टक्के), त्यानंतर बिहार (६·९ टक्के) आणि त्यानंतर उत्तर प्रदेश (७ टक्के). यावरूनही या भावंडांतील साम्य दिसून येईल. बिहार हा जयप्रकाश, राजेंद्रबाबूसारख्या त्यागमूर्ती कार्यकर्त्यांचा प्रांत. ज्या गांधीयुगाने भारतीय स्त्रीला घराच्या तुरुंगातून बाहेर काढून समाजसेवेचे व सार्वजनिक जीवनाचे वारे सेवन करण्याची संधी सर्वांत प्रथम मोठ्या प्रमाणावर मिळवून दिली त्या गांधीयुगाची प्रभातही याच श्रद्धाधन बिहारमध्ये झाली होती. अलीकडे आचार्य विनोबा भावे यांनी भूदान आंदोलनाच्या संदर्भात बिहारला आपली प्रयोगशाळा बनविले आहे. इतके सारे असूनही या प्रांतातील कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते स्त्रियांना पडद्यातून बाहेर काढण्यास आजही फारसे उत्सुक नसल्याचे दिसते. (त्या बाबतीत सर्वांचे एकमत आहे!)

हुंड्याच्या बाबतीतील विविधता

भारतीय स्त्रीचा विचार करताना लग्नातील हुंड्याचा विचार करणे क्रमप्राप्त होते. वस्तुतः हुंडा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ती वराची किंमत असते. घरच्या गाईच्या विक्रीला काढलेल्या खोंडाप्रमाणे नवरा मुलगा ही विक्रीकरिता काढलेली वस्तू असून जो जास्तीत जास्त बोली बोलेल त्याला ती मिळेल असे त्यात गृहीत धरलेले असते. पंजाब, केरळ, आसाम, यांसारख्या काही थोड्या प्रांतांचा अपवाद वगळल्यास बहुतेक सर्वच ठिकाणी हा वर-विक्रा मोठ्या प्रमाणावर चालतो. आता तर त्याला भलतीच तेजी आलेली दिसते. महाराष्ट्रातील ज्या जातीत पूर्वी मुलीचा हुंडा घेत असत त्यांच्यातही शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून पदवीधर तरुणांनी व त्यांच्या पालकांनी मुलीच्या बापाकडून हुंडा घेण्याची सुधारणा (!) अमलात आणली असून त्यांनी आपले भावही तथाकथित वरिष्ठ समाजातील हुंड्याच्या दराशी मिळतेजुळते ठेवलेले आहेत.

या संदर्भात एक गमतीचा विरोध देशामध्ये दिसून येतो. काही मागासलेल्या

(व आदिवासी) समाजात आजही मुलीचा हुंडा घेतात. अशा मुलींचे बाप आपल्या मुलींना सासरहून पळवून आणून माहेरी ठेवतात आणि तिच्या निर्वाहव्ययाची मागणी करून तिच्या सासरच्या लोकांकडून पैसे उकळतात किंवा घटस्फोट मिळवून दुसऱ्या माणसाशी तिचे लग्न करून देतात. (वृत्तपत्रात येणाऱ्या 'मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही मला नीट नांदवत नाही...' यांसारख्या जाहिरातींवरून ही वस्तुस्थिती लक्षात यावी) याच्या उलट आपला मुलगा ही सोन्याची अंडी घालणारी कोंबडी आहे असे समजणारे आईबाप काही मागासलेल्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर आढळतात. एका सुनेकडून मिळालेल्या हुंड्याने समाधान न झाल्यामुळे ते त्या सुनेला विहिरीत ढकलून देतात अथवा तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला जाळून टाकतात आणि चिरंजिवांना पुन्हा बोहल्यावर उभे करून दुसऱ्यांदा (अनेकदा !) हुंडा उकळतात. अशी आहे आपली विविधता.

कला-साहित्यातील व सार्वजनिक क्षेत्रातील स्त्रिया

भारतीय स्त्रीवर इतकी अनंत प्रकारची दडपणे असूनही कला-साहित्याच्या क्षेत्रात तिने मर्यादित स्वरूपात का होईना जी कामगिरी बजावली आहे ती पाहिली की सानंद कौतुक वाटते. त्या बाबतीत लक्षात भरण्यासारखी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र-बंगालसारखे एकदोन प्रांत सोडले तर इतर प्रांतांत जीवनाच्या सर्व क्षेत्रांत प्रविष्ट झालेल्या स्त्रिया फार थोड्या आढळतात. काही प्रांतातून काही विशिष्ट क्षेत्रांतच कर्तबगारी गाजविलेल्या स्त्रिया सापडतात. अर्थात आपापल्या प्रांतापुरते ज्यांचे नाव प्रसिद्ध आहे अशा स्त्रियांचा विचार येथे केलेला नाही. अखिल भारतीय पातळीवर ज्यानी आपली काही छाप टाकली आहे अशाच स्त्रियाचा उल्लेख येथे करता येण्यासारखा आहे.

या संदर्भात महाराष्ट्रामधील गायिकांची नावे सर्वप्रथम डोळ्यासमोर येतात. सर्वश्रीमती हिराबाई बडोदेकर, मोघूबाई कुर्डीकर श्रीमतीबाई नार्वेकर, अंजनीबाई लोलेकर, ज्योत्स्नाबाई भोळे, माणिक वर्मा, पद्मावती शालिग्राम (गोखले), लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरी आमोणकर वगैरे असंख्य नावे आठवू लागतात. अर्थात या सर्वांपेक्षा तामिळनाडच्या श्रीमती शुभलक्ष्मी (सुब्बुलक्ष्मी) याचे जागतिक कीर्तीचे स्थान अगदी वेगळे आहे, हे मान्य केले तरी आमच्या गायिकांच्या भारतातील स्थानाला उणेपणा येत नाही. बनारसच्या सिद्धेश्वरी देवी किंवा लखनौच्या बेगम अख्तर, कलकत्याच्या मालविका कानन, मुंबईच्या लक्ष्मीशंकर यांच्यासारख्या हाताच्या बोटांवर मोजता येण्यासारख्या चारदोन बिगर मराठी भाषी गायिका सोडल्यास या क्षेत्रात महाराष्ट्राची बरोबरी इतर कोणी करू शकतील असे वाटत नाही. अर्थात याची उणीव नृत्य, चित्रकला वगैरे क्षेत्रांतील रुक्मीणीदेवी अरुंडेल, मृणालिनी साराभाई, अमृता शेरगिल, बाला सरस्वती, रोशन कुमारी, कमला लक्ष्मण, इंद्राणी रहमान, वगैरे अमहाराष्ट्रीय महिलांनी खूप मोठ्या प्रमाणावर भरून काढली

आहे असे म्हणण्यास हरकत नसावी. साहित्याच्या क्षेत्रात कै. सौ. कुसुमावती देशपांडे यांचा जसा दबदबा अखिल भारतीय पातळीवर होता तसा इतर कोणाचा नसला तरी इस्मत चुगताई (उर्दू), अमृता प्रीतम (पंजाबी), महादेवी वर्मा (हिंदी), लीला रॉय (बंगाली, इंग्रजी) शांता रामराव, कमला मार्कंडेय (इंग्रजी) यांची नावे चांगलीच परिचित आहेत. पंडिता क्षमा राव संस्कृत पंडिता म्हणून प्रसिद्ध होत्या. लोकसाहित्याच्या संदर्भात श्रीमती दुर्गाताई भागवत, डॉ. कु. सरोजिनी बाबर इत्यादींची नावे अखिल भारतीय पातळीवर जाऊन पोचली आहेत. विद्वत्तेच्या क्षेत्रात डॉ. इरावती कर्वे (मानववंशशास्त्र), डॉ. कुमुदिनी दांडेकर (जनसांख्यिकी) यांसारखी काही महाराष्ट्रीय नावे इतमामाने झळकतात. शिक्षण व लोकशिक्षण या विभागात सर्वश्रीमती सुलभा पाणंदीकर, चंद्राताई कर्नाटकी, डॉ. चित्रा नाईक, कुलसुम सयानी वगैरे मराठी नावे ऐकू येतात.

समाजसेवेच्या व सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रात एकेकाळी महाराष्ट्राचे नाव खूपच गाजले. परंतु त्याचे श्रेय मुख्यतः महात्मा फुल्यांपासून महर्षी कर्व्यांपर्यंत पुरुष-कार्यकर्त्यांनाच आहे. पंडिता रमाबाईसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या मराठी महिला या क्षेत्रात फारच थोड्या आढळतात. सर्वश्रीमती सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी, रामेश्वरी नेहरू, लेडी धनवंती रामराव, विजयालक्ष्मी पंडित, लक्ष्मी मेनन, इंदिरा गांधी, हॅना सेन, राजकुमारी अमृत कौर, रेणुका रे, रेणु चक्रवर्ती, दुर्गाबाई देशमुख, डॉ. सुशीला नायर, रुक्मिणीदेवी अरुंडेल, अम्मू स्वामिनाथन, अचम्मा मथाई, सुचेता कृपलानी, वगैरेंच्या बरोबरीने नाव घेता येईल अशा समाजसेविका महाराष्ट्रात अभावानेच आढळतात असे म्हणावे लागते. याचे कारण काय असावे ते शोधले पाहिजे.

समाधानकारक ?

आंतरभारतीय स्त्रीजीवनाचे हे एक ओझरते दर्शन आहे. केवळ एक स्थूल आराखडा आहे. परंतु तेवढ्यावरून एकूण भारतीय स्त्रीजीवनाची काहीतरी कल्पना निश्चितच येते. आपल्या देशातील आदिवासी व अशिक्षित स्त्रियांचा विचार येथे केलेला नाही. कारण त्यांच्या समस्या खूपच मूलगामी व प्रचंड आहेत, परंतु तथाकथित सुधारलेल्या, पुढारलेल्या शिक्षित समाजातील स्त्रियांची स्थिती तरी समाधानकारक आहे असे आपल्याला म्हणता येईल काय? आर्थिक संपन्नतेचा, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा, लोकप्रिय कुटुंबाचा किंवा खानदानी घराण्याचा आधार लाभलेल्या काही स्त्रिया अखिल भारतीय पातळीवर महत्त्वाची स्थाने भूषवीत असल्याची दृश्ये अधूनमधून दिसतात. कोणी आमदार-मंत्री होतात, कोणी राज्यपाल-महामंत्री बनतात, संयुक्त राष्ट्रसंघासारख्या जागतिक संस्थेचे अध्यक्षपदही कोणी भूषवून जातात. पण त्यामुळे सामान्य भारतीय स्त्री व अशी अपवादाभूत उदाहरणे यांच्यातील दरी अधिकच भयाण दिसू लागते. वस्तुतः शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारामुळे भारतीय स्त्रीला

कोणत्याही क्षेत्रात कर्तबगारी दाखविण्याची संधी प्राप्त झालेली आहे. आर्थिक ओढघस्तीमुळे तिच्या कर्तृत्वाला आव्हानही मिळालेले आहे. केरळसारख्या छोट्याशा प्रांतातून हजारोंच्या संख्येने बाहेर पडणाऱ्या नर्सेस, शिक्षिका, लघुलेखिका व टंकलेखिका पाहिल्या म्हणजे त्यांनी हे आव्हान स्वीकारले आहे याची खात्री पटते. परंतु तरीही भारतीय स्त्रीचे जीवन अजून मध्ययुगीन कल्पना व बंधने यांच्या पाशातच गुरफटलेले आहे असे वाटते. म्हणून बहुधा देशाची जवळजवळ निम्मी लोकसंख्या व्यापणाऱ्या स्त्रियांना राज्यविधानसभांत किंवा संसदेत एक दशांशही जागा मिळत नाहीत. असे का होते ?

मला वाटते, भारतीय स्त्री सुधारणेच्या मार्गाने वाटचाल करीत असली तरी तिने अजून आपले मानसिक परावलंबन सोडलेले नाही. पुरुषनिरपेक्ष जीवनाची कल्पनाच तिला सहन होत नाही. आजवर आपण असे समजत आलो की स्त्रीला निसर्गाने दुबळी व परावलंबी बनविले आहे. परंतु निसर्गाने लादलेल्या दुबळेपणावर विजय मिळविण्याची साधने आज उपलब्ध झाल्यानंतरही आपण तीच कल्पना उराशी बाळगून बसलो आहोत. एखादी बंडखोर स्त्री समाजाची बंधने तोडून मुक्त होण्याचा प्रयत्न करते पण ती चुकीच्या मार्गाला लागल्यामुळे मुक्त होण्याऐवजी उच्छृंखल बनते आणि शीड फाटलेल्या गलबताप्रमाणे भरकटत जाते. स्त्री ही पुरुषासारखीच एक स्वतंत्र मानव आहे, ती उपभोगाची किंवा विलासाची वस्तू नाही, ही गोष्ट पुरुषांना कळेल तेव्हा कळो, पण तत्पूर्वी खुद्द स्त्रीला या सत्याचा साक्षात्कार होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आचार्य दादा धर्माधिकारी यांच्यासारखे चिंतन करणारे पुरुष जे विचार मांडतात त्यांचा अभ्यास अधिक गंभीरपणाने स्त्रियांनी केला पाहिजे. 'मी स्वतंत्र व्यक्ती आहे, माझे भवितव्य मी घडविणार आहे, त्यासाठी भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा सोसण्याची व येणाऱ्या संकटांना धैर्याने तोंड देण्याची माझी तयारी आहे !' असा निश्चय जेव्हा भारतीय स्त्री करील तेव्हाच आधुनिक मुक्त मानवाचे जीवन ती जगू शकेल. या दिशेने भारतीय स्त्रीने वाटचालही सुरू केलेली दिसते. तिचा वेग खूपच मंद असला तरी तेवढ्याने निराश होण्याचे मात्र काही कारण नाही.

0

विभाग चौथा

पुढची वाटचाल

२१. स्त्रीजीवनाचे भवितव्य

[१] स्त्रीजीवनाचे भवितव्य

लक्ष्मी मेनन

[२] स्त्रियांच्या संघटना

धनवंती रामराव

[३] लघुउद्योग

कुसूम वानखेडे

[४] गर्लगाइड चळवळ व समृद्ध स्त्रीजीवन

अनसूया करकरे

[५] स्त्रीकामगार आणि इतर महिला

मीनाक्षी साने

[६] कर्तव्य हेच जीवन

इंदिराबाई देवधर

[७] स्त्रियांची विधायक शक्ती

शकुंतला परांजपे

२२. भारतीय स्त्रीजीवन : गौरवशाली कहाणी

कमलादेवी चट्टोपाध्याय

२१

स्त्रीजीवनाचे भवितव्य

[१]

लक्ष्मी मेनन

श्रीमती लक्ष्मी मेनन, एम्. ए., एल्. टी., टी. डी., एलएल्. बी.; पद्मभूषण (जन्म मार्च १८९९) शिक्षिका, अध्यापिका म्हणून सुरुवात करून केंद्र शासनात उपमंत्री पदापर्यंत पोचल्या. शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात अनेक जबाबदारीच्या स्थानांवर कार्य व परदेशात प्रवास. ['ग्रेनव्यू' सेंट्रल स्टेडिअमजवळ, त्रिवेंद्रम १, केरळ)

भारतीय स्त्रीजीवनाचे भवितव्य हे भारताच्या किंवा जगाच्या भवितव्यापेक्षा विशेष स्वतंत्र किंवा निराळे आहे असे मानता येणार नाही. स्त्रियांना स्त्रीजात या नात्याने स्वतंत्र अस्तित्व नसल्यामुळे त्यांच्यापुढे स्वतंत्र जीवितध्येय आहे, असे समजता येणार नाही. कारण त्यांची सुखदुःखे, त्यांच्या आशा-आकांक्षा व त्यांनी प्रत्यक्ष करावयाचे कार्य हे एकंदर समाजाच्या कार्यक्रमांशी नेहमीच निगडित राहणार. मात्र आजच्या काही समस्या अशा आहेत की, ज्या सबंध मानवजातीच्या अंतिम हिताच्या दृष्टीने, अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. तथापि त्यातही काही गोष्टी मात्र अशा आहेत की जेथे स्त्रियांना महत्त्वपूर्ण भाग घ्यावा लागेल, नव्हे, त्यांनी तसा तो घेतलाच पाहिजे.

स्थायी स्वरूपाची शांतता निर्माण करण्याच्या हेतूने सध्या जगामध्ये निकराचा प्रयत्न चालू आहे. तथापि, हे उद्दिष्ट सफल होण्यात जर कोणती प्रमुख अडचण येत असेल तर ती म्हणजे विशिष्ट समस्यांना तोंड देण्याबद्दल पुरुषजातीकडून व्यक्त होणारी जुनाट स्वरूपाची पारंपारिक मनोवृत्ती! राष्ट्राराष्ट्रांतील वैरभावना, सामाजिक ताण व आर्थिक मागासलेपणा हे बहुतांशी या जुनाट मनोवृत्तीचेच परिपाक होत. यासाठी भावी काळातील विश्वसमाजाची उभारणी करताना आंतरराष्ट्रीय संबंधातील व्यवहारांमध्ये परस्परसहकार्याच्या शाश्वत मूल्यांची जोपासना करण्याकडे तळमळीने लक्ष देणे अटळ मानले पाहिजे. मात्र, हे स्वप्न साकार करण्यासाठी स्त्रियांना एक पथ्य पाळण्याची गरज आहे. ते असे की, पुरुषजातीने उभी केलेली भूतकाळातील व्यवहारांची चौकट त्यांनी निषेधार्ह मानली पाहिजे. स्त्रियांनी जी वाट चोखाळायची आहे ती अवघड वाट

आहे. त्यात हृदयाची विशालता, सहिष्णुता, समजुतदारपणा, सहजीवन व औदार्य यांची क्षणोक्षणी गरज भासणार आहे. जेव्हा जगातील स्त्रिया संकुचित राष्ट्रवादाने प्रेरित न होता जागतिक बंधुभावनेने कार्य करण्यास प्रवृत्त होतील तेव्हा या जगाचा चेहरामोहराच बदलून जाईल. संघर्षातील निरर्थकता, सुसंस्कृत जीवनातील मांगल्य, ध्येयासंबंधीची प्रामाणिक निष्ठा आणि उच्चार व आचार यांची एकवाक्यता या मूल्यांची निष्ठावंत उपासना जेव्हा स्त्रिया करू लागतील तेव्हाच या मूल्यांना नवा अर्थ प्राप्त होईल. दुर्दैवाने आजच्या पिढीतील स्त्रिया ही कठोर उपासना करताना दिसत नाहीत. ज्या काही थोड्या स्त्रियांना थोडीफार संधी क्वचित प्राप्त होताना दिसते तेथेही त्या संधीचा उपयोग व्यापक ध्येयसिद्धीसाठी केलेला आढळत नाही.

वर्तमानकाळातील संधीचा उपयोग कसा केला जातो यावरच भारतीय स्त्रीजीवनाचे भवितव्य सर्वस्वी अवलंबून आहे. जे अधिकार त्यांना या पिढीत सहजासहजी उपभोगावयास मिळत आहेत त्यांमुळे त्यांची आत्मसंतुष्टता पोसली जाणार आहे काय? का येथील समाजजीवनात बदल घडवून आणण्यासाठी त्या आपल्या अंगावर नवीन जबाबदाऱ्या घेऊन त्या मनापासून पार पाडणार आहेत? 'जे व्हायचे असेल ते होणारच' अशा वृत्तीने जर त्या स्वस्थ बसून राहातील तर ती एक मोठीच चूक ठरेल परंतु त्याऐवजी जर त्या 'आम्हाला हल्लीची समाजव्यवस्था नको असून या देशात सर्वांना सुखस्वास्थ्य प्राप्त होईपर्यंत आम्ही विश्रांती घेणार नाही' अशा धडाडीचा निर्धार करतील तर उज्ज्वल भविष्यकाळाच्या त्या शिल्पकार ठरतील. परंतु यासाठी अपरिमित कष्ट, अविरत परिश्रम व प्रचंड त्याग त्यांना करावा लागेल. आपण हे आव्हान स्वीकारून त्यासाठी पडेल तो त्याग करावयास तयार आहोत काय? जर या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी मिळणार असेल तर भारतीय स्त्रीजीवनाचे भवितव्य खात्रीने उज्ज्वल आहे.

[२] स्त्रियांच्या संघटना

धनवंती रामराव

श्रीमती धनवंती रामराव, एम्. ए. पद्मभूषण (जन्म १०-५-१८९३) सुप्रसिद्ध समाज कार्यकर्त्या. अखिल भारतीय महिला परिषदेत उच्च पदाधिकारी. कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात भरीव कार्य. देशीपरदेशी संचार. (ब्लॉक जी, १०, मफतलाल पार्क, भुलाभाई देसाई रस्ता, मुंबई २६)

गेल्या शतकामध्ये होऊन गेलेल्या राजा राममोहन राय यांच्यापासून तो अलिकडील काळात महात्मा गांधींपर्यंत देशातील सर्व प्रमुख नेत्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज असल्याचे आग्रहाने सांगितले आहे. शिक्षणामुळे स्त्रियांचा सामाजिक व राजकीय

प्रश्नांकडे पाहाण्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक होईल असा त्यांचा विश्वास होता. याच पुढारी मंडळींच्या प्रभावामुळे उत्तेजन मिळून स्त्रिया स्वखुषीने पुढे येऊ लागल्या. आणि स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे व त्यांच्या संपूर्ण विकासाच्या आड येणाऱ्या जुन्यापुराण्या चालीरीतींवर आधारलेल्या समाजव्यवस्थेत बदल झाला पाहिजे, यासाठी प्रयत्न करू लागल्या. अशा या प्रयत्नांनूनच विविध प्रांतांमधून स्त्रियांच्या खास संघटनांचा उगम होत गेला आणि हळूहळू त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होत गेली.

स्त्रियांच्या सामाजिक विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या देशभर विखुरलेल्या या स्त्रीसंस्थांना अखिल भारतीय पातळीवर संघटित करण्याची गरज १९२६-२७मध्ये त्यांच्या पुढाऱ्यांना वाटू लागली. कारण त्यामुळे देशातील सर्व सुशिक्षित व पुढारलेल्या स्त्रियांचे सहकार्य व सक्रिय पाठिंबा संघटनेस मिळणार होता. तसेच निरनिराळ्या सामाजिक व आर्थिक समस्या, कायदेकानू व तत्कालीन परिस्थितीमध्ये कुचकामी ठरलेल्या जुन्या सामाजिक रूढी व अडाणी समजुती या सर्वांवर चर्चा करता येणार होती.

स्त्री-संघटनांच्या कार्यामुळे महिलावर्गात बरीच जागृती झाली व तिचा परिणाम म्हणून जुन्या हिंदू कायद्यामध्ये काही दूरगामी सुधारणा करण्यात यश येत गेले. विवाह, वारसा, व मुलांच्या पालकत्वाच्या बाबतीत पूर्वी कधीही न मिळालेले कायदेशीर हक्क स्त्रियांना हळूहळू प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे बालविवाह, पडदापद्धती व स्त्रियांच्या समान हक्कांच्या आड येणाऱ्या इतर काही सामाजिक रूढींचा बीमोड करण्यातही स्त्री-संघटनांनी भरीव कामगिरी बजावली आहे.

आजच्या सार्वजनिक जीवनामध्ये पुरुषांच्या बरोबरीने भाग घेऊन राष्ट्रीय विकासाला हातभार लावतांना स्त्रिया दिसत आहेत त्याचे श्रेय मुख्यतः स्त्री-संघटनांनी केलेल्या प्रयत्नांना द्यावे लागेल. कारण या संघटनांनी स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून दिले इतकेच नव्हे तर राष्ट्राच्या नागरिक या नात्याने त्यांच्यावर येणारी जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्य त्यांना दिले. एखाद्या लहानशा खेड्यापासून ते मोठ्या शहरापर्यंत चालणारे स्त्री-संघटनांचे कार्य आजही अतिशय महत्त्वाचे आहे. विशेषतः समाजकल्याण क्षेत्रांमध्ये सरकार आखीत असलेल्या अनेक प्रगतिपर योजनांना स्वयंस्फूर्त पाठिंबा देऊन देशाचे जीवन अधिक समृद्ध व सुसंस्कृत करण्यासाठी पुढील काही वर्षे या संघटनांना मोलाचे कार्य करावे लागेल.

[३] लघुउद्योग

कुसुमताई वानखेडे

श्रीमती कुसुमताई वानखेडे, एम्. ए., (जन्म १-१-१९१७) प्रथम श्रेणीच्या सामाजिक कार्यकर्त्या, कुशल संघटक. भारतीय स्त्री-संघटनांमध्ये उच्च पदावर काम. महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार मंडळाच्या अनेक वर्षे अध्यक्ष. (गमाडिया हाउस, हाजी अली पार्कसमोर, भुलाभाई देसाई रस्ता, मुंबई २६)

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला आपल्या विकासाच्या दृष्टीने निश्चित पाऊलवाट करावी लागते. आपला भारत हा कृषिप्रधान देश खरा पण केवळ त्या क्षेत्रातील प्राधान्य देशाच्या सर्वांगीण विकासाला कसे पुरे पडणार? म्हणून कृषिऔद्योगिक विकासाचा कार्यक्रम हाती घेतला गेला, परंतु औद्योगीकरणाशिवाय हा समन्वय अशक्यप्राय होता. देशाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने केवळ मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ करून भागणार नाही, म्हणून लघुउद्योगालाही उत्तेजन देण्याची आवश्यकता औद्योगिक नीतीचा विचार करताना एका ठरावान्वये एप्रिल ३०, १९५६ ला प्रतिपादन करण्यात आली आहे. मागील तीन पंचवार्षिक योजनांमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार ह्यांनी लघुउद्योगाच्या प्रगतीसाठी निरनिराळ्या सवलती कारखानदारांना उपलब्ध करून दिल्या. त्या साऱ्यांचा तपशील ह्या ठिकाणी देणे कठीण आहे. तरी त्या उत्तेजनामुळे लघुउद्योगांना जोम आला व ह्या उद्योगांद्वारे पंचवार्षिक योजनेत जो विकास अभिप्रेत होता तो म्हणजे आर्थिक विकासाचा पाया बळकट करणे, लोकांना कामधंदा देण्याच्या दृष्टीने त्यांना संधी मिळवून देणे व सर्वसाधारण राहाणीमान वाढविणे हाच अंशतः साकार झाला. भांडवली साधनसामुग्रीचे न्यूनत्व आणि कुशल मनुष्यबळाचा अभाव असलेल्या भारतासारख्या देशात लघुउद्योगाना एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय विकासाच्या योजनेच्या कार्यक्रमातील एक महत्त्वाचे अंग म्हणून लघुउद्योगाकडे पाहिले जाते.

महाराष्ट्र राज्याने लघुउद्योगवाढीसाठी नुकतीच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. तंत्रज्ञांना ते एक आवाहन आहे. केवळ भांडवलाच्या अभावी ज्या तंत्रज्ञाना स्वतःचा उद्योगधंदा काढता येत नाही अशा तंत्रज्ञांना हे महामंडळ जमीन, पाणी, वीज, कुशल कामगार पुरविण्याच्या दृष्टीने हरप्रकारचे सहाय्य करते.

अशा लघुउद्योगांना दिलेल्या सवलतींचा स्त्रिया कितपत फायदा घेतात हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. वास्तविक मध्यमवर्गीय स्त्रियाना सदैव आर्थिक अडचण असते व संसार संभाळून पैसा कमविणे हे अपरिहार्य आहे. परंतु बहुतेकांना सांसारिक जबाबदारीमुळे ३-४ तास काम करून काही कमावता आले तर सोयीचे वाटते. नाहीतर नाइलाजास्तव घराची व मुलांची जबाबदारी एखाद्या नातेवाइकावर किंवा अडाणी

मोलकरणीवर टाकून सातआठ तास श्रमासाठी घराबाहेर जावेच लागते. परंतु दररोज नियमितपणे तीनचार तास काम करून सुद्धा अर्थार्जन करणे शक्य आहे. रंगकांड्या, खडू, लिफाफे, ऑफिसला लागणाऱ्या इतर उपयुक्त वस्तू तयार करणे, महिलांना फावल्या वेळात जरूर करता येण्याजोगखे आहे. असे उद्योग एकटीने करण्याऐवजी जर संस्थांमार्फत सहकारी क्षेत्रात चालविले तर जास्त उपयुक्त होईल. कारण कच्चा माल आणणे, तयार माल योग्य रीतीने साठविणे व विकणे ह्या अतिशय कटकटीच्या व जबाबदारीच्या बाबी आहेत. त्या संस्थांवर सोपविल्यास गरजू महिलांना जास्त सोयीचे होईल. हा कार्यक्रम देताना संस्थांचा प्रामाणिकपणा हीच त्यांची कसोटी! कारण गरजू स्त्रियांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. नाहीतर गरजू म्हणून त्यांच्याच पोटावर पाय देऊन संस्थांचा फायदा करून घेण्याची प्रवृत्ती आढळते.

अर्थात तयार झालेल्या मालाचा दर्जा चांगला हवा. नाहीतर तो खपविणे कठीण जाते. शिवाय असा उच्च प्रतीचा माल विकत घेण्याचे सरकारी धोरण असून वाजवी किमतीपेक्षा त्याला पंचवीस टक्के जास्त किमत मिळते. उद्योग सुरू करताना कच्च्या मालाची सुलभता, त्याची बाजारात मागणी आदी साऱ्याच गोष्टींचा सारासार विचार करून उद्योग सुरू करावा. कागदी फुले, मातीची खेळणी अशा वस्तूंना बाजार मिळणे कठीण असते.

आज असे लघुउद्योग सुरू करण्याची आवश्यकता गरजू महिलांसाठी आहे. त्यासाठी संस्थांनी पुढे यावे. परंतु त्यापूर्वी उद्योगधंदा या विषयाचा अभ्यास कार्यकर्त्यांनी अवश्य करावा. त्या ज्ञानाच्या व धडाडीच्या अभावी स्त्री-संस्थांनी सुरू केलेले उद्योग थोड्याच काळात बंद होतात असा अनुभव आहे. त्याचप्रमाणे अशा उद्योगांना राज्य सरकार व केंद्रीय सरकार ह्यांकडून जी मदत मिळत आहे त्याचा फायदा जरूर घ्यावा व संस्थांना ही मदत लवकर व वेळेवर मिळेल याची सरकारनेही दक्षता घ्यावी.

[४] गर्लगाइड चळवळ व समृद्ध स्त्रीजीवन

अनसूया करकरे

श्रीमती अनसूया करकरे, बी. ए., बी. टी. (जन्म २-२-१९०९) पुणे येथील 'संगम' गर्ल गाइड संस्थेच्या आशियाई मध्यवर्ती केंद्राच्या प्रमुख. राजस्थान शिक्षणखात्यात दोन तपे काम केल्यावर 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ गर्ल गाइड्स् ॲण्ड गर्ल स्काउटस्' संस्थेच्या आशियाई संघटनेच्या प्रवासी अधिकारी. (संगम, आळंदी रस्ता, पुणे ६)

विज्ञान, वैद्यक व तात्त्विक ज्ञान या क्षेत्रांमध्ये प्रगती होत असल्याचे आजच्या तरुण पिढीतील बऱ्याच जणांना माहीत असते. परंतु आजच्या या वैज्ञानिक युगातही माणसाची नैतिकदृष्ट्या प्रगती झाली पाहिजे असे फारच थोड्यांना वाटते. त्यामुळेच

आपल्या तरुण पिढीच्या विचारांना चालना देणारे काही प्रश्न विचारणे जरूर आहे. उदाहरणार्थ, आपल्या शेजाऱ्यांबाबत आपल्या काही जबाबदाऱ्या असतात यासंबंधीची तुमची जाणीव वाढली आहे का? सामान्यतः अलीकडचे लोक एकमेकांशी अधिक स्नेहाने वागतात असे तुम्हास वाटते का? तुम्ही पूर्वीपेक्षा अधिक सहिष्णू व उदारमतवादी झाला आहात का? निरनिराळे धर्म व वर्ण यांबद्दलचे आपले पूर्वग्रह टाकून देऊन त्यांच्यातील फरक नीट समजावून घेण्याचा प्रयत्न तुम्ही करता का? यांसारख्या प्रश्नांसंबंधी स्वतंत्रपणे विचार करण्यास मुलांमुलींना जर लहानपणापासून प्रोत्साहन दिले तर त्यांच्यातून अधिक चांगले स्त्रीपुरुष निर्माण होऊन ते मानवी संबंध सुधारू शकतील.

लहान वयाच्या मुलांमुलींना त्यांचा स्वतःचा जीवनविकास पूर्ण होण्याच्या दृष्टीने व दुसऱ्यांची सेवा करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम देणारी एक चळवळ माझ्या डोळ्यापुढे आहे. ती म्हणजे मुलांकरिता स्काउट व मुलींकरता गाईड. लार्ड बेडन पॉवेल या इंग्रज गृहस्थाने सुरुवातीस मुलांसाठी काही कार्यक्रम आखला. लवकरच त्या कार्यक्रमाकडे मुलींचा एक छोटा गट आकर्षित झाला. गाइडच्या या छोट्या गटाचे रूपांतर पुढे लक्षावधी मुलींच्या आंतरराष्ट्रीय कुटुंबात झाले. गाइड शिक्षण घेतलेल्या व त्याचा जीवनदृष्टी म्हणून स्वीकार केलेल्या मुलींनी जागतिक मैत्री व समजूतदारपणा यांच्या उपासनेस फार मोठा हातभार लावला आहे. गाइडमध्ये शिक्षण घेतल्यामुळे त्या अधिक चांगल्या स्त्रिया झाल्या असून त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी पुढारीपण स्वीकारले आहे.

अशी ही गाइड शिक्षण देणारी चळवळ म्हणजे आहे तरी काय? 'सतत तयार रहा' हे गाइड शिक्षणाचे ब्रीदवाक्य आहे व 'सत्कृत्य करीत जा' हे गाइडच्या जीवनव्यवहाराचे मार्गदर्शक तत्त्व आहे आणि या दोहोंतून शेजाऱ्यापाजाऱ्याची सेवा करण्याचे मत प्रतिबिंबित होते. या चळवळीच्या थोर संस्थापकाने आपल्या मृत्युशय्येवरून जागतिक स्काउट व गाइडना पुढील संदेश दिला होता: 'इतरांना सुखी केल्यामुळेच तुम्ही सुखी होऊ शकाल.' या अमर संदेशात गाइड चळवळीपाठीमागे असणारा सेवाभाव दिसून येतो.

स्काउट व गाइड चळवळीची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये आहेत. त्यांवरून मुलांमुलींना मिळत असलेल्या उच्च ध्येयवादाच्या व मानवी मूल्यांच्या शिकवणुकीची कल्पना येते. पहिली गोष्ट म्हणजे या चळवळीत कोणत्याही वंश-जाती-धर्म-पंथाच्या तरुणांना भाग घेता येतो. त्यामुळे जागतिक बंधुभावनेचे ध्येय स्पष्ट होते. तसेच या चळवळी ऐच्छिक स्वरूपाच्या असून राजकारणापासून अलिप्त आहेत. कोणत्याही संकुचित गटबाजीपासून दूर राहिल्या आहेत. त्यांचे स्वरूप जागतिक आहे. अशा या व्यापक व सर्वांना सामावून घेणाऱ्या संघटनेत वावरणाऱ्या मुलाला किंवा मुलीला माणसामाणसांमधील कृत्रिम भेदभावांची जाणीवच होत नाही.

गाइड चळवळीच्या कार्यक्रमात पाच मूलभूत सूत्रांचा अंगिकार केला आहे. चळवळीला आध्यात्मिक अधिष्ठान देणारे गाइड वचन व दहा नियम; पेट्रोल सिस्टिम (लहानांना सामुदायिक जीवनाचा अनुभव देणारी व त्यातून नेतृत्वाची संधी व अनुभव देणारी संघपद्धती); सुसंस्कृत आरोग्यसंपन्न जीवनपद्धती आणि हस्तव्यवसाय यांच्यासंबंधीच्या कसोट्या व प्रावीण्यपदके; समयसूचकता, स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेण्याची वृत्ती व उद्योगीपणा यांचा विकास करणाऱ्या उघड्या मैदानावरील छावण्या, सहली व असे इतर अनेक कार्यक्रम आणि निरनिराळ्या उपक्रमांतून वाढीला लागणारी आंतरराष्ट्रीय मैत्री, व भगिनीभावना.

गाइड शिक्षणाचे तंत्र शिक्षणशास्त्रदृष्ट्या निर्दोष आहे. गाइड शिक्षणाचा संपूर्ण कार्यक्रम हा पूर्वनियोजित कार्यक्रमाभोवती गुंफलेला असतो. 'स्काउट शिक्षण हा एक खेळ आहे' ही बेडन पॉवेल यांची उक्ती सुप्रसिद्ध आहे. स्काउट व गाइड चळवळींत उत्साहाने भाग घेणाऱ्यांना मजा व साहस यांचा अनुभव लुटता येतो. ही चळवळ म्हणजे असा एक खेळ आहे की त्यात शिस्त बाहेरून लादली जात नाही तर ती अंतःप्रेरणेने निर्माण होते.

स्काउट व गाइड चळवळ हा उत्कृष्ट नागरिकत्वाचे शिक्षण देण्याचा अप्रत्यक्ष परंतु सहजसुलभ मार्ग असल्याचे जगातील प्रमुख शिक्षणतज्ज्ञांनी मान्य केले आहे. हे नागरिकत्व म्हणजे संकुचित किंवा बंदिस्त राष्ट्रीयत्वाच्या स्वरूपाचे शिक्षण नसते. स्वतःच्या घरामधील सत्कृत्यापासून सुरुवात करणारी छोटीशी गाइड हळूहळू आपला हात, भोवतालचा समाज, स्वतःचा देश व शेवटी विशाल जग यांच्या मदतीसाठी पुढे करते. 'जागतिक निर्वासित वर्ष' व 'अधिक धान्य पिकवा' यासारख्या युनोने मदतीदाखल आखलेल्या उपक्रमांना जगभर पसरलेल्या गाइडनी उत्साहाने साद दिली आहे.

गाइड चळवळ प्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाली व त्यामुळे ती फक्त पाश्चात्त्य संस्कृतीच्या मुलींसाठीच योग्य आहे असा गैरसमज सुरुवातीला निर्माण झाला होता. तथापि, महायुद्धानंतरच्या काळात गाइड चळवळीतील मूलभूत प्रेरणा न बदलता त्या त्या देशातील परिस्थितीशी व संस्कृतीशी त्या जुळवून घेण्याची वृत्ती निर्माण झाली. मात्र त्या चळवळीतील वर सांगितलेली पाच मूलभूत सूत्रे कायम राखण्यात आली. त्यांमध्ये फरक करण्यात आला नाही.

गाइड चळवळीच्या सुमारे साठ वर्षांच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास गाइडनी शांततेच्या व युद्धाच्या काळातील आव्हानांचा स्वीकार केल्याचे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी स्थापन झालेल्या 'गाइडस् इंटरनॅशनल सर्व्हिस' च्या कार्यात त्या त्या देशातील गाइडनी तत्परतेने व उत्साहाने भाग घेतला होता. निरनिराळ्या युद्धकचेऱ्या व नागरी संस्थांचे काम त्यांनी अंगावर घेतले होते. गाइड शिक्षणामधून मिळणारी उपयुक्त अशी अनेक कौशल्ये त्यांनी आत्मसात केल्याने वरिष्ठ हुद्द्याच्या जागांवरील कामे त्यांना यशस्वीरीत्या पार पाडता आली.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे या चळवळीचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असल्यामुळे देशोदेशींच्या मुलींना एकमेकींशी परिचय वाढविण्याची संधी प्राप्त करून देणारा आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा कार्यक्रम हे या चळवळीचे एक महत्त्वाचे अंग ठरते. यामुळे निरनिराळ्या संस्कृतींची व जीवनपद्धतींची अधिक चांगली ओळख मुलींना होऊ शकते. तसेच निरनिराळ्या देशांतील व प्रदेशांतील भिन्नतेची मुलींना चांगली समजूत येते व या सर्वांचा परिणाम म्हणजे विश्वमैत्रीचे मंगल सूर सर्वत्र आळविले जातात.

स्त्रीजातीच्या भवितव्याचा विचार केल्यास मुलींना लोकशाही राष्ट्रातील उत्तम नागरिक होण्याचे शिक्षण देणाऱ्या आणि निकोप आणि अचूक विचार करण्याची व निर्भयतेने आचरण करण्याची शक्ती देणाऱ्या गाइड चळवळीचे महत्त्व व उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

[५] स्त्रीकामगार आणि इतर महिला

मीनाक्षी साने

श्रीमती मीनाक्षी साने, बी. ए. (जन्म १८ मे १९०९). महात्मा गांधींच्या जंगल सत्याग्रहात भाग. दोन वर्षे सातारा कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यात आणि कामगार चळवळीत कार्यकर्त्या. सहा वर्षांचा कारावास. सोलापूर शिक्षण समितीत काही वर्षे सभासद. मधून मधून लेखन. (९-४ शिवाजी नगर, मुंबई १८)

सामाजिक वा राजकीय घटनांप्रमाणे काही शब्द किंवा वाक्प्रचारही हां हां म्हणता इतिहासजमा होतात. बाईलबुद्ध्या, बायकीशाळा असले वाक्प्रचार आता अगदी बालबोध घरातूनही गायब होत असावे. कारण त्यांच्याही मुली शिकतात, नोकरीपेशा पत्करून स्वतःच्या कर्तबगारीने मोठमोठ्या हुद्द्यांवरही चढतात. या घडीला तर भारताची महामंत्री एक महिला आहे. पहाता पहाता अर्धशतकात किती जमीनअस्मानाचा फरक पडला आपल्या जगात!

हा फरक काही अनायासे घडलेला नाही. सुरुवातीला तर शाळेत जाणाऱ्या मुलींना लोकांच्या खड्यांचा मारा सहन करावा लागला. महात्मा फुले, महर्षी कर्वे, यांना अनेक वर्षे समाजाची अवहेलना सहन करावी लागली. तेव्हा कोठे स्त्रीसुद्धा पुरुषांप्रमाणेच हाडामासाची व भावभावनांची एक माणूस आहे, हे सध्याच्या पुरुषप्रधान समाजाच्या लक्षात येऊ लागले.

त्या वेळच्या पांढरपेशा समाजाची ही अवस्था, मग इतर वर्गातील अशिक्षित

स्त्रियांची परिस्थिती किती बिकट असेल याची कल्पनाच करावी लागेल. घरात तर त्या गुलाम होत्याच. पण आर्थिक दुर्दशेमुळे गिरण्या अगर विड्यांच्या कारखान्यांतून त्यांना कामधंदा शोधावा लागे. परकीय ब्रिटिश राज्यकर्त्यांना तेथे त्यांच्या संरक्षणासाठी कायदेकानू करण्याची फारशी फिकीर नव्हती. त्यामुळे कारखान्यांतूनही त्यांना अगदी गुलामासारखे राबावे लागे. १९३७ साली सोलापुरातील बिडी कामगार बायकांनी संप केला. त्यावेळचा प्रसंग मला चांगला आठवतो. संपातील एक हुशार बाई दोन दिवस दिसली नाही. म्हणून मी चौकशीला तिच्या घरी गेले. तर त्यावेळी तिचा नवरा, 'बायको सभेला जाते', म्हणून एका दांडक्याने तिला झोडपून काढीत होता! पण अशा अवस्थेमध्येही या स्त्रिया घरात व बाहेर झगडत राहिल्या.

अशा प्रकारे समाजातील वरच्या व खालच्या थरांतील महिला जरी आपआपली वाटचाल करीत होत्या तरी त्यांच्या मार्गामध्ये एक मोठी धोंड होती. त्यामुळे हे दोन प्रवाह सुमारे दोन पिढ्या तरी अलगच राहिले. ती धोंड म्हणजे जातीयता. त्यामुळे महात्मा फुले व महर्षि कर्वे आदी नेत्यांनी अपार कष्ट व त्याग करून ज्या शाळा काढल्या त्यांचा फायदा त्यावेळच्या जागृत पांढरपेशा वर्गालाच झाला असे त्या कालावर आज वास्तववादी नजर टाकली तर आढळून येते. या पांढरपेशांच्या मुली पुढे शिक्षकिणी, डॉक्टर, किंवा परिचारिका झाल्या. ऐतिहासिक दृष्टीने ही घटना अपरिहार्य असेल पण स्त्रीविमोचनाचा मोर्चा बांधताना या स्त्रिया व बहुजनसमाजातील कामकरी स्त्रिया यांना एकत्र आणण्यामध्ये आपल्या जातिसंस्थेने मोठी अडचण निर्माण केली ही गोष्ट नाकारून चालणार नाही. त्याबरोबरच दुसरी धोंड परकीय सत्तेचीही होती. या सत्तेला भारताचे औद्योगीकरण जलद गतीने करावयाचे नव्हते. ते झाले असते तर जातिसंस्था स्वाभाविकपणेच खिळखिळी झाली असती.

स्वातंत्र्यानंतर आता या परिस्थितीत बऱ्याच झपाट्याने बदल होऊ लागला आहे. मुख्यतः घटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त झाला आहे. आणि सार्वत्रिक शिक्षणामुळे बहुजनसमाजातील मुलीही मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेऊ लागल्या आहेत. आता सरकारी अगर बिनसरकारी क्वचितच एखादी कचेरी असेल की ज्याठिकाणी मुली काम करताना आढळत नाहीत.

त्याचप्रमाणे देशाचे औद्योगीकरणही पूर्वीपेक्षा जास्त वेगाने होऊ लागले आहे. बुद्धिजीवी पांढरपेशा समाज व शारीरिक कष्ट करणारा बहुजनसमाज असे पूर्वी समाजाचे दोन भिन्न भिन्न थर असत. औद्योगीकरणामुळे मोठमोठ्या कारखान्यांतून क्लिष्ट आणि नाजूक यंत्रावर कामे करताना ढोर मेहनतीचा भाग कमी व बुद्धीचा भाग जास्त लागतो. त्यामुळे टेबलावर कारकुनी काम करणारे बुद्धिजीवी व यंत्रावर [illegible] काम करणारे ते कामगार ही पूर्वीची कल्पना मागे पडू लागली [illegible] त्या प्रमाणात या उभय समाजांतील व पर्यायाने महिलावर्गांतील अंतरही [illegible] लागले आहे.

हा बदल अनुकूल [illegible] कष्टकरी स्त्रियांचा मार्ग

[७] स्त्रियांची विधायक शक्ती

शकुंतला परांजपे

श्रीमती शकुंतला परांजपे, बी. एस्सी. एम्. ए. (जन्म १७-१-१९०६) राज्यसभा सभासद. पूर्वी महाराष्ट्र विधान परिषद सभासद. तीन वर्षे इंटरनॅशनल लेबर ऑफिसमध्ये काम. तीस वर्षे कुटुंबनियोजनाचे कार्य. नाटके, कादंबरी, गोष्टी, लेख, प्रवासवर्णन, असे लेखन. (परांजपे रस्ता, पुणे ४)

स्त्री व पुरुष यांमधील नैसर्गिक भेद अद्याप तरी कायम आहेत. गर्भारपण व बाळंतपण या चक्रात पूर्वी स्त्रीची जवळजवळ सर्व उमेद खर्च होत असे. परंतु आता तसे होण्याची आवश्यकता नाही. विचारपूर्वक जेव्हा हवी तेव्हा व हवी तितकी मुले पदरात पाडून घेऊन तिला आता कितीतरी इतर व्यवसाय करता येतील. समान हक्कांच्या पाठीमागे लागून ती अधिकाधिक पुरुषी बनू पहात आहे हे दुर्दैव! शारीरिक बल पुरुषाला अधिक असले तरी चाणाक्षपणा, समंजसपणा आणि सहनशीलपणा तिच्याजवळ जास्त प्रमाणात आढळतो. आपली स्वाभाविक प्रकृती ओळखून व आपले नैसर्गिक सामर्थ्य जाणून जर तिने पावले टाकली तर तिच्या हातून कितीतरी कार्य होण्यासारखे आहे.

प्रकृतीने पुरुष विध्वंसक असतो असे आता म्हणावे लागत आहे. रानटी अवस्थेत त्याला परिस्थितीशी सदोदित झगडावे लागत असे. आता रानटी अवस्था गेली परंतु लढण्याची खुमखुमी गेलेली दिसत नाही. आजकाल सर्वत्र जी जाळपोळ, मोडतोड, दगडफेक दिसून येते तीत स्त्रिया भाग घेताना दिसत नाहीत. त्यांचा तो स्वभावच नाही. फार तर संतापाच्या भरात एखादे लाटणे, रवी अथवा पुस्तकसुद्धा फेकण्यापलीकडे स्त्रीचा संताप टिकणार नाही. आनंदीबाईप्रमाणे स्वार्थासाठी ती एखादा खूनही करील, अथवा करवील. परंतु अफाट प्रमाणात सर्वनाशाची कल्पनाही तिला सहन होत नाही. किंबहुना लढाई हा प्रकारच तिच्या स्वभावाला मानवत नाही. कारण तिच्या पोटचे गोळे त्या धामधुमीत दगावतात. मुलगा सैन्यात जाण्याची इच्छा दर्शवू लागला की घरी आई प्रथम विरोध करते. कोरियातील लढाईत अमेरिकेने भाग घेतला तेव्हा अमेरिकन स्त्रियांनी विरोध केला होता.

अपत्यनिर्मितीचे विधायक कार्य निसर्गानेच स्त्रीकडे सोपविले असल्यामुळे विनाशक प्रवृत्ती तिच्या प्रकृतीलाच रुचत नाहीत. तसेच अफरातफर, लाचलुचपत, इत्यादी व्यवहार स्त्री फारच कमी प्रमाणात करते असे आढळून आले आहे. शाळा कॉलेजात सुद्धा मुलांपेक्षा मुलींचाच अभ्यास, वर्तन व शिस्त अधिक श्रेष्ठ असते असे मी कित्येक शिक्षकांच्या तोंडून ऐकले आहे. तेव्हा देशाची किंवा जगाची विस्कटलेली

वर्डी फिरून नीट वसवण्यास स्त्रीचा पुष्कळच पुढकार घेता येईल. मुलांना चांगले वळण लावणे हे तिचे पहिले कर्तव्य. नंतर कुटुंबाचे, गावाचे, देशाचे व्यवहार कसे चालतात ह्याचा अभ्यास करून आणि त्यात अधिकाधिक भाग घेऊन तिला सद्यःपरिस्थिती सुधारता येईल. विलायतेतील स्त्रियांप्रमाणे ग्राहक संघ (कंझ्युमर्स सोसायटीज) चालवता येतील.

शेतकरी समाजात कामाचा बोजा आणि घरचे व बाहेरचे कामाचे तास मोजले तर स्त्रियांचाच वाटा एकंदरीत अधिक असतो. हल्ली बुद्धिजीवी वर्गातही स्त्रिया नोकरी करायला लागल्यापासून केव्हा केव्हा अशीच परिस्थिती आढळून येते. ही काम करण्याची आपली ताकद व चिकाटी जेव्हा स्त्रिया ओळखतील तेव्हा सार्वजनिक आणि राजकीय बाबतीतसुद्धा त्यांना आपले वजन पाडता येईल.

()

२२

भारतीय स्त्रीजीवन : गौरवशाली कहाणी

कमलादेवी चट्टोपाध्याय

श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय, डिप्लोमा इन सोशियॉलॉजी (लंडन), पद्मभूषण (जन्म ३-४-१९०३) अखिल भारतीय महिला परिषदेच्या संस्थापकांपैकी एक; पुढे अध्यक्ष. राष्ट्रीय नाट्य केंद्राच्या संस्थापक-अध्यक्ष. वाटुमल व मॅगसेसे पारितोषिकांच्या मानकरी. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कार्यकर्त्या, लेखिका व वक्त्या. जगभर पुष्कळ प्रवास (सायन्स पॅव्हिलियन, एक्झिबिशन ग्राउंड, मथुरा रोड, नवी दिल्ली.)

भारतीय स्त्रीला, तिचा सध्याचा दर्जा व स्थान हे मुख्यतः दोन गोष्टींमुळे प्राप्त झाले आहे. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या भारतीय संस्कृतीतील काही चांगल्या परंपरा आणि दुसरी गोष्ट म्हणजे खंदे समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ व सुरुवातीच्या काळात नेतृत्व करणाऱ्या स्त्रिया यांचे प्रयत्न. विशेषतः ज्या स्त्रीनेत्यांनी स्त्रियांना अधिक मानाचे, जबाबदारीचे व गौरवाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या नवयुगाची पताका मोठ्या धैर्याने आपल्या खांद्यावर वाहिली त्याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

भारतीय स्त्रीची प्राचीन उज्ज्वल परंपरा

आपली प्राचीन काळातील परंपरा खरोखर फार अभिमान वाटावा अशी गौरवशाली आहे. फार पूर्वीपासून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेण्याची व निरनिराळ्या प्रकारच्या कारागिरीत कौशल्य प्राप्त करून घेण्याची संधी मिळत होती. अतिशय वंद्य असलेली अर्धनारीनटेश्वराची प्रतिमा स्त्रीपुरुषांतील समानता बिनतोड व समर्पक रीतीने व्यक्त करते. भारतीय विचार व तत्त्वज्ञान यांचे उगमस्थान असणाऱ्या ऋग्वेद या मूळ ग्रंथावरून स्त्रियांनी केलेल्या भरीव कामगिरीची साक्ष पटते. कारण त्यातील काही ऋचा स्त्रीपंडितांनी रचल्या आहेत. या संदर्भात जिच्या लिखाणाचा अंतर्भाव वेद व पुराणे यांमध्ये झाला आहे अशी ब्रह्मवादिनींच्या उज्ज्वल मालिकेतील वाक् ही पहिली श्रेष्ठ स्त्री, त्याचप्रमाणे, महाकाव्य लिहिणारी गंगादेवी, घोषा, जुहू, यमी, सूर्या, रात्री, शची, व अपाला या स्त्रिया विख्यात आहेत. गार्गी, मैत्रेयी व

उभयभारती यांसारख्या स्त्रिया वादविवादात महत्त्वाचा भाग घेऊन कित्येकदा पुरुषांना निरुत्तर करीत असत. शंकराचार्यांसारख्या प्रकांडपंडितालाही उभयभारतीबरोबर वाद करताना विचारासाठी वेळ मागून घ्यावा लागला होता. लोपामुद्रा, रोमशा यांसारख्या तपस्विनींबद्दल समाजामध्ये आदरभाव होता. आर्य स्त्रियांना विद्यासंपन्न होण्याची संधी मिळत असे व त्यामुळे त्यांनी धर्मकृत्यांमध्ये भाग घ्यावा अशी समाजाकडून अपेक्षा केली जात असे.

बौद्धकाळीही सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्त्रियांमधून निर्माण झालेल्या प्रभावी वक्त्या व धर्मोपदेशिका हे बौद्धकाळातील एक वैशिष्ट्य होते. या क्रांतिकारक काळामध्ये सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रांमध्ये सेवेची अनेक दालने स्त्रियांना खुली झाली. साहजिकच धार्मिक जीवनात व साहित्यात स्त्रियांकडून उल्लेखनीय भर घातली गेलेली आढळते. त्यांनी रचिलेल्या सूत्रांचा अंतर्भाव बौद्ध शास्त्रग्रंथांमध्ये झालेला आढळतो. कवयित्री म्हणून नावलौकिक मिळविलेल्या सुमेधाने भिक्षुणी होण्यासाठी आपल्या राज्याचा त्याग केला व तिच्याइतक्याच प्रसिद्धी पावलेल्या इसिदासी, उप्पलवण्णा, सुभा जीवकम्बवनिका या स्त्रियांनी तिचे अनुकरण केले. जैन संप्रदायातही स्त्रियांना आदराचे स्थान असल्यामुळे अनेक स्त्रिया चमकल्या. भद्रा, कांती व अक्कादेवी कवयित्री म्हणून प्रसिद्ध होत्या. दक्षिणेतील अम्माइयार व राजस्थानमधील मीराबाई यांना सर्वत्र देशात गौरवाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्रातील मुक्ताबाई, ओरिसातील माधवी, तेलंगणातील मुद्दुपलानी, केरळातील मनोरमा थामपुरायी — जिच्या ओव्या प्रेमळ व भक्तिमार्गाने परमेश्वराचे पूजन करणाऱ्या वैष्णव धर्मग्रंथांत समाविष्ट केल्या आहेत — वगैरे इतर स्त्रियाही प्रसिद्ध आहेत. तंजावरमधील मधुरवाणी व बंगालमधील चंद्रावती विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध होत्या. काश्मिरी भाषेतील प्राचीन सहित्यात हब्बा खातूनच्या सुंदर काव्याला मानाचे स्थान आहे. याशिवाय, पुरातन काळापासून स्त्रियांनी लोकवाङ्मयात वेळोवेळी भर घातलीच आहे. मध्ययुगात स्त्रीचे स्थान घसरत गेले.

मध्यंतरी ओळीने तीनशेहून अधिक वर्षे होत राहिलेल्या परकीयांच्या स्वाऱ्यांमुळे सर्व समाजव्यवस्था विस्कळित होऊन गेली; अर्थव्यवस्था कोलमडून पडली. नित्यजीवनात अस्थैर्य निर्माण झाले व या कारणांमुळे स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरला. इस्लामी संस्कृतीच्या प्रभावामुळे व असुरक्षिततेच्या वातावरणामुळे पडदापद्धती अंमलात आली. अर्थात ही चाल बहुतांशी वरच्या वर्गात प्रचलित झाली. मात्र या अत्यंत धामधुमीच्या व प्रतिकूल असलेल्या काळातसुद्धा काही वीरांगना व राजकारणी स्त्रिया पुढे आल्या. मार्को पोलोने वर्णन केलेली काकतीय राणी रुद्राम्मा, पुरुषाप्रमाणे रणवेष धारण करून अकबराविरुद्ध आपली फौज लढविणारी चांदबिबी, औरंगजेबाच्या हल्ल्यांचा शौर्याने प्रतिकार करणारी ताराबाई, इंग्रजांनी सुद्धा जिच्या कर्तृत्वाचा गौरवाने उल्लेख केला ती अहल्याबाई होळकर व इंग्रजांच्या तावडीतून आपले राज्य वाचविताना धारातीर्थी

पडलेली झांशीची राणी लक्ष्मीबाई अशा अनेक स्त्रिया चमकून गेल्या. एवढेच नव्हे तर राजवाड्यातील बंदिस्त जीवन कंठणाऱ्या जहानारा, रोशनारा व झेबुन्निसा या स्त्रियांनीही इतिहासाला आपल्या अस्तित्वाची दखल घ्यावयास लावली.

ढासळलेल्या समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान शतकानुशतके खालीच घसरत गेले. नंतर ब्रिटिश आल्यावर त्यांनी शासनासाठी जेव्हा नवीन कायदे केले तेव्हा त्यासाठी त्यांनी जुन्या कायद्यांचाच आधार घेतला. याचे एक कारण म्हणजे जुन्यासंबंधी ब्रिटिश मनाला वाटणारा भीतियुक्त आदर! १९१९ मध्ये जेव्हा नव्या राजकीय सुधारणांचा हप्ता भारतीयांच्या समाधानासाठी तयार करण्यात आला, तेव्हाही असेच झाले. भारतातील प्रागतिक मताच्या संघटनांनी व स्त्रीपुरुषांनी भारतीय स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून जोरदार मागणी केली. परंतु ब्रिटिश पार्लमेंटाने त्याबद्दल नाखुशी दाखविली. खुद्द ब्रिटनमध्येही त्या काळात स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झालेला नव्हता! अर्थात ब्रिटिश पार्लमेंटपुढे आपली बाजू आग्रहपूर्वक मांडण्याचा निर्णय भारतीय स्त्रीनेत्यांनी घेतला व त्याप्रमाणे स्त्रियांच्या एका शिष्टमंडळाने आपली बाजू एका 'संसदीय समिती'पुढे यशस्वीपणे मांडली. त्याचा परिणाम असा झाला की, भारतीय स्त्रियांना मतदानाचा हक्क प्रदान करण्याचे स्वातंत्र्य नव्यानेच स्थापन होणाऱ्या भारतातील कायदेमंडळांना देण्यात आले. अर्थात नवी कायदेमंडळे अस्तित्वात आल्याबरोबर, जवळजवळ पहिलीच गोष्ट त्यांनी जर कोणती केली असेल तर स्त्रियांना कायदेमंडळांचे दरवाजे खुले करण्याची होय. त्याप्रमाणे १९२५ साली भारतीय स्त्रियांनी प्रथम कायदेमंडळात प्रवेश केला व त्या पुरुषांबरोबरीने एका महत्त्वाच्या कामात भाग घेऊ लागल्या. पुढे १९३६ साली जेव्हा प्रांतीय स्वायत्तता आली व नवी मंत्रिमंडळे स्थापन झाली तेव्हा अनेक प्रांतांतून स्त्रिया मंत्रिपदही विभूषित करू लागल्या.

ब्रिटिश अमदानीत स्त्रीजीवनाचे पुनरुत्थान

ब्रिटिश अमदानीत शिक्षणाचा प्रसार मुख्यतः खाजगी प्रयत्नामुळे झाला. या क्षेत्रातही स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र संस्था स्थापन झाल्या. विशेष म्हणजे त्यांत एका महिला विद्यापीठाची स्थापना केली गेली. शिकलेल्या स्त्रियांचे प्रमाण जरी सुरुवातीस कमी राहिले तरी त्यांनी अनेक क्षेत्रांत व व्यवसायांत धडाडीने प्रवेश करण्यास सुरुवात केली. सुदैवाने, याबाबत आपल्या प्राचीन उच्च परंपरेचा स्त्रियांना फायदा मिळाला. कर्तृत्वाचे कोणतेही दालन त्यांना निषिद्ध समजले गेले नाही. १८७८ सालाइतक्या मागच्या काळातही मुली विद्यापीठात शिक्षण घेऊ लागल्या होत्या व पुढील अभ्यासासाठी युरोपअमेरिकेसारख्या लांबच्या प्रदेशांची सफर करू लागल्या होत्या. १८९२ मध्ये पहिली स्त्री वकील झाली. १९२१ साली पहिली स्त्री बॅरिस्टर म्हणून काम करू लागली. त्यामुळे सुरुवातीपासूनच स्त्रियांनी नगरपालिका व लोकलबोर्डे या नागरी कारभार पहाणाऱ्या संस्थांत सुलभतेने प्रवेश केला.

गांधीजींच्या नेतृत्वामुळे चैतन्य निर्माण झाले

निरनिराळ्या सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या चळवळीमुळे स्त्रियांच्या वाटचालीस अधिक चालना मिळत गेली. राष्ट्रीय व प्रांतिक पातळीवर सुसंघटित व बलिष्ठ महिला संघटना स्थापन झाल्या आणि त्यातून राष्ट्रीय अन् प्रांतीय पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्या व स्त्रीनेत्या उदयास आल्या. परंतु गांधीजींच्या नेतृत्वामुळे या चळवळीमध्ये खरे चैतन्य निर्माण झाले. गांधीजींचे नेतृत्व स्त्रीचळवळीला प्रेरक ठरले. प्रत्येक पाऊल पुढे टाकताना त्यांनी स्त्रियांना बरोबर घेतले. गांधीजींनी स्त्रियांमध्ये जो क्रांतिकारक ध्येयवाद निर्माण केला त्यामुळे त्यांच्या जीवनात कायाकल्प घडून आला. जरी त्यावेळी बहुसंख्य स्त्रिया साक्षर नव्हत्या तरी प्राचीन कला, हस्तव्यवसाय, पुराणातील ज्ञान व धर्मग्रंथातील तत्त्वज्ञान त्यांना अवगत होते. देशभक्तीच्या उर्मीच्या जोडीला मूलभूत स्वातंत्र्याची आवश्यकता त्यांना अनेक परीने जाणवत होती. शैक्षणिक सोयीची दुर्मिळता, सामाजिक सुधारणांना होत असलेला विरोध व आर्थिक हलाखीची परिस्थिती या समस्यांची दाहकता जाणवू लागल्याने भारतीय स्त्रीचे लक्ष राजकारणाकडे वळू लागले होते. त्यामुळे गांधीजींनी जेव्हा स्त्रियांना ती ऐतिहासिक हाक दिली तेव्हा त्या एखाद्या लाटेप्रमाणे राजकीय आंदोलनात सामील होण्यासाठी पुढे सरसावल्या. हे पुष्कळसे अनपेक्षितच घडले. कारण स्त्रियांनी काही विशिष्ट कार्यक्रमातच भाग घ्यावा अशी त्यांची सुरवातीची अपेक्षा होती. परंतु अनेक शतकांचा मागासलेपणा त्यांनी क्षणार्धात झुगारून दिला व भारतीय स्वातंत्र्याच्या उग्र आंदोलनाशी त्या उत्साहाने एकरूप झाल्या. कळकळ व निश्चय ही त्यांची आयुधे होती. साध्या सुती साड्या हा त्यांचा गणवेष होता. जरी त्या अशिक्षित व अननुभवी असल्या तरी त्यांनी धडाडीने नव्या जबाबदाऱ्यांचा स्वीकार केला. त्यांच्यापैकी बऱ्याच जणी दूरदूरच्या खेड्यांतून आल्या होत्या; तरी इतर काही जणी अशा होत्या की ज्यांनी सुखवस्तु व ऐश्वर्यशाली जीवनावर तुळशीपत्र ठेवले होते. जणू एका नवीन संजीवनी मंत्राने त्या सर्वांनाच भारावून टाकले होते. लाठीमार-गोळीबाराला तोंड देत त्या धैर्याने आगेकूच करीत होत्या. गांधीजींना अटक झाली तेव्हा त्यांच्या पाठोपाठ चळवळीचे नेतृत्व करण्यास एक स्त्रीच पुढे आली होती. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही स्वतःकडे राजकीय पुढारीपण घेतले व निरनिराळ्या जबाबदाऱ्या कुशलतेने पार पाडून दाखविल्या. प्रत्येक क्षेत्रामध्ये त्या शेकडोंनी, हजारोंनी सामील झाल्या व त्यांनी आपल्या कर्तृत्वामुळे गांधीजींकडून प्रशस्ती मिळविली की, 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी बजावलेली अमोल कामगिरी सुवर्णाक्षरात कोरून ठेवावी लागेल.'

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांची कर्तबगारी वाढत्या प्रमाणात

१९४७ साली राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झालेल्या भारतात एक नवा कालखंड सुरू होत असताना स्त्रियांना त्यांचे योग्य स्थान मिळावे हे क्रमप्राप्तच होते. देशाची

घटना जेव्हा तयार केली गेली तेव्हा तीत स्त्रीपुरुषसमानता, सर्व क्षेत्रांमध्ये उभयतांना समानसंधी व सारख्या कामासाठी सारखेच वेतन यांस स्पष्टपणे मान्यता दिली गेली. त्यानंतर घटनेने मान्य केलेली समानता प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने पूर्वीच्या अनेक कायद्यांतील विषमता दूर करणाऱ्या सुधारणा संमत झाल्या.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात स्त्रियांनी वाढत्या प्रमाणात नव्या नोकऱ्या व नव्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. व्यापारधंद्यापासून ते राजकारणापर्यंत व कलाक्षेत्रापासून ते समाजकल्याणक्षेत्रापर्यंत त्या उत्साहाने आपला वाटा उचलीत आहेत. लोकसभा व राज्यांच्या विधानसभा यांच्या निवडणुकीसाठी जो स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला आहे त्याचा परिणाम हितकारक ठरला आहे आणि विशेष म्हणजे पुरुष मतदारांपेक्षा स्त्रीमतदारांनी आपले मत नोंदविण्याविषयी कितीतरी अधिक उत्साह दाखविला आहे. काही राजकीय पक्षांचे स्वतंत्र महिला विभाग असून त्यांनी आपले उमेदवार निवडताना स्त्रियांना योग्य प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण १० कोटी स्त्रीमतदार होते व त्यांपैकी ४० टक्के म्हणजे ४ कोटी मतदारांनी मतदान केले. निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये राज्यविधानसभांमध्ये १५४ व लोकसभेमध्ये ३२ स्त्री-उमेदवार निवडून आले आहेत.

उत्तरोत्तर सर्व वयाच्या स्त्रिया व मुली विविध प्रकारच्या नोकरीधंद्यामध्ये जास्त जास्त प्रमाणात भाग घेऊ लागल्या आहेत. उच्च शिक्षणामध्ये स्त्रिया मागे राहिल्यामुळे त्याबाबतीत चालना देण्यासाठी व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यतः स्त्रियांचीच एक खास समिती नेमण्यात आली होती व तिचे अध्यक्षपद एका स्त्रीकडे होते. विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊ न इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी स्वतंत्र पॉलिटेक्निक शाळा स्थापन केल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांना जीवनोपयोगी व व्यावहारिक उद्योग-व्यवसायात पडता येऊ लागले आहे. समाजविकासाच्या व राष्ट्रीय विस्तारकार्यक्रमांच्या सर्व योजनांमध्ये स्त्रिया उत्साहाने भाग घेत आहेत. देशातील कला व हस्तव्यवसाय यांचे पुनरुज्जीवन करण्यात तर त्यांनी उल्लेखनीय भाग घेतला आहे.

मध्यवर्ती समाजकल्याण मंडळ

स्त्रियांनी समाजकल्याण क्षेत्रामध्ये बजावलेली कामगिरी तर खचितच नेत्रदीपक आहे. या क्षेत्राकडे गांधीजींचे विशेष लक्ष असे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांनी या क्षेत्रात चांगल्या परंपरा तयार केल्या आहेत. त्यांच्या पत्नी कस्तुरबा यांच्या नावे उभारण्यात आलेला निधी ग्रामीण भागातील कार्यावर लक्ष केंद्रित करीत आहे. तेथील कार्याला चेतना देत आहे. तसेच कस्तुरबा निधीतर्फे खेड्यांत काम करू इच्छिणाऱ्या स्त्रियांना ग्रामसेविकेचे प्रशिक्षण दिले जाते. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच ग्रामीण कार्यासाठी आखलेल्या या योजनेतील कार्यक्रमांना आकार प्राप्त झाला होता. ग्रामीण स्त्रियांना स्वतःचा विकास घडवून आणण्यास उद्युक्त करण्यासाठी गेल्या दशकामध्ये 'ग्रामीण

महिला संघ' स्थापन केला गेला आहे. तथापि या संघटनांपेक्षाही सर्वांत अधिक प्रभाव पाडणारी संस्था म्हणजे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या कक्षेतील 'मध्यवर्ती समाज कल्याण मंडळ' ही स्वयंशासित संघटना होय. एका ख्यातनाम स्त्रीच्या उत्साही मार्गदर्शनाखाली या मंडळाने केलेले कार्य अत्यंत स्पृहणीय आहे. मंडळाच्या कार्यात मदत करण्यासाठी स्वयंस्फूर्तपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मंडळाने यशस्वीपणे खेचून घेतले आहे. त्याचप्रमाणे, मंडळाच्या कामात अनेक बिनसरकारी संघटना सामील झाल्या आहेत. उण्यापुऱ्या दहा वर्षांच्या अवधीत मंडळाने अनेक कार्यकर्त्यांमध्ये असलेली सुप्त शक्ती कार्यान्वित केली असून तिची सांगड नदीच्या पात्राप्रमाणे विशाल होत जाणाऱ्या कार्याशी घातली आहे. मंडळाच्या विस्तारकार्यक्रमाच्या द्वारा चाळीस हजारांहून अधिक खेड्यांमध्ये प्रशिक्षित स्त्रीकार्यकर्त्यांना प्रवेश झाला असून त्यांनी त्या खेड्यांतील जीवनामध्ये नवसंजीवन ओतले आहे. या अशिक्षित किंवा अर्धशिक्षित स्त्रियांसाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम आखून त्यांना समाजकार्यकर्त्री, नर्स, दाई, शिक्षिका, चिटणीस, मेट्रन, सुपरिंटेंडंट वगैरेंचे प्रशिक्षण दिले गेले आहे. केवळ या योजनेमुळे पाच हजार निराधार स्त्रिया, साठ हजार मुले व एक लक्ष अपंगांना आधार मिळाला असून त्यांची व्यवस्था आधारगृहे, आफ्टरकेअर होम्स व अनाथाश्रम या समाजसेवा-केंद्रांतून झाली आहे. याखेरीज असंख्य स्त्रियांना संधी प्राप्त करून दिल्यामुळे व त्यांच्यावर जबाबदारी सोपविल्यामुळे त्यांची गुणवत्ता वाढण्यास आणि त्यांच्यामधील नेतृत्वशक्तीचा विकास होण्यास मदत झाली आहे. या सर्वांचा परिणाम समाजाच्या पुनर्रचनेला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यात होत आहे.

()

ग्रंथसूची

[लेखकांनी कळविलेले संदर्भग्रंथ व इतर स्फुट ग्रंथ सोयीकरिता तीन गटांत विभागून दिले असून इंग्रजी ग्रंथ त्याच क्रमाने आहेत. हिंदी व संस्कृत ग्रंथांची संख्या लहान असल्याने ते एकत्रच दिले आहेत.]

स्त्री-जीवन आणि समाज

अळेकर, गो. र.—साध्वी स्त्रिया

आचार्य, हरि महादेव—मुलींच्या वारसा हक्काचा विचार १९४९

आंबेडकर, भीमराव—हिंदु स्त्रियांची उन्नति आणि अवनति याला जबाबदार कोण?; अनु. चांगदेव भ. खैरमोडे १९६१

ईश्वरचंद्र विद्यासागर—विधवाविवाह; अनु. वि. प. पंडित १८६५

ओक, विनायक कोंडदेव—मोठे सोंग! नवरा का बायको! म्हणजे स्त्रियांची परवशता १९०६

कंटक, प्रेमा—हिंदी स्त्रियांचे जीवन १९४५

कट्टी, व्यंकट रंगो—विधवावपन अनाचार १८८९

कानिटकर, गोविंद वासुदेव—स्त्रियांची परवशता (जॉन स्टुअर्ट मिलकृत 'सब्जेक्शन् ऑफ विमेन' नांवाच्या मूळ इंग्रजी निबंधावरून)

काळे चांदेकर, केशव नारायण—अबला प्रेमसुधा १८९६

केळकर, का. न. व खरे बाळूताई—स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

किर्लोस्कर, शा. का.—विवाहसंस्थेचा इतिहास

केळकर, माधव सदाशिव—स्त्रियांची गुलामगिरीपासून सुटका (इंदुप्रकाशपत्रांत प्रसिद्ध झालेला निबंध) १९१०

खरे, दाजी आबाजी—पुनर्विवाह १८९२

खांडेकर, दत्तात्रय गणेश—संपा. हिंदु विवाहाबाबत अधिनियम; सन १९५५ चा भारताचा अधिनियम १५ वा १९५८

गजेंद्रगडकर, के. बा.—हिंदु कायद्यात स्त्रियांचे स्थान १९४४

गोगनाईक, भानु केशव—स्त्रीधर्म (मूळ बंगाली ग्रंथाच्या आधारें)

गांधी, मोहनदास करमचंद—गांधीजींचे स्त्रियांशी हितगुज; संपा. व अनु. मु. गो. देशपांडे व भाऊ धर्माधिकारी १९४६

गांधी, मोहनदास करमचंद—तेजस्वी तरुणी; अनु. वेन्द्रे १९४७

गांधी, मोहनदास करमचंद – स्त्रिया व सामाजिक अन्याय; अनु. प्र. ह. खाडिलकर १९४९
गांधी, मोहनदास करमचंद – स्त्रीजीवन १९६०
गुंजीकर, रामचंद्र भिकाजी – सौभाग्यरत्नमाला : भाग १, २ (विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकामध्ये निरनिराळ्या वेळी लिहिलेले स्त्रीशिक्षणसंबंधी लेख १८८६
गोखले, कृ. के. – हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा १९२२
चौबळ, अनंत महादेव – पुनर्विवाह शास्त्रादिविचार १९११
जोशी, मोरेश्वर हरिश्चंद्र – स्त्रीसद्बोधमाला १८८५
जोशी, रामचंद्र भिकाजी व दत्तात्रय ल. सहस्रबुद्धे – स्त्रीपुनर्विवाह चालू करण्याची कारणें १९१३
जोशी, लक्ष्मण नारायण – महिला जीवन म्हणजेच गृहिणीकर्तव्य १९२१
जोशी, वामन विश्वनाथ – पुनर्विवाह शास्त्रसंग्रह १९१०
जोशी, वासुदेव विनायक – स्त्रियांचे हक्क व सुधारणा १९३८
टिळक, कमलाबाई – स्त्रीजीवनविषयक कांही प्रश्न १९४०
टिळक कमलाबाई – स्त्रीजीवनाची नवीं क्षितिजें १९६५
ढापरे, ज. ना. – स्त्रियांचा प्रश्न
थत्ते, नारायण परशुराम – आदर्श-स्त्रीजीवन (केसरींतून 'स्त्रियांचे समाजातील स्थान आणि आर्यसंस्कृति ' या नावांखाली प्रसिद्ध झालेली लेखमाला) १९४०
दप्तरदार, रघुवीर विठ्ठल आणि अंताजी दि. घेडेकर – विधवाविवाह खंडनाचा साद्यंत इतिहास १८७०
दांडेकर, मालती – तरुणींचे प्रश्न १९४९
दांडेकर, शं. वा. संपा. भारतांतील थोर स्त्रिया अनु. शरयु बाळ १९६३
देशपांडे, कमलाबाई – अपौरुषेय वाङ्मय अर्थात स्त्रीगीतें १९४८
देशपांडे, कमलाबाई – स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल (१८२९ ते १९२९) १९६०
देशपांडे, विमलाबाई – घर आणि अंगण १९५८
दोशी, हिराचंद – बालविवाह
निमकर, दत्तात्रय वासुदेव – हिन्दुलग्नसंस्था ; इतिहास आणि विवाहशास्त्र १९३८
पटवर्धन, रमाबाई – स्त्रियांचे कल्याण १९४७
पटवर्धन, वसुंधरा – आमचे स्त्रीजीवन १९४९
पंडित, विष्णु परशरामशास्त्री – स्त्रीपुनर्विवाहाच्या सशास्त्रतेचा विचार (पुणें व नाशिक येथील व्याख्याने) १८७०
पंडिता रमाबाई – स्त्रीधर्मनीति १९६७
पदमनजी, बाबा – स्त्रीकंठभूषण १८६८
पुनर्विवाह प्रतिबंध निवारणार्थ आजपर्यंत झालेला यत्न व त्याचें फळ.
(ज्ञानदीप मासिकांत प्रसिद्ध झालेला निबंध) १८९६

पेची, फिप्सन – बालविवाह १८९१
बावर, सरोजिनी – मराठीतील स्त्रीधन १९६४
बालविवाह व असंमत वैधव्य (निबंधचंद्रिकेत प्रसिद्ध झालेला निबंध) १८८५
बेडेकर, मालती – घराला मुकलेल्या स्त्रिया व काळाची चाहूल १९६२
बेडेकर, मालती – संकटमुक्त स्त्रियांचे पुनर्वसन १९६४
बेंडे, विनायक यशवंत – विधवादुःखवर्णन आणि विधवाविवाहसंबंधी मुंबई व पुणे येथील खरा इतिहास (काव्य) १८७०
भागवत, राजाराम रामकृष्ण – विधवाविवाह सशास्त्र की अशास्त्र ? १८८५
मोडक, विश्वनाथ आबाजी – हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेची साठ वर्षे १९५६
मोडक, वामन आबाजी – बालविवाहाच्या संबंधाने हिताहित विचार १८८७
यति, परमहंस प्रज्ञानेश्वर – विधवावपनशास्त्रार्थासंबंधी अखेर निर्णय १९२९
यथार्थवर्णनसूचक – विद्वस्तोद्वाहकलिका १८७०
रानडे, राम केशव – स्त्रियांचा कायदा १९४९
रानडे, राम केशव – हिन्दु स्त्रियांच्या मिळकतीबाबत देशमुख कायदा १९४३
रोकडे, जनाबाई – स्त्रियांची सामाजिक कर्तव्ये (फ्लॉरेन्स नाइटिंगेल इच्या चरित्रास अनुसरून दिलेले व्याख्यान) १९१४
लिमये नरगुंदकर, विनायक गो. – स्त्रीशिक्षणज्ञानमाला १८८५
विधवाविवाहाच्या सशास्त्रतेविषयी वाद (हा वाद पुणे मुक्कामी रविवार दि. २७ मार्च १८७०या दिवशीं श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांच्या संनिध दीक्षित यांच्या वाड्यात सुरू झाला त्याचा वृत्तान्त) १८७०
विधवादुःखनिवेदन आणि पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयी विचार १८८५
विनोबा – स्त्री-शक्ति १९६४
विवेकानंद – भारतीय नारी १९६०
विवेकानंद – भारतीय स्त्रिया, अनु. सरोजिनी कमतनूरकर
विश्वेश्वर – हिंदुसमाज आणि पतित स्त्रियांची सुधारणा १९२९
वैद्य, चिंतामण विनायक – अबलोन्नति लेखमाला १९२९
शंकराचार्यस्वामी (मठ करवीर व संकेश्वर) – विधवाविवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णयपत्र १८७०
शिंदे, ताराबाई – स्त्री-पुरुष तुलना १८८२
श्रीसरस्वतीमंदिर, सोलापूर – उपदेशमाला (लेखसंग्रह)
संत, दु० का० – मराठी स्त्री १९५७
साठे, कृष्ण प्रभाकर – पुनर्विवाह निषेध १८६९
साने, पांडुरंग सदाशिव – भारतीय नारी १९५६

संकीर्ण

अळतेकर, अ० स० – प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति १९३५

आगरकर, गोपाळ गणेश – संपूर्ण आगरकर संपा. अळतेकर १९३७

कर्वे, इरावती – परिपूर्ती, १९४९

कर्वे, इरावती – मराठी लोकांची संस्कृति

कर्वे, इरावती – युगान्त १९६७

काणेकर, अनंत – रसेलनीति १९४१

केळकर, गिरिजाबाई – गृहिणी-भूषण अथवा स्त्रीशिक्षणविषयक स्फुट विचारमाला १९२१

केळकर, गिरिजाबाई – स्त्रियांचा स्वर्ग १९२१

केळकर, द० के० – मराठी साहित्याचे सिंहावलोकन १९६३

केतकर, श्रीधर व्यंकटेश – ब्राह्मणकन्या व भारतीय समाजशास्त्र १९३६

कोलते, वि० भि० – साहित्यसंचार १९६५

चापेकर, नारायण गोविंद – पेशवाईच्या सावलीत १९३७

जावडेकर, शंकर दत्तात्रय – आधुनिक भारत १९५३

जेरेट – ऐने अकबरी : खंड ३ रा

जोग, रा. श्री., संपा. – मराठी वाङ्मयाचा इतिहास (१८००–१८७४). १९६५

जोशी, रा. भि. – मराठी भाषेची घटना १९२३

दाडेकर, वि. पां – मराठी साहित्याची रूपरेषा : पूर्वार्ध – प्राचीन मराठी साहित्य, उत्तरार्ध – अर्वाचीन मराठी साहित्य १९५२

देशपांडे, अ. ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १, २. १९६७

देशपांडे, हरिहर वामन – १८५७ च्या वीर महिला १९५९

नेने, वि. पां. – अर्वाचीन मराठी साहित्य (१८५७–१९३५). १९३५

पट्टाभिसितारामय्या – काँग्रेसचा इतिहास १९३६

पुरंदरे, सरस्वती – मराठी सामाजिक कादंबरी वाङ्मयातील स्त्रीजीवन १९५४

प्रदक्षिणा – (१८४० ते १९५५ या कालातील मराठी वाङ्मयाचे समीक्षण) १९६०

भारत इतिहास संशोधक मंडळ – पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार

भारतीय विद्याभवन – भारताचा इतिहास, खंड ६ वा

भावे, वा. कृ. – पेशवेकालीन महाराष्ट्र १९३५

भावे, वि. ल. – महाराष्ट्र सारस्वत १९५१

मगदूम, अप्पाभाऊ – जैन वीर स्त्रिया १९३६

माशेंड – शालिनीची निवडक पत्रे

माटे, श्रीपाद महादेव – कर्तबगार स्त्रिया १९५७

लोकहितवादी – लोकहितवादींची शतपत्रे १९४०

वाटवे के. ना. – संस्कृत महाकाव्याचे पंचप्राण १९४७
समर्थशिष्य (टोपण) – पौराणिक स्त्रीरत्ने १९१६
सरदेसाई, गो. स., संपा. – पेशवे दफ्तरातील निवडलेले कागद भाग ३२ वा, १९३०
सरवटे, वि. सी. – मराठी साहित्य समालोचन खंड १, २ (१८१८–१९३४), १९३७
साठे, म. दा. – पौराणिक स्त्रियांच्या रम्य कथा १९६१
क्षीरसागर, श्री. के., संपा. कुलकर्णी व्ही. डी. – बायका १९६२

व्यक्तिविषयक

(आठवले, पा.) माझी कहाणी – पार्वतीबाई आठवले १९३६
(कर्वे, धों. के.) आत्मवृत्त व चरित्र – धोंडो केशव कर्वे १९५८
(टिळक, बा. गं.) लोकमान्य टिळक – न. चि. केळकर
(निवेदिता, भगिनी) भगिनी निवेदिता
(पंडिता रमाबाई) स्तुति सुमने – कृष्णाबाई गद्रे १९३९
(पंडिता रमाबाई) महाराष्ट्राची तेजस्विनी : पंडिता रमाबाई १९६०
(पंडिता रमाबाई) पंडिता रमाबाई – दे. ना. टिळक १९६०
(पंडिता रमाबाई) पंडिता रमाबाई – के. सी. ठाकरे १९५०
(पंडिता रमाबाई) पंडिता रमाबाई यांचे चरित्र – मराठी वाङ्मय कमिटी, बॉम्बे रिप्रेझेन्टेटिव्ह काउन्सिल, १९३१
(पंडिता रमाबाई) अग्रेसर स्त्री कैवारी : पंडिता रमाबाई – संपा. मु. धों. रामटेके व र. ना. हर्षे १९५७
(पंडिता रमाबाई) पंडिता रमाबाई (नवयुग मासिकात प्रसिद्ध झालेले लेख) – द्वा. गो. वैद्य
(फुले, ज्योतीराव गोविंद) महात्मा ज्योतीराव फुले – वसंत देसाई १९६५
(रानडे, महादेव) न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र – न. र. फाटक १९६६
(रानडे, रमाबाई) आमच्या आयुष्यातील काही आठवणी – रमाबाई रानडे १९५३
(राय, राजा राममोहन) आधुनिक हिंदुस्थानचे जनक राजा राममोहन राय – ना. म. केळकर

अहवाल २

आर्यकन्या महाविद्यालय (बडोदे)
कन्या गुरुकुल (जलंदर)
कन्या विद्यालय (नडियाद)
खानेसुमारी अहवाल (१९०१ ते १९६१)
भारत महिला परिषद १९०६

हिंदी

टंडन, यशपाल – पुराण-विषय समनुक्रमणिका १९५२

नागर, अमृतलाल – ये कोठेवालिया १९६१

प्रशान्तकुमार – वैदिक साहित्य में नारी

बेणीपुरी रामवृक्ष – नई नारी : भारतीय नारी की नई पिढी की समस्याओ पर एक रोशनी १९६४

भवाळकर, वनमाला – महाभारत में नारी

सांकृत्यायन, राहुल – व्होल्गा से गंगा

संस्कृत

अग्निपुराण – आनंदाश्रम प्रत

नारदपुराण – वेंकटेश्वर प्रत

पद्मपुराण – ,, ,,

ब्रह्मपुराण – , ,

भविष्यपुराण – ,, ,,

मत्स्यपुराण – ,, ,,

मदन पारिजात – (१४ व्या शतकातील स्मृतिग्रंथ)

पाराशर माधव स्मृतिग्रंथ

Woman and Society Individual

Aiyangar, Bhashyam, K T.—"Women in Hindu Law".

Altekar, A. S.—"The Position of Women in Hindu Civilization", 1956

Appadorai, A., Ed —"Status of Women in South Asia," 1954.

Baig, Tara Ali—"Women of India", 1958.

Bachmann, Hedwig, Tr by Sheelavati Ketkar—"On Soul of Indian Woman", 1942.

Bader Clarisse—"Women in Ancient India: Moral and Literary Studies", tr. by M. E R. Martin, 1964.

Baroda Committee—Report: "Hindu Women's Property Rights."

Baroda, Maharani of, and Mitra, S M—"The Position of Women In Indian Life", 1911.

Barve—"Present Position of Hindu Women and Means of Ameliorating Their Lot".

Baveja, Malik Ram—"Woman in Islam" tr. by M Abdul Ali

Caton, A. R., Ed.—"Key of Progress : A Survey of the Status and Conditions of Women in India", 1930.

Chattopadhyaya, Kamaladevi and Others—"The Awakening of Indian Women", 1939.

Chaudhari, Jatindra Vimal—"Sanskrit Poetesses".

Chaudhary, Rooplal—"Hindu Woman's Right to Property (Past and Present)", 1961.

Chiplunkar, G. M.—"The Scientific Basis of Women's Education", 1930.

Choksi, Mithan and Gedge, Evelyn C., Eds.—"Women in Modern India" (15 papers by Indian women writers), 1929.

Christian Literature Society—"Women of India and What Can Be Done for them", 1895.

Cormack, Margaret—"The Hindu Woman", 1961.

Cousins, Margaret—"Awakening of Asian Womanhood".

Cousins, Margaret—"Indian Womanhood Today", 1947.

Curle, R.—"Women—An Analytical Study".

Das, Freida M. (Mrs.)—"Purdah, the Status of Indian Women", 1932.

Das, R. M.—"Woman in Manu and His Seven Commentators", 1962.

Desai, Neera—"Woman in Modern India", 1957.

Gajendragadkar, K. B.—"Legal Rights of Hindu Women".

Gandhi, M. K.—"Women and Social Injustice", 1954.

Gedge, Evelyn C. and Choksi, Mithan, Eds.—"Women in Modern India", 1929.

Gharpure, J. R.—"Rights of Women Under the Hindu Law", 1943.

Gujarati, B S.—"Woman of East and West", 1944.

Handigiri—"The Women Poets of the Rgveda".

Hardinge, M. E—"The Way of All Women".

Haridas Nanabhai and Shantaram Narayan—"Legal Opinions on Caste-meetings and ex-Communications with reference to the late Marriage of a Brahman Widow".

Hate, Chandrakala—"Hindu Woman and Her Future", 1948.

Holtby—"Women and Changing Civilization".

India Information Service—"Women in India".

Indra—"The Status of Women in Ancient India", 1955

Joyce, T. A., Ed.—"Women of All Nations", 1910.

Kacker, Muralidhar—"Hindu Shastras on Marriage of Widows".

Klein, Viola—"Feminine Character".

Madhavananda (Swami) and Ramesh Chandra Majumdar—"Great Women of India", 1953.
Mason, O. T.—"Women's Share in Primitive Civilization".
Mysore Committee—"Report: Women's Rights under Hindu Law".
Mill, John Stuart—"Subjection of Women".
Pandita Ramabai—"The High Caste Hindu Woman", 1888
Pathare Reform Association, Bombay—"Marriage of Hindu Widows", 1869.
Pinkham, Mildreth Worth—"Women in the Sacred Scriptures of Hinduism", 1941
Prabha—"Hope for Rajasthan and Abolition of Purdah", 1959.
Rajgopal, T. S—"Indian Women in the New Age or Women in Young India", 1936.
Rao Shastri, Shakuntala—"Women in the Sacred Laws", 1953
Rao Shastri, Shakuntala—"Women in the Vedic Age", 1954
Rothfeld, Otto—"Women of India", 1958.
Russell, Bertrand—"Marriage and Morals".
S Shridevi—"A Century of Indian Womanhood", 1965
Sarma, N. A.—"Woman and Society", 1947.
Sengupta, P.—"Women Workers of India", 1960
Shah, K. T.—"Women's Role in Planned Economy", 1947
Thomson, E.—"The Sattee", 1928.
Thomas, P.—"Indian Women Through the Ages", 1964
Tribhuvan, Jyotsna—"Law Relating to Women in India", 1965
Upadhyaya—"Women in Rgveda", 1933
Urquhart, Margaret M.—"Women of Bengal · A Study of the Hindu Pardansins of Calcutta", 1926.
Ward, Barbara E., E—"Women in the New Asia: the Changing Social Roles of Men and Women in South and South-East Asia", 1963
Westermark—"History of Marriage".
White, E. M—"Women and Civilization".
Wolstoncrafts—"Vindication of Rights of Women".

GENERAL

Adam—"Report on State Education in Bengal".
Altekar, A. S.—"Education in Ancient India", 1934.
Bhagwandas—"Indian Ideals of Women's Education".
Bombay Education Department—"Compilation of Opinions on the Subject of the Education of Girls and Women called for by Government Order", 1976

Durant, Will—"Story of Civilization".
Elliot and Dowson—"History of India", 1867.
Engels, F.—"Origin of Family".
Hartog Committee Report—"India Government—Age of Consent Committee Report", 1928.
India Government: Labour and Employment Ministry, Labour Bureau—"Women in Employment", 1964.
Karve, D. K.—"My Twenty Years in the Cause of Indian Women", 1915.
Law, Bimal Churan—"Women in Buddhist Literature", 1927.
Megasthenes—"Ancient India", tr. McCrindle, 1877.
Mukerjee—"History of Education in India".
National Committee on Women's Education, India—Reports 1958-59, 1964-65.
Nehru, Jawaharlal—"Glimpses of World History".
Nilkantha (Shastri)—"History of South India".
"Progress of Women's Education in British Empire"
Randell—"Creative Centuries".
"Review of Education in Bombay State, 1855 to 1955".
Radhakrishnan, S—"Report on Education".
Ramakrishna Mission Pub—"Cultural Heritage of India".
Rege, Y. M—"Whither Women?"
Roy, M. N—"Ideal of Indian Womanhood", 1941.
Sachau—"Alberuni's India", 1914.
Saiyadine, K. G.—"Education in India".
Smith, V. A.—"History of Fine Arts", 1910.
Sternbach, Ludwik—"Ganika-Vritta-Sangraha" or "Text on Courtezans in Classical Sanskrit", 1953.
Syed Nurullah and J. P. Naik—"History of Education in India".
Unesco—"Women and Education".

INDIVIDUAL

· Besant, A.—"An Autobiography".
Dutt, G. S—"Woman of India: Being the Life of Saroj Nalini", 1929.
Karve, D. K—"Looking Back" (autobiography), 1934.

0